# brow book

UNIVERSAL LIBRARY
OU_192284
UNIVERSAL LIBRARY

# देशसेवा

अथवा

# भारतसेवकांतील निवडक लेख.

लेखक :

रामचंद्र गणेश प्रधान बी. ए. एलूएल. बी., ॲड्व्होकेट, लोकनियुक्त
सभासद, मुंबई कायदे कौन्सिल, फेलो मुंबई युनिव्हर्सिटी,
ग्रंथकार, प्रतिनिधिसत्ताक राज्यपद्धति व हिंदुस्था-
नांतील स्वराज्याचा लढा ( इंग्रजी )

पुणें पेठ भांबुर्डा घ. नं. १३६।२ येथें आर्यभूषण छापखान्यांत अनंत
विनायक पटवर्धन यांनीं छापिलें व रामचंद्र गणेश प्रधान बी. ए.
एलूएलू. बी., ॲड्व्होकेट, यांनीं नाशिक येथें प्रसिद्ध केलें.

१९३०.

किंमत १ रुपये.

# स्वराज्यग्रंथमाला.

**पुष्प १ लें**:--प्रतिनिधिसत्ताक राज्यपद्धति (पहिल्या आवृत्तीच्या फारच थोड्या प्रती शिल्लक आहेत. दुसरी आवृत्ती छापत आहे. किंमत १ रुपया.)

**पुष्प २ रें**:--India's Struggle for Swaraj (हिंदुस्थानांतील स्वराज्याचा लढा) हा ग्रंथ इंग्रजींत आहे. किंमत ४ रुपये.

**पुष्प ३ रें**:--देशसेवा अथवा **भारतसेवकां**तील निवडक लेख. किंमत ३ रुपये.

**पुष्प ४ थें**:--प्लेटो व त्याचे राजकीय विचार किंमत ६ आणे.

**पुष्प ५ वें**:--रूसो व त्याचे विचार (तयार होत आहे.)

हीं सर्व पुस्तकें ग्रंथकर्ते आमदार रा. ग. प्रधान, यांच्याकडे नाशिक येथें मिळतील.

# अर्पण पत्रिका.

कायदेकौन्सिलच्या नाशिक जिल्ह्यांतील मतदारांनीं मला
१९२३ व १९२६ सालीं आपला प्रतिनिधि म्हणून
निवडून दिलें, त्याबद्दल अत्यंत कृतज्ञतापूर्वक
व प्रेमपूर्वक हा लेखसंग्रह त्यांस मी
नम्रपणें अर्पण करितों.

नाशिक,
ता. १ मे १९३०.

रा. ग. प्रधान.

# प्रस्तावना.

मी १९१६ च्या जानेवारी महिन्यांत **भारतसेवक** नांवाचें मासिक सुरू केलें, व तें १९२० पर्यंत चालविलें. त्यांत प्रसिद्ध झालेले माझे निवडक लेख या पुस्तकांत ग्रंथित करण्यांत आले आहेत. आपल्या लेखांस थोडें तरी कायमचें स्वरूप प्राप्त व्हावें असें लेखकास साहजिकपणें वाटत असतें; व ह्या नैसर्गिक मनोवृत्तीस अनुसरूनच हा लेखसंग्रह मी प्रसिद्ध करीत आहें.

**भारतसेवक** प्रसिद्ध होऊं लागलें तोपर्यंत, म्हणजे १९१५ सालापर्यंत, मराठी मासिकांत राजकीय विषयांची चर्चा फारच थोडी होत असे. राजकीय विषयांचें प्रमुखपणें सांगोपांग विवेचन करणारें पहिलें मराठी मासिक **भारतसेवक** होय, हें सर्वसंमत आहे. राजकीय विषयांवर मराठी मासिकांनीं घातलेला बहिष्कार **भारतसेवकानें** पूर्णपणें उठविला असें म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं.

या लेखसंग्रहांत महत्वाच्या विषयांची चर्चा झालेली आहे, हें वाचकांच्या लक्षांत सहज येईल. त्यांत व्यक्त केलेले विचार अद्यापही मननीय ठरतील असा माझा दृढ भरंवसा आहे. गेल्या दहा वर्षांत आपली बरीच प्रगति झाली आहे, तथापि त्यामुळें या लेखसंग्रहांत व्यक्त केलेल्या बहुतेक तत्वांस मुळींच बाध आलेला नाहीं. निदान उत्क्रांतिन्यायानें त्यांतील विचारांचें महत्त्व प्रत्येकास पटेल, ह्याबद्दल मला शंका वाटत नाहीं.

नाशिक,
ता. १ मे १९३०.

**रामचंद्र गणेश प्रधान.**

# अनुक्रमणिका.


| विषय | | पान |
|---|---|---|
| १ | आम्ही स्वराज्यास अपात्र आहोंत काय ? ... ... | १ |
| २ | स्वराज्याची पात्रता. ... ... ... ... | २४ |
| ३ | आम्ही स्वराज्य कां मागतों. ... ... ... | ४२ |
| ४ | मि. कर्टिस आणि 'राऊंड टेबल' संघ. ... ... | ६८ |
| ५ | मि. मॉँटेग्यु यांनीं जाहीर केलेलें धोरण. ... ... | १०९ |
| ६ | व्हाईसरॉयसाहेबांचें भाषण, ... ... ... | ११६ |
| ७ | मॉँटेग्यु-चेल्म्सफर्ड सुधारणांची योजना. लेखांक १ ... | १३८ |
| ८ | मॉँटेग्यु-चेल्म्सफर्ड सुधारणांची योजना. लेखांक २ ... | १९३ |
| ९ | सुधारणेचा कायदा व पुढील धोरण ... ... | २२८ |
| १० | परलोकवासी दादाभाई नौरोजी ... ... ... | २६० |
| ११ | अप्रत्यक्ष प्रतिकार ... ... ... ... | २७७ |
| १२ | पुस्तक-परीक्षण प्रो. रॉलिन्सनकृत शिवाजीचें चरित्र ... | २९४ |
| १३ | ना. पटेल यांचें जातींजातींतील विवाहविषयक बिल ... | ३०६ |

# देशसेवा

अथवा

**श्री. रामचंद्र गणेश प्रधान**

बी. ए., एल्एल्. बी., एम्. एल्. सी.,

**यांचे**

**भारतसेवकांत प्रसिद्ध झालेले निवडक लेख.**

## आम्ही स्वराज्यास अपात्र आहोंत काय ?

वरील प्रश्न आम्हास स्वतःला विचारण्याची पाळी यावी, ही मोठी दुःखाची व दुर्दैवाची गोष्ट होय. वास्तविक पाहतां, कोणत्याहि सुसंस्कृत राष्ट्राविषयीं हा प्रश्न विचारण्याचें कारण पडूं नये. कारण, अशा प्रत्येक राष्ट्रांत स्वराज्याची पात्रता कमी अधिक प्रमाणानें आढळल्यावांचून राहत नाहीं. किंबहुना, स्वराज्याची पात्रता व आपला राज्यकारभार स्वतः चालविण्याची बुद्धि, हीं सुसंस्कृतपणाचीं अवश्य अंगें होत, असें म्हटलें असतां अतिशयोक्ति होणार नाहीं. आतां ही पात्रता व बुद्धि एखाद्या समाजांत किंवा राष्ट्रांत वसत असतांनाहि, कांहीं कारणपरत्वें त्या समाजास किंवा राष्ट्रास स्वराज्याची पवित्र जबाबदारी आपले शिरावर घेण्यास, व ती जबाबदारी अंगावर घेतल्यामुळें होणारा अप्रतिम आनंद अनुभवण्यास, मिळत नाहीं, ही गोष्ट अलाहिदा होय. परंतु तितक्यावरून त्या समाजाच्या किंवा राष्ट्राच्या स्वराज्यविषयक पात्रतेविरुद्ध कोणी अनुमान काढल्यास तें बरोबर होणार नाहीं. एखादा देश चांगला सुधारलेला असूनहि, जर त्या देशांतील लोक स्वराज्यसुख उपभोगीत नसतील तर, त्याचें कारण मुख्यत्वेंकरून एखाद्या बलाढ्य व्यक्तीची प्रचंड स्वार्थी महत्त्वाकांक्षा किंवा एखाद्या प्रबळ सत्ताधारी वर्गाची आपले हातांतून आपलें वर्चस्व गमावूं न देण्याची उत्कट इच्छा व त्या इच्छेनुसार त्या वर्गाचें वर्तन, हें होय, असें आप-

णास विचारांतीं दिसून येईल. जर्मनीची राज्यव्यवस्था जरी सनदशीर असली तरी, ती इंग्लंडच्या राज्यव्यवस्थेप्रमाणें लोकमतानुयायी नाहीं, जर्मन पार्लमेंटास ब्रिटिश पार्लमेंटाप्रमाणें पूर्ण अखत्यार नाहीं, हें सर्वांना माहीत आहेच. परंतु, तितक्यावरून ब्रिटिश लोक स्वराज्यास अधिक पात्र आहेत व जर्मन लोक कमी पात्र आहेत, असें अनुमान काढल्यास तें बरोबर होईल काय ? फार झालें तर इतकें म्हणतां येईल कीं, कांहीं कारणपरत्वें जर्मनींत इंग्लंडाप्रमाणें अद्याप स्वराज्याची व्हावी तशी वाढ झालेली नाहीं. परंतु स्वराज्याची वाढ होत जाणें किंवा न जाणें, व स्वराज्यास अपात्र असणें, ह्या दोहोंमध्यें जमीनअस्मानाचें अंतर आहे, हें सांगावयास नको. दुसरें उदाहरण पाहिजे असल्यास रशियाचें घेतां येईल. रशियाची राज्यपद्धति जवळ जवळ एकतंत्री आहे, तेथील पार्लमेंट म्हणजे ड्यूमा, हिच्या हातांत फारच अल्प सत्ता आहे, बादशहा व त्याचें मंत्रिमंडळ यांच्याच इच्छेनुसार रशियाचा राज्यकारभार चालतो, हें सर्वश्रुत आहेच. परंतु, रशियांत एकतंत्री राज्यपद्धति प्रचलित आहे, म्हणून रशियन लोक स्वराज्यास अपात्र आहेत, असें कोणी प्रतिपादन करतो काय ? उलट, कांहीं वर्षांपूर्वी झारनें ड्यूमा बरखास्त केली व राजकीय सुधारकांचा छळ करून कित्येकांना तर सायबीरियाच्या अतिथंड प्रदेशांत कारागृहवास भोगावयास लाविलें, तेव्हां त्याच्या सुलतानी वर्तनाबद्दल ब्रिटिश मुत्सद्दी व ब्रिटिश वर्तमानपत्रकार ह्यांनीं कडक टीका केली नाहीं काय ? चिनी लोकांनीं आपले देशांत प्रजासत्ताक राज्यपद्धति स्थापन करण्याकरितां कित्येक वर्षें चळवळ करून ती सरतेशेवटीं सफळ झाली असतां, तिचा बींमोड करून व पूर्ववत् राजसत्ता स्थापन करून आपण स्वतः तख्तानशीन होण्याचें युआन् शिकायनें कृष्णकारस्थान चालविलें आहे, याचें कारण युआन् शिकायची राक्षसी महत्त्वाकांक्षा नसून चिनी लोकांची स्वराज्यविषयक अपात्रता होय, असें कोणी प्रतिपादन करूं लागल्यास, तें बरोबर होईल काय ? सारांश, प्रत्येक सुधारलेल्या राष्ट्रांत स्वराज्याची पात्रता ही थोड्याबहुत प्रमाणानें अंगभूतच असते. व अशी वास्तविक स्थिति असल्यामुळें मुख्य प्रश्न आहे तो, अमका सुधारलेला देश स्वराज्यास पात्र आहे किंवा नाहीं, हा नसून त्याचेठायीं असलेली पात्रता व्यक्त करण्याकरितां व तिचें पोषण करण्याकरितां कोणत्या योजना अमलांत आणल्या पाहिजेत, हा होय. राजकारण ही अत्यंत महत्वाची व अवघड कला आहे, यांत शंका नाहीं परंतु ग्रीक तत्ववेत्ता प्लेटो ह्यानें आपल्या 'पॉलिटिक्स' ग्रंथांत म्हटल्याप्रमाणें

परमेश्वरानें त्या कलेचें थोडेंबहुत ज्ञान बीजरूपानें प्रत्येकास निसर्गतःच दिलेलें आहे, व हें नैसर्गिक ज्ञान हाच स्वराज्याचा पाया होय.

अशी वास्तविक स्थिति असल्यामुळें आम्ही हिंदी लोक स्वराज्यास पात्र आहोंत काय? असा प्रश्न विचारणें म्हणजे एका अर्थी आमच्या सुसंस्कृतपणाबद्दलच शंका घेणें होय. तथापि ज्याअर्थी हा प्रश्न उपस्थित होऊन त्याबद्दल सध्यां जिकडे तिकडे खल चालू आहे, त्याअर्थी प्रस्तुत लेखांत त्याचा शांतपणानें व सांगोपांग विचार करण्याचा आमचा मानस आहे.

प्रथम स्वराज्य म्हणजे काय ह्याची स्पष्ट कल्पना असणें जरूर आहे. स्वराज्य म्हणजे राष्ट्रीय स्वातंत्र्य नव्हे, हें आतां कोणास सांगावयास पाहिजे असें नाही. स्वराज्यास मुख्यत्वेंकरून दोन गोष्टी अवश्य लागतात. त्या ह्याः— (१) प्रतिनिधिमंडळ व (२) प्रधानमंडळावर किंवा कार्यकारी कौन्सिलावर प्रतिनिधिमंडळाची हमखास हुकमत. प्रतिनिधिमंडळ आहे, परंतु जर त्या मंडळाची प्रधानमंडळावर किंवा कार्यकारी कौन्सिलावर सत्ता चालत नसेल, म्हणजे अन्य शब्दांनीं सांगावयाचें असल्यास, प्रतिनिधिमंडळाच्या ठरावाप्रमाणें प्रधानमंडळानें किंवा कार्यकारी कौन्सिलानें वागलेंच पाहिजे, असा जर निर्बंध नसेल, प्रतिनिधिमंडळानें व्यक्त केलेली इच्छा व दिलेला सल्ला प्रधानमंडळास किंवा कार्यकारी कौन्सिलास जर धाब्यावर बसवितां येत असेल, तर सदरहु प्रतिनिधिमंडळ केवळ सल्लागार मंडळ होय; व जरी कालांतरानें त्या मंडळाची प्रधानमंडळावर किंवा कार्यकारी कौन्सिलावर सत्ता स्थापित होईल, तरी ती सत्ता स्थापित होईतोंपर्यंत, स्वराज्याची स्थापना झाली, असें म्हणतां येणार नाही. आस्ट्रेलिया, कानडा, दक्षिणआफ्रिका, न्यू फाउंडलंड व न्यू झीलंड हे जे स्वराज्य उपभोगिणारे ब्रिटिश साम्राज्यांत देश आहेत, व फ्रान्स, इंग्लंड इत्यादि जे स्वराज्य उपभोगिणारे स्वतंत्र देश आहेत, त्या सर्व देशांत प्रतिनिधिमंडळाची प्रधानमंडळावर किंवा कार्यकारी कौन्सिलावर हमखास हुकमत चालते. व म्हणून त्या देशांत स्वराज्य आहे, असें म्हणण्यांत येतें. असल्या 'स्वराज्यास' इंग्रजींत 'Responsible Government' म्हणजे 'जबाबदारीचें राज्य' म्हणतात. याचा अर्थ असा कीं, प्रधान मंडळ किंवा कार्यकारी कौन्सिल, हें आपल्या धोरणाबद्दल, आपल्या सर्व कृत्यांबद्दल, व प्रतिनिधिमंडळानें पसार केलेले ठराव व कायदे अमलांत आणण्याबद्दल,

प्रतिनिधिमंडळास पूर्णपणें जबाबदार आहे. अशा प्रकारची राज्यव्यवस्था ज्या देशांत नाहीं, त्या देशांत स्वराज्य आहे, असें म्हणतां येणार नाहीं. सारांश प्रतिनिधिमंडळाची प्रधानमंडळावर किंवा कार्यकारी कौन्सिलावर हमखास हुकमत चालणें, हें स्वराज्याचें सार होय. व हिंदुस्थानास स्वराज्य मिळालें पाहिजे, याचा अर्थ असा कीं, हिंदुस्थानचा राज्यकारभार चालविण्याकरितां ( १ ) प्रतिनिधिमंडळ पाहिजे व ( २ ) त्या मंडळाची कार्यकारी कौन्सिलावर हमखास हुकमत चालली पाहिजे. हिंदुस्थानचें व हिंदुस्थानांतील भिन्न भिन्न प्रांतांचीं अशीं कायदे कौन्सिलें आहेत. परंतु त्यांतलि सर्व सभासद नागरिकांनी निवडून दिलेले नसल्यामुळें, हीं कौन्सिलें सर्वांशीं प्रतिनिधिमंडळें आहेत, असें म्हणतां येत नाहीं. मद्रास, मुंबई, बंगाल, पूर्वबंगाल व असाम, संयुक्तप्रांत, मध्यप्रांत, पंजाब व ब्रह्मदेश ह्यांपैकीं प्रत्येक प्रांतांत, प्रांतिक कायदेकौन्सिल आहे. व शिवाय सर्व हिंदुस्थानचें म्हणून, एक स्वतंत्र कायदेकौन्सिल आहे, त्यास 'इंपीरियल' कायदेकौन्सिल म्हणतात. प्रांतिक कौन्सिलांत जे अंमलदार नाहींत अशा सभासदांची संख्या अंमलदार सभासदांपेक्षां अधिक आहे; इंपीरिअल कौन्सिलांत ती कमी आहे. परंतु कोणत्याहि कौन्सिलांत नागरिकांनीं निवडून दिलेल्या सभासदांची संख्या, सरकारनें नेमिलेल्या अंमलदार व बिनअंमलदार सभासदांच्या संख्येपेक्षां कमी आहे. सबब, सदरहु कौन्सिलें केवळ अंशतःच प्रतिनिधिमंडळें आहेत, पूर्णपणें प्रतिनिधिमंडळें नाहींत, हें उघड आहे. कायदे कौन्सिलांची घटनाच अशी असल्यामुळें, तीं केवळ सल्लागारमंडळें असावींत, व त्यांचा कार्यकारी कौन्सिलांवर कांहींएक ताबा चालूं नये, ह्यांत नवल नाहीं.

वरील विवेचनावरून कोणाच्याहि लक्ष्यांत येईल की, हिंदुस्थानास स्वराज्य दिलें पाहिजे, या मागणीचा अर्थ असा कीं, ( १ ) हिंदुस्थानांतील प्रांतिक व 'इंपीरिअल' कौन्सिलांतील सर्व सभासद नागरिकांनीं निवडलेले असले पाहिजेत; व ( २ ) त्या कौन्सिलांचा कार्यकारी कौन्सिलांवर ताबा चालला पाहिजे. नागरिकप्रतिनिधिसत्ता हें स्वराज्याचें सार होय.

इंग्लंड, इटली, फ्रान्स, जपान वगैरे स्वराज्य उपभोगिणाऱ्या स्वतंत्र देशांत, व ब्रिटिश साम्राज्यांतील स्वराज्य उपभोगिणाऱ्या बहुतेक वसाहतींत, प्रतिनिधिमंडळाखेरिज दुसरें एक मंडळ आहे. त्यास 'अमीरउमरावांचें' ( House of

*

Lords ) मंडळ, सेनेट, लेजिस्लेटिव्ह कौन्सिल वगैरे भिन्न ठिकाणीं भिन्न संज्ञा आहेत. उपरिनिर्दिष्ट वसाहतींत प्रतिनिधिमंडळास बहुतेक ठिकाणीं 'लेजिस्लेटिव्ह असेंब्ली' ही संज्ञा आहे. सारांश, सदरहु वसाहतींत राज्यकारभार चालविण्याकरितां दोन मंडळें आहेत; परंतु सर्व सत्ता अर्थातच प्रतिनिधिमंडळांच्या हातांत आहे. अशा दोन मंडळांच्या द्वारें राज्यकारभार चालविणें अधिक चांगलें, किंवा एकट्याच प्रतिनिधिमंडळाच्या द्वारें राज्यकारभार चालविणें अधिक चांगलें हा राजकीय शास्त्रांतील ( Political Science ) एक महत्त्वाचा परंतु बराच वादग्रस्त प्रश्न आहे. कित्येकांच्या मतें, प्रतिनिधिमंडळाच्या आततायीपणास व अमर्याद सुधारणाबुद्धीस योग्य तो आळा घालण्यास दुसऱ्या मंडळाचा चांगला उपयोग होतो, तर कित्येक असें म्हणतात कीं, नागरिकांना ज्या सुधारणा हव्या असतात, व ज्या अंमलांत आणण्याकरितां ते आपल्या प्रतिनिधींच्या द्वारें प्रयत्न करतात, त्या योग्य वेळीं व योग्य रीतीनें अंमलांत आणण्याचे बाबतीत, ह्या दुसऱ्या मंडळाकडून विनाकारण हरकत येते. ह्या वादग्रस्त प्रश्नाचा प्रस्तुत लेखांत विचार करण्याचें कारण नाहीं. येथें इतकें सांगितलें असतां पुरे आहे कीं, दुसरें मंडळ हें स्वराज्याचें अवश्य अंग नाहीं. म्हणजे प्रतिनिधिमंडळावांचून स्वराज्य असूं शकणार नाहीं, परंतु दुसऱ्या मंडळावांचून स्वराज्य असण्यास कांहीं हरकत नाहीं. हिंदुस्थानांत दोन मंडळें असावीं किंवा एकच प्रतिनिधिमंडळ असावें, म्हणजे एकमंडळी राज्यपद्धति ( Single Chamber System ) किंवा द्विमंडळी राज्यपद्धति ( Bicameral System ) असावी, हा प्रश्न राजकीय शास्त्राच्या किंवा कलेच्या दृष्टीनें महत्त्वाचा असेल; परंतु स्वराज्याच्या दृष्टीनें तो गौण आहे. नागरिकांनीं पूर्णपणें निवडलेलें प्रतिनिधिमंडळ असलें, व त्या मंडळाची कार्यकारी कौन्सिलावर हमखास हुकमत चालली म्हणजे हिंदुस्थानास स्वराज्य प्राप्त झालें, असें म्हणण्यास हरकत नाहीं.

नागरिकप्रतिनिधिसत्ता हें स्वराज्याचें सार होय, हें वर सांगितलेंच आहे. नागरिक म्हणजे ज्यास प्रतिनिधि निवडून देण्याचा हक्क आहे तो. प्रतिनिधि निवडून देण्याच्या ह्या हक्कास भिन्न ठिकाणीं भिन्न भिन्न मर्यादा आहेत. ब्रिटिश साम्राज्यांतील स्वराज्य उपभोगिणाऱ्या बहुतेक वसाहतींत हा हक्क प्रत्येक जाणत्या पुरुषास व कांहीं वसाहतींत तर प्रत्येक जाणत्या स्त्रीस दिलेला आहे. खुद्द इंग्लंडांत त्यास कांहीं मिळकतीची अट ठेविली आहे. हिंदुस्थानास

**स्वराज्य मिळालें पाहिजे, अशी मागणी जेव्हां आम्ही करितों, तेव्हां प्रत्येक जाणत्या हिंदी रहिवाश्यास प्रतिनिधि निवडून देण्याचा हक्क द्यावा, असें आम्ही मुळींच म्हणत नाहीं.** हिंदी लोकांतील खालचे वर्गांत शिक्षणाचा जास्त प्रसार झाल्यावर व स्थानिक स्वराज्याच्या संस्थांच्या द्वारें व अन्य रीतीनें त्यांना जास्त राजकीय ज्ञान होऊन आपल्या राष्ट्रीय जबाबदाऱ्या जास्त चांगल्या रीतीनें समजूं लागल्यावर, प्रत्येक जाणत्या हिंदी गृहस्थास सदरहु हक्क देणें अवश्य व इष्ट होईल. परंतु अशी स्थिति प्राप्त होण्यास अर्थातच बराच काळ लागणार आहे, हें उघड आहे; व जो हक्क खुद्द इंग्लिशांना अद्याप प्राप्त व्हावयाचा आहे, तो आजच आह्मांस मिळाला पाहिजे, असें कोणीहि म्हणत नाहीं. हिंदुस्थानच्या सांप्रतच्या राजकीय प्रगतीच्या अवस्थेंत प्रतिनिधि निवडून देण्याच्या जबाबदारीच्या हक्कास कांहीं निर्बंध घातले पाहिजेत, हें उघड आहे. व तसे निर्बंध घालूं नये, असें कोणीहि राष्ट्रीय सभेंत किंवा अन्यत्र प्रतिपादन केलेलें नाहीं. परंतु स्वराज्याच्या स्थापनेस असल्या निर्बंधांचा अभाव अवश्य आहे, असें नाहीं. खुद्द इंग्लंडांत १८६७ सालापूर्वी, पार्लमेंटास प्रतिनिधी निवडून देण्याचा हक्क बराच मर्यादित असल्यामुळें कनिष्ठ किंवा मजूरदार वर्गास तो हक्क उपभोगण्यास मिळत नव्हता, व प्रतिनिधी निवडून देणारे मतदार प्रायः मध्यम वर्गाचे असत. १८८९ सालीं जपानांत जेव्हां पार्लमेंटाची प्रथम स्थापना झाली, तेव्हां प्रतिनिधी निवडून देण्याचा हक्क ज्यांचें वय २५ वर्षांहून कमी नाहीं, व जे १५ येनापेक्षां ( म्हणजे सुमारें २२॥ रुपयांपेक्षां ) कमी प्रत्यक्ष कर देत नाहींत, अशा पुरुषांनाच दिलेला होता; व त्यामुळें जरी जपानची लोकसंख्या त्या वेळीं सुमारें चार कोटी होती, तरी मतदारांची संख्या साडेचार लाखांपेक्षां जास्त झाली नाहीं. सारांश, ब्रिटिश हिंदुस्थानांत जे दहा बारा कोटी पुरुष आहेत, त्यांपैकीं प्रत्येक जाणत्या पुरुषास प्रतिनिधि निवडण्याचा आजच हक्क मिळाला पाहिजे, अशी अविचाराची मागणी कोणीहि करीत नाहीं.

हिंदी लोक स्वराज्यास पात्र आहेत किंवा नाहींत ह्या प्रश्नाचा विचार करतांना वरील गोष्टी लक्ष्यांत घेणें जरूर आहे. परंतु हिंदुस्थानास स्वराज्य मिळालें पाहिजे. ही मागणी आम्हीं केल्याबरोबर, इंग्लंड, आस्ट्रेलिया, कानडा, न्यूझीलंड इत्यादि ठिकाणीं स्वराज्याचीं जीं परिणत रूपें आहेत, तीं डोळ्यांपुढें आणून, तशा प्रकारचें पूर्ण विकसित झालेलें स्वराज्य आम्ही मागतों काय, अशी विन्रा

कारण कल्पना करून घेऊन कित्येक टीकाकार आम्ही स्वराज्यास अपात्र आहोंत अशी ओरड करीत असतात. वास्तविक पाहतां, आमची मागणी कांहीं इतकी बेताल नाहीं. इंग्लंडांत किंवा आस्ट्रेलिया, कानडा, न्यूझीलंड ह्या ब्रिटिश वसाहतींत ज्या परिणत स्वरूपाचें स्वराज्य आहे, त्या परिणत स्वरूपाचें स्वराज्य एकदम हिंदुस्थानांत स्थापन करावें, सदरहु वसाहतींत ज्याप्रमाणें प्रत्येक जाणत्या पुरुषास प्रतिनिधि निवडून देण्याचा हक्क आहे, तसा प्रत्येक जाणत्या हिंदी पुरुषास असावा, असें आम्ही मागत नाहीं. **प्रतिनिधि निवडून देण्याच्या हक्कास योग्य ते निर्बंध घालण्यास आमची बिलकूल हरकत नाहीं. आमचें म्हणणें येवढेंच आहे कीं, सदरहु योग्य निर्बंध कांहींहि असोत, आमचीं प्रतिनिधिमंडळें नागरिकांनीं पूर्णपणें निवडलेलीं असलीं पाहिजेत, व त्यांना राज्यकारभार चालविण्याचा पूर्ण अखत्यार असून, त्यांची कार्यकारी कौन्सिलावर हमखास हुकमत चालली पाहिजे.**

आमच्या स्वराज्याच्या मागणीचें वास्तविक स्वरूप अशा प्रकारचें असल्यामुळें, आमच्या स्वराज्यविषयक पात्रतेबद्दल शंका घेण्याचें कारण नाहीं. तथापि, आमच्यांतच—राष्ट्रीय सभेच्या कंपूंतच—असे कांहीं लोक आहेत कीं, त्यांना आम्ही अद्याप स्वराज्यास पात्र झालों आहों, असें प्रामाणिकपणें वाटत नाहीं. गेल्या राष्ट्रीय सभेचे अध्यक्ष सर सत्येंद्रप्रसन्न सिंह हे ह्या मताचे असून, त्यांचे ह्यासंबंधाचे काय विचार आहेत, याचें दिग्दर्शन आम्हीं मागील अंकांत केलेंच आहे. स्वराज्यास आम्ही अद्याप पात्र नाहीं, ह्या मताचें प्रतिपादन सर सिंहांनीं जसें केलें आहे, तसें प्रतिपादन त्या मताच्या दुसऱ्या कोणाहि अनुयायानें केलेलें आह्मांस तरी माहीत नाहीं. सबब, सर सिंहांच्या विचारांचें परीक्षण केल्यास एकंदर ह्या मताचेंच परीक्षण केल्यासारखें होणार आहे.

येथें ही एक गोष्ट नमूद करण्यास आह्मांस आनंद वाटतो कीं, पार्लमेंटासारख्या प्रतिनिधिसंस्था चालविण्यास जें बौद्धिक व नैतिक सामर्थ्य लागतें तें जात्याच पौर्वात्य राष्ट्रांत नाहीं, सबब त्या संस्थांना सदरहु राष्ट्रें अपात्र होत, म्हणजे तीं राष्ट्रें पूर्वीं अपात्र होतीं, सध्यां अपात्र आहेत, व पुढेंहि यावच्चंद्रदिवाकरौ अपात्रच राहतील, हें जें मत कांहीं वर्षांपूर्वीं पाश्चात्य राष्ट्रांत प्रचलित होतें, तें आतां बहुतेक नाहींसें झालें आहे.

इ० स० १८३२ त, हिंदुस्थानची राज्यव्यवस्था कंपनी सरकार कोणत्या रीतीनें चालवीत आहे, ह्याबद्दल चौकशी करण्याकरितां पार्लमेंटानें कमिटी नेमली होती. त्या कमिटीनें जेम्स मिल्ल ह्यांस प्रश्न विचारला कीं, "हिंदुस्थानांत प्रतिनिधिसंस्था स्थापन करण्याबद्दल तुमचें मत काय आहे ?" त्यास मिल्लनें उत्तर दिलें कीं, "अगदीं अशक्य" (Utterly out of the question) मिल्लसाहेबांचें त्यावेळीं ब्रिटिश लोकमतावर फार वजन होतें. व तेव्हांपासून प्रतिनिधिक संस्था फक्त पाश्चात्य राष्ट्रांनाच योग्य होत, पूर्वात्य राष्ट्रांच्या ठिकाणीं त्याबद्दल जात्याच पात्रता नाहीं, सबब, त्या संस्थांमुळें पूर्वात्य राष्ट्रांचें कल्याण न होतां उलट त्यांच्या राज्यव्यवस्थेंत घोंटाळा माजेल, या मताचा पाश्चात्य मनावर बराच पगडा बसला होता, व अद्यापहि त्या मताचा मधून मधून प्रतिध्वनि ऐकूं येतो ! १९०८ सालीं, लॉर्ड मोर्लेसाहेबांनीं हिंदुस्थानच्या कौन्सिलांची सुधारणा करून प्रतिनिधी निवडून देण्याचा हक्क हिंदी लोकांना दिला. परंतु त्यांनींहि आपलें भाषणांत असें बोलून दाखविलें कीं, हिंदुस्थानांत प्रतिनिधिसंस्था स्थापन करण्याचा माझा हेतु नाहीं; इतकेंच नव्हे, तर जोंपर्यंत माझी दृष्टि पोंचते, तोंपर्यंत पाहतां, प्रतिनिधिसंस्थांना हिंदुस्थान कधींहि पात्र होईल, अशी माझी मनोदेवता मला सांगत नाही. सध्यांची हिंदुस्थानांतील कौन्सिलें केवळ सल्लागारमंडळें होत, हें उघड आहे; परंतु त्यांत प्रतिनिधिसंस्थांचें तत्व बीजरूपानें कां होईना, पेरलें असल्यामुळें कालांतरानें त्या कौन्सिलांचें पार्लमेंटसारख्या प्रतिनिधिसंस्थांत पर्यवसान होणें अपरिहार्य आहे, हें लक्षांत घेतां, गेल्या राष्ट्रीय सभेंत नामदार सुरेंद्रनाथ बॅनर्जी ह्यांनीं बोलून दाखविल्याप्रमाणें, पुढील इतिहासकार मोर्लेसाहेबांस हिंदुस्थानच्या पार्लमेंटाचे जनक म्हणून वाखाणतील ह्यांत शंका नाहा. परंतु पित्याला ज्याप्रमाणें जन्म होईपर्यंत आपलें अपत्य मुलगा आहे किंवा मुलगी आहे हें कळत नाहीं, त्याप्रमाणेंच मोर्लेसाहेबांची अवस्था होऊन त्यांनीं वरील उद्गार काढले असावे असें दिसतें. नाहीं तर त्यांच्यासारख्या मुत्सद्यानें व तत्ववेत्त्यानें असे उद्गार काढावे, हें आश्चर्य नाहीं काय ? किंवा आश्चर्य तें कसलें ! मोर्लेसाहेब हे मोठे धूर्त मुत्सद्दी आहेत; त्यांच्याइतके धोरणी मुत्सद्दी दुसरे हल्लीं इंग्लंडांत आहेत किंवा नाहींत, ह्याबद्दल आम्हांस फार शंका वाटते; व जो खरा धूर्त मुत्सद्दी आहे तो, आपलें योजलेलें कार्य सिद्धीस नेण्याकरितां, प्रसंगोपात प्रिय परंतु सत्याच्या कसोटीस बिनचूक न उतरणारें भाषण करण्यास चुकत नाहीं. हें, राजनीति बहुरूपी आहे हें ज्यांना माहीत आहे, त्यांना सांग-

ण्याची अवश्यकता नाहीं. असो; हें अंमळ विषयांतर झालें. मुख्य मुद्दा इतकाच कीं, हिंदुस्थान व इतर पौर्वात्य राष्ट्रें निसर्गतःच प्रतिनिधिसंस्थांना नालायक आहेत, ह्या मताचा अनुवाद जरी अद्यापहि मधून मधून केलेला ऐकूं येतो, तरी त्या मताचा जोर दिवसेंदिवस कमी होत चालला असून आणखी कांहीं वर्षांनीं तें नष्ट झालेल्या मतांच्या गटांत आपलें योग्य स्थान पटकावून बसेल, व त्यामुळें तें लोकांच्या स्मृतिपथांतूनहि कालांतरानें नाहींसें होईल, असें मानण्यास जागा आहे. जपाननें प्रतिनिधिसंस्था स्थापन करून त्या आज कित्येक वर्षें चांगल्या रीतीनें चालविल्या आहेत; चीनदेशांत जरी आणखी एक राजक्रांति होऊन राजसंस्था पुनः स्थापित होण्याचा संभव दिसत आहे, तरी पूर्ववत् एक-तंत्री राज्यपद्धति अमलांत येणें आतां अशक्य आहे. युआन–शिकाय जरी प्रेसिडेंटचा बादशहा झाला, तरी त्यास पार्लमेंटाच्याच सहाय्यानें राज्यकारभार चालविल्याशिवाय गत्यंतर नाहीं. फिलिपाइन बेटांत अमेरिकन सरकारनें प्रतिनिधिसंस्था स्थापन केल्या आहेत, इतकेंच नव्हें; तर फिलिपाईन लोकांना 'स्वराज्य' हि दिलें आहे. सयामचा राजा आपल्या लहानशा राज्यांतहि प्रतिनिधिसंस्था स्थापन करीत आहे. इजिप्त व हिंदुस्थान ह्या देशांत प्रतिनिधिसंस्था बीजरूपानें स्थापन झाल्या असून, त्यांचें 'स्वराज्यांत 'पर्यवसान करण्याकरितां चळवळी चालू आहेत–इत्यादि जीं पौर्वात्य राष्ट्रांत स्थित्यंतरें झालीं आहेत, व होत आहेत त्यांवरून 'पौर्वात्य राष्ट्रें प्रतिनिधिसंस्थांना जात्याच अपात्र होत,' ह्या असत्य व अनुदार मतास जो तीव्र धक्का बसला आहे, त्यामुळें त्यांतील जीव बहुतेक नष्ट झाला आहे. हिंदी लोक जात्याच प्रतिनिधिसंस्थांना नालायक आहेत, व ही त्यांची अपात्रता तशीच यावच्चंद्रदिवाकरौ राहणार, असें आतां कोणी जबाबदार व विचारशील मनुष्य प्रतिपादन करण्याचें धाष्ट्र्य करील असें आम्हांस वाटत नाहीं. मि. एड्विन बेव्हन ह्यांनीं आपल्या " हिंदी राष्ट्रीयत्व " ( Indian Nationalism ) ह्या निबंधांत म्हटल्याप्रमाणें, प्रतिनिधिसंस्था ह्या, राजकारणांत सदसद्विवेचक बुद्धीची जी क्रिया चालली असते, तिचीं फळें होत, व ही राजकारणांतील सदसद्विवेचक बुद्धि परमेश्वरानें पाश्चिमात्यांनाच दिली आहे, पौर्वात्यांना दिली नाहीं, असें नाहीं.

( **They, i. e. constitutional forms, represent Rationalism in politics, and though I do not believe that Rationalism**

**is as much of life as some people have believed. I think that Rationalism is the sound operation of the human Reason within a certain sphere and Reason does not belong to one part of the world, but to all. Indian Nationalism** पानें १२३—१२४. )

वरील विवेचनावरून आमचे वाचकांच्या लक्ष्यांत आलें असेलच कीं, सध्यां वादाचा प्रश्न आहे तो, हिंदी लोकांचे ठिकाणीं पार्लमेंटसारख्या प्रतिनिधिसंस्थांना नैसर्गिक व चिरंतन अपात्रता आहे हा नसून, ते स्वराज्यास आज पात्र आहेत किंवा नाहीं, हा होय. परमेश्वरानें मनुष्यजाति जेव्हां निर्माण केली, तेव्हां त्या जातीचे पाश्चिमात्य व पौर्वात्य असे अगदीं परस्परभिन्न दोन विभाग करून, पाश्चिमात्यांनाच प्रतिनिधिसंस्था स्थापन करण्यास व त्या चालविण्यास लागणारी अक्कल दिली, व पौर्वात्यांच्या ठिकाणीं मात्र तद्विषयक मूढता ठेविली, असें ईश्वराच्या न्यायबुद्धीस काळिमा आणणारें व मानवजातीच्या मूलभूत ऐक्यास विरोध करणारें तत्व उजळ माथ्यानें प्रतिपादन करणारे हरीचे लाल फारसे आतां राहिले नाहींत. उलट, समाजशास्त्रविषयक जे शोध झालेले आहेत व होत आहेत, त्यांवरून अगदीं स्पष्ट दिसून येत आहे कीं, इतर बाबींप्रमाणें ह्या बाबीं-तहि परमेश्वरानें पक्षपातीपणा केला नसून त्यासंबंधानें पौर्वात्य व पाश्चिमात्य राष्ट्रांत मूलभूत व कायमचा असा फरक नाहीं. व ही गोष्ट कांहीं उदारमनस्क इंग्लिश सद्गृहस्थांनीं प्रांजलपणें कबूलहि केली आहे. सुमारें पंचेचाळीस वर्षां-पूर्वीं ॲन्स्टी नांवाच्या अँग्लो–इंडियन सद्गृहस्थानें लंडन येथें "ईस्ट इंडिया असोसिएशन" च्या सभेंत बोलून दाखविलें कीः—"पौर्वात्य लोकांना शिक्षण देऊन स्थानिक स्वराज्याकरितां व प्रतिनिधिसत्ताक राज्यपद्धतीकरितां तयार करावयाचें आहे, वगैरे गोष्टी जेव्हां आपण सांगत असतों, तेव्हां पूर्व ही म्युनि-सिपालिट्यांची जननी आहे, ही गोष्ट आपण अजिबाद विसरतों. वास्तविक पाहतां स्थानिक स्वराज्य हें पूर्वेइतकेंच प्राचीन आहे. ज्या जगाच्या भागास आपण पूर्व म्हणून म्हणतों त्या भागांतील लोकांचा धर्म कोणताहि असो, आशिया खंडाच्या आपण चारी दिशा जरी धुंडाळून काढल्या, तरी त्यांत असा एकहि भाग आपणांस आढळून येणार नाहीं कीं, तो म्युनिसिपालिट्यांनीं भरलेला नाहीं. इतकेंच नव्हे, तर पाश्चिमात्य देशांतील प्राचीन म्युनिसिपालिट्यांप्रमाणें त्या एकमेकांशीं जाळ्या-प्रमाणें इतक्या संलग्न झाल्या आहेत कीं, त्यामुळें तुम्हांस एक प्रचंड प्रतिनिधिप-

द्धति आयतीच सांपडलेली आहे, व आपणांस करावयाचें तें एवढेंच कीं, प्रचलित असलेली पद्धति घेऊन म्युनिसिपालिट्यांना आपले प्रतिनिधी पाठविण्यास सांगावयाचें. "

( We are apt to forget in this country when we talk of preparing people in the East by education and all that sort of thing, for Municipal Government and Parliamentary Government ( if I may use such a term ) that the East is the parent of Municipalities. Local Self-government in the widest acceptation of the term is as old as the East itself. No matter what may be the religion of the people who inhabit what we call the East, there is not a portion of that country, there is not a portion of Asia from West to East, from North to South, which is not swarming with Municipalities ; and not only so, but like our Municipalities of old, they are all bound together as in a species of network, so that you have ready made to your hand the frame-work of a great system of representation and all you have to do is to adopt what you have there and invite the Municipalities to send you their delegates ).

तसेंच मॅव्हिनी, सर हेनरी मेन इत्यादि पाश्चात्य विद्वानांनीं जे शोध केले आहेत, त्यांवरून उघड दिसतें कीं, हिंदुस्थानांतील ग्रामसंस्था ह्या प्राचीन आहेत; इतकेंच नव्हे, तर त्या पाश्चात्य ग्रामसंस्थांहून भिन्न नाहींत; दोघांचीं सामान्य स्वरूपें एकाच प्रकारचीं आहेत ( If very general language were employed, the description of the Teutonic or Scandinavian village communities might actually serve as a description of the same institution in India. ) ·

हिंदुस्थानांत ब्रिटिशांचा अंमल झाल्यानंतर हिंदुस्थानांत पूर्वी कधींहि झालें नव्हतें इतकें राजसत्तेचें केंद्रीभवन झालें, व त्यामुळें ह्या ग्रामसंस्थांचा नाश झाला; व एका दृष्टीनें पाहतां, स्वराज्याचे बाबतींत, ब्रिटिशसत्ता हिंदुस्थानांस झाल्यावर, आपली पीछेहाटच झाली. ह्या ग्रामसंस्थांचें माऊंट स्टुअर्ट एल्फिन्स्टन,

सर चार्लस मेटकाफ् इत्यादिकांनीं आपले लेखांत जें वर्णन दिलें आहे, त्यावरून त्या ग्रामसंस्था म्हणजे लहान लहान प्रजासत्ताक राज्येंच होतीं, असें दिसतें. सर चार्लस मेटकाफ् म्हणतोः--

"The village communities are little republics, having nearly everything they can want within themselves, and almost independent of any foreign relations"

( ग्रामसंस्था ह्या, लहान प्रजासत्ताक राज्यें आहेत; त्यांना जें कांहीं पाहिजे तें बहुतेक सर्व त्यांच्या ठिकाणीं असून त्यांचे बाह्यसंबंध फारसे येत नाहीत. ) ह्या ग्रामसंस्था व अलीकडच्या पाश्चिमात्य प्रतिनिधिसंस्था ह्यांच्यांत कांहीं फरक नाहीं, असें भासविण्याचा आम्ही प्रयत्न करीत आहों, असें कोणी समजूं नये. व गांवकऱ्यांच्या प्रतिनिधींच्या द्वारें एखाद्या खेड्याचा कारभार चालविणें व सर्व राष्ट्राचा राज्यकारभार चालविणें ह्यांत जमीनअस्मानाचें अंतर आहे, हेंहि उघड आहे. प्रतिनिधित्वाचें तत्व ( the principle of representation ) हिंदी लोकांस फार प्राचीन काळापासून माहीत असतां, आमच्या राजकीय विचारांची गति कुंठित कां झाली व आमच्या राजकीय व्यवस्थेचें स्वरूप पुष्कळ अंशी एकतंत्री कां राहिलें वगैरे प्रश्न बरेच महत्त्वाचे आहेत; परंतु त्याबद्दल प्रस्तुत लेखांत विवेचन करणें शक्य नाहीं. पार्लमेंटसारख्या प्रतिनिधिसंस्था पूर्वी हिंदुस्थानांत नव्हत्या हें जरी खरें आहे, तरी तसल्या प्रकारच्या संस्थांना आम्हीं निसर्गतःच अपात्र आहोंत, हें मत अगदीं चुकीचें आहे, ही गोष्ट ग्रामसंस्थांच्या सार्वत्रिक प्रचारावरून निर्विवाद आहे. सबब स्वराज्यास आम्ही जात्याच व कायमचेच नालायक आहों, ह्या मताचा आतां कोणीं अनुवाद केला, तर त्याकडे लक्ष देण्याचें कांहीं कारण नाहीं.

तेव्हां प्रश्न राहिला तो इतकाच कीं, **सध्यां म्हणजे आज** आपण स्वराज्यास पात्र आहों किंवा नाहीं. ह्याबद्दल आपल्यांतच मतभेद आहे, हें मागें सांगितलेंच आहे. सर सिंहासारख्यांना असें वाटतें कीं, आपण अद्याप स्वराज्यास पात्र झालों नाहीं, व म्हणून प्रथम "बौद्धिक, नैतिक व आधिभौतिक" सुधारणा करून आपण आपले ठिकाणीं स्वराज्यविषयक पात्रता आणली पाहिजे. ह्या सुधारणा कोणत्या ह्याचें त्यांनीं स्पष्ट विवेचन केलें नाहीं. तसेंच ही पात्रता येण्यास आणखी किती अवकाश लागेल हेंहि त्यांनीं सांगितलें

नाहीं. ही सर सिंहांची विचारसरणी राष्ट्रीय सभेच्या इतर पुढाऱ्यांस मान्य नाहीं, हें उघड आहे. कारण ज्या सभेंत त्यांनीं अध्यक्ष ह्या नात्यानें हिंदी लोकांत स्वराज्यविषयक पात्रता अद्याप यावयाची आहे असें सांगितलें, त्याच सभेंत नॉमदार सुरेंद्रनाथ बॉनर्जी व ॲनीबिझांट ह्यांनीं "आम्ही स्वराज्यास अगदीं पात्र आहों" असें आपल्या उच्च स्वरानें ब्रिटिश सरकारास व सर्व सुधारलेल्या जगास जाहिर केलें. नामदार बानर्जींचें भाषण महत्त्वाचें असल्यामुळें व दोन्ही पक्षांची विचारसरणी वाचकांच्या लक्षांत येणें इष्ट असल्यामुळें आम्हीं त्यांचें भाषणांतील खालीस उतारा दिला आहे. नामदार बॅनर्जी म्हणाले:--

"आपण स्वराज्यास पात्र आहोंत काय? ह्या प्रश्नाची आपण मीमांसा करूं या. स्वराज्य हा सृष्टीचा क्रम आहे; ती ईश्वराची योजना आहे. प्रत्येक समाजाच्या भवितव्यतेची सूत्रें त्याच समाजाच्या हातांत असलीं पाहिजेत हा दैवी कायद्याचा भाग आहे व नैतिक विश्वाची दिक्कालाबाधित योजना आहे. ही दैवी योजना ईश्वरानें आपल्या प्रकाशमय अक्षरांनीं विश्वाच्या इतिहासाच्या प्रत्येक ओळींत स्पष्टपणें लिहिलेली आहे. ह्या सार्वत्रिक व सर्वकालीन नियमापासून जर कधीं कोठें परावर्तन झालें, तर तें क्षणिक असून सांक्रमणिक आहे. ज्याप्रमाणें होकायंत्राचें टोंक नेहमीं उत्तरेकडे असतें, त्याप्रमाणें ज्या देशास ही क्षणिक व सांक्रमणिक स्थिति प्राप्त झालेली आहे त्याचें धोरण, त्या स्थितींतून निघून स्वराज्याची हद्द गांठण्याकडेच असतें. स्वराज्य ही सृष्टीची नैसर्गिक अवस्था असल्यामुळें, आम्ही स्वराज्यास पात्र नाहीं, स्वराज्याचें ध्येय अतिशय पुढील काळचें आहे–इतकें कीं तें भविष्यकाळाच्या धुक्यांत अंधुक सुद्धां दिसत नाहीं,–असें जें कांहीं लोक म्हणतात, तें शाबीद करण्याची जबाबदारी त्यांचेवर आहे. पुराव्याचा बोजा त्यांच्यावर आहे; आम्ही स्वराज्यास पात्र आहों असें, माझ्यासारखे जे लोक म्हणतात, त्यांच्यावर नाहीं. तथापि तो बोजा उदारपणानें मी आपलें अंगावर घेऊन माझ्या प्रतिपक्षीयांशीं उघडपणें वाद करून "हिंदी लोक स्वराज्यास पात्र आहेत," हा सिद्धांत शाबीद करण्यास मी तयार आहें. आपला प्राचीन इतिहास पहा, सध्यांच्या वस्तुस्थितीचें परीक्षण करा, सभोंवतालीं अवलोकन करा, व नंतर आपलें मत काय होत असेल तें सांगा. जगाच्या प्रातः–कालीं, रोमनगराचा जन्म होण्यापूर्वी, बॅबिलोन व निनवी हीं शहरें इतिहासांत दृग्गोचर होण्यापूर्वी, आपल्या पूर्वजांनी स्वराज्याच्या

प्राथमिकसंस्था ज्यांना ग्रामसंस्था म्हणतात त्या—स्थापन केल्या होत्या. त्या इतक्या संघटित होत्या कीं, त्यांचें ठिकाणीं इतका जिवंतपणा व सामर्थ्य होतें कीं, जरी मोठमोठालीं साम्राज्यें पार लयास गेलीं, सिंहासनें ढांसळून पडलीं, राजघराणीं नष्ट झालीं, तरी त्या संस्था जीवंत राहून त्यांचें कार्य अगदीं अलीकडच्या काळापर्यंत अव्याहतपणें चाललें होतें. तसेंच ज्या ज्या बाबतींत आमची परीक्षा घेतलेली आहे, त्या त्या बाबतींत आम्ही पसारच झालों आहोंत. ज्या परिस्थितींत आम्हांस स्थानिक स्वराज्याचीं कर्तव्यें करावीं लागतात, ती परिस्थिति प्रतिकूल आहे, असें खुद्द लॉर्ड मोर्ले साहेबांनीच कबूल केलें आहे; तरीसुद्धां अशा प्रतिकूळ परिस्थितीतहि आम्ही स्थानिक स्वराज्याचें काम चांगल्या रीतीनें करीत आलों आहों. कायदेकौन्सिलांची १९०९ सालीं सुधारणा झाल्यापासून सदरहु कौन्सिलांतीलहि कामें आम्हीं चोख रीतीनें केलीं आहेत. ह्या राष्ट्रीय सभेच्या प्रचंड अधिवेशनाकडे पहा. राष्ट्रीय सभेसारखी प्रचंड सभा पृथ्वीच्या पाठीवर कोठें तरी भरल्याचें आढळून येत आहे काय ! स्वराज्य म्हणजे 'वादे वादे जायते तत्त्वबोधः' ह्या तत्वाचा अंगिकार करून राज्य चालविणें, अशी कोणीं एकानें व्याख्या केली आहे व ती बरोबर आहे. ह्या प्रचंड सभेंतील वादविवाद नेमस्तपणानें, आत्मसंयमनानें, व नेमिलेल्या अधिकाऱ्यांबद्दल योग्य आदरबुद्धि तिळमात्र न सोडतां चाललेले असतात. आमच्या स्वराज्याच्या पात्रतेबद्दल आणखी अधिक सबळ पुरावा तो कोणता पाहिजे ! ह्या राष्ट्रीय सभेचें काम चालविण्याच्या आमच्या पद्धतीनें आम्ही आपली स्वराज्याची पात्रता जगाच्या निदर्शनास आणली आहे. ह्याखेरीज आणखी एक गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे. ती ही कीं, स्वराज्याचें शिक्षण देणाऱ्या उत्तम शाळा म्हटल्या म्हणजे स्वराज्याच्या संस्थाच होत. ह्या माझ्या विधानास ग्लॅडस्टनसारख्या मुत्सद्याचा आधार आहे. त्यांनीं एके ठिकाणीं म्हटले आहे कीं, "स्वराज्यविषयक संस्थांनींच लोकांच्या ठिकाणीं स्वराज्याबद्दल पात्रता उत्पन्न होते. लोकांना स्वराज्याच्या संस्था न देणें म्हणजे त्यांना स्वराज्याचें शिक्षण मिळविण्याकरितां लागणाऱ्या शाळा न देणें होय." हें ग्लॅडस्टन साहेबांचें म्हणणें अगदीं बरोबर आहे व त्यास प्रमाण पाहिजे असल्यास जपानाकडे पहा. जपानी लोकांना जेव्हां स्वराज्य देण्यांत आलें, तेव्हां ते नुकतेच कोठें मध्यकालीन युगांतून बाहेर पडलेले होते. त्या वेळीं जपानी लोकांत स्वराज्याची पात्रता होती असें कोणासहि

वाटत नव्हतें. परंतु आज सर्वजण म्हणत आहेत कीं, जपानांतील प्रतिनिधि-सत्ताक राज्यपद्धति पूर्णपणें यशस्वी झाली आहे. दुसरें उदाहरण फिलिपाईन बेटाचें द्या. अमेरिकेनें फिलिपाईन लोकांना स्वराज्य दिलें आहे व त्याचा परिणाम उत्तमच झाला व होत आहे. *"

---

*Are we fit? Let us analyse the problem. Selfgovernment is the order of nature, the dispensation of Divine Providence. Every community must be the master of its own destinies. That is a part of the Divine Law and the immutable order of the moral universe, written in every line of universal history, written in characters of light by an invisible hand. Every deviation, every departure from it, is transient and transitional and like the compass pointing always northward, steadily deflects towards the goal which is Self-government. Self-government being the natural condition of things, it is incumbent upon those who say that we are not fit for self-government, and that it is a distant goal, so distant as to fade away into the mists of the unseen future—I say, it is incumbent upon them to prove their case. The burden of proof is upon them and not upon me. But with the chivalrous spirit characteristic of our great movement, I will come to their rescue and take upon myself the burden......Let us survey the past, examine the present and look around and then pronounce our verdict. In the morning of the world, before Rome had been built, before Badylon and Nineveh had emerged into the historic arena, our ancestors had founded those village organisations which represent the first beginnings of self-government. So well organised were they, so tenacious of life and vitality that they survived the crash of Empires, the subversion of Thrones, the fall of dynasties and lived down to our own times with a never-ending life. Coming down to more recent times, what do we find? Wherever we have been tried, we have never been found wanting. We have been tried in the matter of local self-government under adverse conditions as admitted by Lord Morley and yet the experiment has proved

ह्या दोन मतांपैकीं खरें मत कोणतें, ह्याचा आतां विचार करावयाचा आहे.

मागील अंकांत आम्हीं लिहिल्याप्रमाणें स्वराज्यविषयक पात्रता ठरावावयाची कशी ? हा बिकट प्रश्न आहे. ज्याप्रमाणें हवेंतील उष्णता उष्णतामापक यंत्रानें मोजतां येते, त्याप्रमाणें स्वराज्यविषयक पात्रता ठरविण्यास जर कांहीं स्पष्ट व निश्चित प्रमाण असतें, तर त्या पात्रतेसंबंधानें मतभेदास जागा राहती ना. परंतु

---

successful. We have been tried in the higher regions of self-government under the Reform Scheme of 1909, and again we have been successful. Here we have a stupendous gathering of representative men from all parts of India. Look North, South, East and West, is there any other part of the world which can present to the view an assembly equal to this? It has been observed, and rightly so, that self-government is government by discussion, and the discussions in this great assembly are carried on with a sense of moderation, self-restraint and regard for constituted authority which is proof positive of our capacity for self-government. In this great assembly, by the manner in which we conduct our deliberations, we demonstrate that we are qualified for government by discussion. But that is not all. The best training ground for self-government are the institutions of self-government, and Mr. Gladstone is my authority for it. He says "Free institutions alone qualify a people for self-government. If you deny the people free institutions you take away from them the most useful academies for training in self-government." Look abroad for an illustration of this truth. Japan was given full Parliamentary institutions immediately after Japan had emerged from mediaeval Feudalism. Japan was not presumed to be fit for self-government; but after fifty years' training in the actual work of self-government, it is the universal verdict that the experiment of Parliamentary Government in Japan without a previous trial was fully justified. Take the Phillipine islands which only the other day became a province of America. America has given her free institutions and with the best results.

राजकारणाचा, मनुष्याची बुद्धिमत्ता, त्याचें मन, त्याची इच्छाशक्ति, त्याच्या आकांक्षा, त्याच्या इच्छा, त्याच्या समजुती, किंबहुना ग्रॅहॅम वॅलेस ह्या ग्रंथकारानें आपल्या " राजकारणांत मानवी स्वभाव " ( Human Nature in Politics ) ह्या पुस्तकांत दाखविल्याप्रमाणें, त्याचे दुराग्रहसुद्धां, इत्यादिकांशीं निकट संबंध असल्यामुळें, स्वराज्याच्या पात्रतेबद्दल असें निश्चित व ठराविक माप असणें शक्य नाहीं; व म्हणून एखादा समाज किंवा देश स्वराज्यास लायक आहे किंवा नाहीं, हें स्थूलमानानें व मोघम रीतीनेंच ठरवावें लागतें. एखाद्या समाजांत बराचसा सुसंस्कृत वर्ग असला, म्हणजे तो स्वराज्यास लायक आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं, व जरी प्रतिनिधि निवडून देण्याचा हक्क कांहीं विवक्षित नियमांनीं मर्यादित करणें अवश्य असेल, म्हणजे तो हक्क सरसकट वाटेल त्यास देणें योग्य होणार नाहीं, तरी असल्या समाजांत स्वराज्याचा आरंभ करण्यास मुळींच हरकत नाहीं. हिंदुस्थानच्या एकंदर लोकसंख्येच्या मानानें हिंदी सुशिक्षितसमाज जरी लहान असला, तरी तो बराच असून दिवसेंदिवस वाढत आहे. ह्या वर्गांत केवळ पदवीधरांचाच समावेश करणें बरोबर होणार नाहीं; कारण, वर्तमानपत्रें, सभा इत्यादिकांमुळें सुसंस्कृतपणाची मर्यादा विश्वविद्यालयाच्याबाहेर विस्तृत होत चालली आहे हें विसरतां कामा नये. वर आम्हीं सांगितलेंच आहे कीं, जपाननें जेव्हां प्रथम स्वराज्याची स्थापना केली, त्यावेळीं फक्त सुमारें ४५०,००० पुरुषांना प्रतिनिधी निवडून देण्याचा हक्क दिला होता. म्हणजे लोकसंख्येच्या मानानें १०० त एक असें प्रमाण पडतें. हें प्रमाण जर आरंभीं आपण घेतलें तर ब्रिटिशहिंदुस्थानांत सुमारें तेवीस लक्ष मतदार असावयास पाहिजेत. ब्रिटिशहिंदुस्थानांतलि तेवीसकोटी प्रजेंत तेवीस लक्ष योग्य व लायक मतदार मिळणार नाहीत काय ? सारांश, स्वराज्याचा आरंभ करण्यास लागणारा लायक व योग्य मतदारांचा संघ सध्यां हिंदुस्थानांत उपलब्ध आहे, ह्यांत संशय नाहीं.

एखाद्या समाजांत एखादी विवक्षित राज्यपद्धति स्थापना करावी किंवा करूं नये, ह्याचा निर्णय करतांना मुख्यत्वेंकरून तीन मुद्यांचा विचार करावा, असें प्रसिद्ध इंग्लिश तत्ववेत्ता मिल्ल ह्यांनीं आपल्या " प्रतिनिधिसत्ताक राज्यपद्धति " ह्या ग्रंथांत म्हटलें आहे. ते तीन मुद्दे येणेप्रमाणें:--( १ ) ती विवक्षित राज्यपद्धति स्वीकारण्यास लोकांची खुषी पाहिजे; निदान ते इतके नाखुष असतां

कामा नयेत कीं, त्यामुळें ती राज्यपद्धति अमलांत आणण्यास दुस्तर अडथळा येईल; ( २ ) ती राज्यपद्धति चालू ठेवण्यास लागणाऱ्या गोष्टी करण्यास ते खुष व समर्थ असले पाहिजेत; व ( ३ ) त्या पद्धतीचे हेतू सिद्धीस नेण्याकरितां अवश्य लागणाऱ्या गोष्टी करण्यास ते खुष व समर्थ असले पाहिजेत.

पहिल्या मुद्याच्या दृष्टीनें हिंदुस्थानच्या स्वराज्याच्या प्रश्नाचा फारसा विचार करण्याचें कारण नाहीं. हिंदुस्थानांतील सर्व सुशिक्षित व समजदार मनुष्यांना स्वराज्याची तळमळ लागली आहे, व ते स्वराज्याची मागणी करीत आहेत, ह्यावरूनच आमची स्वराज्य स्वीकारण्याची खुषी स्पष्ट दिसून येत आहे.आमच्या सुशिक्षित मुसलमान बंधूंनाहि स्वराज्य पाहिजे हेंहि आतां स्पष्ट आहे. शेतकऱ्यांसारखे अशिक्षित वर्ग उदासीन आहेत हें खरें, परंतु ते स्वराज्यस्थापनेच्या विरुद्ध आहेत, असें मात्र नाहीं. उलट स्वराज्य म्हणजे काय, हें त्यांना समजून दिल्यास तेहि स्वराज्य पाहिजे, असेंच म्हणतील. असा कोणता हरीचा लाल आहे कीं, त्यास "स्वराज्याचा अमूल्य ठेवा" दिला असतां, तो अभाग्याच्या घरीं आलेल्या कामधेनूप्रमाणें तो टाकून देईल? सारांश, मिलच्या मतें अवश्य असणारी पहिली अट आमच्यामध्यें पूर्णपणें आढळून येत आहे.

दुसऱ्या अटीसंबंधानें मिलचें असें म्हणणें आहे कीं, एखाद्या समाजास प्रतिनिधिसत्ताक राज्यपद्धति पाहिजे असेल; पण जर त्या समाजांतील लोक आळसानें, निष्काळजीपणानें, भित्रेपणानें किंवा सार्वजनिक बुद्धीच्या अभावामुळें, ती राज्यपद्धति संभाळण्यास लागणारे श्रम करणार नाहींत, तर ते त्या राज्यपद्धतीस नालायक आहेत; व जरी अशा स्थितींतहि ती राज्यपद्धति त्यांना अल्पकालसुद्धां मिळाल्यापासून फायद्याच होणार आहे, तरी त्यांना त्या पद्धतीचा चिरकाल उपभोग घेण्यास मिळण्याचा संभव नाहीं. आम्हीं हिंदी लोक अगदीं निर्दोष आहों, असें कोणीहि म्हणत नाहीं. सर्व समाजांत कमी अधिक दोष आहेत व त्याप्रमाणें आमच्यांतहि आहेत. परंतु स्वराज्याची उत्कट इच्छा आम्हांस झाली असतां व त्याकरितां आमची जीवापाड धडपड चालली असतां, "आळसानें, निष्काळजीपणानें, भित्रेपणामुळें किंवा सार्वजनिक बुद्धीच्या अभावामुळें," स्वराज्याचें रक्षण करण्यास लागणारे परिश्रम आम्ही करणार नाहीं काय? आम्ही खरोखर इतके "आळशी, भित्रे, निष्काळजी व सार्वजनिक बुद्धिहीन" आहोंत काय कीं, जरी आम्हांस आमच्या इच्छेप्रमाणें स्वराज्य मिळालें, तरी त्याचें

रक्षण करण्यास आम्ही अवश्य ते परिश्रम करणार नाहीं ? स्वराज्याचा उपभोग जे लोक पुष्कळ वर्षे घेत आहेत, त्यांचे हातून कदाचित् स्वराज्य रक्षणाचे बाबतींत हयगय होईल; परंतु ज्यांना स्वराज्य नवीनच मिळालें आहे, ते त्याचें रक्षण करण्याचें पवित्र कामीं दुर्लक्ष तर करणार नाहींतच, परंतु त्याची जोपासना व वाढ करण्याकरितां वाटेल ते परिश्रम व स्वार्थत्याग करण्यास तयार होतील.

मिल्लुच्या तिसऱ्या अटीचा विचार करतांनाहि वरीलप्रमाणेंच विचारसरणी डोळ्यांपुढें उभी राहते. स्वराज्याचा उद्देश राष्ट्राची सर्वांगीण उन्नति करणें व त्या उन्नतीच्याद्वारें मानवी प्रगतीस आपल्या योग्यतेप्रमाणें मदत करणें, हा होय. स्वराज्य नसतांनाहि जर आम्ही हिंदुस्थानची सर्व बाजूंनीं उन्नति करण्याचा प्रयत्न करीत आहों, व मानवी प्रगतीच्या उदात्त कामी हातभार लावीत आहों, तर स्वराज्य मिळाल्यावर मात्र आम्ही स्वराज्याचे हेतू सिद्धीस नेण्याकरितां लागणारे प्रयत्न करण्यास कमी करूं हें म्हणणें शोभेल काय? स्वराज्य नसतांनाहि स्वामी विवेकानंदासारख्यांनी हिंदुधर्माच्या मूलभूत उदात्त तत्वांचें उत्तमत्व पाश्चात्यांना दाखवून युरोपियन राष्ट्रांच्या धार्मिक प्रगतीस मदत केली आहे. स्वराज्य नसतांनाहि सर रामकृष्ण गोपाळ भाण्डारकर, रा. बाळ गंगाधर टिळक, , जगदीशचंद्र बोस इत्यादि विद्वद्रत्नांनी मानवी ज्ञानांत व संस्कृतींत भर घातली आहे. स्वराज्य नसतांनाहि सर रवींद्रनाथ टागोर ह्यांचे ग्रंथ व मिसेस सरोजिनी नायडू ह्या प्रतिभासंपन्न कवयित्रीचीं इंग्रजी काव्य पाश्चात्यांच्या कौतुकास पात्र होऊन ते त्यापासून आपली आत्मिक व बौद्धिक उन्नति करून घेत आहेत. स्वराज्य नसतांनाहि जर भरतभूमीचे पुत्र व भरतभूमीच्या कन्या तिच्या वैभवाकरितां अविश्रांत झटत असून मानवी ज्ञानांत, संस्कृतींत व प्रगतींत भर घालीत आहेत, तर स्वराज्य आम्हांस मिळालें असतां मात्र आम्ही राष्ट्रीय व मानवी उन्नतीकरितां प्रयत्न करणार नाहीं, हें म्हणणें कितपत शोभेल ? आमची तर पक्की खात्री आहे कीं, हिंदुस्थानास "स्वराज्याचा अमूल्य ठेवा" मिळाला म्हणजे हिंदी लोकांत इतका नवीन जोम व उत्साह येईल कीं, पूर्वी कधींहि झाली नाहीं इतकी मानवी सेवा त्यांच्या हातून घडेल, धर्मांच्या एकीकरणाचें महत्कार्य पुढें सरसावेल, मानवी ऐक्याच्या चळवळीस जोर होईल, व आधिभौतिक व आध्यात्मिक वैभवाचा समतोलपणा, हें जें खऱ्या व चिरंतन सुधारणेचें तत्व, त्या तत्वाची पताका हिंदुस्थानांतच नव्हे, तर सर्व जगांत, आपणास सरतेशेवटीं विजय प्राप्त झाला, ह्या आनंदाच्या डौलांत फडकूं लागेल!

असो. येथपर्यंत सामान्यदृष्टीनें, व कोणतीहि राज्यपद्धति स्थापन करण्यास ज्या अटी अवश्य पूर्ण झाल्या पाहिजेत म्हणून मिल्लनें सांगितलें आहे, त्या अटींच्या दृष्टीनें, आम्ही स्वराज्यास अपात्र आहोंत काय ह्या प्रश्नाचा विचार झाला. आतां आपण आणखी एका दृष्टीनें विचार करूं. आमची जेथें जेथें परीक्षा घेतली आहे, तेथें तेथें आह्मांस यशच मिळालें आहे, हें जें नामदार सुरेंद्रनाथ बानर्जींनी आपल्या भाषणांत विधान केलें आहे, तें आम्हीं मागें दिलेंच आहे. परंतु आम्ही आपली बुद्धिमत्ता, सार्वजनिक काम करण्याची हौस, जनतेबद्दल कळकळ व कर्तृत्वशक्ति, म्युनिसिपालिट्या, लोकलबोर्डें, कायदे कौन्सिलें इत्यादि सरकारनें स्थापलेल्या संस्थांतच दाखविली आहे, असें नाहीं. आमच्या मतें आम्हींच ज्या स्वावलंबनाच्या तत्वावर लहान मोठ्या शेंकडों संस्था स्थापन केल्या आहेत, त्यांत आम्हीं जी कर्तृत्वशक्ति दाखविली आहे, ती वरील निमसरकारी संस्थांत दाखविलेल्या कर्तृत्वशक्तीपेक्षां अधिक योग्यतेची असून आमची स्वराज्यविषयक पात्रता अधिक स्पष्ट रीतीनें व जोरानें व्यक्त करणारी आहे. राष्ट्रीय सभा आज आम्ही सतत तीस वर्षें चालवीत आहों, ह्या एकाच गोष्टीवरून आमच्या स्वराज्यविषयक पात्रतेस अनुकूल असें कांहींच अनुमान काढण्यासारखें नाहीं काय? आमच्या महाराष्ट्रांत डेक्कन एज्युकेशन सोसायटी, सर्व्हंटस् ऑफ इंडिया सोसायटी ह्या पहिल्या प्रतीच्या संस्था आहेत; त्यांचीं कामें चांगल्या रीतीनें चाललीं नाहींत काय? डेक्कन एज्युकेशन सोसायटी स्थापन होऊन आज तीस वर्षें झालीं आहेत, व ती एक प्रचंड शाळा व एक प्रचंड कॉलेज उत्तम रीतीनें चालवीत आहे. पंजाबांतील आर्यसमाजाच्या कामगिरीकडे पाहिलें तर मन अगदीं थक्क होऊन जातें! त्या समाजानें सामाजिक, धार्मिक, शिक्षणविषयक, पतितोद्धारक वगैरे शेंकडों चळवळींचें जणूं काय जिकडे तिकडे जाळेंच पसरिलें आहे! त्यांनीं स्थापन केलेल्या लाहोर येथील "दयानंद आंग्लो वेदिक कॉलेजा" बद्दल लिहितांना लंडन युनिव्हर्सिटीचे प्रोफेसर सिडने वेब ह्मणतातः "हें कॉलेज म्हणजे हिंदू लोकांच्या संघटनाशक्तीचें व कार्यकारी सामर्थ्याचें एक स्मारकच आहे" ( This institution is a monument of the organizing and administrative capacity of the Hindu race ) आर्यसमाजाचें सर्व काम प्रातिनिधिक तत्वानें चाललें आहे, हें सर्वांना माहीत आहेच. जे लोक आर्यसमाजासारखी प्रचंड प्रातिनिधिक संस्था स्थापन

करूं शकतात, व ज्यांनीं त्या संस्थेचें बहुविध कार्य त्याच तत्वाबरहुकूम आज चाळीस वर्षें अनेक संकटांशीं टक्कर देऊन अव्याहतपणें व कुशलतेनें चालविलें आहे, ते आपल्या देशाचा राज्यकारभार चालविण्यास अपात्र आहेत, असें म्हणणें म्हणजे केवळ अन्याय होय! स्वावलंबनाच्या तत्वावर उभारलेल्या संस्था चांगल्या रीतीनें चालविणें हें एक स्वराज्याच्या पात्रतेचें द्योतक आहे, व अशा लहानमोठ्या शेंकडों संस्था चांगल्या रीतीनें चालवून आम्हीं आपली स्वराज्य-विषयक पात्रता जगाच्या निदर्शनास पूर्ण रीतीनें आणून दिली आहे व देत आहों.

सारांश, आम्ही स्वराज्यास अद्याप पात्र झालों नाहीं हें मत चुकीचें आहे. स्वराज्याचे जें स्वरूप वर सांगितलें आहे, तशा स्वरूपाच्या स्वराज्याचा प्रारंभ करण्यास कांहींहि प्रत्यवाय नाहीं. स्वराज्य प्राप्त झाल्यानंतर आमचे हातून चुका होणार नाहींत, असें नाहीं. परंतु भूतलावर असें एक तरी राष्ट्र आहे काय, कीं ज्याच्या हातून आजपर्यंत मुळींच चुका घडल्या नाहींत, सध्यां घडत नाहींत, व पुढें कधींहि घडणार नाहींत ? चालू महा युद्धाचीच बाब घ्या. आपल्या साम्राज्याचा खरा शत्रु रशिया नाहीं, जर्मनी आहे, ही गोष्ट इंग्लिश मुत्सद्यांच्या, पार्लमेंटांतील सभासदांच्या, व मतदारांच्या लक्षांत आली होती काय ? जीं राष्ट्रें स्वराज्याचा शेंकडों वर्षें उपभोग घेत आहेत, त्यांच्या हातून जर प्रसंगवशात् मोठमोठाल्या चुका होतात, तर स्वराज्य-प्राप्तीनंतर आमच हातून चुका झाल्या तर नवल तें काय ? हल्लींच्या अँग्लो-इंडियन नोकरशाहीच्या हातून कांहींच चुका होत नाहींत काय ? असें जर आहे, तर आमचे हातून चुका घडतील, इतक्या-वरून आम्ही स्वराज्यास अपात्र कसे ? आमच्या हातून प्रसंगोपात् चुका होतील म्हणून, आम्हांस स्वराज्य मिळतां कामा नये, असें म्हणणें म्हणजे पोहणारा कदा-चित् पोहतांना बुडून मरेल म्हणून पोहूंच नये, किंवा मोरोपंतकवीनें म्हटल्याप्र-माणें, घरांत घूस बिळें करील म्हणून घरच बांधूं नये, असें म्हणण्याइतकेंच हास्यास्पद आहे. सुराज्य स्वराज्याचा मोबदला कधींहि होऊं शकणार नाहीं, (Good government can never be a substitute for self-government ) व स्वतंत्रता मनुष्यास स्वतंत्रतेस पात्र करिते ( It is liberty that fits men for liberty ) हीं राजकीय शास्त्रांतील ( Political Science ) उदात्त तत्त्वें पाश्चात्यांनाच लागू आहेत, पौर्वात्यांना लागू नाहींत असें आहे काय !

आतां एका मुद्याचा विचार करून हा बराच लांबलेला लेख पुरा करितों. कांहीं लोकांचें असें म्हणणें आहे कीं, सध्यांचा काल सामाजिक सुधारणेस फार अनुकूल आहे; परंतु आजच किंवा कांहीं थोडया वर्षांतच जर आपणास स्वराज्य प्राप्त झालें तर सामाजिक सुधारणेची गति मंद होऊन, सामाजिक सुधारणेमुळें प्राप्त होणारें राष्ट्रीय सामर्थ्य कमी होईल, व त्यामुळें स्वराज्यामुळें होणारा फायदा व्हावा तितका होणार नाहीं. सबब, स्वराज्यप्राप्तीबद्दल उतावीळपणा होऊं न देतां, आणखी बरींच वर्षें सामाजिक सुधारणेचें व आस्ते आस्ते राजकीय हक्क संपादन करण्याचें काम तसेंच चालू ठेवावें. सामाजिक सुधारणेबद्दल आमचें धोरण काय आहे, हें आम्हीं मागील अंकांत स्पष्ट सांगितलेंच आहे. आज आह्मांस स्वराज्य मिळाल्यानें आमच्या सामाजिक प्रगतीस धोका येईल, अशी जर आमची समजूत असती, तर आम्हांस स्वराज्य देण्याची वेळ समीप आली आहे, असें आम्हींहि कधीं म्हटलें नसतें. हिंदुस्थानचें भावी ‘स्वराज्य’ म्हणजे हिंदूंचें राज्य नव्हे; अर्थात्च तें ब्राह्मणाचेंहि राज्य नव्हे, हें निराळें सांगावयास नकोच. भावी हिंदी स्वराज्यांत, ब्राह्मण ब्राह्मणेतर मिळून सर्व हिंदु, मुसलमान, पार्शी, ख्रिस्ती वगैरे सर्व हिंदी जातींचा व वर्गांचा, इतकेंच नव्हे तर, हिंदुस्थानांत स्थाईक राहणाऱ्या युरोपियनांचाहि समावेश होणार आहे. हिंदी प्रतिनिधिमंडळांत बरेचसे हिंदु व कदाचित् बरेचसे ब्राह्मण निवडून येतील ही गोष्ट खरी; परंतु सर्वच हिंदु किंवा ब्राह्मण प्रतिनिधी सामाजिक सुधारणेस प्रतिकूळ असतील, व जे कांहीं थोडेबहुत असतील, ते सामाजिक प्रगतीस विरोध करूं शकतील, असें मानण्याचें कारण नाहीं. ब्रिटिश राज्यामुळें व इंग्रजी शिक्षणामुळें जरी सामाजिक सुधारणेस उत्तेजन मिळत गेलें आहे, किंबहुना सामाजिक सुधारणेची चळवळ, ही इंग्रजी राज्यामुळें उत्पन्न झालेल्या नवीन परिस्थितीचेंच फळ होय, असें म्हणण्यास जरी हरकत नाहीं, तरी आमची जागृत झालेली सामाजिक बुद्धि जिवंत राहण्यास सध्यांची विषमतामूलक राज्यपद्धतिच अवश्य आहे असें नाहीं. सामाजिक सुधारणेचीं तत्त्वें अमक्याच राज्यपद्धतीवर अवलंबून आहेत, असें म्हणतां येत नाहीं, व त्यांचें स्वतःसिद्ध उत्तमत्व व त्यांची राष्ट्रीयदृष्ट्या अवश्यकता न समजण्याइतके आम्ही मंदधी आहोंत, असेंहि कोणी म्हणणार नाहीं. उलट, आम्ही राज्यकर्ते परधर्मीय असल्यामुळें तुमच्या धार्मिक व सामाजिक चालीरितींत आम्हांस हात घालतां येत नाहीं, ह्या सबबीवर अवश्य व हितावह सामाजिक कायदे हल्लींच्या परिस्थितींत होण्यास जी अतिशय अडचण पडते, ती पडणार नाहीं, असें आम्हांस वाटतें. सारांश, वरील आक्षेप अगदीं भ्रामक आहे.

एकंदर विचार करितां आम्ही अद्याप स्वराज्यास पात्र झालों नाहीं, हा विचार सोडून दिला पाहिजे; व आपणास स्वराज्य प्राप्त झाल्यावर आपण तें उत्तम तऱ्हेनें चालवूं अशी पूर्ण उमेद बाळगून स्वराज्यप्राप्तीची चळवळ जोरानें, नेटानें, उत्साहानें व जुटीनें चालविली पाहिजे. स्वराज्यास आपण आज जरी लायक असलों, तरी युद्ध संपल्याबरोबर तें आपणांस मिळेलच, इतकी फाजील खात्री बाळगण्यास पूर्वानुभवावरून कांहीं कारण नाहीं. ज्या लोकांनीं आयरिश लोकांना स्वराज्य देण्यास अडथळे आणले व इतका विलंब लावला ते, युद्ध संपल्याबरोबर लागलीच, आम्ही स्वराज्याची मागणी करीत आहों इतक्यामुळेंच, आपणास "स्वराज्याचा अमूल्य ठेवा" देतील असें थोडेंच आहे! स्वराज्यप्राप्तीकरितां आपणास चळवळ करावी लागणारच; इतकेंच नव्हे, तर ती चळवळ **कित्येक वर्षें** करावी लागणार! **कदाचित् आणखी एका पिढीसाहि स्वराज्याकरितां आटोकाट प्रयत्न करावे लागतील!** व हे प्रयत्न करीत असतां, आपले राष्ट्रीय गुण अधिकाधिक विकसित होऊन, आपली सध्यां असलेली स्वराज्यविषयक पात्रता द्विगुणित झाल्याशिवाय राहणार नाहीं. दरम्यान स्वराज्याच्या चळवळीबरोबर सामाजिक वगैरे इतर चळवळी चालूं ठेवण्यास कोणत्याहि रीतीचा प्रत्यवाय नाहीं.

---

# स्वराज्याची पात्रता.

## रा. कोठारी व इतर आक्षेपक यांना उत्तर.

**भारतसेवकाच्या** दुसऱ्या अंकांत " आम्ही स्वराज्यास अपात्र आहोंत काय? " या मथळ्याखालीं जो लेख आला आहे, त्यावरून हिंदुस्थानच्या स्वराज्याच्या पात्रतेच्या प्रश्नाकडे आमच्या वाचकवर्गाचें लक्ष जाऊन, रा. कोठारी, रा. जोशी, रा. गवई, रा. श्रोत्री इत्यादि लेखकांनीं त्याचा पत्रद्वारें ऊहापोह केला आहे, ह्याबद्दल आम्ही त्यांचे फार आभारी आहोंत. स्वराज्याच्या पात्रतेच्या प्रश्नाची वाटाघाट करण्यांत कांहीं अर्थ नाहीं; कारण, त्यामुळें त्या प्रश्नाबद्दल आपल्यांत जे मतभेद आहेत, ते विकोपास जाऊन विनाकारण रणकंदन माजेल, अशी कित्येकांनीं भीति व्यक्त केली आहे. आमच्या मतें ही भीति अगदी निराधार आहे. 'वादे वादे जायते तत्वबोधः' ही उक्ति सर्वथा खरी आहे, व असल्या महत्त्वाच्या प्रश्नाचा सर्व बाजूंनीं व शांतपणानें विचार झाल्यास कुशंका विलयास जातील, व सर्वांना पसंत पडेल असाच मार्ग निघून त्यामुळें सर्वांचेंच कल्याण होईल. मतभेद विकोपास जाऊं न देतां त्यांचा योग्य विचार करणें व शक्य असल्यास एकमेकांपासून भिन्न असलेल्या मतांतूनच योग्य मार्ग शोधून काढणें यांतच खरें शहाणपण आहे. व हें शहाणपण आमच्या लोकांत नाहीं असें आम्हांस वाटत नाहीं. आपण अद्याप स्वराज्यास पात्र झालों नाहीं, आपणास आजच स्वराज्य मिळालें तर वरिष्ठ जाती कनिष्ठ जातींवर जुलूम करतील व म्हणून हिंदी स्वराज्य वरिष्ठ वर्गांना कितीहि फायदेशीर झालें, तरी तें कनिष्ठ वर्गांना अपायकारकच होणार, असें आमच्यांपैकीच कित्येकांना वाटावें हें दुर्दैव तर खरेंच ! वरिष्ठ जातींबद्दल कनिष्ठ जातींना अद्याप पूर्ण विश्वास वाटूं नये इतक्यावरूनच हिंदु समाजपद्धति किती दोषार्ह आहे हें कोणाहि विचारशील मनुष्याला वाटल्यावांचून राहणार नाहीं. तें कांहींहि असलें, तरी जोंपर्यंत वरच्यासारखे विचार प्रचलित आहेत तोंपर्यंत त्याकडे दुर्लक्ष करून कसें चालेल? आपल्यामध्यें मतभेद असतां ते नाहींतच, असा आपला खोटाच समज करून घेऊन केवळ धोपटमार्गानें जाणें म्हणजे डोळे असून ते मिटून चालण्याइतकेंच वेडेपणाचें आहे. प्रतिकूल विचा-

रांकडे दुर्लक्ष करून किंवा ते विचार व्यक्त करणारे सर्वच मूर्ख, मतलबी किंवा द्वेषानें प्रेरित झालेले आहेत असें समजून, त्यांना येनकेन प्रकारेण हाणून पाडण्याचा प्रयत्न करणें आमच्या मतें अगदीं अयोग्य आहे. सबब, रा. कोठारी व इतर आक्षेपक यांनीं आपले आक्षेप मोकळेपणानें व्यक्त केल्याबद्दल त्यांचें अभिनंदन करून त्यांच्या आक्षेपांस ह्या लेखांत उत्तर देण्याचा आमचा विचार आहे.

रा० कोठारी यांनीं एकंदर सात प्रश्न विचारले आहेत. त्यांपैकीं पांचवा प्रश्न अनुषंगिक व क्षुल्लक मुद्यासंबंधीं असल्यामुळें त्याचा येथें फारसा विचार करण्याचें कारण नाहीं. हिंदुस्थानाला स्वराज्य मिळालें पाहिजे असें जें इंग्लिश सद्गृहस्थ व मिसेस बिझांटबाईसारख्या स्त्रिया म्हणतात, तें केवळ "मुत्सद्दीपणानें हिंदी लोकांत शांतता राखण्याच्या हेतूनें" म्हणतात असें आह्मांस वाटत नाहीं. कोणत्याहि राष्ट्रांत सर्वच मुत्सद्दी व परकीय लोकांच्या कल्याणाकरितां झटणारे लोक लबाड असतात असें म्हणणें अत्यंत धाष्टर्याचें आहे, व सर वुइल्यम वेडरबर्न, मिसेस ॲनीबिझांट वगैरे जे आंग्ल सद्गृहस्थ व ज्या आंग्ल स्त्रिया हिंदी स्वराज्याला अनुकूल आहेत, त्या सर्व गृहस्थांचे व स्त्रियांचे अंतस्थ हेतू शुद्ध नाहींत असें आम्हांस वाटंत नाहीं.

रा. कोठारी यांनीं दुसऱ्या ज्या शंका विचारल्या आहेत त्या निरसन करण्याचें काम त्यांनींच आपल्या दुसऱ्या पत्रानें सोपें केलें आहे. व या दोन्ही पत्रांचा एकत्र विचार केला असतां त्यांच्या आक्षेपांचा इत्यर्थ इतकाच दिसतो कीं जे लोक स्वराज्य मागण्यास प्रवृत्त झाले आहेत त्यांनीं सामाजिक अन्याय दूर करण्यासहि तितकेंच प्रवृत्त असलें पाहिजे. हा त्यांचा सिद्धांत आम्हांस पूर्णपणें मान्य आहे; व **भारतसेवकाचें** धोरण त्याप्रमाणेंच आहे हें आतां सांगावयास पाहिजे असें नाहीं. रा. कोठारी यांच्या दुसऱ्या पत्रावरून अस्पृश्य जाती स्पृश्य होईपर्यंत हिंदुस्थानास स्वराज्य मिळूं नये असें त्यांचें म्हणणें आहे, असें दिसत नाहीं. कारण, ते म्हणतात "ज्यांना आपलें ¼ बांधव अस्पृश्य असल्याबद्दल बिलकूल पर्वा वाटत नाहीं, त्यांच्या मागणीची पर्वा ब्रिटिश राजकर्त्यांनीं तरी कां करावी ?" याचा अर्थ अस्पृश्यांचे स्पृश्य होईपर्यंत थांबावें असा मुळींच करावयाचा नाहीं. अस्पृश्य वगैरे जाती ज्या सामाजिक अन्यायाखालीं आज शेंकडों वर्षें दडपल्या गेल्या आहेत, ते दूर करण्याकरितां प्रत्येक स्वराज्य-

वाद्यानें प्रवृत्त झालें पाहिजे, असा रा. कोठारी यांचा आग्रह आहे; व तो आग्रह अयोग्य आहे असें आम्हांस वाटत नाहीं. परंतु हा आग्रह करणारेच रा. कोठारी स्वराज्य मिळविण्यापूर्वी अस्पृश्य जातीचें अस्पृश्यत्व दूर करण्याची आवश्यकता नाहीं असें कबूल करतात. ही त्यांची विचारसरणी आम्हांस तरी विसंगत वाटते. परंतु त्यांच्या विचारसरणींतील ह्या विसंगतपणाशीं आम्हांस कांहीं कर्तव्य नसल्यामुळें त्याचा अधिक विचार करण्याचें कारण नाहीं.

रा. कोठारी यांचा असा एक प्रश्न आहे कीं "कांहीं विशिष्ट वर्ग स्वराज्याचे हक्क उपभोगण्यास समर्थ झाले म्हणजे तेवढ्यानें राष्ट्राची स्वराज्यास पात्रता होते काय?" हा प्रश्न विचारतांना हिंदुस्थानांतील सुशिक्षित वर्ग स्वराज्याचे हक्क उपभोगण्यास समर्थ झाला आहे किंवा नाहीं ह्याबद्दल रा. कोठरी यांनीं आपलें मत स्पष्ट रीतीनें जाहीर केलें असतें तर बरें झालें असतें, असें आम्हांस वाटतें. तथापि हा मुद्दा जरी बाजूला ठेवला, तरी रा. कोठारी यांच्या वरील प्रश्नाचें उत्तर हेंच होय कीं, राष्ट्रांत सुशिक्षित वर्ग बराचसा झाला व तो वर्ग स्वराज्याचे हक्क उपभोगण्यास समर्थ झाला म्हणजे राष्ट्र स्वराज्यास पात्र झालें असेंच म्हटलें पाहिजे. सामान्य जनता सुशिक्षित नसली, व स्वराज्याचे हक्क उपभोगण्यास समर्थ नसली, म्हणजे यच्चयावत् वयांत आलेल्या स्त्रीपुरुषांस किंवा पुरुषांस प्रतिनिधि निवडण्याचा हक्क देऊन इंग्लंड, कॅनडा, आस्ट्रेलिया वगैरे देशांत जें परिणत स्वरूपाचें स्वराज्य आहे, तशा प्रकारचें स्वराज्य एकदम स्थापन करणें हितावह होणार नाहीं हें उघड आहे. व मागें आम्हीं आपल्या लेखांत म्हटल्याप्रमाणें असल्या परिणत स्वरूपाचें स्वराज्य हिंदुस्थानला द्यावें असें कोणीहि म्हणत नाहीं. परंतु असल्या परिणत स्वरूपाच्या स्वराज्यास हिंदुस्थान अद्याप पात्र झाला नसला म्हणून तो स्वराज्यास मुळींच पात्र झाला नाहीं, असें मात्र आम्हांला वाटत नाहीं. रा. कोठारी यांची विचारसरणी अशी दिसते कीं, हिंदुस्थानांतील सर्व लोक स्वराज्याचे हक्क उपभोगण्यास समर्थ होईतोंपर्यंत हिंदुस्थाननें मर्यादित स्वरूपाचे स्वराज्यसुद्धां मागूं नये, ही विचारसरणी चुकीची आहे. हिंदुस्थानांत यच्चयावत् तेहेतीस कोटी लोक स्वराज्याला पात्र होईपर्यंत सुशिक्षित लोकांनीं स्वस्थ बसावें व त्यामुळें त्यांच्या ठिकाणीं उत्पन्न झालेली स्वराज्याची पात्रता वाव नसल्यामुळें खिचपत पडावी, ही पद्धति आत्मघातकी आहे असें आमचें स्पष्ट मत आहे. बहुतेक स्वराज्यशाली देशांत

स्वराज्याची आस्ते आस्ते परिणतिच होत गेली आहे, व अशा प्रकारची परिणति हिंदुस्थानच्या स्वराज्याच्या बाबतींत झाल्यास त्यांत कांहींहि वावगें होणार नाहीं. राष्ट्रांतील कोणत्याहि वर्गास अगोदर स्वराज्याचा प्रत्यक्ष अनुभव मिळण्यापूर्वींच एकदम परिणत स्वरूपाचें स्वराज्य स्थापन करण्यापेक्षां मर्यादित स्वराज्य स्थापन करणें व नंतर त्याचा अधिकाधिक विकास करणें हेंच श्रेयस्कर आहे. परिणत स्वरूपाचें स्वराज्य एकदम पूर्णपणें स्थापन करणें ह्यांत व्यावहारिक मुत्सद्दीपणा बिलकूल नसून त्यायोगानें राष्ट्रांत बराच घोंटाळाहि होण्याचा संभव आहे. उलटपक्षी जे लोक शिक्षणानें स्वराज्याचे हक्क उपभोगण्यास पात्र झाले आहेत त्यांना स्वराज्याचा प्रत्यक्ष अनुभव देऊन, इतर लोक शिक्षणानें स्वराज्याचे हक्क उपभोगण्यास जसेजसे पात्र होतील, तसतसें परिणत स्वरूपाचें स्वराज्य स्थापन करणें ही पद्धति अधिक हितावह आहे. असली पद्धति क्रांतिकारक नसून प्रशमनशील आहे. इंग्लंड, कानडा, आस्ट्रेलिया, जपान वगैरे देशांत ह्याच पद्धतीचें अवलंबन केलें आहे, व जी पद्धति त्या देशांना हितावह झाली आहे, ती हिंदुस्थानासच हितावह कां होऊं नये, हें आम्हांस समजत नाहीं.

रा. कोठारी व इतर आक्षेपक यांचा आणखी असा आक्षेप आहे कीं, हिंदुस्थानास आजच जर स्वराज्य प्राप्त झालें तर सर्व सत्ता वरिष्ठ जातींच्या हातांत जाऊन ते अस्पृश्य वगैरे जातींवर जुलूम करतील व त्यामुळें अस्पृश्य जातींची सध्यांच्या राज्यपद्धतीखालीं जी प्रगति होत आहे ती बंद पडून पुन्हां ते वरिष्ठ वर्गांच्या जुलमाखालीं दडपून जातील. अशा प्रकारची भीति कित्येकांना वाटावी ही मोठी दुःखाची गोष्ट होय. व त्यावरून आम्ही जें एक अनुमान काढतों तें हें कीं, ह्या भीतीस जागा राहणार नाहीं अशा प्रकारचेंच वर्तन सर्व वरिष्ठ वर्गांनीं पूर्णपणें ठेविलें पाहिजे. राष्ट्रांतील अनेक वर्गांपैकीं कांहींचा इतर वर्गांवर विश्वास न बसतां, धर्मानें, चालीरीतीनें व इतिहासपरंपरेनें सर्वतोपरि भिन्न अशा परकीयांवर बसावा, ही गोष्ट कोणत्याहि राष्ट्रास लांछनास्पदच आहे, यांत शंका नाहीं. आपल्या सुशिक्षित वरिष्ठ जातींच्या देशबंधूंच्या हातांत सत्ता गेल्यानें आपल्यावर जुलूम होईल व सध्याचीच राज्यपद्धति कायम राहिल्यानें आपली प्रगति होईल हा जो मागासलेल्या जातींतील कित्येक लोकांचा समज आहे, तो चुकीचा जरी असला, तरी त्यांचा असा समज कां असावा याचा प्रत्येक देश-

हितेच्छु सुशिक्षित हिंदी गृहस्थानें शांतपणानें विचार केला पाहिजे. वास्तविक पहातां समाजपद्धति अशा प्रकारची पाहिजे कीं, कोणत्याहि वर्गाला इतर वर्गाबद्दल यत्किंचितहि अविश्वास वाटतां कामा नये. परंतु हिंदुस्थानांत असा अनुभव येत नाहीं, इतक्यावरूनच हिंदुसमाजपद्धति सुधारण्याची किती अवश्यकता आहे व कनिष्ठ वर्गांची जीं गाऱ्हाणीं असतील तीं दूर करणें किती अगत्याचें आहे हें दिसून येतें. परंतु हें जरी खरें असलें, तरी हिंदुस्थानाला स्वराज्य मिळाल्यावर वरिष्ठ जातींचे सुशिक्षित हिंदु लोक मागासलेल्या जातींवर जुलूम करतील व त्यांना अज्ञानांतच व अवनतींतच खिचपत पडूं देतील, असें मानण्यास काय जागा आहे ? या प्रश्नाचा रा. कोठारी यांनीं सविस्तर विचार करून स्वराज्य झाल्यानंतर सुशिक्षित वरिष्ठ जातींचे लोक कनिष्ठ जातींवर जुलूम करतील असें मानण्यास त्यांना कोणती कारणें वाटत आहेत, तीं त्यांनीं स्पष्ट सांगितलीं असतीं तर बरें झालें असतें. परंतु असें न करितां मागासलेल्या जातींत नीचत्वाची जाणीव आहे, व " खोगीर लादूं दिल्यावर तें लादण्यास कोणीही तयार असतोच " इतक्यावरूनच त्यांनीं सुशिक्षित वरिष्ठ वर्गांवर मोघम आरोप केला आहे. परंतु हा आरोप करण्यास सबळ कारण आहे असें आम्हांस वाटत नाहीं. अस्पृश्य जातींचें मुख्य गाऱ्हाणें म्हटलें म्हणजे अस्पृश्यत्व हें होय. परंतु हिंदुस्थानला स्वराज्य प्राप्त होण्यापूर्वी हें अस्पृश्यत्व नाहींसें झालें पाहिजे, असें रा. कोठारीसुद्धां म्हणत नाहींत. शिक्षणाची बाब घेतल्यास स्वराज्य झाल्यानंतर अस्पृश्य जातींना शाळांतून मज्जाव करण्यांत येईल असें रा. कोठारी यांचें म्हणणें आहे काय ! व असें असल्यास त्यास काय आधार आहे, हें ते सांगतील काय ? सांपत्तिक स्थितीचा प्रश्न घेतल्यास सर्वांची सांपत्तिक स्थिति समान दर्जाची होऊन श्रीमंती-गरीबी वगैरे भेद लयास जातील, ही जी समजूत कांहीं पाश्चात्य लोकांत दिसून येते, ती केवळ कल्पनासृष्टींतील आहे. सबब अस्पृश्य जातींतील पुष्कळ लोकांना आपले दिवस दारिद्र्यांत काढावे लागले, तर तो वरिष्ठ वर्गांचा जुलूम कसा ? वरिष्ठ वर्गांतसुद्धां ज्यांना दारिद्र्याशीं अहोरात्र झगडावें लागत आहे असे थोडे थोडके लोक आहेत असें नाहीं. नैतिक उन्नतीची गोष्ट घेतल्यास अस्पृश्य जातींनीं व्यसनपंकांत कायमचें मग्न असावें, अशी वरिष्ठ लोकांची इच्छा आहे, असें म्हणण्याचें रा. कोठारी धार्ष्ट्य करतील काय ! सारांश, कोणत्याहि रीतीनें विचार केल्यास वरिष्ठ जातींचे

सुशिक्षित हिंदु लोक अस्पृश्यादि मागासलेल्या जातींवर स्वराज्यांत जुलूम करतील असें मानण्यास कांहीं कारण दिसत नाहीं. आतां अस्पृश्यांचें अस्पृश्यत्व नष्ट झालें पाहिजे, हें आम्हांस कबूल आहे; व त्याच्या ठिकाणीं जी नीचत्वाची भावना रूढ झाली आहे, तीहि नष्ट झाली पाहिजे हेंहि आम्हांस कबूल आहे. परंतु ह्या बाबतींत सुशीक्षित वरिष्ठ वर्गाकडून हरकत येईल असें मानण्यास काय जागा आहे ? उलटपक्षीं, स्वराज्य झाल्यावर पहिली जी गोष्ट करण्यांत येईल ती सार्वत्रिक, मुक्त व सक्तीचें प्राथमिक शिक्षण ही होय. ज्या ज्या देशांत स्वराज्य स्थापन झालें आहे, त्या त्या देशांत प्रथमतः ज्या महत्त्वाच्या गोष्टी करण्यांत आल्या, त्यांत सार्वत्रिक, मुक्त व सक्तीचें प्राथमिक शिक्षण ही प्रमुख होय; व हिंदुस्थानला स्वराज्य मिळाल्यावर हिंदुस्थानचें पार्लमेंट प्राथमिक शिक्षण सार्वत्रिक, मुक्त व सक्तीचें केल्याशिवाय राहणार नाहीं, अशी आमची पक्की खात्री आहे. जे लोक आजच हिंदुस्थानांत प्राथमिक शिक्षण सार्वत्रिक, मुक्त व सक्तीचें झालें पाहिजे म्हणून प्रयत्न करीत आहेत, तेच लोक स्वराज्य झाल्यानंतर वरील प्रकारचें शिक्षण सुरू करण्यास विरोध करतील असें मानणें म्हणजे सुशिक्षित लोकांवर अत्यंत नीचतेचा आरोप करण्यासारखें आहे. आणि प्राथमिक शिक्षण सार्वत्रिक, मुक्त व सक्तीचें झाल्यावर अस्पृश्यादि मागसलेल्या जातींना आपली उन्नति करून घेण्यास साधन मिळणार नाहीं काय ? व त्यांच्या ठिकाणीं जी नीचत्वाची कल्पना परंपरेनें आली आहे, ती शिक्षणाचे योगानें नाहींशी होणार नाहीं काय ? व ही नीचत्वाची कल्पना नष्ट झाल्यावर त्यांना सामाजिक विषमतेची व अन्यायाची चीड येणार नाहीं काय ? व ही चीड त्यांना येऊं लागल्यावर आपली सामाजिक उन्नति करून घेण्यास ते आपण होऊनच प्रयत्न करणार नाहींत काय ? यावर कदाचित् असें म्हणण्यांत येईल कीं, हें सर्व खरें आहे. परंतु अस्पृश्य जातींच्या अस्पृश्यत्वाचा प्रश्न अंशतः तरी धार्मिक असल्यामुळें व हिंदुसमाजाचीं धार्मिक सूत्रें धर्माधिकाऱ्यांच्या हातीं असल्यामुळें स्वराज्यांत त्यांचें अस्पृश्यत्व दूर करण्यांत येईलच, अशी खात्री नाहीं. ह्या आक्षेपांत मुळींच तथ्य नाहीं असें आम्ही म्हणत नाहीं. परंतु स्वराज्यप्राप्तीकरितां अस्पृश्यांचें अस्पृश्यत्व नष्ट झालेंच पाहिजे, असा खुद्द रा. कोठारी यांचा आग्रह नाहीं, असें आम्हीं वर सांगितलेंच आहे. तथापि शिक्षणाचा प्रसार झाल्यावर व त्यायो-

गानें अस्पृश्य जातींची सामाजिक, नैतिक वगैरे उन्नति झाल्यावरहि धर्माधिकाऱ्यांचें प्राबल्य पूर्वीप्रमाणेंच चालत राहून अस्पृश्य जातींवर अस्पृश्यत्वाचा जो शिक्का मारलेला आहे, तो काढून टाकला जाणार नाहीं असें आम्हांस वाटत नाहीं. कदाचित अस्पृश्यत्वाचा हा शिक्का काढून टाकण्याकरितां खुद्द अस्पृश्य जातींतील लोकांना झगडावें लागेल. ह्या झगड्यांत त्यांना इतर वर्गांतील लोकांकडून मदत मिळणार नाहीं असें नाहीं. समाजांतील बराचसा भाग त्यांचें अस्पृश्यत्व दूर करण्याकरितां तयार झाला असतां व खुद्द अस्पृश्य जातींतील सहा कोटी लोक आपलें अस्पृश्यत्व दूर करून घेण्याकरितां चळवळ करीत असतां केवळ कांहीं धर्माधिकाऱ्यांचें व त्यांच्या अनुयायांचें चालेल असें आम्हांस वाटत नाहीं. ज्याप्रमाणें जपानी सरकारनें जपान देशांतील एटा वगैरे अस्पृश्य जातींचें अस्पृश्यत्व कायद्यानें नाहींसें करून त्यांना इतर नागरिकांबरोबर समान हक्क दिले, तशी स्थिति हिंदुस्थानांत स्वराज्य स्थापन झाल्यावर **ताबडतोब** जरी झाली नाहीं, तरी अस्पृश्य जातींना नागरिकत्वाचे समान हक्क मिळाल्यावांचून रहाणार नाहींत, व कालांतरानें त्यांचें अस्पृश्यत्वहि अजीबात नाहींसें होईल. ह्यासंबंधानें आणखी एक गोष्ट लक्षांत घेतली पाहिजे ती ही कीं, हिंदुस्थान जें स्वराज्य मागत आहे तें साम्राज्यांतर्गत असल्यामुळें गव्हर्नर किंवा गव्हर्नर जनरल ह्या नात्यानें ब्रिटिश सत्तेचे प्रतिनिधी हिंदुस्थानांत राहणारच, व ज्याप्रमाणें कानडा, आस्ट्रेलिया, दक्षिण आफ्रिका ह्या स्वराज्य उपभोगणाऱ्या ब्रिटिश वसाहतींत ब्रिटिश सत्तेच्या प्रतिनिधींना कांहीं विशिष्ट प्रकारचे अधिकार दिलेले आहेत, त्याप्रमाणें हिंदुस्थानांतील ब्रिटिश सत्तेच्या प्रतिनिधींच्या हातांत विशिष्ट अधिकार ठेवण्यांत येतीलच. वर दिलेल्या ब्रिटिश वसाहतींत कोणताहि कायदा पसार होण्यापूर्वी त्यास गव्हर्नराची संमति लागते. इतकेंच नव्हे, तर कांहीं प्रकारचे कायदे ब्रिटिश राजाच्या संमतीशिवाय करतांहि येत नाहींत. उदाहरणार्थ, युरोपियनलोक व जे युरोपियन नाहींत असे लोक यांच्यामध्यें भेदभाव स्थापन करणारा असा एखादा कायदा करणें असल्यास त्यास राजाची संमति मिळाल्याशिवाय तो पास करतां येत नाहीं. हिंदुस्थानांत स्वराज्य झाल्यावर अर्थातच हिंदुस्थानांतील पार्लमेंटाच्या अधिकारावर असल्या प्रकारचे निर्बंध राहणारच. व म्हणून त्या पार्लमेंटांत जात्यभिमान मनांत बाळगून कनिष्ठ मानलेल्या जातींवर जुलूम करण्याचें कोणी सभासदानें मनांत आणलें व यदाकदाचित् त्यास बहुमत मिळून आपली इच्छा अमलांत आणण्याकरितां कायदा

पार्लमेंटाकडून पसार करून घेतां आला, तरी देखील तो कायदा गव्हर्नराची किंवा खुद्द राजाची संमति न मिळाल्यामुळें अमलांत येणार नाहीं. सारांश, हिंदी स्वराज्य झाल्यावर अस्पृश्य वगैरे जातींवर वरिष्ठ जाती जुलूम करतील व त्यामुळें त्यांची प्रगति कुंठित होईल, हा आक्षेप अगदीं चुकीचा आहे असें आम्हांस वाटतें.

ह्यासंबंधानें 'स्पष्टवक्त्या'च्या –रा. कोठाऱ्यांच्या नव्हे–एका आक्षेपाचा विचार करणें अवश्य आहे. 'स्पष्टवक्ता' आपले लेखांत म्हणतात, "सुशिक्षित हिंदी लोकांना आपल्या देशांतील बहुजनसमाजाविषयीं अधिक सहानुभूति असणें साहजिक आहे. परंतु जोंपर्यंत सहकारित्वानें दोन्ही वर्गांतील हितसंबंधांमधील विरोध नाहींसा झाला नाहीं व बहुजनसमाजाची सामाजिक व सांपत्तिक उन्नति झालेली नाही, तोंपर्यंत सुशिक्षित वर्ग बाहेरून निकड लागल्याशिवाय बहुजनसमाजाच्या हिताविषयीं काळजी वाहणार नाहीं." सुशिक्षित लोक व बहुजनसमाज ह्या दोन्ही वर्गांच्या हितसंबंधांत काय विरोध आहे हें 'स्पष्टवक्त्या'नें स्पष्ट करून सांगितलें असतें तर फार बरें झालें असतें. व अशा प्रकारचें अँग्लो–इंडियनी विधान 'स्पष्टवक्त्या'च्या लेखणीतून उतरावें ह्याबद्दल आम्हांस फार वाईट वाटतें. सुशिक्षित वर्गाबद्दल त्यांची जी कल्पना आहे तीहि सर्वथैव खरी आहे, असें आम्हांस वाटत नाहीं. सुशिक्षित वर्ग बाहेरून निकड लागल्याशिवाय बहुजनसमाजाच्या हिताविषयीं काळजी वाहणार नाहीं हा त्यांचा सिद्धांत अतिव्याप्तीच्या दोषास पात्र आहे. जे सुशिक्षित लोक बहुजनसमाजाच्या हिताविषयीं काळजी वाहत नाहींत त्यांना सुशिक्षित कसें म्हणावें हा जरी मुद्दा बाजूला ठेवला, तरी सर्वच सुशिक्षित लोक बाहेरून निकड लागल्याशिवाय बहुजनसमाजाच्या हिताविषयीं काळजी वाहणार नाहींत, हें म्हणणें चुकीचें आहे. सुशिक्षित वर्गांत जरी कांहीं लोक असे असले कीं त्यांना स्वतःच्या चैनीशिवाय व वैभवाशिवाय दुसरें कांहीं दिसत नाहीं, तरी त्यांच्यामध्यें बहुजनसमाजाकरितां निरपेक्ष बुद्धीनें झटणारे बरेच लोक आहेत यांत शंका नाहीं. व राष्ट्रांत ज्या मानानें देशाभिमान, राष्ट्रसेवाबुद्धि, स्वार्थत्याग वगैरे गुण अधिकाधिक विकसित होतील, त्या मानानें असल्या थोर मनाच्या सुशिक्षित लोकांची संख्या वाढत जाणारच. सबब हल्लीं विदेशी अधिकाऱ्यांच्या हातीं असलेली सत्ता सुशिक्षित लोकांच्या हातांत गेल्यानें त्यांची बहुजनसमाजाच्या हिताविषयींची काळजी कमी होईल अशी भीति बाळगण्याचें कांहीं कारण नाहीं.

रा. कोठारी यांचा तिसरा प्रश्न असा आहे कीं, "राजकीय परतंत्रतेच्या दुःखा-पेक्षां कृत्रिम सामाजिक नीचत्वाचें दुःख जबर आहे. असें असतां सामाजिक अन्यायानें चीड न येणारे बहुसंख्य लोक जोंपर्यंत हिंदुस्थानांत आहेत तोंपर्यंत त्यांना राजकीय पारतंत्र्याची चीड कशी येणार ?" राजकीय परतंत्रतेचें दुःख अधिक किंवा सामाजिक नीचत्वाचें दुःख अधिक हा प्रश्न बराच बिकट आहे; आणि रा. कोठाऱ्यांप्रमाणें राजकीय परतंत्रतेच्या दुःखापेक्षां कृत्रिम सामाजिक नीचत्वाचें दुःख अधिक जबर आहे असें सर्वांचेंच मत असेल असें आम्हांस वाटत नाहीं. प्रत्येक देशांत कमी जास्त प्रमाणानें सामाजिक उच्चत्वनीचत्व हें आहेच. हिंदुस्थानांतील जातिभेदाप्रमाणें जातिभेद अन्यत्र नाहींत, ही गोष्ट खरी आहे; व उच्च वर्ग, मध्यम वर्ग, मजुरदारांचा वर्ग, शेतकऱ्यांचा वर्ग वगैरे जे वर्ग इतर देशांप्रमाणें हिंदुस्थानांत आहेत त्यांत आणखी जातिभेदाची भर पडल्यामुळें हिंदुस्थानची स्थिति बरीच चमत्कारिक झाली आहे व त्याच्या उन्नतीचा प्रश्न बराच बिकट झाला आहे हेंहि खरें आहे. परंतु इतर देशांत सामाजिक उच्चत्व व नीचत्व हा भाव नाहीं असें नाहीं. ज्याप्रमाणें जगांत अद्याप राजकीय समता स्थापन झालेली नाहीं, त्याप्रमाणें कोणत्याहि देशांत सामाजिक समताहि पूर्णपणें प्रस्थापित झालेली नाहीं. अमेरिका खंडांत आज आरंभापासून प्रजासत्ताक राज्यपद्धति चालू आहे, आणि इंग्लंड, जर्मनी, रशिया, इटली वगैरे युरोपियन राष्ट्रांत ज्याप्रमाणें सरदारांचा वर्ग आहे तसा तेथें वर्गहि नाहीं. तथापि त्या देशांतही संपत्तीमुळें व इतर कारणांमुळें सामाजिक उच्चनीच भाव उत्पन्न झालेले आहेत. हे भेदभाव जितके अपरिहार्य आहेत तितकेच असावे,त्यापेक्षां अधिक तीव्र नसावेत ह्याकरितां त्या देशांत कांहीं परहिततत्पर लोक प्रयत्न करीत आहेत ही गोष्ट खरी, व कोणत्याहि देशांत जे भेदभाव अपरिहार्य आहेत त्यापेक्षां अधिक असूं नयेत, जितके ते अधिक असतील तितका मानवी उन्नतीस विरोध होईल हेंहि अगदीं निश्चित आहे. परंतु प्रत्येक देशाची सध्यांची स्थिति अशी आहे कीं जे भेदभाव अपरिहार्य आहेत, त्यापेक्षां अधिक प्रत्येकांत दिसून येतात. परंतु त्यावरून कोणत्याही सुधारलेल्या देशांतील लोक राजकीय पारतंत्र्यांचें दुःख सामाजिक नीचत्वाच्या दुःखापेक्षां कमी मानतात असें आढळून येत नाहीं. व त्याचें कारण उघडच आहे. राजकीय परतंत्रता प्राप्त झाल्यानें सामाजिक नीचत्वाचें दुःख नाहींसें होईलच अशी काय खात्री आहे ? दुसरें कारण असें कीं, सामा-

जिक नीचत्व जरी कितीहि दुःखद असलें तरी त्या नीचत्वानें पीडित झालेले लोक समाजांतलेच असतात व सामाजिक उच्चनीच भाव कितीहि तीव्र असले, तरी त्यामुळें समाजांतील भिन्न भिन्न वर्गांचें परस्परावलंबित्व नाहींसें होत नाहीं. ह्या कारणास्तव कोणत्याहि सुधारलेल्या देशांत राजकीय परतंत्रतेचें दुःख सामाजिक नीचत्वाच्या दुःखापेक्षां कमी मानलें जात नाहीं. व हिंदुस्थानांतच तें तसें मानलें जात असेल तर त्यावरून अनुमान इतकेंच निघतें कीं, सामाजिक नीचत्वाच्या दुःखाची जाणीव ज्याप्रमाणें पुष्कळांना नाहीं, त्याप्रमाणेंच राजकीय परतंत्रतेच्या दुःखाची जाणीव ज्यांना आहे, असेहि लोक जितके असावे तितके नाहींत. जाणिवेशिवाय सुखदुःख नाहीं हें उघडच आहे, व ज्यांना राजकीय परतंत्रतेच्या किंवा सामाजिक नीचत्वाच्या दुःखाची जाणीवच नाहीं, त्यांचे ठिकाणीं त्या जाणीवेपासून होणारें दुःख तरी कसें असणार ? व दुःखच जर नाहीं तर अमकें दुःख हलकें व अमकें दुःख जबर अशी भावना तरी कशी असणार ! परंतु ज्यांच्या ठिकाणीं ही जाणीव जागृत झालेली आहे त्यांना राजकीय पारतंत्र्याचें दुःख व सामाजिक नीचत्वाचें दुःख ह्या दोन प्रकारच्या दुःखांत निवड करण्याची पाळी आली तर ते पहिल्याच प्रकारचें दुःख निवडतील असें नाहीं. सामाजिक नीचत्वाचें दुःख कमी आहे असें नाहीं, परंतु तें राजकीय परतंत्रतेच्या दुःखापेक्षां अधिक जबर आहे हा सिद्धांत सर्वमान्य होईल असें आम्हांस वाटत नाहीं.

रा. कोठारी यांचा चवथा आक्षेप असा आहे कीं, "हिंदी स्वराज्य सुधारणेला प्रतिकूल असणार." ह्या आक्षेपाच्या समर्थनार्थ त्यांनीं जी विचारसरणी स्वीकारली आहे ती अत्यंत चमत्कारिक आहे. ते म्हणतात कीं, हिंदु लोक थोर, परोपकारी, विश्वैकवृत्तीच्या मिशनऱ्यांचे आभार न मानतां त्यांच्यावर शेणमाराचा प्रयोग करितात, व ह्यावरून हिंदुस्थान सामाजिक सुधारणेस प्रतिकूल आहे असें सिद्ध होतें. युरोपियन मिशनऱ्यांनीं शिक्षण वगैरे बाबतींत जें उत्तम कार्य केलें आहे त्याची किंमत आम्ही यत्किंचितहि कमी मानीत नाहीं. मिशनऱ्यांपासून हिंदी लोकांचें बरेंच कल्याण झालें आहे हें निर्विवाद आहे; परंतु तितक्यावरून सर्वच मिशनरी "थोर, परोपकारी व विश्वैकवृत्तीचे" आहेत असें अनुमान काढणें बरोबर होणार नाहीं. तसेंच हिंदु लोक मिशनऱ्यांना नेहमींच शेणमार करितात हेंहि खरें नाहीं. शेणमाराचा प्रयोग नेहमीं घडत नसून क्वचितूच

घडतो, हें मिशनरी लोक सुद्धां कबूल करतील; व कांहीं प्रसंगीं घडणाऱ्या शेणमाराच्या प्रयोगावरून हिंदु लोक सामाजिक सुधारणेस प्रतिकूल आहेत हें अनुमान काढणें जर योग्य आहे, तर बऱ्याच प्रसंगीं हिंदु लोक मिशनऱ्यांचा उपदेश शांतपणानें ऐकून घेतात, इतकेंच नव्हे तर हजारों हिंदुलोक आपल्या मुलांना मिशनऱ्यांनीं चालविलेल्या शाळांत व कॉलेजांत पाठवितात ह्यावरून हिंदुसमाज सुधारणेस अनुकूल आहे असें अनुमान कां काढूं नये ? आणखी अशी एक गोष्ट आहे कीं, जर कधीं कधीं मिशनऱ्यांवर शेणमाराचा प्रयोग होत असेल तर त्याचें कारण बहुतेक अंशीं हिंदु लोकांच्या धार्मिक मनोवृत्तींना अविचारानें धक्का देणारी त्यांची उपदेशपद्धति हेंच असतें. ज्या विभूती हिंदु लोकांना अत्यंत प्रिय आहेत व ज्यांची ते अनन्यभावानें पूजा करीत असतात त्यांचेवर घाणेरडे आरोप करून त्यांची जर मिशनऱ्यांनीं निर्भर्त्सना केली व त्यामुळें त्यांच्या हिंदु श्रोत्यांना राग येऊन त्यांनीं आपला राग पंकप्रहारानें व्यक्त केला तर त्यांत दोष कोणाचा? व त्यावरून हिंदुसमाज सामाजिक सुधारणेस प्रतिकूल आहे असें अनुमान कसें निघतें ? यावर कदाचित् असें म्हणण्यांत येईल कीं, रा. कोठारी यांची विचारसरणी जरी चुकीची असली तरी हिंदुसमाज सामाजिक सुधारणेस प्रतिकूल आहे हा त्यांचा सिद्धांत खोटा नाहीं. संख्येच्या दृष्टीनें विचार केल्यास आज हिंदुसमाज सामाजिक सुधारणेस प्रतिकूल आहे ही गोष्ट खरी आहे. तथापि त्या प्रतिकूलतेस न जुमानतां हिंदुसमाजांत सामाजिक सुधारणा अधिकाधिक प्रमाणानें घडून येत आहेत व कालांतरानें बहुतेक सुधारणा रूढ होतील असा अंदाज दिसत आहे. जातिभेद नष्ट झाले पाहिजेत असें मानणाऱ्यांची संख्या जितकी असावी तितकी अद्याप जरी झाली नाहीं, तरी ती वाढत आहे; व जरी जातिभेद अजिबात नाहींसे होण्याचा समय जवळ आलेला दिसत नाहीं, तरी जातिभेदांची तीव्रता कमी होण्याचा जो उपक्रम सुरू झाला आहे, तो अधिकाधिकच वाढत जाईल अशीं स्पष्ट चिन्हें दिसूं लागलीं आहेत. बेटीव्यवहाराचे बाबतींत जे निर्बंध आहेत ते नाहींसे होण्यास जरी बराच विलंब लागला, तरी रोटीव्यवहारासंबंधाचे निर्बंध अधिकाधिक प्रमाणानें ढिले पडत चालले आहेत हें कोणाच्याहि लक्षांत येण्यासारखें आहे; व निदान अस्पृश्यांचें अस्पृश्यत्व नाहींसें होईल ह्याबद्दल आम्हांस तरी शंका वाटत नाहीं. सारांश, हिंदुसमाजांत ज्या सामाजिक सुधारणा व्हावयास पाहिजेत त्या जरी अद्याप पूर्णपणें घडून आल्या नाहींत, तरी त्यांची

गति अव्याहतपणें चालू आहे व तिचा जोर दिवसेंदिवस कमी न होतां अधिकाधिकच होणार ह्यांत तिळमात्रहि शंका नाहीं. सबब हिंदी स्वराज्य सामाजिक सुधारणेस प्रतिकूलच असणार हा रा. कोठाऱ्यांचा सिद्धांत बरोबर आहे असें आम्हांस वाटत नाहीं. दुसरी गोष्ट अशी कीं, सध्यांची राज्यपद्धति तरी सामाजिक सुधारणेस अनुकूल आहे काय ? हल्लींचे अग्लो–इंडियन राज्यकर्ते सामाजिक सुधारणेस कोणती मदत करीत आहेत ? विधवापुनर्विवाह कायदेशीर आहे असें ठरवून ब्रिटिश सरकारांनीं वरिष्ठ जातींत विधवापुनर्विवाहास जी पूर्वी आडकाठी होती ती नाहींशी केली आहे ही गोष्ट खरी; व स्त्रीशिक्षणासहि त्यांचेकडून मदत मिळत आहे हेंही खरें आहे. परंतु एकंदरींत विचार करतां अँग्लो–इंडियन अधिकाऱ्यांचें किंवा सरकाराचें सध्यांचें धोरण सामाजिक सुधारणेस फारसें अनुकूल आहे असें नाहीं. जर तें तसें असतें तर चार वर्षांपूर्वी नामदार बसूंनीं व्हाइसरॉयच्या कायदे कौन्सिलांत जें बिल आणलें होतें त्यास त्यांनीं विरोध केला नसता. मागासलेल्या जातींना ब्रिटिश अमदानींत इतर जातींप्रमाणेंच शिक्षण मिळण्याची मुभा आहे ही गोष्ट खरी; परंतु हिंदुस्थानास स्वराज्य प्राप्त झाल्यावर ह्या बाबतींत फरक होईल, व अस्पृश्यादि जातींना विद्यामंदिरांत घेतलें जाणार नाहीं, असें रा. कोठारी यांचें म्हणणें आहे काय ?

रा. कोठारी यांनीं आपल्या सहाव्या प्रश्नांत प्रागतिकांवर टीका केली आहे, व ज्या अर्थी जहालांप्रमाणें प्रागतिकही एकदम स्वराज्य मागत आहेत, त्याअर्थी ते आपल्या धोरणापासून चळले आहेत, असें त्यांचें म्हणणें आहे. प्रागतिक वरील टीकेला उत्तर देण्यास समर्थ असल्यामुळें त्यांच्यावर रा. कोठारी यांनीं केलेल्या आरोपाचा सविस्तर विचार करण्याचें आम्हांस कांहीं प्रयोजन नाहीं. महायुद्धामुळें सध्यांची उत्पन्न झालेली अपूर्व परिस्थिति लक्षांत घेऊन एकदम स्वराज्याची मागणी करण्याची आवश्यकता व इष्टता कांहीं प्रागतिकांना वाटूं लागली तर त्यांत कांहीं आश्चर्य नाहीं. परंतु ह्या बाबतींत रा. कोठारी यांचा थोडासा उतावीळपणा झाला आहे असें आम्हांस म्हटल्यावांचून राहवत नाहीं. गेल्या राष्ट्रीय सभेनें स्वराज्यविषयक सुधारणांचा मसुदा तयार करण्याकरितां कमिटी नेमलेली आहे. तो मसुदा काय आहे हें समजण्यापूर्वींच राष्ट्रीय सभा एकदम स्वराज्याचीच मागणी करीत आहे, असें म्हणण्यास रा. कोठारी यांच्याजवळ काय आधार आहे ! उलट ना. श्रीनिवास शास्त्री यांनीं

आपल्या बेळगांवच्या भाषणांत राष्ट्रीय सभेनें नेमलेल्या कमिटीनें तयार केलेल्या मसुद्याच्या स्वरूपाचें जें दिग्दर्शन केलें आहे त्यावरून पाहतां त्या मसुद्यांत व स्वराज्यांत फरक आहे, इतकेंच नव्हे तर त्यांत हिंदी पार्लमेंटाचे ३ सभासद सरकारनें नेमिलेले असावेत अशा प्रकारची स्पष्ट योजना केलेली आहे. कनिष्ठ वर्गांच्या हिताचें रक्षण होईल अशा रीतीनेंच कमिटीनें आपली योजना तयार केली आहे, असें ना. शास्त्री यांनीं आपल्या भाषणांत म्हटलें आहे, त्याकडे रा. कोठारी व कनिष्ठ वर्गांचे इतर पुरस्कर्ते यांनीं लक्ष द्यावें, अशी त्यांना आमची सूचना आहे. यापेक्षां या आक्षेपाचें जास्त विवेचन करण्याचें कारण नाहीं. रा. कोठारी यांचा शेवटचा प्रश्न असा आहे कीं,ज्याअर्थी सरकार राज्यव्यवस्थेंत किरकोळ सुधारणा सुद्धां करण्यास तयार नाही, त्याअर्थी तें खुद्द राज्यव्यवस्थाच आपल्या हातांत देईल असें मानणें विचारीपणाचें आहे काय ! व ज्याअर्थी सुराज्याला आवश्यक अशा गोष्टीही सरकारपासून मिळण्यास आपण असमर्थ आहोंत, त्याअर्थी आपण स्वराज्य मिळवूं शकूं असें मानणें समंजसपणाचें आहे काय ? ह्या प्रश्नांत अतिशयोक्ति भरली आहे असें कोणासही वाटल्यावांचून राहणार नाहीं, व अशा प्रकारचीं अतिशयोक्तीचीं विधानें रा. कोठारी यांच्यासारख्या होतकरू लेखकानें करावीं ह्याबद्दल आम्हांस फार वाईट वाटतें. नीट विचार न करितां अतिशयोक्तीचीं विधानें करणें हा आपल्यांपैकीं बऱ्याच लेखकांचा दोष आहे. ह्या दोषापासून रा. कोठारी अलिप्त राहण्याचा प्रयत्न करतील अशी आम्हांस फार आशा आहे. ब्रिटिश सरकार राज्यव्यवस्थेंत किरकोळ सुधारणासुद्धां करण्यास तयार नाहीं हें विधान सर्वथैव खोटें आहे. ब्रिटिश सरकारावर सुधारणाविरोधित्वाचा असा आरोप करणें न्याय्य नाहीं. हिंदुस्थानांतील कायदे कौन्सिलांचाच प्रश्न जरी घेतला तरी सरकारनें त्या कौन्सिलांची वेळोवेळीं सुधारणा केली आहे. सन १९०९ सालीं लॉर्ड मोर्ले यांनीं ज्या सुधारणा अमलांत आणल्या त्या किरकोळ सुद्धां नाहींत असें रा. कोठारी यांचें म्हणणें आहे काय ? त्या सुधारणा अपूर्ण असतील, परंतु त्या किरकोळ नाहींत इतकेंच नव्हे तर महत्त्वाच्या आहेत. लोकांना प्रतिनिधी निवडण्याचा हक्क देणें, कायदे कौन्सिलांत ठराव आणण्याचा हक्क देणें, कार्यकारी कौन्सिलांत हिंदी सभासद नेमणें वगैरे सुधारणांना रा. कोठारी जर किरकोळ सुधारणा समजत असतील, तर त्यांच्या राजकीय शहाणपणाबद्दल आम्हांस कौतुक वाटणें शक्य नाहीं; व ह्या

बाबतींत त्यांच्यांत व असल्या प्रकारच्या सर्व सुधारणांना नांवें ठेवणाऱ्या लोकांत काय फरक आहे हें आम्हांस समजत नाहीं. इंग्रज सरकारची सुधारणाबुद्धि फारशी जोमदार आहे असें आम्ही समजत नाहीं, व लोकमताचा आघात झाल्याशिवाय तें महत्त्वाच्या सुधारणा आपण होऊन करण्यास तयार होईल असेंही आम्हांस वाटत नाहीं. परंतु लोकमताचा आघात होत असतांही व लोकांची चळवळ चालली असतांही त्या लोकमताची व चळवळीची बिलकुल पर्वा न करितां सदासर्वदा तें सरकार सुधारणेस विरोधच करीत राहील असें मात्र आम्हांस वाटत नाहीं. लोकांनीं जर जोरानें चळवळ चालविली व लोकमताचा आघात जर एकसारखा सरकारावर चालू ठेविला तर सरकार किर-कोळ सुधारणाच काय परंतु महत्वाच्याही सुधारणा केल्याशिवाय राहणार नाहीं, असा आमचा पक्का भरंवसा आहे. ह्यावरून उघडच आहे कीं, सरकार जरी आपण होऊनच राज्यव्यवस्था आपल्या हातांत देणार नाहीं, तरी राज्य-व्यवस्था आपल्या हातांत मिळविण्याची चळवळ आपण जर जोरानें व नेटानें एकसारखी चालविली तर कधींना कधीं तरी सरकारास आपल्या हातांत राज्यव्यवस्था देणें भाग पडेलच. सरकारनें आपण होऊन सुधारणा करीत असावें ही गोष्ट आम्हांस समत आहे. परंतु त्यांनीं लोकांची मागणी नसतांना-सुद्धां त्यांच्या हातांत खुद्द राज्यव्यवस्था द्यावी अशी अपेक्षा करणें अगदीं वेडेपणाचें आहे. कोणतें सरकार आपण होऊनच लोकांच्या हातांत राज्यव्यवस्था देईल ! आणि सरकार आपण होऊन लोकांच्या हातांत राज्यव्यवस्था देत नाहीं ह्याबद्दल त्याला दोष देण्यांत काय अर्थ आहे ! राज्यव्यवस्था लोकांच्या हातीं जाणें हें सरकाराच्या इच्छेवर किंवा मर्जीवर अवलंबून नसून सर्वतोपरी लोकांच्या प्रयत्नांवर अवलंबून आहे. आणि लोकांनीं जर सतत व योग्य प्रयत्न केले तर कालांतरानें त्यांच्या प्रयत्नांचा सरकारावर इष्ट परिणाम होऊन त्यांच्या हातांत राज्यव्यवस्था आल्याशिवाय राहणार नाहीं.

हिंदी लोकांच्या सामर्थ्याविषयीं रा. कोठारी यांची जी कल्पना आहे ती चुकीची आहे. ज्यांच्या प्रगतीकरितां रा. कोठारी यांच्यासारखे तरुण व उत्साही गृहस्थ प्रयत्न करण्यास उद्युक्त झाले आहेत त्यांच्या सामर्थ्याबद्दल अशा प्रकारची त्यांची कोती कल्पना असावी हें आश्चर्य आहे. सामाजिक सुधारक असो किंवा राजकीय सुधारक असो, त्याचा आपल्या देशाच्या सामर्थ्यावर

भरंवसा पाहिजे, तो जर नसल व आपला देश दुबळा, आपला देश पगु, आपल्यांत सामर्थ्य नाहीं, आपण निःसत्व, वगैरे रडगाणीं जर तो आरंभापासूनच गाऊं लागेल तर त्याच्या हातून कोणतेंही महत्कार्य घडण्याचा संभव नाही. परंतु हा केवळ नैतिक विश्वासाचाच प्रश्न नाहीं. हिंदी लोकांत सामर्थ्य आहे किंवा नाहीं हें अनुभवानेंच सिद्ध झालेलें आहे व होत आहे. सन १९०९ सालीं ज्या सुधारणा अमलांत आल्या त्या सरकारानें सर्वतोपरी आपण होऊनच केल्या असें म्हणणें वाजवी होईल काय? लोकांच्या चळवळीमुळें अंशतः तरी त्या घडून आल्या नाहींत काय? सरकारास वंगभंग सरतेशेवटीं रद्द करावा लागला ह्यांत लोकांच्या चळवळीचें थोडेंबहुत तरी सामर्थ्य दिसून आलें नाहीं काय? शिक्षणाप्रीत्यर्थ सरकारानें जास्त खर्च करण्याचा उपक्रम केला आहे त्याचें कारण लोकांची चळवळ नव्हे काय? स्थानिक स्वराज्यांत ज्या अलीकडे थोड्या बहुत सुधारणा झाल्या आहेत व होण्याचा संभव दिसत आहे त्या लोकमताचा परिणाम नाहींत का? सारांश, हिंदुस्थानांत बिलकुल सामर्थ्य नाहीं व सुराज्याला लागणाऱ्या गोष्टीसुद्धां सरकारापासून त्यास मिळवितां येणार नाहींत हें रा. कोठारी यांचें विधान चुकीचें आहे. आतां हिंदुस्थान स्वराज्य मिळवूं शकेल किंवा नाहीं हेंही हिंदी लोकांच्या चळवळीवरच अवलंबून राहणार आहे. ही चळवळ लवकरच, यशस्वी झाली नाहीं म्हणून निराश होण्याचें किंवा हिंदी लोक कमकुवतच आहेत वगैरे रडगाणें गाण्याचें कारण नाही. स्वराज्याच्या चळवळीसारखी अत्यंत महत्वाची चळवळ लवकर सफल होईल अशी आशा करणें अत्यंत असमंजसपणाचें आहे. असल्या प्रकारची चळवळ कित्येक वर्षें नेटानें व जोरानें चालवावी लागते. त्या चळवळीचा आरंभ करण्यास जें सामर्थ्य लागतें तें हिंदुस्थानांत अद्याप आलें नाहीं असें आम्हांस वाटत नाहीं. ती योग्य काळांत सिद्धीस नेण्याकरितां जें सामर्थ्य लागतें तें कदाचित् आज आपल्यांत आलेलें नसेल, परंतु तें येणार नाहीं इतके आमचे लोक निःसत्व व पंगु आहेत अशी मात्र त्यांच्याबद्दल आमची भावना नाहीं. व ज्यांची असेल त्यांनीं ह्या चळवळींत पडूं नये असें त्यांना आमचें साफ निक्षून सांगणें आहे. स्वराज्याची चळवळ सिद्धीस जाऊन राज्यव्यवस्था आपल्या हातांत येण्यास जें सामर्थ्य लागेल तें आपल्या लोकांत येणें हें सर्वस्वी आपल्या पुढाऱ्यांच्या व रा. कोठारी यांच्यासारख्या उत्साही तरुण देशभक्तांच्या प्रयत्नांवर अवलंबून आहे. व हे प्रयत्न त्यांच्या हातून होणार नाहींत असें आमची मनोदुबळता आम्हांस सांगत नाहीं.

रा. कोठारी यांच्या आक्षेपांचा येणेंप्रमाणें विचार झाला रा. कोठारी यांचे आक्षेप जरी आम्हांस चुकीचे वाटतात तरी त्यांनीं आपले विचार स्पष्टरीतीनें लोकांपुढें मांडल्याबद्दल पुनः एकवार त्यांचें अभिनंदन केल्याशिवाय आम्हांस राहवत नाहीं. त्यांचा जो मुख्य सिद्धांत आहे, त्याबद्दल मात्र आमचा व त्यांचा बिलकूल मतभेद नाहीं. ते आपल्या दुसऱ्या पत्रांत म्हणतात, "हिंदुस्थानच्या राजकीय उन्नतीचा शत्रु जो अधिकारी वर्ग त्याच्याविरुद्ध आपणांस आंग्ल-राज्यकर्त्यांकडे व उदार आंग्लजनतेकडे दाद मागावयाची आहे ही गोष्ट सर्वांस मान्य आहे, आणि असें करतांना आपण जर आपल्या दुर्दैवी देशबांधवांविषयीं पूर्ण सहानुभूति दाखविली तर त्या योगानें या कामीं त्यांचें आपणास अत्यंत साहाय्य होणार आहे. अधिकारी वर्ग हा आपला जबर प्रतिपक्षी असून आपली न्यायाची ओरड त्याच्या तक्रारीपेक्षांही अधिक जोराची होणें इष्ट असल्यास आपल्या अन्यायपीडित बांधवांची सहानु-भूति मिळवून या ओरडींत त्यांनाही सामील करून घेणें हें प्रत्येक समंजस स्वरा-ज्यवाद्याचें कर्तव्य आहे." रा. कोठारी यांचे हे विचार आह्मांस मान्य असून त्यांकडे प्रत्येक स्वराज्यवाद्याचें लक्ष जाईल अशी आह्मांस आशा आहे.

दुसरा आक्षेपक "स्पष्टवक्ता" यांच्या एका आक्षेपाचा वर विचार केलाच आहे. चळवळीनें व विधायक उपायांनीं आपण आपली स्वराज्याची पात्रता निदर्शनास आणून दिली पाहिजे ही "स्पष्टवक्त्याची" सूचना मननीय आहे. परंतु स्वराज्याची पात्रता ह्या शब्द-समूहाचा "स्पष्टवक्त्यानें" जो अर्थ केला आहे तो बरोबर नाहीं. पात्रतेच्या अर्थामध्यें शक्यतेचा समावेश करणें योग्य नाहीं. आज हिंदुस्थानाला स्वराज्य मिळविणें शक्य नाहीं म्हणून तो स्वराज्याला पात्र नाहीं असें अनुमान काढणें चुकीचें आहे. "स्पष्टवक्त्याची" ही विचारसरणी जर बरोबर मानली तर आयर्लंडही स्वराज्याला अद्याप पात्र झालें आहे असें म्हणतां येणार नाहीं. पात्रतेबरोबरच शक्यता असते असें नाहीं, व शक्यतेनेंच पात्रतेचें माप घ्यावयाचें असल्यास कित्येक पात्र व्यक्तींना व देशांना अपात्र ठरवावें लागेल. वास्तविक पाहतां प्रथमतः पात्रता उत्पन्न होते व नंतर ज्या गोष्टीबद्दल पात्रता उत्पन्न झाली असते ती मिळणें शक्य होतें. शक्यतेवरच जर पात्रता अवलंबून राहिली तर नैतिक कर्तव्याची कल्पना बरीच आकुंचित करावी लागेल. हा मुद्दा इतका स्पष्ट आहे कीं, त्याचा अधिक विचार करण्याचें कारण नाहीं.

सरतेशेवटीं मागसलेल्या जातींच्या पुढाऱ्यांना एक विनंति करून हा बराच लांबलेला लेख पुरा करितों. स्वराज्याची मागणी हिंदुस्थानानें जुटीनें करणें अत्यंत अवश्य आहे. युद्ध संपल्यानंतर केवळ स्वराज्याची मागणी करावी किंवा ज्यांचें लवकरच स्वराज्यांत पर्यवसान होईल अशा सुधारणांची मागणी करावी,हा प्रश्न आज राष्ट्रीय सभेपुढें आहे व त्याचा निर्णय यंदाच्या लखनौच्या बैठकींत होईलच. राष्ट्रीय सभेचा ह्या बाबीसंबंधाचा निर्णय जरी सर्वांना पूर्णपणें पसंत पडला नाहीं तरी आपलीं व्यक्तिविषयक मतें सध्या तरी बाजूला ठेवून तो निर्णय मान्य करणें हें आपलें कर्तव्य आहे. राष्ट्रीय सभा जी मागणी करील ती विचार-पूर्वकच केली जाईल व तींत कोणत्याही वर्गाच्या हितसंबंधांकडे दुर्लक्ष केलें जाणार नाहीं अशी आमची पक्की खात्री आहे. जे राष्ट्रीय सभेचे पुढारी मुसल-मानांच्या हितसंबंधाकडे पूर्णपणे लक्ष देण्यास तयार आहेत ते हिंदु समाजांतीलच कनिष्ठ वर्गांच्या हितसंबंधाकडे दुर्लक्ष करतील असें मानण्याचें कांहीं कारण नाहीं. राष्ट्रीय सभेनें नेमलेल्या कमिटीनें तयार केलेल्या सुधारणांच्या मसुद्याचा अद्याप विचार व्हावयाचा असल्यामुळें तो प्रसिद्ध झाला नाहीं, परंतु नामदार शास्त्री यांनीं त्याच्या स्वरूपाचें जें दिग्दर्शन केलें आहे त्यावरून हिंदुसमाजांतील कनिष्ठ जातींच्या हितसंबंधाचें रक्षण होईल अशी त्यांत योजना केली आहे असें स्पष्ट दिसतें. अशी वस्तुस्थिति असल्यामुळें राष्ट्रीय सभेच्या मागणीस कनिष्ट वर्गांचे पुढारी विरोध करणार नाहींत अशी आम्हांस फार आशा आहे. तथापि त्यांना जर कांहीं आक्षेप घ्यावयाचे असतील किंवा कांहीं सूचना करावयाच्या असतील तर त्यांनीं सरकाराकडे एकदम धांव न घेतां त्यांनीं आपलें म्हणणें राष्ट्रीय सभेपुढें मांडावें. कनिष्ठ मानलेल्या जातींनीं आपल्या हितसंबंधाविषयीं उदासीन राहूं नये इतकेंच नव्हे तर त्यांचें योग्य संरक्षण करण्याचा त्यांनीं प्रयत्न करावा, असें त्यांच्याप्रमाणेंच आमचेंही म्हणणें आहे. व गेल्या महिन्यांत सत्यशोधक समाजाची परिषद भरली होती, तेव्हां मराठे जातींच्या हितसंबंधाचें संरक्षण करण्याकरितां कमिटी नेमण्यांत आली आहे ह्या-बद्दल आम्हांस आनंदच वाटतो. परंतु कनिष्ठ मानलेल्या जातींनीं निष्कारण राष्ट्रीय सभेच्या मागणीला विरोध करूं नये अशी त्यांना आमची आग्रहाची विनंति आहे. राष्ट्रीय सभेच्या पुढाऱ्यांनीं राष्ट्रीय सभेचें काम इतक्या शहाणपणानें व दूरदर्शीपणानें चालविलें आहे कीं, त्यांनीं बहुतेक सर्व वर्गांचा विश्वास संपादन

केला आहे. त्यांचा नेमस्तपणा व सावधपणा हा इतका मशहूर आहे कीं, त्यांच्या-कडून कोणत्याही वर्गाच्या हितसंबंधाकडे दुर्लक्ष होणार नाहीं. सबब राष्ट्रीय सभेला सर्व जातींनीं व वर्गांनीं चिकटून राहून एकाद्या विशिष्ट वर्गाला स्वराज्याच्या बाबतींत आपले विचार राष्ट्रीय सभेच्या चालकांस कळविणें असेल तर त्यांचा योग्य विचार झाल्याशिवाय राहणार नाहीं अशी आमची पक्की खात्री आहे. राष्ट्रीय सभेच्या चालकांपुढें आपले विचार न मांडतां राष्ट्रीय सभेच्या मागणीला विरोध करणें व त्यामुळें प्रत्यक्षपणें जरी नाहीं तरी अप्रत्यक्षपणें आपल्या सर्व-सामान्य अँग्लो-इंडियन प्रतिपक्षाच्या कह्यांत जाणें ह्यासारखें देशद्रोहाचें काम आमच्या मागसलेल्या देशबंधूंच्या पुढाऱ्यांकडून होणार नाहीं अशी आम्हांस आशा आहे.

# आम्ही स्वराज्य कां मागतों.

**भारतसेवका**च्या मागील अंकांत हिंदुस्थान स्वराज्यास पात्र आहे किंवा नाहीं, ह्या प्रश्नाचा बराच ऊहापोह झाला आहे. हिंदुस्थान स्वराज्यास पात्र आहे, व हिंदी लोकांना स्वराज्य मिळाल्यावर ते तद्विषयक जबाबदारी उत्तम रीतीनें पार पाडण्यास समर्थ आहेत, असें सिद्ध करण्याचा आम्हीं प्रयत्न केला आहे. ह्या लेखांत आम्ही स्वराज्य कां मागतों, याचा विचार करण्याचा आमचा मानस आहे.

स्वराज्य म्हणजे काय याचा आम्हीं दुसऱ्या अंकांत स्पष्ट बोध केला आहे. परंतु अद्याप स्वराज्याविषयीं जे विचार कित्येकांकडून व्यक्त करण्यांत येतात, त्यावरून त्याची खरी कल्पना पुष्कळांना नाहीं असें म्हणावें लागतें. सध्यांचे अँग्लो-इंडियन अधिकारी जाऊन त्यांचे जागी हिंदी गृहस्थांची नेमणूक झाली म्हणजे हिंदुस्थानला स्वराज्य मिळालें अशी कित्येकांची समजूत असल्याचें दिसतें; परंतु ही समजूत चुकीची आहे. अँग्लो-इंडियन ब्युराक्रसी जाऊन इंडियन ब्युराक्रसी स्थापन झाली-एवढ्यानेंच हिंदुस्थानला स्वराज्य मिळालें असें समजणें म्हणजे स्वराज्याच्या वास्तविक स्वरूपाचें अज्ञान व्यक्त करणें होय. स्वराज्यांत वरील गोष्टीचा अंतर्भाव होतो हें खरें आहे. स्वराज्य झाल्यावर हिंदुस्थानचा राज्यकारभार हिंदी अधिकाऱ्यांच्याच मार्फत चालविला जाईल हें उघड आहे. परंतु अँग्लो--इंडियन अधिकारी वर्गाच्या जागी हिंदी अधिकारिवर्ग आला म्हणजे तेवढ्यानेंच हिंदुस्थानांत स्वराज्य स्थापन झालें, असें म्हणतां येणार नाहीं. हिंदुस्थानचे अधिकारी हिंदुस्थानांतीलच लोक असावेत हें तर आम्ही मागतोंच, परंतु आमची मागणी ह्याच्याहिपेक्षां अधिक आहे. सध्यां जी हिंदुस्थानांत राज्यपद्धति प्रचलित आहे, ती जाऊन तिचे जागीं प्रतिनिधिसत्ताक राज्यपद्धति स्थापन करण्यांत यावी अशी आमची मागणी आहे. हल्लीं जीं हिंदुस्थानांत कायदेकौन्सिलें आहेत त्यांच्याऐवजीं लोकनियुक्त सभासदांचीं मंडळें स्थापन करण्यांत येऊन, त्यांना कायदेकानू वगैरे करण्याचा अधिकार असावा व कार्यकारी मंडळांवर त्यांची हमखास हुकमत चालावी अशा प्रकारचा सध्यांच्या राज्यपद्धतींत फेरफार व्हावा असें आमचें म्हणणें आहे. सारांश,

हिंदुस्थानाला स्वराज्य पाहिजे ह्याचा अर्थ हिंदुस्थानांतील सध्यांचे अँग्लो-इंडियन अधिकारी जाऊन त्यांचे जागीं हिंदी अधिकारी यावेत, एवढाच नसून हिंदुस्थानांत प्रतिनिधिसत्ताक राज्यपद्धति किंवा जबाबदारीची राज्यपद्धति स्थापन झाली पाहिजे हा होय. स्वराज्याचा हा अर्थ स्पष्ट रीतीनें समजणें अवश्यक आहे. हिंदुस्थानांत मुसलमानांची किंवा इंग्रजांची सत्ता स्थापन होण्यापूर्वीं जें स्वराज्य होतें तें ह्या स्वराज्याहून भिन्न आहे हें प्रत्येकानें लक्षांत ठेविलें पाहिजे. मुसलमानांचें किंवा इंग्रजांचें राज्य होण्यापूर्वीं हिंदुस्थानांत स्वराज्य होतें ह्याचा अर्थ इतकाच कीं, हिंदुस्थान स्वतंत्र होतें, हिंदी लोक राष्ट्रीय स्वातंत्र्याचें परम सुख उपभोगीत होते, व त्यांच्यावर इतर कोणत्याही राष्ट्राची सत्ता चालत नव्हती. शिवाजी महाराजांनीं महाराष्ट्रांत स्वराज्य स्थापन केलें असें आपण म्हणतों त्याचा अर्थ हा होय कीं, महाराष्ट्राचें नष्ट झालेलें स्वातंत्र्य शिवाजी महाराजांनीं आपल्या देशबांधवांना पुनः मिळवून दिलें. परंतु आज जें आपण स्वराज्य मागत आहों तें वरील प्रकारचें नसून भिन्न आहे. अशा प्रकारचें स्वराज्य हिंदुस्थानांत पूर्वीं कधींही नव्हतें असें स्थूल मानानें म्हणण्यास हरकत नाहीं. ख्रिस्ती शकापूर्वीं सहाव्यासातव्या शतकांत हिंदुस्थानांत कांहीं भागांत अशा प्रकारचें स्वराज्य असावें असें मानण्यास जागा आहे. ह्या शतकांत उत्तर हिंदुस्थानांत चार मुख्य व बलाढ्य राज्यें आणि कांहीं लहान मोठीं प्रजासत्ताक संस्थानें होतीं, असें हिंदुस्थानच्या प्राचीन इतिहासाबद्दल उपलब्ध असलेल्या माहितीवरून दिसून येतें. * ह्या प्रजासत्ताक संस्थानांबद्दल अद्याप फारशी माहिती मिळालेली नसल्यामुळें त्यांत प्रचलित असलेल्या राज्यपद्धतीचें खरें व पूर्ण स्वरूप समजण्यास आज मार्ग नाहीं. परंतु **सर्व राजकीय सत्तेचा उगम जनतेंत आहे व जनता हीच खरी अधिकाराचें स्थान असून**

---

*" The earliest Buddhist records reveal the survival side by side with more or less powerful monarchies, of republics with either complete or modified independence." Buddhist India by Rhys Davids.

( बुद्धधर्मानुयायांचे जे आदि ग्रंथ उपलब्ध आहेत त्यांवरून असें दिसतें कीं, त्या वेळीं हिंदुस्थानांत कमी अधिक बलाढ्य राज्यें व पूर्ण किंवा अर्धवट स्वातंत्र्य उपभोगणारीं प्रजासत्ताक संस्थानें होतीं. ) रिस डेविड्स यांचें बुद्धिस्ट इंडिया, पान २.

**तिच्या सल्ल्यानेंच राज्यकारभार चालविला पाहिजे, हें जें प्रतिनिधिसत्ताक राज्यपद्धतीचें तत्त्व,** त्याप्रमाणें तेथील सर्व राज्यकारभार चालविला जात असावा, असें मानण्यास जागा आहे. ह्या संस्थानांत ज्याप्रमाणें राजकीय स्वतंत्रता नांदत होती, त्याप्रमाणेंच त्यांचा सर्व राज्यकारभार प्रजेच्या अनुमतीनें चालत असल्यामुळें तेथील प्रजा स्वराज्यही उपभोगीत होती. परंतु ह्या प्रजासत्ताक संस्थानांखेरीज अन्य ठिकाणीं हिंदुस्थानांत स्वराज्य होतें असें दिसत नाहीं. आपण आज जें स्वराज्य मागतों तें स्वराज्य म्हणजे राष्ट्रीय स्वतंत्रता नव्हे. ब्रिटिश राजसत्ता हिंदुस्थानांत अबाधित जरी चालली, तरी हिंदुस्थानचा निदान अंतस्थ कारभार जनतेच्या संमतीनें व जनतेच्या प्रतिनिधींच्या द्वारें चालविला पाहिजे हें आमच्या स्वराज्याच्या मागणीचें सार आहे. लॉर्ड कर्झनसाहेबांच्या अमदानींत हिंदी लोकांच्या राजकीय महत्त्वाकांक्षांवर जो दडपेगिरीचा रूळ फिरविला जात असे त्यामुळें सन १९०६ सालीं हिंदुस्थानांत स्वातंत्र्यवादी पक्ष उत्पन्न झाला होता; परंतु लॉर्ड मिंटोसाहेबांच्या कारकीर्दींत सहानुभूतीचें व उदारपणाचें धोरण स्वीकारण्यांत येऊन त्यांनीं व लॉर्ड मोर्लेसाहेबांनीं सुधारणा अमलांत आणल्यामुळें ह्या राष्ट्रीयस्वातंत्र्यवादी पक्ष बहुतेक नष्ट झाला आहे, आणि ब्रिटिश साम्राज्यछत्राखालीं स्वराज्य मिळविण्याची पुनरपि जागृत झालेली आशा जोंपर्यंत ब्रिटिश सरकारच्या न्यायी, उदार व प्रागतिक धोरणानें जिवंत राहील, तोंपर्यंत तो पक्ष पुनः वर डोकें काढील, असें मानण्यास कारण नाहीं. सारांश, ब्रिटिश राजसत्तेखालीं हिंदुस्थानचा राज्यकारभार हिंदी जनतेच्या अनुमतीनें व प्रातिनिधिक संस्थांच्या द्वारें चालविण्यांत यावा हाच काय तो आमच्या स्वराज्याच्या मागणीचा अर्थ आहे; व हें स्वराज्य आम्ही कां मागतों याचें विवेचन प्रस्तुत लेखांत करण्याचा आमचा उद्देश आहे.

स्वराज्य मागण्याचें पहिलें कारण असें आहे कीं, त्यामुळें हिंदुस्थानांत हल्लीं आहे त्यापेक्षांही अधिक सुराज्य होईल अशी आमची पक्की समजूत आहे. हल्लींचें राज्य वाईट किंवा जुलमी आहे असें कोणीही समंजस मनुष्य म्हणणार नाहीं. तसेंच तें अगदीं निर्दोषी आहे, त्यापासून जसें हिंदी लोकांचें कल्याण झालेलें आहे व होत आहे, तसें त्यांचें बिलकुल अकल्याण झालेलें नाहीं किंवा होत नाहीं, असें इंग्रजी राज्याचे अस्सल अंध चहातेसुद्धां व खुद्द इंग्रजी राज्यकर्तेही म्हणणार नाहींत. इंग्रजी राज्यापासून हिंदुस्थानचें कित्येक बाबतींत पुष्कळ

कल्याण झालें आहे, हें न्यायबुद्धीनें प्रांजलपणें कबूल केलें पाहिजे, व त्याप्रमाणें कोणीही हिंदी गृहस्थ तें नाकबूल करीत नाहीं; परंतु परकीय राज्य कितीही उत्तम असलें तरी त्याच्या परकीय स्वरूपामुळें त्यामध्यें कांहीं महत्त्वाचे दोष राहणें अगदीं अपरिहार्य आहे. इंग्रजांचें राज्य परकीयांचें आहे हें लक्षांत घेतां तें एकंदरीनें उच्चप्रतीचें आहे यांत शंका नाहीं. परंतु परकीय राज्यकर्ते कितीही हुशार व कर्तव्यदक्ष असले तरी त्यांना प्रजेचें हृद्गत कळण्यास कठीण पडतें व त्यामुळें प्रजेच्या इच्छा व आकांक्षा जेणें करून तृप्त होतील, अशा रीतीनें राज्यकारभार चालविण्याचें काम त्यांचे हातून समाधानकारक रीतीनें होत नाहीं. इंग्रज तत्त्ववेत्ता जॉन स्टुअर्ट मिल्ल हा आपल्या 'प्रतिनिधिसत्ताक राज्यपद्धति' ह्या ग्रंथांत म्हणतो "राज्यकर्ते व प्रजाजन यांच्यामध्यें संवयी व विचार ह्यांसंबंधानें अतिशय विषमता नसतांनाही, जर राज्यकर्ते परकीय असतील तर त्यांना राज्यकारभार चालविण्यास वारंवार मोठाल्या अडचणी येतात आणि राज्यकारभारही अगदीं अपूर्णतेनें चालविला जातो. त्यांच्या मनोवृत्ती लोकांच्या मनोवृत्तीप्रमाणें नसतात. एखाद्या गोष्टीचा त्यांच्या मनावर किंवा चित्तवृत्तीवर जो परिणाम होतो त्यावरून त्या गोष्टीचा प्रजेच्या मनावर किंवा चित्तवृत्तीवर काय परिणाम होईल, हें त्यांना ठरवितां येत नाहीं. जी गोष्ट देशांतील एखाद्या सामान्य बुद्धिमत्तेच्या मनुष्यास जणूं काय उपजत बुद्धीनेंच समजते, ती त्यांना अभ्यासानें आणि अनुभवानें सावकाश शिकावी लागते, आणि इतकेंही करून ती त्यांना पूर्ण अवगत होत नाहीं. ज्या रीतीभातीकरितां व सामाजिक बंधनाकरितां त्यांना कायदेकानू करावे लागतात, तीं त्यांना अपरिचित असतात. बहुतेक विस्तृत माहितीकरितां त्यांना लोकांवर अवलंबून रहावें लागतें. आणि कोणावर भरंवसा ठेवावा हें समजण्यास त्यांना कठिण जातें. लोक त्यांना भितात, त्यांचेबद्दल संशय बाळगतात व त्यांचेबद्दल त्यांना बहुधा नावडही वाटत असते. आणि जे लोक त्यांच्याशीं अत्यंत नम्रतेनें वागतात व त्यांचें आर्जव करितात तेच कायते विश्वसनीय आहेत असा त्यांच्या मनाचा कल होतो. ते लोकांचा तिरस्कार करतात, तर उलटपक्षीं परकीय राज्यकर्त्यांनीं कांहीहि केलें तरी तें प्रजेच्या हिताकरितां आहे असा लोकांना विश्वास वाटत नाहीं. परकीय राज्यकर्त्यांची चांगल्या रीतीनें राज्यकारभार करण्याची कितीही प्रामाणिक बुद्धि

असली तरी त्यांच्या मार्गांत असल्या अनेक अडचणी येत असतात."* हे मिल्लचे विचार अगदीं बरोबर आहेत, ह्यांत शंका नाहीं; व म्हणून परकीय राज्यकर्ते कितीही चांगले असले तरी त्यांच्या राज्यकारभारांत कमीअधिक प्रमाणानें दोष हे राहणारच. हिंदुस्थानांतील ब्रिटिश राज्यांत दोष आहेत असें जेव्हां आम्ही म्हणतों, तेव्हां त्या राज्यापासून आम्हांस झालेल्या प्रत्यक्ष किंवा

---

*"It is always under great difficulties and very imperfectly that a country can be governed by foreigners ; even when there is no extreme disparity in habits and ideas, between the rulers and the ruled. Foreigners do not feel with the people. They cannot judge, by the light in which a thing appears to their own minds, or the manner in which it affects their feelings, how it will affect the feelings or appear to the minds of the subject population. What a native of the country, of average practical ability, knows as it were by instinct, they have to learn slowly and after all imperfectly by study and experience. The laws, the customs, the social relations, for which they have to legislate, instead of being familiar to them from childhood are all strange to them. For most of their detailed knowledge they must depend on the information of natives ; and it is difficult for them to know whom to trust. They are feared, suspected, probably disliked by the population ; seldom sought by them except for interested motives ; and they are prone to think that the servilely submissive are the trustworthy. Their danger is of despising the natives, that of the natives is, of disbelieving that any thing the strangers do can be intended for their good. These are a part of the difficulties that any rulers have to struggle with, who honestly attempt to govern well a country in which they are foreigners" —Mill's Representative Government. **तसेंच पुढें मिल्ल म्हणतो** :—"The government of a people by itself has a meaning and a reality, but such a thing as government of the people by another does not and cannot exist." (एखाद्या राष्ट्रानें स्वतः राज्यकारभार करावा यांत अर्थ असून तो कारभार खराखुरा असतो ; परंतु एका राष्ट्रानें दुसऱ्या राष्ट्राचा कारभार करावा हें अशक्य आहे. )

अप्रत्यक्ष फायद्याकडे आम्ही दुर्लक्ष करितों असें नाहीं. व म्हणून हिंदुस्थानापुढें प्रश्न आहे, तो हा कीं, ब्रिटिश राज्यापासून होणारे फायदे न गमावतां त्यांतील दोष नाहींसे होऊन हिंदी लोकांना हल्लींच्यापेक्षांही अधिक सुराज्य उपभोगण्यास कसें मिळेल? ह्या प्रश्नाचा समाधानकारक निकाल लागण्यास एकच उपाय आहे, व तो हिंदुस्थानाला स्वराज्य देणें हा होय. हिंदुस्थानांत स्वराज्य झाल्यानें ब्रिटिश सत्तेपासून व ब्रिटिश लोकांच्या निकट संबंधापासून होणारें कल्याण तर हिंदी लोकांस मिळेलच; परंतु आणखी, सध्यां प्रचलित असलेल्या राज्यपद्धतींतील कांहीं परिहार्य व कांहीं अपरिहार्य दोष नाहींसे होऊन, हिंदुस्थानांत हल्लींपेक्षांही अधिक सुराज्य होईल; आणि स्वराज्य, सुराज्य, आणि ब्रिटिश साम्राज्याशी निकट संबंध ह्या त्रयीपासून होणारे फायदे हिंदी लोकांस उपभोगण्यास मिळतील. ब्रिटिश सत्ता व ब्रिटिशांचा निकट परिचय अबाधित राहिल्यामुळें ब्रिटिश सत्तेच्या व ब्रिटिश लोकांच्या प्रागतिकत्वापासून हिंदुस्थानास मिळणारा लाभ कायम राहून पुनः राजसत्ता परकीय असल्यामुळें जे अपरिहार्य तोटे होत असतात, ते नाहींसे होतील, व अशा रीतीनें स्वराज्यामुळें हिंदुस्थानास अधिक सुराज्य प्राप्त होईल.

हिंदुस्थानांत स्वराज्य ऊर्फ प्रतिनिधिसत्ताक राज्यपद्धति स्थापन झाल्यानें अधिक सुराज्य असें होईल याचें थोडेंसें विवेचन केल्यास अयोग्य होणार नाहीं. कोणत्याही राजकर्त्यांना आपली राज्यव्यवस्था उत्तम प्रकारचीच आहे, तिच्यापेक्षां अधिक चांगली राज्यव्यवस्था होऊं शकेल, असें बहुधा वाटत नाहीं; व म्हणून राज्यव्यवस्थेंत दोष दाखविणारे व तींत सुधारणा घडवून आण्याकरितां झटणारे त्यांना अप्रिय होत असतात. हा इंग्रज राज्यकर्त्यांचाच दोष आहे असें नाहीं, तर तो सामान्यतः सर्व देशांतील व कालांतील राज्यकर्त्यांमध्यें कमीअधिक प्रमाणानें आढळून येतो. हिंदुस्थानांत स्वराज्य झाल्यानें अधिक सुराज्य होईल हें दाखविण्याचा प्रयत्न सध्यांच्या अँग्लोइंडियन अधिकाऱ्यांना पसंत पडणार नाहीं, हें उघड आहे; परंतु कर्तव्य म्हणून तो प्रयत्न केल्यावाचून गत्यंतर नाहीं. हिंदुस्थानांत स्वराज्य झाल्यानें पहिली सुधारणा होईल ती ही कीं, हिंदुस्थानचा राज्यकारभार चालविण्यास आज जो अवाढव्य खर्च करावा लागतो, तो पुष्कळ कमी होईल. सध्यांच्या राज्यपद्धतींत मोठमोठाले पगार देऊन अँग्लो-इंडियन अधिकारी नेमावे लागतात, व त्यामुळें त्यांचा पगार,

त्यांचीं पेन्शनें व त्यांना देण्यांत येत असलेलें एक्स्चेंज कॉंपेनसेशन् ह्या बाबींक-रितांच हिंदुस्थानच्या तिजोरींतून बराच खर्च करावा लागतो. ॲंग्लो-इंडियन अधिकाऱ्यांना जे मोठमोठाले पगार देण्यांत येतात, तितके पगार कोणत्याही इतर देशांतील अधिकाऱ्यांना देण्यांत येत नाहींत, व त्यामुळें सध्यांची हिंदुस्था-नची राज्यव्यवस्था अतिशय खर्चाची होऊन राहिली आहे. ही हिंदुस्थानच्या सध्यांच्या राज्यव्यवस्थेसंबंधाची गोष्ट इतकी स्पष्ट आहे कीं, त्याबद्दल मतभेद होणें अशक्य आहे. स्वराज्य झाल्यानें अर्थातच ॲंग्लो-इंडियन अधिकाऱ्यांच्या जागीं हिंदी अधिकारी नेमण्यांत येतील; व हिंदी अधिकाऱ्यांना ॲंग्लो-इंडियन अधिकाऱ्यांच्या येवढा पगार देण्याचें कारण नसल्यामुळें अधिकाऱ्यांचे पगार व त्यांचें पेन्शन ह्या बाबीबद्दल होणारा खर्च पुष्कळ कमी होईल. एक्स्चेंज कॉंपेन्सेशनबद्दल देण्यांत येणारें वेतन देण्याचें कारणच राहणार नाहीं, व इंग्लं-डांत असलेल्या इंडिया हौसच्यांप्रीत्यर्थही खर्च करावा लागणार नाहीं. सारांश, हिंदुस्थानास स्वराज्य मिळाल्यानें हिंदुस्थानची राज्यव्यवस्था कितीतरी कमी खर्चाची होईल! व त्यामुळें हिंदी प्रजेवर हल्लीं असलेला कराचा बोजा कमी करितां येईल, किंवा निदान शिक्षण, पाटबंधारे, आरोग्य वगैरे प्रजेचें प्रत्यक्ष सुखसंवर्धन करणाऱ्या बाबींकरितां खर्च करण्यास मुबलक पैसा मिळेल.

स्वराज्य झाल्यानें देशी उद्योगधंद्यांची अधिक अभिवृद्धि होईल हेंही उघड आहे. सध्यांच्या स्थितींत आर्थिक बाबतींत इंग्लिश व हिंदी लोक यांचे हितसं-बंध एकच नसल्यामुळें हिंदुस्थानचें आर्थिक धोरण ब्रिटिश धंदेवाले व व्यापारी यांच्या हिताच्या दृष्टीनें ठरवावें लागतें; व त्यामुळें हिंदी उद्योगधंद्यांच्या व व्यापाराच्या अभिवृद्धीस सरकारची जितकी मदत मिळावयास पाहिजे तितकी मिळत नाहीं. याचा परिणाम असा झाला आहे कीं, हिंदुस्थानानें कच्चा माल तयार करावा, तो परदेशांत पाठवावा व आपणास लागणाऱ्या लहानसहान जिनसांकरितांसुद्धां परकीय देशांच्या तोंडाकडे पाहावें, ह्या अत्यंत लाजिरवाण्या व दुःखकारक स्थितींतून अद्याप आमची सुटका होत नाहीं! स्वराज्य झाल्यानें ही स्थिति सर्वतोपरी पालटून अनेक प्रकारचे उद्योगधंदे अस्ति-त्वांत येऊन भरभराट पावतील, व जपानांत ज्याप्रमाणें शेती व उद्योगधंदे यांच्या-मध्यें योग्य प्रमाण राखण्यांत येऊन शेतीवरच बहुतेक भिस्त ठेविल्यानें रयतेला जे सतत कष्ट सोसावे लागतात त्या कष्टांपासून जपानी प्रजा मुक्त आहे, तशी

स्थिति हिंदुस्थानांत होऊन हिंदी लोकांचें वार्षिक उत्पन्न वाढेल व त्यांची एकंदर सांपत्तिक भरभराट होत जाईल, ह्याबद्दल आम्हांस तरी तिळमात्र संशय वाटत नाहीं. अप्रतिबंध व्यापाराचें तत्त्व जरी बहुतेक पाश्चात्य राष्ट्रांनी सोडून दिलें आहे, तरी त्यापासून इंग्लंडचें कल्याण होत असल्यामुळें अद्याप तेथें त्याचें वर्चस्व कायम आहे व त्यामुळें जरी इंग्लंडचा फायदा होत असला तरी हिंदुस्थानचा तोटा होत आहे हें आतां कोणास सांगावयास पाहिजे असें नाहीं. हिंदुस्थानाचे बाबतींत अप्रतिबंध व्यापाराचें धोरण न स्वीकारतां संरक्षणपद्धतीचें धोरण स्वीकारण्यांत यावें, असें हिंदी लोकांचे पुढारी सरकारास वारंवार आग्रहानें सांगत असतां, तें धोरण इंग्लिश लोकांच्या औद्योगिक व व्यापारीय हिताच्या विरुद्ध असल्यामुळें अद्याप स्वीकारण्यांत येत नाहीं. महायुद्धामुळें हिंदुस्थानच्या तिजोरींत तूट पडलेली भरून काढण्याकरितां यंदा हिंदुस्थान सरकारनें संरक्षणपद्धतीचें अंशतः अवलंबन केलें आहे हें खरें; परंतु युद्ध संपल्यानंतर हेंच धोरण कायम ठेवण्यांत येइल, अशी काय खात्री आहे ? देशी कापडावर मँचेस्टरवाल्यांच्या फायद्याकरितां जी जकात बसविली आहे, ती सध्यांच्या अडचणीच्या प्रसंगीं सुद्धां काढून टाकण्यांत आली नाहीं, ह्या एकाच गोष्टीवरून हिंदुस्थान सरकारनें संरक्षणपद्धतीचें केलेलें अवलंबन केवळ तात्पुरतें आहे, अशी कोणास भीति वाटल्यास ती निराधार आहे असें कसें म्हणावें ? सारांश, हिंदुस्थानांत स्वराज्य झाल्यावर हिंदुस्थानच्या आर्थिक धोरणांत बरीच क्रांति होऊन हिंदी उद्योगधंद्याची व व्यापाराची अधिक भरभराट होईल यांत बिलकुल संशय नाहीं.

हिंदुस्थानांत स्वराज्य झाल्यावर सर्व प्रकारच्या उच्च जागा हिंदी लोकांना मिळूं लागतील व त्यामुळें त्यांच्या कर्तृत्वशक्तीचें हल्लीं जें चीज होत नाहीं तें होऊं लागेल. सध्यांची राज्यपद्धति अतिशय खर्चाची आहे एवढ्याच तिच्याविरुद्ध आक्षेप आहे असें नाहीं; तर बहुतेक सर्व अधिकाराच्या, जबाबदारीच्या व महत्त्वाच्या जागा राज्यकर्त्यांच्या जातभाईकरितां राखून ठेवण्यांत येत असल्यामुळें, हिंदी लोकांच्या बुद्धिमत्तेचा व कर्तबगारीचा देशास जितका फायदा मिळावा तितका मिळत नाहीं. कै० ना० गोखले यांनीं म्हटल्याप्रमाणें " सध्यांच्या राज्यपद्धतींत नैतिक दोष आहे. तो हा कीं, हिंदी लोकांची वाढ खुंटत चालली आहे. सर्व जन्मभर आम्हांला कनिष्ठ स्थितींत दिवस कंठावे लागतात, व आमच्यापैकीं कोणी कितीही थोर असो त्याला कनिष्ठावस्थेंतच राहून मान वांकवावी लागते. ईटन किंवा हॅरो येथील विद्यार्थ्यांस आपण ग्ल्याडस्टन, नेल्सन किंवा वेलिंग्टन

होऊं अशी महत्त्वाकांक्षा वाटत असते, व त्याप्रमाणें त्यांचे हातून प्रयत्न होत असतात; परंतु अशी उच्च महत्त्वाकांक्षा आम्हांस वाटण्यास जागा नाहीं. हल्लींच्या राज्यपद्धतीखालीं आमची पूर्ण वाढ कधीही होणें शक्य नाहीं. स्वराज्य उपभोगणाऱ्या राष्ट्राला जी नैतिक उन्नति वाटत असते तिचा अनुभव आम्हांला मिळणें शक्य नाहीं. राज्यकारभार चालविण्यास किंवा समरांगणावर मर्दुमकी करण्यास जें बुद्धिसामर्थ्य लागतें तें आमच्यांत नाहीं असें नाही. परंतु सरकार त्याचा उपयोग करून घेत नसल्यामुळें सरतेशेवटीं तें आस्ते आस्ते नष्ट होऊन आमच्या नशिबीं आमच्याच देशांत लांकूड फोडणें व पाणी भरणें इतकेंच काय तें शिल्लक राहील."*

हल्लींच्या राज्यपद्धतीखालीं ज्याप्रमाणें बहुतेक सर्व उच्चप्रतीच्या जागा ब्रिटिश लोकांना देण्यांत येतात, त्याप्रमाणेंच आमच्यापैकीं कित्येक वर्गांना सैन्यांत घेण्यांत येत नाहीं, व ज्या लोकांना घेण्यांत येतें, त्यांनीं साम्राज्याची कितीही उत्तम सेवा केली व कितीही मर्दुमकी गाजविली, तरी त्यांना कमिशनच्या जागा

---

*"The excessive costliness of the foreign agency is not its only evil. There is a moral evil which, if anything, is even greater. A kind of dwarfing or stunting of the Indian race is going on under the present system. We must live all the days of our life in an atmosphere of inferiority, and the tallest of us must bend, in order that the exigencies of the existing system may be satisfied. The upward impulse which every school boy at Eton or Harrow may feel that he may one day be a Gladstone, a Nelson or a Wellington and which may draw forth the best efforts of which he is capable is denied to us. The full height to which our manhood is capable of rising can never be reached by us under the present system. The moral elevation which every self-governing people feel cannot be felt by us. Our administrative and military talents must gradually disappear owing to sheer disuse till at last our lot as hewers of wood and drawers of water in our own country is stereotyped."
—The late Mr. Gokhale (Evidence before the Welby Commission.)

देण्यांत येत नाहींत. परचक्र आलें असतां आपल्या देशाच्या बचावाकरितां जरूर पडल्यास प्राण देखील अर्पण करण्यास तयार होणें, ह्यासारखें राष्ट्रांतील जिवंत व्यक्तींना अभिमानास्पद असें दुसरें कोणतेंही कृत्य वाटत नाही. परंतु आमची स्थिति अशी झाली आहे कीं, आपल्यापैकीं पुष्कळ वर्गावर " सैनिक होण्यास नालायक " असा हीनपणाचा शिक्का सरकारनें मारला आहे. ज्या लोकांवर हा शिक्का मारला नाहीं, त्यांची तरी स्थिति समाधानकारक आहे काय ? तर तीही नाहीं. त्यांनीं उत्तम सैनिक म्हणून कीर्ति संपादन करावी, वाटेल त्या हवेंत व वाटेल त्या कष्टांनें एकनिष्ठेनें व शौर्यानें साम्राज्याच्या लढाया माराव्या, प्रसंग पडल्यास आपण केवळ पेन्शनवर राहून आपल्या गोऱ्या अधिकाऱ्यांना आपली सर्व शिधासामुग्री अर्पण करावी, परंतु इतकें करून आपण मोठमोठाल्या कमिशनच्या जागा मिळवूं अशी आशा त्यांना वाटणें यास ती मनांतल्या मांड्याप्रमाणेंच निष्फळ आहे. ही स्थिति हिंदी लोकांच्या दृष्टीनें समाधानकारक व ब्रिटिश राज्यकर्त्यांना भूषणावह आहे, असें म्हणता येणें शक्य आहे काय ? अर्थातच स्वराज्य झाल्यावर ही स्थिति पालटून सर्व हिंदी लोकांना सैन्यांत घेतलें जाईल व वरिष्ठ प्रतीच्या जागा मिळणें हें हल्लीप्रमाणें राज्यकर्त्यांच्या जातीवर अवलंबून न राहतां, हिंदी लोकांच्या शौर्यावर व कर्तबगारीवर अवलंबून राहील.

स्वराज्य झाल्यावर हत्याराचा कायदा रद्द करण्यांत येईल हें उघड आहे. तसेंच प्रेसॲक्ट, सभाबंदीचा कायदा वगैरे जे दडपेगिरीचे कायदे हल्ली अस्तित्वांत आहेत तेही रद्द करण्यांत येतील. राज्यकर्ते व प्रजा यांच्या हितसंबंधांत एकवाक्यता नसली व सरकारचा प्रजेवर पूर्ण विश्वास नसला, म्हणजे असले दडपेगिरीचे कायदे करावे लागतात. प्रजेचें हित तेंच सरकारचें हित अशी जेथें स्थिति आहे, व सरकार आणि प्रजा यांच्यामध्यें पूर्ण विश्वास व प्रेम जेथें नांदत आहे, तेथें असल्या दडपेगिरीच्या कायद्यांची काय अवश्यकता आहे ? हिंदुस्थानांत स्वराज्य ऊर्फ प्रतिनिधिसत्ताक राज्यपद्धति स्थापन झाल्यावर राज्यकारभार प्रजेच्या अनुमतीनें व प्रतिनिधींच्या द्वारें चालेल व त्यामुळें वरील दडपेगिरीच्या कायद्यांचें कारणच उरणार नाही. अर्थातच ते रद्द करण्यांत येऊन हिंदी लोकांना मुद्रणस्वातंत्र्य, सभास्वातंत्र्य वगैरे हक्क पूर्णपणें उपभोगण्यास मिळतील.

स्वराज्य झाल्यावर शिक्षणाचा प्रसारही जास्त होईल यांत शंका नाही. आमच्या ब्रिटिश राज्यकर्त्यांनीं शाळा, कॉलेजें व विश्वविद्यालयें स्थापन करून आम्हांस जें शिक्षण दिलें आहे त्याबद्दल आम्ही त्यांचे अत्यंत ऋणी आहों. पाश्चात्य ज्ञानाचा अमूल्य ठेवा हिंदी लोकांना देण्याचा त्यांनीं जो निर्धार केला तो त्यांना अत्यंत भूषणावह असून, त्यामुळें त्यांनी आमच्यावर मोठाच उपकार केला आहे यांत संदेह नाही. परंतु ह्या शिक्षणाच्या बाबतींत इंग्रज राज्यकर्त्यांनीं जितकी उदार बुद्धि आरंभीं दाखविली, तितकी बुद्धि हल्लीच्या त्यांच्या शिक्षणविषयक धोरणांत दिसून येत नाहीं असें मोठ्या कष्टानें म्हणावें लागतें. त्यांनीं जर मनांत आणिलें असतें व आपला हात आखडतां न घेतां पूर्वीप्रमाणेंच शिक्षणाचा प्रसार करण्याचें आपलें व्रत एकनिष्ठेनें चालविलें असतें, तर जपानप्रमाणेंच हिंदुस्थानांत शिक्षणाचा जोरानें प्रसार होऊन इंग्रजी राज्य शंभर दीडशें वर्षें चालू असतांही अद्याप लिहितां वाचतां येणाऱ्यांची संख्या किती तरी अल्प आहे, म्हणून रडगाणें गाण्याची पाळी आम्हांस आली नसती. आज सर्व सुधारलेल्या राष्ट्रांत प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचें आहे. हिंदुस्थान जरी सुधारलेल्या ब्रिटिश साम्राज्याचा भाग किंबहुना मुकुटमणि आहे तरी तेथें मात्र तें मोफत व सक्तीचें नाहीं! इतकेंच नव्हे, तर तें मोफत व सक्तीचें करण्याकरितां के. ना. गोखले यांच्यासारख्या राजकीय सुधारकांनीं लहानसा उपक्रम केला, तर त्यास सरकारकडून विरोध होतो. अशी स्थिति असल्यानें आमची शिक्षणविषयक प्रगति फारच मंद गतीनें होत आहे. हिंदुस्थानांत स्वराज्य होऊन राज्यकारभाराचीं सूत्रें हिंदी लोकांच्या हातांत आल्यावर, प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचें करण्यांत येईल यांत तिळमात्रही संशय नाही.

येणेंप्रमाणें हिंदी लोकांना स्वराज्याचा अमूल्य ठेवा मिळाल्यावर अनेक रीतीनें त्यांची सुधारणा होत जाऊन, हल्ली आहे त्यापेक्षां किती तरी अधिक सुराज्य त्यांना प्राप्त होईल. स्वराज्य झाल्यानें सुराज्य कमी होईल, अशी जर कोणास शंका वाटत असेल, तर ती अगदीं चुकीची आहे; हें वरील विवेचनावरून कोणाच्याही लक्षांत येण्यासारखें आहे. सुराज्याला एकतंत्री सत्ता किंवा निदान शिष्टजनसत्ता लागते, प्रातिनिधिसत्ताक राज्यपद्धति सुराज्याला प्रतिकूल आहे असें एक मत आहे; परंतु तें चुकीचें आहे. सुराज्याला स्वराज्य प्रतिकूल नाहीं. इतकेंच नव्हे, तर **स्वराज्या-**

**शिवाय सुराज्य होणार** नाहीं असें आमचें ठाम मत आहे. स्वराज्य सुराज्याला प्रतिकूल आहे हें मत जे लोक प्रतिपादन करितात, त्यांची सुराज्याची कल्पना अगदीं आकुंचित असते. राज्यांत शांतता राहिली, प्रजेच्या शरीराचें व मालमत्तेचें संरक्षण झालें, आणि प्रजेला न्याय मिळाला म्हणजे सुराज्य झालें अशी त्यांची समजूत असते. सुराज्यांत अर्थातच ह्या गोष्टीचा अंतर्भाव होतो. व ज्या राज्यांत न्याय नाहीं, किंवा प्रजेचें यथायोग्य पालन होत नाहीं, तें राज्य कसलें, असें म्हणण्यास हरकत नाहीं. परंतु शांतता, न्याय व प्रजासंरक्षण एवढींच काय तीं सुराज्याचीं अंगें आहेत असें नाहीं. प्रजेच्या अंगीं जें बौद्धिक व नैतिक सामर्थ्य असेल, त्याचा राज्यकारभारांत पूर्ण उपयोग करून घेणें व त्यायोगानें तिच्या बौद्धिक आणि नैतिक उन्नतीस मदत करणें, हेंही सुराज्याचें एक अत्यंत महत्त्वाचें अंग आहे. राज्यांत शांतता नांदत आहे; प्रजेला न्याय मिळत आहे; खून, दरोडे वगैरे गुन्हे होत नाहीत; हें सर्व कांही आहे, परंतु राज्यपद्धतीचा लोकांच्या बौद्धिक व नैतिक गुणांवर सुपरिणाम होत नसल्यामुळें ते आपल्या पोटापलीकडे पाहात नाहींत, इतर व्यक्तीबद्दल त्यांना फारशी सहानुभूति वाटत नाहीं, शिक्षणाचा त्यांच्यामध्यें प्रसार होत नाहीं व त्याबद्दल त्यांना महत्त्वही वाटत नाहीं, उद्योगधंद्यांची अभिवृद्धि होत नाहीं, लोकांत देशाभिमान नाहीं व त्यांना कोणतीही पवित्र व उच्च महत्त्वाकांक्षा वाटत नाहीं, अशा स्थितींत सुराज्य आहे असें म्हणतां येईल काय ? राज्यपद्धति चांगली किंवा वाईट आहे, हें ठरवितांना शांतता राखणें, न्याय देणें वगैरे जी सरकारचीं मूलभूत कर्तव्यें असतात, त्यांच्याकडेच फक्त दृष्टि देऊन चालावयाचें नाहीं. त्या राज्यपद्धतीचा लोकांच्या संस्कृतीवर, त्यांच्या बौद्धिक, नैतिक, राजकीय वगैरे उन्नतीवर काय परिणाम होत आहे, हेंही पाहिलें पाहिजे. व अशा रीतीनें विचार केल्यास **स्वराज्य सुराज्याला प्रतिकूल नाहीं इतकेंच नव्हे तर तें अवश्य आहे** असें दिसून आल्याशिवाय राहणार नाहीं. स्वराज्य सुराज्याला प्रतिकूल आहे हा जर सिद्धांत खरा मानिला, तर इंग्लंड, फ्रान्स, इटाली, स्वित्झर्लंड, जपान, अमेरिका, कानडा, दक्षिण आफ्रिका, ऑस्ट्रेलिया वगैरे ज्या ज्या देशांत स्वराज्य आहे त्या त्या देशांत 'सुराज्या'च्या ऐवजीं 'कुराज्य' आढळून आलें पाहिजे. परंतु वरील देशांत 'कुराज्य' आपणास आढळून

येतें काय! त्या देशांत सुराज्य नाहीं असें कोणी म्हणेल काय! तेव्हां स्वराज्य हें सुराज्याला प्रतिकूल आहे हें मत अगदीं चुकीचें आहे यांत शंका नाहीं. असो; आम्हीं स्वराज्य मागतों याचें पहिलें कारण त्यामुळें अधिक सुराज्य होईल हें होय. त्याशिवाय स्वराज्य मागण्याचीं दुसरीं कारणें आहेत, त्यांचें विवेचन स्थलसंकोचास्तव पुढील अंकापर्यंत तहकूब ठेवणें भाग आहे.

---

# आम्ही स्वराज्य कां मागतों ?

मागील अंकांत आम्ही स्वराज्य कां मागतों याचें एक कारण सांगितलें. हिंदुस्थानाला स्वराज्य मिळाल्यानें हल्लीपेक्षांही अधिक सुराज्य होईल हें सिद्ध करण्याचा प्रयत्न करून स्वराज्य सुराज्याला प्रतिकूल नाहीं, इतकेंच नव्हे तर स्वराज्य सुराज्याला अवश्य आहे हें मत आम्हीं स्थापित केलें आहे. स्वराज्याशिवाय सुराज्य होणार नाहीं हा आमचा सिद्धांत आमचे मित्र सुबोधपत्रिकाकार यांना पसंत पडला नाहीं असें दिसतें. कारण त्यांनीं अशी टीका केली आहे कीं, "आमच्या संस्थानांमध्यें स्वराज्यच आहेना ! मग तेथें सर्वत्र सुराज्य आहे काय !" स्वराज्य म्हणजे काय, याचें आम्ही स्पष्ट विवेचन केलें असतां देशी संस्थानांमध्यें स्वराज्य आहे हें चुकीचें विधान सुबोधपत्रिकाकार यांनीं करावें याचें आम्हांस फार आश्चर्य वाटतें. स्वराज्य म्हणजे प्रतिनिधिसत्ताक किंवा जबाबदारीची राज्यपद्धति हें आम्हीं आमच्या लेखांत स्पष्ट सांगितलें आहे. अशा प्रकारचें स्वराज्य देशी संस्थानांत* आहे असें म्हणणें

*म्हैसूर, त्रावणकोर वगैरे कांहीं थोड्या संस्थानांनीं प्रातिनिधिक तत्त्वाला मान्यता दाखवून सल्लागार मंडळें स्थापन केलीं आहेत, ही गोष्ट आनंदाची आहे; परंतु तितक्यावरून त्या संस्थानांत स्वराज्य ऊर्फ प्रतिनिधिसत्ताक राज्यपद्धति आहे असें म्हणतां येत नाहीं. इंदूर संस्थाननें कायदे कौन्सिलासारखी संस्था निर्माण करून प्रातिनिधिक तत्वाला मान देण्याचें स्तुत्य उदाहरण घालून द्यावें, अशी इंदूर येथें प्रसिद्ध होणाऱ्या 'मल्हारी मार्तंड विजया' नें ता. २८ सप्टेंबरच्या अंकांत सूचना केली आहे, तिचा इंदूर संस्थानचे अधिपति श्री० तुकोजीराव महाराज विचार करतील अशी आम्हांस आशा आहे. हिंदुस्थानांतील प्रत्येक प्रमुख देशी संस्थानांत पार्लमेंट स्थापन होऊन तेथील राज्यकारभार प्रजेच्या प्रतिनिधींच्या द्वारें चालविण्यांत येईल, तर फार उत्तम होईल असें आमचें मत आहे. एखाद्या मोठ्या संस्थानांत प्रतिनिधिसत्ताक राज्यपद्धति जर स्थापन झाली व तेथील राज्यकारभार प्रजेच्या प्रतिनिधीच्या द्वारें चालविण्यांत आला तर त्यायोगानें केवळ संस्थानांच्याच नव्हे तर सर्व हिंदुस्थानच्या प्रगतीला मदत होईल. म्हैसूरचे किंवा इंदुरचे महाराज आपल्या संस्थानांत अशी राज्यपद्धति स्थापन करण्याचा उपक्रम करतील तर त्यांचे हिंदी लोकांवर अलोट उपकार होतील. हा प्रश्न व्यवहारदृष्ट्या दिसतो तितका सोपा नाहीं, हें आम्ही कबूल करतों. तथापि तो हातांत घेऊन त्याचा समाधानकारक रीतीनें विचार करणें प्रत्येक सुशिक्षित व प्रागतिक संस्थानिकाचें कर्तव्य आहे, असें आमच्यानें म्हटल्यावांचून रहावत नाहीं.

अगदीं चुकीचें आहे. सबब कांहीं देशी संस्थानांत सुराज्य नाहीं, सबब स्वराज्यामुळें सुराज्याचें पोषण होतेंच असें नाहीं. ह्या सुबोधपत्रिकाकारांच्या टीकेंत अर्थ नाहीं. तसेंच सुराज्यांत ज्या गोष्टींचा आम्ही अंतर्भाव केला आहे त्यांचाही सुबोधपत्रिकाकारांनीं विचार केला आहे असें दिसत नाहीं. असो.

स्वराज्याशिवाय सुराज्य होणार नाहीं हा सिद्धांत अत्यंत महत्त्वाचा असल्यामुळें त्याचें अधिक विवेचन करणें आम्हांस अवश्य वाटतें. ह्या सिद्धांताचा खरेपणा व त्याचें महत्त्व चांगलें लक्षांत येण्याकरितां समाजांत राजकीय सत्ता स्थापन करण्याचे हेतू काय आहेत, याचा विचार केला पाहिजे. समाज अस्तित्वांत आल्यावर कालांतरानें राजकीय सत्ता उद्भूत होते. समाजांत राजकीय सत्ता स्थापन झाल्यावर त्यास राजकीय समाजाचें (Political Society) किंवा राष्ट्राचें (State) स्वरूप* प्राप्त होतें. राजकीय सत्तेच्या दृष्टीनें त्या समाजास राष्ट्र (State) म्हणतात. सबब समाज अस्तित्वांत येऊन त्यांत राजकीय सत्ता स्थापित झाली म्हणजे समाज, समाजांतील व्यक्ती आणि राष्ट्र असे तीन भिन्नभाव उत्पन्न होतात. आणि राष्ट्राचे हेतू सिद्धीस नेण्याकरितां ज्या व्यक्तीच्या किंवा समुदायाच्या हातांत राजकीय सत्ता दिली जाते, त्यास सरकार असें म्हणतात. ह्यावरून उघडच आहे कीं, सरकार हें राष्ट्राचे हेतू सिद्धीस नेण्याचें केवळ साधन आहे; आणि राज्यपद्धति चांगली किंवा वाईट आहे हें ठरवितांना त्या पद्धतीमुळें राष्ट्राचे हेतू कितपत सिद्धीस जात आहेत हें पाहिलें पाहिजे. ज्या राज्यपद्धतीमुळें राष्ट्राचें हेतू उत्तम रीतीनें तडीस जातील ती राज्यपद्धति उत्तम, हें अनुमान ह्यावरून स्पष्टच आहे.

---

*इंग्रजींतील पारिभाषिक शब्द Society (समाज) आणि State (राष्ट्र) हे होत. State (स्टेट) याचें भाषांतर कांहीं मराठी कोशांत 'राष्ट्र' असें केलेलें आहे. शुक्रनीतींत स्वामी, अमात्य, सुहृद्, कोश, राष्ट्र, दुर्ग आणि बल अशीं राज्याचीं सात अंगें आहेत असें सांगितलें आहे. बंगालचे प्रोफेसर विनयकुमार सरकार, यांनीं शुक्रनीतीचें जें इंग्रजी भाषांतर केलें आहे त्यांत 'राष्ट्र' ह्या शब्दाबद्दल State हा शब्द वापरलेला आहे. नेटिव स्टेट्स याचें मराठींत भाषांतर 'देशी राष्ट्रें' असें न करितां 'देशी संस्थानें' असें करण्याचा प्रघात पडला आहे. पाश्चात्य तत्ववेत्यांचे जे राजकीय विचार आपल्यांत अलीकडे रूढ होऊं लागले आहेत त्याबद्दलची परिभाषा निश्चित होईल तर बरें होईल.

राष्ट्राचे हेतू कोणते ह्याबद्दल युरोपांतील राजकीय तत्त्ववेत्त्यांनी जी भिन्न भिन्न मतें व्यक्त केली आहेत त्यांचें स्थूलमानानें वर्गीकरण केलें असतां आपणास असें दिसून येईल की,ती मतें दोन प्रकारची आहेत. एक मत असें आहे कीं, समाजांतील व्यक्तींचें जीवित व त्यांची मालमत्ता यांचें सरकारनें संरक्षण केलें म्हणजे सरकारांची इतिकर्तव्यता झाली. प्रजेच्या जीविताचें व मिळकतीचें संरक्षण करण्यापेक्षां सरकारचें अधिक कर्तव्य नाहीं व जी राज्यपद्धति हें कर्तव्य उत्तम रीतीनें बजावण्यास साहाय्यभूत होते ती सर्वोत्कृष्ट होय. प्रजेच्या जीविताचें व मिळकतीचें संरक्षण करणें ह्याखेरिज जे अन्य व उच्च हेतू आहेत, त्यांचें पोषण करणें हें सरकारचें कर्तव्य नसून तें समाजानें सरकारच्या तोंडाकडे न पाहतां किंवा सरकारवर अवलंबून न राहतां स्वतंत्र रीतीनें केलें पाहिजे, असें वरील मत प्रतिपादन करणाऱ्यांचें म्हणणें आहे. राजकीय तत्त्ववेत्त्यांचा दुसरा जो वर्ग आहे त्याचें असें म्हणणें आहे की, ज्याअर्थी समाजाचे हेतू उत्तम रीतीनें सिद्धीस नेण्याकरितां म्हणून राजकीय सत्तेचा उदय झाला आहे त्याअर्थी ते राजकीय सत्तेच्या द्वारें कितपत सिद्धीस जात आहेत यावरूनच राज्यपद्धति चांगली किंवा वाईट आहे हें ठरविलें पाहिजे. असे हे दोन राजकीय तत्त्ववेत्त्यांचे वर्ग आहेत. पहिल्या मताचे अनुयायी हल्लीं फारसे राहिले नसून दुसऱ्याच मताचें युरोपखंडांत व अमेरिकेंत हल्लीं प्राबल्य आहे.

प्राचीन ग्रीस देशांत राजकीय प्रश्नांचा पुष्कळ ऊहापोह झाला होता, आणि राजकीय विचारांत प्राचीन ग्रीक तत्त्ववेत्त्यांनी व विशेषतः प्लेटो आणि ॲरिस्टॉटल यांनी जी भर घातली आहे ती अत्यंत महत्त्वाची आहे. ह्या दोन्ही तत्त्ववेत्त्यांच्या मतें, समाजांतलि व्यक्तींची उन्नति करणें हें राष्ट्राचें व राष्ट्रांतील राजकीय सत्तेचें आधिष्ठान जें सरकार त्याचें कर्तव्य आहे.

अरिस्टॉटलचें ह्यासंबंधाचें वचन युरोपांतलि सुशिक्षित लोकांत इतकें प्रचलित आहे कीं, त्यास लोकोक्तीचें ( Proverb ) महत्त्व प्राप्त झालें आहे. तो म्हणतो कीं, मनुष्याच्या ज्या मूलभूत गरजा आहेत त्यामुळें राष्ट्र अस्तित्वांत येतें हें खरें; परंतु त्यांचा अंतिम हेतू ह्या गरजा पुऱ्या करणें एवढाच नसून समाजांतील व्यक्तींचें चारित्र्य चांगलें व्हावें म्हणून योग्य त्या गोष्टी करणें हें राष्ट्राचें व अर्थातच त्यांतलि सरकारचें कर्तव्य होय. ( The State comes into existence originating in the bare needs of life and con-

tinuing in existence for the sake of good life. ) प्राचीन रोमन लोकांत फारसे राजकीय तत्त्ववेत्ते होऊन गेले नाहीत; परंतु प्लेटो, अरिस्टॉटल वगैरे ग्रीक राजकीय तत्त्ववेत्त्यांचेच विचार त्यांना संमत होते, आणि सिसरोसारख्यांनीं त्यांचाच अनुवाद करून समाजांतील व्यक्तीच्या सद्गुणांचें पोषण करणें हेंच सरकारचें कर्तव्य आहे असें प्रतिपादलें आहे. सारांश, राष्ट्रांतील व्यक्तींच्या शीलाचें पोषण करणें हें सरकारचें कर्तव्य आहे हें मत प्राचीन ग्रीक व रोमन लोकांत प्रचलित होतें असें म्हणण्यास हरकत नाही.

मध्ययुगांत युरोपखंडांत हेंच मत प्रचलित होतें. राजा हा ईश्वराचा प्रतिनिधि आहे व त्यांनी प्रजेची नीतिमत्ता व धार्मिकता वाढवून आपल्या राज्यांत " देवाचें राज्य " किंवा रामराज्य स्थापन करण्याचा प्रयत्न करावा हें मत त्या वेळी सर्वत्र रूढ झालेलें होतें. राजा हा ईश्वराचा अंश आहे, हें मत पौर्वात्य लोकांचेंच आहे, पाश्चात्य लोकांना त्याचा गंधही नव्हता असें भासविण्याचा कांहीं पाश्चात्य लेखक अलीकडे प्रयत्न करीत असतात, परंतु ही अगदीं चूक आहे. राजकीय सत्तेचें खरें अधिष्ठान जनता आहे, व म्हणून राजसत्तेस कायद्यांनी व प्रातिनिधिक संस्थांनीं आळा घातला पाहिजे, ह्या मताचा प्रादुर्भाव होऊन तें अमलांत येण्यापूर्वी, राजा हा परमेश्वराचा प्रतिनिधि आहे व तो चांगला असो किंवा वाईट असो त्याच्या आज्ञेचें उल्लंघन करतां कामा नये, हें तत्त्व पाश्चात्य लोकांतही बरेंच रूढ झालें होतें. मध्ययुगांत तर ह्याच तत्त्वाचें युरोपांत प्राबल्य होतें. राजसंस्थेविषयी लोकांच्या अशा दैवी कल्पना असल्यामुळें अर्थातच सरकारनें किंवा राजानें धर्म व नीति ह्यांचें पोषण केलें पाहिजे ही कल्पनाही त्या वेळीं सर्वांना संमत होती. इटालियन कवि व इटालियन राष्ट्रीयत्वाच्या भावनेचा आद्य पुरस्कर्ता डेंटे हा एके ठिकाणीं असें म्हणतो कीं, सरकार प्रजेचें कल्याण कितपत करीत आहे ह्यावरून तें चांगलें किंवा वाईट हें ठरविलें पाहिजे. ( The merits of Government may be tested by its promotion of the general welfare of all its subjects. )

मार्सिलियस ह्या नांवाचा दुसरा तत्त्ववेत्ता इटालीमध्यें मध्ययुगांत होऊन गेला. तो म्हणतो की, मनुष्याचें जीवित उच्चतम करण्यास मदत करणें हा राष्ट्राचा हेतु आहे. ( The state exists to render the bigher life possible. ) टॉमस ॲक्विनास ह्या तत्त्ववेत्त्याचें असें मत आहे कीं, सद्गुणांचें पोषण करणें हा

सरकारचा हेतु आहे. इंग्लंडांत १८ व्या शतकांत लॉक नांवाचा तत्त्ववेत्ता होऊन गेला. तो म्हणतो कीं, मनुष्यजातीचें कल्याण ( good of mankind ) हें सरकारचें ध्येय आहे. लॉकच्या ह्या मताबद्दल प्रो० हक्सले साहेबांनीं असें म्हटलें आहे कीं, सरकारचें उद्दिष्ट यापेक्षां अधिक उदात्त रीतीनें व थोडक्या शब्दांत व्यक्त करणें अशक्य आहे. ( Noblest and at the same time briefest statement of the purpose of government. ) इंग्रजी तत्त्ववेत्ता बर्क याचें नांव कोणास ठाऊक नाहीं असें नाहीं. त्यानें आपल्या ग्रंथांत जे राजकीय विचार प्रगट केले आहेत त्यांची उदात्तपणाबद्दल व प्रगल्भतेबद्दल अतिशय ख्याति आहे; आणि इंग्रज मुत्सद्दी, तत्त्ववेत्ते व ग्रंथकार त्या विचारांना फार महत्त्व देत असतात. सबब राष्ट्राच्या हेतूबद्दल बर्कच्या विचाराला विशेष महत्त्व दिल्यास वावगें होणार नाहीं. तो म्हणतो, " राष्ट्र म्हणजे सर्व विद्या, सर्व कला, प्रत्येक सद्गुण व सर्व प्रकारची पूर्णता यांची अभिवृद्धि करण्याकरितां समाजांतील व्यक्तींनीं केलेली भाती होय. " ( A partnership in all science, a partnership in all art, a partnership in every virtue, and in all perfection. ) हेगेल नांवाचा तत्त्ववेत्ता असें म्हणतो का, नीति आणि नैतिक कायद्यांची योजना करणें व त्यांचा कृतींत अनुभव घेणें हें राष्ट्राचें उद्दिष्ट आहे. ( Morality and the application and realisation of the moral law is the end of the State. )

मॅकूकेन्नी नांवाचा ग्रंथकार असें म्हणतो कीं, सामाजिक, राजकीय आणि वैयक्तिक जीविताचें जें उच्चतम, अत्यंत उदात्त व पूर्ण स्वरूप, त्याचा नागरिकांमध्यें विकास करणें हा राष्ट्राचा हेतु आहे. ( The object of the State should include the perfect development of all its citizens in the highest, noblest and fullest form of social, political and individual life ) अमेरिकेचे हल्लींचे प्रेसिडेन्ट वुइलसन साहेब आपल्या 'दी स्टेट' ( The State ) ह्या नांवाच्या ग्रंथांत असें म्हणतात कीं, समाजाचे हेतू सुकर करणें व सिद्धीस नेणें हा सरकारचा हेतु आहे. ( The end of government is the facilitation and accomplishment of the objects of the organised Society. )

ब्लंटश्ली नांवाचा जर्मन ग्रंथकार असें म्हणतो की, राष्ट्राच्या ज्या शक्ती आहेत त्यांचा विकास करणें, आणि राष्ट्रीय जीविताची पूर्णता करणें हें सरकारचें उद्दिष्ट आहे; मात्र हें जें नैतिक व राजकीय अभिवृद्धीचें कार्य, तें मानवजातीच्या भवितव्यतेविरुद्ध असतां कामा नये. (The end of government is the development of the national capacities, the perfecting of the national life and finally its completion, provided of course that the process of moral and political development shall not be opposed to the destiny of humanity.)

जेन्क्स नांवाच्या ग्रंथकाराच्या मतें जगाच्या प्रगतीची अभिवृद्धि करण्याचा प्रयत्न करणें हें सरकारचें कर्तव्य आहे. (The state should endeavour to further the world's progress.)

इटालियन देशभक्त मॅझिनी हा म्हणतो कीं, प्रजेंत कर्तव्यजागृति करणें आणि प्रजेची कर्तव्यबुद्धि जागृत करून राष्ट्राचें जें सर्वसाधारण ध्येय असेल तें सिद्धीस नेण्याचा प्रयत्न करणे हें सरकारचें कर्तव्य आहे. इंग्रज तत्त्ववेत्ता मिल्ल असें म्हणतो की, समाजाची प्रगति करणें हा सरकारचा मुख्य हेतु आहे.

वर जे राष्ट्राच्या हेतूबद्दल निरनिराळ्या तत्त्ववेत्त्यांचे व ग्रंथकारांचे विचार दिले आहेत, त्यांवरून उघड दिसून येईल की, राज्यांत नुसती शांतता राखणें किंवा प्रजेच्या जीविताचें व मालमत्तेचें संरक्षण करणें एवढेंच काय तें सरकारचें कर्तव्य नाही. समाजांतील व्यक्तींच्या नीतिमत्तेचें पोषण करून त्यांना सदाचार-संपन्न करणे, राष्ट्राच्या ज्या राजकीय, सामाजिक, वैयक्तिक शक्ती असतील त्यांचा विकास करणें, राष्ट्राचें सामर्थ्य वाढविणें, व मनुष्यजातीच्या प्रगतींत भर घालण्यास राष्ट्रास साहाय्य करणें, हीहि सरकारची कर्तव्यें आहेत. ह्यावरून उघडच आहे कीं, शांतता राखणें, प्रजेच्या जीविताचें व मालमत्तेचें रक्षण करणें, इतक्याच गोष्टींचा सुराज्यांत अंतर्भाव होत नसून राष्ट्राचें सामर्थ्य वाढविणें, समाजांतील व्यक्तींना नीतिमान् करणें, समाजाच्या राजकीय, सामाजिक, नैतिक इत्यादि जीवितांगांचें पोषण करणें आणि मनुष्यजातीच्या प्रगतीला मदत करणें ह्याही गोष्टींचा सुराज्यांत अंतर्भाव होतो. आणि म्हणून कोणती राज्यपद्धति सर्वोत्कृष्ट आहे हें ठरवितांना

वरील हेतू भिन्न भिन्न राज्यपद्धतीमुळें कशा रीतीनें व किती प्रमाणानें सिद्धीस जाण्यासारखे आहेत हें पाहिलें पाहिजे. आणि अशा रीतीनें विचार केल्यास स्वराज्य ऊर्फ प्रतिनिधिसत्ताक राज्यपद्धति सुराज्याला अवश्य आहे असें विचाराअंतीं दिसून आल्याशिवाय राहणार नाहीं.

सरकारचे हेतु कोणते, हें आम्हीं वर निरनिराळ्या तत्त्ववेत्त्यांची व लेखकांचीं मतें देऊन विस्तारशः सांगितलें आहे. हे हेतु उत्तम रीतीनें सिद्धीस नेण्याकरितां स्वराज्य ऊर्फ प्रतिनिधिसत्ताक राज्यपद्धति अवश्य आहे, याचा आतां थोडासा अधिक विचार करूं. प्रजेच्या नीतीचें पोषण करणें हें एक सरकारचें कर्तव्य आहे, असें वर सांगितलेंच आहे. आतां नीति हा शब्द व्यापक असून त्यांत केवळ वैयक्तिक किंवा कौटुंबिक गुणांचा अंतर्भाव होत नसून, सामाजिक व राजकीय गुणांचाही अंतर्भाव होतो. केवळ वैयक्तिक किंवा कौटुंबिक गुण घेतल्यास त्यांचें पोषण करण्याकरितां स्वराज्याची आवश्यकता नसेल; परंतु समाजांतील भिन्नभिन्न व्यक्तींमधील किंवा वर्गांमधील सहकारिता, देशाभिमान, स्वार्थत्याग, परहिततत्परता वगैरे सामाजिक व राजकीय सद्गुणांचा पूर्ण विकास स्वराज्याशिवाय होणार नाहीं. स्वराज्य असलें म्हणजे राष्ट्रांतील भिन्नभिन्न लोकांना व वर्गांना आपण एकाच राष्ट्रकुटुंबाचीं लेंकरें आहोंत असें वाटून त्यांमध्यें सामाजिक व राजकीय सद्गुणांचा विकास होत असतो. शिवाय राष्ट्राच्या ज्या अनेक महत्त्वाच्या बाबी असतात त्यांत त्यांना कमीअधिक प्रमाणानें लक्ष द्यावें लागत असल्यामुळें त्यांच्या मनाला व बुद्धीला व्यापकपणा येतो. आणखी असें आहे कीं, मनुष्याच्या नीतिमत्तेचें पोषण त्याच्या स्वतःच्या प्रयत्नानें झालें तरच तें खरें पोषण होय. जी नीतिमत्ता बाह्य सत्तेनें लादलेली असते ती पोचट असून केव्हां नष्ट होईल याचा नेम नाहीं. नीतिमत्तेंत सामाजिक व राजकीय गुणांचा अंतर्भाव होतो, आणि नीतिमत्तेचें पोषण मनुष्याच्या अंतःप्रवृत्तीनें झालें तरच तें टिकाऊ असतें. हें जर खरें असेल तर ह्यावरून अनुमान उघडच आहे कीं, बुद्धिमत्तेला वाव देणाऱ्या व मानसिक आणि नैतिक गुणांचा विकास करणाऱ्या राष्ट्रीय बाबींबद्दल त्यांच्यांत कळकळ उत्पन्न करणें हें अगदीं अवश्य आहे; व ही कळकळ स्वराज्याशिवाय योग्य प्रमाणानें उत्पन्न होणें अशक्य आहे. तसेंच राष्ट्राचें सामर्थ्य वाढविणें, मनुष्यजातीच्या प्रगतींत भर घालणें हे जे आणखी सरकारचे हेतू तेही स्वराज्याशिवाय पूर्णपणें सिद्धीस जाणार नाहींत. पाश्चात्य राष्ट्रांचें सामर्थ्य अधिक कां व त्या सामर्थ्या-

पुढें हिंदुस्थान वगैरे पौर्वात्य राष्ट्रांचा टिकाव कां लागला नाहीं, याचा सूक्ष्म रीतीनें विचार केल्यास आपणास असें आढळून येईल कीं, पाश्चात्य राष्ट्रांत प्रतिनिधिसत्ताक राज्यपद्धति असल्यामुळें तेथील लोकांत राष्ट्रिय गुणांचा जास्त विकास होऊन त्यांचें राष्ट्रीय सामर्थ्य वाढलेलें आहे. खुद्द पाश्चात्य राष्ट्रांतहि असें आढळून येतें की, इटली, आस्ट्रिया, रशिया वगैरे ज्या राष्ट्रांत स्वराज्याचा व्हावा तसा विकास झालेला नाहीं, तेथील लोकांची राष्ट्रीय नीतिमत्ता, व राष्ट्रिय सामर्थ्य हीं इंग्लंड, फ्रान्स वगैरे ज्या देशांत स्वराज्याचा योग्य विकास झालेला आहे तेथील लोकांपेक्षां कमी आहे. स्वराज्याच्या बाबतीत अगदीं पुढें गेलेले जे अमेरिकन लोक त्यांची राष्ट्रीय नीतिमत्ता सर्वोत्कृष्ट आहे, असें डी. टॉकेव्हिल, ब्राइस वगैरे ग्रंथकारांचें मत आहे, व फिलिपाईन बेटाबद्दल अमेरिकन लोकांनीं स्वीकारलेलें धोरण पाहिलें असतां, वरील मत बरोबर आहे, असें दिसतें. इंग्रज तत्त्ववेत्ता जॉन स्टुअर्ट मिल्ल याचें या विषयींचें मत मनन करण्यासारखें आहे. तो म्हणतो, " स्वराज्य हें इतर कोणत्याही राज्यपद्धतीपेक्षां वर्तमान सुराज्याला अधिक अनुकूल आहे आणि त्यामुळ राष्ट्रीय चारित्र्य अधिक उच्च दर्जाचें झाल्याशिवाय रहात नाहीं."

( It-popular government-is both more favourable to present good government, and promotes a better and higher form of national character, than any other polity whatever. )

'वर्तमान सुराज्य' ( present good government ) हे मिल्लचे शब्द लक्ष्यांत घेण्यासारखे आहेत.

येथपर्यंत स्वराज्य सुराज्याला पोषक आहे व म्हणून तें आम्ही मागतों, याचें विवेचन झालें. आतां स्वराज्य मागण्याचीं दुसरीं कारणें कोणतीं आहेत, याचा विचार करूं.

स्वराज्य मागण्याचें दुसरें कारण असें आहे कीं, हिंदुस्थानाला स्वराज्याला पात्र करणें व तो पात्र झाल्यावर त्यास स्वराज्य देणें हें ब्रिटिश राज्याचें उद्दिष्ट आहे असें अनेक वेळां ब्रिटिश मुत्सद्यांनीं बोलून दाखविलें आहे. हिंदुस्थानांत ब्रिटिश सत्ता स्थापन झाल्यावर एल्फिन्स्टन, मन्रो, मेकॉले यांच्यासारखे जे थोर अंतः-

करणाचे व उदार मतांचे अधिकारी होऊन गेले, त्यांनीं असें स्पष्ट सांगितलें आहे कीं, कालांतरानें हिंदुस्थानला ब्रिटिश सरकारनें स्वराज्य दिलें पाहिजे. त्याशिवाय हिंदुस्थानची खरी उन्नति होणार नाहीं; व हिंदुस्थानांतील ब्रिटिश सत्ताही चिरकाल टिकणार नाहीं. लॉर्ड मेकॉले यांनी तर पार्लमेंटांत असें स्पष्ट बोलून दाखविलें आहे कीं, पाश्चात्य विद्येचा व आंग्ल राज्यपद्धतीचा हिंदी लोकांच्या मनावर सुपरिणाम होऊन त्याचा विकास झाला, व हिंदी लोकांची पात्रता वाढून ते पाश्चात्य राजकीय संस्था मागूं लागले तर तो दिवस इंग्लिश लोकांच्या इतिहासांत अत्यंत अभिमानाचा होईल.*

सर जॉन मालकम् यांनी एके ठिकाणीं असें म्हटलें आहे कीं, हिंदी लोकांना जर आपल्या देशाच्या राज्यकारभारांत योग्य वाव दिली नाहीं तर ब्रिटिश सत्ता हिंदुस्थानांत चिरकाल टिकेल, असें हिंदुस्थानच्या किंवा इतर कोणत्याही देशाच्या इतिहासावरून म्हणण्यास जागा नाहीं. मालकम् साहेब आणखी असें म्हणतात कीं, आम्ही हिंदी लोकांना शिक्षण देत आहों, परंतु त्याबरोबरच शिक्षणामुळें सुसंस्कृत झालेल्या हिंदी लोकांच्या शिरावर योग्य जबाबदाऱ्या टाकण्याची योजना केली नाहीं, तर त्याचा परिणाम ब्रिटिश साम्राज्याला अपायकारक झाल्याशिवाय राहणार नाहीं.†

---

*" It may be that the public mind of India may expand under our system till it has outgrown that system, that by good government we may educate our subjects into a capacity for better government; that having become instructed in European knowledge, they may, in some future age, demand European institutions. Whether such a day will ever come, I know not. But never will I attempt to avert or retard it. Whenever it comes, it will be the proudest day in English history. "

*Lord Macaulay.*

† " We are not warranted by the history of India, nor indeed by that of any other nation in the world, in reckoning upon the possibility of preserving an Empire of such a magnitude by a system which excludes, as ours does, the natives from every station of high rank and honourable ambition. If we

सर वुइल्यम हंटर यांनी असें म्हटलें आहे की, इंग्लिशांच्या स्वातंत्र्यविषयक कल्पनांनी ज्यांच्या महत्त्वाकांक्षांचें पोषण झालें आहे व ज्यांच्या डोक्यांत प्रतिनिधित्वाशिवाय प्रजेवर कर लादतां कामा नये ही कल्पना शिरली आहे, त्यांना आपल्या देशाच्या कारभारांत योग्य भाग न देणें अशक्य आहे.*

वरील अधिकाऱ्यांचीं मतें त्यांची स्वतःची असून त्यांनी तीं ब्रिटिश सरकारतर्फे व्यक्त केली नाहीत व त्यामुळें तीं ब्रिटिश सरकारावर किंवा ब्रिटिश जनतेवर बंधनकारक नाहीत हें खरें; परंतु एकीकडे हिंदी लोकांना पाश्चात्य विद्यामंदिर खुलें करावयाचें, त्यांच्यापुढें पाश्चात्य संस्कृतीचे, पाश्चात्य सुधारणेचे, पाश्चात्य राजकीय संस्थांचे व पाश्चात्य राजकीय सुधारणेचे, गोडवे गावयाचे, हिंदुस्थानाला स्वराज्याला पात्र करण्याकरितांच व हिंदुस्थानची उन्नति करण्याकरितांच इंग्रजी राज्याची स्थापना झाली आहे असें वारंवार म्हणावयाचें व ह्या सर्वांचा हिंदी लोकांच्या मनावर परिणाम होऊन, त्यांनी स्वराज्याची मागणी केली तर ते कांहीं तरी भयंकर कृत्य करण्याला उद्युक्त झाले आहेत अशी आपली समजूत करून घेऊन त्यांना नांवें ठेवावयाची व त्यांच्या स्वराज्याच्या मागणीला विरोध

---

do not use the knowledge which we impart, it will be employed against us. If these plans are not associated with the creation of duties that will employ the minds which we enlighten, we shall only prepare elements that will hasten the destruction of our Empire."

"If we pursue steadily the proper measures, we shall in time so far improve the character of our Indian subjects as to enable them to govern and protect themselves."

* "I cannot believe that a people numbering one-sixth of the whole inhabitants of the globe, and whose aspirations have been nourished from their earliest youth on the strong food of English liberty can be permanently denied a voice in the government of their country. I do not believe that races into whom we have instilled the maxim of 'no taxation without representation' as the fundamental right of a people can be permanently excluded from a share in the management of their finances."

करावयाचा या विसंगत वर्तनाला काय म्हणावें? पाश्चात्य राज्यपद्धति, पाश्चात्य विद्या, पाश्चात्य इतिहासाचें ज्ञान इत्यादि गोष्टींचा कालांतरानें हिंदी लोकांवर काय परिणाम होईल याचा आमच्या राज्यकर्त्यांनीं अगोदरच विचार केलेला असला पाहिजे; तसा विचार न करितां जर त्यांनीं आम्हांस पाश्चात्य ज्ञान देण्यास सुरुवात केली असेल, पाश्चात्य राज्यपद्धति हिंदुस्थानांत स्थापन केली असेल व अर्धवट कां होईना पाश्चात्य संस्था सुरू केल्या असतील तर ते अत्यंत मंदधी आहेत असें म्हणावें लागेल. परंतु इंग्रज राज्यकर्त्यांना मंदधी कोण म्हणेल? त्यांनीं ज्या गोष्टी केल्या आहेत त्या विचारपूर्वकच केल्या असल्या पाहिजेत, असें मानण्यास कांहीं हरकत नाहीं. सबब इंग्रजी विद्या, इंग्रजी राज्यपद्धति व कांही उदार ब्रिटिश मुत्सद्यांचे विचार, या सर्वांचा आमचे मनावर अपेक्षित असा परिणाम होऊन आम्हीं जर स्वराज्य मागूं लागलों तर त्याबद्दल आमच्या राज्यकर्त्यांनीं आम्हांस दोष न देतां उलट त्यांना आनंदच व्हावयास पाहिजे. सारांश, स्वराज्य मागण्याचें दुसरें कारण हें आहे कीं, स्वराज्याशिवाय हिंदुस्थानांतील ब्रिटिश राज्यकर्त्यांचें उद्दिष्ट सफल होणार नाहीं.

स्वराज्य मागण्याचें तिसरें कारण असें आहे कीं, जर आम्ही सरकारास कर देतों तर त्या कराचा विनियोग कोणत्या रीतीनें चालला आहे हें पाहणें आमचें कर्तव्य आहे. प्रजेचा जो पैसा कराच्या रूपानें सरकारच्या तिजोरींत जातो त्याचा खर्च योग्य रीतीनें व्हावा अशी इच्छा प्रजेला असणें अगदीं सहाजिक आहे. व त्या पैशाचा विनियोग कोणत्या रीतीनें व्हावा हें ठरविण्याचा व त्याप्रमाणें तो झाला आहे किंवा नाहीं हें पाहण्याचा प्रजेला पूर्ण अखत्यार आहे. पाश्चात्य देशांत हीं राजकीय तत्त्वें सरकारास मान्य झालीं असून त्याप्रमाणें तेथें अंमलबजावणी होत आहे. तेथें तर ह्या तत्त्वांची मजल येथपर्यंत गेलेली आहे कीं, प्रतिनिधित्वाचा हक्क मिळाल्याशिवाय सरकारास कर देण्यास प्रजा बांधलेली नाहीं असें स्पष्ट रीतीनें सांगण्यांत येतें. कराच्या रूपानें जो पैसा प्रजा सरकारास देते त्या पैशानेंच सर्व राज्यकारभार चाललेला असतो. अधिकाऱ्यांना जे मोठमोठाले पगार मिळतात, ते प्रजेनें दिलेल्या करांतूनच मिळत असतात. प्रजेनें आटोकाट मेहनत करावी, रात्रंदिवस काबाडकष्ट करीत असावें, व अशा रीतीनें मेहनत करून त्यांना जी प्राप्ति होते तिच्यांतून कांहीं भाग कराच्या रूपानें सरकारास देण्यांत येत असतो. ज्यांनीं हा कर द्यावयाचा त्यांना त्याचा

विनियोग कशा प्रकारचा होत आहे हें थोड्या प्रमाणानें सुद्धां पाहण्याचा हक्क असूं नये हें अगदीं अन्याय्य आहे. पाश्चात्य राष्ट्रांत प्रतिनिधिसत्ताक राज्यपद्धतीची जी उत्पत्ति झाली ती ह्याच कारणामुळें झाली; व त्याची वाढही होण्यास हेंच कारण बऱ्याच अंशीं झालें आहे. प्रजेकडून घेण्यांत येणारा कर व प्रातिनिधिक तत्त्व, ह्यामध्यें असलेल्या त्या निकट संबंधाचें महत्त्व आम्हां हिंदी लोकांस चांगलें कळूं लागलें आहे व म्हणूनच आम्ही स्वराज्याची मागणी करीत आहों. आमच्या पैशावर आमचा बिलकुल ताबा नसावा ही गोष्ट आम्हांस अत्यंत नापसंत वाटते. प्रजेवर कर बसवावा किंवा बसवूं नये, बसवावयाचा असल्यास तो कोणता व कसा बसवावा, कराच्या रूपानें मिळालेल्या पैशाचा विनियोग कशा रीतीनें करण्यांत यावा ह्या सर्व महत्त्वाच्या गोष्टी ठरविण्याचा अधिकार आम्हांसच असावा असें आम्हांस वाटूं लागलें आहे व आमच्या राजकीय उन्नतीच्या दृष्टीनें पाहिलें असतां अशी इच्छा आमच्यांत उत्पन्न झाली आहे ही आनंदाची गोष्ट समजली पाहिजे.

स्वराज्य मागण्याचें आणखी एक कारण असें आहे कीं, तें मिळाल्याशिवाय कोणत्याही जिवंत व सुधारलेल्या राष्ट्राच्या आत्म्याची तळमळ दूर होत नाहीं. हिंदुस्थानांतील रहिवाशी कांहीं अडाणी नाहींत. ते चांगले सुधारलेले असून त्यांनीं मानवी संस्कृतीत जी भर घातली आहे ती अत्यंत महत्त्वाची आहे. तिच्याबद्दल कोणासही कौतुकच वाटेल. ज्या वेळीं युरोपखंडांतील लोक रानटीपणांत निमग्न झालेले होते, त्या वेळीं हिंदुस्थान देश वैभवाच्या व उन्नतीच्या शिखराला पोहोंचलेला होता. शेंकडों वर्षें हिंदुस्थानांतील लोकांनीं राष्ट्रीय स्वातंत्र्याचा व राष्ट्रीय वैभवाचा उपभोग घेतलेला होता. कालांतरानें आमचें राष्ट्रीय स्वातंत्र्य गमावून त्याबरोबर आमचें वैभवही नष्ट झालें हें खरें; परंतु मुसलमानी अमदानींत सुद्धां आमचें सत्त्व आम्हीं नाहींसें होऊं दिलें नव्हतें. तर मग सुधारलेल्या व प्रागतिक अशा ब्रिटिश साम्राज्यछत्राखालीं आम्हीं आज शंभर वर्षें राहिलों असतां आम्हीं आपलें वैशिष्ट्य टाकून देऊन राजकीय आत्महत्या करूं, असें कसें संभवेल? मनुष्य हा जसा समाजप्रिय आहे, तसाच तो राजकारणप्रियही आहे. किंबहुना ग्रीक तत्त्ववेत्ता प्लेटो यानें आपल्या एका ग्रंथांत म्हटल्याप्रमाणें राजकीय बुद्धि परमेश्वरानें प्रत्येक समाजांत निसर्गतःच ठेविली आहे. व ही राजकीय बुद्धि मनुष्यांत उपजतच बीजाच्या रूपानें असल्यामुळें तिचें पोषण होऊन कालांतरानें राजकीय सत्ता उदयास

आली, व समाजाचीं राष्ट्रें बनलीं. ही राजकीय बुद्धि पाश्चात्य लोकांतच आहे व आम्हीं हिंदी लोक मात्र तिला पारखे आहोंत, असा भेदभाव परमेश्वरानें खास केलेला नाही. जगांत जीं मोठमोठालीं व वैभवशाली राष्ट्रें आहेत त्यांच्यासारखीच आमची स्थिति होऊन आम्हांसही स्वराज्यशाली, वैभवशील, सुसंस्कृत व प्रागतिक म्हणून जगांत तोंड वरती करून स्वाभिमानानें वागतां यावें अशी जर इच्छा आम्हास वाटूं लागली, तर तिच्याबद्दल आम्हांस दोष देणें योग्य होईल काय? स्वराज्य मिळवून मानवी जातीच्या प्रगतींत आणखी भर घालावी अशी जर आम्हांस तळमळ वाटूं लागली आहे तर त्याबद्दल आमचा काय इलाज? ज्याप्रमाणें तृषार्त मनुष्याची तहान पाणी मिळाल्यावांचून भागणार नाहीं त्याप्रमाणेंच आम्हांस स्वराज्य मिळाल्याशिवाय आमच्या राजकीय जीवनाची तळमळ नाहींशी होणार नाहीं. आमची स्वराज्याची मागणी म्हणजे आमच्या आत्म्याचा आक्रोश होय; व हा आक्रोश आतां कशाच्यानेंही थांबणार नाहीं. हिंदुस्थानचे माजी व्हाइसराय लॉर्ड हार्डिंज व मद्रासचे बिशप व्हाइटहेड साहेब यानीं आमच्या स्वराज्याच्या मागणीचें हें खरें स्वरूप ओळखलें आहे; व म्हणूनच त्यांनीं असें स्पष्ट सांगितलें आहे कीं, हिंदी लोकांची स्वराज्याची मागणी ही नैसर्गिक आकांक्षा आहे, व ही गोष्ट इंग्रज लोक लक्षांत घेतील तर हिंदुस्थानचें व इंग्लंडचें—दोघांचेंही कल्याण झाल्यावांचून रहाणार नाहीं.

---

# मि० कर्टिस आणि 'राऊंड टेबल' संघ.

लंडन येथें प्रसिद्ध होणाऱ्या 'राऊंड टेबल' नांवाच्या त्रैमासिकाचे संपादक मि. कर्टिस हे हिंदुस्थानांत आले असून, युद्धसमाप्ती नंतर जी ब्रिटिश साम्राज्याची पुनर्घटना होण्याचा संभव आहे, तींत हिंदुस्थानच्या राज्यपद्धतींत कोणते फेरबदल करावे, ह्याविषयीं ते खलबत करीत आहेत, हें आमच्या वाचकांना माहीत असेलच. ते हिंदुस्थानांत आले असल्यामुळें 'राऊंड टेबल' त्रैमासिकाच्या संपादकाचें काम मि. केर ह्या नांवाचे गृहस्थ सध्यां करीत आहेत. मि. कर्टिस यांनीं संयुक्तप्रांताच्या लेफ्टेनंट-गव्हर्नरच्या कॅंपांतून तारीख १५ नव्हेंबर १९१६ रोजीं मि. केर यांना एक पत्र पाठविलें होतें. तें पत्र छापील असून त्यावर 'खाजगी' असा शेरा मारलेला होता. सदरहु पत्राची एक प्रत कर्मधर्मसंयोगानें रा. गांधी यांच्या हातीं आली. रा. गांधींना तें पत्र साहजिकपणेंच अतिशय महत्त्वाचें वाटल्यामुळें त्यांनीं तें लखनौ येथें बॉंबे कॉनिकलचे संपादक मि. हार्निमन यांना आपले पत्रांत प्रसिद्ध करण्याकरितां दिलें. आणि त्याप्रमाणें २८ डिसेंबर १९१६ च्या बॉंबे क्रॉनिकलच्या अंकांत तें समग्र प्रसिद्ध झालें. लखनौ येथेंही त्या पत्राच्या छापील प्रती राष्ट्रीय सभेला आलेल्या प्रमुख प्रतिनिधींना देण्यांत आल्या होत्या. ह्या पत्रानें जिकडे तिकडे बरीच गडबड उडाली आणि अलाहाबादच्या 'लीडर' पत्रांत त्यांतील कांहीं उतारे प्रसिद्ध करण्यांत आले. मि० कर्टिस यांना ही गोष्ट समजल्यावर आपलें पत्र बॉंबे क्रॉनिकलमध्यें अर्धवटच छापलेलें आहे आणि त्यामुळें आपले हेतू आणि कार्य यांचेबद्दल गैरसमज झाला आहे असें त्यांना वाटून, त्यांनीं तें पत्र प्रमुख वर्तमानपत्रांकडे सबंध प्रसिद्ध करण्याकरितां पाठवून दिलें. मि. कर्टिस यांनीं लखनौ येथें आमचीही मुलाखत घेतली होती आणि आपल्या पत्राची एक प्रत आमच्या मासिकांत प्रसिद्ध करण्याकरितां त्यांनीं आम्हांस दिली आहे. ह्या पत्रानें हिंदुस्थानांत गडबड उडवून दिली असून त्यावर हिंदी वर्तमानपत्रांत बरीच टीकाही झाली आहे. इतकेंच नव्हे तर संयुक्त प्रांतांतील कायदे कौन्सिलांत त्याबद्दल प्रश्नोत्तरें होऊन त्या प्रांताचे लेफ्टेनंट गव्हर्नर सर जेम्स मेस्टन यांनाही त्याबद्दल खुलासा करावा लागला आहे, आणि ह्या पत्रामुळें जे कांहीं महत्त्वाचे प्रश्न उपस्थित झाले आहेत

त्याबद्दलचा वाद लवकर संपेल असें दिसत नाहीं. सबब, त्या पत्राचें आणि सामान्यतः मि. कर्टिस आणि 'राऊंड टेबल' संघ यांच्या मतांचें ह्या लेखांत परीक्षण करण्याचें आम्हीं योजिलें आहे.

परंतु हें परीक्षण करण्यापूर्वी 'राऊंड टेबल' ही संस्था काय आहे ह्याबद्दल आमच्या वाचकांना थोडीशी माहिती देणें अवश्य आहे. १९१० सालीं साम्राज्यविषयक प्रश्नांचा अभ्यास करण्याकरितां कॅनडा, ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड, आणि साऊथ आफ्रिका येथें संघ स्थापन करण्यांत आले. त्यानंतर ग्रेटब्रिटन, हिंदुस्थान आणि न्यू फाऊंडलंड येथेंहि संघ स्थापन करण्यांत आले. ह्या संघांच्या सभासदांना एकमेकांचे विचार कळावे म्हणून त्यांनीं १९११ सालीं 'राऊंड टेबल' नांवाचें त्रैमासिक सुरू केलें. आणि त्या त्रैमासिकाच्या नांवावरूनच ह्या संघांना 'राऊंड टेबल संघ' असें म्हणण्याचा प्रघात पडला आहे. 'राऊंड टेबल' यांचा शब्दशः अर्थ काय हें सांगावयास नकोच. चार लोकांना गप्पा मारावयाच्या असल्या किंवा एखाद्या विषयाची चर्चा करावयाची असली म्हणजे त्यांनीं राऊंड टेबलसभोंवार बसावें आणि गप्पा माराव्या किंवा चर्चा करावी असा प्रघात आहे. सबब 'राऊंड टेबल' याचा अर्थ चर्चा आणि 'राऊंड टेबल ग्रूप्स' याचा अर्थ एकत्र जमून चर्चा करणारे संघ असा आहे. ह्या संघांत सर्व राजकीयपक्षांचे सभासद असून त्यांत साम्राज्यविषयक अनेक प्रश्नांचा खल होत असतो. त्यांपैकीं एक प्रश्न म्हटला म्हणजे "ज्याप्रमाणें परराष्ट्रीय धोरणावर ब्रिटिश लोकांचा ताबा चालतो, त्याप्रमाणेंच स्वयंशासित ब्रिटिश वसाहतींतील लोकांचा ताबा चालावा, म्हणून काय केलें पाहिजे" हा होय. ह्या प्रश्नावर मि. कर्टिस यांनीं रिपोर्ट तयार करून तो त्यांनीं 'राऊंड टेबल' संघांना सादर करावा असें चालू युद्ध सुरू होण्यापूर्वी ठरलें होतें. त्याप्रमाणें त्यांनीं तो रिपोर्ट तयार करून १९१५ सालीं राऊंड टेबल संघांना सादर केला आणि गेल्यासालीं तो "दी प्राब्लेम ऑफ दी कॉमनवेल्थ" ह्या नांवानें प्रसिद्ध करण्यांत आला.

राऊंड टेबल संघांत सर्व राजकीयपक्षांचे लोक आहेत हें वर सांगितलेंच आहे. भिन्न भिन्न सभासदांनीं केलेल्या टीकांचा विचार होऊन स्रतेशेवटीं जो ग्रंथ प्रसिद्ध करण्यांत येतो, त्याबद्दलची सर्व जबाबदारी लेखकावर असते, असें मि. कर्टिस यांनीं वरील ग्रंथांच्या प्रस्तावनेंत म्हटलें आहे. त्यांनीं असेंही म्हटलें

आहे कीं, "दि प्रॉब्लेम ऑफ दी कॉमनवेल्थ" यांत व्यक्त केलेले विचार ज्यांना पसंत नाहींत असे ब्रिटिशसाम्राज्यांतील सर्व देशांत आणि सर्व पक्षांत पुष्कळ लोक आहेत.

'राऊंड टेबल' संघाबद्दल येणेंप्रमाणें हकीकत आहे. साम्राज्यविषयक प्रश्नांचा विचार करणारे व खल करणारे हे संघ आहेत असें ह्यावरून स्पष्ट दिसतें. हिंदुस्थानांत फक्त एकच संघ आहे व तो आग्रा येथें आहे. ह्या संघांत हिंदी सभासद आहेत किंवा नाहींत हें समजत नाही, परंतु दोन तीन हिंदी सभासद असावेत असें मि० कर्टिस यांनीं आम्हांस सांगितलेल्या हकीकतीवरून दिसतें. हे संघ केवळ साम्राज्यविषयक प्रश्नांचा अभ्यास करणाऱ्या जिज्ञासूंचे असून ते राजकीय स्वरूपाचे नाहींत, आणि कोणत्याही प्रकारची राजकीय चळवळ करण्याचा त्यांचा हेतु नाही, असें भासविण्याचा नामदार मारिस यांनीं संयुक्त प्रांताच्या कायदेकौन्सिलांत प्रयत्न केला आहे. परंतु नामदार मारिस यांचें हें विधान अगदीं चुकीचें आहे असें आम्ही स्पष्ट म्हणतों. साम्राज्यविषयक प्रश्नांची, व विशेषतः वसाहतवाल्यांना ब्रिटिश लोकांप्रमाणेंच साम्राज्याच्या शासनांत भाग मिळण्याकरितां ग्रेटब्रिटनच्या राजकीय घटनेंत कोणते फेरबदल केले पाहिजेत ह्या प्रश्नाची, चर्चा करणाऱ्यांच्या संघांना बिन राजकीय [ Non-political ] संघ समजावयाचे तर मि० मारिस यांची राजकीय संस्थेबद्दलची कल्पना अगदीं अपूर्व असली पाहिजे, असें म्हणावें लागेल. उद्यां जर हिंदुस्थानांत हिंदुस्थानविषयक प्रश्नांचा विचार करण्याकरितां हिंदी लोकांचे संघ स्थापण्यांत आले, आणि सरकारी नोकर त्यांचे जर सभासद झाले तर नामदार मारिस, इतर सरकारी अधिकारी किंवा खुद्द सरकार यांना ती गोष्ट पसंत पडेल काय? असल्या संघांना ते बिन-राजकीय संघ समजतील काय? जर नाहीं तर राऊंड टेबल संघांना राजकीय कां समजूं नये? तसेंच आपल्या मतांचा प्रसार करण्याचा जर राऊंड टेबल संघाचा हेतु नाही तर त्यांनीं राऊंड टेबल हें त्रैमासिक कां सुरू केलें? आणि अलीकडे "दी प्रॉब्लेम ऑफ दी कॉमनवेल्थ" ह्यासारखीं पुस्तकें कां प्रसिद्ध करण्यांत येत आहेत? मि. कर्टिस यांचीं मतें राऊंड टेबलच्या सर्व सभासदांना कदाचित् पसंत नसतील; परंतु तितक्यावरून तीं मतें मि. कर्टिस यांचीं एकट्याचींच आहेत आणि संघांतील बहुमताचा पाठिंबा त्यांना नाहीं असें म्हणतां येत नाहीं. राऊंड टेबल संघांत

सरकारी अधिकारी आहेत आणि कित्येक सभासदांना आपलीं मतें उघडपणें व्यक्त करणें कायदेशीर वाटत नसेल, म्हणून मि. कर्टिस यांना पुढें करण्यांत येऊन त्यांच्या द्वारें राऊंड टेबल संघ आपल्या मतांचा प्रसार करण्याचा प्रयत्न करीत आहे, अशी जर कोणाला शंका आली तर ती अगदीं साहजिक आहे. सारांश, राऊंड टेबल ही संस्था राजकीय नव्हे आणि आपल्या मतांचा प्रसार करण्याचा तिचा हेतु किंवा प्रयत्न नाहीं, असें भासविण्याचा संयुक्तप्रांताचे पोलीस इन्स्पेक्टर–जनरल नामदार मारिस यांनीं जो आपल्या भाषणांत प्रयत्न केला आहे तो केवळ निरर्थक असून हास्यास्पद आहे असें म्हटल्यावांचून आम्हांस राहवत नाहीं. सर जेम्स मेस्टन यांनीं अशा प्रकारचा लोकांच्या डोळ्यांत धूळ घालण्याचा प्रयत्न केला नाहीं हें ह्यासंबंधानें लक्षांत ठेवण्यासारखें आहे.

'राऊंड टेबल' ही संस्था साम्राज्यविषयक प्रश्नांचें अध्ययन करणाऱ्या केवळ जिज्ञासूंची नाहीं ह्याबद्दल पुरावा मि. कर्टिस यांच्या पत्रांतच मिळण्यासारखा आहे. ते म्हणतात, "राऊंड टेबलच्या विद्यमानें आपण दोन ग्रंथ प्रसिद्ध केले आहेत. त्या ग्रंथांत आपण जी मतें प्रतिपादिली आहेत, तीं हीं होतः– ( १ ) ब्रिटिश साम्राज्य हें केवळ त्यांतील लोकांनाच नव्हे, तर खुद्द मानवी सुधारणेला अवश्य आहे. ( २ ) त्या साम्राज्याचा बचाव आतां केवळ लष्करी सामर्थ्यानें करतां येणें शक्य नाहीं; आणि ( ३ ) साम्राज्याच्या सामान्य हिताच्या ज्या बाबी आहेत त्याबद्दलची जबाबदारी संयुक्त राज्यातील ब्रिटिश प्रजेप्रमाणें स्वयंसत्ताक वसाहतींतील ब्रिटिश प्रजेनें आपलें शिरावर घेतली नाहीं तर तें साम्राज्य लयास जाईल. ह्या ग्रंथाकडे केवळ संयुक्त राज्यांतील नव्हे, तर स्वयंसत्ताक वसाहतींतील सुद्धां पुष्कळ लोकांचें लक्ष गेलें आहे. ह्या स्वयंसत्ताक वसाहतींपैकीं तीन वसाहतींत मी नुकताच प्रवास करून आलों आहें. तेथें मी पुष्कळ सभांत भाषणें केलीं आहेत आणि त्यांतील श्रोत्यांनी मला प्रश्न विचारले आहेत. मीं असंख्य लोकांबरोबर ह्या प्रश्नाबद्दल चर्चा केली आहे, आणि सर्वत्र सामान्य मत असें झालें कीं, आपण प्रतिपादिलेलीं मतें पुष्कळ अंशीं बरोबर आहेत." 'राऊंड टेबल' ही संस्था राजकीय स्वरूपाची नसून तिचा हेतु लोकमत तयार करण्याचा नाहीं असें जर असतें, तर मि. कर्टिस यांनीं सभेंत भाषणें करण्याची आणि शेंकडों लोकांबरोबर चर्चा करण्याची तसदी का घेतली हें समजणें कठीण आहे. मि. कर्टिस यांच्या नांवानें प्रसिद्ध

झालेलीं पुस्तकें ज्यानें काळजीपूर्वक वाचलीं असतील त्यास असें कळून आल्याशिवाय राहणार नाहीं कीं, एका विशिष्ट मताच्या प्रसाराकरितांच मि. कर्टिस यांचे सर्व प्रयत्न चालले आहेत. हें मत पूर्णपणें राजकीय असून त्याप्रमाणें ब्रिटिश साम्राज्याची घटना बदलण्यांत यावी म्हणून ते खटपट करीत आहेत. त्यांच्या प्रयत्नांचा किती परिणाम झालेला आहे आणि पुढें होण्याचा संभव आहे हें एकाच गोष्टीवरून चांगलें दिसून येतें. गेल्या जुलै महिन्यांत लंडन येथील एम्पायर पार्लमेंटरी ॲसोसिएशनच्या विद्यमानें, ब्रिटिश पार्लमेंट आणि वसाहतींतील पार्लमेंटें यांच्या प्रतिनिधींची परिषद् भरली होती, तींत ग्रेटब्रिटन आणि स्वयंसत्ताक वसाहती यांचें एकीकरण करण्याकरितां साम्राज्याच्या घटनेंत कोणते फेरबदल करणें अवश्य आहे ह्याविषयीं व्हायकौंट मिल्नर यांचें भाषण झालें. त्यांत त्यांनीं मि. कर्टिस यांच्याच मतांचा अनुवाद केलेला असून त्यांनीं आपल्या पुस्तकांत ज्या सुधारणा सुचविल्या आहेत, त्याच त्यांनी सुचविल्या आहेत. सारांश, आपल्या विशिष्ट मताप्रमाणें साम्राज्याची पुनर्घटना व्हावी म्हणून 'राऊंड टेबल' संघाच्या द्वारें आणि अन्य रीतीनें मि. कर्टिस यांनीं भगीरथ प्रयत्न सुरू केले आहेत. आणि कदाचित् त्यांचा इंग्लंडांतील प्रधानमंडळ आणि मतदार यांचेवर बराच परिणाम होण्याचा संभव आहे.

येथपर्यंत 'राऊंड टेबल' संस्थेचें खरें स्वरूप काय आहे आणि त्या संस्थेच्या विद्यमानें मि. कर्टिस यांनीं चालविलेला प्रचंड उद्योग हा केवळ ज्ञानेच्छु, कल्पनासृष्टींत भराऱ्या मारणाऱ्या राजकीय तत्त्ववेत्त्यांचा नसून व्यावहारिक मुत्सद्द्यांचा आहे, हें दाखविण्याचा आम्हीं प्रयत्न केला आहे. आतां आपण मि. कर्टिस यांच्या पत्राकडे वळूं. हिंदुस्थानाबद्दल त्यांचे विचार काय आहेत हें त्यांच्या पत्रांतील खालील उताऱ्यावरून आमचे वाचकांना स्पष्ट कळून येईल. ते म्हणतात " ज्या प्रश्नाचा विचार करण्याकरितां मीं हिंदुस्थानांत आलों आहें तो प्रश्न सोपा आहे. युद्ध करणें, तह करणें, वगैरे ज्या ब्रिटिश साम्राज्याच्या अत्यंत महत्त्वाच्या जबाबदाऱ्या आहेत, त्यांत ग्रेटब्रिटनबरोबर समानतेनें स्वयंसत्ताक वसाहतींना हक्क मिळाल्याशिवाय ब्रिटिश साम्राज्य टिकणार नाहीं अशी आपली खात्री आहे. हा हेतु सिद्धीस नेण्याकरितां साम्राज्यसरकारची शासनव्यवस्था दुरुस्त करून तींत वसाहतींतील लोकांना भाग दिला पाहिजे. याचा परिणाम असा होईल कीं, ज्यांना स्वराज्य मिळालेलें नाहीं असे जे सदतीस कोटी लोक ब्रिटिश साम्राज्यांत आहेत त्यांच्या भवितव्यतेचीं सूत्रें ब्रिटिश लोकांबरोबर

वसाहतींतील लोकांच्या हातांत येतील. परंतु ह्या ३७ कोटी लोकांना एकाच वर्गांत बसविणें चुकीचें होईल. मध्य आफ्रिकेंतील लोक इतके मागसलेले आहेत कीं, सरकारनें आपल्यावर कोणत्या रीतीनें राज्य करावें ह्याबद्दल मत देण्याला ते लायक नाहींत. तेथें राज्यकर्त्यांचें कर्तव्य म्हटलें म्हणजे त्यांच्या आधिभौतिक आणि शक्य तर आध्यात्मिक इतिहासाचें अध्ययन करून त्या इतिहासाच्या दृष्टीनें त्यांना शक्य तितकी उत्तम राज्यव्यवस्था देणें, हें होय. त्यांच्यावर राज्य चालवितांना आपणाला त्यांचें मत घेतां येत नाहीं; कारण, त्यांना मतच नाहीं. परंतु हिंदी लोकांची गोष्ट याहून निराळी आहे. ह्या प्रचंड हिंदी समाजांत, राजकीय विषयांवर मत देण्यास जे समर्थ आहेत आणि मत देत असतात असे लहान, परंतु महत्त्वाचे वर्ग आहेत. ह्या वर्गांच्या मताप्रमाणें हिंदुस्थानचें राजकीय धोरण ठेवितां येत नाहीं; कारण एकतर हे वर्ग अत्यंत लहान आहेत. हिंदुस्थानच्या राजकीय धोरणाचा निर्णय करण्याची जबाबदारी ह्या वर्गांचे शिरावर ठेविली तर त्यांना ती बजावतां येणार नाहीं. बहुजनसमाज त्यांना हाणून पाडील. आणि म्हणून त्यांना आपले निर्णय बहुजनसमाजावर लादतां येणार नाहींत. आणि जे निर्णय आपले नाहींत ते अर्थात्‌च आपल्याला अमलांत आणतां येणार नाहींत. जे हिंदी लोक राजकीय प्रश्नांचा निर्णय करण्यास समर्थ आहेत ते सध्यां पुरेसे नसून त्यांच्यांत जूट व संघटना ही नाहींत. आणि त्यामुळें ज्या बहुसंख्याक हिंदी लोकांना राजकीय प्रश्नांचा निर्णय करण्याची पात्रता नाहीं, ते त्यांच्या निर्णयाप्रमाणें सतत वागण्यास तयार होणार नाहींत. ही स्थिति पालटून राजकीय प्रश्नांचा निर्णय करण्याची पात्रता ज्यांचे अंगीं आली आहे, अशा लोकांची संख्या पुरेशी होऊन त्यांच्यांत जूट व संघटना झाल्याशिवाय हिंदी मताप्रमाणें हिंदुस्थानचें राज्य चालविणें शक्य नाहीं. ब्रिटिश लोकमतांत दोष नाहींत असें नाही. तथापि एकंदरीनें पाहतां ब्रिटिश लोकमत दोषरहित आणि निरपेक्ष आहे. ब्रिटिश लोकमताइतकेंच निर्दोष आणि निरपेक्ष हिंदी लोकमत जर असतें, तर त्या मताप्रमाणें, ज्या हिंदी लोकांना राजकीय प्रश्नांचा निर्णय करण्याचें सामर्थ्य नाही ते वागण्यास तयार झाले असते. परंतु हिंदी लोकमत खात्रीनें तितकें निर्दोष आणि निरपेक्ष नाहीं. संख्येनें आणि गुणानें दोन्हीही दृष्टींनीं पाहतां त्यांत अद्याप सुधारणा झाली पाहिजे, आणि ती सुधारणा करणें हें ब्रिटिश सरकारचें आद्यकर्तव्य असलें पाहिजे. हिंदी लोकमताचें स्वरूप जरी अशा प्रकारचें आहे, तरी हिंदुस्थानांत

लोकमत आहे, ही गोष्ट विसरतां कामा नये. जें हिंदी मत आहे तें लक्षांत घेण्याचा सरकार प्रयत्न करीत असतें असें स्थूल मानानें म्हणण्यास हरकत नाहीं. हिंदी राष्ट्रमत उत्तम प्रकारचें नाहीं असें जरी सरकारला वाटत असलें तरी तें मत पुष्कळ वेळां सरकार मान्य करतें. तें मत इतकें चुकीचें आहे कीं त्याप्रमाणें वागलें असतां संकट ओढवेल असें सरकारला वाटलें, तरच त्या मताकडे सरकार लक्ष देत नाहीं. हिंदी लोकमताचें पोषण करावें आणि आपल्या धोरणावर त्या मताचा अधिकाधिक परिणाम होऊं द्यावा हें ब्रिटिश सरकारचें धोरण आहे. शेवटचा निर्णय करण्याची जबाबदारी ब्रिटिश सरकारनें अद्याप आपलेच हातांत ठेविली आहे. परंतु ही जबाबदारी आपले शिरावर घेण्याला पुरेसे हिंदी गृहस्थ समर्थ झाल्यावर त्यांचेवर टाकण्याचा काळ –मग तो कितीही दूर असो– यावा अशी त्यांची इच्छा आहे." ह्यानंतर मि. कर्टिस म्हणतात, "हिंदुस्थानांतील स्थितीची ही रूपरेषा आहे आणि हिंदुस्थान व सेंट्रल आफ्रिका ह्यांच्यांत जो फरक आहे तो हाच आहे. आतां आपल्यापुढें जो प्रश्न आहे त्याच्याशीं हिंदुस्थानांतील स्थितीचा संबंध कसा पोहोंचतो हें आपण पाहूं. आपली मागणी अशी आहे कीं, हिंदुस्थान आणि मध्य आफ्रिका यांतील अंतस्थ बाबी, तशाच परराष्ट्रीय संबंधाच्या बाबी, ह्या सर्व बाबींवर सुधारलेल्या साम्राज्य सरकारची हुकमत चालावी. ह्या दोन देशांचा अंतस्थ कारभार सध्यांच भिन्न तत्त्वाप्रमाणें चाललेला आहे, आणि आपणापुढें प्रश्न आहे तो हा कीं, अंतस्थ बाबी आणि परराष्ट्रीय बाबी यांचा निकट संबंध आहे हें लक्षांत घेतां, हिंदुस्थान आणि दक्षिण आफ्रिका यांच्या परराष्ट्रीय बाबींच्या नियमासंबंधानें दक्षिण आफ्रिका आणि हिंदुस्थान यांच्यामध्यें फरक न करणें बरोबर होईल कां? जर बरोबर होइल तर हिंदुस्थान आणि दक्षिण आफ्रिका यांच्यामध्यें फरक न करण्यास हरकत नाहीं. परंतु आपण ही गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे कीं, हिंदुस्थान आणि दक्षिण आफ्रिका यांना जर आपण एकाच पंक्तीला बसाविलें आणि ब्रिटिश साम्राज्याच्या राज्यपद्धतींत जे फेरफार आपण आपल्या पुस्तकांत सुचविले आहेत ते अंमलांत आणले, तर हिंदुस्थानांत त्याविरुद्ध इतकी चळवळ होईल कीं, कदाचित् रक्तपातही झाल्यावांचून राहणार नाहीं. दक्षिण आफ्रिका आणि हिंदुस्थान ह्यांच्यामध्यें फरक न करणें योग्य असलें, तर हाही परिणाम सोसण्यास आपण तयार झालें पाहिजे. परंतु तो सोसण्यास तयार होण्यापूर्वीं, ज्या अर्थीं हिंदुस्थान आणि दक्षिण आफ्रिका यांच्या अंतस्थ बाबींचें शासन भिन्न पद्धतीप्रमाणें करण्यांत

येत आहे, त्या अर्थी तितक्याच मानानें त्यांच्या परराष्ट्रीय बाबींचें नियमनही भिन्न रीतीनें करणें योग्य आहे, ह्या मुद्याचा पूर्ण विचार झाला पाहिजे. हिंदुस्थानांत जें लोकमत आहे त्याचा परिणाम जर आपण हिंदुस्थानच्या आपल्या हिंदुस्थानविषयक धोरणावर होऊं देतों, तर तितक्याच प्रमाणानें साम्राज्यविषयक निर्णयावर हिंदी मताचा परिणाम होऊं देणें आवश्यक नाही काय? सबब आपलें कार्य हें आहे कीं, एकपक्षीं, ग्रेटब्रिटन व वसाहती आणि हिंदुस्थान यांच्यामध्यें आणि उलटपक्षीं, हिंदुस्थान आणि दक्षिण आफ्रिका यांच्यामध्यें फरक कसा आहे आणि तो त्यांच्या राज्यपद्धतीत कसा प्रतिबिंबित झाला आहे, हें आपण आपल्या देशबांधवांना दाखविलें पाहिजे. .......आपण हिंदी लोकांची अशी खात्री करून दिली पाहिजे कीं, दक्षिण आफ्रिकेंतील लोकांप्रमाणें त्यांच्या सर्व आशा आणि आकांक्षा ब्रिटिश साम्राज्याच्या चिरस्थाईपणावर अवलंबून आहेत. तसेंच आपण त्यांची अशीही खात्री करून दिली पाहिजे कीं, वसाहतींविरुद्ध द्वेषभाव उत्पन्न करण्याकरितां जी चळवळ येथें चालू आहे त्यामुळें हिंदी लोकांचेंच नुकसान झाल्याशिवाय राहणार नाहीं.......परंतु हिंदुस्थानचा प्रश्न काय आहे हें प्रत्यक्ष समजून घेण्याचा आपण प्रयत्न केल्याशिवाय आपण आपल्या पुस्तकांत जें लिहूं त्याचा कांहीं उपयोग होणार नाही. हिंदी लोकांच्या आकांक्षा काय आहेत हें हिंदी पुढाऱ्यांकडून समजून घेण्याचा आम्हीं प्रयत्न केला आहे, असें हिंदी पुढाऱ्यांना वाटेल अशी आपण खबरदारी घेतली पाहिजे. हिंदुस्थानच्या प्रश्नाबद्दल हिंदी लोकांचें म्हणणें काय आहे हें ऐकून न घेतां आपण हिंदुस्थानच्या प्रश्नाबद्दल मतें देतों अशी तक्रार करण्याला आपण जर जागा ठेविली तर फार नुकसान होणार आहे."

मि. कर्टिस यांच्या पत्रांतील हेच महत्त्वाचे उतारे होत आणि त्यावरून त्यांचे हिंदुस्थानाबद्दल काय विचार आहेत हें आमच्या वाचकांच्या लक्षांत येईल. आतां आपण वरील विचारांचें परीक्षण करूं.

परंतु हें परीक्षण करण्यापूर्वी मि. कर्टिस यांचे विचारांविरुद्ध प्राथमिक आक्षेप उपस्थित होतो. तो हा कीं, मि. कर्टिस हे हिंदी लोकांचे विचार समजून घेऊन हिंदुस्थानच्या प्रश्नाचा अभ्यास करण्याकरतां मुद्दाम हिंदुस्थानांत आले आहेत. आपलें मन खुलें ठेवून हिंदी पुढाऱ्यांचे विचार समजून घ्यावे, आणि त्यांच्यांशीं चर्चा करून आपलीं मतें कायम करावीं ह्या हेतूनेंच ते येथें आले आहेत हें

त्यांनींच पुष्कळांना सांगितलें आहे. गेल्या नवंबर महिन्यांत त्यांनीं आम्हांस पत्र पाठवून आमचे मुलाखतीची इच्छा दर्शविली होती, त्यांतही त्यांनीं स्पष्ट लिहिलें होतें कीं, हिंदुस्थानची वस्तुस्थिति काय आहे हें प्रत्यक्ष पहाण्याकरितां मी येथें आलों आहें. हिंदुस्थानांत येण्याचा त्यांनीं व्यक्त केलेला हा हेतु जर खरा असेल तर हिंदुस्थानच्या प्रश्नाबद्दल सिद्धांत ठरविण्याची त्यांची पद्धति त्या हेतूच्या अगदीं विरुद्ध आहे असें म्हणणें भाग आहे. मि. कर्टिस हे हिंदुस्थानांत कोणत्या तारखेस आले हें त्यांच्या पत्रावरून नक्की समजण्यास मार्ग नाहीं. तथापि ते आक्टोबरच्या अखेर आले असावे असें त्यांच्या पत्रावरून दिसतें. त्यांनीं मि. केर यांना लिहिलेलें पत्र नवंबरच्या पंधरा तारखेचें आहे. म्हणजे याचा अर्थ असा होतो कीं, ते हिंदुस्थानांत येऊन एक महिना झाला नाहीं तोंच, त्यांनीं हिंदुस्थानाबद्दल ठाम मतें व्यक्त केलीं आहेत. हिंदी मताचें स्वरूप काय आहे, तें असावें तितकें बरोबर आणि निरपेक्ष आहे किंवा नाहीं, तें मत एकंदर सर्व हिंदी समाजाला मान्य होण्यासारखें आहे किंवा नाहीं, हिंदी लोकांवर राज्यकारभाराची जबाबदारी ठेवल्यास ते ती पार पाडतील किंवा नाहीं, इत्यादि जे महत्त्वाचे प्रश्न आहेत ते मूलभूत आहेत. ह्या प्रश्नांबद्दल जशीं ज्यांचीं मतें असतील तशी हिंदुस्थानच्या राज्यपद्धतींत कोणत्या सुधारणा केल्या पाहिजेत, ह्याबद्दल त्यांचीं अनुमानें अर्थातच असणार. सबब ह्या प्रश्नांचा विचार बारकाईनें लक्षपूर्वक केला पाहिजे, आणि त्यांबद्दल हिंदी पुढाऱ्यांची मतें काय आहेत हें प्रथम पाहिलें पाहिजे. ह्या सरळ आणि योग्य मार्गाचें अवलंबन न करितां वरील मूलभूत प्रश्नांबद्दल मि. कर्टिस यांनीं एकदम आपलीं मतें व्यक्त करण्याचें धार्ष्ट्य केलें आहे. महत्त्वाच्या प्रश्नांबद्दल निर्णय करण्याची ही पद्धति किती सदोष आहे, हें सांगण्याची आवश्यकता नाहीं. डिसेंबरच्या अखेर लखनौला राष्ट्रीय सभा भरणार आहे, हें मि. कर्टिस यांना ठाऊक होतें; आणि आपण राष्ट्रीय सभेला मेस्टन साहेबांबरोबर जाणार आहांत, असें त्यांनीच आपलें पत्रांत लिहिलें आहे. तथापि, त्यांनीं राष्ट्रीय सभेच्या बैठकीची किंवा राष्ट्रीयसभेला येणाऱ्या पुढाऱ्यांच्या मुलाखतीची वाट न पाहतां त्यांनीं आपले हिंदुस्थानविषयींचे सिद्धांत ठाम ठोकून दिले आहेत! राष्ट्रीयसभेला हजर राहून त्यांनीं त्या सभेचें काम लक्षपूर्वक पाहिलें असें म्हणावें तर तसेंही नाहीं. ते राष्ट्रीयसभेला फक्त थोडा वेळ मेस्टन साहेबांबरोबर आले होते, परंतु राष्ट्रीयसभेचें महत्त्व, तिचें लोकांवर असलेलें वजन, इत्यादि गोष्टी समजून घेण्याचा त्यांनीं प्रयत्न केला, असें दिसत नाहीं. त्यांनीं कांहीं हिंदी

पुढाऱ्यांच्या मुलाखती घेतल्या हें खरें. परंतु त्यांतही त्यांचे विचार जाणण्याचा प्रयत्न करण्यापेक्षां आपलींच मतें त्यांच्यावर ठसविण्याचा त्यांनीं अधिक प्रयत्न केला. हिंदुस्थानच्या प्रश्नांचा अभ्यास करण्याची ही त्यांची पद्धति हिवाळ्यांत हवा खाण्याकरितां येऊन तितक्या अवधीत हिंदुस्थानच्या बिकट प्रश्नांबद्दल ठाम मत देणाऱ्या युरोपियन प्रवाशांच्या पद्धतीहून भिन्न आहे, असें कोणीही समजणार नाहीं.

हिंदी लोकमताविरुद्ध मि. कर्टिस यांचा असा आक्षेप आहे कीं, त्या मताचें वजन बहुजनसमाजावर पडणार नाहीं, आणि म्हणून त्यांचें असें म्हणणें आहे कीं, हिंदुस्थानचा राज्यकारभार चालविण्याची जबाबदारी हिंदी लोकांच्या शिरावर ठेविली, तर बहुजनसमाज हिंदी राजकर्त्यांना जुमानणार नाहीं, आणि त्यामुळें हिंदुस्थानांत घोंटाळा माजेल. ज्यांना राजकीय बाबीबद्दल मत देण्याचें सामर्थ्य आलें आहे, त्यांची संख्या थोडी आहे, इतक्यामुळेंच त्यांचे राजकीय निर्णय किंवा त्यांचा अधिकार बहुजनसमाजाला मान्य होणार नाहीं, असें मि. कर्टिस यांचें म्हणणें नाहीं. जर हिंदी लोकांचें मत असावें तितकें निःस्वार्थी आणि बरोबर असेल तर तें जरी थोड्या लोकांचें असलें तरी तें बहुजनसमाजाला ग्राह्य होऊन त्या मताप्रमाणें वागण्यास तो तयार होईल, हें ते कबूल करितात. परंतु त्यांचें म्हणणें इतकेंच आहे कीं, ज्या अर्थी तें मत निःस्वार्थी आणि बरोबर नाहीं, त्या अर्थी तें बहुजनसमाजाला ग्राह्य होणार नाहीं. ह्या विचारसरणीचें सूक्ष्म रीतीनें परीक्षण केल्यास आपणास असें दिसून येईल कीं, मि. कर्टिस यांच्या मतें, हिंदी लोकांच्या हातांत राज्यकारभाराचीं सूत्रें देण्याला प्रत्यवाय आहे तो इतकाच कीं, हिंदी लोकमत निःस्वार्थी आणि बरोबर नाहीं. तें मत निःस्वार्थी आणि बरोबर झालें, म्हणजे त्यांच्या हातांत राज्यकारभाराचीं सूत्रें देण्याला हरकत नाहीं, असें अर्थातच त्यांच्या विचारसरणीवरून अनुमान निघतें. तेव्हां प्रश्न उपस्थित होतो तो हाच कीं, हिंदी लोकमत निःस्वार्थी आणि बरोबर आहे किंवा नाहीं. हिंदी लोकमत बरोबर व निःस्वार्थी नाहीं हें सिद्ध करण्याचा मि. कर्टिस यांनीं आपलें पत्रांत बिलकूल प्रयत्न केला नाहीं. त्यांना हिंदुस्थानांत येऊन एक महिना झाला नाहीं तोंच त्यांनीं हिंदी लोकमत बरोबर व निःस्वार्थी नाहीं असें एकदम म्हणणें फार सोपें आहे; एखाद्या गोष्टीला शिव्या देऊन हाणून पाडण्यासारखाच हा प्रकार आहे. ज्या विधानाच्या सत्यतेबद्दल मि. कर्टिस यांनीं आधार दिला नाहीं तें खोडून टाकण्याची अवश्यकता आहे असें नाहीं.

तथापि मि. कर्टिस आणि त्यांच्या विचारांचे जे कोणी दुसरे अधिकारी किंवा बिनअधिकारी लोक असतील त्यांना आम्हीं स्पष्ट विचारतों कीं, हिंदी लोकमत खरोखर चुकीचें आणि स्वार्थी आहे काय ? हिंदी लोकमताचें पूर्ण निदर्शक म्हणजे राष्ट्रीय सभा आणि मॉस्लेमलीग, ह्या दोन संस्था होत. ह्या दोन संस्थांचे ठराव चुकीचे आहेत काय ? ते स्वार्थी आहेत काय ? गेल्या राष्ट्रीय सभेनें एकंदर सव्वीस ठराव पास केले. त्यांपैकीं, औपचारिक आणि किरकोळ ठराव वजा जातां महत्त्वाचे ठराव सुमारें पंधरा आहेत. ते ठराव चुकीचे आहेत काय ? त्यावरून सुशिक्षित हिंदी लोकांचा स्वार्थ दिसून येतो काय ? हत्यारांचा कायदा रद्द करावा, हिंदी लोकांना सैन्यांत मोठमोठ्या जागा देण्यांत याव्या, त्यांना स्वयंसैनिक होऊं द्यावें, ह्या मागण्या चुकीच्या आहेत काय ? त्यावरून सुशिक्षित हिंदी लोकांचा स्वार्थ दिसून येतो काय ? मुदतबंदी मजुरीची पद्धत बंद करण्यांत यावी, ही सुशिक्षित हिंदी लोकांची मागणी आपमतलबी आहे काय ? ब्रिटिश वसाहतींत हिंदी लोकांना जो अन्याय सोसावा लागतो तो दूर करण्यांत यावा, ही त्यांची मागणी चुकीची आहे काय ? ती स्वार्थी आहे काय ? प्राथमिक शिक्षण सक्तीचें करण्यांत यावें ही मागणी सुशिक्षित लोकांचा स्वार्थ सिद्ध करणारी आहे काय ? वरिष्ठ प्रतीच्या जागा हिंदी लोकांना अधिकाधिक प्रमाणांत देण्यांत याव्या आणि हिंदुस्थानांत समकालीन परीक्षा घेण्यांत यावी ही हिंदी लोकांची मागणी चुकीची आहे काय ? यावर कदाचित मि. कर्टिस असें म्हणतील कीं, माझा जो आक्षेप आहे तो ह्या मागण्यांबद्दल नसून राष्ट्रीय सभेनें आणि मॉस्लेम लीगनें जी सुधारणांची योजना तयार केली आहे तिजवि-षयीं आहे. परंतु ही योजना चुकीची व स्वार्थी कशी हें ते सांगूं शकतील काय ? अल्पसंख्याक वर्गांना योग्य प्रतिनिधित्व मिळावें म्हणून त्या योजनेंत केलेली व्यवस्था चुकीची व आपमतलबी आहे काय ? लष्करी आणि परराष्ट्रीय बाबांबद्दल पूर्ण अधिकार हिंदुस्थान सरकारला असावा आणि त्या अधिकारांत कायदे कौन्सिलानें ढवळाढवळ करूं नये ही योजना चुकीची आहे काय ? आणि तिजरून सुशिक्षित हिंदी लोकांचा स्वार्थ दिसून येतो काय ? राष्ट्रीय सभेनें आणि मॉस्लेम लीगनें तयार केलेल्या योजनेंत कांहीं दोष असतील; तर्कशास्त्राच्या कसोटीला लावल्यास ती अगदीं पूर्ण व सर्वांगसुंदर दिसणार नाहीं. परंतु हा दोष केवळ तिचाच नसून सुधारलेल्या सर्व राष्ट्रांच्या राज्यपद्धतींत

कमी अधिक प्रमाणानें दिसून येणारा आहे. खुद्द ब्रिटिश लोकांची शासनपद्धति निर्दोष आणि सर्वांगसुंदर आहे असें मि. कर्टिस म्हणतील काय ?

हिंदी लोकमत स्वार्थी आहे असा आक्षेप मि. कर्टिस यांनीं घेऊन त्या मताची नालस्ती करावी ही अत्यंत दुःखाची गोष्ट आहे. सुशिक्षित हिंदी लोक आपल्या अशिक्षित, गरीब देशबांधवांच्या हिताची पर्वा करीत नाहीत हा जो आपमतलबी व धूर्त अँग्लो–इंडियन आक्षेप घेतात त्याचाच हा अनुवाद आहे; आणि त्यावरून मि. कर्टिस यांना अँग्लो–इंडियन अधिकाऱ्यांनी आपल्या जाळ्यांत पकडलें आहे असें स्पष्ट दिसतें. नाहीतर त्यांना हिंदुस्थानांत येऊन चार आठ दिवस लोटले नाहींत तोंच त्यांनी हिंदी लोकमताची नालस्ती करून तें स्वार्थी आहे असें म्हणण्याचें धाष्टर्य करावें, हें आश्चर्य नव्हे काय ? आपल्या हातांतील सत्ता रतीभर सुद्धां कमी होऊं नये म्हणून जे अट्टाहास करीत असतात त्यांनीं हिंदी लोकमत स्वार्थी आहे अशी उलटीच बोंब मारावी, हें निलाजरेपणाचें लक्षण नव्हे काय ! मि. कर्टिस हे अँग्लो–इंडियन अधिकाऱ्यांच्या ओंजळीनें पाणी न पितां शांतपणानें आणि निःपक्षपातबुद्धीनें विचार करितील, तर त्यांची खात्री झाल्याशिवाय राहणार नाही की सुशिक्षित हिंदी लोकमत स्वार्थी तर नाहींच, परंतु उलट अँग्लो–इंडियनमतापेक्षां अधिक उदार, अधिक निरपेक्ष आणि अधिक रास्त आहे. मि. कर्टिस यांनीं हिंदी लोकमत चुकीचें आणि स्वार्थी आहे, हे सप्रमाण सिद्ध करून द्यावें, नाही तर हिंदी लोकमताची नालस्ती केल्याबद्दल त्यानीं हिंदी लोकांची माफी मागावी हा अर्थातच सभ्यपणाचा आणि सरळ मार्ग आहे. आणि ते त्या मार्गाचें अवलंबन करतील, अशी आम्हांस आशा आहे.

मि. कर्टिस यांनी आपलें पत्रांत हिंदी लोकमताबद्दल केलेलीं विधानें किती चुकीची आहेत, हें आम्हीं आतांपर्यंत दाखविलें. परंतु एका दृष्टीनें ह्याही पेक्षां अधिक आक्षेपार्ह मजकूर त्यांचे पत्रांत आहे, आणि तो हा होय. हिंदुस्थानच्या मूलभूत प्रश्नांबद्दल त्यांनीं आपलीं ठाम मतें व्यक्त केलीं आहेत, हें आम्हीं वर दाखविलेंच आहे. हिंदुस्थानच्या अंतस्थ व परराष्ट्रीय कारभारांत वसाहतींना ब्रिटिश लोकांबरोबर समान भाग दिला पाहिजे, परंतु हिंदुस्थानाला स्वराज्याचे हक्क देतां कामा नये, हें त्यांचें मत निश्चित झालें आहे. ह्या मुद्यासंबंधानें हिंदी लोकमत काय आहे, हें समजून घेऊन आपल्या मताचा आणखी विचार करावा, आणि हिंदी लोकमतानुरोधें त्यांत दुरुस्ती करावी, अशी त्यांची बिलकूल इच्छा दिसत

नाहीं. असें असतां हिंदी मत जाणण्याचा त्यांनीं आपलें पत्रांत मोठा आव आणला आहे. ह्यासंबंधानें त्यांच्या पत्रांतलि मजकूर जो कोणी लक्ष्यपूर्वक वाचील, त्याची अशी खात्री होईल कीं, हिंदी लोकमत समजून घेण्याची त्यांनीं व्यक्त केलेली इच्छा खरीखुरी नसून तिचा उद्देश फक्त एवढाच दिसतो कीं, मि. कर्टिस हे आपला विचार घेत आहेत, अशी हिंदी पुढाऱ्यांची समजूत व्हावी. अगोदर आपलीं मतें कायम करावयाचीं; त्यांत दुरुस्ती करण्याची मनांत बिलकूल इच्छा धरावयाची नाहीं; आणि बाह्यात्कारीं मात्र हिंदी लोकमत काय आहे, हें जाणण्याचा आम्ही प्रयत्न करीत आहोंत, असें हिंदी लोकांना भासवावयाचें— ही पद्धति सरळ आणि सभ्यपणाची आहे, असें कोण म्हणेल ? आम्हांला तरी ही पद्धति कारस्थानाची आणि फसवेगिरीची नाहीं, असें वाटणें अशक्य आहे. मि. कर्टिस यांच्या पत्रांतील हा भाग आम्हांला अत्यंत आक्षेपार्ह वाटतो. यापेक्षां हिंदी लोकमत समजून घेण्याचा बहाणा ते न करते तर फार बरें झालें असतें. वसाहतवाल्यांविरुद्ध द्वेष उत्पन्न करण्याची मोहीम हिंदुस्थानांत सुरू करण्यांत आली आहे, हेंही त्यांचें विधान खोटें व खोडसाळपणाचें आहे व असलें धडधडित खोटें विधान करण्यांत त्यांचा हेतु काय असावा, हेंही समजणें अशक्य आहे असें नाहीं. वसाहतवाल्यांना ब्रिटिश साम्राज्याच्या परराष्ट्रीय कारभारांत आणि हिंदुस्थानच्या राजकारभारांत भाग देण्यांत यावा, असें त्यांचें मत आहे. हें मत सर्व वसाहतवाल्यांना पसंत आहे असें नाहीं. मि. कर्टिस यांनींच आपल्या **दी प्राब्लेम ऑफ दी कॉमनवेल्थ** ह्या पुस्तकांत असें सांगितलें आहे कीं, पुष्कळ वसाहतवाल्यांची ब्रिटिश साम्राज्याच्या परराष्ट्रीय कारभारांत आपणाला भाग मिळावा अशी इच्छा आहे; परंतु हिंदुस्थानचा राज्यकारभार आपले शिरावर घेण्यास ते तयार* नाहीत. त्यांचें असें म्हणणें आहे

---

*By considerable numbers of thinking men in the Dominions it is urged that these vast communities ( in India and Egypt ) should be given their independence or at any rate self-Government on the same line as themselves. The very idea of one people governing another is contrary to their traditions. But if India, Egypt, and the African Protectorates must be governed from outside, the responsibility, they would say, must be left, where it now rests, with the people of the British isles. There are many who would welcome the prospect of joining

कीं, हिंदुस्थानला वसाहतीप्रमाणें स्वराज्य देण्यांत यावें किंवा हें शक्य नसल्यास त्याच्या राज्यकारभाराची जबाबदारी हल्लीं ज्यांच्यावर आहे त्यांच्यावरच म्हणजे ब्रिटिश लोकांवरच असूं द्यावी. मि. कर्टिस यांच्या मताबद्दल वसाहतींत अद्याप असावी तितकी अनुकूलता नसल्यामुळें ती येनकेन प्रकारेण उत्पन्न करणें हें अर्थात्‌च मि. कर्टिस यांचें धोरण असलें पाहिजे. आणि हिंदी लोकमत समजून घेण्याबद्दल वर जें आम्ही लिहिलें आहे, त्यावरून आपला हेतु सिद्धीस नेण्याकरितां केवळ सरळच उपाय योजावे, ह्या मताचे मि. कर्टिस आहेत असें दिसत नाहीं. उपाय कोणते कां असेनात, हेतु सिद्धीस गेला म्हणजे झालें, ( The end justifies the means ) ही पद्धति त्यांना पसंत आहे असें दिसतें. तेव्हां हिंदुस्थानचा राज्यकारभार वसाहतवाल्यांनीं आपले शिरावर घेतला पाहिजे, ह्या त्यांच्या मताबद्दल जी प्रतिकूलता वसाहतींत दिसून येते, ती नाहींशी करण्याच्या हेतूनें वसाहतवाल्यांच्याविरुद्ध द्वेष उत्पन्न करण्याची मोहीम हिंदुस्थानांत सुरू करण्यांत आली आहे, असें त्यांनीं खोटेंच विधान केलें असलें असलें पाहिजे अशी कोणास शंका आली तर ती साहजिक नव्हे काय ? हिंदी लोक वसाहतवाल्यांचा द्वेष करतात किंवा वसाहतवाले हिंदी लोकांचा द्वेष करतात, हें आतां कोणास सांगितलें पाहिजे असें नाहीं. कोणी कोणाचा द्वेष करूं नये, असा उपदेश मि. कर्टिस यांना करावयाचा असेल तर त्या उपदेशाला योग्य स्थान वसाहतीच होत. हिंदुस्थानांत असा उपदेश करण्याचें मुळींच्च कारण नाहीं, असें आम्ही मि. कर्टिस यांना निक्षून सांगतों.

येथपर्यंत मि० कर्टिस यांच्या पत्राचें परीक्षण झालें. आतां त्यांच्या मुख्य सिद्धांताचें परीक्षण करूं. **राऊंड टेबल** संघाच्या विद्यमानें मि० कर्टिस यांनीं ( १ ) दी प्राब्लेम ऑफ दी कॉमनवेल्थ आणि ( २ ) दी कॉमनवेल्थ ऑफ नेशन्स भाग १, हीं दोन पुस्तकें प्रसिद्ध केलीं आहेत. ह्याशिवाय आणखी दोन

---

with the people of India in the control of foreign affairs and bearing their full share of the cost, who would yet be shocked at the idea of themselves becoming involved in the task of controlling India. The position created by this attitude in the Dominions is seriously complicated by the vigorous protest which any such proposal is certain to evoke from India and perhaps from Egypt—the Problem of the Commonwealth Pages 201-202.

ग्रंथ प्रसिद्ध करण्याचें ठरलें असून त्यांत हिंदुस्थानच्या प्रश्नाचा सविस्तर रीतीनें विचार करण्यांत येणार आहे. पहिल्या म्हणजे **दी प्राब्लेम ऑफ दी कॉमनवेल्थ** ह्या पुस्तकाचे दोन भाग असून पहिल्या भागांत साम्राज्याचा प्रश्न काय आहे, हें सांगितलें आहे व दुसऱ्या भागांत तो प्रश्न समाधानकारक रीतीनें सोडविण्याकरितां काय केलें पाहिजे याचा विचार करण्यांत आला आहे.

मि० कर्टिस यांनीं मुख्य सिद्धांत प्रतिपादिले आहेत ते येणेंप्रमाणेः—( १ स्वयंसत्ताक वसाहतींना ब्रिटिश साम्राज्याच्या परराष्ट्रीय कारभारांत ग्रेट ब्रिटनबरोबर भाग दिला पाहिजे. ( २ ) परकीय कारभारांत त्यांना भाग पाहिजे असेल, तर त्यांनीं हिंदुस्थानचा परराष्ट्रीय आणि अंतस्थ कारभार आपले हातांत घेण्याला तयार झालें पाहिजे. ( ३ ) हिंदुस्थानचा अंतस्थ कारभार सुद्धां चालविण्यास हिंदी लोक पात्र झाले नाहींत; तेव्हां अर्थातच साम्राज्याच्या परराष्ट्रीय कारभारांत वसाहतवाल्यांप्रमाणें त्यांना भाग देतां येत नाहीं. हिंदुस्थानासंबंधानें त्यांचा असा सिद्धांत आहे कीं, त्यांचा अंतस्थ आणि परराष्ट्रीय राज्यकारभार हे इतके संलग्न आहेत कीं, वसाहतवाल्यांना त्यांच्या परराष्ट्रिय कारभारांतच नव्हे, तर अंतस्थ कारभारांत सुद्धां ब्रिटिश लोकांबरोबर भाग दिला पाहिजे. कोणत्याही स्वयंसत्ताक वसाहतीला दुसऱ्या स्वयंसत्ताक वसाहतीच्या किंवा ग्रेटब्रिटन आणि आयर्लंद यांच्या अंतस्थ कारभारांत हात घालण्याला मुभा असावी, असें मि० कर्टिस यांचें म्हणणें नाहीं. परंतु हिंदुस्थान, इजिप्त इत्यादि जे स्वयंसत्ताक नाहति असे ब्रिटिश साम्राज्याचे भाग आहेत, त्यांच्या केवळ परराष्टीय कारभारांतच नव्हे, तर अंतस्थ कारभारांतसुद्धां स्वयंसत्ताक वसाहतींना भाग दिला पाहिजे, असें मि. कर्टिस यांचें म्हणणें आहे. म्हणजे अन्य शब्दांनीं सांगावयाचें असल्यास, हिंदुस्थानच्या राज्यकारभाराला—मग तो अंतस्थ असो वा परराष्ट्रीय असो—ते ब्रिटिश साम्राज्याच्या परराष्ट्रिय कारभाराचाच भाग समजतात. हिंदुस्थानचे परराष्ट्राशीं जे संबंध येतात त्यांच्या नियमनांतच वसाहतवाल्यांना भाग मिळावा, इतकीच त्यांची मागणी नसून हिंदुस्थानच्या अंतस्थ राज्यकारभाराचीं सूत्रें सुद्धां त्यांच्या हातांत असावीं, अशी मि. कर्टिस यांची मागणी आहे. हिंदुस्थानासंबंधानें केलेल्या मागणीचें हें व्यापक स्वरूप लक्षांत ठेवणें अवश्य आहे.

आपल्या पहिल्या सिद्धांताच्या समर्थनार्थ मि. कर्टिस यांनीं जी विचारसरणी स्वीकारिली आहे ती अशी आहे. इ० स० १८४० पासून ब्रिटिश वसाहतींना

स्वराज्य देण्याला ब्रिटिश सरकारनें आरंभ केला. प्रथमतः कानडाला स्वराज्य मिळालें. कानडाची स्थिति त्यापूर्वीं चांगली नसून ब्रिटिश सरकारचा प्रतिनिधि गव्हर्नर, आणि लोकसभा यांच्यामध्यें वारंवार लढा उत्पन्न होत असे. तो नाहींसा करण्याकरितां कोणते उपाय योजले पाहिजेत, ह्याबद्दल चौकशी करून रिपोर्ट करण्याकरितां ब्रिटिश सरकारनें लॉर्ड डर्‌ह्यॅम यांस कमिशनर नेमलें. त्यांनीं कानडाला स्वराज्य दिल्याशिवाय तेथील असंतोष नाहींसा होणार नाहीं अशी सूचना केली. वसाहतींना स्वराज्य द्यावें असा लॉर्ड डर्‌ह्यॅम यांनीं अभिप्राय दिला खरा; परंतु त्यांची स्वराज्याची कल्पना आकुंचित होती. वसाहतींतील राज्यपद्धतीची घटना, ग्रेटब्रिटन, इतर वसाहती आणि परकीय राष्ट्रें यांच्याशीं व्यापारी संबंध, सार्वजनिक जमिनींची व्यवस्था आणि परराष्ट्रीय संबंधाचें नियमन इतक्या बाबी इंग्लंडनें आपल्या हातांत ठेवाव्या व बाकीच्या सर्व बाबींत वसाहतींना पूर्ण स्वातंत्र्य द्यावें, अशी लॉर्ड डर्‌ह्यॅम यांची सूचना होती. ह्या बाबींखेरीज सर्व बाबींत वसाहतींना पूर्ण अधिकार मिळाला, म्हणजे त्यांना स्वराज्य मिळालें अशी त्यांची कल्पना होती. परंतु ही कल्पना चुकीची आहे असें लवकरच दिसून आलें. सार्वजनिक जमिनींची विल्हेवाट लावण्याचा अधिकार वसाहतींना लवकरच देण्यांत आला. इ० स० १८६० च्या सुमारास ग्रेटब्रिटन, परकीय राष्ट्रें आणि इतर वसाहती यांच्याशीं वाटेल ते व्यापारी तहनामे करण्याचा अधिकार वसाहतींना मिळाला. तेव्हांपासून परराष्ट्रांच्या, इतर वसाहतींच्या आणि खुद्द ग्रेटब्रिटनच्या मालावर जकात किती व कशी बसवावी हें ठरविण्याचा अधिकार प्रत्येक स्वयंसत्ताक वसाहत आपापल्या इच्छेप्रमाणें बजावीत आहे. कालांतरानें वसाहतींत कोणाला येऊं द्यावयाचें व कोणाला द्यावयाचें नाहीं, हेंही ठरविण्याचा अधिकार वसाहती मागूं लागल्या, आणि तो देण्यांतही आला. सारांश, परराष्ट्रीय संबंधाच्या नियमनाखेरीज सर्व बाबींत वसाहतींना पूर्ण स्वातंत्र्य मिळालें. इ० स० १८८५ सालीं ग्रेटब्रिटन आणि रशिया यांच्यामध्यें युद्ध होण्याचा संभव दिसला. ऑस्ट्रेलिया आणि न्यूझीलंड ह्या वसाहतींना, पॅसिफिक महासागरांतील रशियाचीं जहाजें आपले बंदरांवर तोफांचा भडिमार करून त्यांचा नाश करतील अशी भीति वाटली. तेव्हां आपल्या बचावाकरितां आरमाराची व तटबंदीची काय व्यवस्था करण्याचा साम्राज्यसरकारचा विचार आहे, अशी त्यांनीं त्या सरकारला पृच्छा केली. ही व्यवस्था करण्याकरितां ऑस्ट्रेलिया आणि न्यूझीलंड

द्रव्याची किती मदत करण्यास तयार आहेत, असें उलटपक्षीं ब्रिटिश सरकारनें त्यांना विचारलें. त्याचा परिणाम असा झाला कीं, आस्ट्रेलिया, न्यूझीलंड आणि न्यू फाऊंडलंड ह्या वसाहती आपल्या बचावाची व्यवस्था करण्याकरितां ब्रिटिश सरकारास द्रव्याच्या देणग्या देऊं लागल्या. परंतु कालांतरानें ऑस्ट्रेलियाला ही पद्धति नापसंत होऊं लागली. आपल्या बचावाकरितां आपण ज्या देणग्या देतों त्यांची योग्य व्यवस्था होत आहे किंवा नाहीं हें पाहण्याची त्यास इच्छा झाली, आणि सरतेशेवटीं आपलें स्वतःचें आरमार तयार करण्याचा ऑस्ट्रेलियानें निर्धार केला. लवकरच कानडानेंही त्याचें अनुकरण केलें. सारांश, आज ऑस्ट्रेलिया आणि कानडा यांनीं स्वतंत्र आरमारें तयार केलेलीं आहेत, आणि १९१४ सालीं महायुद्ध सुरू झाल्यापासून तर वसाहतींनीं आपलीं सैन्यें उभारलीं असून यूरोपच्या समरभूमीवर त्या ब्रिटिश साम्राज्याच्या लढाया मारीत आहेत. स्वयंसत्ताक वसाहतींची अशी एकसारखी उत्क्रांति होत गेली आहे. त्यांना अंतस्थ स्वातंत्र्य पूर्ण मिळालें आहे. व्यापारी संबंध नाजूक व महत्त्वाचे असतात, तरी देखील त्यांचें नियमन करण्याचा त्यांना पूर्ण अधिकार प्राप्त झाला आहे; तो इतका कीं, खुद्द ग्रेट ब्रिटनच्या मालावर वाटेल ती जकात त्या बसवूं शकतील. आपल्या देशांत कोणाला वसाहत करूं द्यावयाची व कोणाला नाहीं, हाही त्यांनीं मागितलेला हक्क ब्रिटिश सरकारनें साम्राज्यांतील इतर लोकांच्या तक्रारींना व असंतोषाला न जुमानतां मान्य केला आहे. त्यांनीं स्वतंत्र आरमारें तयार करून आपल्या बचावाची थोडीबहुत व्यवस्था केली आहे, आणि सध्यां तर वसाहतींतील हजारों लोक साम्राज्याकरितां आपल्या प्राणांची आहुति देत आहेत. येथपर्यंत मजल आल्यावर साम्राज्याच्या परराष्ट्रीय संबंधाच्या नियमनांत त्यांना भाग कां देऊं नये असें मि. कर्टिस यांचें म्हणणें आहे. त्यांना जर हा भाग देण्यांत आला नाहीं तर साम्राज्याचें एकीकरण न होतां कालांतरानें त्याचे तुकडे तुकडे होतील; आणि वसाहती ब्रिटिश लोकांचा संबंध तोडून टाकून स्वतंत्र होतील अशी मि. कर्टिस यांची पक्की समजूत आहे.

साम्राज्याच्या परराष्ट्रीय संबंधाच्या नियमनांत स्वयंशासित वसाहतींना भाग दिला पाहिजे, हें सिद्ध केल्यावर ही व्यवस्था अमलांत आणण्याकरितां काय केलें पाहिजे, याबद्दल मि. कर्टिस यांचे विचार येणेंप्रमाणें आहेत. ब्रिटिश

प्रधानमंडळांत वसाहतींतर्फे सभासद असावे, आणि त्यांची निवड वसाहतींतील पार्लमेंटांनीं किंवा प्रधानमंडळांनीं करावी, हा एक उपाय आहे. ह्याशिवाय दुसरा उपाय म्हटला म्हणजे वसाहतींनीं ब्रिटिश पार्लमेंटांत आपल्यातर्फे सभासद निवडून द्यावे. परंतु ह्या दोन्ही योजना अव्यवहार्य आहेत असें मि. कर्टिस यांचें म्हणणें आहे. सबब त्यांची योजना अशी आहे कीं, ग्रेट ब्रिटनच्या ज्या अंतस्थ बाबी आहेत त्या साम्राज्यविषयक बाबींपासून अलग कराव्या. आणि ज्याप्रमाणें प्रत्येक वसाहतीचा अंतस्थ कारभार चालविण्याकरितां प्रत्येकींत पार्लमेंट आणि प्रधानमंडळ आहे, त्याप्रमाणें ग्रेटब्रिटनचा अंतस्थ कारभार चालविण्याकरितां स्वतंत्र पार्लमेंट आणि प्रधानमंडळ हीं असावीं, आणि युद्ध करणें, तह करणें वगैरे ज्या सबंध साम्राज्याच्या बाबी आहेत, त्यांचें नियमन करण्याकरितां साम्राज्याचें पार्लमेंट आणि प्रधानमंडळ हीं असावींत. म्हणजे प्रत्येक वसाहतींत, आयर्लंडांत आणि ग्रेट ब्रिटनांत अंतस्थ कारभार चालविण्याकरितां स्वतंत्र पार्लमेंट आणि प्रधानमंडळ, आणि सर्व साम्राज्याचें पार्लमेंट आणि प्रधानमंडळ—अशी व्यवस्था होईल. सारांश, साम्राज्यविषयक प्रश्नांचा निर्णय करण्याकरितां अगदीं स्वतंत्रच पार्लमेंट आणि प्रधानमंडळ असावें अशी मि. कर्टिस यांची सूचना आहे. आरमारखातें, युद्धखातें, परराष्ट्रीयखातें, इंडिया ऑफिस आणि ज्या स्वयंशासित वसाहती नाहींत त्यासंबंधाचें खातें, या सर्वांचा निकट संबंध असल्यामुळें आणि त्यांच्यामध्यें पूर्ण सहकारिता असल्याशिवाय साम्राज्यविषयक प्रश्नांचा योग्य निर्णय करणें अशक्य असल्यामुळें, साम्राज्यप्रधानमंडळांत, मुख्य प्रधानाशिवाय, परराष्ट्रीय मंत्री, युद्धमंत्री, आरमारमंत्री, जमाबंदीखात्याचे मंत्री, हिंदुस्थानचे स्टेटसेक्रेटरी, स्वयंशासित नसलेल्या वसाहतींचे म्हणजे ज्यांना क्रौन वसाहती म्हणतात त्यांचे सेक्रेटरी—इतके मंत्री असले पाहिजेत साम्राज्याच्या प्रश्नांत अर्थातच साम्राज्याच्या बचावाच्या प्रश्नाचा अंतर्भाव होतो. आणि बचावाचा प्रश्न म्हटला म्हणजे त्याकरितां लागणाऱ्या खर्चाचा प्रश्न हा आलाच. हा खर्च सर्व वसाहतींनीं आपणांमध्यें वांटून घ्यावा. ही वांटणी कशी करावी हें तज्ज्ञांनीं ठरवावें. प्रत्येक वसाहतीच्या वांटणीला किती रक्कम येते हें तज्ज्ञांच्या साह्यानें साम्राज्य पार्लमेंटानें ठरविल्यावर ती वसूल करण्याकरितां करांची योजना कशी असावी हें ठरविण्याचा अधिकार साम्राज्याच्या पार्लमेंटाला न देतां तो प्रत्येक वसाहतींच्या पार्लमेंटाच्याच हातांत असावा. म्हणजे. प्रत्येक वसाहतीनें साम्राज्याच्या बचा-

त्याकरितां जी रक्कम द्यावयाची तिचें प्रमाण साम्राज्याच्या पार्लमेंटानें ठरवावें, परंतु ती रक्कम वसूल करण्याकरितां करांची जी योजना करावयाची ती प्रत्येक वसाहतीनें आपल्या मर्जीप्रमाणें ठरवावी. अशा रीतीनें वसाहतींचें हल्लींचें आर्थिक स्वातंत्र्य ( Fiscal autonomy ) कायम राहील. आतां एखाद्या वसाहतीनें आपल्या वांटणीस आलेली रक्कम जर दिली नाहीं, तर ती वसूल करण्याकरितां काय करावें हा प्रश्न राहिला. त्याबद्दल मि. कर्टिस यांचें असें म्हणणें आहे कीं, अशा प्रसंगीं ती रक्कम वसाहतींतील प्रजेकडून परभारें वसूल करण्याचा अधिकार साम्राज्याच्या प्रधानमंडळास असावा. साम्राज्याच्या प्रधानमंडळांत किती मंत्री असावेत हें वर सांगितलेंच आहे. त्यांत प्रत्येक वसाहतीतर्फे निदान एक तरी मंत्री असावा असें मि. कर्टिस यांचें म्हणणें आहे.

सबंध साम्राज्याच्या हिताच्या ज्या गोष्टी आहेत त्यांचे नियमनांत वसाहत-वाल्यांना भाग दिला पाहिजे, ह्या आपल्या मताच्या समर्थनार्थ मि. कर्टिस यांनीं स्वीकारलेली विचारसरणी वर लिहिल्याप्रमाणें आहे. आणि ही व्यवस्था अमलांत आणण्याकरितां सध्यांच्या राज्यपद्धतीच्या घटनेंत त्यांच्या मतें कोणते फेरबदल करण्यांत आले पाहिजेत, याचेंही दिग्दर्शन आम्हीं वर केलें आहे. त्यांचा दुसरा सिद्धांत असा आहे कीं, साम्राज्यविषयक कारभारांत वसाहतवाल्यांना जर भाग पाहिजे असेल तर त्यांनीं हिंदुस्थानच्या केवळ परराष्ट्रीय नव्हे तर अंतस्थ राज्यकारभाराच्या जबाबदारींतही भाग घेण्यास तयार झालें पाहिजे. हिंदुस्थान स्वराज्यालाच अद्याप पात्र झाला नाहीं, तेव्हां अर्थातच साम्राज्याच्या राज्यकारभारांत त्याला भाग देतां येत नाहीं, असा मि. कर्टिस यांचा तिसरा सिद्धांत आहे. परंतु ह्याबद्दल ते असें म्हणतात कीं, हिंदुस्थानाला साम्राज्यसरकारनें स्वराज्याला पात्र करून त्यास स्वराज्य मिळाल्यानंतर त्यालाही वसाहतीप्रमाणें साम्राज्याच्या कारभारांत भाग दिला पाहिजे. मि. कर्टिस म्हणतात कीं, स्वराज्याच्या तत्त्वावर माझा पूर्ण विश्वास आहे, आणि ह्या तत्त्वाचा दिवसेंदिवस अधिकाधिक प्रसार होऊन जगांतील सर्व राष्ट्रांत त्याचाच विजय होईल. ब्रिटिश साम्राज्याची इमारत ह्याच तत्त्वावर उभारली आहे. आणि ह्याच तत्त्वाकरितां ब्रिटिश लोक आजपावेतों झगडत आले आहेत आणि चालू महायुद्धांत झगडत आहेत. साम्राज्याच्या कक्षेंत इजिप्त, हिंदुस्थान वगैरे जे देश आले आहेत त्यांत केवळ शांतता राखली म्हणजे साम्राज्याचें काम संपलें असें नाहीं. त्या देशांतील

लोकांना साम्राज्यसरकारनें आस्ते आस्ते स्वराज्याला पात्र केलें पाहिजे आणि त्यांच्यांत स्वराज्याची पात्रता आल्यावर त्यांना स्वराज्य दिलें पाहिजे. इतक्यानेंही साम्राज्याचें ध्येय सफल झालें असें नाहीं. साम्राज्यकारभारांतही भाग त्यांना दिला पाहिजे.

(The Commonwealth cannot, like despotisms, rest content with establishing order within and between the communities it includes. It must by its nature prepare those communities first to maintain order within themselves......The peoples of India and Egypt, no less than those of the British isles and the Dominions, must be gradually schooled to the management of their national affairs. But even when this has been done, the goal of the Commonwealth has not been reached, until the mutual relations of all the self-governing nations it includes are controlled by the will of their peoples acting in common. It is not enough that free communities should submit their relations to the rule of law. Until all those peoples control that law the principle by which the Commonwealth exists is unfulfilled. The task of preparing for freedom the nations which cannot as yet govern themselves is the supreme duty of those who can. It is the spiritual end for which the Commonwealth exists, and material order is nothing except as a means to it.)

परंतु इजिप्त, हिंदुस्थान वगैरे देशांतील लोकांत स्वराज्याची पात्रता येईपर्यंत त्यांच्या कारभाराची सर्व जबाबदारी जे स्वराज्य भोगीत आहेत व म्हणून जे साम्राज्याचा कारभार चालविण्यास समर्थ झाले आहेत, अशा साम्राज्यांतील सर्व भागांनीं म्हणजे केवळ ग्रेटब्रिटनचेंच नव्हे तर वसाहतींनींही आपले शिरावर घेतली पाहिजे. इजिप्त, हिंदुस्थान वगैरे स्वराज्याला अद्याप पात्र न झालेले जे देश साम्राज्यांत आहेत त्यांना स्वराज्याला पात्र करणें हा साम्राज्याचा अध्यात्मिक हेतु आहे आणि तो हेतु सिद्धीस नेण्याची जबाबदारी केवळ ग्रेटब्रिटनवर नसून वसाहतींवरही आहे.

येणेंप्रमाणें मि. कर्टिस यांची विचारसरणी आहे. ब्रिटिश साम्राज्याच्या कार्याविषयींचे त्यांचे विचार मननीय आहेत यांत शंका नाहीं. त्यांचें ध्येय उदात्त असून तें पूर्णपणें सिद्धीस गेलें तर ब्रिटिशसाम्राज्य हें न भूतो न भविष्यति अशा प्रकारचें एक साम्राज्य होईल यांत तिळमात्रही शंका नाहीं. जगाच्या पांचही खंडांत पसरलेल्या साम्राज्यांतील घटकावयवांनीं स्वराज्याचा उपभोग घ्यावा इतकेंच नव्हे तर सर्व साम्राज्याचा कारभार एकदिलानें व जुटीनें चालवावा हें ध्येय उदात्त नाहीं असें कोण म्हणेल ! ब्रिटिशसाम्राज्याची एकंदर लोकसंख्या त्रेचाळीस कोटी असून त्यांत हिंदू, मुसलमान, बुद्धानुयायी, पार्शी, ख्रिस्ती वगैरे सर्व धर्मांचे लोक आहेत. ह्या सर्व लोकांनीं आपापला राज्यकारभार चालवावा इतकेंच नव्हे तर त्यांनीं साम्राज्याचा कारभारही सर्व भेदभाव सोडून देऊन जुटीनें चालवावा ही गोष्ट अतिउदात्त असून त्यामुळें मानवी जातीचें एकीकरण आणि तिची प्रगति होण्याला अतिशय मदत होईल यांत शंका नाहीं. ब्रिटिशसाम्राज्यांतील सर्व घटकावयवांना स्वराज्य मिळालें म्हणजे स्वराज्याच्या तत्त्वाचा सर्व जगभर प्रसार होऊन त्याचा सर्वत्र विजय होण्यास कठीण जाणार नाहीं, हेंही खरें आहे. तसेंच साम्राज्याचीही जबाबदारी आपले शिरावर आहे, ह्या जाणीवेनें साम्राज्यांतील प्रत्येक भागाचें राष्ट्रीय जीवन अधिक व्यापक व उन्नत होईल यांतही तिळमात्र शंका नाहीं. जे लोक अंतस्थ स्वातंत्र्य उपभोगीत आहेत, परंतु पर-राष्ट्रीय संबंधाचें नियमन करण्याचा ज्यांना अधिकार नाहीं त्यांचें राष्ट्रीय जीवन तेवढ्यापुरतें तरी अपूर्णच रहाणार. युद्ध करणें, तह करणें वगैरे बाबी अत्यंत महत्त्वाच्या असून त्यांचें नियमन करण्याचा अधिकार असल्याशिवाय राष्ट्रीय जीवितास व्यापकता व पूर्णता येणें शक्य नाहीं. ब्रिटिश साम्राज्यांतच कानडा, ऑस्ट्रेलिया, दक्षिण आफ्रिका वगैरे अंतस्थ स्वातंत्र्य भोगणारे देश आहेत; परंतु नुसत्या अंतस्थ स्वातंत्र्यानें त्यांना ग्रेटब्रिटनप्रमाणें अद्यापपावेतों मोठेपणा मिळालेला नाहीं व मिळणार नाहीं. याचें कारण काय ? तर अंतस्थ बाबीपलीकडे जाण्याला त्यांच्या राष्ट्रीय जीवनाला वाव नाहीं. अंतस्थ स्वातंत्र्य कितीही पूर्ण व अबाधित असलें तरी तें एकप्रकारें आकुंचितच राहणार; परराष्ट्राशीं येणाऱ्या संबंधाचें पूर्ण नियमनापासून जो व्यापकपणा व जो उन्नतपणा येत असतो तो त्यामुळें येणार नाहीं. तसेंच जे लोक अंतस्थ स्वातंत्र्यच केवळ उपभोगीत आहेत, इतकेंच नव्हे तर परराष्ट्रीय बाबींचेंही नियमन करण्याचा अधिकार चालवितात त्यांची संस्कृति जितकी उदात्त आणि

सर्वांगसुंदर असते तितकी नुसतें अंतस्थ स्वातंत्र्य भोगणाऱ्या लोकांची असूं शकणार नाहीं. कांहीं महत्त्वाच्या बाबतींत त्यांना दुसऱ्यावरच अवलंबून रहावें लागतें आणि पराधीनता ती पराधीनताच; ती अपायकारक झाल्याशिवाय राहणार नाहीं. तेव्हां ब्रिटिशसाम्राज्यांतील सर्व देशांना केवळ अंतस्थच स्वातंत्र्य असावें, इतकेंच नव्हे तर युद्ध करणें, तह करणें वगैरे मूलभूत आणि महत्त्वाच्या बाबींचें नियमन करण्याचाही अधिकार असावा हें जें मि. कर्टिस यांचें ध्येय तें सिद्धीस गेल्यास केवळ ब्रिटिशसाम्राज्याचेंच नव्हे तर सबंध मानव जातीचें कल्याण होईल ह्याबद्दल आम्हांस मुळींच शंका वाटत नाहीं. व केवळ ध्येयाच्या दृष्टीनें विचार केल्यास मि. कर्टिस यांची योजना आम्हांस तरी मननीय वाटते. परंतु मि. कर्टिस यांच्या योजनेंत जे दोष आहेत, ते हिंदुस्थान आणि इजिप्त यांचेबद्दल होत. ह्या मुद्याचा सविस्तर विचार पुढील अंकांत करूं.

# मि. कर्टिस आणि ' राउंड टेबलसंघ. '

युद्धसमाप्तीनंतर ब्रिटिश साम्राज्याच्या घटनेंत कोणते फेरबदल करावे याविषयीं ' राऊंड टेबल ' त्रैमासिकाचे संपादक मि. कर्टिस यांचे विचार काय आहेत, हें आम्हीं फेब्रुवारीच्या अंकांत स्पष्ट करून सांगितलें आहे. केवळ ध्येयाच्या दृष्टीनें विचार केल्यास त्यांची योजना मननीय आहे, असा आम्हीं आपला अभिप्राय दिला आहे. परंतु ध्येयाच्या दृष्टीनें ती योजना कितीही उत्तम असली तरी तींत हिंदुस्थान आणि इजिप्त ह्यांना योग्य स्थान दिलेलें नसल्यामुळें ती अपूर्ण आणि दूषित झाली आहे, असें आम्ही म्हटलें आहे. हिंदुस्थान आणि इजिप्त ह्यासंबंधानें त्यांच्या योजनेंत जे दोष आहेत त्यांचा प्रस्तुत लेखांत विचार कर्तव्य आहे.

ज्यांना अद्याप स्वराज्य मिळालेलें नाहीं व म्हणून ज्यांच्या अंतस्थ कारभाराचीं सुद्धां सूत्रें ब्रिटिश लोकांच्या हातांत आहेत असे ब्रिटिश साम्राज्यांत जे भाग आहेत त्यांत हिंदुस्थान आणि इजिप्त हे प्रमुख होत. ब्रिटिश साम्राज्याची एकंदर लोकसंख्या ४३, ३५, ७४, ००१ आहे. त्यांपैकीं ४, ५३, ६५, ५९९ लोक ग्रेटब्रिटन आणि आयर्लंड येथील राहणारे असून स्वराज्य भोगणाऱ्या वसाहतींची लोकसंख्या १, ९२, ५१, २१०, आहे. ग्रेटब्रिटन, आयर्लंड आणि स्वयंशासित वसाहती यांची एकंदर लोकसंख्या ६, ४६, १६, ८०९ आहे. ही वजा जातां बाकी राहिलेल्या ३६, ८९, ५७, १९२ लोकसंख्येपैकीं हिंदुस्थानची लोकसंख्या ३१, २६, ३२, ५३७ आणि इजिप्तची लोकसंख्या १,१२,८७,३५९ आहे. हिंदुस्थान आणि इजिप्त यांची लोकसंख्या वजा जातां ४,५०,३७,२९६ इतकी लोकसंख्या रहाते; त्यापैकीं ३,१३,०६,८८१ आफ्रिकेंत आहे, व बाकीची लोकसंख्या वेस्ट इंडिज, सिलोन, मॅलेस्टेट इत्यादि भागांत पसरलेली आहे. सिलोनची लोकसंख्या ४१,०६,३५० आहे व वास्तविक पाहतां सिलोनचा हिंदुस्थानांतच अंतर्भाव केला पाहिजे. सिंहलद्वीप हा हिंदुस्थानचाच एक भाग असून तेथील लोकांची हरकत नसल्यास त्याचा पुनः हिंदुस्थानांत अंतर्भाव करण्याला हरकत नाहीं. हिंदुस्थान, इजिप्त आणि सिलोन हे भाग वजा जातां दक्षिण आफ्रिका इत्यादि इतर भाग आहेत. आणि त्यांची

लोकसंख्याही कोटीनें मोजतां येण्यासारखी आहे. तथापि ने भाग अद्याप फारच मागसलेले आहेत, ह्याबद्दल मतभेद नाहीं व म्हणून त्यांना स्वराज्य द्यावें असें कोणी म्हणत नाहीं. दक्षिण आफ्रिका वगैरे न सुधारलेल्या व मागासलेल्या प्रांतांतील रहिवाशांनीं स्वराज्याची चळवळ चालविली आहे असें अद्याप ऐकूं येत नाहीं; किंबहुना त्यांनीं स्वराज्याची चळवळ सुरू केल्यास त्यांची बिनसुधारलेली किंवा मागासलेली स्थिति संपली असेंच म्हणावें लागेल. ब्रिटिश साम्राज्याच्या ध्येयाबद्दल मि. कर्टिस यांनीं जे विचार व्यक्त केले आहेत ते जर बरोबर मानले तर ह्या रानवट आणि मागसलेल्या लोकांनाही शिक्षणद्वारा आणि अन्य रीतीनें सुसंस्कृत करून त्यांनाही शक्य तितकें लवकर स्वराज्य देणें हें ब्रिटिश साम्राज्याचें पवित्र कर्तव्य आहे. हें कर्तव्य ब्रिटिश सरकार करीत आहे किंवा नाहीं हा प्रश्न अलाहिदा आहे, आणि कर्तव्याचे हे तात्त्विक विचार जबाबदार व कर्तृत्ववान् मुत्सद्यांच्या धोरणांत जोंपर्यंत दिसून येत नाहींत तोंपर्यंत ते फोल आहेत हेंही खरें आहे. परंतु दक्षिण आफ्रिकेंतहि ब्रिटिश सरकारनें स्वराज्य स्थापन करावें असें कोणीही म्हणत नाहीं, व खुद्द तेथील लोकांनीही स्वराज्याची मागणी केल्याचें ऐकिवांत नाहीं. दक्षिण आफ्रिकेचीही लोकसंख्या कमी आहे असें नाहीं आणि अश्रांतच ती प्रतिवर्षी वाढत जाणार; आणि दक्षिण आफ्रिकेंतील ह्या तीन कोटी लोकांनी सदैव रानटी स्थितींत असावें अशी ईश्वरी योजना असणें खास शक्य नाहीं. दक्षिण आफ्रिकेंतील रानटी रहिवाशी हेही कालांतरानें सुधारणार; अमेरिकेंतील रेड इंडियन लोकांप्रमाणें ते पृथ्वीतलावरून अजीबात नष्ट होतील असें दिसत नाहीं. तेव्हां जे प्रश्न आज हिंदुस्थान आणि इजिप्त ह्या देशांत उपस्थित झाले आहेत ते किंवा त्यासारखेच अन्य प्रश्न दक्षिण आफ्रिकेंतही कालांतरानें उपस्थित झाल्याशिवाय राहणार नाहींत; परंतु ही गोष्ट दूरच्या भविष्यत् कालाची आहे. दक्षिण आफ्रिकेंत प्रतिनिधिसत्ताक राज्यपद्धति आजच स्थापन केली तर तेथील लोकांना ती चालवितां येणार नाहीं हें निर्विवाद आहे. सबब युद्धसमाप्तिनंतर ब्रिटिश साम्राज्याची जी पुनर्घटना करावयाची तींत दक्षिण आफ्रिका वगैरे देशांचा विचार करण्याचें कारण नाहीं ही गोष्ट खरी. परंतु हिंदुस्थान आणि इजिप्त यांचा प्रश्न अगदीं स्वतंत्र आहे आणि त्याकडे दुर्लक्ष करून चालेल अशी स्थितिही नाहीं. तेथील लोक रानवट किंवा मागासलेले नाहींत, इतकेंच नव्हे तर त्यांची संस्कृति उच्च प्रकारची असून कित्येक बाबतींत

तर ती पाश्चात्यांना अनुकरणीय आहे. ज्या कालांत युरोपखंडांतील लोक अंगाला रंग फासून रानावनांत इतस्ततः फिरत असत, त्या पुरातन काळांतसुद्धां हिंदुस्थान, इजिप्त आणि चीन ह्या देशांतील लोक सुधारणेच्या उच्च शिखरावर आरूढ झाले होते. ही गोष्ट इतकी सप्रमाण आहे कीं, ती खुद्द पाश्चात्य लोकही नाकबूल करीत नाहींत. हिंदुस्थान, इजिप्त आणि दक्षिण आफ्रिका हे सर्वच देश रानवट स्थितींत असून त्यांचा नैतिक, धार्मिक, शैक्षणिक, सामाजिक आणि राजकीय दर्जा सारखाच कनिष्ठ प्रतीचा आहे असें दाखविण्याचा कित्येकांकडून प्रयत्न होतो आणि त्यामुळें ज्यांना प्राचीन इतिहास अवगत नाहीं आणि ज्यांच्या पौर्वात्य लोकांविषयींच्या कल्पना आपमतलबी मिशनऱ्यांच्या शिकवणीवरून किंवा धूर्त मुत्सद्यांच्या प्रसंगोपात व्यक्त केलेल्या विचारांवरून बनलेल्या असतात, अशा अजाण, सामान्य पाश्चात्य लोकांना तें खरेंही वाटतें. हिंदुस्थान, इजिप्त आणि दक्षिण आफ्रिका ह्यांच्यामध्यें फरक करण्याचें कारण नाहीं असें मानणारे लोक ग्रेटब्रिटनमध्यें अद्यापि आहेत असें मि. कर्टिस यांच्या पत्रावरून स्पष्ट दिसतें; आणि म्हणूनच हा समज चुकीचा आहे व तो दूर केला पाहिजे, असें मि. कर्टिस यांनीच आपले पत्रांत लिहिलें आहे. सबब हिंदुस्थान आणि इजिप्त यांचा प्रश्न स्वतंत्र असून युद्धसमाप्तीनंतर ब्रिटिश साम्राज्याची जी पुनर्घटना होणार तींत त्याचा विचार करणें अगदीं अवश्य आहे.

परंतु हिंदुस्थान व इजिप्त हे कितीही सुधारलेले असले आणि हिंदी लोक व इजिप्शियन लोक स्वराज्य मागत असले तरी मि. कर्टिस यांनीं त्यांना आपल्या योजनेंत स्थान दिलेलें नाहीं. 'दी प्राब्लेम ऑफ दी कॉमनवेल्थ' ह्या पुस्तकांत ते म्हणतात कीं, हिंदुस्थान आणि इजिप्त देशांत जे युरोपियनांच्या बरोबरीचे प्रमुख नागरिक आहेत त्यांना आपल्या राज्यकारभारांत आणि साम्राज्याच्या कारभारांत भाग कसा द्यावा हा प्रश्न आहे, आणि त्या प्रश्नाचा विचार 'दी कॉमनवेल्थ ऑफ नेशन्स' ह्या पुस्तकाच्या तिसऱ्या भागांत करण्याचें त्यांनीं अभिवचनही दिलें आहे. ह्यासंबंधानें त्यांची योजना अद्याप प्रसिद्ध झाली नसल्यामुळें ती काय आहे हें अर्थातच आम्हांस सांगतां येणें शक्य नाहीं. ती प्रसिद्ध होईल तेव्हां आम्ही त्याचा विचार करूं. तथापि ऐवढी गोष्ट निर्विवाद आहे कीं, त्यांच्या योजनेचें स्वरूप कांहाही असलें तरी ती हिंदुस्थान आणि इजिप्त

ह्यांतील **प्रमुख नागरिकांपुरतीच** आहे. शिवाय प्रमुख नागरिकांची त्यांची व्याख्या काय आहे म्हणजे प्रमुख नागरिकांत ते सरदार, जहागीरदार, जमीनदार यांचाच अंतर्भाव करितात किंवा सुशिक्षितांचाही अंतर्भाव करितात हें अद्याप कळावयाचें आहे. सारांश 'दी प्राब्लेम ऑफ दी कामनवेल्थ' ह्यांतील कांहीं वाक्यांवरून जरी असें दिसतें कीं आपल्या देशाचा अंतस्थ कारभार आणि साम्राज्याचा कारभार ह्या दोन्हीसंबंधानें इजिप्त आणि हिंदुस्थान येथील प्रमुख नागरिकांच्या मताला सरकारनें अधिकाधिक मान देत जावा असें त्यांचें मत आहे, तरी हिंदुस्थान आणि इजिप्त ह्यांना **स्वराज्य** यावें असा त्यांचा मुळींच अभिप्राय नाहीं; किंबहुना हिंदुस्थान आणि इजिप्त ह्या देशांत आजच स्वराज्य स्थापन करणें हें अकालीं होणार आहे, आणि स्वराज्याची अकालीं स्थापना करणें अपायकारक झाल्याशिवाय राहाणार नाहीं असें त्यांनीं आपले ग्रंथांत स्पष्ट म्हटलें आहे. हिंदुस्थान आणि इजिप्त ह्यांतील प्रमुख नागरिकांच्या मताला अधिकाधिक मान देण्याला ते जरी तयार असले तरी ते ह्या दोन देशांत स्वराज्य स्थापण्याला अनुकूल नाहींत, हें स्पष्ट आहे. कांहीं प्रमुख लोकांच्या विचारांना मान देण्याला सरकार तयार झालें म्हणजे स्वराज्य स्थापन झालें असें होत नाहीं. हा मुद्दा इतका उघड आहे कीं, त्याचें अधिक विवेचन करण्याचें कारण नाहीं.

हिंदुस्थानाला (आतां आपण हिंदुस्थानापुरतेंच लिहूं) स्वराज्य न देण्याबद्दल मि. कर्टिस यांनीं निरनिराळ्या ठिकाणीं निरनिराळीं कारणें दिलीं आहेत. आणि ही त्यांची हातचलाखी पाहून त्यांच्या धूर्ततेचें कौतुक केल्याशिवाय राहवत नाहीं. आपल्या पहिल्या म्हणजे 'दी प्रॉब्लेम ऑफ दी कॉमनवेल्थ' ह्या पुस्तकांत ते असें म्हणतात कीं, हिंदुस्थानांत पुरेसा मतदारसंघ नाहीं, सबब त्यास स्वराज्य देतां येत नाहीं. कायदे करणें व त्यांची अंमलबजावणी करणें हीं जीं सरकारचीं कर्तव्यें तीं चोख रीतीनें करण्यास जे लायक पुढारी लागतात ते हिंदुस्थानांत पुरेसे आहेत. परंतु असल्या लायक लोकांना निवडून त्यांना अधिकारारूढ करणारा पात्र असा मतदारसंघ पुरेसा नाहीं असें मि. कर्टिस यांचें म्हणणें आहे. स्वराज्याची इमारत अवश्य तितक्या लायक मतदारसंघाच्या पायावर उभारावी लागते आणि असा पुरेसा लायक मतदारांचा संघ हिंदुस्थानांत नसल्यामुळें हिंदुस्थानाला स्वराज्य देतां येत नाहीं अशी मि. कर्टिस यांची विचारसरणी आहे.

(India may contain leaders qualified not only to make but also to administer the laws; but she will not be ripe for self-government until she contains an electorate qualified to recognise those leaders and place them in office. From its nature, national self-government depends, not only upon the handful of public men needed to supply cabinets and Parliaments but on the electorate, on the fitness of a sufficient proportion of the people themselves to choose rulers able to rule. Such men there are already but not in sufficient numbers to assume control of Indian affairs.)

ही विचारसरणी कशी चुकीची आहे याचा आम्ही **महाराष्ट्र होमरूल संघातर्फे** गेल्या आक्टोबर महिन्याच्या ८ व्या तारखेस पुणें मुक्कामीं झालेल्या आमच्या व्याख्यानांत§ विचार केला आहे. त्या व्याख्यानांत आम्हीं असें सिद्ध करण्याचा प्रयत्न केला आहे कीं, स्वराज्य स्थापण्यास लागणारा मतदारसंघ हिंदुस्थानांत आहे. ह्या व्याख्यानाकडे मि. कर्टिस यांचें लक्ष गेलें*आणि त्यांनीं मि. केर यांना लिहिलेलें पत्र, हें व्याख्यान त्यांच्या अवलोकनांत आल्यानंतर त्यांनीं लिहिलेलें आहे. मि. केर यांना धाडलेल्या पत्रांत योग्य मतदारसंघाचा अभाव ह्या हिंदुस्थानाला स्वराज्य न देण्याच्या कारणाचा मुळींच उल्लेख नाहीं. त्यांत मि. कर्टिस यांनीं दुसरेंच कारण दिलें आहे; तें हें कीं, हिंदी लोकमत निर्दोष आणि निरपेक्ष नाहीं, व म्हणून त्या मताप्रमाणें केलेले निर्णय बहुजन-समाजाला मान्य होणार नाहींत, अतएव हिंदुस्थानाला स्वराज्य देतां येत नाहीं. ' धी कॉमनवेल्थ ऑफ नेशन्स ह्या पुस्तकांत तर त्यांनीं तिसरेंच कारण दिलें

---

§ Observations on Indian Home Rule– Price As. 2.

* मि. कर्टिस हे आपल्या नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या 'A letter to the people of India,' ह्या पुस्तकांत म्हणतात:—" In response to Sir James Meston's invitation, I reached India at the end of last October ........on the ship before landing received a communication from a responsible official of the Bombay Goverment asking me to see him. I did so and was furnished with a copy of a public lecture on my books by an Indian."

आहे. ह्या पुस्तकांत त्यांनीं हिंदुस्थान आणि दक्षिण आफ्रिका यांच्यामध्यें बिलकुल फरक केलेला नसून हिंदुस्थानला स्वराज्य न देण्याचें कारण असें दिलें आहे कीं, हिंदी लोकांच्या राजकीय कल्पना अद्याप दैवी किंवा प्राथमिक स्वरूपाच्या आहेत. अशीं मि. कर्टिस यांनीं त्यांना योग्य वाटेल त्याप्रमाणें भिन्नभिन्न ठिकाणीं भिन्न भिन्न कारणें सांगितलीं आहेत. ही भिन्नता कां दिसून यावी हें गूढ आहे. तथापि त्याच्याशीं आम्हांस कांहीं कर्तव्य नाहीं. हीं सर्व कारणें एकत्र करून त्यांचा विचार करण्यास हरकत नाहीं.

हिंदुस्थानांत स्वराज्य न स्थापण्याचीं मि. कर्टिस यांनीं जीं कारणें दिलीं आहेत तीं येणेंप्रमाणें:—

( १ ) हिंदुस्थानांत पुरेसा लायक मतदारसंघ नाहीं.

( २ ) हिंदी लोकमत निरपेक्ष व बरोबर नाहीं व म्हणून त्या मतान्वयें केलेले निर्णय बहुजनसमाज ग्राह्य करणार नाहीं आणि

( ३ ) हिंदी लोकांचे राजकीय विचार अद्याप दैवी आणि प्राथमिक स्वरूपाचे आहेत.

ह्या तीन आक्षेपांपैकीं दुसऱ्या आक्षेपाचा मागील लेखांत आम्हीं विचार केलाच आहे. हिंदी लोकमत स्वार्थी आणि चुकीचें नाहीं, इतकेंच नाहीं तर अँग्लो–इंडियन अधिकाऱ्यांच्या मतापेक्षां अधिक निरपेक्ष आणि रास्त आहे हें आम्हीं दाखविलें आहे. हिंदुस्थानांत मतदारसंघ पुरेसा नाहीं हा जो पहिला आक्षेप त्यांतही कांहीं अर्थ नाहीं. प्रातिनिधिक संस्थांत स्वतंत्र बाण्याचे सभासद निवडून आल्यास त्या संस्था जोरदार होत जातील आणि राज्यकर्त्यांवर त्यांची अधिकाधिक छाप बसूं लागेल. ह्याकरितां असले स्वतंत्र बाण्याचे सभासद निवडून यावे ही गोष्ट अधिकारीमंडळास बहुधा पसंत नसते व ह्मणून मतदारीचा हक्क संकुचित करण्यांत येऊन त्याबद्दल नानाप्रकारचे निर्बंध करण्यांत येत असतात. हा राजनीतिचा प्रकार इतर देशांप्रमाणें हिंदुस्थानांत दिसून आला तर त्यांत कांहीं नवल नाहीं. आपल्या हातांतील सत्ता कमी होऊन ती दिवसेंदिवस जनतेच्या हातीं अधिकाधिक जावी ही गोष्ट कोणत्याही राज्यकर्त्यांना मनापासून आवडणें शक्य नाहीं व म्हणून ती सत्ता जनतेच्या हातांत गेल्याशिवाय

गत्यंतरच नाहीं, अशी स्थिति प्राप्त झाल्यास, निदान ती आपल्या हातांतून शक्य तितक्या कमी प्रमाणानें जाईल अशी खबरदारी घेण्याची अधिकाऱ्यांची साहजिकच प्रवृत्ति असत्ये. मतदारीचा हक्क विस्तृत करून मतदारसंघ बराचसा मोठा झाला म्हणजे अधिकाऱ्यांच्या संमतीनें वागणारे किंवा अधिकाऱ्यांच्या धोरणास फारसा विरोध न करणारे असे प्रतिनिधी बहुधा निवडून येत नाहींत. हिंदुस्थानांतील प्रांतिक कायदेकौन्सिलांतील सभासद निवडून देण्याचा हक्क म्युनिसिपालिट्यांना आणि लोकलबोर्डांना दिला आहे. याशिवाय सरदार, जहागीरदार वगैरे विशिष्ट लोकांना प्रतिनिधित्वाचा हक्क दिला असून मुसलमानांना तर स्वतंत्र प्रतिनिधित्वाचा हक्क दिलेला आहे. प्रत्येक म्युनिसिपालिटीला हा हक्क दिलेला नसून मुंबई इलाख्यांत ज्या शहराची लोकसंख्या दहा हजारांपेक्षां कमी नाहीं अशा शहरांतलि म्युनिसिपालिट्यांनाच आपल्यातर्फे प्रतिनिधी निवडून देण्याचा हक्क दिला आहे. लोकलबोर्डासंबंधीं विचार करितां तालुका लोकलबोर्डांना हा हक्क दिलेला नसून फक्त डिस्ट्रिक्ट लोकलबोर्डांनाच दिलेला आहे. म्युनिसिपालिट्यांनीं व लोकलबोर्डांनीं प्रतिनिधींची जी निवड करावयाची ती अप्रत्यक्ष निवडणुकीच्या तत्त्वावर करण्यांत यावी अशी योजना केलेली आहे. म्हणजे दहा हजार वस्तीला एक, ह्याप्रमाणें म्युनिसिपालिट्यांनीं आणि एक लक्ष वस्तीला एक, ह्याप्रमाणें डिस्ट्रिक्ट लोकलबोर्डांनीं, आपल्या सभासदांपैकीं मतदार सभासद म्हणून निवडून द्यावे, आणि ह्या मतदार सभासदांनी कौन्सिलचा सभासद निवडून द्यावा अशी योजना करण्यांत आली आहे. कौन्सिलच्या निवडणुकींत अप्रत्यक्ष निवडणुकीच्या तत्त्वाचें सरकारनें अवलंबन केलें असल्यामुळें म्युनिसिपालिट्यांच्या किंवा डिस्ट्रिक्ट लोकलबोर्डांच्या प्रत्येक सभासदाला कौन्सिलचा सभासद निवडून देण्याचा हक्क प्राप्त झाला आहे, असें म्हणतां येत नाहीं. त्याला जो हक्क मिळाला आहे तो इतकाच कीं त्यानें कौन्सिलचा सभासद निवडून देण्याकरितां मतदार निवडून द्यावे. अशी योजना असल्यामुळें कायदे कौन्सिलांतलि सभासद निवडून देणारा मतदारसंघ लहान दिसावा ह्यांत आश्चर्य नाहीं. परंतु सरकारनें केलेल्या निर्बंधामुळें मतदारसंघ लहान असला म्हणजे तितक्यावरून मतदारीचा हक्क उपभोगण्यास लायक असणाऱ्यांची संख्या पुरेशी नाहीं असें सिद्ध होत नाहीं.

परंतु हें अप्रत्यक्ष निवडणुकीचें तत्त्व सरकारनें म्युनिसिपालिट्या आणि लोकलबोर्ड यांच्यापुरतेंच स्वीकारलें आहे. मुसलमानांना स्वतंत्र प्रतिनिधित्वाचा

जो हक्क देण्यांत आला आहे त्यासंबंधानें हें तत्त्व अमलांत आणलेलें नाहीं, आणि त्यामुळें तर मतदारसंघ पुरेसा नाहीं, ह्या आक्षेपाचा फोलपणा अधिकच दिसून येतो. जे मुसलमान शंभर रुपयांपेक्षां कमी सारा देत नाहींत, जे प्राप्तीचा कर देतात, जे ॲडव्होकेट, सॉलिसिटर्स, जस्टिस ऑफ धी पीस, ऑनररी म्यॅजिस्ट्रेट किंवा किताब धारण करणारे आहेत, तसेंच विश्वविद्यालयांतून पदवी मिळवून ज्यांना पांच वर्षे झालीं आहेत, अशा सर्व मुसलमानांना मतदारीचा हक्क दिलेला आहे. मुसलमानांच्या प्रतिनिधींच्या निवडणुकींत प्रत्यक्ष निवडणुकीचें तत्त्व मान्य केलें असतां इतर निवडणुकींत तें तत्त्व सरकारनें कां स्वीकारलें नाहीं आणि मुसलमान व इतर हिंदी लोक यांच्यात त्यांनीं कां भेद केला हें मोठें गूढ आहे. मुसलमान लोक इतर हिंदी लोकांपेक्षां अधिक सुशिक्षित आहेत किंवा प्रातिनिधिक संस्थांचा त्यांचा अनुभव अधिक आहे असें नाहीं. तथापि सरकारच्या ह्या योजनेनेंच एक गोष्ट सिद्ध होते ती ही कीं शंभर रुपये सारा देणारा किंवा प्राप्तीचा कर देणारा किंवा पदवीधर मुसलमान मतदारीचा हक्क उपभोगण्यास जर लायक आहे तर त्या वर्गांत येणारे इतर हिंदी लोक तो हक्क उपभोगण्यास लायक नाहींत असें म्हणणें अन्यायाचें व वेडेपणाचें नाहीं काय ? प्रत्यक्ष निवडणुकीचें तत्त्व मुसलमानांना ज्याप्रमाणें लागू केलें आहे त्याप्रमाणें इतर हिंदी लोकांनाही जर तें लागू करण्यांत येईल तर हिंदुस्थानच्या सध्यांच्या स्थितींतही पुरेसा मतदारसंघ आहे असें दिसून आल्याशिवाय राहाणार नाहीं. प्रत्येक जाणत्या पुरुषास मतदारीचा हक्क द्यावा अशी कोणीही मागणी केलेली नाहीं व करीत नाहीं. खुद्द इंग्लंडांतील मतदारीच्या हक्काचा इतिहास पाहिला तर आपणास असें दिसून येईल कीं, तो आरंभीं संकुचित असून पुढें अधिकाधिक विस्तृत करण्यांत आला. सन १८३२ सालीं ब्रिटिश पार्लमेंटानें पार्लमेंटाच्या निवडणुकीच्या दुरुस्तीचें बिल पास केलें, त्यावेळीं मतदारीचा हक्क किती आकुंचित होता हें इंग्लंडच्या इतिहासाचें ज्यांनीं अध्ययन केलें आहे त्यांना माहित आहेच. सारांश, स्वराज्याची स्थापना करण्यापूर्वी प्रत्येक जाणता मनुष्य मतदारीचा हक्क उपभोगण्यास लायक झाला पाहिजे ही कल्पना चुकीची असून तिला इतिहासाचा आधार नाहीं. ज्या ज्या देशांत आज आपणाला स्वराज्य आढळून येतें त्या त्या देशांत स्वराज्याचा अधिकाधिक विकासच होत गेला आहे. कानडा, आस्ट्रेलिया, दक्षिण आफ्रिका, न्यूझीलंड आणि न्यूफौंडलंड ह्या ब्रिटिश साम्राज्यांत ज्या स्वयंशासित वसाहती आहेत त्यांतही स्वराज्य एकदम परिणत

स्वरूपांतच स्थापन करण्यांत आलें असें नाहीं; तेथेंही मतदारीचा हक्क आरंभीं आकुंचितच होता आणि स्वराज्याचा अधिकाधिक विकासच होत गेला. अशा दृष्टीनें हिंदुस्थानच्या स्वराज्याच्या प्रश्नाकडे पाहिल्यास हिंदुस्थानांत मतदारसंघ पुरेसा नाहीं ह्या मि. कर्टिस ह्यांच्या आक्षेपांत मुळींच अर्थ नाहीं असें दिसून येईल. मुसलमानांना मतदारीचा हक्क ज्या प्रमाणानें दिला आहे तितक्या प्रमाणानेंच इतर हिंदी लोकांना तो देण्यांत आला तरी सुद्धां स्वराज्याला लागणारा पुरेसा मतदारसंघ हिंदुस्थानांत आहे अशी कोणाचीही खात्री झाल्याशिवाय राहणार नाहीं.

हिंदी लोकांचे राजकीय विचार अद्याप दैवी किंवा प्राथमिक स्वरूपाचे आहेत आणि म्हणून त्यांना स्वराज्य देतां येत नाहीं असा मि. कर्टिस यांचा तिसरा आक्षेप आहे. ते म्हणतात " ब्रिटिश साम्राज्यांत सर्व शासनसत्ता युरोपियन लोकांच्या हातांत आहे. त्या साम्राज्यांत हिंदुस्थान, इजिप्त वगैरे जे लहानमोठे परतंत्र देश आहेत तेथील लोकांच्या हातांत ही शासनसत्ता स्थानिक बाबतींतही देण्यांत आलेली नाहीं. याचें कारण असें आहे कीं, ज्या लोकांच्या कल्पना अद्याप दैवी किंवा प्राथमिक स्वरूपाच्या आहेत, त्यांना साम्राज्याच्या संस्था समाधानकारक रीतीनें चालवितां येणार नाहींत, आणि त्यांना शासनसत्ता न देण्याला हेंच कारण पुरेसें आहे..................पौवार्त्य लोकांना ज्या स्वराज्यपद्धतीचा परिचय आहे ती बदलण्यापूर्वी ज्या कल्पना आणि रीतीभाती यांच्यामुळें ती राज्यपद्धति विकास पावलेली आहे त्या कल्पना आणि रीतीभाती अगोदर बदलल्या पाहिजेत, आणि हिंदुस्थानांतील सामान्य लोकांचे विचार व त्यांचा जीवनक्रम इतका बदलेल कीं ते एका पिढीत आपल्या राज्यकारभाराची जबाबदारी आपल्या शिरावर घेण्यास समर्थ होतील, असें मानण्यास जागा नाहीं. "

हिंदी लोकांचे राजकीय विचार दैवी स्वरूपाचे आहेत म्हणजे काय? असा प्रश्न उपस्थित होतो. त्यास मि. कर्टिस यांचें असें उत्तर आहे कीं, राजा ईश्वराचा प्रतिनिधि आहे व सर्व राजकीय सत्ता परमेश्वरापासून उत्पन्न झालेली आहे, तिची उत्पत्ति जनतेंत नाहीं अशा प्रकारच्या कल्पना अद्याप हिंदी लोकांत प्रचलित आहेत. आणि मि. कर्टिस यांच्या मतें त्यांचा असा परिणाम झाला आहे कीं, हिंदी लोकांना ईश्वराबद्दल आपली कर्तव्यें आहेत अशी जाणीव आहे,

परंतु आपल्या देशाबद्दल व देशबांधवाबद्दलही आपलीं कर्तव्यें आहेत ही जाणीव अद्याप त्यांच्यामध्यें दिसून येत नाहीं. ही जाणीव म्हणजे स्वराज्याचा पाया होय. आणि जोंपर्यंत हिंदुस्थानांतील सामान्य लोकांचीं मनें ह्या जाणीवेनें प्रेरित झालेलीं नाहींत तोंपर्यंत हिंदी लोक स्वराज्याचे हक्क उपभोगण्यास समर्थ होणार नाहींत. हिंदी लोकांत दैवी विचारांचें प्राबल्य अद्याप किती आहे हें सिद्ध करण्याकरितां त्यांनीं असें उदाहरण दिलें आहे कीं, एकदां कांहीं जमिनीबद्दल सरकार आणि हिंदुस्थानांतील अद्याप प्राथमिक स्थितींत असलेली एक विवक्षित जात यांच्यामध्यें तंटा उपस्थित झाला. त्याचा हायकोर्टानें सरकारतर्फे निकाल दिला, परंतु प्रीव्हि कौन्सिलनें हायकोर्टाचा ठराव फिरवून त्या जातीतर्फे निकाल दिला. तेव्हां त्या जातीला प्रीव्हि कौन्सिल ही कोणी तरी दैवी शक्ति आहे असें वाटून तिनें धार्मिक संस्कारांच्या द्वारें त्या शक्तीबद्दल आपली कृतज्ञता व्यक्त केली. हिंदी लोकांचे राजकीय विचार दैवी स्वरूपाचे आहेत हें दाखविण्याकरितां मि. कर्टिस यांनीं स्वीकारलेली विचारसरणी अशा प्रकारची आहे.

हिंदी लोकांचे विचार अद्याप दैवी स्वरूपाचे आहेत, हें मि. कर्टिस यांचें म्हणणें बरोबर नाहीं. प्रत्येक समाजाच्या आद्यावस्थेंत त्याच्या राजकीय कल्पना धार्मिक स्वरूपाच्याच असतात, किंबहुना समाजाच्या प्राथमिक स्थितींत नीति, राजकारण, धर्म इत्यादि विषयांसंबंधींच्या कल्पना अलग झालेल्या नसतात. आज धर्म आणि राजकारण यांची फाळणी झालेली आपण पाहतों; ही फाळणी फायदेशीर आहे कीं काय हा प्रश्नच आहे. इतकें मात्र खरें कीं नीति, धर्म आणि राजकारण यांची ताटातूट केल्यामुळें राजकारण हा नीतीचा व धर्माचा प्रश्न नाहीं आणि राष्ट्राराष्ट्रांतील संबंधांत तर नीतितत्त्वें पाळण्याचें मुळींच कारण नाहीं, अशा प्रकारच्या घातक कल्पना युरोपखंडांत बऱ्याच पसरल्या आहेत असें डॉ. जॉवेट, मि. बारकर वगैरे पाश्चात्य विद्वानांचें मत आहे. चालू महायुद्धाच्या मुळाशीं नीति आणि राजकारण यांमधील युरोपांत प्रचलित असलेली फारकत होय असें सूक्ष्म विचाराअंतीं कोणासही दिसून येईल. तथापि राजकारण आणि नीति यांचा अन्योन्य संबंध हा विषय अलाहिदा आहे व त्याच्याशीं सध्यां आपणांस कांहीं कर्तव्य नाहीं. येवढी गोष्ट निर्विवाद आहे कीं, कोणताही समाज घेतला आणि त्याची प्राथमिक अवस्था काय होती हें पाहिलें तर त्याचे त्या वेळचे राजकीय विचार दैवी स्वरूपाचेच होते असें आपणांस दिसून येईल.

प्राचीन ग्रीक लोक अतिशय सुधारलेले असून त्यांच्यांत प्रजासत्ताक राज्यपद्धतीचा आणि तिच्या मुळाशीं असलेल्या तत्त्वांचा पूर्ण विकास झाला होता. परंतु त्यांच्या प्राथमिक स्थितींत त्यांच्या राजकीय कल्पना दैवी स्वरूपाच्याच होत्या हें त्यांचें जें प्राचीन काव्य होमरचें इलियड त्यावरून अगदीं स्पष्ट दिसतें. प्राचीन रोमन लोकांच्या राजकीय कल्पनाही आरंभी अशाच प्रकारच्या होत्या. खुद्द इंग्लंडांतही सोळाव्या शतकापर्यंत राजकीय कल्पना दैवी स्वरूपाच्याच होत्या. युरोपखंडांत ख्रिस्ती धर्माचा प्रसार होण्यास सुरुवात झाल्यानंतर, त्या धर्माचा युरोपियन लोकांच्या राजकीय विचारांवर जो परिणाम झाला तो असा कीं, सर्व राजकीय सत्तेचा उगम जनता आहे, आणि जनतेच्या मताविरुद्ध राजानें किंवा अधिकाऱ्यांनीं वागणें बरोबर नाहीं, ह्या ज्या ग्रीक किंवा रोमन लोकांपासून आलेल्या राज्यव्यवस्थेच्या आधारभूत कल्पना त्या नष्ट होऊन राजा हा ईश्वराचा प्रतिनिधी आहे, त्याची सत्ता त्याला जनतेकडून मिळालेली नसून परमेश्वरानें ती त्याला दिलेली आहे, त्याच्या सत्तेचा प्रतिकार करणें पाप आहे, त्यांनीं कितीही अन्याय केला तरी त्याला विरोध करितां कामा नये इत्यादि दैवी स्वरूपाच्या कल्पना प्रादुर्भूत होऊं लागल्या. ह्या कल्पनांचा पुढें इतका विकास झाला कीं दुष्ट राजाच्या सत्तेचेंही समर्थन लोक दैवी तत्त्वावर करूं लागले. एखादा राजा जर अतिशय दुष्ट व जुलमी निघाला तर त्याला मुद्दाम परमेश्वरानें प्रजेला तिनें केलेल्या पापाबद्दल शासन करण्याकरितां सत्ता दिली आहे असें प्रतिपादन करण्यास कांहीं विद्वान् लोक सुद्धां मागें घेत नसत. जर्मनीत एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धापर्यंत राजकीय कल्पना दैवी स्वरूपाच्या होत्या असें खुद्द मि. कर्टिस यांनीं म्हटलें आहे. जर्मनीचा प्रसिद्ध मुत्सद्दी बिस्मार्क याचे राजकीय विचारांवर दैवी कल्पनांचा बराच पगडा बसलेला होता, हीहि गोष्ट मि. कर्टिस यांनीं नमूद केली आहे. युरोपियन लोकांच्या राजकीय विचारांवर धर्मसमजुतीचा अशा प्रकारचा परिणाम झालेला आहे असें इतिहास स्पष्ट सांगत असतां ह्या बाबतींत आशिया आणि युरोप यांच्यामध्यें कायमचा फरक करण्याचा प्रयत्न करणें म्हणजे जाणून बुजून इतिहासाकडे डोळेझांक करण्यासारखें आहे. प्रत्येक समाजाच्या प्राचीन राजकीय कल्पना दैवी स्वरूपाच्याच असल्यामुळें त्या प्राचीन हिंदुस्थानांत तशा प्रकारच्या असल्यास नवल नाहीं. परंतु हिंदुस्थान हा देश अफाट असल्यामुळें व त्याचें

प्राचीन वाङ्मय पूर्णपणें उपलब्ध झालें नसल्यामुळें प्राचीन हिंदू लोकांच्या राजकीय कल्पना सर्व काळीं व सर्व ठिकाणीं दैवी स्वरूपाच्याच होत्या असा सिद्धांत ठोकून देणें अत्यंत धाष्टर्याचें आहे. शुक्रनीति, चाणक्याचें अर्थशास्त्र इत्यादि जे राजकारणविषयक प्राचीन ग्रंथ आहेत त्यावरून प्राचीनकाळीं हिंदुस्थानच्या भिन्न भिन्न भागांत जे राजकीय विचार प्रचलित होते त्यांचा सविस्तर इतिहास मिळण्यासारखा नाहीं. तथापि ह्या ग्रंथांत जे राजकीय विचार दिसून येतात त्यावरूनही प्राचीन हिंदु लोकांचे विचार दैवी स्वरूपाचेच होते ह्या सिद्धांताला पुष्टि मिळत नाहीं. राजा प्रजेचा नोकर आहे, त्यास दिलेलें वेतन म्हणजे त्याच्या नोकरीबद्दल पगार होय, दुष्ट राजा हा परमेश्वराचा प्रतिनिधि नसून तो असुराचा प्रतिनिधि आहे आणि त्याचा प्रतिकार अवश्य करावा, अशा प्रकारचे विचार शुक्रनीतींत आढळून येतात. शुक्रनीति हा ग्रंथ ख्रिस्तीशकापूर्वी चवथ्या किंवा पांचव्या शतकांत लिहिलेला आहे असें विद्वानांचें मत आहे. तेव्हां प्राचीन हिंदू लोकांचे राजकीय विचार दैवी स्वरूपाचे होते हा सिद्धांत बरोबर आहे असें म्हणतां येईल काय ? दुष्ट राजा हाही ईश्वराचा प्रतिनिधि आहे आणि प्रजेचें शासन करण्याकरितां परमेश्वरानेंच त्याला सत्ता दिली आहे हा विचार कोणीकडे आणि दुष्ट राजा हा असुराचा प्रतिनिधि आहे आणि त्याचा प्रतिकार करून जरूर दिसल्यास त्याला पदच्युत करावें हा शुक्रनीतींतील विचार कोणीकडे, याचा वाचकांनींच विचार करावा. सारांश, हिंदू लोकांचे राजकीय विचार सदासर्वदा दैवी स्वरूपाचे होते, ह्या मताविरुद्ध उपलब्ध असलेल्या ग्रंथांत सुद्धां पुरावा मिळत असल्यामुळें तें ग्राह्य आहे असें म्हणतां येणार नाहीं. हिंदु लोकांचे राजकीय विचार कधींही आणि अल्पसुद्धां प्रमाणानें दैवी स्वरूपाचे नव्हते हा सिद्धांत जसा चुकीचा आहे, तद्वतच हिंदू लोकांचे राजकीय विचार सर्वकाळीं दैवी स्वरूपाचे होते, दैवी स्वरूपाच्या राजकीय विचाराव्यतिरिक्त, अन्य राजकीय विचार त्यांना माहीत नव्हते हाही सिद्धांत तितकाच चुकीचा आहे; आणि अशा एकदेशीय आणि अतिशयोक्तीनें भरलेल्या सिद्धांतापासून काढलेलीं अनुमानें अर्थातच चुकीचीं असणार. आणि मि. कर्टिस यांनीं अशा प्रकारची चूक केली असल्यामुळें त्यांचीं अनुमानेंही दोषार्ह झालीं आहेत.

प्राचीन हिंदू लोकांना दैवी स्वरूपाच्या राजकीय विचारांखेरीज अन्य प्रकारचे राजकीय विचार ठाऊक नव्हते असा सिद्धांत प्रतिपादणें म्हणजे प्राचीन हिंदू

लोकांच्या राजकीय इतिहासाचें अज्ञान प्रगट करणें होय. ग्रीक किंवा रोमन लोक यांच्यांत राजकीय विचारांची जशी वाढ झाली तशी जरी प्राचीन हिंदू लोकांत झाली नाहीं, तरी हिंदू लोकांना दैवी राजकीय विचाराशिवाय अन्य राजकीय विचार माहीत नव्हते, किंवा अनियंत्रित राज्यपद्धतीशिवाय अन्य प्रकारची राज्यपद्धति त्यांच्या परिचयाची नव्हती हें म्हणणें अगदीं चुकीचें आहे. या संबंधानें आणखी एक गोष्ट लक्षांत घेण्यासारखी आहे. ती ही कीं, इंग्लंड आणि फ्रान्स हे देश वगळले असतां अर्वाचीन युरोपखंडाच्या इतर देशांतहि अनियंत्रित राज्यपद्धति हीच तेथील लोकांच्या जास्त परिचयाची आहे. आणि सर्व राजकीय सत्तेचें अधिष्ठान जनता आहे ही कल्पना तेथें अद्याप रूढ व्हावयाची आहे. इंग्लंड आणि फ्रान्स येथील राज्यपद्धति आणि युरोपांतील इतर देशांतील राज्यपद्धति ह्या पद्धतींमध्यें दिसून येणारा हा भेद खुद्द मि० कर्टिस यांनाही कबूल आहे असें त्यांच्या ग्रंथावरून दिसतें. तेव्हां ज्या राजकीय तत्त्वांचा अद्याप युरोपांतील कित्येक देशांतसुद्धां विकास व्हावयाचा आहे त्या तत्त्वांचा प्राचीन हिंदू लोकांत पूर्ण विकास झालेला नव्हता म्हणून त्यांना किंवा त्यांच्या हल्लींच्या वंशजांना कमी लेखून प्रातिनिधिक संस्था त्यांना सदासर्वदा अयोग्यच होणार असा सिद्धांत ठोकून देणें अगदीं चुकीचें आहे.

अर्वाचीन हिंदी लोकांचे राजकीय विचार दैवी स्वरूपाचे आहेत हाहि सिद्धांत अगदीं चुकीचा आहे. असा सिद्धांत प्रतिपादणें म्हणजे इंग्रजी अम्मल हिंदुस्थानांत सुरू होऊन जीं शेंसवाशें वर्षें झालीं आहेत त्या अवधींत हिंदू लोकांच्या विचारांत व समजुतींत कांहींहि स्थित्यंतरें झालीं नाहींत, आणि शंभर दीडशें वर्षांपूर्वी जसे हिंदी लोक होते तसेच ते आज आहेत असें म्हणण्यासारखें आहे. हिंदी लोकांची सुधारणा युरोपियन लोकांच्या सुधारणेइतकी प्रागतिक नसेल; युरोपियन सुधारणेच्या मानानें हिंदी सुधारणा स्थिर असेल; परंतु ती खात्रीनें इतकी निर्जीव व स्थिर नाहीं कीं, तिजवर पाश्चात्य सुधारणेचे गेल्या शंभर दीडशें वर्षांत आघातावर आघात होत असतां त्यांचा बिलकुल परिणाम होऊं नये. गेल्या २० वर्षांत हिंदी लोकांच्या राजकीय विचारांत इतकी क्रांति झाली आहे कीं, तितकी क्रांति त्यांच्या इतिहासांत कधींही झालेली नव्हती असें एका अँग्लो-इंडियन अधिकाऱ्यानें मि० कर्टिस यांना सांगितलें असें त्यांनींच एके ठिकाणीं लिहिलें आहे. परंतु त्यांनीं ही गोष्ट आपले ग्रंथ लिहितांना लक्षांत ठेवल्याचें

दिसत नाहीं. प्राचीन हिंदू लोकांच्या राजकीय विचारांत दैवी विचारांचें प्राबल्य दिसून येत होतें, असें जरी क्षणभर वादविवादाकरितां गृहीत धरलें तरी तें प्राबल्य आतां राहिलें नाहीं आणि ज्या राजकीय विचारांबद्दल इंग्लिश, फ्रेंच आणि अमेरिकन लोक यांना अत्यंत अभिमान वाटतो आणि ज्यामुळेंच पाश्चात्य संस्कृति पौर्वात्य लोकांच्या आदरास पात्र झाली आहे, त्या विचारांचेंच प्राबल्य वाढत चाललें आहे. 'ना विष्णुः पृथिवीपतिः' अशा प्रकारच्या दैवी स्वरूपाच्या राजकीय विचारांवर कोणत्याही सुशिक्षित हिंदी गृहस्थाचा विश्वास नाहीं. सर्व राजकीय सत्तेची उत्पत्ति जनतेपासून आहे ही कल्पना पाश्चात्यांना जितकी प्रिय आहे तितकीच ती सुशिक्षित हिंदी गृहस्थांना प्रिय झाली आहे. प्रत्येक राष्ट्रानें प्रातिनिधिक संस्थांच्या द्वारें आपला राज्यकारभार चालवावा हें तत्त्व पाश्चात्यांप्रमाणेंच त्यांना आवडूं लागलें आहे. मि. कर्टिस हे एक ठिकाणीं म्हणतात कीं, कानडा, आस्ट्रेलिया व न्यूझीलंड येथील लोकांना स्वराज्याचें तत्त्व इतकें प्रिय आहे कीं, त्यांना तें धर्माप्रमाणें वाटतें. सुशिक्षित हिंदी लोकांची स्थिति अशीच झालेली आहे. त्यांनाही स्वराज्य म्हणजे स्वधर्म वाटूं लागला आहे. आणि भक्ताला ज्याप्रमाणें परमेश्वराची तळमळ लागते, त्याप्रमाणें त्यांना स्वराज्याची तळमळ लागली आहे. ह्या गोष्टीकडे डोळेझांक करून चालावयाचें नाहीं; आणि डोळेझांक करून केलेले सिद्धांत चुकीचे आणि अपायकारक झाल्याशिवाय राहाणार नाहींत.

सुशिक्षित हिंदी लोकांचे राजकीय विचार जरी पाश्चात्यांच्या विचारांप्रमाणें असले तरी सामान्य लोकांच्या राजकीय विचारांत फरक झाला नाहीं, असा कदाचित् आक्षेप घेण्यांत येईल. परंतु ह्या आक्षेपांतही अर्थ नाहीं. कोणत्याही देशांत सुशिक्षित लोक आणि ज्यांना अशिक्षित समजण्यांत येतें असे लोक यांच्या विचारांत जमीनअस्मानाचें अंतर नसतें. जे विचार सुशिक्षितांच्या मनांत खेळत असतात त्यांचा अशिक्षितांवरही दिवसेंदिवस अधिकाधिक अंमल बसत जातो. सुशिक्षित आणि अशिक्षित यांच्यामध्यें बिलकूल दळणवळण होत नाहीं व त्यामुळें सुशिक्षितांचे विचार अशिक्षितांना समजत नाहींत, इतका अलगपणा कोणत्याही देशांत कधींही नसतो. भिन्न भिन्न समाजांत जरी कारणपरत्वें असा अलगपणा राहिला तरी एकाच समाजांतील भिन्न भिन्न वर्गांत तो राहणें अशक्य आहे. सामाजिक व्यवहार गुंतागुंतीचे असल्यामुळें समाजां-

तील भिन्न भिन्न वर्गांत कमीजास्त प्रमाणानें दळणवळण हें होणारच; आणि त्यामुळें एका वर्गाचे विचार दुसऱ्या वर्गाला कळल्याशिवाय राहत नाहींत. सुशिक्षित आणि अशिक्षित हिंदी लोक हे जणूं काय अगदीं अलग वर्ग आहेत आणि सुशिक्षितांच्या विचारांचा परिणाम अशिक्षितांवर होत नाही असें पुष्कळ अँग्लो–इंडियन अधिकारी आणि हिंवाळ्यांत १।२ महिने प्रवास करून हिंदुस्थानावर ग्रंथ लिहिणारे कांहीं इंग्रज ग्रंथकार म्हणत असतात. परंतु पाश्चात्य देशांतील समाजपद्धतीमुळें तेथील सुशिक्षित आणि अशिक्षित यांच्यामध्यें जरी असा अलगपणा दिसत असला तरी हिंदी लोकांची समाजपद्धति अशा प्रकारची आहे कीं, त्यांच्यांत असा अलगपणा आढळणें अशक्य आहे. सुशिक्षित हिंदी लोकांच्या राजकीय विचारांचा परिणाम ह्या वस्तुस्थितीमुळें सामान्य लोकांवरहि होत चालला आहे आणि त्यांचे राजकीय विचार पूर्वीप्रमाणें दैवी स्वरूपाचे राहिले नाहींत. हिंदु लोकांचा अम्मल नाहींसा होऊन मुसलमानांचें राज्य हिंदुस्थानांत झालें तेव्हांपासूनच सामान्य लोकांच्या राजकीय विचारांचें दैवी स्वरूप कमी होऊं लागलें आणि अनेक कारणांमुळें सध्यां तर तें फारच कमी झालेलें आहे. विचारांत व आचारांत सुशिक्षित लोकांचें अनुकरण करण्याकडेच सामान्य लोकांची प्रवृत्ति असते. हिंदुस्थान ह्या प्रवृत्तीला अपवाद आहे असें नाहीं, आणि सामान्य हिंदी लोकांत ही प्रवृत्ति अधिकाधिक दिसूं लागली आहे. हिंदी लोकांचे राजकीय विचार दैवी स्वरूपाचे आहेत हें सिद्ध करण्याकरितां मि. कर्टिस यांना हिंदुस्थानांतील एका रानटी जातीचें उदाहरण घ्यावें लागलें ह्यावरूनहि हीच गोष्ट सिद्ध होते हिंदुस्थानांतील प्राथमिक स्थितींत असलेल्या एखाद्या जातींत दैवी स्वरूपाचे राजकीय विचार अद्याप आढळून येत असतील. परंतु सामान्य हिंदी लोक कांहीं रानटी नाहींत. शिवाय ज्या रानटी जातीचें मि कर्टिस यांनीं उदाहरण दिलें आहे तिनें सुद्धां खालील कोर्टाचा ठराव म्हणजे परमेश्वराचा ठराव असें न समजतां प्रीव्हि कौन्सिलकडे धांव घेतली ही गोष्ट मोठी अर्थसूचक आहे. प्रीव्हि कौन्सिलनें तिला अनुकूल असा ठराव दिल्यामुळें त्याबद्दल तिनें कांहीं धार्मिक विधी करून आपला आनंद व्यक्त केला असेल, परंतु आनंद व्यक्त करण्याच्या ह्या पद्धतीमुळें त्या जातीचे राजकीय विचार दैवी स्वरूपाचे आहेत असें अनुमान जर मि. कर्टिस काढतात तर, तिनें हायकोर्टाचा

ठराव दैवी ठरावाप्रमाणें न मानून त्याविरुद्ध प्रीव्हि कौन्सिलकडे अपील केलें ह्या गोष्टीवरून विरुद्ध प्रकारचें अनुमान कां काढूं नये ? सारांश, मि. कर्टिस म्हणतात त्याप्रमाणें सामान्य हिंदी लोकांचेहि राजकीय विचार केवळ दैवी स्वरूपाचे आहेत असें नाहीं. अधिकारीवर्गास ते अतिशय, किंबहुना कांहीं पाश्चात्य देशांतील लोकांपेक्षां फारच अधिक, मान देतात हें खरें. प्रातिनिधिक संस्थांच्या द्वारें लोकमत व्यक्त करून अधिकाऱ्यांच्या अनियंत्रितपणाला आळा घालण्याची त्यांना संधि न मिळाल्यामुळें अधिकाऱ्यांच्या हातून जुलूम झाला तर ते अधिक निमूटपणें सहन करितात हेंही खरें आहे. चांगल्या राजाबद्दल किंवा चांगल्या अधिकाऱ्याबद्दल त्यांना अतिशय पूज्यभाव वाटतो हेंही आम्ही कबूल करितों. परंतु त्यावरून त्यांच्या राजकीय कल्पना अगदीं दैवी स्वरूपाच्या आहेत असें अनुमान काढणें चुकीचें आहे त्यांच्याहि विचारांत व आचारांत स्थित्यंतरें होत आहेत. आणि त्यांनाही परिस्थित्यनुरूप राजकीय शिक्षण मिळून त्यांचेहि विचार अर्वाचीन प्रकारचे होऊं लागले आहेत. महत्त्वाचीं व वजनदार वर्तमानपत्रें आणि मासिकें खेड्यापाड्यांत जाऊन त्यांतील विचार त्यांच्या कानावर पडूं लागले आहेत. ह्या सर्व गोष्टी बड्या अधिकाऱ्यांना किंवा मोठमोठ्या शहरीं राहून व बड्या अधिकाऱ्यांचा पाहुणचार खाऊन लोकस्थिति जाणूं इच्छिणाऱ्या युरोपियन प्रवाशांना कदाचित् कळणार नाहींत. परंतु ज्यांचा जन्म हिंदुस्थानांतच झाला आहे आणि ज्यांना सामान्य लोकांची स्थिति काय आहे याचा प्रत्यक्ष अनुभव आहे अशा सुशिक्षित हिंदी लोकांना ह्या सर्व गोष्टी पूर्णपणें माहीत आहेत. सामान्य लोकांचा आत्मा परकीय लोकांना पूर्णपणें जाणतां येणें अशक्य आहे. मि. कर्टिस हे जर सुशिक्षित हिंदी लोकांच्या बरोबर खेड्यापाड्यांतून प्रवास करतील आणि सामान्य लोकांत मिळूनमिसळून त्यांचें हृद्गत ओळखण्याचा प्रयत्न करतील तर त्यांना सामान्य लोकांच्या सामाजिक व राजकीय विचारांत झालेलीं व होत चाललेलीं स्थित्यंतरें समजून आल्याशिवाय राहाणार नाहींत. कांहीं दिवसांपूर्वी सर नारायण चंदावरकर यांनीं गव्हर्न्मेंट ऑफ इंडिया अमेंडमेंट ॲक्ट ह्या विषयावर टाइम्स ऑफ इंडियांत लेखमाला प्रसिद्ध केली होती. तींत त्यांनीं स्वराज्य म्हणजे काय, वगैरे राजकीय गोष्टी सामान्य हिंदी लोकांनाहि कशा समजतात हें दाखविलें होतें. त्या लेखमालेवरून सामान्य हिंदी लोकांच्या मनःस्थितीची जशी कल्पना येण्यासारखी आहे तशी एखाद्या बड्या

पोलीस अंमलदाराबरोबर खेड्यांत प्रवास करून होणें शक्य नाहीं, ही गोष्ट मि. कर्टिस यांना सांगण्याची आम्ही परवानगी घेतों. आणि म्हणून वरील लेखमाला त्यांनीं अवश्य वाचावी अशी त्यांना आमची शिफारस आहे.

हिंदुस्थानाला स्वराज्य न देण्याबद्दल मि. कर्टिस यांनीं भिन्नभिन्न ठिकाणी जीं भिन्नभिन्न कारणें दिली आहेत, त्यांचा येथपर्यंत विचार झाला. साम्राज्यांतील प्रत्येक भागाला अतएव हिंदुस्थानाला सरतेशेवटीं स्वराज्य दिलें पाहिजे व म्हणून हिंदी लोकांना आस्ते आस्ते स्वराज्याचें शिक्षण दिलें पाहिजे, असें मि. कर्टिस यांचें मत आहे, हें खरें. परंतु आजच हिंदुस्थान स्वराज्याला पात्र झाला आहे असें त्यांचें मत नाहीं व म्हणून युद्धानंतर साम्राज्याची जी पुनर्घटना व्हावी असा त्यांचा अभिप्राय आहे, तीत हिंदुस्थानाला स्वराज्य देण्यांत यावें अशी त्यांची योजना नाहीं. त्यांच्या योजनेंत महत्त्वाचा जो दोष आहे तो हाच होय. ध्येयाच्या दृष्टीनें ते हिंदी स्वराज्याचें समर्थन करितात, परंतु हिंदी लोक अद्याप स्वराज्याला पात्र झाले नाहींत व त्यांना **आस्ते आस्ते** स्वराज्याचें शिक्षण दिलें पाहिजे, ह्या कोत्या व चुकीच्या समजुतींनीं त्यांना अद्याप सोडलें नाहीं, व ह्यामुळें त्यांची साम्राज्यपुनर्घटनेची योजना एकदेशीय व अपूर्ण झाली आहे. मि. कर्टिस यांनीं **हिंदी लोकांस पत्र** ह्या नांवाचें नुकतेंच एक पुस्तक प्रसिद्ध केलें आहे. त्यांत त्यांनीं हिंदी लोकांना स्वराज्याचें शिक्षण **आस्ते आस्ते** दिलें पाहिजे असें न म्हणतां हिंदी लोकांना स्वराज्याचें शिक्षण **शक्य तितक्या लवकर** दिलें पाहिजे असें म्हटलें आहे. **आस्ते आस्ते** आणि **शक्य तितक्या लवकर** यांत अर्थातच फरक आहे. आणि मि. कर्टिस यांच्या मतांत झालेला हा फरक अभिनंदनीय आहे. परंतु हिंदी लोक स्वराज्याला अद्याप पात्र झालेले नाहींत हें मत चुकीचें आहे अशी अद्याप त्यांची खात्री झालेली दिसून येत नाहीं. जोंपर्यंत मि. कर्टिस यांना किंवा दुसऱ्या कोणालाही असें वाटत आहे कीं, हिंदी लोक आपला राज्यकारभार चालविण्यास अद्याप पात्र झाले नाहीत, तोंपर्यंत त्यांच्या साम्राज्यपुनर्घटनेच्या योजनेंत दोष हे राहणारच व म्हणून मि. कार्टिस यांना व त्यांच्या मताचे जे कोणी असतील त्यांना आमचें असें सांगणें आहे कीं, हिंदुस्थान स्वराज्याला अद्याप लायक झाला नाहीं ही भ्रामक कल्पना त्यांनीं अजिबात सोडून द्यावी आणि नंतर साम्राज्याच्या प्रश्नाचा विचार करावा.

यावर मि. कार्टिस कदाचित् असा आक्षेप घेतील कीं, "तुम्हीही आजच पूर्ण स्वराज्य मागत नाहीं. राष्ट्रीय सभेनें आणि ऑल-इंडिया मॉस्लेम लीगनें जीं

सुधारणांची योजना तयार केली आहे तींतही तुम्हीं पूर्ण सत्ता मागितलेली नाहीं. तेव्हां तुम्ही स्वराज्याला अद्याप लायक झालां नाहीं हें तुमच्या मागणीवरूनच दिसून येत नाही काय ? " राष्ट्रीय सभेनें आणि मॉस्लेम लीगनें तयार केलेल्या सुधारणांच्या योजनेंत पूर्ण सत्ता मागण्यांत आली नाही हें खरें, परंतु ह्यावरून जर कोणतें अनुमान निघत असेल तर तें आमच्या मागण्या नेमस्त व सयुक्तिक आहेत हें होय. आयर्लंड कित्येक वर्षे स्वराज्याची मागणी करीत आहे व त्यानेंही पूर्ण सत्ता मागितलेली नाहीं. परंतु त्यावरून आयरिश लोक स्वराज्याला अद्याप पात्र झाले नाहींत असें अनुमान काढणें बरोबर होईल काय ? फार लांब कशाला ? युद्ध करणें, तह करणें वगैरे ज्या परराष्ट्रीय बाबी आहेत त्यांच्या नियमनांत आम्हांला भाग द्या अशी मागणी कॅनडा, आस्ट्रेलिया, दक्षिण आफ्रिका वगैरे स्वयंशासित वसाहतींनीं अगदीं अलीकडे केली आहे. सन १९११ सालीं साम्राज्यपरिषद् भरली होती. तींत न्यूझीलंडचे मुख्य प्रधान सर जोसेफ वॉर्ड यांनीं साम्राज्याचें स्वतंत्र पार्लमेंट आणि स्वतंत्र प्रधानमंडळ असावें अशी सूचना आणली होती. साम्राज्याच्या कारभारांत आम्हांला भाग देण्यांत यावा अशी जर स्वयंशासित वसाहतींतर्फे प्रथमच स्पष्ट मागणी करण्यांत आली असेल तर तीं हीच होय. यापूर्वीं अशा प्रकारच्या मागण्या ज्या मधून मधून करण्यांत आल्या होत्या, त्या एक तर स्पष्ट स्वरूपाच्या नव्हत्या. परंतु त्या मागण्यांच्या स्वरूपापेक्षां अधिक लक्षांत घेण्यासारखी गोष्ट म्हटली म्हणजे त्या, वसाहतवाल्यांनीं केलेल्या नसून ब्रिटिश लोकमताच्या कांहीं पुढाऱ्यांनीं केल्या होत्या. सारांश, १९११ सालापूर्वीं, ब्रिटिश साम्राज्याच्या कारभारांत आम्हांला भाग द्या, अशी कोणत्याही वसाहतीनें स्पष्ट मागणी केली नव्हती. १९११ सालीं न्यूझीलंडच्या मुख्य प्रधानानें अशा प्रकारची मागणी केली; परंतु ती इतर सर्व वसाहतींना पसंत पडली नाही. आणि सरतेशेवटीं तिला युद्धपरिषदेंत वाटाण्याच्या अक्षताच मिळाल्या. अद्यापिही साम्राज्याचें स्वतंत्र पार्लमेंट व प्रधानमंडळ असावें आणि अशा रीतीनें वसाहतवाल्यांना साम्राज्याच्या कारभारांत भाग देण्यांत यावा, हें मत सर्वच वसाहतवाल्यांना पसंत आहे असें नाहीं, ही गोष्ट मि. कर्टिस हेच कबूल करितात. सारांश साम्राज्याच्या राज्यकारभारांत वसाहतवाल्यांना भाग देण्याबद्दल खुद्द वसाहतींतील लोकमत पूर्ण तयार झालेलें नाहीं व म्हणून वसाहतींतील सरकारांनीं किंवा लोकांनीं अशी स्पष्ट मागणीही केलेली नाहीं. परंतु त्यावरून वसाहतवाले

साम्राज्याचा कारभार चालविण्यास अद्याप लायक झाले नाहींत असें अनुमान काढणें बरोबर होईल काय? तें जर बरोबर होणार नाहीं तर हिंदी लोकांनीं स्वराज्याचे पूर्ण हक्क मागितले नाहींत ह्यावरून हिंदी लोकांत अद्याप स्वराज्याची पात्रता उत्पन्न झालेली नाहीं हें अनुमानही बरोबर नाहीं असें कां म्हणूं नये? पात्रता अंगीं असली म्हणजे तिला अनुरूप राज्यव्यवस्था पूर्णपणें स्थापन करितां येतेच असें नाहीं. राज्यकारभाराचें चालू असलेलें यंत्र अजिबात टाकून देऊन त्याऐवजीं निराळें नवीन यंत्र स्थापन करणें व्यवहार्य नसेल, किंवा व्यवहार्य असूनही थोडाबहुत अपाय झाल्याशिवाय तें स्थापन करणें शक्य नसेल, आणि अशा दृष्टीनें विचार केला असतां विवक्षित परिस्थितीत एकदम क्रांतिकारक फेरबदल करणें योग्य व इष्ट नसेल. परंतु पात्रता आणि नवीन राज्यव्यवस्थेची स्थापना यांमध्यें अन्योन्य निकट संबंध असतोच असें नाहीं. एखाद्या विवक्षित राज्यपद्धतीविषयीं पात्रता असूनही लोक त्या पद्धतीपेक्षां कमी प्रतीची राज्यपद्धति मागण्यास तयार होतील; परंतु त्यावरून पात्रतेविषयीं भलतींच अनुमानें काढणें कधीही योग्य होणार नाहीं. राष्ट्रीय सभेच्या आणि मॉस्लेम लीगच्या योजनेंत स्वराज्याचे पूर्ण हक्क मागण्यांत आले नाहीत ही गोष्ट हिंदी लोकांची स्वराज्यविषयक अपात्रता दर्शवीत नसून त्यांचा नेमस्तपणा आणि व्यवहार्य मुत्सद्दीपणा मात्र सिद्ध करीत आहे.

## मि. मॉंटेग्यु यांनीं जाहीर केलेलें धोरण.

तारीख २० आगष्ट रोजीं पार्लमेंट सभेंत एका सभासदाच्या प्रश्नाला उत्तर देतांना हिंदुस्थानचे नवीन स्टेट सेक्रेटरी मि. मॉंटेग्यु यांनीं खालीं दिलेलें धोरण जाहीर केलें. ते म्हणाले, " **हिंदुस्थानच्या राज्यकारभाराच्या प्रत्येक शाखेंत हिंदी लोकांना अधिकाधिक भाग देणें, आणि ब्रिटिश साम्राज्याचा घटक ह्या नात्यानें हिंदुस्थानांत जबाबदार राज्यपद्धति अधिकाधिक प्रमाणानें स्थापन करण्याच्या हेतूनें स्वराज्य-संस्थांचा आस्ते आस्ते विकास करणें, हें ब्रिटिश सरकारचें धोरण असून तें हिंदुस्थान सरकारासही पूर्णपणें मान्य आहे. या धोरणाला अनुसरून महत्त्वाच्या सुधारणा शक्य तितक्या लौकर अंमलांत आणण्याचें ब्रिटिश सरकारनें ठरविलें आहे. त्या सुधारणा कोणत्या हें ठरविण्यापूर्वीं हिंदुस्थानांतील व विलायतेंतील अधिकाऱ्यांनीं औपचारिक पद्धतीचा अवलंब न करितां विचार-विनियम करावा हें अत्यंत महत्त्वाचें आहे, असेंही त्यांनीं ठरविलें आहे. यास्तव मीं हिंदुस्थानांत जावें, आणि व्हाइसरॉयाबरोबर या गोष्टीचा खल करावा, तसेंच व्हाइसरॉयाबरोबर प्रांतिक सरकारांच्या मतांचा विचार करावा, आणि प्रातिनिधिक संस्था आणि व्यक्ती यांच्या सूचना काय आहेत त्या ऐकून घ्याव्या, अशी व्हाइसरॉयांनीं केलेली सूचना मीं स्वीकारावी असें ब्रिटिश सरकारनें राजेसाहेबांच्या संमतीनें ठरविलें आहे. मला आणखी एक गोष्ट सांगणें जरूर वाटतें ती ही कीं, या धोरणाला अनुसरून जी प्रगति करावयाची ती पायरीपायरीनेंच घडून येणारी आहे. हिंदी लोकांच्या कल्याणाची जबाबदारी ब्रिटिश सरकार आणि हिंदुस्थान सरकार यांचेवर आहे. सबब, या धोरणाला अनुसरून जी सुधारणा करावयाची ती किती व केव्हां करावयाची याचा निर्णय त्यांनींच केला पाहिजे; आणि तो निर्णय करितांना, या धोरणाला अनुसरून ज्यांना देशसेवेच्या नवीन**

**संधी मिळतील ते सरकारबरोबर कितपत सहकारिता करितील, आणि त्यांच्या जबाबदारीच्या जाणीवेवर विश्वास कितपत ठेवतां येईल, या दोन गोष्टींचा विचार करावा लागेल. सरकारतर्फे सुधारणांची जी योजना तयार करण्यांत येईल तिची हिंदी लोकांना चर्चा करण्याला भरपूर संधि देण्यांत येईल, आणि नंतर ती पार्लमेंटाच्या संमतीकरितां तिजपुढें मांडण्यांत येईल.**

*　　*　　*　　*

मि. मॉंटेग्यु हे हिंदुस्थानच्या स्टेट सेक्रेटरीच्या पदावर आरूढ होऊन फार दिवस झाले नाहींत तोंच त्यांनीं हें धोरण जाहीर केलें, ही मोठी समाधानाची गोष्ट आहे, आणि त्याबद्दल आम्ही त्यांचें मनःपूर्वक अभिनंदन करितों. मि. मॉंटेग्यु यांना जेव्हां भारतमंत्री नेमण्यांत आलें, तेव्हां सरकारच्या हिंदुस्थान-विषयक धोरणांत लौकरच फरक पडेल अशी हिंदी लोकांच्या मनांत आशा उत्पन्न झाली होती, आणि ती निरर्थक ठरली नाहीं हें पाहून आम्हांला फार समाधान वाटतें. वास्तविक पाहतां, अशा प्रकारचें धोरण यापूर्वीच जाहीर करावयास पाहिजे होतें, आणि या बाबतींत सरकारकडून जर दिरंगाई झाली नसती तर हिंदुस्थानसरकारच्या संमतीनें प्रांतिकसरकारांनीं स्वीकारलेलें दडपेगिरीचें धोरण स्वीकारण्यांत आलें नसतें, आणि मिसेस बेझंट व त्यांचे साथीदार यांना अटक केल्यामुळें सर्वत्र पसरलेला असंतोष उत्पन्न झाला नसता. सरकारच्या हातून अशी दिरंगाई कां झाली हें आज समजण्याला मार्ग नाहीं. कदाचित् अशा प्रकारचें धोरण जाहीर करण्याला माजी स्टेट सेक्रेटरी मि चेंबरलेन हे अनुकूल नसतील. तें कसेंही असलें, तरी हिंदुस्थानांत आज माजलेल्या असंतोषाचें मूळ कारण सरकारची दिरंगाई होय यांत शंका नाहीं. मि. मॉंटेग्यु यांनीं आणखी दिरंगाई होऊं दिली नाहीं, आणि हिंदुस्थानच्या वस्तुस्थितीचें लौकरच आकलन केलें याबद्दल ते स्तुतीस पात्र आहेत. त्यांनीं जाहीर केलेलें धोरण अत्यंत महत्त्वाचें असून त्यामुळें हिंदी लोकांचा असंतोष अंशतः तरी कमी होईल, असें आम्हांस वाटतें. मि. मॉंटेग्यु यांनीं जाहीर केलेलें धोरण त्यांचें एकट्याचेंच नसून ब्रिटिश सरकारचें आहे हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. आणि ब्रिटिश सरकारची सध्यांची घटना लक्षांत घेतां त्या धोरणाचें महत्त्व अधिकच आहे. ब्रिटिश प्रधानमंडळांत आज सोशयालिस्ट पक्षाखेरीज सर्व पक्षांचे प्रतिनिधी आहेत,

आणि प्रधानमंडळांतील जें प्रमुख पोटमंडळ **वॉर कॅबिनेट** त्यांत तर लॉर्ड कर्झनसारखे एकेकाळी हिंदी लोकांच्या आकांक्षांना पायाखालीं तुडवून त्यांना तृणवत् मानणारे साम्राज्यवादी आहेत. तेव्हां मि. मॉंटेग्यु यांनीं जाहीर केलेलें धोरण एकाच पक्षाचें नसून, त्यावर सर्व पक्षांनीं आपल्या पसंतीचा शिक्का मारला आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. प्रधानमंडळांत सोशयालिस्टपक्षाचे प्रतिनिधी नाहीत हें आम्हीं वर म्हटलेंच आहे. परंतु त्या पक्षाची मतेंच अशीं आहेत कीं, तो हिंदुस्थानात स्वराज्य स्थापण्याला प्रतिकूल असणें शक्य नाहीं. तेव्हां मि. मॉंटेग्यु साहेबांनी जाहीर केलेलें धोरण सर्व ब्रिटिश राष्ट्राचें आहे या म्हणण्याला, प्रधानमंडळांत सोशयालिस्ट पक्षाचे प्रतिनिधी नाहींत या गोष्टीनें बाध येत नाहीं. असो. सुधारणांच्या प्रश्नाचा हिंदुस्थान सरकाराबरोबर खल करण्याकरितां स्वतः मॉंटेग्युसाहेब येणार आहेत हीहि समाधानाची गोष्ट आहे. व्हाइसरॉयसाहेबांनीं त्यांना हिंदुस्थानांत येण्याचें आमंत्रण दिलें याबद्दल त्यांचेंहि अभिनंदन करणें अवश्य आहे. ब्रिटिश सरकारनें आपलें हिंदुस्थानविषयक धोरण लौकरच जाहीर करावें असा व्हाइसरॉयसाहेबांचा एकसारखा तगादा लागला होता, असें आतां प्रसिद्ध झालें आहे. असें जर होतें तर ही गोष्ट हिंदुस्थानसरकारनें यापूर्वीच कां प्रसिद्ध केली नाहीं हें आम्हांस समजत नाहीं. ब्रिटिश सरकारनें आपलें धोरण लौकरच प्रसिद्ध करावें अशी आम्हीं विनंति केली असून त्याप्रमाणें तें जाहीर करण्यांत येईल, अशी जर हिंदुस्थान-सरकारनें प्रेसनोट काढली असती तर त्यांच्याबद्दल झालेला गैरसमज थोडा तरी कमी झाला असता. लोकांची उत्कंठा अत्यंत वाढली असतां सरकारनें अशा प्रकारचें मौन स्वीकारणें हें खात्रीनें मुत्सद्दीपणाचें लक्षण नाहीं. सारांश, या सुधारणांच्या प्रश्नाच्या बाबतींत सरकारच्या हातून आजपर्यंत अनेक चुका झाल्या आहेत. त्यांची पुनरावृत्ति न होवो, ही आमची आशा आहे

* * *

## मि. मॉंटेग्यु व जबाबदार राज्यपद्धति.

हिंदुस्थानांत जबाबदार राज्यपद्धति स्थापन करणें हें ब्रिटिश सरकारचें ध्येय आहे, हें मि० मॅंटेग्यु यांनीं आपलें भाषणांत नमूद केलें आहे, ही समाधानाची गोष्ट आहे. परंतु त्यांच्या भाषणाचा सूक्ष्म रीतीनें विचार केला असतां असें दिसून येईल कीं, हें ध्येय त्यांनीं जितक्या स्पष्ट रीतीनें व्यक्त करावयास पाहिजे

होतें तितक्या स्पष्ट रीतीनें व्यक्त केलेलें नाहीं· या ध्येयाला त्यांच्या वाक्यांत प्रमुखस्थान दिलेलें नसून गौणस्थान दिलेलें आहे. सबब मि० मॉंटेग्यु यांच्या वरील विधानामुळें हिंदी लोकांना पूर्ण समाधान वाटतां कामा नये. हिंदुस्थानांत जबाबदार राज्यपद्धति स्थापन करणें हें ब्रिटिश राजनीतीचें धोरण आहे, असा जाहिरनामा बादशहांनीं काढावा अशी राष्ट्रीय सभेची मागणी आहे. आणि तिला अनुसरून गेल्या आगष्ट महिन्यांत भरलेल्या ऑल-इंडिया कॉंग्रेस कमिटी आणि ऑल-इंडिया मॉस्लेम लीग यांच्या संयुक्त परिषदेनें स्टेट सेक्रेटरीसाहेबांस विनंति केली आहे. तेव्हां मि० मॉंटेग्यु यांचें विधान पुरेसें न समजतां राष्ट्रीय सभेच्या ठरावाप्रमाणें बादशहांचा जाहिरनामा प्रसिद्ध होणें अवश्य आहे, आणि हा जाहिरनामा काढण्याला आतां बिलकूल विलंब होतां कामा नये, असा आपण आग्रह धरला पाहिजे. हा जाहिरनामा प्रसिद्ध करण्याला मि० मॉंटेग्यु यांच्या हिंदुस्थानांतील आगमनाची यत्किंचितही आवश्यकता नाहीं. आणि तो प्रसिद्ध झाल्याशिवाय स्वराज्याचें ध्येय ब्रिटिश सरकारनें व जनतेनें निःसंशय मान्य केलें आहे, अशी हिंदी लोकांची खात्री होणार नाहीं. यासंबंधानें आमची आणखी अशी सूचना आहे की, ज्या सुधारणा हिंदुस्थानांत अमलांत आणण्याचें सरते शेवटीं ठरेल त्याकरितां गव्हर्नमेंट ऑफ इंडिया ॲक्टाची जेव्हां दुरुस्ती करावी लागेल, तेव्हां त्याच्या उपोद्घातांत ( Preamble ) वरील ध्येय स्पष्टपणें नमूद करण्यांत यावें. बादशहांचा जाहिरनामा निघाला आणि गव्हर्नमेंट ऑफ इं. अक्टाच्या उपोद्घातांत स्वराज्याचें ध्येय ग्रथित करण्यांत आलें, म्हणजे हिंदुस्थानांत ब्रिटिश राजनीतीचें अंतिम ध्येय काय व तिचें धोरण कसें असावें, याबद्दल संशयाला बिलकूल जागा राहणार नाहीं. स्वराज्याचें संरक्षण करणें आणि साम्राज्यांतील प्रत्येक भागांत त्याचा प्रसार करणें हें ब्रिटिश साम्राज्याचें ध्येय आहे, असें आज, युद्धामुळें विचार व मनोवृत्ती उदात्त झाल्या असतां, सांगण्यांत येत आहे. परंतु ब्रिटिश लोकांच्या मनाची ही स्थिति युद्ध संपल्यानंतर कायमच राहील अशी खात्री नाहीं व म्हणून वर सुचविल्याप्रमाणें योजना करणें अवश्य आहे. हिंदुस्तानांत सरते शेवटीं जबाबदार राज्यपद्धति स्थापन करण्याच्या हेतूनें स्वराज्यपोषक संस्थांचें जें पोषण करावयाचें तें **आस्ते आस्ते** करावयाचें असें मि. मॉंटेग्यु यांचें म्हणणें आहे. त्यांच्या भाषणांतील हा दुसरा दोष आहे. **आस्ते आस्ते** अशी भाषा वापरण्याचें सोडून **शक्य तितकं लवकर** अशी भाषा वापरण्याला ब्रिटिश मुत्सद्यांनीं आतां शिकलें पाहिजे. **आस्ते आस्ते प्रगति** हें धोरण टाकून

**शक्य तितकी लवकर प्रगति** हें धोरण त्यांनीं स्वीकारलें पाहिजे. जबाबदार राज्यपद्धतीला पोषक अशा महत्त्वाच्या सुधारणा करण्याचें आणि त्या **शक्य तितक्या लवकर** करण्याचें ब्रिटिश सरकारनें ठरविलें आहे, ही आनंदाची गोष्ट आहे. त्या महत्त्वाच्या सुधारणा कोणत्या यासंबंधानें खल करण्याकरितां मि. मॉंटेग्यु यांनी हिंदुस्थानांत येण्याचें ठरविलें आहे, हीहि समाधानाची गोष्ट आहे. त्यांचें हिंदी लोक मनःपूर्वक स्वागत करतील यांत शंका नाहीं. त्यांच्या आगमनानें बराच फायदा होईल असें म्हणण्याला हरकत नाही. परंतु सुधारणांची योजना निश्चित करण्याकरितां त्यांनीं ठरविलेली पद्धति उत्तम आहे असें आमच्यानें म्हणवत नाहीं. हिंदुस्थानसरकारबरोबर सुधारणांच्या प्रश्नाचा खल करण्याला मि. मॉंटेग्यु हे तयार आहेत, प्रांतिक सरकारांच्या अभिप्रायांचाहि ते विचार करणार आहेत, आणि लोकपक्षीय प्रातिनिधिक संस्थांनीं केलेल्या सूचना ते लक्षांत घेणार आहेत. हें सर्व ठीक आहे. परंतु सुधारणांची शेवटची योजना तयार कोण करणार? तर स्वतः मि. मॉंटेग्यु. हिंदुस्थानसरकार, प्रांतिकसरकारें आणि प्रातिनिधिक संस्था यांच्या विचारांचा मि. मॉंटेग्यु यांना फायदा मिळणार असल्यामुळें ते जी सुधारणांची योजना सरतेशेवटीं निश्चित करतील ती समाधानकारक होईल अशी आम्हांस आशा आहे. परंतु हिंदी लोकांना पसंत पडेल अशी योजना तयार करण्याचें काम सोपें नाहीं. आणि तें मि. मॉंटेग्यु यांनी आपल्या एकट्याच्या शिरावर घेणें हें जरी त्यांच्या आत्मविश्वासाचें द्योतक असलें तरी समंजसपणाचें नाहीं असें आम्हांस वाटतें. सुधारणांची योजना तयार करण्याचे कामीं स्टेट सेक्रेटरी आणि हिंदुस्थानसरकार यांचें अंग असणें जितकें अवश्य आहे, तितकेंच जनतेच्या पुढाऱ्यांचेंहि अंग असणें अवश्य आहे. जनतेच्या पुढाऱ्यांचे विचार काय आहेत हें नुसतें समजून घेण्यानें काम भागणार नाहीं; सुधारणांची योजना तयार करण्याच्या कामीं त्यांची मदत घेतली पाहिजे. युद्धसमाप्तिनंतर साम्राज्याची जी पुनर्घटना करण्यांत येणार आहे, ती कशी असावी हें ठरविण्याकरितां मुद्दाम साम्राज्यपरिषद् भरविण्यांत येणार आहे. म्हणजे, साम्राज्याची नूतन घटना करण्याचे कामीं साम्राज्यांतील प्रत्येक स्वयंशासित आणि महत्त्वाचे देशांना भाग मिळणार आहे. साम्राज्याची पुनर्घटना कशी असावी हें ठरविण्याचें काम, ग्रेटब्रिटन, स्वयंशासित वसाहती आणि हिंदुस्थान या सर्वांवर सोंपविण्यांत येणार आहे. त्याप्रमाणेंच, हिंदुस्थानच्या राज्यकारभारांत कोणत्या सुधारणा केल्या पाहिजेत हें ठरविण्याचें

काम स्टेट सेक्रेटरी, हिंदुस्थानसरकार आणि जनतेचे प्रतिनिधी या सर्वांवर सोंपविण्यांत आलें असतें तर उत्तम झालें असतें अशी आमची पक्की समजूत आहे. आणि म्हणूनच कॉन्फरन्स भरवून सुधारणांची योजना तयार करण्यांत यावी अशी आम्हीं सूचना केली आहे. पार्लमेंटरी कमिटी न नेमतां, किंवा परिषद् न भरवितां मि. मॉंटेग्यु यांनी तिसरीच शक्कल काढली आहे. ती शक्कल जरी त्यांच्या बुद्धिमत्तेची द्योतक असली, तरी ती कॉन्फरन्सच्या कल्पनेपेक्षां अधिक चांगली आहे किंवा अधिक फलद्रूप होईल, असें आम्हांस वाटत नाहीं. कॉन्फरन्सनें तयार केलेली योजना लोकांना जितकी पसंत पडेल तितकी हिंदुस्थानसरकार वगैरे यांचा सल्ला घेऊन कां होईना, परंतु मि. मॉंटेग्यु यांनीं एकट्यानेंच तयार केलेली योजना लोकांना पसंत पडेल अशी खात्री नाहीं. आणि ती जर पसंत पडली नाहीं तर ॐ पुनश्च हरिः, या न्यायानें सरकार आणि जनता यांच्यामध्यें पुन्हा लढा सुरू होईल. हिंदुस्थानच्या राज्यकारभारांत ज्या सुधारणा करावयाच्या त्या किती व केव्हां करावयाच्या याचा निर्णय करण्याचें काम ब्रिटिश सरकार आणि हिंदुस्थानसरकार यांचें आहे, हें तत्त्व मि. मॉंटेग्यु यांनीं आपले भाषणांत घुसडून दिलें आहे. आणि त्यामुळें त्या भाषणाची किंमत बरीच कमी झाली आहे. हें तत्त्व अगदीं आक्षेपार्ह असून हिंदी लोक तें कधींहि मान्य करणार नाहींत. हिंदुस्थानच्या राज्यकारभारांत कोणत्या सुधारणा करावयाच्या आणि त्या केव्हां करावयाच्या हें ठरविण्याची जबाबदारी केवळ ब्रिटिश सरकार आणि हिंदुस्थानसरकार यांचेवर नसून हिंदी लोकांचेवरहि आहे. हिंदी लोकांच्या कल्याणाची जबाबदारी ब्रिटिश सरकार आणि हिंदुस्थानसरकार यांचेवर आहे हेंहि मि. मॉंटेग्यु यांचें म्हणणें बरोबर नाहीं. कारण हिंदी लोक आतां अजाण राहिले नसून त्यांना आपलें स्वतःचें कल्याण जितकें कळतें तितकें ब्रिटिश सरकार किंवा हिंदुस्थानसरकार यांना कळणें अशक्य आहे. हिंदुस्थानच्या राज्यकारभारांत ज्या सुधारणा करावयाच्या त्या कोणत्या व केव्हां करावयाच्या हें ठरविण्याची जबाबदारी ब्रिटिश सरकार आणि हिंदुस्थानसरकार यांचेवर आहे, हें तत्त्व इतकें घातक आहे कीं, त्याचा सर्वत्र निषेध करण्यांत आला पाहिजे. सुधारणांची योजना चर्चेकरितां प्रसिद्ध करण्यांत येईल असें मि. मॉंटेग्यु यांनीं आश्वासन दिलें आहे, परंतु तिच्यावर जी टीका होईल तिला अनुसरून तिच्यांत दुरुस्ती करण्यांत येईल असेंहि त्यांनी आश्वासन दिलें असतें तर फार बरें झालें असतें.

* * *

ब्रिटिश सरकारचें धोरण जाहीर करतांना मि. मॉंटेग्यु यांनीं केलेल्या भाषणांत वर लिहिल्याप्रमाणें दोष आहेत. परंतु एकंदरीनें विचार करितां तें बरेंच समाधानकारक आहे, हें नमूद करण्यास आम्हांस आनंद वाटतो. मि. मॉंटेग्यु हे उत्साही व कर्तृत्ववान् मुत्सद्दी असून हिंदुस्थानच्या राज्यकारभारांत खरीखुरी सुधारणा करण्याची त्यांची उत्कट इच्छा आहे असें दिसतें. तेव्हां ह्या सुधारणांच्या प्रश्नांचा समाधानकारक निकाल लावून ते हिंदी लोकांचें प्रेम संपादन करतील, आणि ब्रिटिश राज्याचा पाया अधिक दृढ करतील, अशी आम्हांस आशा आहे. सरकारचें धोरण जाहिर करून ज्याप्रमाणें त्यांनीं लोकांचा असंतोष अंशतः कमी केला आहे, त्याप्रमाणेंच मिसेस बेझंटप्रभृति व्यक्तींना लवकरच मुक्त करून हिंदुस्थानसरकारच्या संमतीनें कांहीं प्रांतिक सरकारांनीं स्वीकारलेलें दडपेगिरीचें धोरण ते जर रद्द करतील, तर हिंदी लोक त्यांचे धन्यवाद गातील. परंतु मिसेस बेझंटप्रभृति व्यक्तींना जर सोडण्यांत येणार नाहीं, आणि दडपेगिरीचें धोरण असेंच चालू राहील तर त्यांच्या आगमनानें व्हावा तसा फायदा होणार नाहीं हें आम्ही त्यांना स्पष्ट सांगण्याची परवानगी घेतों. मिसेस बेझंट व त्यांचे साथीदार यांच्या प्रकरणासंबंधानें मि. मॉंटेग्यु यांनीं खुलासेवार खलिता पाठविण्याला हिंदुस्थानसरकारास कळविलें आहे असें समजतें; आणि त्यामुळें **मद्रास मेल**सारख्या 'अँग्लो-इंडियन' पत्रकारांच्या पायाची आग मस्तकाला जाऊन त्यांनीं मि. मॉंटेग्यु यांना धमकीहि दिली आहे. परंतु असल्या धमक्यांना भीक न घालतां मि. मांटेग्यु हे आपलें कर्तव्य चोख रीतीनें करतील आणि मिसेस बेझंटप्रभृति व्यक्तींना सोडून देऊन हिंदुस्थानांतील असंतोष दूर करण्याचें श्रेय घेतील अशी आम्हांस आशा आहे.

* * *

# व्हाइसरॉयसाहेबांचें भाषण.

चालू महिन्याच्या पांचव्या तारखेला सिमला येथें हिंदी कायदे कौन्सिलची सभा भरली होती. नेहमीप्रमाणें प्रश्नोत्तराचा विधि उरकल्यावर, नेक नामदार लॉर्ड चेल्म्सफर्ड यांनी कौन्सिलचे अध्यक्ष या नात्यानें प्रास्ताविक भाषण केलें. हें भाषण बरेंच महत्त्वाचें असून, त्यांत त्यानी हिंदुस्थानसरकारच्या धोरणाचें ( Policy ) आणि आपल्या आजपर्यंतच्या दीड वर्षाच्या कारकीर्दीत आपण केलेल्या गोष्टीचें थोडक्यांत पण स्पष्ट दिग्दर्शन केलें आहे. व्हाइसरॉयसाहेबांनी आजपर्यंत केलेल्या भाषणांत हें पहिल्या प्रतीचें ठरेल, यांत शंका नाहीं; आणि त्याचें एकंदरीत सार उत्तम असल्यामुळें त्याचा हिंदी लोकमतावर व मनःस्थितीवर सुपरिणामहि झाला आहे. वास्तविक पाहतां, अशा प्रकारचें सहानुभूतिपर भाषण लॉर्ड चेल्म्सफर्ड यांनीं निदान गेल्या जानेवारीत भरलेल्या कायदे कौन्सिलच्या सभेंतच करावयास पाहिजे होतें; व त्याप्रमाणें त्यांनी केलें असतें, तर त्यांच्या धोरणाबद्दल हिंदी लोकांना जी भीति वाटत होती ती त्यांना वाटली नसती. परंतु 'तुम्ही आपलें धोरण लवकर जाहीर करा' असा टाहो हिंदी लोक एकसारखा फोडीत असतां, त्याकडे दुर्लक्ष करून उलट व्हाइसरॉयसाहेबांनी गुप्तपणें आपला सुधारणाविषयक खलिता स्टेट सेक्रेटरीकडे पाठवून दिला; आणि त्यांत त्यानीं कोणत्या सुधारणा सुचविल्या आहेत त्याचा त्यांनी मागमूसही लागूं दिला नाहीं. हिंदुस्थानासंबंधानें जें राजकीय धोरण स्वीकारावयाचें तें निश्चित करून जाहिर करण्याची जबाबदारी, लॉर्ड चेल्म्सफर्डसाहेब यांनी म्हटल्याप्रमाणें, मुख्यत्वेंकरून ब्रिटिश सरकारावर आहे, हें खरें; आणि युद्धामुळें त्या सरकारास हिंदुस्थानांतील सुधारणांच्या प्रश्नाकडे लक्ष देण्यास फुरसद झाली नाहीं, हेंहि खरें आहे. परंतु ब्रिटिश सरकार आपलें धोरण जाहिर करीतोंपर्यंत आपण ह्या बाबतींत काय करीत आहों याबद्दल चकारशब्द सुद्धां काढावयाचा नाहीं हा व्हाइसरॉयसाहेबांचा निर्धार मुत्सद्याला साजेसा होता, असें आम्हांस वाटत नाहीं. लॉर्ड चेल्म्सफर्डसाहेबच आपले भाषणांत म्हणतात कीं, आपल्या कार्यकारी कौन्सिलाच्या ( Executive Council ) पहिल्याच बैठकीत, ( १ ) हिंदुस्था

नांत ब्रिटिश राज्याचा अंतिम उद्देश कोणता व ( २ ) तो सिद्धीस नेण्याकरितां कोणते उपाय क्रमशः योजले पाहिजेत, हे दोन प्रश्न मी होऊनच कौन्सिलपुढें मांडिले. लॉर्ड चेम्स्लफर्ड यांनीं आपल्या जागेचा 'चार्ज' १९१६ च्या एप्रिल महिन्यांत घेतला, आणि त्याच महिन्यांत त्यांनीं आपल्या कार्यकारी कौन्सिलची पहिली सभा भरविली असली पाहिजे. असें जर होतें तर, गेल्या-साली सप्टेंबर महिन्यांत भरलेल्या कायदेकौन्सिलच्या सभेत, आपण वरील प्रश्नांचा विचार करीत आहों असें सांगण्याला त्यांना कोणती हरकत होती? महत्वाच्या प्रश्नासंबंधानें जनतेच्या पुढाऱ्यांना यत्किंचितहि मागमूस लागूं न देतां 'गुप्तपणें' खलबत करणें, कधींहि श्रेयस्कर होणार नाहीं. आणि अशा 'गुप्त' पद्धतीचा अवलंब केल्यानें, जर जनतेचा गैरसमज होऊन तिच्यांत असंतोष उत्पन्न झाला तर त्याबद्दल आपणच जबाबदार आहों, हें सरकारनें विसरतां कामा नये. आज हिंदुस्थानांत जरी जबाबदार राज्यपद्धति नसली तरी कमी अधिक प्रमाणानें लोकनियुक्त अशीं कायदे कौन्सिलें आहेत, आणि लोकमत दिवसेंदिवस अधिकाधिक जोरदार होऊं लागलें आहे. अशा स्थितींत गुप्त पद्धतींना फांटा देऊन, आपण काय करीत आहों, आपण कोणत्या प्रश्नांचा विचार करीत आहों वगैरे सर्व गोष्टी सरकारनें प्रजेला खुल्या अंतःकरणानें लवकर सांगितल्या पाहिजेत; नाहींतर, लोकांची उत्सुकता वृद्धिंगत होऊन गैरसमज व असंतोष यांचा फैलाव झाल्याशिवाय राहाणार नाहीं. लॉर्ड चेल्म्सफर्डसाहेब आपले भाषणांत म्हणतात कीं, आपण दिलेलीं वचनें पाळतां येतील किंवा नाहीं याबद्दल आपणास खात्री नसल्यामुळें, वचनेंच द्यावयाचीं नाहींत, असें आपलें तत्त्व आहे. वचनें देऊन तीं मोडण्यापेक्षां, मुळीं वचनेंच द्यावयाचीं नाहीत हें अधिक चांगलें, हें कोणीहि कबूल करील; परंतु यांत खरा पुरुषार्थ आहे असें मात्र आम्हांस वाटत नाहीं. खरें कर्तृत्व, वचनें देऊन तीं कांहींहि झालें तरी पाळण्यांत आहे; निदान वचनें द्यावयाचींच नाहीत असा अगदीं निर्धार असल्यास, मोठमोठाल्या गोष्टी योग्य वेळीं करून दाखविण्यांत आहे. आपण कदाचित् वचनभ्रष्ट होऊं, म्हणून वचनच द्यावयाचें नाहीं, हा मार्ग समाजाच्या संसर्गापासून आपण कदाचित् नीतिभ्रष्ट होऊं म्हणून समाजापासून अलिप्तच राहावयाचें, या मार्गासारखाच गौण व पुरुषार्थविहीन आहे. परंतु वास्तविक पाहतां, हे सर्व विचार अप्रस्तुत आहेत. व्हाइसरॉय साहेबांकडून कोणीहि वचनें मागितलीं नव्हती, व ब्रिटिश सरकारच्या संमतीशिवाय त्यांनीं दिलेलीं वचनें एका दृष्टीनें कवडीमोल आहेत.

हहि हिंदी लोक जाणून आहेत. परंतु ब्रिटिश सरकारच्या संमतीशिवाय, हिंदुस्थानांत ब्रिटिश राज्याचें ध्येय काय व तें सिद्धीस नेण्याकरितां काय केलें पाहिजे, याबद्दल हिंदुस्थानसरकारास जरी अभिवचन देतां आलें नाहीं तरी त्याबद्दल त्यांनीं अगदीं मौनव्रतच स्वीकारणें अवश्य होतें असें नाहीं. शिवाय वरील प्रश्नांचा निर्णय करणें हें आपलें काम नाहीं, तें ब्रिटिश सरकारचें काम आहे व म्हणून त्यांची वाटाघाट करण्याचें आपणांस कांहीं कारण नाहीं, हें लॉर्ड चेल्म्सफर्डसाहेबांचें तत्व जर बरोबर असेल तर त्याप्रमाणें आचरण ठेवणें हें केवळ हिंदुस्थानसरकारचें कर्तव्य नसून प्रांतिक सरकारांचेंहि आहे. व्हाइसरॉयसाहेबांनीं मात्र गप्प रहावें, परंतु गव्हर्नर, लेफ्टेनन्ट गव्हर्नर वगैरे प्रांताधिकाऱ्यांनीं वाटेल तशीं मूर्खपणाची भाषणें करून सरकारच्या धोरणाबद्दल लोकांना वाटत असलेली भीति वृद्धिंगत करावी व त्यांच्या असंतोषांत भर घालावी हा न्याय कोठला ? ब्रिटिश सरकार आपलें धोरण प्रसिद्ध करीतोंपर्यंत गप्पच बसावयाचें तर प्रांतिक सरकारांनींहि हिंदुस्थानसरकारचें अनुकरण करून गप्प बसावयास पाहिजे होतें; परंतु तसा प्रकार झाला नाहीं, हें सर्वांना माहीत आहेच. पंजाबचे लेफ्टेनंट गव्हर्नर सर मायकेल ओडवायर, व मद्रासचे गव्हर्नर लॉर्ड पेंटलंड यांनीं जर खोडसाळ भाषणें करून हिंदी लोकांच्या राजकीय चळवळीवर हल्ला केला नसता तर सरकारचे खावयाचे दांत एक व दाखवावयाचे दुसरे अशी जी कित्येक लोकांना शंका वाटूं लागली, ती वाटूं लागली असती काय? सारांश, ह्या सुधारणांच्या प्रश्नाच्या बाबतींत सरकारच्या हातून आजपर्यंत अनेक चुका झाल्या आहेत, व त्या लक्षांत घेऊनच मुख्य प्रधान मि. लॉइड जॉर्ज यांनीं मि. मॉंटेग्यु यांना स्टेटसेक्रेटरीच्या जागीं नेमिलें असावें अशी आमची समजूत आहे. असो; झालेल्या गोष्टी उकरून काढून त्यांचें चर्वितचर्वण करण्याची आमची इच्छा नाहीं. उशीरानें कां होईना, परंतु सरतेशेवटीं लोकमतास मान देऊन ब्रिटिश सरकारनें आपलें धोरण जाहिर केलें आहे, ही अत्यंत समाधानाची गोष्ट आहे. मात्र या बाबतींत आपण स्वीकारलेल्या मौनवृत्तीचें समर्थन करण्याचा लॉर्ड चेम्सफर्ड साहेब यांनीं केलेला प्रयत्न निरर्थक आहे, असें आम्हांस म्हटल्यावांचून राहवत नाहीं.

## व्हाइसरॉय साहेबांच्या भाषणाचे विभाग.

व्हाइसरॉय साहेबांच्या भाषणाचे मुख्य चार विभाग करितां येतील. पहिल्या विभागांत हिंदी सैन्यानें साम्राज्याची जी अप्रतिम सेवा केली आहे ती लक्षांत

घेऊन, त्याची स्थिति सुधारण्याकरितां सरकारनें कोणकोणत्या सुधारणा केल्या आहेत व हिंदी प्रजेचीं गाऱ्हाणीं दूर करण्याकरितां सरकारनें आजपर्यंत काय काय केलें आहे, व आणखी काय काय करण्याचा त्यांचा विचार आहे, हें सर्व सांगितलें आहे. याशिवाय, युद्धसमाप्तीनंतर ज्या राजकीय सुधारणा अंमलांत आणावयाच्या त्यांसंबंधानेंहि आपलें धोरण वरील विभागांत त्यांनीं व्यक्त केलें आहे. लॉर्ड चेल्म्सफर्ड यांच्या भाषणांतील हाच विभाग अत्यंत महत्त्वाचा असून त्याचाच प्रस्तुत लेखांत मुख्यत्वेंकरून विचार कला आहे. दुसऱ्या विभागांत शिक्षण वगैरे कार्यक्षेत्रांत सरकारनें काय केलें आहे, याचें थोडक्यांत सिंहावलोकन केलें आहे. तिसऱ्या विभागांत, द्रव्य, माणसें व युद्धसामुग्री या तीनहि बाबतींत हिंदुस्थानसरकार ब्रिटिश सरकारास कशी मदत करीत आहे व युद्धसामुग्री तयार करण्याकरितां ' म्युनिशन ' ( दारूगोळा ) बोर्डानें जो उपक्रम सुरू केला आहे त्यामुळें, देशी उद्योगधंद्यांना कसें उत्तेजन मिळत आहे, हें दाखविलें आहे, व चवथ्या विभागांत जमाबंदी व परराष्ट्रीय राजकारण यांचें संक्षिप्त सिंहावलोकन करण्यांत आलें आहे.

## नामदार बसु

आपले भाषणाच्या आरंभीं, व्हाइसरॉयसाहेबांनीं इंडिया कौन्सिलमध्यें ना. बसु यांच्या झालेल्या नेमणुकीचा उल्लेख करून असें सांगितलें कीं, ही नेमणूक आपल्या शिफारशीवरून स्टेटसेक्रेटरीसाहेबांनी केली आहे. हिंदुस्थानांतील राजकीय चळवळीची सद्यःस्थिति ज्याला स्वानुभवानें चांगली अवगत आहे, असा हिंदी सद्गृहस्थ स्टेटसेक्रेटरीच्या कौन्सिलांत असणें इष्ट आहे, असें आपणास वाटत असल्यामुळें आपण ना. बसु यांचें नांव सुचविलें असेंहि लॉर्ड चेल्म्सफर्ड यांनीं सांगितलें. ना. बसु यांना स्टेटसेक्रेटरीच्या कौन्सिलांत नेमण्यांत यावें अशी शिफारस व्हाइसरॉयसाहेबांनी केली, हें त्यांनीं चांगलें केलें यांत शंका नाहीं, आणि त्याबद्दल ते स्तुतीस पात्र आहेत. जनतेच्या पुढाऱ्यांना अशाच जबाबदारीच्या जागा अधिकाधिक प्रमाणानें देण्याचा सरकारनें उपक्रम केला पाहिजे. गव्हर्नमेंट आफ् इंडिया ॲक्टान्वयें, जमाबंदीच्या बाबीखेरीज इतर सर्व बाबतींत आपल्या कौन्सिलच्या बहुमताला धाब्यावर बसवून आपल्या स्वतःच्या मताप्रमाणें कोणतीहि गोष्ट करण्याला स्टेटसेक्रेटरीस पूर्ण अखत्यार आहे. अशी स्थिति असल्यामुळें, ना. बसूंना इंडिया कौन्सिलांत हिंदुस्थानचें फारसें कल्याण

करितां येईल, असें आम्हांस वाटत नाहीं. इतकेंच नव्हे तर हिंदुस्थानांत त्यांनीं आजपर्यंत जसें " विचारस्वातंत्र्य " व्यक्त केलें, तसें इंडिया कौन्सिलांतहि निर्भीडपणें व्यक्त करण्याचा त्यांनी निश्चय केल्यास, " प्रतिकूलमतपत्रिका " ( Minutes of dissent ) खरडून हिंदी लोकांच्या स्वातंत्र्यप्रिय व बाणेदार स्वभावाची प्रचीति स्टेटसेक्रेटरी व त्यांचे इतर कौन्सिलदार यांना वारंवार आणून जी कांही थोडीशी देशसेवा करितां येण्यासारखी असेल, तिजपेक्षां अधिक सेवा त्यांना करितां येणें बहुतेक अशक्यच आहे ! तथापि, सध्यांच्या परिस्थितींत मि० मॉंटेग्यु हे त्यांच्या मतांना बराच मान देतील, अशी आशा बाळगण्यास हरकत नाहीं. मात्र ना० बसु यांनी फारच सावधगिरीनें वागलें पाहिजे. त्यांची नेमणूक करण्यांत सरकारचा एक असा हेतु असावा असा तर्क करण्यास हरकत नाही कीं, आपण जी सुधारणांची योजना तयार करूं तिजबद्दल त्यांनी आपली पसंती व्यक्त केल्यास तिचा लोकांकडून स्वीकार करविण्यास सरकारास फारशी अडचण पडूं नये. कल्पना करा कीं, सरकारची योजना ना० बसूंना पसंत पडली, परंतु इतर पुढाऱ्यांना व लोकांना पसत पडली नाहीं, तर ना० बसूंच्या अभिप्रायाकडे बोट दाखवून इतरांचा विरोध अयोग्य आहे, असें म्हणण्यास सरकारास संधि मिळणार नाही काय ? यावरून उघड आहे कीं, ना० बसु हे आपल्या देशबांधवांच्या मताविरुद्ध गेले, व जी योजना त्यांना पसंत नाही ती स्वीकारण्यास ते त्यांना सांगूं लागले तर त्यांच्या नेमणुकीपासून फायदा न होतां उलट तोटाच झाला असें म्हणावें लागेल. राजनीति फार खोल असते हें आम्ही ना० बसूंना सांगावयास पाहिजे असें नाही. ज्या एकोणवीस लोकनियुक्त नामदारांनीं आपला सुधारणांचा मसुदा हिंदुस्थान सरकारकडे पाठविला, त्यांपैकी ते एक असून, त्यांत जी तत्त्वें ग्रथित केलीं आहेत, तीं ज्या योजनेंत ग्रथित केलेलीं नाहींत, अशी योजना आपणास कधीहि पसंत पडणार नाहीं असें त्यांनी बोलून दाखविलें आहे. तेव्हां ज्यांच्याबरोबर आमण हिंदुस्थानच्या कायदेकौन्सिलांत जनतेच्या हक्कांच्या समर्थनार्थ व तिच्या प्रगतीप्रीत्यर्थ सरकारशीं शेंकडों लढाया मारल्या त्या आपल्या प्रिय व विश्वासु साथीदारांच्या मताला झुगारून ते सरकारच्या पक्षाला मिळतील, असें आम्हांस वाटत नाही. वास्तविक पाहतां, त्यांनीं जी इंडिया कौन्सिलांतील जागा स्वीकारली आहे ती लोकमताचा पुरस्कार करण्याकरिता आहे, सरकारच्या कक्षांत जाऊन सरकारची योजना अप्रिय असली तरी ती लोकांवर लादण्याकरितां नव्हे; आणि आम्हांस अशी

सबळ आशा आहे कीं, जर सरकारची योजना राष्ट्रीय सभा आणि मॉस्लेम लीग यांच्या चालकांना पसंत पडली नाही तर ते आपल्या जागेचा राजीनामा देऊन तिजबद्दल आपली नापसंती व्यक्त करितील.

## हिंदी सैन्याची सुधारणा.

चालू महायुद्धांत हिंदी सैन्यानें केलेली साम्राज्याची सेवा किती अमूल्य आहे, हें महशूरच आहे. त्या सैन्याच्या जोरावरच पॅरिसवरील जर्मनीच्या स्वारीचा ओघ फ्रान्स आणि इंग्लंड यांना मागें हटवितां आला. जर फ्रान्स आणि इंग्लंड यांना हिंदी सैन्याची कुमक वेळीच मिळाली नसती तर, पॅरिस जर्मनीच्या हस्तगत होऊन, एक दोन महिन्यांच्या आंतच फ्रान्सच्या राजधानींत जर्मनीचें निशाण रोंवण्याची कैसरची महत्त्वाकांक्षा तृप्त झाली असती, आणि युद्धाचा शेवट जर्मनीला पाहिजे तसाच झाला असता. इंग्लंड आणि फ्रान्स यांच्यावर गुदरलेला हा प्रसंग टळला याचें श्रेय सर्वस्वीं हिंदी सैन्याला आहे. ज्या सैन्यानें इंग्लंड व फ्रान्स यांचें अशा रीतीनें संरक्षण केलें त्याची स्थिति सुधारून त्यानी केलेल्या कामगिरीबद्दल आपली गुणग्राहकबुद्धि अंशतः तरी व्यक्त करण्याला सरकारनें तयार व्हावें यांत कांहीं नवल नाहीं. ज्यांच्यावर आपल्या साम्राज्याची सर्व मदार आहे त्यांची स्थिति सुधारावयाची नाहीं तर कोणाची सुधारावयाची ? वास्तविक पाहतां, हिंदी सैन्याचा दर्जा वाढविण्याकरितां सरकारनें ज्या सुधारणा केल्या आहेत त्या त्यांनीं यापूर्वीच करावयास पाहिजे होत्या. आम्हांला कमिशनच्या जागा देण्यांत येत नाहींत, हा अन्याय दूर करा ही मागणी हिंदी लोक किती तरी वर्षे करीत आहेत ! परंतु संशय आणि भीति या दोन पिशाचिकांनी सरकारला आजपर्यंत घेरलें असल्यामुळें, त्यांनीं तिजकडे दुर्लक्ष केलें ! व अद्यापहि या पिशाचिकांच्या मगरमिठींतून तें पूर्णपणें मुक्त झालें आहे किंवा नाहीं, हें या बाबीसंबंधानें जे नियम करण्यांत येत आहेत ते प्रसिद्ध झाल्याशिवाय सांगतां येणार नाही. 'आम्हांवर पूर्ण विश्वास ठेवा,' असें सरकार आम्हांस वारंवार सांगतें. परंतु उलटपक्षी, आम्हांवरहि पूर्ण विश्वास ठेवा असें आम्ही सरकारला सांगतों, तेव्हां सरकार मात्र तें मनावर घेत नाहीं. असो. हिंदी लोकांना कमिशनच्या जागा यापुढें देण्यांत येतील, ही सुधारणा केल्याबद्दल आम्ही मि. मॉंटेग्यु आणि लॉर्ड चेल्म्सफर्ड यांचे मनःपूर्वक आभार मानतों. लॉर्ड चेल्म्सफर्ड यांनी या प्रश्नासंबंधानें स्टेटसेक्रेटरीकडे पाठविलेला खलिता लवक-

रच प्रसिद्ध करण्यांत येईल, आणि ही जी सुधारणा करण्यांत आली आहे, तिचा सुपरिणाम अयोग्य निर्बंधांनीं कमी न करितां, सरकार हिंदी लोकांवर पूर्ण विश्वास ठेवून खुल्या अंतःकरणानें ती अंमलांत आणील अशी आम्हांस आशा आहे. हिंदी ऑफिसरांच्या मुलांना लष्करी शिक्षण देण्याकरितां शाळा काढण्याचा सरकारचा विचार आहे, तोहि स्तुत्य आहे. परंतु या शाळेंत ऑफिसरांच्याच मुलांना घेण्यांत येईल, असा निर्बंध कां असावा हें आम्हांस समजत नाहीं. हा निर्बंध अयोग्य आहे व म्हणून तो न ठेवितां या शाळेंत इतर मुलांनाहि घेण्याची व्यवस्था झाली पाहिजे. विषमतेच्या किंवा एकाच वर्गाच्या हिताच्या पायावर रचलेले निर्बंध सरतेशेवटीं असंतोषाला कारणभूत होतात, हें सरकारनें विसरतां कामा नये.

## हिंदी लोकांचीं गाऱ्हाणीं.

सैन्यासंबंधानें आपण कोणत्या सुधारणा केल्या आहेत, हें सांगितल्यावर व्हाइसरॉयसाहेब हिंदी लोकांच्या गाऱ्हाण्यांकडे वळले आहेत. साम्राज्यपरिषदेंत हिंदुस्थानाला स्थान मिळाल्यामुळें आणि साम्राज्यप्रधानमंडळांत ( Imperial Cabinet ) वसाहतीप्रमाणें हिंदुस्थानचा प्रतिनिधि असावा असें ब्रिटिश सरकारनें ठरविल्यामुळें, त्याचा दर्जा वाढला आहे यांत शंका नाहीं. परंतु प्रधानमंडळांत एखादाच कां होईना, पण हिंदी गृहस्थ चालतो, तर एखादा हिंदी गव्हर्नर किंवा ले. गव्हर्नर नेमण्याला सरकारला हरकत कां वाटावी ? निदान त्याचप्रमाणें एखाद्या हिंदी गृहस्थाला परराष्ट्रीय वकीलाच्या, (Ambasador) किंवा त्याच्या सेक्रेटरीच्या जागी कां नेमण्यांत येऊं नये ? साम्राज्यपरिषदेला एखादा हिंदी गृहस्थ हिंदुस्थानचा प्रतिनिधि म्हणून गेल्यानें किंवा युद्ध चालू असे तोंपर्यंत, युद्धांत हिंदुस्थानकडून कशी मदत मिळण्यासारखी आहे याविषयीं सल्ला घेण्याकरितां एखाद्या **सिंहाची** साम्राज्यप्रधानमंडळांत नेमणूक केल्यानें हिंदुस्थानचा साम्राज्यांतील दर्जा जरी थोडासा वाढला तरी, तो असावा तसा होण्याकरितां हिंदुस्थानांत वसाहतीप्रमाणें स्वराज्यच स्थापन झालें पाहिजे हें उघड आहे. जोंपर्यंत हिंदुस्थानांत स्वराज्य नाही तोंपर्यंत त्याचा साम्राज्यांतील दर्जा वसाहतींपेक्षां कमीच राहणार; व हा फरक, सरकारनें साम्राज्यपरिषदेंत हिंदुस्थानतर्फे एखाद्या हिंदी अधिकाऱ्याला नेमल्यानें, किंवा साम्राज्यप्रधानमंडळांत एखाद्या हिंदी गृहस्थाला घेतल्यानें, पूर्णपणें कधींहि नाहींसा होणार नाहीं. आतां वरील गोष्टींचा स्वराज्याच्या प्रश्नाच्या बाबतींत सुपरिणाम होईल, हें आम्ही जाणून

आहों; आणि म्हणूनच **अकरणात् मंदकरणं श्रेयः** या न्यायानें वरील स्थित्यंतराबद्दल आम्हांस आनंदच वाटतो.

## हिंदुस्थान आणि वसाहती.

हिंदुस्थानासंबंधानें ब्रिटिश वसाहतींचें धोरण अन्यायाचें व आपमतलबीपणाचें आहे, या हिंदी लोकांच्या तक्रारीबद्दल लॉर्ड चेल्म्सफर्डसाहेब असें म्हणतात कीं, 'समान आचरणाचें तत्त्व' ( The principle of reciprocity of treatment ) वसाहतींच्या प्रतिनिधींनीं स्वीकारल्यामुळें हीहि तक्रार अंशतः तरी दूर झाल्याशिवाय राहणार नाहीं. शिवाय, तीन तत्त्वें आपआपल्या सरकारांनीं मान्य करावीं, अशीहि सदरील प्रतिनिधींनीं त्यांना शिफारस केली आहे. तीं तत्त्वें येणेंप्रमाणें:--

( १ ) वसाहत करण्यासंबंधानें इतर पौर्वात्य देशांतील लोकांपेक्षां हिंदी लोकांना कमी सवलती देऊं नयेत.

( २ ) जे सुशिक्षित हिंदी वसाहतीत प्रवास करण्याकरितां किंवा अभ्यासाकरितां जातील, त्यांना योग्य सवलती देण्यांत याव्या.

( ३ ) जे हिंदी गृहस्थ वसाहतीत जाऊन राहिले आहेत, त्यांना सहानुभूतीनें वागविण्यांत यावें.

'समान आचरणाचें तत्त्व' वसाहतीच्या प्रतिनिधींनीं मान्य केलें आहे, ही समाधानाची गोष्ट आहे. परंतु स्वयंशासित वसाहतींतून हिंदुस्थानांत मजूर येत नसल्यामुळें व पुढें येण्याचा संभव नसल्यामुळें या तत्त्वाची अंमलबजावणी हिंदुस्थानापेक्षां वसाहतींनाच अधिक फायदेशीर होईल, हें उघड आहे. वसाहतींतील बराचसा भाग ओसाड असतांना आणि हिंदुस्थानची लोकसंख्या आटोक्याबाहेर वाढल्यामुळें हिंदी लोकांना परदेशांत वसाहत करण्याला उत्तेजन देणें न्याय्य व इष्ट असतांना, वसाहतींनीं 'गंजींतील कुत्र्या' प्रमाणें हिंदी लोकांना कोणत्या ना कोणत्या तरी सबबीवर मज्जाव करावा, ही गोष्ट स्वार्थशील पाश्चात्य संस्कृतीला अनुसरूनच असल्यामुळें तिजबद्दल जास्त लिहिण्याचें कारण नाहीं. सध्यां इतकेंच लिहितों कीं, **जर्मन पूर्व आफ्रिका** जर इंग्लिशांच्या हातांत आला, तर पर० गोखले यांनीं सुचविल्याप्रमाणें, निदान तो तरी हिंदी वसाहतवाल्यांकरितां राखून ठेविण्यांत आला तरी देखील बरेंच काम होईल. पर० ना० गोखले यांच्या-

बद्दल प्रमुख ब्रिटिश मुत्सद्दी बराच आदर दाखवीत असतात व गोखल्यांचे राजकीय विचार किती मुत्सद्दीपणाचे व नेमस्त होते व एकोणवीस लोकनियुक्त सभासदांनी केलेल्या मागण्या किती क्रांतिकारक आहेत, हें ध्वनित करण्याकरितां **आगाखान** यांना कच्छपी घेऊन कांहीं धूर्त इंग्रज मुत्सद्यांनी त्यांच्याकरवी गोखल्यांनीं १९१५ सालीं तयार केलेली सुधारणांची योजना प्रसिद्धहि केली आहे. कै० गोखल्यांबद्दल त्यांचा खरोखर पूज्यभाव असेल, आणि त्यांची सुधारणांची योजना त्यांना खरोखर आदरणीय वाटत असेल, तर निदान पूर्व जर्मन आफ्रिका हिंदी वसाहतवाल्यांकरितां राखून ठेवावा, ही त्यांची सूचना अमलांत आणण्याला ते हरकत घेणार नाहीत अशी आम्हांस फार आशा आहे, असो; जे हिंदी गृहस्थ वसाहतींत जाऊन राहिले आहेत, त्यांना सहानुभूतीनें वागविण्यात यावें, या तत्त्वाप्रमाणें वसाहतींच्या सरकारांनी आपलें धोरण ठेवावें अशी त्यांना शिफारस करण्यांत आली आहे, ही आनंदाची गोष्ट आहे. परंतु 'सहानुभूति' हा शब्द फार लवचिक आहे, आणि मुत्सद्यांच्या मुखांतून तो तर वारंवार निघत असतो. त्याचा अर्थ जितका व्यापक आहे, तितका आकुंचितहि करितां येण्यासारखा आहे. तेव्हां हिंदी वसाहतवाल्यांना सहानुभूतीनें वागविण्यांत यावें, या तत्त्वाचें सविस्तर उद्घाटन साम्राज्यपरिषदेनें करावयास पाहिजे होतें. हिंदी वसाहतवाल्यांना सुखानें राहूं दिलें किंवा व्यापार करूं दिला म्हणजे त्यांच्याशी ठेवावयाच्या "सहानुभूतिपर वर्तनाची' सीमा झाली, असें वसाहतींच्या सरकारांना किंवा तेथील लोकाना वाटण्याचा संभव आहे. परंतु 'सहानुभूतिपर वर्तन' या शब्दसमुच्चयाचा असा आकुंचित अर्थ करणें कधींहि रास्त होणार नाहीं. जोंपर्यंत हिंदी वसाहतवाल्यांना पूर्ण नागरिकत्वाचे हक्क देण्यात येणार नाहीत, आणि ते व श्वेतवर्णी वसाहतवाले यांच्यामध्यें कृत्रिम भेदभाव करण्यात येतील, तोंपर्यंत त्यांना सहानुभूतीनें वागविण्यांत आलें, असें म्हणतां येणार नाहीं. **श्वेतवर्णी वसाहतवाल्यांना जे राजकीय हक्क आहेत, ते सर्व त्यांना देण्यांत आले पाहिजेत.** हिंदी वसाहतवाल्यांची संख्या मर्यादित करणें हें जरी एका दृष्टीनें रास्त असलें तरी त्यांना सदासर्वदा राजकीय नीच स्थितीतच ठेवणें कधींहि न्याय्य होणार नाही. सबब आमची हिंदुस्थानसरकारास अशी विनंति आहे की, त्यांनीं हिंदी वसाहतवाल्यांना पूर्ण नागरिकत्वाचे हक्क देण्यांत यावे, असा वारंवार वसाहतींच्या सरकारांना आग्रह करावा. वास्तविक पाहता साम्राज्य-परिषदेंनच याचा विचार व्हावयास पाहिजे होता. परंतु श्वेतवर्णी

वसाहतवाल्यांचे स्वार्थी दुराग्रह दूर करण्याचें काम सोपें नसल्यामुळें सर सत्येंद्र-प्रसन्न सिंह व बिकानेरचे महाराज यांना हा प्रश्न अशा स्पष्ट रीतीनें परिषदेपुढें मांडितां आला नसल्यास नवल नाही.

## मुदतबंदी मजूरपद्धति व हिंदी कापडावरील जकात.

साम्राज्यांतील हिंदी लोकांचा दर्जा वाढविण्याकरितां व वसाहतींतील त्यांचीं गाऱ्हाणीं दूर करण्याकरितां काय करण्यांत आलें आहे, हें सांगितल्यावर मुदत-बंदी मजूरपद्धति सरकारनें बंद केली आहे, या गोष्टीचा लॉर्ड चेल्म्सफर्ड यांनीं उल्लेख केला. ही पद्धति बंद केल्याबद्दल ते स्तुतीस पात्र आहेत. हिंदी कापडावरील उठविलेली जकात युद्धसमाप्तीनंतर पुन्हां बसविण्यांत येणार नाहीं व ती बसविण्याचा साम्राज्यसरकारनें प्रयत्न केल्यास त्याला हिंदु-स्थानसरकार पूर्ण विरोध करील असें व्हाइसरॉयसाहेबांनीं आश्वासन दिलें, ह्याबद्दल आम्ही त्यांचे मनःपूर्वक आभार मानितों. युद्ध संपल्यानंतर ही जकात पुन्हां बसविण्याकरितां मँचेस्टरवाले जिवापाड धडपड करतील व त्यांना संतुष्ट ठेवण्याकरितां साम्राज्य-सरकार न्यायाला व हिंदी लोकमताला कदाचित् गुंडाळू-नहि ठेवील. तेव्हां आपण दिलेलें अभिवचन पाळणें लॉर्ड चेल्म्सफर्डसाहेबांना सोपेंच जाईल असें नाहीं. परंतु मँचेस्टरवाल्यांनीं किंवा साम्राज्य-सरकारनें कितीहि नेट धरिला तरी व्हाइसरॉयसाहेब आपलें वचन पाळतील अशी आम्हांस आशा आहे. या बाबतींत हिंदी लोक त्यांना पूर्ण पाठिंबा देतील, हें सांगावयास पाहिजे असें नाही.

## हत्यारांचा कायदा.

हत्यारांच्या कायद्यांत कोणत्या सुधारणा कराव्या, याबद्दल हिंदुस्थानसर-कारनें प्रांतिकसरकारांचे अभिप्राय मागितले आहेत, ही समाधानाची गोष्ट आहे. या बाबतींत समानतेचें तत्त्व स्वीकारण्यांत येऊन काळा, गोरा वगैरे जातिविष-यक ( Racial ) भेदभाव दूर करण्याचा आमचा निश्चय झाला आहे असें लॉर्ड चेल्म्सफर्ड यांनीं आश्वासन दिल्याबद्दल आम्ही त्यांचे आभार मानतों. हत्या-रांच्या कायद्याबद्दलची हिंदी लोकांची तक्रार आजपर्यंत सरकारला व अँग्लो इंडियन अधिकारीवर्गाला वेडेपणाची वाटत होती; व त्याबद्दल कित्येक अँग्लो इंडियन पत्रकार त्यांची चेष्टाहि करीत असत. परंतु उशीरानें कां होईना, सरते-

शेवटी हिंदी लोकांची ही तक्रार निष्कारण नसून तींत बरेंच तथ्य आहे अशी सरकारची खात्री झाली आहे, ही आनंदाची गोष्ट आहे.

## दुसऱ्या तक्रारी, प्रेस-ॲक्ट.

हिंदी लोकांचीं गाऱ्हाणी दूर करण्याचा व्हाइसरॉयसाहेबांनी सुरू केलेला उपक्रम स्तुत्य होय. परंतु त्यांनीं ज्यांचा उल्लेख केला आहे, तेवढींच हिंदी लोकांचीं गाऱ्हाणी आहेत असें नाहीं. राष्ट्रीय सभा प्रत्येक वर्षी जे ठराव पास करीत असते, ते पाहिले म्हणजे हिंदी लोकांच्या लहानमोठ्या गाऱ्हाण्यांची यादी किती मोठी आहे हें कोणाच्याहि लक्षांत येईल. प्रेस ॲक्ट रद्द करावा अशी हिंदुस्थानसरकारला विनंति करण्याकरितां इंडियन प्रेस असोसिएशनतर्फे जें डेप्युटेशन गेले मार्च महिन्यांत व्हाइसरॉयसाहेबांकडे गेलें होतें, त्यास त्यांनी नकारात्मक उत्तर दिलें असल्यामुळें, त्या ॲक्टाची लॉर्ड चेल्म्सफर्डसाहेब यांनीं गाऱ्हाण्यांत गणना करूं नये हें साहजिक आहे. परंतु ही त्यांची चूक आहे. प्रेस-ॲक्टहि लवकरच रद्द झाला पाहिजे, व तो रद्द करण्याचें श्रेय व्हाइसरॉयसाहेब घेतील अशी आम्हांस फार आशा आहे. राज्यरक्षणकानूअन्वयें ज्या शेंकडों लोकांना अटकेंत ठेविलें आहे, त्यांच्या प्रकरणांची चौकशी करण्याकरितां कमिटी नेमण्यांत आली पाहिजे, व तिच्यांत हिंदुस्थानच्या कायदे कौन्सिलातील दोन चार तरी लोकनियुक्त सभासद असले पाहिजेत. प्राथमिक शिक्षण सक्तीचें झालें पाहिजे, व विश्वविद्यालयावरील सरकारचा ताबा बराच कमी झाला पाहिजे. हिंदी लोकांचीं ही सर्व गाऱ्हाणीं दूर झाली पाहिजेत. हिंदी लोकांची गाऱ्हाणीं खरीं आहेत व तीं आपण दूर केली पाहिजेत, ही भावना सरकारच्या मनांत उत्पन्न झाली आहे ही समाधानाची गोष्ट आहे, व म्हणूनच सरकार तीं शक्य तितकीं लवकर दूर करील असा आम्हांस भरंवसा आहे. निदान प्रेस-ॲक्ट रद्द करण्याला व राज्यरक्षणकानूअन्वयें अटकेंत ठेविलेल्या गृहस्थांच्या प्रकरणांची चौकशी करण्याकरितां कमिटी नेमण्याला बिलकूल विलंब होतां कामा नये, अशी आमची व्हाइसरॉयसाहेबांना आग्रहपूर्वक विनंति आहे.

## राजकीय सुधारणा.

हिंदी लोकांच्या गाऱ्हाण्यांचा विचार केल्यानंतर व्हाइसरॉयसाहेब सुधारणांच्या प्रश्नाकडे वळले आहेत. त्यांनीं कार्यकारी कौन्सिलच्या पहिल्याच सभेंत

हिंदुस्थानांत ब्रिटिश राजसत्तेचें ध्येय काय, व तें सिद्धीस नेण्याकरितां कोणते उपाय योजले पाहिजेत, हे दोन प्रश्न मांडिले, हें आम्ही वर सांगितलेंच आहे. पहिल्या प्रश्नासंबंधानें लॉर्ड चेल्म्सफर्ड म्हणतात की, हिंदुस्थानसरकारनें जें ध्येय सुचविलें तें, ब्रिटिश सरकारनें स्टेट सेक्रेटरी मि. मॉंटेग्यु यांच्या द्वारें व्यक्त केलेल्या ध्येयाहून **वस्तुतः अभिन्न** आहे. ( in substance practically indistinguishable ) परंतु लॉर्ड चेल्म्सफर्ड यानी वापरलेल्या भाषेवरून हिंदुस्थानसरकारनें सुचविलेलें ध्येय व साम्राज्य सरकारनें जाहीर केलेलें ध्येय, या दोहोंत थोडा तरी फरक असावा असें दिसतें. नाहीं तर, 'व्यवहारदृष्ट्या वस्तुतः अभिन्न' अशी शब्दयोजना त्यांनीं कां केली असती ? हें आमचें अनुमान जर खरें असेल तर मि. मॉंटेग्यु यांनी जें साम्राज्यसरकारच्या धोरणाचें 'विज्ञापन' ( Announcement ) केलें त्यांत त्यासंबंधानें दोन्ही सरकारांचें 'पूर्ण ऐकमत्य' ( Complete accord ) आहे, असें विधान त्यांनीं कसें केलें हें आम्हांस समजत नाहीं. असो; साम्राज्यसरकारनें जाहिर केलेलें ध्येय व हिंदुस्थानसरकारनें सुचविलेलें ध्येय यांत जरी थोडासा फरक असला व तो जाणण्याची इच्छा प्रस्तुत लेखकासारख्या जिज्ञासूला असली तरी, या मुद्याचें महत्त्व आतां राहिलें नाहीं, हें उघड आहे. कधीं काळी जेव्हां व्हाइसरॉयसाहेबाचा खलिता प्रसिद्ध करण्यांत येईल, तेव्हां सहजच त्याचा उलगडा होईल. सध्यां महत्वाचा मुद्दा इतकाच आहे की, जें ध्येय साम्राज्यसरकारनें जाहिर केलें आहे त्याची इ. स. १८५८ च्या राणीच्या जाहिरनाम्याप्रमाणें अवस्था न होतां, तें प्रामाणिकपणानें व निश्चयानें अव्याहत अमलांत आणण्याचा साम्राज्यसरकार, हिंदुस्थानसरकार आणि प्रांतिक सरकारें—या सर्व सरकारांनी अंतःकरणपूर्वक प्रयत्न केला पाहिजे. प्रसंगोपात्त प्रत्येक व्यक्तीची व राष्ट्राची उदात्त बुद्धि होत असते; अडचण आहे ती हीच की, ही बुद्धि सदासर्वदा टिकत नाहीं. राणीचा जाहिरनामा म्हणजे हिंदी लोकांच्या राजकीय आकांक्षाची सीमा आहे असें नाहीं; त्यांत ब्रिटिश राजसत्तेच्या अंतिम ध्येयाबद्दल एक चकार शब्दसुद्धां नाहीं. तरी देखील त्यांत दिलेलीं आश्वासनें 'अशक्य कोटींतील आहेत,' असें उघड उघड म्हणणारे लॉर्ड कर्झन हे सुलतानी व्हाइसरॉय भेटलेच. तेव्हां मि. मॉंटेग्यु यांनीं जाहिर केलेलें धोरण अव्यवहार्य आहे, अपायकारक आहे, इत्यादि विधानें करून तें अमलांत आणण्याचें कामीं अनेक अडथळे आणणारे मुत्सद्दी व अधि-

कारी निपजणार नाहींत, किंबहुना सध्याहि नसतील, अशी कोणाला खात्री देतां येईल काय? हिंदुस्थानासंबंधानें स्वराज्याचें ध्येय स्वीकारल्याबद्दल आम्हांस फार आनंद वाटतो, हें जरी खरें आहे, तरी तें ध्येय पूर्णपणें सफल होण्यापूर्वी आपल्या मार्गांत किती अडचणी उपस्थित होतील याचा नेम नाहीं, हें आपण विसरता कामा नये.

## स्वराज्याचें ध्येय सिद्धीस नेण्याचे तीन मार्ग.

आतां दुसरा प्रश्न स्वराज्याचें ध्येय सिद्धीस नेण्याकरितां कोणते उपाय अमलांत आणले पाहिजेत हा होय. ह्यासंबंधानें व्हाइसरॉयसाहेब म्हणतात कीं, तीन दिशांनी प्रगति झाली पाहिजे. पहिली दिशा स्थानिक स्वराज्याची होय. या मुद्यासंबंधानें बोलतांना लॉर्ड चेल्मसफर्ड यांनी जें एक तत्व प्रतिपादिलें आहे तें जरी नवीन नसलें तरी तें प्रत्येकानें—विशेषतः प्रत्येक अधिकाऱ्यानें—लक्षांत ठेविलें पाहिजे. तें तत्त्व हें: "चुका करण्याच्या स्वातंत्र्यापेक्षां शिक्षणाचा अधिक चांगला उगम नाहीं" ( There is no better source of instruction than the liberty to make mistakes. ) किंवा पाश्चात्य भाषासरणीचा पेहराव टाकून देऊन आपल्या भाषासरणीला साजेल अशा शब्दांनी सांगावयाचें असल्यास, 'चुका करूनच मनुष्य शहाणा होतो.' हें तत्त्व नवीन नाहीं, हें आम्हीं सांगितलेंच आहे, व या तत्त्वाचाच आधार दाखवून, 'निदान खरेंखुरें स्थानिक स्वराज्य आम्हांला द्या' अशी आम्ही मागणी करीत आलों. परंतु आपल्या स्वतःच्या हातून जरी शेंकडों चुका होत असल्या, तरी हें तत्त्व कार्यक्षमतेची ( Efficiency ) वेळीं अवेळीं बढाई मारणाऱ्या अँग्लो-इंडियन अधिकाऱ्यांना कधींहि पटलें नाहीं, व म्हणून जिला सापेक्षतेनें तरी गौण म्हणण्यास हरकत नाहीं, त्या स्थानिक स्वराज्याच्या बाबतीतहि, ज्या सालीं लॉर्ड रिपनसाहेबांनी स्थानिक स्वराज्याला प्रारंभ केला, त्या सालापेक्षां म्हणजे इ० स० १८८२ सालापेक्षां आज हिंदुस्थानचें पाऊल अधिक पुढें गेलेलें आढळून येत नाहीं. अद्यापहि वरील तत्त्व पूर्णपणें ओळखून अँग्लो-इंडियन अधिकारी आपलें वर्तन ठेवितील अशी आम्हांस आशा नाहीं, व म्हणून सरकारला जी सुधारणा करावयाची ती त्यांच्या विरोधाला न भितांच त्यानें केली पाहिजे. अमक्या सुधारणा केल्याच पाहिजेत, असा आपला निर्धार सरकारनें व्यक्त केल्यास ते विरोध करतीलच असें नाहीं; परंतु सरकारच्या हातून असा निर्धार होऊं नये, म्हणून ते शक्य तितकी खटपट

केल्याशिवाय राहणार नाहीत, हें सरकारनें कधींहि विसरतां कामा नये. आपआपल्या खात्यांत कार्यक्षमतेच्या दृष्टीनें किरकोळ सुधारणा करण्याची जरी त्यांची इच्छा असली, व त्या इच्छेप्रमाणें जरी ते प्रयत्न करीत असले तरी ज्या सुधारणांमुळें त्यांची सत्ता कमी होऊन लोकांची सत्ता वाढेल, अशा सुधारणा अमलांत आणण्याला ते मनापासून मदत करितील, अशी आशा बाळगणें म्हणजे 'ब्युराक्रसी' च्या खऱ्या स्वरूपाचें अज्ञान प्रगट करणें होय. असो. आज हिंदुस्थानांत जें स्थानिक स्वराज्य आहे तें इतकें अर्धवट आणि आकुंचित आहे कीं, त्यामुळें लोकांना धड शिक्षणहि मिळत नाही व स्थानिक स्वराज्याची कामेंहि उत्तम रीतीनें होत नाहीत. वस्तुस्थिति अशी असल्यामुळेंच हिंदी लोकांना पूर्ण स्थानिक स्वराज्य ताबडतोब देण्यांत यावें, अशी राष्ट्रीय सभेची व मॉस्लेम लीगची मागणी आहे; आणि त्या मागणीप्रमाणें सरकारच्या योजनेंत व्यवस्था होईल तरच या प्रश्नाचा समाधानकारक निकाल झाला असें म्हणतां येईल.

## दुसरी दिशा—वरिष्ठ जागा.

दुसरी दिशा हिंदी लोकांना वरिष्ठ जागा अधिक प्रमाणानें देण्याची होय. या बाबतींतहि आजपर्यंत झालेली प्रगति फारच अल्प आहे. राज्यकारभार सुयंत्रितपणें चालवितांना ज्या शेंकडों व्यावहारिक अडचणी येतात त्यांचा हिंदी चळवळ्यांना प्रत्यक्ष अनुभव नसल्यामुळें त्यांची सरकारच्या धोरणावरील किंवा कृत्यांवरील टीका विधायक नसून विध्वंसक असते, असा कित्येक अधिकाऱ्यांचा आणि अँग्लो—इंडियन पत्रकारांचा आक्षेप आहे. हा आक्षेप सर्वस्वी खरा नाही; हिंदी चळवळ्यांची टीका विधायक नसते, हें म्हणणें चुकीचें आहे. तथापि, ह्या आक्षेपांत थोडासा सत्यांश आहे हें जरी कबूल केलें तरी त्यावरून निष्पन्न एवढेंच होतें कीं, हिंदी लोकांना वरिष्ठ अधिकारांच्या जागा न देण्याचाच हा परिणाम आहे. त्यांना त्या जागा दिल्या, म्हणजे त्यांनाहि राज्यकारभारांतील व्यावहारिक अडचणी अधिक चांगल्या कळूं लागतील. लॉर्ड चेल्म्सफर्ड यांना हें तत्त्व मान्य आहे हें पाहून आम्हांस फार आनंद वाटतो. परंतु ज्यांनीं मोठमोठीं अधिकाराचीं कामें केली आहेत असे हिंदी गृहस्थ कायदेकौन्सिलांत असावेत ह्या व्हाइसरॉय साहेबांच्या म्हणण्याचा अर्थ आम्हांस नीट समजत नाहीं. अधिकार गाजविण्यांत ज्यांचा सारा जन्म गेला आहे असे गृहस्थ—मग ते हिंदी असोत किंवा अँग्लो—इंडियन असोत—जनतेचे प्रतिनिधी म्हणून जनतेच्या सभेंत ( Popular

assembly ) मिरवण्याला लायक आहेत, असें कोणीहि समजणार नाहीं. पार्लमेंटांत जे अँग्लो-इंडियन पेन्शनर आजपर्यंत निवडून आले आहेत, त्यांपैकीं बहुनेकांचें त्या सभेंत मुळींच तेज पडलें नाही, असें कलकत्त्याचे प्रसिद्ध बॅरिस्टर मि० नॉर्टन यांनीं एके ठिकाणीं म्हटलें आहे; आणि येथील कायदे कौन्सिलांत हिंदी पेन्शनर निवडून आल्यास किंवा सरकारनें त्यांची नेमणूक केल्यास, असाच प्रकार अनुभवास आल्यावांचून राहणार नाहीं.

## तिसरी दिशा—कायदेकौन्सिलें.

सुधारणेची तिसरी दिशा म्हणजे कायदे कौन्सिलें होत. इतर दोन बाबींबरोबर या बाबीसंबंधानें सरकारनें प्रगति केली पाहिजे, हें आम्हांस कबूल आहे, असें व्हाइसरॉयसाहेबांनीं सांगितलें. हा प्रश्न फार महत्त्वाचा असून त्याबद्दल मतभेद असल्यामुळें त्याचा काळजीपूर्वक विचार झाला पाहिजे, असें लॉर्ड चेल्म्सफर्ड यांचें म्हणणें आहे. या प्रश्नाचा काळजपूर्वक विचार झाला पाहिजे, हें कोणीहि कबूल करील; परंतु त्यांच्या काठिण्याचें किंवा त्याबद्दल असलेल्या मतभेदाचें अतिशयोक्तीनें वर्णन करण्याचें कारण नाहीं. ब्रिटिश मुत्सद्दीपणा खात्रीनें इतका पंगु नाहीं, कीं हिंदी लोकमताच्या सहाय्यानें तो प्रश्न समाधानकारक रीतीनें सोडविता येणार नाहीं.

## भाषणाचा दुसरा भाग.

आपल्या भाषणाच्या दुसऱ्या भागांत लॉर्ड चेल्म्सफर्ड यांनीं आपण आपल्या आजपर्यंतच्या कारकीर्दींत केलेल्या गोष्टींचें दिग्दर्शन केलें आहे; परंतु तें फारच संक्षिप्त आहे. शिक्षणाचा व विशेषतः प्राथमिक शिक्षणाचा प्रसार झाला पाहिजे, व राजकीय सुधारणांच्या प्रश्नामुळें तर शिक्षणाच्या प्रश्नाला विशेष महत्त्व आलें आहे, असें व्हाइसरॉयसाहेबांनीं सांगितलें. खुद्द इंग्लंडांत शिक्षणप्रधान ( Minister of Education ) मि. फिशर हे शिक्षणाचा प्रसार व त्यांत सुधारणा करण्याकरितां, युद्ध चालू असतांहि काय प्रयत्न करीत आहेत हें पाहिलें असतां हिंदुस्थानांत जी अगदीं अल्प प्रमाणानें शैक्षणिक प्रगति होत आहे, तिला काय म्हणावें, हें आम्हांस समजत नाहीं. हिंदुस्थानचे शिक्षणखात्याचे मंत्री सर शंकरन् नायर यांच्यासारखे हुषार व प्रागतिक हिंदी गृहस्थ आहेत हें खरें; आणि शिक्षणाचा प्रसार करण्याची त्यांची उत्कट इच्छाहि आहे परंतु त्यांच्या एकट्यांच्या हातून काय होणार ? शिवाय, 'शिक्षणाच्या

प्रसारगाचा प्रश्न म्हणजे खर्चाचा आहे. आणि म्हणून जर सरकार शिक्षणाकरितां जरूर तितका खर्च करण्याला तयार होणार नाही, तर शिक्षणाचा प्रसारहि व्हावा तसा झाला नाहीं तर त्यांत आश्चर्य कसलें ! वास्तविक पाहतां, प्राथमिक शिक्षण हें सक्तीचेंच झालें पाहिजे. इतर सर्व सुधारलेल्या देशांत प्राथमिक शिक्षण सक्तीचें असतां हिंदुस्थानांत मात्र तें तसें असू नये, हें ब्रिटिश सत्तेला लांछनास्पद नाहीं काय ? हिंदुस्थानांत प्राथमिक शिक्षण सक्तीचें नाहीं हा आपल्या राज्यावर कलंक आहे व तो लवकरच आपण धुवून टाकिला पाहिजे, अशी ब्रिटिश सरकार व हिंदुस्थानसरकार यांची भावना झाली पाहिजे. ही भावना जोंपर्यंत झाली नाहीं, तोंपर्यंत प्राथमिक शिक्षण सक्तीचें करण्याकरितां जोराचा प्रयत्न होईल, असें आम्हांस वाटत नाहीं.

## तिसरा भाग–हिंदुस्थाननें युद्धांत केलेली मदत.

आपल्या भाषणाच्या तिसऱ्या भागांत लॉर्ड चेल्म्सफर्ड यांनी युद्धांत हिंदुस्थान साम्राज्याला कशी मदत करीत आहे व त्यामुळें हिंदी उद्योगधंद्यांना कसें अप्रत्यक्ष उत्तेजन मिळत आहे, याचें सविस्तर वर्णन केलें आहे. दारूगोळा बोर्डाच्या कामामुळें, कातडी कमावणें, बूट तयार करणें वगैरे धंद्यांना बरकत आली आहे; मेसापोटेमियामध्यें बसरा आणि बगदाद यांचे दरम्यान दळणवळण चालू ठेवण्याकरितां ज्या बोटी, गलबतें वगैरे लागली त्यांपैकी शेंकडा ५७ हिंदुस्थाननें पुरविलीं आहेत; तसेंच मेसापोटेमिया, ईजिप्त, पूर्व आफ्रिका इत्यादि देशांत रेल्वे बांधून आगगाड्या सुरू करण्याकरितां लोखंड वगैरे सर्व सामानहि हिंदुस्थाननें पुरविलें आहे; इत्यादि गोष्टी व्हाइसरॉयसाहेबांनी सांगितल्या आहेत. त्यावरून एक गोष्ट निर्विवाद सिद्ध होते की, हिंदुस्थानच्या मदतीशिवाय इंग्लंडला मेसापोटेमिया कधींहि काबीज करितां, किंवा काबीज केल्यानंतर राखतां, आला नसता. माणसांची व द्रव्याची हिंदुस्थाननें दिलेली मदत अशीच अमूल्य आहे. युद्धापूर्वी सैन्याच्या भरतीसाठीं मिळणाऱ्या तरुणांचें प्रमाण सालिना सुमारें १५००० पडत होतें, ते हल्लीं पुष्कळच वाढलें आहे. लाखों हिंदी लोकांना मेसापोटेमिया, पूर्व आफ्रिका, फ्रान्स इत्यादि ठिकाणीं पाठविण्यांत आलें आहे; कारागीर, मजूर, घरगुती नोकर इत्यादिकांचीच संख्या पाऊण लाखापेक्षां अधिक झाली आहे; पांचशें हिंदी डॉक्टरांना कमिशनच्या जागा देण्यांत आल्या असून ते युद्धासंबंधीं इस्पितळांत कामें करीत आहेत. व्हाइसरॉय साहेबांनीं दिलेली ही हकीकत वाचून

नानाप्रकारचे विचारतरंग उत्पन्न होतात. हिंदुस्थानचें हें अपरंपार सामर्थ्य पाहून कोण असा अधम हिंदी मनुष्य आहे की, त्यांचें अंतःकरण अभिमानानें स्फुरण पावणार नाही! परंतु या सामर्थ्याचा फायदा हिंदी लोकांनाच पूर्णपणें केव्हां मिळणार, हा विचार लागलाच उत्पन्न होऊन मन किंचित् खिन्न होतें. आज मेसापोटेमियांत व पूर्व आफ्रिकेंत लाखों हिंदी लोक गेले आहेत व साम्राज्याकरितां आपले प्राण खर्ची घालीत आहेत. युद्ध संपल्यानंतर, तेथेंच वसाहत करून, ज्या भूमी आपल्या देशबांधवांच्या रक्तसिंचनानें पुनीत झाल्या आहेत, त्यांतच आपली जीवनयात्रा संपविण्याचें त्यांनीं मनांत आणलें, तर त्यांची हकालपट्टी होणार नाहींना? व जरी हकालपट्टी झाली नाही तरी त्यांना समानतेनें व न्यायानें वागविण्यांत येईल काय? त्यांना तेथील नागरिकत्वाचे हक्क देण्यांत येतील काय? किंवा दक्षिण आफ्रिकेंत–स्वातंत्र्याच्या, समतेच्या, न्यायाच्या लांब लांब गप्पा सोडणाऱ्या जनरल स्मट्सच्या देशांत–ज्याप्रमाणें त्यांचा स्पर्शसुद्धां ट्रामच्या गाडींत खपत नाही व एखादा हिंदी, अज्ञानानें किंवा त्यास विषमता असह्य वाटल्यामुळें, तीत जाऊन बसूं लागला तर त्यास आपल्या प्राणास मुकावें लागतें तशी त्यांची स्थिति होणार नाहीं काय? असल्या प्रकारच्या विचारांचें काहूर माजून आनंदाचें आनंदत्व व अभिमानाचें अभिमानत्व नष्ट होतें. असो; वरील प्रकार अनुभवास येणार नाहीं असा आमचा भरंवसा आहे; परंतु आमच्या दुर्दैवानें आतांच तर सुधारलेलीं राष्ट्रें सुद्धां किती कृतघ्न व स्वार्थपरायण होऊं शकतात, हें लक्षांत ठेवून, आपलें सामर्थ्य आपल्याच उन्नतीकरितां खर्च करण्याचा हिंदुस्थाननें निश्चय केला पाहिजे.

## जमाबंदी व परराष्ट्रीय राजकारण.

व्हाइसरॉय साहेबांचे भाषणांत जमाबंदीसंबंधानें महत्त्वाचा मुद्दा म्हटला म्हणजे सोन्याची नाणी पाडण्याकरितां मुंबईस **रॉयल मिंटची** शाखा लवकरच स्थापन करण्याचा सरकारचा विचार आहे, हा होय. हिंदुस्थानांत सोन्याचीं नाणी पाडण्याची व्यवस्था नसल्यामुळें पौंड आणि अर्धा पौंड हीं सोन्याचीं नाणी विलायतेहून आणावीं लागतात, व हिंदुस्थानसरकारचा रिझर्व्ह फंडहि येथें न ठेवितां विलायतेस ठेविण्यांत येतो. वास्तविक, पाहतां, या फंडाचा हिंदी व्यापाऱ्यांना उपयोग व्हावयास पाहिजे; परंतु त्याचा त्यांना फायदा न मिळतां युरोपियन व्यापाऱ्यांना मिळतो. ही व्यवस्था हिंदी उद्योगधंदे व व्यापार यांच्या वाढीच्या

दृष्टीनें हिंदुस्थानला अपायकारक आहे. ती दूर होऊन तो फंड येथेंच ठेवण्याची व्यवस्था झाली पाहिजे. युद्धामुळें जर्मन सबमरीनची जोंपर्यंत भीति आहे, तोंपर्यंत तर विलायतेहून सोन्याचीं नाणीं हिंदुस्थानांत सुरक्षित येतील अशी खात्री नाहीं. तेव्हां हिंदुस्थानांतच सोन्याचीं नाणीं पाडण्याकरितां टांकसाळ सुरू करण्याची सरकारची योजना योग्य आहे; व ती युद्धापुरतीच न करितां कायमचीच करणें अवश्य आहे. अफगाणिस्थानचे अमीर यांची हिंदुस्थानसरकारला पूर्ण मदत असून त्यामुळें वायव्य सरहद्दीवरील महसुद वगैरे रानटी जातींना कह्यांत ठेवणें सुकर झालें आहे, असें लॉर्ड चेल्म्सफर्ड यांनीं सांगितलें. तथापि, सरहद्दीवर धोका केव्हां उपस्थित होईल याची खात्री नसल्यामुळें, डोळ्यांत तेल घालून वागणें इष्ट आहे, असें त्यांचें मत आहे.

## भाषणाचा उपसंहार.

व्हाइसरॉयसाहेबांच्या भाषणाचा उपसंहार मनन करण्यासारखा आहे. त्यांत त्यांनीं हिंदी व ब्रिटिश लोकांना अशी कळवळ्यानें विनंति केली आहे कीं, युद्धामुळें जो परस्परविश्वास व जें परस्परप्रेम उत्पन्न झालें आहे, तो विश्वास व तें प्रेम हीं अनुदारपणाच्या क्षुद्र मनोवृत्तीनें त्यांनीं नाहींशीं होऊं देऊं नयेत. सरकारच्या शुद्ध हेतूवर व त्यांच्या निष्कपटी वर्तनावर पूर्ण भरंवसा ठेवण्यांत यावा, अशीहि त्यांनीं हिंदी पुढाऱ्यांना विनंति केली आहे. हिंदुस्थानचें वातावरण, परस्परविश्वास व सहकारिता या उदात्त भावनांच्या आनंददायी किरणांनीं भरून गेलें पाहिजे, व अशा वातावरणांत, मि. मॉंटेग्यु येतील तेव्हां सुधारणांच्या प्रश्नाचा, विवेक, व्यवहार व न्याय या सर्वांच्या दृष्टीनें योग्य निर्णय झाला पाहिजे, असें सांगून लॉर्ड चेल्म्सफर्ड यांनीं आपल्या भाषणाचा उपसंहार (Peroration) केला आहे. व्हाइसरॉयसाहेबांनीं केलेला हा उपदेश हिंदी लोक लक्षांत ठेवतील, व त्यांनीं केलेल्या विनंतीस ते पूर्ण मान देतील, याबद्दल आम्हांस बिलकूल शंका वाटत नाहीं. आम्हांस शंका वाटते ती हीच कीं, त्यांच्या उपदेशाचा व त्यांच्या विनंतीचा अँग्लो-इंडियन लोकांवर कितपत परिणाम होईल. हिंदुस्थान सरकारचें ठाणें कलकत्त्याहून दिल्लीस हालविल्याबद्दल लॉर्ड हार्डिंज यांच्यावर कलकत्त्याच्या अँग्लो-इंडियन व्यापाऱ्यांनीं ज्याप्रमाणें टीकेचा भडिमार केला, त्याप्रमाणेंच मि. मॉंटेग्यु व लॉर्ड चेल्म्सफर्ड यांचेवर भडिमार करण्यास कलकत्ता, मद्रास वगैरे ठिकाणच्या अँग्लो-इंडियन लोकांनीं सुरुवात केली आहे; आणि लॉर्ड रिपन-

साहेबांच्या कारकीर्दीत इलबर्ट बिलाविरुद्ध अँग्लो-इंडियन लोकांनीं ज्याप्रमाणें चळवळ सुरू केली त्याप्रमाणें हिंदी लोकांनीं मागितलेल्या सुधारणांविरुद्ध ते चळवळ करितील, अशीं चिन्हें दिसूं लागलीं आहेत. असें जर झालें तर मि. मॉंटेग्यु यांचा मार्ग बिकट होणार नाहीं काय? आणि हिंदी व ब्रिटिश लोकांनीं सहकारितेनें वागावें या व्हाइसरॉयसाहेबांच्या विनंतीची किंमत ती काय राहिली? आपल्या कांहीं अँग्लो-इंडियन देशबंधूंनीं हा जो अदूरदर्शीपणाचा मार्ग स्वीकारिला आहे तो त्यांनी सोडून द्यावा अशी आग्रहपूर्वक विनंति जर लॉर्ड चेल्म्सफर्डसाहेब त्यांना करितील, तर 'शांततेचें वातावरण' उत्पन्न होण्याला बरीच मदत होईल. मि० मॉंटेग्यु व लॉर्ड चेल्म्सफर्ड यांच्या परीक्षेची हीच वेळ आहे, व आपल्या अँग्लो-इंडियन देशबांधवांच्या ओरडीला भिऊन ते कर्तव्यपराङ्मुख होणार नाहींत अशी आम्हांस फार आशा आहे. मि० मॉंटेग्यु यांचें हिंदुस्थानांतील आगमन सुपरिणामी होऊन त्यांचे हातून राजकीय सुधारणांचा प्रश्न समाधानकारक सुटावा, अशी हिंदी लोकांची मनापासून इच्छा आहे. परंतु मि० मॉंटेग्यु हे स्टेट सेक्रेटरी होऊन त्यांनीं आपलें सहानुभूतिपर धोरण व्यक्त केल्याबरोबर कित्येक अँग्लो-इंडियन गृहस्थांचें पित्त इतकें कां खवळावें हें आम्हांस समजत नाहीं. सुधारणांच्या योजनेंत अँग्लो-इंडियन वर्गाच्या हितसंबंधाचे हितसंरक्षण करण्यांत येणार नाहीं अशी त्यांना तिळमात्र शंका येण्याचें कारण नाहीं. आपल्या देशबांधवांच्या हिताचें संरक्षण करण्यास लॉर्ड चेल्म्सफर्ड किंवा मॉंटेग्यु हे विसरतील इतके मंदबुद्धीचे ते खात्रीनें नाहींत. असें असतां, अँग्लो-इंडियन लोकांनीं विनाकारण काहूर उठवावें आणि व्हाइसरॉय व स्टेट सेक्रेटरी यांच्या मार्गांत अडचणी उपस्थित कराव्या हें त्यांना बिलकूल शोभत नाहीं. सरकारशीं विश्वासानें व सहकारितेनें वागणें हें जसें हिंदी लोकांचें कर्तव्य आहे, तसें त्यांचेंहि आहे; आणि हिंदी लोकांच्या योग्य मागण्यांना विरोध केल्यानें कसे भयंकर परिणाम होण्याचा संभव आहे, त्याचा त्यांनीं शांतपणें विचार करावयास नको काय? मिसेस बेझंटबाईस सोडून देऊन मि० मॉंटेग्यु यांनीं आपली न्यायबुद्धि व्यक्त केल्याबद्दल त्यांनीं डोक्यांत इतकी राख घालावी व स्टेट सेक्रेटरीस वाटेल त्या धमक्या द्याव्या, यामुळें ते आपलें कसें हंसें करून घेत आहेत, ही गोष्ट त्यांच्या लक्षांत येऊं नये, ही मोठी आश्चर्याची गोष्ट आहे. आम्हांस अद्याप अशी आशा आहे कीं, मि० मॉंटेग्यु यांना विरोध न करतां सुधारणांचा प्रश्न समाधानकारक रीतीनें सोडविण्याला ते त्यांना मनापासून मदत करितील.

व्हाइसरॉय साहेबांच्या भाषणांतील महत्त्वाचे मुद्दे वर सांगितल्याप्रमाणें आहेत. हिंदुस्थानचें राजकीय वातावरण निवांत होण्याला तें बरेंच कारणीभूत होईल. भाषणांतील धोरणाप्रमाणें

## मिसेस बेझंट व त्यांचे साथीदार

यांना सोडून देण्यांत आलें, हें सरकारनें फारच चांगलें केलें यात शंका नाहीं. ह्या न्यायाच्या कृत्याबद्दल मि० मॉंटेग्यु आणि लॉर्ड चेल्म्सफर्ड हे दोघेहि स्तुतीस पात्र आहेत. मि० मॉंटेग्यु यांनीं त्यांना सोडण्याचा आग्रह धरला नसता तर व्हाइसरॉयसाहेबांनीं आपण होऊन लॉर्ड पेंटलंड यांच्या दडपशाहीच्या धोरणांत हात घातला असता किंवा नाही, याची जरी शंका असली, तरी त्यांनी स्टेट सेक्रेटरीस विरोध न करितां त्यांची आज्ञा शिरसामान्य केली, याबद्दल त्यांची प्रशंसा करणें योग्य आहे. मि० मॉंटेग्यु यांची तर करावी तितकी स्तुति थोडीच आहे. आजपर्यंतचें त्यांचें वर्तन त्यांच्या मुत्सद्दीपणाला, व हिंदुस्थानाबद्दल त्यांना जी कळकळ वाटत आहे, त्या कळकळीला साजेसेंच झालें आहे, व त्यामुळें आम्हांस त्यांच्या भावी धोरणाबद्दल फारच आशा वाटत आहे. त्यांना जी संधि मिळाली आहे, तशी संधि मिळण्याचें महद्भाग्य फारच थोड्यांच्या नशिबीं असतें. ज्याप्रमाणें बर्क, पिट, लॉर्ड रिपन व लॉर्ड मॉर्ले याचीं नांवें हिंदुस्थानच्या अर्वाचीन इतिहासांत अजरामर झालीं आहेत, त्याप्रमाणें आपलेंहि नांव इतिहासांत सुवर्णाक्षरांनी कोरून तीस कोटी लोकांचें कायमचें कल्याण करण्याची संधि परमेश्वरानें त्यांना दिली आहे, व ही अपूर्व संधि त्यांना तारुण्याच्या उमेदीतच मिळाली आहे. त्यांना मिळालेली संधि जशी अपूर्व आहे, तशीच त्यांची परीक्षाहि परमेश्वर व इतिहासदेवता करून घेईल, हें त्यांनीं विसरतां कामा नये. आणि ‘ न्यायात्पथः प्रविचलन्ति पदं न धीराः ’ हें उदात्त तत्त्व पूर्णपणें लक्षांत ठेवून, त्यांनी आपलें आचरण असें ठेवावें कीं, त्यांच्याच आंग्ल कवीनें म्हटल्याप्रमाणें, निसर्ग त्यांच्याकडे बोट दाखवून म्हणूं शकेल की, ‘ **हा खरा मनुष्य** ’ ( Nature might stand up and say here is a man ).

लॉर्ड चेल्म्सफर्ड यांच्या भाषणाचें आम्हीं जें वर परीक्षण केलें आहे, त्यावरून त्यांचें धोरण किती चांगलें आहे, हें कोणाच्याहि लक्षांत येईल. परंतु एक गोष्ट मात्र या उदात्त धोरणाच्या अगदीं विरुद्ध आहे, व म्हणून तिचा जोरानें निषेध

करणें हें आमचें कर्तव्य आहे. गेल्या मार्च महिन्यांत हिंदुस्थानसरकारनें, प्रांतिक सरकारांनीं स्वराज्याच्या चळवळीबद्दल कसें धोरण स्वीकारावें याबद्दल त्यांना एक सर्क्युलर पाठविलें होतें, हें आतां सर्वांना माहीत झालेंच आहे. तें सर्क्युलर सरकार प्रसिद्ध करील काय, असा ना. डॉ. तेजबहादूर सप्रु व ना. राव-बहादुर शर्मा यांनीं प्रश्न विचारिला असतां, त्यांना सरकारतर्फे ना. सर विल्यम विन्सेंट यांनीं स्पष्ट सांगितलें कीं, तें 'गुप्त' (Confidential) असल्याकारणानें सरकार तें प्रसिद्ध करण्यास तयार नाहीं. ना. शर्मा यांना उत्तर देतांना ना. सर विन्सेंट यांनीं कबूल केलें कीं, स्वराज्याच्या चळवळीसंबंधानें प्रांतिक सरकारांना गुप्त सूचना करण्यांत आल्या होत्या. ( Confidential instructions were issued to Local Governments in connection with the Home Rule movement ) गेल्या चार पांच महिन्यांत हिंदुस्थानांत जो असंतोष माजला व सर मायकेल् ओड्वायर, लॉर्ड पेंटलंड इत्यादि प्रांताधिकाऱ्यांनीं जें दडपशाहीचें धोरण स्वीकारिलें, त्याच्या बुडाशीं हिंदुस्थासरकारचें हें 'गुप्त' सर्क्युलर आहे, असें अनुमान करण्यास आम्हांस सबळ कारणें आहेत. हिंदुस्थानसरकारनें हें सर्क्युलर जर काढलें नसतें तर सर मायकेल् ओड्वायर यांनी वस्तुविपर्यास करून राष्ट्रीयसभा व मॉस्लेमलीग यांच्या मागण्या, गदर लोक जे फेरबदल करूं इच्छितात त्याप्रमाणेंच, क्रांतिकारक व प्रचलित राज्यव्यवस्थेला विध्वंसक आहेत असें विधान करण्याचें, किंवा लॉर्ड पेंटलंड यांनीं जो स्वराज्याच्या चळवळीवर हल्ला केला तो करण्याचें, किंवा मिसेस् बेझंट व त्यांचे साथीदार यांना अटक करण्याचें, त्यांनीं धाष्टर्य केलें असतें असें आम्हांस वाटत नाहीं. लोकांनीं व त्यांच्या पुढाऱ्यांनीं सरकारावर विश्वास ठेवून त्यांच्याशीं पूर्ण सहकारितेनें वागावें अशी जर सरकारची मनापासून इच्छा आहे तर हें 'गुप्त' सर्क्युलर हवें कशाला व सरकार तें प्रसिद्ध करण्याला कां कचरतें? एक तर सरकारनें तें सर्क्युलर प्रसिद्ध केलें पाहिजे किंवा तें रद्द करण्यांत आलें आहे, असें जाहिर केलें पाहिजे. स्वराज्याच्या चळवळीबद्दल प्रांतिक सरकारांना हिंदुस्थानसरकारनें ज्या सूचना ( Instructions ) केल्या आहेत, त्या 'गुप्त' ठेविण्याचें कारण काय? त्या सूचना आक्षेपार्ह असतील किंवा आक्षेपार्ह नसतील. त्या जर आक्षेपार्ह नसतील तर सरकारनें त्या प्रसिद्ध कां करूं नयेत? त्या प्रसिद्ध केल्यानें सरकारचा फायदा होणार नाहीं काय? त्या आक्षेपार्ह असतील तर सरकारच्या नवीन धोरणाला अनुसरून त्या रद्द करणें अवश्य नाहीं

काय ! त्या आक्षेपार्ह असूनहि सरकार जर त्या रद्द करणार नाही तर त्यांचेवर लोकांचा पूर्ण विश्वास कसा बसावा ! व्हाइसरॉयसाहेबांच्या भाषणाचा सुपरिणाम, सरकार हें सर्क्युलर प्रसिद्ध करीत नाहीं व रद्दहि करीत नाहीं या एकाच गोष्टीवरून कमी होण्याचा संभव आहे, याचा व्हाइसरॉयसाहेबांनीं विचार करावयास नको काय ! व्हाइसरॉयसाहेबांच्या भाषणापेक्षां, या सर्क्युलरवरून स्वराज्याच्या चळवळीबद्दल त्यांचें खरें धोरण काय आहे याबद्दल लोक अनुमान काढितील व त्या अनुमानांत विनाकारण संशयाचा व गैरसमजुतीचा अंश सुद्धां दिसूं नये अशी खबरदारी घेणें हें लॉर्ड चेल्म्सफर्ड यांचें कर्तव्य आहे, अशी आमची समजूत आहे, व म्हणूनच आमची त्यांना आग्रहाची विनंति आहे कीं,–

**त्यांनीं विलंब न करितां हें सर्क्युलर प्रसिद्ध करावें किंवा तें रद्द केल्याचें जाहिर करावें.**

त्यापैकीं एकहि मार्गाचा जर ते अवलंब करणार नाहीत तर सरकारच्या हेतूबद्दल लोकांनीं यत्किंचित्‌हि शंका घेऊं नये, असें त्यांनी कितीं जरी कंठरवानें सांगितलें तरी, मनुष्यस्वभाव लक्षांत घेतां लोकांना थोडीतरी शंका आल्याशिवाय राहणार नाहीं.

# मॉंटेग्यु-चेल्म्सफर्ड सुधारणांची योजना.

## योजनेचें स्वरूप.

हिंदुस्थानच्या राज्यपद्धतींत कोणत्या सुधारणा केल्या पाहिजेत, ह्या प्रश्नासंबंधानें चौकशी करून मि. मॉंटेग्यु आणि लॉर्ड चेल्म्सफर्ड यांनीं जो अहवाल प्रधानमंडळास सादर केला आहे, तो जुलै महिन्याच्या आठव्या तारखेस प्रसिद्ध करण्यांत आला. आणि तेव्हांपासून त्यांनीं जी सुधारणांची योजना सुचविली आहे, तिची जिकडे तिकडे चर्चा चालू आहे. प्रस्तुत लेखांत प्रथम त्या योजनेचें स्वरूप पूर्णपणें विशद करण्याचा प्रयत्न करून, नंतर तिच्यावर चर्चात्मक टीका करण्याचा, आणि तिजबद्दल आपण काय धोरण स्वीकारावें या प्रश्नाचा विचार करण्याचा, आमचा मानस आहे.

## योजना प्रसिद्ध केल्याबद्दल आभार.

प्रथमारंभी सुधारणांची सरकारी योजना प्रसिद्ध केल्याबद्दल आम्ही मि. मॉंटेग्यु, लॉर्ड चेल्म्सफर्ड आणि प्रधानमंडळ यांचे मनःपूर्वक आभार मानतों. हिंदुस्थानच्या राजकीय सुधारणेचा प्रश्न, हा केवळ राजकीय नसून युद्धविषयकहि आहे, व म्हणून तो अत्यंत अगत्याचा झाला आहे, हें हिंदी राजकीय सुधारकांनीं सरकारास अनेक वेळां सांगितलें होतें. परंतु गेल्या आगष्ट महिन्यांत भारतमंत्र्यांनीं पार्लमेंटांत जें धोरण जाहीर केलें त्याला जवळ जवळ पाऊण वर्ष होऊनहि जेव्हां सरकारी योजना प्रसिद्ध करण्यांत आली नाहीं, तेव्हां लोकांचा धीर साहजिकपणेंच खचूं लागून, महायुद्धाची समाप्ति होईपर्यंत ती योजना प्रसिद्ध करण्यांत येणार नाहीं कीं काय अशी त्यांस भीति वाटूं लागली होती. सुधारणेचा प्रश्न हा युद्धविषयक प्रश्न आहे, व म्हणून तो सोडविण्याचें कामीं अधिक दिरंगाई करणें हानिकारक होईल, असा इषारा खुद्द **लंडन टाइम्सनेंहि** प्रधानमंडळास दिला होता. तो इषारा लक्ष्यांत घेऊन आणि हिंदी लोकमताला अखेरसि मान देऊन सरकारनें आपली सुधारणांची योजना प्रसिद्ध केली, हें समाधानकारक असून त्याबद्दल भारतमंत्री, व्हाइसरॉय आणि प्रधानमंडळ यांचे आभार मानणें अवश्य आहे.

## अहवाल-त्यांतील प्रकरणें.

मि. मॉंटेग्यु आणि लॉर्ड चेल्म्सफर्ड यांनी प्रधानमंडळास सादर केलेल्या अहवालाची, **भारतसेवकाच्या** आकारापेक्षां जरा किंचित कमी आकाराचीं दोनशें त्रेचाळीस पृष्ठें असून त्याचे दोन मुख्य विभाग आहेत. पहिल्या विभागाला **सामुग्री** ( Material ) ही संज्ञा दिली असून त्यांत एकंदर सात प्रकरणें आहेत. दुसऱ्या विभागाचा मथळा **सूचना** ( Proposals ) हा असून त्यांत एकंदर चार प्रकरणें आहेत. पहिल्या विभागाच्या सुरुवातीलाच म्हणजे अहवालाच्या आरंभीच एक लहानशी तीन पानांची प्रस्तावना असून तींत भारतमंत्री आणि व्हाइसरॉय यांनी हिंदुस्थानांत केलेल्या चौकशीच्या स्वरूपाचें अल्प दिग्दर्शन करण्यात आलें आहे. दुसऱ्या विभागाच्या आरंभी म्हणजे दुसरें प्रकरण सुरू होण्यापूर्वी एक प्राथमिक जादा प्रकरण ( Preliminary ) असून त्यांत हिंदुस्थानासंबंधानें नवीन धोरण स्वीकारण्याची कारणे काय, आणि ते धोरण सरतेशेवटी अमलांत आणण्याच्या हेतूनें ज्या आज सुधारणा करावयाच्या त्या कोणत्या तत्त्वास अनुसरून केल्या पाहिजेत, हें सांगितलें आहे. दुसऱ्या विभागांतील अकराव्या प्रकरणानंतर एक लहानसें उपसंहारात्मक जादा प्रकरण आहे, त्यात मि. मॉंटेग्यु आणि लॉर्ड चेल्म्सफर्ड यांच्या कल्पनेप्रमाणें हिंदुस्थानच्या भवितव्यतेचें चित्र रेखाटलें असून सरकारी योजनेवर ज्यांस टीका करावयाची असेल, त्यांनी ती सप्रमाण विचारपूर्वक केली तरच फायदा होईल असा इषारा दिला आहे **हा इषारा आम्हांस पूर्णपणें मान्य असून आमची टीका ' सप्रमाण, विचारपूर्वक ' आहे, असें मि. मॉंटेग्यु व लॉर्ड चेल्म्सफर्ड यांस आढळून येईल असा आमचा भरंवसा आहे** अहवालाच्या शेवटी दोन परिशिष्टें जोडली असून पहिल्यांत अहवालांत केलेल्या सूचनांचा थोडक्यांत सारांश दिला आहे, व दुसऱ्यांत प्रांतिक सरकाराना व प्रांतिक सरकारांतील ' जबाबदार ' सरकारांना ज्या खात्यांबद्दल अधिकार देण्यास हरकत नाही त्यांच्या दोन पृथक् याद्या दिल्या आहेत. ह्या परिशिष्टांशिवाय आणखी दोन पत्रें व इंडिया कौन्सिलाच्या सभासदांनी लिहिलेलें एक मिनिट हीं दिली आहेत. दोन्ही पत्रें भारतमंत्र्याना लिहिलेलीं असून पहिल्यांत लॉर्ड डानमूर, सर ड्यूक, मि. भूपेंद्रनाथ बसू आणि मि. चार्लस् रॉबर्टस ह्या ज्या गृहस्थांनी सुधारणाविषयक चौकशींत मि. मॉंटेग्यु व लॉर्ड चेल्म्सफर्ड यांना मदत केली, त्यांनी योजनेबद्दल आपली संमति व्यक्त केली आहे. इंडिया कौन्सिलचें मिनिटहि संमतिदर्शक आहे.

अहवालाच्या पहिल्या विभागाचीं एकंदर सात प्रकरणें आहेत हें वर सांगितलेंच आहे. पहिल्या प्रकरणाचा मथळा ' हिंदुस्थानांत अलीकडे घडलेल्या गोष्टी' ( Recent events in India ) हा असून त्यांत १९०९ सालीं मोर्ले-मिंटो सुधारणा अमलांत आल्यापासून गेले सालापर्यंत हिंदुस्थानात घडलेल्या स्थित्यंतरांचें दिग्दर्शन करण्यांत आलें असून त्या स्थित्यंतरामुळें नवीन धोरण कसें इष्ट व अवश्य झालें आहे हें सांगितलें आहे. दुसऱ्या व तिसऱ्या प्रकरणात अनुक्रमें ( १ ) हिंदुस्थानच्या प्रचलित राज्यपद्धतीची व ( २ ) कायदेकौन्सिलांची वाढ कशी होत गेली, हें दाखविलें आहे. चवथ्या प्रकरणांत मोर्ले-मिंटो सुधारणांच्या गुणदोषांचें विवेचन केलें असून त्या हिंदुस्थानच्या नवीन गरजा व आकांक्षा भागविण्याला कशा अपुऱ्या आहेत हें दाखविलें आहे. पांचव्या प्रकरणांत हिंदुस्थानच्या प्रचलित राज्यघटनेचें स्वरूप दाखविलें आहे. सहाव्या प्रकरणाचा मथळा ' प्रश्नाच्या अटी ' ( Conditions of the Problem ) हा असून तें महत्त्वाचें आहे. त्यांत हिंदुस्थानांत जबाबदार राज्यपद्धति पूर्णपणें स्थापन करण्याला सामाजिक, धार्मिक वगैरे अडचणी दाखविल्या आहेत. वरील अडचणीमुळें **प्रांतिक** जबाबदार राज्यपद्धतीसुद्धां पूर्णपणें स्थापन करितां येत नाहीं असें मि. मँटेग्यु व लॉर्ड चेल्म्सफर्ड यांनीं अनुमान काढलें असल्यामुळें वरील प्रकरण महत्त्वाचें असून त्यांतील सिद्धांताची छाननी करणें अवश्य आहे. सातव्या प्रकरणांत राष्ट्रीय सभा व मॉस्लेम लीग यांच्या योजनेचा टीकात्मक विचार केला असून तिचे दोष दाखविले आहेत.

दुसऱ्या विभागांतील आठवें प्रकरण मोठें व अत्यंत महत्त्वाचें आहे. त्यांत मि. मँटेग्यु व लॉर्ड चेल्म्सफर्ड यांच्या मतें प्रांतिक सरकारांत ज्या सुधारणा करणें अवश्य आहे, त्यांचें सविस्तर वर्णन दिलें आहे. ह्या प्रकरणाचे चार पोटविभाग असून त्यांत अनुक्रमें ( १ ) प्रांतिक स्वायत्तता ( २ ) प्रांतिक कार्यकारी मंडळें ( ३ ) प्रांतिक कायदेकौन्सिलें आणि ( ४ ) प्रांतिक सरकारांचा भावी विकास या मुद्यांचा विचार करण्यांत आला आहे. नवव्या प्रकरणांत हिंदुस्थान सरकार व भारतमंत्र्याचें कौन्सिल यांत कोणत्या सुधारणा केल्या पाहिजेत हें दाखविलें आहे. दहाव्या प्रकरणांत देशी संस्थानांसंबंधानें ज्या सुधारणा करावयाच्या त्या दिल्या आहेत. अकराव्या प्रकरणाचे पांच पोटविभाग असून त्यांत अनुक्रमें वरिष्ठ प्रतीच्या सरकारी नोकऱ्या, सैन्य, उद्योगधंदे. बिनअधिकारी युरोपियन व युरेजियन लोक व त्यांचे हितसंबंध आणि ब्रिटी

व युरोपियन यांच्यांतील सामाजिक दळणवळण या प्रश्नाचा थोडक्यांत विचार करण्यांत आला आहे.

मॅंटेग्यु–चेल्म्सफर्ड यांच्या रिपोर्टांतील मजकुराचें आम्हीं वर जें स्थूल दिग्दर्शन केलें आहे त्यावरून तो किती व्यापक आहे हें आमच्या वाचकांच्या लक्षांत येईलच. इटालीत पंधराव्या शतकांत गुइसिआर्डिनी या नांवाचा एक ग्रंथकार होऊन गेला. त्यानें आपल्या देशाचा इतिहास लिहिला आहे. तो इतका नीरस व कंटाळवाणा आहे कीं असें सांगतात कीं, एका न्यायाधिशानें एका गुन्हेगारास तो इतिहास वाचण्याची शिक्षा दिली. ह्या शिक्षेंत काय अर्थ आहे असें समजून त्यानें ती आनंदानें पत्करली. परंतु पुस्तकाचीं थोडींशीं पानें चाळल्यावर त्याला तें इतकें कंटाळवाणें वाटूं लागलें कीं, त्यानें दुसरी शिक्षा देण्याला न्यायाधिशास विनंति केली. सरकारी रिपोर्ट सामान्यतः इतके नीरस व कंटाळवाणे असतात कीं, गुइसिआर्डिनीच्या इतिहासाचें वाचन म्हणजे गुन्हेगारांस देण्यासारखी एक शिक्षाच होय असें इटलीतील चवदाव्या शतकांतील न्यायाधीश ज्याप्रमाणें समजत असत, त्याप्रमाणेंच त्यांचें पठण इंडियन पीनल कोडांत व विशेषतः १२४ अ कलमांत राजद्रोहाच्या गुन्ह्यास ज्या शिक्षा सांगितल्या आहेत त्यांत अंतर्भूत केलें असतां वावगें होणार नाही. परंतु ह्या सामान्य नियमाला प्रस्तुत रिपोर्ट अपवाद आहे यांत शंका नाहीं. तो इतका चित्ताकर्षक आहे कीं तो वाचण्याकरितां एकदां हातांत घेतला कीं त्याचें वाचन पुरें झाल्याशिवाय तो खाली ठेवावासा वाटत नाहीं. हिंदुस्थानच्या राज्यपद्धतीच्या उत्पत्तीचा व वाढीचा इतिहास त्यांत उत्तम रीतीनें सांगितला आहे. तिच्यांतील दोष निष्पक्षपातबुद्धीनें दाखविले आहेत. हिंदी लोकांच्या आकांक्षांचें वर्णन सहृदयतेनें केलें आहे. ज्या विवक्षित सुधारणा त्यांत सुचविण्यांत आल्या आहेत त्या सर्वमान्य होण्यासारख्या नसल्या तरी त्यांत व्यक्त केलेले विचार आणि अभिप्राय मननीय आहेत. रिपोर्टाची भाषा रुक्ष नसून उच्च प्रकारच्या वाङ्मयाला साजेशी आहे. असा

## सुंदर व मनोवेधक रिपोर्ट

लिहिल्याबद्दल आम्हीं मि. मॅंटेग्यु व लॉर्ड चेल्म्सफर्ड यांचे मनःपूर्वक आभार मानतों. त्यांनी जी चौकशी केली तीहि काळजीपूर्वक केली आहे असें रिपोर्टावरून स्पष्ट दिसतें. जरी त्यांची अनुमानें आपल्या देशबांधवांच्या हितासंबंधाविषयीं त्यांनी दाखविलेल्या फाजील कळकळीनें आणि लोकांच्या हातीं सत्ता जाऊं देणें

ज्या अर्थी आतां अपरिहार्यच झालें आहे त्या अर्थी ती शक्य तितकी कमी जाऊ द्यावी ह्या नैसर्गिक मनःप्रवृत्तीनें दूषित झालीं आहेत तरी त्यांनीं प्रत्येक प्रश्नाचा सर्व बाजूंनी व व्यापकरीत्या विचार केला आहे, हें नमूद करण्यास आम्हांस संतोष वाटतो. तथापि रिपोर्टांत

## एक मोठा दोष

राहिला आहे. तो हा कीं, मि. मॅंटेग्यु व लॉर्ड चेल्म्सफर्ड याना हिंदुस्थानांत जे अर्ज व ज्या सुधारणांच्या योजना सादर करण्यांत आल्या त्यांचा गोषवारा-सुद्धां रिपोर्टांत दिलेला नाहीं. राष्ट्रीय सभा आणि मॉस्लेम लीग यांनीं तयार केलेल्या संयुक्त योजनेची टिकात्मक चर्चा करण्यांत आली आहे. परंतु त्या योजनेशिवाय इतर ज्या योजना कांहीं संस्थांनीं व व्यक्तींनीं सादर केल्या त्यांचा थोडक्यांत सारांश तरी रिपोर्टांत सामील करावयास पाहिजे होता. हे अर्ज व ह्या योजना अनेक दृष्टींनीं महत्त्वाच्या आहेत. त्यांत हिंदुस्थानवासीयाचे भिन्न भिन्न विचार व भिन्न भिन्न आकांक्षा उत्तम रीतीनें प्रतिबिंबित झाल्या असल्यामुळें त्यांचें ऐतिहासिक महत्त्व विशेष आहे. शिवाय सरकारी योजनेचा तुलनात्मक विचार करतांना त्यांचा फार उपयोग होण्यासारखा आहे. सरकारी योजना समाधानकारक आहे किंवा नाहीं, ती हिंदुस्थानची सर्व बाजूंनी झालेली राष्ट्रीय प्रगति लक्षांत घेतां पुरेशी आहे किंवा नाहीं, त्यांतील गुणदोष काय आहेत, हें ठरविण्याची बिकट जबाबदारी आतां ब्रिटिश नागरिक आणि त्यांचे पार्लमेंटांतलि प्रतिनिधी यांचेवर आहे. ती उत्तम रीतीनें पार पाडण्याकरितां हिंदी लोकांनीं काय मागण्या केल्या होत्या हें त्यांना समजणें अवश्य नाहीं काय? राष्ट्रीय सभा आणि मॉस्लेम लीग यांचीच योजना जरी घेतली तरी ती ब्रिटिश जनता व तिचे पार्लमेंटांतील प्रतिनिधी यांस सादर न करितां तिच्यावरील टीका मात्र प्रसिद्ध करणें ही पद्धति सयुक्तिक आहे काय? ही टीका बरोबर आहे किंवा चुकीची आहे हें ठरविण्यासाठीं पार्लमेंटांतील सभासदांना व ब्रिटिश लोकांना ती काय आहे हें अगोदर समजणें अवश्य नाहीं काय? सारांश, सार्वजनिक संस्थांनीं व व्यक्तींनीं सरकारापुढें मांडलेल्या योजना व त्यांस सादर केलेले अर्ज यांचा निदान गोषवारा रिपोर्टाला जोडला नाहीं, हा त्यांतील मोठा दोष आहे. हा दोष भारत-मंत्र्याच्या कौन्सिलच्या सभासदांच्या लक्षांत आला असावा असें दिसतें. कारण त्यांनीं आपल्या मतपत्रिकेंत वरील अर्ज व योजना, निदान सर्व प्रकारचीं मतें

जेणेंकरून व्यक्त होतील असे निवडक अर्ज व निवडक योजना, प्रसिद्ध करण्यांत याव्या अशी सूचना केली आहे. ही सूचना अमलांत कां आणली नाहीं हें आम्हांस समजत नाहीं. सरकारी योजना प्रसिद्ध करण्याला आणखी विलंब होणें इष्ट नाहीं हेंच जर त्याचें कारण असेल तर आमचें कांहीं म्हणणें नाहीं. परंतु ते अर्ज व त्या योजना प्रसिद्ध करावयाच्याच नाहींत असें जर मि. मॉंटेग्यु यांनीं ठरविलें असेल तर ती चूक आहे, व तिची दुरुस्ती होऊन इंडिया कौन्सिलच्या अभिप्रायाप्रमाणें सर्व मतांचे निदर्शक असे सर्व कागद तरी लवकरच प्रसिद्ध करावे अशी आमची मि. मॉंटेग्यु यांस सूचना आहे.

## योजनेच्या मुळाशीं असलेलीं तत्त्वें.

येथपर्यंत कांहीं प्रास्ताविक मुद्यांचा विचार झाला. आतां आपण मॉंटेग्यु-चेल्म्सफर्ड योजना काय आहे हें विस्तारशः पाहूं. सुधारणांची कोणतीहि व्यवस्थित योजना घेतली तर आपणांस असें आढळून येईल कीं, तिच्या मुळाशीं कांहीं तत्त्वें असतात. त्या तत्त्वांना अनुसरून ती तयार केलेली असते. मि. मॉंटेग्यु व लॉर्ड चेल्म्सफर्ड यांची योजना ज्या तत्त्वांवर रचलेली आहे तीं तत्त्वें दुसऱ्या भागाच्या आरंभीं प्रास्ताविक जादा प्रकरणात दिलीं आहेत हें आम्हीं वर सांगितलेंच आहे. तीं तत्त्वें एकंदर चार आहेत. सरकारी योजनेची टीकात्मक चर्चा करतांना तीं लक्ष्यांत ठेवणें जरूर आहे. सबब, तीं आम्हीं खालीं दिलीं आहेतः—

### तत्त्व पहिलें.

**स्थानिक संस्थांच्या बाबतींत शक्य तितकी पूर्ण लोकसत्ता असली पाहिजे; त्या संस्थांवर बाह्य हुकमतीचा दाब शक्य तितका कमी असला पाहिजे.**

### तत्त्व दुसरें.

**जबाबदार राज्यपद्धतीचें ध्येय अधिकाधिक प्रमाणानें सिद्धीस नेण्याकरितां प्रथमारंभीं ज्या क्षेत्रांत सुधारणा करावयाच्या तें क्षेत्र म्हटलें म्हणजे प्रांत होत. जबाबदारीच्या तत्त्वाप्रमाणें कांहीं सत्ता जनतेला ताबडतोब दिली पाहिजे; आणि परिस्थिति अनुकूल**

झाल्याबरोबर पूर्ण प्रांतिक जबाबदार राज्यपद्धति स्थापन करण्याचा आमचा हेतु आहे. यावरून असें निष्पन्न होतें कीं, हिंदुस्थानसरकारच्या ज्या जबाबदाऱ्या आहेत त्या पार पाडण्याचे कामाला बाध येऊं न देतां, कायदेकानू करणें, अंमलबजावणी करणें, कर बसविणें व कराचा विनियोग करणें, ह्या सर्व बाबींत प्रांतिक सरकारांवरील हिंदुस्थानसरकारची हुकमत शक्य तितकी कमी केली पाहिजे.

## तत्त्व तिसरें.

हिंदुस्थानसरकार हें पार्लमेंटाला पूर्णपणें जबाबदार राहिलें पाहिजे. प्रांतिक सरकारांत ज्या सुधारणा करावयाच्या त्यांचा परिणाम काय होतो याचा अनुभव येईतोंपर्यंत, सर्व अवश्यक बाबतींत हिंदुस्थान सरकारची सत्ता अबाधित राहिली पाहिजे. मात्र त्यावर पार्लमेंटाची हुकमत राहील. दरम्यान हिंदुस्थानचें कायदेकौन्सिल अधिक विस्तृत करून तें अधिक प्रातिनिधिक करावें, आणि सरकारावर त्याचें वजन अधिक पडेल अशी व्यवस्था करावी.

## तत्त्व चवथें.

वर सांगितलेल्या सुधारणा ज्या मानानें अंमलांत येतील त्या मानानें हिंदुस्थान सरकार आणि प्रांतिक सरकारें यांवरील पार्लमेंटाची हुकमत कमी केली पाहिजे.

ह्या चार तत्त्वांच्या पायावर सुधारणांच्या योजनेची इमारत उभारण्यांत आली आहे. ही सर्व तत्त्वें ता. २० आगष्ट १९१७ रोजीं पार्लमेंटांत जाहीर केलेल्या हिंदुस्थानविषयक धोरणाला अनुसरून आहेत, असें मि. मॉंटेग्यु आणि लॉर्ड चेल्मसफर्ड यांचें म्हणणें आहे. त्यांची विचारसरणी अशी आहे कीं, हिंदुस्थानांत जबाबदार राज्यपद्धति स्थापन करणें हें ध्येय त्या धोरणानें निश्चित केलें खरें; परंतु त्याबरोबरच असें ठरविण्यांत आलें आहे कीं, तें ध्येय सिद्धीस नेण्याकरितां ज्या सुधारणा करावयाच्या त्या आस्ते आस्ते करावयाच्या असून प्रत्येक टप्प्याला त्या कितपत यशस्वी झाल्या हेंहि पाहिलें पाहिजे. जबाबदार राज्यपद्धति

हें अंतिम ध्येय असल्यामुळें आरंभीं सुद्धां ज्या सुधारणा करावयाच्या त्यांत अंशतः तरी जबाबदारीचें तत्त्व ग्रथित झालें पाहिजे; परंतु ज्या अर्थी तें ध्येय आस्ते आस्ते सिद्धीस न्यावयाचें आहे, त्या अर्थी जबाबदार राज्यपद्धति पूर्णपणें, म्हणजे प्रांतिक सरकारें, तसेंच हिंदुस्थान सरकार, ह्या सर्व सरकारांसंबंधानें, स्थापन करतां तर येत नाहीच; परंतु प्रांतिक सरकारासंबंधानें सुद्धां ती पायरी-पायरीनेंच स्थापन केली पाहिजे. शिवाय, जबाबदार राज्यपद्धति पायरी–पायरीनें स्थापन करणें हें तत्त्व प्रांतिक सरकारांबरोबरच हिंदुस्थान सरकारास लागू करतां येत नाहीं. म्हणजे प्रांतिक सरकारें पूर्णपणें जबाबदार होईतोंपर्यंत हिंदुस्थान सरकार अंशतः सुद्धां जबाबदार करितां येत नाहीं. ही विचारसरणी कितपत संयुक्तिक आहे व वरील अनुमानें २० आगष्ट रोजीं जाहीर केलेल्या धोरणावरून निघतातच काय याचा आपण पुढें विचार करूं. मि. मॉंटेग्यु व लॉर्ड चेल्मसफर्ड यांनी प्रतिपादिलेल्या चार तत्त्वांतील विचारसरणी काय आहे, एवढेंच ह्या ठिकाणी सांगावयाचें आहे.

## स्थानिकस्वराज्य.

स्थानिकस्वराज्य पूर्णपणें स्थापन करावें, अशी मागणी आपण कित्येक वर्षे करीत आहों. ती सरतेशेवटीं मान्य करण्यांत आली आहे, ही समाधानाची गोष्ट आहे. यासंबंधानें मि. मॉंटेग्यु व लॉर्ड चेल्मसफर्ड यांनीं जें तत्त्व प्रतिपादिलें आहे त्यांत 'शक्य तितकें पूर्ण' हे शब्द आहेत. हें खरें; परंतु प्रांतिकसरकार त्यांचा आंकुचित अर्थ करणार नाहींत अशी आम्हांस आशा आहे. हिंदुस्थानच्या प्रमुख प्रांतांत तरी स्थानिकस्वराज्य पूर्णपणें स्थापन झालें पाहिजे. तसें होण्याला आतां अडचण येऊं नये. कारण, मॉंटेग्यु—चेल्मसफर्ड योजनेंत दुरुस्त्या न होतां ती आहे तशींच जरी अंमलांत आली तरी, स्थानिकस्वराज्याचें खातें आरंभापासूनच जनतेच्या स्वाधीन करण्याचें तीत ठरविलें असल्यामुळें लोकमताप्रमाणें स्थानिकस्वराज्याचें पूर्ण पोषण करणें हें सर्वस्वीं आपल्याच हातीं राहील.

स्थानिकस्वराज्याचें खातें जनतेच्या स्वाधीन करण्यांत यावें अशी भारतमंत्री व व्हाइसरॉय यांनीं शिफारस केली आहे खरी; परंतु ह्यासंबंधानें एक प्रश्न राखून ठेविण्यांत आला आहे. तो हा कीं, ज्या स्थानिक संस्था आपलीं कामें योग्य रीतीनें करणार नाहींत, त्यांस 'सस्पेंड' करण्याचा अधिकार 'कार्यकारी

कौन्सिलांत ' असावा काय ? हा प्रश्न कां राखून ठेविण्यांत आला आहे हें आम्हांस समजत नाहीं. ह्यावरून ' स्थानिकस्वराज्याची ' सुद्धां शेंडी आपल्या हातांत ठेवण्याची ' बेजबाबदार ' सरकारची इच्छा दिसते. कर्तव्यपराङ्मुख स्थानिक संस्थांना अवश्य वाटल्यास ' सस्पिंड ' करण्याचा अधिकार सरकारास असला पाहिजे, हें कोणीहि कबूल करील. परंतु स्थानिक स्वराज्याचें खातें ' जबाबदार ' सरकारचे हातीं एकदां दिल्यावर तो अधिकार ' बेजबाबदार ' सरकारच्या हातीं राखून ठेवणें अगदीं विसंगत व अन्याय्य आहे. तो अधिकार चालविण्याला योग्य सरकार म्हटलें म्हणजे ' बेजबाबदार ' सरकार नसून ' जबाबदार सरकार ' हेंच होय; व त्याच्याच हातीं तो असला पाहिजे. स्थानिक संस्थांना सस्पिंड करण्याचा अधिकार जर ' बेजबाबदार ' सरकाराकडे राखून ठेवण्यांत आला, तर स्थानिकस्वराज्य पूर्णपणें स्थापन करण्यांत आलें असें कसें म्हणतां येईल ? सबब, वर दिलेला जो प्रश्न विचाराकरितां राखून ठेविला आहे तो तसा ठेवण्याचें बिलकूल कारण नव्हतें. ह्यावरून स्थानिकस्वराज्याचे बाबतीत सुद्धां लोकांच्या हातीं सत्ता देण्याला सरकार किती नाखूष आहे हें चांगलें दिसून येतें. स्थानिक स्वराज्यावर ' बेजबाबदार सरकार 'चा अशा रीतीनें अंशतः देखील ताबा राखून ठेवणें हें अगदीं गैरशिस्त आहे. सबब आम्हांस अशी आशा आहे कीं, ह्या राखून ठेविलेल्या प्रश्नाचा निकाल असाच लावण्यांत येईल, कीं स्थानिक संस्थांना ' सस्पिंड ' करण्याचा अधिकार ' बेजबाबदार ' सरकारला न देतां ' जबाबदार ' सरकारला देण्यांत येईल. सुधारणांच्या योजनेच्या स्थानिक स्वराज्यविषयक भागांत हा मोठाच दोष आहे व तो काढून टाकण्यांत आला पाहिजे.

## प्रांतिक सरकारांसंबंधीं सुधारणा.

प्रांतिकसरकारांसंबंधीं ज्या सुधारणा सुचविण्यांत आल्या त्या बऱ्याच भानगडीच्या आहेत. परंतु त्या जितक्या भानगडीच्या आहेत तितक्याच महत्त्वाच्या असल्याकारणानें त्या समजून घेणें अवश्य आहे. त्यांतील दोष काय आहेत व त्या कशा अपुऱ्या आहेत हें आम्ही पुढें सांगणार आहों. परंतु प्रथम त्यांची योग्य कल्पना असणें जरूर आहे. ज्या तत्त्वाला अनुसरून प्रांतिकसरकारांसंबंधीं सुधारणा सुचविण्यांत आल्या आहेत तें तत्त्व आम्हीं वर दिलेंच आहे. मि. मँटेग्यु व लॉर्ड चेल्म्सफर्ड यांची पहिली सूचना अशी आहे कीं, राजस्वविषयक

किंवा आर्थिक ( Fiscal ), व्यवस्थापक ( Legislative ) आणि कार्यनिर्वाहक ( Administrative ) बाबतींत प्रांतिकसरकारांस हिंदुस्थानसरकारच्या विशिष्ट जबाबदाऱ्यांस बाध येऊं न देतां, अधिक स्वातंत्र्य देण्यांत यावें. १९११ सालीं हिंदुस्थानसरकारनें जो 'राज्यारोहण-दरबार-खलिता' ( Coronation Durbar Despatch ) पाठविला त्यांत प्रांतांवरील हिंदुस्थानसरकारचा ताबा कमी करून 'प्रांतिक—स्वायत्त शासन' ( Provincial autonomy ) स्थापन केलें पाहिजे अशी सूचना करण्यांत आली होती. सध्यां प्रांतिकसरकारांवर हिंदुस्थान सरकारची बरीच सत्ता चालत असल्यामुळें प्रांतिकसरकारांस आपापल्या प्रांताचा चांगला विकास करितां येत नाहीं अशी त्यांची कित्येक वर्षे तक्रार आहे. कोणतीही सुधारणेची गोष्ट करावयाची झाली म्हणजे अगोदर हिंदुस्थान सरकारची मंजुरी पाहिजे, ती मिळेल किंवा नाहीं ह्याबद्दल खात्री नाहीं, मिळाली तरी कालावधि लागतो, प्रांतिक उत्पन्नाच्या कांहीं बाबींत हिंदुस्थानसरकारचा हिस्सा असल्यामुळें त्या बाबीपासून मिळणारें उत्पन्न जरी वाढलें तरी त्याचा प्रांतिक सरकारांस पूर्ण फायदा मिळत नाहीं, इत्यादि अडचणीमुळें प्रांतिक प्रगतीला पुरेसा वाव मिळत नाहीं, असा हिंदुस्थानसरकार व प्रांतिक सरकारें यांचे दरम्यान सध्यां असलेल्या संबंधाविषयीं आक्षेप आहे. याविषयी प्रांतिक सरकारें आणि लोकाग्रणी यांच्यांत मतभेद नाहीं. राष्ट्रीयसभेच्या मागण्यांपैकींच प्रांतिक स्वायत्तशासनाची मागणी आहे, आणि राष्ट्रीयसभा—मॉस्लेमसंघ यांच्या संयुक्त योजनेंत तिला स्थान आहे. ही मागणी मॉंटेग्यु—चेल्म्सफर्ड यांच्या योजनेंत मान्य करण्यांत आली असून तिला अनुसरून प्रांतिक सरकारांवरील, जमाबंदीच्या बाबतींत, कायदेकानु करण्याचे बाबतींत आणि राज्यकारभाराचे बाबतींत हिंदुस्थान सरकारचा सध्यां चालत असलेला ताबा पुष्कळ कमी करावा अशी तींत व्यवस्था केलेली आहे.

## आर्थिक स्वायत्तशासन.

प्रांतांना आर्थिक स्वायत्तशासन देण्याकरितां भारतमंत्री व व्हाइसरॉय यांची अशी सूचना आहे की, जमाबंदीच्या बाबींचे हल्लींप्रमाणें तीन विभाग न करितां फक्त दोनच विभाग करण्यांत यावे. हल्लींची व्यवस्था अशी आहे की, उत्पन्नाच्या कांहीं बाबी प्रांतिक, कांहीं राष्ट्रीय म्हणजे हिंदुस्थान सरकारच्या, आणि कांहीं विभक्त ( divided ) असे तीन विभाग आहेत. जमीनमहसूल, स्टँप,

ग्रामीचा कर आणि पाटबंधारे ह्या बाबी सध्यां विभक्त आहेत. त्यांचें उत्पन्न विवक्षित प्रमाणानें हिंदुस्थान सरकार व प्रांतिक सरकार यांच्यामध्यें वांटण्यांत येतें. रिपोर्टांत असें सुचविलें आहे कीं, जमनिमहसूल आणि पाटबंधारे ह्या सर्वस्वी प्रांतिक बाबी कराव्या. स्टँपाचे दोन प्रकार आहेत. त्यांपैकीं जनरल स्टँप ही राष्ट्रीय बाब करण्यांत येऊन न्यायविषयक ( Judicial ) स्टँप पूर्णपणें प्रांतिक बाब करावी. ग्रामीचा कर ही पूर्ण राष्ट्रीय बाब असावी. कांहीं प्रांतांत (उदाहरण मुंबई ) एक्साईज पूर्ण प्रांतिक आहे. ती सर्व प्रांतांत तशी करावी.

जमीनमहमहसुलाची बाब अर्थातच सर्वांत महत्त्वाची आहे. ती व इतर कांहीं बाबी पूर्ण प्रांतिक केल्यामुळें प्रांतांचें उत्पन्न वाढेल, परंतु त्या मानानें हिंदुस्थान सरकारचें उत्पन्न कमी होईल. रिपोर्टांत असा अंदाज केला आहे कीं, वरील फेरफारामुळें हिंदुस्थान सरकारच्या बजेटांत तूट पडेल, व प्रांतिक सरकारांच्या तिजोरींत शिल्लक राहील. ही हिंदुस्थान सरकारच्या बजेटांतील तूट भरून काढण्याकरितां प्रत्येक प्रांतानें विवक्षित प्रमाणानें हिंदुस्थान सरकारला वर्गणी ( contribution ) द्यावी व ही ठरलेली वर्गणी प्रांतिक सरकारच्या उत्पन्नावर आद्यभार ( first charge ) समजण्यांत यावा. अशा रीतीनें प्रांतिक सरकारांचें उत्पन्न वाढेल इतकेंच नव्हे, तर आपण काटकसर करून काळजीनें ठेविलेल्या शिलकेवर हिंदुस्थान सरकारची धाड येण्याची भीति नाहींशी झाल्यामुळें तें शक्य तितकें अधिकाधिक वाढवून आपल्या प्रांताची आधिभौतिक, शैक्षणिक वगैरे प्रगति जोरानें करण्याला त्यांस उत्तेजन येईल.

## कर लादणें.

कर लादण्याचे बाबीसंबंधानें प्रांतिक सरकारांस अधिक अधिकार देण्याकरिता असें सुचविण्यांत आलें आहे कीं, कांहीं करांच्या बाबी प्रांतिक ठरविण्यांत याव्या. या बाबींपैकीं कोणत्याहि बाबीविषयीं कर लादण्याकरतां, किंवा लादलेला कर वाढविणें, कमी करणें वगैरेकरितां कायदा करावयाचा झाल्यास त्याला प्रथम हिंदुस्थान सरकारची मंजुरी घेण्याचें कारण नाहीं; कायदा पास झाल्यावर तो त्या सरकाराकडे मंजुरीकरितां पाठविण्यांत आला म्हणजे पुरें. इतर बाबींबद्दल कायदा करावयाचा असला म्हणजे मात्र हिंदुस्थान सरकारची अगोदर मंजुरी मिळविली पाहिजे.

## कायदेकानू करणें.

कायदेकानू करण्याचे बाबतींत प्रांतिक सरकारांस अधिक अधिकार देण्याविषयीं रिपोर्टांत असें सुचविलें आहे की, सामान्यतः प्रांतिक बाबींसंबंधानें हिंदुस्थान सरकारनें कायदे करूं नयेत; ते करण्याचा अधिकार सर्वस्वी प्रांतिक सरकाराचा असावा; परंतु कायद्यानें असा निर्बंध करण्याची अवश्यकता नाहीं. सध्यांहि हेंच तत्त्व अमलांत आहे व तें तसेंच असूं द्यावें. ही सूचना पुरेशी आहे असें म्हणतां येत नाहीं. कानडांत ज्याप्रमाणें बाबींची विभागणी करून कांहीं बाबींबद्दल कायदे करण्याचा अधिकार प्रांतिक सरकारांचाच आहे, कानडाच्या सरकारचा नाहीं असा कानडाच्या राज्यघटनाविषयक कायद्यांतच ( Constitution Act ) निर्बंध करण्यांत आला आहे, त्याप्रमाणें येथेंहि कायद्यानेंच निर्बंध करावयास पाहिजे. परंतु यासंबंधानें रिपोर्टांत असें म्हटलें आहे कीं, असा निर्बंध केला म्हणजे एखादा कायदा योग्य सरकारनें केला आहे किंवा नाहीं व म्हणून तो कायदेशीर आहे किंवा नाहीं, असे प्रश्न उपस्थित होऊन कायद्यांच्या कायदेशीरपणाबद्दलच कोर्टांत वाद माजतात व असे वाद हिंदुस्थानांत उपस्थित होऊं देण्याला जागा ठेवणें इष्ट नाहीं. कल्पना करा कीं, हिंदुस्थान सरकारनें एखादा कायदा केला; परंतु वास्तविक तो प्रांतिक सरकारच्या अधिकारांतील आहे. अर्थातच त्याच्या कायदेशीरपणाबद्दलच हरकत घेण्यांत येऊन कोर्टहि कदाचित् तो बेकायदेशीर ठरवील व याचा परिणाम असा होईल कीं, हिंदुस्थान सरकारच्या अबाधित सत्तेबद्दल लोकांना वाटणारा आदर कमी होईल. ही विचारसरणी एकतंत्री राज्यपद्धतीला ठीक आहे; परंतु जबाबदार राज्यपद्धतीच्या तत्त्वास अनुकूल नाहीं.

प्रांतांना स्वायत्तशासन देण्याकरितां रिपोर्टांत वरील शिफारसी करण्यांत आल्या आहेत. परंतु स्वायत्तशासन म्हणजे स्वराज्य किंवा जबाबदार राज्यपद्धति नव्हे. स्वायत्तशासन म्हणजे फक्त प्रांतिकसरकारांच्या अधिकारांत भर होय. त्यामुळें तो अधिकार जबाबदारीच्या तत्त्वाप्रमाणें चालला आहे, असें होत नाहीं. जेथें स्वराज्य ऊर्फ जबाबदार राज्यपद्धति आहे तेथें स्वायत्तशासन असतें. परंतु उलटपक्षीं जेथें स्वायत्तशासन आहे, तेथें जबाबदार राज्यपद्धति असतेच असें नाहीं. तेव्हां प्रांतिक सरकारें ‘ जबाबदार ’ करण्याकरितां मि. मॉंटेग्यु आणि

चेल्म्सफर्ड यांनीं काय सूचना केल्या आहेत हाच महत्त्वाचा प्रश्न आहे. गव्हर्नर किंवा त्याचें कार्यकारी मंडळ यांच्यावरील हिंदुस्थानसरकारचा नाबा कमी केल्यानें फार तर त्यास अधिक स्वातंत्र्य मिळेल. परंतु त्यामुळें गव्हर्नर किंवा कार्यकारी मंडळ जनतेला थोडेंच जबाबदार होणार आहे ! सबब प्रांतिकसरकारांत ' जबाबदारीच्या ' तत्त्वाप्रमाणें काय फेरफार सुचविले आहेत, हाच अधिक महत्त्वाचा प्रश्न आहे.

या मुद्यासंबंधानें मि. मॉँटेग्यु व लॉर्ड चेल्म्सफर्ड यांनीं असें तत्त्व प्रतिपादिलें आहे कीं, प्रांतिकसरकारें अंशतः तरी ' जबाबदार ' केल्याशिवाय खरी सुधारणा होणार नाहीं; परंतु तीं पूर्णपणें जबाबदार केल्यास राज्यकारभाराची इमारतच ढांसळून पडेल. प्रांतांत पूर्ण स्वराज्य ऊर्फ पूर्ण जबाबदार राज्यपद्धति स्थापन केल्यास म्हणजे प्रांतिकसरकारें पूर्णपणें जबाबदार केल्यास राज्यकारभाराची इमारतच ढांसळून पडेल, हें मि. मॉँटेग्यु व लॉर्ड चेल्म्सफर्ड यांनीं गृहीत धरलें आहे; व तसें करण्याला त्यांनीं ता. २० आगष्ट १९१७ च्या जाहीरनाम्याचा व रिपोर्टाच्या सहाव्या प्रकरणांत सांगितलेल्या अडचणींचा आधार दिला आहे. हा आधार कितपत बळकट आहे व त्यावरून वरील सिद्धांत निघतोच कीं काय, याचा आपण पुढें विचार करूं. सध्यां वरील गोष्ट गृहीत धरून प्रांतिक सरकारें अंशतः ' जबाबदार ' करण्याकरितां भारतमंत्री आणि व्हाइसरॉय यांनीं काय शिफारसी केल्या आहेत एवढेंच पाहावयाचें आहे.

## सूचना १–सर्व प्रांतांत गव्हर्नर आणि कौन्सिल असावें.

यासंबंधानें पहिली शिफारस अशी आहे कीं, सर्व प्रांतांत गव्हर्नर आणि कौन्सिल नेमण्यांत यावें. हल्लीं मुंबई, मद्रास व बंगाल येथें गव्हर्नर असून त्यांचें कार्यकारी कौन्सिल आहे. बिहार आणि ओरिसा प्रांतांत लेफ्टनंट गव्हर्नर आहे, परंतु त्यास कार्यकारी कौन्सिल दिलेलें आहे. संयुक्तप्रांत आणि पंजाब येथें लेफ्टनंट गव्हर्नर आहे, परंतु कार्यकारी कौन्सिल नाहीं. मध्यप्रांत आणि आसाम या प्रांतांच्या अधिपतींना चीफ कमिशनर ही संज्ञा असून तेथें अर्थातच कार्यकारी कौन्सिल नाहीं. मुंबई, मद्रास आणि बंगाल ह्या प्रांतांप्रमाणें बाकीच्या पांच मुख्य प्रांतांतहि गव्हर्नर नेमून त्यांस कार्यकारी कौन्सिल द्यावें, अशी मि. मॉँटेग्यु आणि लॉर्ड चेल्म्सफर्ड यांची पहिली सूचना आहे.

## सूचना २-प्रांतिक व राष्ट्रीय विषयांची विभागणी करावी.

दुसरी सूचना अशी आहे कीं, प्रांतिक व राष्ट्रीय विषयांची स्पष्ट विभागणी करण्यांत यावी. जे विषय प्रांतिक समजण्यांत यावे त्यांची यादी रिपोर्टाच्या शेवटी दुसऱ्या पुरवणीत दिली आहे. ते विषय येणेंप्रमाणें.

१ प्रांतिक कार्यांकरितां कर लादणें.

२ प्रांतिक उत्पन्नाच्या तारणावर कर्ज काढणें.

३ हिंदुस्थान सरकारतर्फे जमाबंदीचें काम ( उदाहरणार्थ प्राप्तीचा कर वसूल करणें ).

४ प्रांतिक खात्यांत नेमणुका करणें वगैरे.

५ कायद्याची अंमलबजावणी करणें व व्यवस्था राखणें.

( अ ) फौजदारी न्याय देणें

( ब ) पोलीस

( क ) तुरुंग

( ड ) गुन्हेगार जाती

( ई ) प्रेसॲक्ट, हत्यारांचा कायदा, राजद्रोही सभाचा कायदा इत्यादि कायद्यांची अंमलबजावणी करणें

( फ ) विष

( च ) जुवेबाजी

( भ ) नाटकें आणि सिनेमा

( म ) अपमृत्यु-मीमांसा ( Coroners ).

६ जमीनमहसूल.

७ शेती.

८ जंगल

९ जलचरखातें ( Fisheries )

१० पब्लिक वर्क्स

११ शिक्षण

१२ दवाखाने व आरोग्य

१३ स्थानिकस्वराज्य

१४ मतदारीचा हक्क, मतदारसंघ

१५ दिवाणी

१६ एक्साइज

१७ शीड्युल्ड जिल्हे

१८ सार्वजनिक कामाकरितां जमीन घेणें

१९ उद्योगधंदे

२० सहकारी पतपेढ्या

२१ बँका, कंपन्या

२२ सरकारी छापखाने

२३ जन्ममृत्यूची नोंद, आंकडे गोळा करणें

२४ एका प्रांतांतून दुसऱ्या प्रांतांत वसाहत करणें

२५ प्रांतिक कर वसूल करणें

२६ सरकारजमा झालेल्या मिळकती

२७ धर्मार्थ संस्थांची व्यवस्था

२८ मोटारगाड्या.

वरील विषय प्रांतिक समजण्यांत यावे व त्यांचा कारभार प्रांतिकसरकारांनी करावा अशी मि. मॉंटेग्यु व लॉर्ड चेल्म्सफर्ड यांची शिफारस आहे.

## प्रांतिकविषयांचे विभाग.

तिसरी सूचना अशी आहे की, प्रांतिक विषयांचे ( १ ) 'बेजबाबदार' सरकारच्या हातांत राखून ठेविलेले ( reserved ) आणि ( २ ) 'जबाबदार' सरकारच्या स्वाधीन केलेले, ( transferred ) असे दोन विभाग करण्यांत यावे. खाली दिलेले विषय 'जबाबदार' सरकारच्या स्वाधीन करण्यांत यावे अशी भारतमंत्री व लॉर्ड चेल्म्सफर्ड यांची शिफारस आहेः—

### जबाबदार सरकारच्या स्वाधीन करावयाचे विषय.

१ प्रांतिक कार्याकरितां कर लादणें

२ स्थानिक—स्वराज्य

३ जन्ममृत्यूंची नोंद, अपमृत्युमीमांसा, खेड्यांतील दिवाणी व फौजदारी कोर्टें, प्रांतिक—कामाकरितां आंकडे वगैरे माहिती गोळा करणें.

४ शिक्षण—प्राथमिक, दुय्यम आणि औद्योगिक.

५ दवाखाने, आरोग्य.

६ शेती

७ सहकारी पतपेढ्या

८ जंगलें बिनवर्गवारी ( unclassed ) आणि कांहीं राखुन ठेविलेलीं ( protected )

९ मच्छीमारीचे व तद्विषयक इतर धंदे

१० पब्लिक वर्क्स–रस्ते, इमारती, गौण पाटबंधारे, ट्रामगाड्या, लाईट व फीडर रेल्वे, ड्रेनेज, बांध

११ एक्साईज–मादकद्रव्यें व पदार्थ, दारूच्या भट्ट्या

१२ धर्मार्थ देणग्या

१३ कला, स्थानिक धंदे यांचें पोषण

१४ किरकोळ विषय, वन्यपशू, पक्षी यांचें संरक्षण, जुवेबाजी, मोटारगाड्या, दस्तऐवज नोंदणें वगैरे.

## प्रांतिक कायदे कौन्सिलें.

प्रांतिक कायदेकौन्सिलासंबंधानें भारतमंत्री आणि व्हाइसरॉय यांच्या अशा सूचना आहेत कीं, प्रत्येक कायदे कौन्सिलांत लोकनियुक्त सभासदांचें मताधिक्य असावें, त्याची निवडणूक मतदारांनी प्रत्यक्षरीत्या ( Direct election ) करावी आणि मतदारीचा हक्क शक्य तितका विस्तृत असावा. हल्लीं कायदे कौन्सिलांतील लोकनियुक्त सभासदांची जी निवडणूक होते ती अप्रत्यक्षरीत्या होते. म्हणजे उदाहरणार्थ, म्युनिसिपालिट्यांच्या तर्फे जे सभासद निवडण्यांत येतात ते म्युनिसिपालिट्यांचे सभासद निवडून देणारे मतदार निवडून देत नाहींत, किंवा म्युनिसिपालिट्यांचे सर्व सभासदहि निवडून देत नाहींत. म्युनिसिपालिट्यांच्या सभासदांनीं प्रथम कांहीं सभासद निवडून द्यावे व नंतर त्यांनीं कायदेकौन्सिलाच्या सभासदांची निवड करावी, अशी हल्लींची पद्धत आहे. फक्त मुसलमानांना मात्र आपले सभासद प्रत्यक्ष निवडणुकीनें निवडतां येतात. अप्रत्यक्ष निवडणुकीची पद्धत रद्द करून मुसलमानांप्रमाणें सर्व मतदारांनीं प्रत्यक्ष निवडणुकीनें सभासद निवडावे अशी शिफारस करण्यांत आली आहे. मतदारीचा हक्क देण्याला कशी लायकी पाहिजे, मतदारसंघ कसे असावेत, लोकनियुक्त सभासद व सरकारनें नेमलेले सभासद यांचें प्रमाण कसें असावें–ह्या सर्व गोष्टी ठरविण्याकरितां पांच सभासदांची कमिटी नेमण्यांत यावी, अशी भारतमंत्री आणि व्हाइसरॉय यांची सूचना आहे.

## अल्पसंख्याक वर्गांचें प्रतिनिधित्व.

कायदेकौन्सिलांच्या घटनेचा विचार करतांना अर्थातच अल्पसंख्याक वर्गांना विशेष प्रतिनिधित्व द्यावें कीं काय हा प्रश्न उपस्थित होतो. त्याबद्दल भारतमंत्री आणि व्हाइसरॉय यांचें असें म्हणणें आहे कीं, विशेष प्रतिनिधित्व जबाबदार राज्यपद्धतीच्या पोषणाला प्रतिकूल आहे व म्हणून तें वास्तविक देतां कामा नये. तथापि ज्याअर्थी मुसलमानांना विशेष प्रतिनिधित्वाचा हक्क देण्याचें अभिवचन १९०९ सालीच दिलें आहे, त्याअर्थी तें आतां मोडतां येत नाहीं व म्हणून मुसलमानांना दिलेला हक्क कायम ठेविला पाहिजे. भारतमंत्री व व्हाइसरॉय हे जरी विशेष प्रतिनिधित्वाच्या तत्त्वाला प्रतिकूल आहेत तरी तें तत्त्व शीख लोकांना लागू न केल्यास अयोग्य ( Inexpedient ) होईल व म्हणून मुसलमानांप्रमाणें त्यांनाहि विशेष प्रतिनिधित्वाचा हक्क देण्यांत यावा अशी त्यांची शिफारस आहे.

मुसलमान आणि शीख यांशिवाय इतर जे अल्पसंख्याक वर्ग आहेत, त्यांना विशेष प्रतिनिधित्वाचा हक्क देण्यापेक्षां नेमणुकीचें तत्त्व अधिक चांगलें असें त्यांचें मत आहे. असल्या वर्गांच्या हितासंबंधाचें संरक्षण सरकारनें त्या वर्गांतील प्रमुख पुढाऱ्यांना कौन्सिलांत नेमून करावें असा त्यांचा अभिप्राय आहे. तथापि, कांहीं अल्पसंख्याक वर्गांना नेमणुकीचें तत्त्वहि चांगलें लागू पडणार नाहीं. अशा वर्गांकरितां त्यांची शिफारस अशी आहे कीं, कांहीं मतदारसंघांना एकापेक्षां जास्त सभासद निवडून घेण्याचा हक्क द्यावा, त्यापैकीं कांहीं सभासद त्या वर्गांचेच असावेत, परंतु त्यांची निवडणूक मात्र त्या त्या मतदारसंघांतील सर्व वर्गांच्या मतदारांनीं करावी.

## अधिकारी सभासद.

लोकनियुक्त आणि सरकारनें नेमलेले ह्याशिवाय अधिकारी सभासद असावेत, अशी सूचना करण्यांत आली आहे. असले सभासद आतां नेमण्याचें कारण नाहीं, असा भारतमंत्री आणि व्हाइसरॉय यांचा अभिप्राय नाहीं. मात्र ‘ जबाबदार सरकारच्या ’ स्वाधीन केलेल्या खात्यांबद्दल जो प्रश्न निघेल त्याबद्दल त्यांनीं मत देऊं नये, असल्या प्रश्नाचा निकाल लोकनियुक्त व सरकारनें नेमलेले बिनअधिकारी सभासद यांनीच करावा असा जरी नियम करण्यांत आला नाहीं, तरी तसा प्रघात पाडण्यांत यावा अशी त्यांची सूचना आहे.

कायदेकौन्सिलांच्या घटनेबद्दल केलेल्या शिफारशी वरप्रमाणे आहेत. आतां कायदेकानू करण्याबद्दल काय योजना सुचविल्या आहेत तें पाहूं.

वर सांगितलेंच आहे कीं, सर्व प्रांतिक विषयांचे दोन विभाग करण्यांत येऊन कांहीं 'जबाबदार' सरकारच्या स्वाधीन करण्यांत यावे व कांहीं 'बेजबाबदार' सरकारच्या हातांत राखून ठेवण्यांत यावे अशी भारतमंत्री व व्हाइसरॉय यांची सूचना आहे. आतां एखादा प्रश्न असा उपस्थित होईल की तो, ह्या दोहोंपैकी कोणत्या विभागांत येतो याबद्दल मतभेद होईल. असा मतभेद झाला असतां काय करावें ? या प्रश्नाचें उत्तर असें देण्यांत आलें आहे कीं, तो प्रश्न कोणत्या विभागांत येतो याचा सबंध कार्यकारी सरकारनें विचार करावा, परंतु त्याचा निकाल सरतेशेवटीं गव्हर्नरनें द्यावा व तो बंधनकारक समजावा. सारांश, एखाद्या वादग्रस्त प्रश्नाच्या वर्गीकरणाविषयीं निर्णय करण्याचा अधिकार एकट्या गव्हर्नरास असावा, अशी भारतमंत्री आणि व्हाइसरॉय यांची सूचना आहे.

लोकनियुक्त सभासदांचें ज्यांत मताधिक्य आहे अशी कायदेकौन्सिलें, आणि एखादा कायदा लोकमताविरुद्ध असला तरी तो पास करून घेण्याची 'बेजबाबदार' सरकारास वाटणारी अवश्यकता, ह्या परस्परविरोधी गोष्टींचा मेळ घालण्याकरितां भारतमंत्री आणि व्हाइसरॉय यांनी ज्या युक्त्या सुचविल्या आहेत त्या मजेदार आहेत. राखून ठेविलेल्या विषयासंबंधानें एखादें बिल पास करून घ्यावयाचें असल्यास गव्हर्नरने त्या बिलाबद्दल असें सर्टिफिकेट द्यावें कीं, "प्रांतांत किंवा प्रांताच्या एखाद्या भागांत शांतता व स्वास्थ्य राखण्यासंबंधानें, किंवा राखून ठेविलेल्या विषयासंबंधानें, आपली जी जबाबदारी आहे ती आपणास पार पाडतां यावी म्हणून हें बिल अवश्य आहे." असें सर्टिफिकिट दिल्यानंतर, त्या बिलाचें कायदे कौन्सिलांत वाचन होऊन त्यावर चर्चा व्हावी. चर्चा चालू असतां कौन्सिलला वाटल्यास त्यानें असा ठराव पास करावा कीं, हें बिल खरोखर राखून ठेविलेल्या विषयासंबंधानें आहे किंवा नाहीं हा प्रश्न हिंदुस्थानसरकारापुढें मांडण्यांत यावा. गव्हर्नरचें सर्टिफिकिट 'शांतता व स्वास्थ्य राखण्याकरितां बिल अवश्य आहे' असें जर असेल तर मात्र कौन्सिलला अशा प्रकारचा ठराव पास करण्याचा अधिकार नाहीं. म्हणजे शांतता व स्वास्थ्य राखण्याकरितां एखादें बिल अवश्य आहे असें गव्हर्नरास वाटलें, परंतु कौन्सिलास वाटत नाहीं, असें झाल्यास तें खरोखर त्या हेतूकरितां

अवश्य आहे किंवा नाही, हा प्रश्न हिंदुस्थान सरकारापुढें मांडण्यांत यावा असा कौन्सिलला ठराव करण्याचा अधिकार नाहीं. असा अधिकार फक्त राखून ठेविलेल्या विषयांबद्दलची आपली जबाबदारी पार पाडण्याकरितां सरकारास अवश्य वाटणाऱ्या बिलासंबधानें असावा असें सुचविण्यांत आलें आहे. वरप्रमाणें कौन्सिलनें ठराव केला म्हणजे त्याप्रमाणें तो प्रश्न हिंदुस्थान सरकारापुढें मांडण्याला गव्हर्नर बांधलेला आहे असें नाही. परंतु मांडल्यास हिंदुस्थान सरकारचा निर्णय प्रमाण समजण्यांत येईल. कौन्सिलच्या ठरावाप्रमाणें तो प्रश्न हिंदुस्थान सरकारापुढें माडण्यात आला नाही, किंवा मांडल्यावर त्या सरकारचा अभिप्राय गव्हर्नरने दिलेलें सर्टीफिकिट योग्य आहे असा पडल्यास सदरहू बिल एकदम कौन्सिलच्या

## ग्रॅन्ड कमिटी

पुढें सादर करण्यांत येइल. ही ग्रँड कमिटी, प्रत्येक असल्या सर्टीफिकिटाच्या बिलाला निराळी असावी. कौन्सिलच्या एकंदर सभासदांपैकी शेंकडा चाळीस किंवा पन्नास तिचे सभासद असावेत. त्यांपैकीं कांहीं सरकारनें नेमलेले व कांहीं कौन्सिलच्या लोकनियुक्त सभासदांनी निवडून दिलेले असे असून सरकारनें नेमिलेल्यांचें आधिक्य असावें. तें इतकेंच असावें की, उदाहरणार्थ, जर एकंदर सभासद चाळीस असले तर त्यांपैकीं एकवीस सरकारनें नेमून द्यावे व बाकीचे एकोणवीस लोकनियुक्त सभासदांनी निवडून द्यावे. एकवीस सरकारनियुक्तांपैकीं दोनतृतीयांश अधिकारी व एकतृतीयांश बिन अधिकारी असावे. ग्रॅन्ड कमिटीला बिल सादर केल्यानतर तिनें त्याचा खल करून तें पास करावे. बिलांत तिला वाटेल त्या तिनें दुरुस्त्या कराव्या. ग्रॅन्ड कमिटीनें एकदां बिल पास केलें म्हणजे तें कौन्सिलपुढें पुनः मांडण्यांत यावें. कौन्सिलनें त्याची चर्चा करावी, परंतु त्यास तें नामंजूर करितां येऊं नये. त्यांत कौन्सिलला दुरुस्ती करितां यावी, परंतु दुरुस्ती करण्याची सूचना आणण्याचा अधिकार कार्यकारी कौन्सिलच्या सभासदासच असावा. यानंतर पुनः कौन्सिलनें ठरलेल्या मुदतीत त्याची चर्चा करावी व त्यानंतर ते पास झालें असें समजावें. परंतु ही चर्चा चालू असतां कौन्सिलला वाटल्यास त्यानें ठराव करून बिलांतील तत्त्वाबद्दल किंवा त्यांतील कलमाबद्दल आपणास वाटत असलेली हरकत नमूद करावी. आणि नंतर गव्हर्नरची त्या बिलाला संमति मिळून त्याला ॲक्टाचें स्वरूप प्राप्त झालें म्हणजे

ऱ्या ॲक्टाबरोबरच कौन्सिलचा ठरावहि गव्हर्नर जनरल आणि स्टेट सेक्रेटरी यांना सादर करण्यांत यावा.

**ग्रॅन्ड कमिटीची** घटना लक्ष्यांत घेतली म्हणजे एक गोष्ट लक्ष्यांत येते. ती ही कीं, हल्लीं ज्याप्रमाणें प्रांतिक कौन्सिलांची घटना आहे, त्याप्रमाणेंच तिची घटना ठेवण्याचा प्रयत्न करण्यांत आला आहे. हल्लीं कौन्सिलांत जसें बिन सरकारी सभासदांचें आधिक्य ( Non-official majority ) आहे, तसें **ग्रॅन्ड कमिटींत** असावें, व हल्लीं ज्याप्रमाणें सरकारला आपणास वाटेल तें बिल बिन सरकारी सभासदांच्या मताधिक्याच्या जोरावर पास करून घेतां येतें, त्याप्रमाणेंच राखून ठेविलेल्या विषयासंबंधानें सरकारला वाटेल तें बिल ग्रॅन्ड कमिटीच्या साहाय्यानें पास करितां यावें, अशी योजना करण्यांत आली आहे. सारांश, कायदेकानू करण्याकरितां वरिष्ठ मंडळ आणि कनिष्ठ मंडळ ( Upper House and Lower House ) अशीं दोन स्वतंत्र मंडळें निर्माण करण्यांत यावीं अशी जरी भारतमंत्री व व्हाइसरॉय यांची शिफारस नाहीं, तरी ' जबाबदार ' सरकारच्या स्वाधीन करण्यांत आलेल्या खात्यांविषयींचीं बिलें आणि राखुन ठेविलेल्या विषयांबद्दलचीं बिन सर्टिफिकिटाचीं बिलें अशीं दोन्ही प्रकारचीं बिलें पास करण्याकरितां कायदेकौन्सिल, आणि सर्टिफिकिटांचीं बिलें पास करण्याकरितां **ग्रॅन्ड कमिटी** अशी योजना करण्यांत आली आहे. ग्रँड कमिटींत सरकारी सभासदांचें आधिक्य ठेवण्याची शिफारस नाहीं, परंतु बिन सरकारी सभासदांचें आधिक्य असावें अशी शिफारस आहे. कदाचित् **ग्रँड कमिटीं**तील लोकनियुक्त सभासद व नेमिलेले बिन सरकारी सभासद एक होऊन ते सर्टिफिकिटाचें बिल पास होऊं देणार नाहींत. याबद्दल रिपोर्टांत असें म्हटलें आहे कीं, सर्टिफिकिटाच्या बिलाला नेमलेल्या सात बिन सरकारी सभासदांपैकीं सहाजणांचा सुद्धां पाठिंबा सरकारला मिळवितां आला नाहीं, तर असें बिल पास न झालेलेंच बरें !

जबाबदार सरकारच्या स्वाधीन केलेल्या खात्यांविषयींचीं बिलें व बिन सर्टिफिकिटाचीं बिलें हीं कौन्सिलनेंच पास केलीं पाहिजेत हें वर सांगितलेंच आहे. आतां कदाचित् स्वाधीन केलेल्या खात्याविषयींचें एखादें बिल अशा स्वरूपाचें असेल कीं, राखून ठेविलेल्या विषयांच्या प्रांतांत त्यामुळें अतिक्रमण होईल. असें असल्यास तें ' अतिक्रमण करणारें ' आहे असा कार्यकारी मंडळाच्या सभासदानें

आक्षेप घ्यावा. बिलांतील एखादें कलम अशा प्रकारचें असलें किंवा बिलांत सुचवलेली एखादी दुरुस्ती अशा प्रकारची असली तरी देखील असा आक्षेप घेता यावा. असला आक्षेप घ्यावयाचा तो मात्र कार्यकारी मंडळाच्या सभासदानेंच घेतला पाहिजे; दुसरे कोणास घेण्याचा अधिकार नसावा. असा आक्षेप घेण्यांत आला म्हणजे त्याचा निकाल गव्हर्नरानें लाविला पाहिजे. आक्षेप बरोबर आहे असा गव्हर्नरानें निकाल दिल्यास त्यानें बिल 'अतिक्रमण करणारें' आहे असें सर्टिफिकेट द्यावें. गव्हर्नराने असें सर्टिफिकेट दिल्यावर त्या बिलावर त्यास वाटल्यास त्यानें वादविवाद होऊं देऊं नये. म्हणजे तें बिल 'टाकण्यांत' आलें असें समजावें. किंवा गव्हर्नरला वाटल्यास त्यानें बिलात दुरुस्ती किंवा दुरुस्त्या सुचवाव्या. आणि असें दुरुस्त झालेलें बिल कौन्सिलपुढें सादर करण्यांत यावें किंवा कौन्सिलच्या विनंतीवरून तें **ग्रँड कामिटीकडे** पाठविण्यांत यावें.

## प्रांतिक बजेट.

आता प्रांतिक बजेटाबद्दल काय शिफारशी करण्यात आल्या आहेत ते पाहूं. एकंदर बजेट सबंध कार्यकारी सरकारनें तयार करावें. प्रांतिक उत्पन्नांतून हिंदुस्थान सरकारला जी रक्कम द्यावयाची ती प्रथम त्यांतून वजा करण्यांत यावी व बाकीच्या रकमेचीं राखून ठेविलेली खाती व स्वाधीन केलेली खाती यांच्यामध्यें विभागणी करण्यांत यावी. ही विभागणी करतांना 'राखून ठेविलेल्या खात्यांचा' अगोदर विचार करण्यांत यावा. आणि नंतर जी बाकी राहील तिची वांटणी मंत्रिमंडळानें स्वाधीन केलेल्या खात्यांमध्यें करावी. राखून ठेविलेल्या खात्यांबद्दल बजेटांत नमूद केलेल्या रकमा लेजिस्लेटिव्ह कौन्सिलनें मंजूर केल्या नाहीत, तर गव्हर्नरनें वर लिहिल्याप्रमाणें सदरहु रकमा अवश्य आहेत असें सर्टिफिकेट द्यावें आणि तें दिल्यावर बजेटांतील राखून ठेविलेल्या खात्यांबद्दलच्या भागात फेरबदल करण्याला कौन्सिलास अधिकार असूं नये. बाकीच्या बजेटांत फेरबदल करून तें मंजूर करण्याचा कौन्सिलास अधिकार असावा.

स्वाधीन केलेल्या खात्यांकरितां बजेटांत मंजूर केलेली रक्कम जर पुरेशी नसली तर मंत्रिमंडळास कर लादण्याचा अधिकार असावा. मंत्रिमंडळाच्या संमतीशिवाय कर लादण्याबद्दल कोणतीहि सूचना आणण्यांत येऊं नये. कर लादण्याचा अधिकार मंत्रिमंडळासच असावा. राखून ठेविलेल्या खात्यांत फाजील खर्च करण्यांत येतो व त्यामुळें स्वाधीन केलेल्या खात्यांकरितां पुरेशी रक्कम

मिळत नाही, अशी तक्रार करण्याला जागा राहिल्यास दहा वर्षांनीं कमिशनपुढें ही तक्रार मांडतां येईल, अशी योजना असल्यामुळें कौन्सिलच्या मतास धाब्या-वर बसवून. राखून ठेविलेल्या खात्यांकरितां फाजील खर्च करण्यांत येणार नाहीं, तो योग्य मर्यादेंतच ठेवण्यांत येईल, असा भारतमंत्री व व्हाइसरॉय यांचा समज आहे.

## वरिष्ठ मंडळ.

प्रांतांत मध्यां वरिष्ठ मंडळ स्थापण्याची अवश्यकता नाहीं असा भारतमंत्री आणि व्हाइसरॉय यांचा अभिप्राय आहे. परंतु जबाबदार राज्यपद्धतीची वाढ होऊन प्रांतांत ती पूर्णपणें स्थापन करण्याची पाळी आली म्हणजे वरिष्ठ मंडळ स्थापन करावें किंवा नाहीं ह्या प्रश्नाचा पुन्हां विचार करणें अवश्य आहे व तो कमिशननें करावा अशी सूचना करण्यांत आली आहे.

## प्रांतिक जबाबदार राज्यपद्धतीचा विकास.

प्रांतिक राज्यघटनेंत जे फेरफार भारतमंत्री आणि व्हाइसरॉय यांनी सुचविले आहेत त्यांचें स्वरूप वर सांगितल्याप्रमाणें आहे. प्रांतांत जी जबाबदार राज्यपद्धति अंशतः स्थापन करावयाची तिचा विकास कसा करावयाचा हा प्रश्न राहिला. त्याबद्दल रिपोर्टांत अशी शिफारस करण्यांत आली आहे कीं, सुधारलेल्या कायदेकौन्सिलांची पहिली बैठक होऊन पांच वर्षे झाल्यानंतर प्रांतिक सरकारनें किंवा प्रांतिक कौन्सिलनें ‘ जबाबदार सरकार’च्या हातीं अधिक खातीं देण्यांत यावी असा हिंदुस्थानसरकाराकडे अर्ज करावा व नंतर हिंदुस्थान सरकारनें आपल्यापुढें मांडलेल्या सर्व पुराव्याचा विचार करून कोणती अधिक खातीं जबाबदार सरकारच्या स्वाधीन करण्यास हरकत नाहीं याचा निर्णय करून त्याप्रमाणें भारतमंत्र्याकडे शिफारस करावी. स्वाधीन केलेल्या एखाद्या खात्याचा कारभार अतिशय वाईट रीतीनें करण्यांत आला आहे, असें हिंदुस्थानसरकारास दिसून आल्यास तें खातें राखून ठेवण्याबद्दल किंवा त्यासंबंधानें मंत्र्यांचे अधिकार कमी करण्याबद्दलहि हिंदुस्थानसरकारला वाटल्यास त्यानें शिफारस करावी. हिंदुस्थानसरकारच्या शिफारशीचा विचार करून स्वाधीन केलेल्या खात्यांत आणखी भर घालावयाची किंवा तीं कमी करावयाची, भर घालावयाची असल्यास किती घालावयाची, मंत्र्यांचे अधिकार कमी करावयाचे कीं काय इत्यादि सर्व गोष्टींचा भारतमंत्र्यानें निर्णय करावा. नवीन खातीं ‘ जबाबदार ’

सरकारला देण्यापूर्वी हिंदुस्थान सरकारला वाटल्यास त्यानें अशी अट घालावी कीं 'मंत्र्यांचे पगार' हा यापुढें राखून ठेविलेला विषय समजण्यांत येणार नाहीं, व म्हणून मंत्र्यांचे पगार कौन्सिलला बजेटाचे वेळीं मंजूर करण्याचा अधिकार असावा. हिंदुस्थानसरकारनें जरी ही अट घातली नाहीं तरी कौन्सिलला वाटल्यास त्यानें ठराव करून अशी मागणी करावी कीं कौन्सिलला मंत्र्यांचे पगार मंजूर किंवा नामंजूर करण्याचा अधिकार असावा व त्याप्रमाणें हिंदुस्थान-सरकारनें व्यवस्था करावी. मंत्र्यांचे पगार मंजूर किंवा नामंजूर करण्याचा अधिकार कौन्सिलास मिळाला म्हणजे मंत्री कौन्सिलास पूर्णपणें जबाबदार होतील.

सुधारलेलें पहिलें कौन्सिल भरल्यानंतर पांच वर्षांनीं जे फेरफार करावयाचे ते वर दिलेल्या योजनेप्रमाणें करण्यांत यावे. त्यानंतर आणखी पांच वर्षांनी एक कमिशन नेमण्यांत येऊन त्यानें एकंदर सर्व स्थितीचें परीक्षण करावें. कोणत्या प्रांतांत पूर्ण जबाबदार राज्यपद्धति स्थापन करण्यास हरकत नाही, कोणत्या प्रांतांत स्वाधीन केलेली खातीं वाढवावी व ती किती वाढवावी, कोणत्या प्रांतांत स्वाधीन केलेली खाती कमी करावी, आणि एकंदर जबाबदार राज्यपद्धतींत कोणकोणत्या सुधारणा कराव्या, इत्यादि सर्व प्रश्नांचा कमिशननें विचार करून आपला अभिप्राय द्यावा. मतदारीचा हक्क, मतदारसंघांची घटना, अल्पसंख्याक वर्गाचें प्रतिनिधित्व, मतदार आपला हक्क योग्य रीतीनें बजावीत आहेत किंवा नाहीत, या प्रश्नांचाहि कमिशननें विचार करावा.

एखाद्या प्रांतात पूर्ण जबाबदार राज्यपद्धति स्थापन करितां येईल किंवा नाहीं याचा विचार करण्याकरितां दहा वर्षांनी कमिशन नेमण्यांत यावें. ह्या शिफारशीवरून त्या मुदतीनंतर पूर्ण प्रांतिक जबाबदार राज्यपद्धति निदान कांहीं प्रांतांत स्थापन करण्यास हरकत नाहीं, असा भारतमंत्री व व्हाइसरॉय यांचा अभिप्राय आहे, असा कोणाचा समज होईल; परंतु तो होऊं नये म्हणून त्यांनीं रिपोर्टांत असें स्पष्ट म्हटलें आहे कीं, दहा वर्षांनंतर पूर्ण प्रांतिक जबाबदार राज्यपद्धति स्थापन करावी असें आमचें मत आहे, अशी कोणीहि कल्पना करून घेऊं नये. पूर्ण प्रांतिक जबाबदार राज्यपद्धति स्थापन करण्याला आज ज्या अडचणी आहेत, त्या थोड्या तरी प्रमाणानें दहा वर्षांनंतरहि राहतील व म्हणून त्या मुदतीनंतरहि पूर्ण प्रांतिक जबाबदार राज्यपद्धति स्थापन करितां येणार नाहीं, असा भारतमंत्री आणि व्हाइसरॉय यांचा अभिप्राय आहे.

## हिंदुस्थानसरकारासंबंधीं सुधारणा.

प्रांतिक सरकारासंबंधीं रिपोर्टांत सुचविलेल्या सुधारणा वरप्रमाणें आहेत. आतां हिंदुस्थान सरकारविषयक सूचना काय आहेत तें पाहूं. हिंदुस्थानसरकारांत जबाबदारीच्या तत्त्वाला अनुसरून सुधारणा सध्यां करावयाची नाहीं, फक्त हिंदुस्थानसरकारचें कायदेकौन्सिल अधिक विस्तृत व प्रातिनिधिक करून त्याचें सरकारावर अधिक वजन पडेल अशी व्यवस्था असावी, हें तत्त्व भारतमंत्री व व्हाइसरॉय यांनीं प्रतिपादिलें आहे, हें आम्हीं वर सांगितलेंच आहे.

## कार्यकारी कौंसिल.

ह्या तत्त्वाला अनुसरून पहिली शिफारस करण्यांत आली आहे ती ही की, गव्हर्नरजनरलच्या कार्यकारी कौन्सिलांत हिंदी सभासद अधिक असावे. निम्मे सभासद हिंदी असावे अशी शिफारस करण्यांत आली नाहीं; फक्त त्यांची संख्या वाढवावी एवढेंच मोघम म्हटलें आहे.

## लेजिस्लेटिव्ह असेंब्ली.

दुसरी शिफारस अशी आहे कीं, सध्यांच्या कौन्सिलच्या सभासदांची संख्या वाढवून ती शंभर करावी. त्याचें नांव लेजिस्लेटिव्ह असेंब्ली हें असावें. ह्या शंभर सभासदांपैकीं दोनतृतीयांश लोकनियुक्त असावे व बाकीचे एकतृतीयांश सरकारनें नेमावे. सरकारनें नेमिलेल्या एकतृतीयांशापैकीं एकतृतीयांश बिन अधिकारी असावे, व बाकीचे अधिकारी असावे.

## मतदारीचा हक्क.

**प्रांतिक** कायदेकौन्सिलांच्या सभासदांची निवडणूक प्रत्यक्षरीत्या व्हावी अशी स्पष्ट शिफारस करण्यांत आली आहे. त्याप्रमाणें **लेजिस्लेटिव्ह असेंब्लीच्या** सभासदांचीहि निवडणूक प्रत्यक्षरीत्या करण्यांत यावी असा स्पष्ट अभिप्राय देण्यांत आलेला नाहीं. ह्या मुद्यासंबंधानें भारतमंत्री व व्हाइसरॉय म्हणतात: " प्रत्यक्ष निवडणुकीचें तत्त्व आम्हांस अगदीं मान्य आहे; परंतु हिंदुस्थान देशाचा विस्तार इतका प्रचंड आहे कीं, तें अमलांत आणणें कठिण आहे. मतदार व उमेदवार यांचा निकट संबंध येणें अवश्य आहे आणि असा निकट संबंध येण्याला अडचण पडणार नाहीं अशा प्रकारचे मतदारसंघ स्थापन करणें कदाचित् अशक्य होईल...प्रांतिक कायदेकौन्सिलें व हिंदुस्थानसरकारचें कायदे

कौन्सिल यांच्या निवडणुकीसंबंधीं नियम सारखे असणें इष्ट आहे हें खरें; व म्हणून लेजिस्लेटिव्ह सभासदांची निवडणूक कोणत्या पद्धतीनें व्हावी याचा विचार, मतदारीचा हक्क वगैरे प्रश्नांचा विचार करण्याकरितां जी कमिटी नेमण्यांत येणार आहे तिनें करावा. त्या कमिटीला कदाचित् असें दिसून येईल कीं, **लेजिस्लेटिव्ह असेंब्लीच्या** सभासदांची निवडणूक प्रत्यक्ष रीतीनें व्हावी अशी व्यवस्था करणें अगदीं अशक्य आहे. असें जर तिला दिसून आलें, तर तिनें अप्रत्यक्ष निवडणुकीच्या भिन्न भिन्न पद्धतींचा विचार करावा. अप्रत्यक्ष निवडणुकीच्या पद्धतीला आक्षेप काय घेतां येण्यासारखे आहेत, हें आम्ही जाणून आहों. परंतु अप्रत्यक्ष पद्धतीचेंच अवलंबन करावयाचें असल्यास **लेजिस्लेटिव्ह असेंब्लीच्या सभासदांची निवड करण्याचा हक्क प्रांतिक कायदे कौन्सिलांतील बिन सरकारी सभासदांना देण्यांत यावा असा आमचा अभिप्राय आहे. आणि ही पद्धत इतर कोणत्याही अप्रत्यक्ष पद्धतीपेक्षां हिंदी लोकमताला अधिक ग्राह्य होईल, असें आम्हांस वाटतें.** ”

लोकनियुक्त सभासदांचें आधिक्य असलेली लेजिस्लेटिव्ह असेंब्ली आणि सरकारला अवश्य वाटणारे कायदे लोकमताला पसंत आहेत किंवा नाहीत या गोष्टीला निर्णायक महत्त्व ( Decisive importance ) न देतां ते पास करून घेण्याची अवश्यकता, या दोन गोष्टी परस्परविरोधी आहेत. तेव्हां त्यांचा मेळ घालण्याकरितां मॉंटेग्यु आणि लॉर्ड चेल्म्सफर्ड यांनीं

## कौन्सिल ऑफ स्टेट

या नवीन संस्थेची कल्पना काढली आहे. ह्या कौन्सिल ऑफ स्टेटचे सभासद पन्नास असावेत. त्यांपैकीं एकवीस लोकनियुक्त असावे व बाकीचे एकोणतीस सरकारनें नेमलेले असावे. ह्या एकोणतिसांपैकीं पंचवीस, गव्हर्नर जनरलच्या कार्यकारी कौन्सिलच्या सभासदांसुद्धां, अधिकारी असावे, आणि बाकीचे चार बिनअधिकारी असावे. सरकारी कामगारांना लेजिस्लेटिव्ह असेंब्ली व कौन्सिल ऑफ स्टेट ह्या दोन्ही संस्थांचे सभासद होतां यावें. एकवीस लोकनियुक्त सभासदांपैकीं पंधरा प्रांतिक कायदेकौंसिलांतील बिनसरकारी सभासदांनीं निवडून द्यावे, व बाकीचे सहा मुसलमान वर्ग, जमीनदार व व्यापारी मंडळ्या यांनीं प्रत्येकीं दोन याप्रमाणें निवडून द्यावे. वरील पंधरा सभासदांपैकीं मुंबई, मद्रास, बंगाल, बिहार, संयुक्त-

प्रांत व पंजाब येथील कायदेकौन्सिलांतील बिन सरकारी सभासदांनीं प्रत्येकीं दोनप्रमाणें निवडून द्यावे आणि ब्रह्मदेश, मध्यप्रांत आणि आसाम येथील बिन सरकारी सभासदांनीं प्रत्येकीं एक याप्रमाणें निवडून द्यावे. एखाद्याला कौन्सिल ऑफ स्टेटचें सभासद निवडण्यांत आलें कीं, त्याला प्रांतिक कायदेकौन्सिलाचा किंवा लेजिस्लेटिव्ह असेंब्लीचा सभासद होतां येणार नाहीं; तो जर त्या संस्थेचा सभासद असेल तर त्यानें आपल्या जागेचा राजीनामा दिला पाहिजे.

## कायदेकानू करण्याची पद्धत.

येणेंप्रमाणें दोन संस्था निर्माण केल्यानंतर कायदेकानू करण्याची पद्धत कशी असावी याबद्दल ज्या सूचना करण्यांत आल्या आहेत त्या अशा आहेत. बिलें दोन प्रकारचीं असतात. सरकारी बिलें व दुसरीं खाजगी सभासदानें आणलेलीं बिलें. खाजगी सभासदानें आपलें बिल अर्थातच आपण ज्या संस्थेचे सभासद आहों त्यांतच आणलें पाहिजे. सरकारी बिल सामान्यतः लेजिस्लेटिव्ह असेंब्लींत आणलें जाईल, व नंतर कौन्सिल ऑफ स्टेटकडे पाठविण्यांत येईल. लेजिस्लेटिव्ह असेंब्लीनें ज्या स्वरूपांत तें बिल पास केलें असेल त्याच स्वरूपांत कौन्सिल ऑफ स्टेटनें तें पास केलें तर अर्थातच कांहीं भानगड राहणार नाहीं. परंतु कौन्सिलनें सुचविलेल्या दुरुस्त्या जर असेंब्लीला पसंत पडल्या नाहींत तर दोघांची संयुक्त बैठक भरविण्यांत येऊन तींत तें जसें पास होईल, तसें त्याला कायद्याचें स्वरूप मिळावें. कायदे करण्याची ही सामान्य पद्धत झाली. परंतु कौन्सिलनें सुचविलेल्या पण असेंब्लीला अमान्य असलेल्या दुरुस्त्या जर हिंदुस्थानसरकारास अवश्य वाटल्या तर त्यानें ' शांतता, व्यवस्था आणि सुराज्य ' याकरितां त्या अवश्यक आहेत असें सर्टिफिकिट द्यावें व असें सर्टिफिकीट देण्यांत आलें म्हणजे त्या अमान्य करण्याचा असेंब्लीला अधिकार असूं नये किंवा त्या पास करण्याकरितां संयुक्त बैठक भरविण्याचेंहि कारण नाहीं. सारांश, कौन्सिलनें केलेल्या दुरुस्त्या शांतता, व्यवस्था व सुराज्य यांकरितां अवश्यक आहेत असें हिंदुस्थानसरकारनें सर्टिफिकीट दिलें म्हणजे त्यांना कायद्याचें स्वरूप आलें असें समजावें.

कल्पना करा कीं, एखादें सरकारी बिल आणण्यालाच असेंब्लीनें परवानगी दिली नाहीं किंवा तें बिल तिनें नापास केलें, तर काय करावयाचें ? अशा स्थितींत गव्हर्नर जनरल–इन्–कौन्सिलनें सर्टिफिकीट द्यावें कीं तें बिल

'शांतता, व्यवस्था व सुराज्य' यांकरितां अवश्य आहे. असें सर्टिफिकीट दिल्यावर तें पुनः कौन्सिलांत आणावें व कौन्सिलनें तें पास केलें म्हणजे त्यास कायद्याचें स्वरूप आलें असें समजावें. तें पुनः असेंब्लींत आणण्याचें कारण नाहीं. तसेंच एखाद्या जरूरीच्या प्रसंगीं हिंदुस्थानसरकारला वाटल्यास सर्टिफिकीट देऊन एखादें बिल असेंब्लींत न आणतां एकदम कौन्सिलांत आणावें आणि कौन्सिलनें तें पास केलें म्हणजे तें पास झाल्याबद्दल असेंब्लीला कळविण्यांत यावें.

खासगी सभासदानें आणलेलें बिल ज्या संस्थेचा तो सभासद असेल तींत पास झाल्यावर दुसऱ्या संस्थेंत आणण्यांत यावें व तिनें तें पास केल्यावर त्याला कायद्याचें स्वरूप प्राप्त व्हावें. जर त्याबद्दल असेंब्ली आणि कौन्सिल यांत मतभेद झाला तर दोघांची संयुक्त बैठक भरविण्यांत येऊन तींत निकाल करण्यांत यावा. आतां एखाद्या खासगी बिलांत असेंब्लीनें कांहीं दुरुस्त्या केल्या, परंतु त्या 'शांतता, व्यवस्था व सुराज्य' यांस अपायकारक आहेत असें सरकारचें मत आहे; असें झाल्यास हिंदुस्थानसरकारनें त्याप्रमाणें सर्टिफिकीट, द्यावें व तें दिल्यावर कौन्सिल तें बिल सरतेशेवटीं ज्या स्वरूपांत पास करील त्या स्वरूपांत तें पास झालें असें समजावें.

कायदेकानू करण्याच्या वरील पद्धतीविषयीं भारतमंत्री व व्हाइसरॉय रिपोर्टांत म्हणतातः " असेंब्ली आणि कौन्सिल ह्या दोन्ही संस्थांच्या संमतीनें कायदा व्हावा, ही पद्धति, सामान्यतः अमलांत यावी. परंतु सर्टिफिकीटच्या बिलांबद्दल कौन्सिलची संमति प्रमाण धरण्यांत यावी आणि इतर प्रकारच्या बिलांबद्दल दोन्ही संस्थांतलि बिनसरकारी सभासदांचें मत प्रमाण मानण्यांत यावें. सर्टिफिकीट देण्याची अवश्यकता कमी होऊं लागली म्हणजे कौन्सिलला इतर देशांप्रमाणें केवळ वरिष्ठ मंडळाचें स्वरूप प्राप्त होऊन दोन्ही संस्थांमधील मतभेदांचा निकाल संयुक्त बैठक भरवून तींत लावण्यांत येईल. " संयुक्त बैठकींत निदान सत्त्यायशी सभासद लोकनियुक्त असतील; तेव्हां तींत जो निर्णय होईल तो त्यांच्या मताप्रमाणें होईल असें मानण्यास हरकत नाहीं.

## हिंदुस्थानसरकारचें बजेट.

हिंदुस्थानसरकारचें बजेट असेंब्लीला सादर करण्यांत यावें. परंतु तें मंजूर करण्याचा किंवा त्यांत फेरबदल करण्याचा तिला अधिकार असूं नये.

कौन्सिललाहि तो अधिकार असूं नये असें रिपोर्टांत स्पष्ट लिहिलेलें नाहीं; तेव्हां कौन्सिलला तो देण्यांत यावा असा भारतमंत्री आणि व्हाइसरॉय यांचा अभिप्राय आहे असें दिसतें.

## प्रिव्ही कौन्सिल.

कौन्सिल ऑफ स्टेटखेरीज प्रिव्ही कौन्सिल या नांवाची आणखी एक नवीन संस्था स्थापन करण्यांत यावी अशी भारतमंत्री व व्हाइसरॉय यांची शिफारस आहे. राजेरजवाडे, कार्यकारी कौन्सिलचे सभासद, मंत्री, हायकोर्टाचे न्यायाधीश, कौन्सिल ऑफ स्टेटचे सभासद, अतिशय प्रसिद्धीस आलेले गृहस्थ अशांनाच प्रिव्ही कौन्सिलचे सभासद नेमण्यांत यावें व ह्या नेमणुका बादशहानें सभासदांच्या हयातीपर्यंत कराव्या. राजकीय धोरण, राज्यकारभार वगैरे बाबींसंबंधानें गव्हर्नर जनरलनें प्रिव्ही कौन्सिलचा सल्ला घ्यावा. ज्याप्रमाणें इंग्लंडांत प्रिव्ही कौन्सिलच्या कमिट्या नेमण्यांत येऊन त्या शास्त्रीय शोध, शास्त्रीय शिक्षण वगैरे बाबतींत चौकशी करून रिपोर्ट करितात, त्याप्रमाणें हिंदी प्रिव्ही कौन्सिलचा उपयोग होईल, अशी भारतमंत्री व व्हाइसरॉय यांनी आशा व्यक्त केली आहे.

## दिल्ली अद्याप दूर आहे.

हिंदुस्थानसरकारासंबंधी ज्या सुधारणा रिपोर्टांत सुचविल्या आहेत त्या विशेष नाहीत, असें खुद्द भारतमंत्री व व्हाइसरॉय यांना वाटत असावें असें दिसतें. कारण, ज्या प्रकरणांत त्या सुधारणांचा विचार करण्यांत आला आहे, त्याचे शेवटी ते म्हणतात, " जबाबदार राज्यपद्धतीचा किल्ला हस्तगत होण्याला अद्याप किती विलंब लागणार आहे हें पाहून ज्या हिंदी राजकारणी गृहस्थांचीं मनें उतावीळ होतील त्यांना आमचें असें सांगणें आहे की, हिंदुस्थानच्या इतिहासांत, " हनोझ, दिल्ली दूर आस्त " हे उद्गार काढण्याचे किती तरी प्रसंग आले होते, याची त्यांनीं आठवण करावी. "

हिंदुस्थानसरकार व प्रांतिक सरकारें ह्यासंबंधानें भारतमंत्री व व्हाइसरॉय यांच्या ज्या मुख्य सूचना आहेत त्या येथपर्यंत सांगितल्या. आतां कांही किरकोळ सूचना सांगून 'पार्लमेंट व इंडिया कौन्सिल' ह्या बाबतीत काय शिफारसी करण्यांत आल्या आहेत, त्या पाहूं.

## कौन्सिलचे ठराव.

कौन्सिलचे ठराव म्हणजे हल्लींप्रमाणेंच शिफारसी होत असें समजण्यांत यावें. ते सरकारला बंधनकारक समजण्यांत येऊं नयेत. परंतु असेंब्लींत किंवा प्रांतिक कौन्सिलांत लोकनियुक्त सभासदांचें आधिक्य असल्यामुळें हल्लींप्रमाणें लोकनियुक्त सभासदांनीं आणलेले ठराव नामंजूर होणार नाहींत. कौन्सिलनें पास केलेले ठराव कायद्यानें सरकारला बंधनकारक जरी नसले तरी सरकार त्यांस सध्यांहि महत्त्व देत असतें व पुढेंहि प्रांतिक कौन्सिलांत किंवा असेंब्लींत पास झालेल्या ठरावांस सरकार महत्त्व देईल.

## पुरवणी प्रश्न.

पुरवणी प्रश्न विचारण्याचा हक्क मूळ प्रश्न विचारणाऱ्यासच नव्हे तर इतर सभासदांसहि असावा अशी शिफारस करण्यांत आली आहे. एखादा प्रश्न विचारणेंच सार्वजनिक हितास अपायकारक असल्यास तो विचारूं देऊं नये; परंतु प्रश्न तसा अपायकारक नाहीं, त्याचें उत्तर देणें अपायकारक आहे, असें असल्यास प्रश्न विचारूं द्यावा; मात्र त्यास असें उत्तर द्यावें कीं "ह्या प्रश्नाचें उत्तर देणें सार्वजनिक हिताला अपायकारक होईल."

## स्टँडिंग कमिट्या.

प्रांतिक सरकारांनी तसेंच हिंदुस्थानसरकारनें स्टँडिंग कमिट्या नेमाव्या. कोणत्या खात्यांकरितां कमिट्या नेमाव्या हें सरकारनें ठरवावें व कोणत्या बाबी कमिटीपुढें मांडण्यांत याव्या हें, खातें ज्या सभासदांच्या हातांत असेल त्यानें ठरवावें. त्यांचीं कामें काय असावीं हें गव्हर्नर जनरल-इन्-कौन्सिलनें नियम करून ठरवावें.

## नामदार.

प्रांतिक कौन्सिल व असेंब्ली यांच्या सभासदांना 'नामदार' म्हणण्यांत येऊं नये. नामदार ही संज्ञा फक्त कौन्सिल ऑफ स्टेट आणि प्रिव्ही कौन्सिल यांच्या सभासदांना द्यावी. प्रांतिक कौन्सिलांच्या सभासदांना एम्. एल्. सी. (Member, Legislative Council) व असेंब्लीच्या सभासदांना 'एम्. एल्. ए. (Member, Legislative Assembly)' ह्या संज्ञा असाव्या.

## सभासदांना वेतन.

सभासदांना वेतन द्यावें किंवा देऊं नये त्याबद्दल रिपोर्टांत कांहींच उल्लेख नाहीं.

## पार्लमेंट व इंडिया कौन्सिल.

प्रांतिक सरकार व हिंदुस्थानसरकार यांत वर सांगितलेल्या सुधारणा अंमलांत आल्या म्हणजे त्यांवरील पार्लमेंटाचा व स्टेट सेक्रेटरीचा ताबा त्या मानानें कमी झाला पाहिजे, हें ज्या चार तत्त्वांच्या पायावर सुधारणेची इमारत उभारलेली आहे त्यांपैकीं चवथें तत्त्व आहे हें आमचे वाचकांस माहीत आहेच. जे प्रांतिक विषय 'जबाबदार' सरकारच्या स्वाधीन करण्यांत येतील त्यांसंबंधानें अर्थातच पार्लमेंटाचा ताबा नष्ट करण्यांत आला पाहिजे. जे विषय 'राखून' ठेविण्यांत येतील त्यांसंबंधानेंहि, प्रांतिक सरकारांना अधिक स्वातंत्र्य देण्यांत येणार आहे ही गोष्ट लक्ष्यांत घेतां, पार्लमेंटाचा ताबा कमी करण्यांत यावा; बारीकसारीक गोष्टींत पार्लमेंटानें हात घालूं नये. धोरणविषयक बाबींत मात्र पार्लमेंटाचा ताबा हल्लींप्रमाणेंच राहूं द्यावा.

हिंदुस्थानाकडे पार्लमेंट दुर्लक्ष करतें, हिंदुस्थानचा महत्त्वाचा प्रश्न निघाला तरी पार्लमेंटाचे सभासद त्याचा विचार करीत नाहींत, हिंदुस्थानच्या बजेटावरील वादविवाद रिकाम्या बैठकींत बहुधा होत असतो, अशी तक्रार आहे. सबब हिंदुस्थानविषयक प्रश्नांत पार्लमेंट लक्ष घालील अशी योजना करणें जरूर आहे. हल्लीं भारतमंत्र्याचा पगार ब्रिटिश तिजोरींतून न देतां हिंदुस्थानच्या तिजोरींतून देण्यांत येत असल्यामुळें हिंदुस्थानच्या बजेटावरील वादविवाद शुष्क व नीरस होतो. भारतमंत्र्याचा पगार व एकंदर इंडिया ऑफिसाबद्दल जो खर्च होतो तो खर्च इतरांच्या खिशांतून होतो, तर त्याबद्दल छाननी करून तो कमी जास्त करण्याच्या भानगडींत आपण कशाला पडा, असें पार्लमेंटाच्या सभासदांना साहजिकपणेंच वाटतें. पार्लमेंट खर्चाचे बाबतींत फार दक्ष असतें; परंतु तें कोणाच्या ? तर इंग्लंडच्या. हिंदुस्थानच्या खर्चाचा बोजा जोंपर्यंत थोडा देखील इंग्लंडवर पडत नाहीं तोंपर्यंत तो कमी झाला काय आणि जास्त झाला काय, पार्लमेंटाला सारखेंच आहे. ही स्थिति नाहींशी व्हावी म्हणून,

## भारतमंत्र्याचा पगार

**ब्रिटिश बजेटांत आकारण्यांत यावा अशी आपण आज कित्येक वर्षें मागणी**

करीत आहों. ती सरतेशेवटीं मि. मॉंटेग्यु आणि चेल्म्सफर्ड यांनीं मान्य केली आहे. परंतु इतक्यानेंच पार्लमेंट हिंदुस्थानच्या प्रश्नांकडे सतत लक्ष देईल असें नाही. म्हणून

## पार्लमेंटची एक कमिटी

नेमण्यांत यावी, अशी भारतमंत्री व व्हाइसरॉय यांची शिफारस आहे. या कमिटीनें हिंदुस्थानविषयक प्रश्नांबद्दल शक्य तितकी माहिती मिळवून बजेटावरील वादविवादापूर्वी आपला रिपोर्ट सादर करावा. तिनें भारतमंत्र्यास प्रश्न विचारावे व त्यांचेकडून कागदपत्र मागवावे. अशा रीतीनें हिंदुस्थानाविषयक प्रश्नांचा सतत विचार करणारी कमिटी नेमल्यावर पार्लमेंटाचें हिंदुस्थानाबद्दल दुर्लक्ष होणार नाही, असा भारतमंत्री व व्हाइसरॉय यांचा भरंवसा आहे.

## भारतमंत्र्याचें कौन्सिल.

भारतमंत्र्याचें कौन्सिल मोडून टाकावें असें कित्येकांचें मत आहे, तर कित्येक त्यांत सुधारणा करण्यांत यावी, असें म्हणतात. सबब, कौन्सिलच्या घटनेचें परीक्षण करून त्याबद्दल रिपोर्ट करण्याकरितां कमिटी नेमण्यांत यावी, अशी मि. मॉंटेग्यु व लॉर्ड चेल्म्सफर्ड यांनी शिफारस केली आहे. कौन्सिलाप्रमाणेंच इंडिया ऑफिसांत कोणत्या सुधारणा करणें अवश्य आहे, याचाहि त्या कमिटीनें विचार करावा.

## देशी संस्थानें.

प्रांतिक सरकारें, हिंदुस्थानसरकार, इंडिया ऑफिस आणि पार्लमेंट ह्यासंबंधानें शिफारशी केल्यानंतर भारतमंत्री आणि व्हाइसरॉय यांनीं देशी संस्थानांसंबंधानें कोणत्या सुधारणा केल्या पाहिजेत या प्रश्नाचा रिपोर्टांत विचार केला आहे. हा प्रश्न बराच महत्त्वाचा आहे व त्याबद्दल देशी संस्थानिकांचे व त्यांच्या प्रजेचे विचार समजणें अवश्य आहे. ब्रिटिश सरकार आणि संस्थानिक यांच्या परस्परसंबंधांत सुधारणा होणें जसें अवश्यक आहे तसेंच संस्थानिक आणि त्यांची प्रजा यांच्या संबंधांत सुधारणा होणें जरूर आहे. ह्या दुसऱ्या प्रश्नाचा रिपोर्टांत विचार करण्यांत आला नाहीं व कदाचित् तो करणेंहि शक्य नव्हतें. तथापि संस्थानिकांनीं आपल्या प्रजेला अधिकाधिक राजकीय हक्क देऊन संस्थानांत शक्य त्या प्रमाणानें जबाबदार राज्यपद्धति स्थापणें अवश्य आहे, असा स्पष्ट अभिप्राय भारतमंत्री आणि व्हाइसरॉय यांनीं व्यक्त केला असता तर चांगलें झालें असतें असें म्हटल्यावांचून आम्हांस राहवत नाहीं. असो; एकंदर।

संस्थानिकांची संख्या सुमारें सातशें असून त्यांचे दोन वर्ग करितां येतात. कांहीं संस्थानांच्या अंतस्थ कारभारांत ब्रिटिश सरकारास सामान्यतः हात घालतां येत नाहीं तर कांहींच्या घालतां येतो. तसेंच, कांहीं संस्थानांस हिंदुस्थानसरकाराबरोबर प्रत्यक्षपणें व्यवहार करण्याचा अधिकार आहे, तर बहुतेकांना गव्हर्नर जनरलचे एजंट किंवा प्रांतिक सरकारें यांच्यामार्फत व्यवहार करावा लागतो. पहिल्या प्रकारची संस्थानें फक्त पांचच आहेत. ज्यांना एजंटामार्फत व्यवहार करावा लागतो, अशी संस्थानें एकंदर १७२ असून त्यांपैकीं १५० मध्य हिंदुस्थानांत, २० राजपुतान्यांत आणि २ बलुचिस्तानांत आहेत. ज्यांना सर्व व्यवहार प्रांतिक सरकारांमार्फत करावा लागतो, अशी संस्थानें एकंदर ५०३ असून त्यांपैकीं ३५० मुंबई इलाख्यांत, ५ मद्रास इलाख्यांत, २ बंगाल इलाख्यांत, ३ संयुक्त प्रांतांत, ३४ पंजाबांत, २६ बिहार आणि ओरिसा प्रांतांत, १५ मध्य प्रांतांत, १६ आसामांत आणि ५२ ब्रह्मदेशांत आहेत. भारतमंत्री आणि व्हाइसरॉय यांनीं ज्या शिफारशी केल्या आहेत, त्या फक्त अंतःस्थ स्वातंत्र्य उपभोगणाऱ्या संस्थानांबद्दल आहेत. ज्यांच्या अंतःस्थ राज्यकारभारांत सुद्धां ब्रिटिश सरकारास हात घालण्याचा अधिकार आहे अशाबद्दल नाहींत.

## संस्थानिकांचें कौन्सिल.

भारतमंत्री आणि व्हाइसरॉय यांची पहिली शिफारस अशी आहे कीं, संस्थानिकांचें एक कौन्सिल असावें. सर्व संस्थानांसंबंधीं, संस्थानें आणि ब्रिटिश हिंदुस्थान यासंबंधीं, आणि ब्रिटिश साम्राज्यासंबंधी असे जे तीन प्रकारचे प्रश्न आहेत, त्यांचा प्रसंगोपात विचार करण्याकरितां कौन्सिल स्थापन करण्यांत यावें. ह्या कौन्सिलाची बैठक वर्षांतून एकदां नियमितपणें भरविण्यांत यावी. कौन्सिलपुढें कोणते प्रश्न मांडावयाचे हें व्हाइसरॉयानें ठरवावें, परंतु कौन्सिलच्या कोणत्याहि सभासदाला किंवा खुद्द कौन्सिलला प्रश्न सुचविण्याचा अधिकार असावा.

## कौन्सिलची स्टॅन्डिंग कमिटी.

संस्थानिकांच्या कौन्सिलनें प्रतिवर्षीं एक लहानशी स्टॅंडिंग कमिटी नेमावी, अशी दुसरी शिफारस आहे. एखाद्या संस्थानच्या हक्काविषयीं प्रश्न निघाला असतां त्याचा निकाल पोलिटिकल खातें तज्ज्ञांचा सल्ला

न घेतां परभारें करून टाकतें व त्यामुळें प्रसंगविशेषीं अन्याय होऊन संस्थानिकांत असंतोष उत्पन्न होतो. असें होऊं नये म्हणून यापुढें असल्या प्रश्नाचा निकाल कमिटीचा अभिप्राय घेऊन करण्यांत यावा. या कमिटीचे सभासद् कौन्सिलनें संस्थानिकांसच नव्हे तर दिवाणांसहि नेमावें.

## कमिशन.

संस्थानासंस्थानांमध्यें, किंवा संस्थान आणि प्रांतिक सरकार किंवा संस्थान आणि हिंदुस्थानसरकार यांच्यामध्यें कांहीं तंटा उपस्थित झाला तर त्याचा निकाल लावण्याकरितां व्हाइसरॉय यांस इष्ट वाटल्यास त्यांनीं कमिशन नेमावें. कमिशनचा निकाल व्हाइसरॉय यांस पसंत पडला नाहीं तर त्यांनीं तें प्रकरण भारतमंत्र्याकडे निकालाकरितां पाठवावें. एखाद्या संस्थानिकास पदच्युत करण्याचा किंवा त्याचे अधिकार कमी करण्याचा किंवा त्याच्या वारसास नालायक ठरविण्याचा प्रश्न उपस्थित झाला तर तो कमिशनपुढें मांडण्यांत यावा. पाहिल्या प्रकारच्या बाबीसंबंधानें कमिशन नेमणें किंवा न नेमणें हें व्हाइसरॉयसाहेबांच्या मर्जीवर अवलंबून असावें; परंतु दुसऱ्या प्रकारच्या बाबीसंबंधानें कमिशन नेमूनच निकाल करण्यांत यावा.

महत्त्वाच्या संस्थानिकांस हिंदुस्थानसरकाराशीं प्रत्यक्षपणें व्यवहार करण्याचा अधिकार द्यावा अशी आणखी सूचना आहे. शिवाय आणखी अशी शिफारस आहे कीं, प्रसंगविशेषीं संस्थानिकांचें कौन्सिल आणि कौन्सिल ऑफ स्टेट यांची संयुक्त परिषद् भरविण्यांत येऊन महत्त्वाच्या प्रश्नांचा विचार व्हावा.

## वरिष्ठ प्रतीच्या जागा.

तारीख २० आगष्ट १९१७ रोजीं ब्रिटिश पार्लमेंटांत हिंदुस्थानासंबंधीं जें धोरण जाहीर करण्यांत आलें त्याचें दुसरें अंग म्हटलें म्हणजे हिंदी लोकांना अधिकाधिक प्रमाणानें वरिष्ठ जागा देणें हें होय. त्यासंबंधानें सूचना करण्यांत आल्या आहेत त्या ह्याः- ( १ ) नेमणुका करण्यासंबंधानें प्रचलित असलेल्या नियमांत जातिविषयक जे निर्बंध अद्याप चालू आहेत ते रद्द करावे.

( २ ) वरिष्ठ प्रतींच्या कांहीं जागा हिंदुस्थानांत भरण्याची पद्धत अंमलांत आणावी.

( ३ ) अनुक्रमें इंग्लंडांत व हिंदुस्थानांत किती वरिष्ठ जागा भरावयाच्या यांचें प्रमाण ठरविण्यांत येऊन तें प्रमाण प्रत्येक वर्षी किती वाढवावयाचें हेंहि ठरवावें.

( ४ ) सिव्हिल सर्व्हिसमधील ज्या वरिष्ठ जागा हिंदुस्थानांत भरावयाच्या त्याचें प्रमाण आरंभीं शेंकडा तेहतीस ठरवून तें प्रत्येक वर्षी दीड या प्रमाणानें अधिक वाढवावें. दहावर्षांनंतर म्हणजे शेंकडा प्रमाण अठ्ठेचाळीस झाल्यानंतर कमिशननें ह्या प्रश्नाचा पुन्हां विचार करावा.

## २ सुधारणांच्या योजनेवर टीका.

मॉंटेग्यु–चेल्म्सफर्ड सुधारणांची योजना काय आहे याची स्पष्ट कल्पना वर दिलेल्या माहितीवरून आमचे वाचकांस होईल अशी आम्हांस आशा आहे. तिचें चांगलें अध्ययन करून तिच्या गुणदोषांबद्दल त्यांनीं आपलें स्वतंत्रपणें मत बनवावें अशी आमची त्यांस आग्रहाची विनंति आहे. राजकीय प्रश्नांचा स्वतंत्रपणें विचार करून आपला अभिप्राय देण्याचा प्रत्येक ज्ञात्या स्त्रीपुरुषानें प्रयत्न केला पाहिजे. स्वतःचें मत ठरवितांना इतरांचीं मतें काय आहेत हें कोणी पाहूं नये असें नाहीं; परंतु माहिती न मिळवितां किंवा विचार न करितां दुसऱ्यांची री ओढणें हें बौद्धिक व नैतिक गुलामगिरीचें लक्षण आहे. ही गुलामगिरी ज्या देशांत आहे त्यास कधींहि मोठेपणा प्राप्त होणार नाहीं. असल्या गुलामगिरीशिवाय प्रायः राष्ट्राचा नाश होत नाहीं. व ती नष्ट, निदान अत्यंत कमी, झाल्याशिवाय त्याचा पुनरुद्धार होणार नाहीं. आपल्या देशांतील बौद्धिक व नैतिक गुलामगिरी दिवसेंदिवस कमी होत चालली आहे ही समाधानाची गोष्ट आहे; परंतु ती आणखी कमी होणें अवश्य आहे. आम्ही जी सरकारी योजनेवर टीका करणार आहों ती कोणत्याही पक्षाचा फाजील अभिमान बाळगून करणार नाहीं. **भारतसेवकाचें** जें स्वतंत्र धोरण आहे त्यास अनुसरून आमची टीका आहे. रिपोर्टांत लिहिल्याप्रमाणें ती विचारपूर्वक आहे असें भारतमंत्री आणि व्हाइसरॉय यांस आढळून येईल अशी आम्हांस आशा आहे.

## कांहीं समाधानकारक शिफारशी.

रिपोर्टांत केलेल्या कांहीं शिफारशी समाधानकारक आहेत ह्याबद्दल मतभेद होणें शक्य नाहीं. ( १ ) स्टेट सेक्रेटरीचा पगार ब्रिटिश बजेटांत आकारावा. ( २ ) हिंदुस्थानच्या प्रश्नांबद्दल सतत विचार करण्याकरितां पार्लमेंटाची कमिटी

नेमावी. ( ३ ) इंडिया कौन्सिलच्या घटनेंत कोणते फेरफार करावे याचा विचार करण्याकरितां कमिटी नेमावी. ( ४ ) प्रांतिक सरकारांवरील हिंदुस्थान-सरकारचा व पार्लमेंटाचा, व हिंदुस्थान सरकारावरील पार्लमेंटाचा, ताबा कमी करण्यांत यावा. ( ५ ) प्रांतिक सरकारांना स्वयंसत्ता ( Provincial autonomy ) देण्यांत यावी. ( ६ ) गव्हर्नर जनरलच्या कार्यकारी कौन्सिलांतील हिंदी सभासदांचें प्रमाण वाढवावें, ( ७ ) प्रांतिक कायदे-कौन्सिलांत लोकनियुक्त सभासदांचें आधिक्य ठेवावें, ( ८ ) त्यांची निवड प्रत्यक्ष पद्धतीनें व्हावी, ( ९ ) मतदारांचा हक्क शक्य तितका विस्तृत असावा, ( १० ) लेजिस्लेटिव्ह असेंब्लींत लोकनियुक्त सभासदांचें आधिक्य असावें, ( ११ ) प्रांतिक कौन्सिलांच्या स्टँडिंग कमिट्या नेमाव्या, (१२) स्थानिक स्वराज्य पूर्णपणें स्थापन करावें. ह्या सर्व शिफारशी समाधानकारक आहेत यांत शंका नाहीं व त्यांस हिंदी लोकमताकडून पाठिंबाच मिळेल. ह्या सुधारणा सुचविल्या-बद्दल आम्ही मि. मॉंटेग्यु व लॉर्ड चेल्म्सफर्ड यांचे मनःपूर्वक आभार मानतों. परंतु हिंदुस्थानांत जबाबदार राज्यपद्धति स्थापन करण्याकरितां, किंवा अन्य शब्दांनी सांगावयाचें असल्यास, हिंदी जनतेच्या हातांत सत्ता देण्याकरितां, त्यांनीं कोणत्या सुधारणा सुचविल्या आहेत, याचा जर नीट निःपक्षपात बुद्धीनें विचार केला तर मोठ्या दुःखानें म्हणावें लागतें कीं, त्या अपुऱ्या, असमाधान-कारक अतएव अग्राह्य आहेत. **विशेषतः. प्रांतिक सरकारासंबंधीं सुचविलेल्या सुधारणा अगदींच अपुऱ्या व असमाधानकारक आहेत असें आमचें स्पष्ट मत आहे.**

## मोठा दोष.

**सुधारणांच्या योजनेंतील सर्वांत मोठा दोष म्हटला म्हणजे प्रमुख प्रांतांत सुद्धां पूर्ण प्रांतिक जबाबदारराज्यपद्धति स्थापन करण्याबद्दल शिफारस करण्यांत आली नाहीं, हा होय.** योजनेंतील इतर दोषांकडे जरी लक्ष दिलें नाहीं, आणि ह्या एकाच दोषाचा विचार केला तरी त्यामुळें तिची किंमत किती तरी कमी झाली आहे! प्रमुख प्रांतांना पूर्ण जबाबदार राज्यपद्धति देण्यांत यावी अशी जर भारतमंत्री आणि व्हाइसरॉय यांनीं शिफारस केली असती तर तिच्यांतील इतर दोष राहूनहि ती भरींव आहे असें मानण्याला विचारी माणसाला शंका वाटली नसती. परंतु प्रांतिक

खात्यांची विभागणी करून कांहीं खातीं संप्रदत्त ( Transferred ) आणि बाकीचीं राखींव ( Reserved ) असा भेद करून फक्त पहिल्या प्रकारच्या खात्यांची अंमलबजावणी जबाबदार राज्यपद्धतीच्या तत्त्वाबरहुकूम करण्यांत यावी हें तत्त्व योजनेंत ग्रथित केल्यामुळें ती गुंतागुंतीची, बिकट झाली आहे, इतकेंच नव्हे तर अपुरी व असमाधानकारक झाली आहे. ती अव्यवहार्य होईल किंवा नाहीं हें जरी आतांच निश्चितपणें सांगतां येणार नाहीं, तरी अनुभवांतीं ती तशी आढळून आल्यास नवल नाहीं.

प्रमुख प्रांतांतसुद्धां पूर्ण प्रांतिक जबाबदार राज्यपद्धति स्थापन न करण्याला भारतमंत्री आणि व्हाइसरॉय यांनीं जीं कारणें दिलीं आहेत त्यांचा आतां आपण विचार करूं. वास्तविक पाहातां प्रांतिक जबाबदार राज्यपद्धतीसुद्धां पूर्णपणें स्थापन करितां येत नाहीं, हा मुद्दा इतका महत्त्वाचा आहे कीं, त्याचा भारतमंत्री आणि व्हाइसरॉय यांनीं एका स्वतंत्र प्रकरणांत नीट रीतीनें विचार करावयास पाहिजे होता. परंतु त्यांनीं तसें न करितां त्या मुद्याच्या समर्थनार्थ भिन्न भिन्न ठिकाणीं फक्त त्रोटक विचार व्यक्त केले आहेत. रिपोर्टाच्या १२३।१२४ पानांत ते म्हणतात, " जबाबदार राज्यपद्धतीचा अर्थ असा आहे कीं, कार्यकारी सरकारचे सभासद मतदारांना जबाबदार असून ते त्यांना काढून टाकतां आले पाहिजेत. आणि मतदारांनीं हा आपला अधिकार आपल्या प्रतिनिधींच्या द्वारें बजाविला पाहिजे. जबाबदार राज्यपद्धतीच्या ह्या दोन अटी आहेत. त्या **पूर्णपणें** अंमलांत येण्याला खालील गोष्टी अवश्य आहेतः—( १ ) सामान्य जनतेच्या हितसंबंधाचें संरक्षण होण्याकरितां मतदारीचा हक्क विस्तृत असून त्याप्रमाणें मतदारसंघ असले पाहिजेत. ( २ ) प्रतिनिधींची निवड ज्ञानपूर्वक करण्यास लागणारी योग्यता मतदारसंघांत असली पाहिजे आणि ( ३ ) जोंपर्यंत सभासदांचें बहुमत कार्यकारी सरकारला अनुकूल आहे तोंपर्यंतच तें अधिकारारूढ राहील, असा राज्यघटनेचा प्रघात पडला पाहिजे. परंतु हिंदुस्थानांत या तिन्ही अटी आढळून येत नाहींत. हिंदुस्थानचे प्रांत व त्यांतलि हितसंबंध इतके अवाढव्य आहेत कीं, ते राष्ट्रीय स्वरूपाचे आहेत असें म्हणण्यास हरकत नाहीं. राज्यकारभाराचा अनुभव ज्यांना आहे असे लोक थोडे आहेत. मतदारीच्या हक्काच्या अंमलबजावणीचा अनुभव बहुतेकांशीं नाहींच असें म्हटल्यास चालेल. सबब, आरंभीं लोकांना

राजकीय शिक्षण दिलें पाहिजे आणि तें जबाबदारीच्या तत्त्वाचा आस्ते आस्ते परंतु अधिकाधिक विकास करूनच देतां येईल. **सहाव्या प्रकरणांत ज्या मुद्यांचा आम्हीं विचार केला आहे त्यावरून असें अनुमान निघतें कीं, पूर्ण प्रांतिक जबाबदार राज्यपद्धति स्थापन करितां येत नाहीं.** "

रिपोर्टाच्या १४० पानांत असें म्हटलें आहे की, "पूर्ण प्रांतिक जबाबदार राज्यपद्धति स्थापन केल्यास राज्यकारभाराची इमारतच ढांसळून पडेल. हा सिद्धांत गृहीत धरूनच कार्यकारी सरकारची घटना ठरविली पाहिजे."

रिपोर्टाच्या १५५।१५६ पानांत भारतमंत्री आणि व्हाइसरॉय म्हणतात, "राज्यकारभाराचें कार्य अविभाज्य (Indivisible) आहे. सबब, आम्हीं सुचविल्याप्रमाणें तें विभक्त केल्यास घोटाळा होऊन इतक्या भानगडी उपस्थित होतील की, आमची योजना अव्यवहार्य आहे असें दिसून येईल, असा आक्षेप कदाचित् घेण्यांत येईल. **या आक्षेपांतील जोर** (Force) **आम्ही जाणून आहों**. त्याचा नीट विचार करून तो टाळण्याकरितां आम्हीं शक्य तितकी तजवीज केली आहे. परंतु जे टीकाकार त्याचेवर भिस्त ठेवून आमची योजनाच नादान ठरवितील, त्यांस आमचें असें उत्तर आहे कीं, आम्हीं इतर योजनांचा विचार केला आहे आणि त्याबद्दल आमचें असें मत आहे कीं, त्यामुळें तर अधिकच घोंटाळा उडेल आणि राज्यकारभाराचें यंत्रच बंद पडेल. आमच्या योजनेवर ही जी विध्वंसक टीका करण्यांत येईल तीं, तिलाच केवळ लागू नसून जींत, प्रचलित राज्यपद्धति आणि पूर्ण प्रांतिक जबाबदार राज्यपद्धति या दोहोंमधील टप्पे (Stages) आंखण्याचा प्रयत्न करण्यांत आला आहे, अशा कोणत्याहि योजनेला लागू पडेल. आतां असे टप्पे आंखून ठेवणें अवश्य आहे हें २० ऑगस्ट १९१७ रोजी जाहीर केलेल्या धोरणांत गृहीत धरलें आहे. (Postulated). आणि खरोखर असे टप्पे जर करण्यांत आले नाहींत तर पूर्ण बेजबाबदार पद्धतींतून पूर्ण जबाबदार राज्यपद्धतींत एकदम उडी मारल्यावांचून गत्यंतर राहणार नाहीं. (No other course open than to take a precipitate plunge forward from total irresponsibility to complete responsibility.)

## पूर्ण प्रांतिक जबाबदार राज्यपद्धति स्थापन न करण्याचीं कारणें.

प्रांतांना पूर्ण जबाबदार राज्यपद्धति न देण्याबद्दल जीं कारणें रिपोर्टांत देण्यांत आलीं आहेत तीं आम्हीं विस्तारशः वर दिलीं आहेत. त्यावरून तीं किती त्रोटक आहेत हें कोणाच्याही लक्षांत येईल. हा प्रश्न अत्यंत महत्त्वाचा असतांही त्याचा कोठेंही सांगोपांग व्यवस्थित विचार करण्यांत आलेला नाहीं. तथापि वर जे उतारे दिले आहेत त्यांचें पृथक्करण ( Analysis ) केल्यास भारतमंत्री आणि व्हाइसरॉय यांच्या मतें पूर्ण प्रांतिक जबाबदारराज्यपद्धति स्थापन न करण्याला जीं कारणें आहेत, तीं येणेंप्रमाणें सांगतां येतील:—

( १ ) तारीख २० ऑगस्ट १९१७ रोजीं जें धोरण जाहीर करण्यांत आलें तें असें आहे की, जबाबदार राज्यपद्धति टप्याटप्यानेंच किंवा हप्त्याहप्त्यानेंच दिली पाहिजे. त्या धोरणान्वयें पूर्ण **राष्ट्रीय** जबाबदार राज्यपद्धति तर देतां येत नाहींच; परंतु पूर्ण प्रांतिक जबाबदार राज्यपद्धतिहि स्थापन करतां येत नाहीं. अन्य शब्दांनी सांगावयाचें असल्यास पूर्ण प्रांतिक जबाबदार राज्यपद्धति स्थापन करण्यांत यावी ही शिफारस त्या धोरणाच्या विरुद्ध आहे.

( २ ) पूर्ण प्रांतिक जबाबदार राज्यपद्धति स्थापन करणें म्हणजे प्रचलित बेजबाबदार राज्यपद्धतीतून पूर्ण जबाबदार राज्यपद्धतींत एकदम मोठा उडी मारणें होय.

( ३ ) पूर्ण प्रांतिक जबाबदार राज्यपद्धति स्थापन केल्यानें राज्यकारभाराची इमारतच ढांसळून पडेल.

( ४ ) जबाबदार राज्यपद्धति पूर्णपणें अंमलांत आणण्याला ज्या तीन गोष्टी अवश्य लागतात त्या हिंदुस्थानांत नाहीत.

( ५ ) सहाव्या प्रकरणांत ज्या गोष्टींचा विचार करण्यांत आला आहे त्या लक्ष्यांत घेतां पूर्ण प्रांतिक जबाबदार राज्यपद्धति स्थापन करतां येत नाहीं.

ह्या कारणांचा आपण आतां क्रमशः विचार करूं.

### पहिलें कारण.

पहिलें कारण कितपत बरोबर आहे हें पाहण्यापूर्वीं तारीख २० ऑगस्ट रोजीं जाहीर केलेलें धोरण काय आहे हें नीट पाहणें अवश्य आहे. भारतमंत्री आणि व्हाइसरॉय यांनीं त्या धोरणाचा जो अर्थ केला आहे तो चुकीचा आहे असें

आमचें मत आहे. व म्हणून आमचें हें मत बरोबर आहे किंवा नाहीं याचा निर्णय आमच्या वाचकांना स्वतंत्रपणें करितां यावा म्हणून आम्हीं प्रथम तें धोरण येथें अक्षरशः नमूद करितों. रिपोर्टाच्या पहिल्या प्रकरणाच्या आरंभींच भारतमंत्री आणि व्हाइसरॉय यांनीं तें शब्दशः दिलें आहेः—"हिंदुस्थानच्या राज्यकारभाराच्या प्रत्येक शाखेंत हिंदी लोकांना अधिकाधिक भाग देणें, आणि ब्रिटिश साम्राज्याचा घटक या नात्यानें जबाबदार राज्यपद्धति अधिकाधिक सिद्ध करण्याच्या हेतूनें स्वराज्यसंस्थांचा आस्ते आस्ते विकास करणें, हें ब्रिटिश सरकारचें धोरण असून तें हिंदुस्थानसरकारासहि पूर्णपणें मान्य आहे. या धोरणाला अनुसरून भरींव सुधारणा शक्य तितक्या लवकर अंमलांत आणण्याचें ब्रिटिश सरकारनें ठरविलें आहे. ह्या भरींव सुधारणा कोणत्या हें ठरविण्यापूर्वी हिंदुस्थानांतील आणि विलायतेंतील अधिकाऱ्यांनीं औपचारिक पद्धतीचा अवलंब न करितां विचारविनिमय करावा असेंहि त्यांनीं ठरविलें आहे. सबब मीं हिंदुस्थानांत जाऊन या प्रश्नाचा व्हाइसरॉयाबरोबर खल करावा, तसेंच व्हाइसरॉयाबरोबर प्रांतिक सरकारांच्या मतांचा विचार करावा, आणि प्रातिनिधिक संस्था आणि व्यक्ती यांच्या सूचना काय आहेत त्या ऐकून घ्याव्या, अशी व्हाइसरॉयनें केलेली विनंति मीं मान्य करावी, असें ब्रिटिश सरकारनें राजेसाहेबांच्या संमतीनें ठरविलें आहे.

"मी आणखी असें सांगतों कीं, या धोरणाला अनुसरून जी प्रगति करावयाची ती क्रमिक टप्प्यांनींच घडून आणतां येईल. हिंदी लोकांच्या कल्याणाची जबाबदारी ब्रिटिश सरकार आणि हिंदुस्थान सरकार यांचेवर आहे. सबब या धोरणाला अनुसरून जी सुधारणा करावयाची ती किती व केव्हां करावयाची याचा निर्णय त्यांनींच केला पाहिजे. आणि तो करितांना, या धोरणाला अनुसरून ज्यांस देशसेवा करण्याच्या नवीन संधी प्राप्त होतील ते सरकाराबरोबर कितपत सहकारित्व करितील आणि त्यांच्या जबाबदारीच्या जाणिवेवर कितपत विश्वास ठेवितां येईल या दोन गोष्टींचा विचार करावा लागेल.

"सरकारातर्फे जी सुधारणांची योजना तयार करण्यांत येईल तिची चर्चा करण्याला भरपूर संधि देण्यांत येईल, व नंतर ती योग्य वेळीं पार्लमेंटाला सादर करण्यांत येईल."

(The policy of His Majesty's Government with which the Government of India are in complete accord is that of the increasing association of Indians in every branch of the administration and the gradual development of self-governing institutions with a view to the progressive realization of responsible Government in India as an integral part of the British Empire. They have decided that substantial steps in this direction should be taken as soon as possible, and that it is of the highest importance as a preliminary to considering what these steps should be that there should be a free and informal exchange of opinion between those in authority at Home and in India. His Majesty's Government have accordingly decided, with his Majesty's approval, that I should accept the Viceroy's invitation to proceed to India to discuss these matters with the Viceroy and the Government of India, to consider with the Viceroy, the views of local Governments, and to receive with him the suggestions of representative bodies and others.

" I would add that progress in this policy can only be achieved by successive stages. The British Government and the Government of India, on whom the responsibility lies for the welfare and advancement of the Indian people must be judges of the time and measure of each advance, and they must be guided by the co-operation received from those upon whom new opportunities of service will thus be conferred and by the extent to which it is found that confidence can be reposed in their sense of responsibility.

" Ample opportunity will be afforded for public discussion of the proposals which will be submitted in due course to Parliament. "

प्रांतांत जबाबदार राज्यपद्धति पूर्णपणें स्थापन करणें हें वरील जाहिरनाम्यांत व्यक्त केलेल्या सरकारी धोरणाविरुद्ध आहे, असें भारतमंत्री आणि व्हाइसरॉय

यांचें म्हणणें आहे, तें कसें ? या प्रश्नाला त्यांचें उत्तर असें आहे कीं, वरील जाहिरनाम्यांत 'क्रमिक टप्प्यांनीं '( Successive stages ) हे शब्द आहेत; आणि त्या शब्दांचा अर्थ खातेवारीनें ( By departments ) असा होतो. सारांश, प्रांतिक खात्यांची विभागणी करून, कांहीं खातीं 'संप्रदत्त,' आणि कांहीं 'राखीव' असा भेद करण्यांत यावा, आणि 'संप्रदत्त' खात्यांबद्दलच मात्र जबाबदार राज्यपद्धति स्थापन करण्यांत यावी, किंवा अन्य शब्दांनीं सांगावयाचें असल्यास, जबाबदार राज्यपद्धति 'खातेवारीनें' स्थापण्यांत यावी. या तत्त्वाला आधार काय, तर जाहिरनाम्यांत, 'क्रमिक टप्प्यांनीं' ( by successive stages ) हे शब्द आहेत, हा होय !

'क्रमिक टप्प्यांनीं' या दोन शब्दांवरून मि. मॉंटेग्यु व लॉर्ड चेल्म्सफर्ड यांनीं काढलेलें हें अनुमान बरोबर आहे काय ? या प्रश्नाचा विचार करतांना एक गोष्ट लक्ष्यांत घेतली पाहिजे ती ही कीं, आगष्ट वीस रोजीं भारतमंत्र्यांनीं जें निवेदन ( Pronouncement ) केलें, त्याचे तीन भाग असून फक्त पहिल्या भागांतच हिंदुस्थानविषयक ब्रिटिश सरकारनें ठरविलेलें धोरण व्यक्त करण्यांत आलें आहे. दुसऱ्या व तिसऱ्या विभागांत जे विचार व्यक्त करण्यांत आले आहेत ते ब्रिटिश सरकारचे नसून भारतमंत्र्याचे वैयक्तिक ( Personal views ) आहेत. हा मुद्दा आमचे वाचकांच्या नीट लक्षांत यावा म्हणून त्याचें स्पष्टीकरण करणें अवश्य आहे.

भारतमंत्र्यानें केलेल्या निवेदनाचे तीन भाग आहेत हें वर सांगितलेंच आहे. पहिल्या भागांत तीन वाक्यें असून त्यांचा आरंभ, अनुक्रमें 'राजेसाहेबांच्या सरकारचें धोरण' ( The policy of His Majesty's Government ), 'त्यांनीं' ( They i. e. the Government ) आणि 'राजेसाहेबांच्या सरकारनें' ( His Majesty's Government ) या शब्दांनीं झालेला आहे. दुसऱ्या भागाचा आरंभ 'मी आणखी असें सांगतों कीं,' ( I would add ) ह्या शब्दसमुच्चयानें करण्यांत आला आहे. दुसऱ्या भागांतील विचारहि पहिल्या भागांत व्यक्त केलेल्या सरकारी धोरणाचाच भाग आहे, असें जर मानावें, तर ( I would add ) 'मी आणखी असें सांगतों' हे शब्द वापरण्याचें कारण काय ? त्याऐवजीं ( They are of opinion, they hold, they have decided ) 'त्यांचें म्हणजे राजेसाहेबांच्या सरकारचें असें मत आहे, त्यांनीं

असें ठरविलें आहे. ' असे शब्द वापरण्यांत आले नसते काय ? वरील किंवा वरच्यासारखे शब्द न वापरतां ज्या अर्थी ' मी आणखी असें सांगतों ' हे शब्द वापरण्यांत आले आहेत, त्याअर्थी अनुमान उघड आहे कीं, पहिल्या भागांत सांगितलेल्या सरकारी धोरणाला भारतमंत्र्यानें आपले वैयक्तिक विचार जोडले आहेत. तसें जर नसतें तर वरील शब्द त्यांनीं वापरलेच नसते.

' टप्प्याटप्प्यानें ' हा जो शब्द वापरण्यांत आला आहे व ज्यावरून भारतमंत्री व व्हाइसरॉय यांनीं एवढें मोठें अनुमान काढलें आहे तो शब्द ' निवेदना ' च्या पहिल्या भागांत नसून दुसऱ्या भागांत आहे. तेव्हां जबाबदार राज्यपद्धतीच्या मार्गांतील प्रगति ' टप्प्या टप्प्यानें 'च घडून आणतां येईल हा अभिप्राय ब्रिटिश सरकारच्या धोरणाचा भाग नसून तो भारतमंत्र्याचा वैयक्तिक आहे. भारतमंत्र्याचें वैयक्तिक मत हिंदी लोकांना बंधनकारक तर नाहींच; पण तें प्रधानमंडळाला, पार्लमेंटाला किंवा ब्रिटिश जनतेलाहि बंधनकारक नाहीं. खुद्द मि. मॉंटेग्यु यांना तें प्रमाण वाटावें हें अगदीं साहजिक आहे; कारण तें त्यांचेंच मत आहे. आणि त्यांनीं ' टप्प्यानें टप्प्यानें ' याचा अर्थ खातेवारीनें असा करून ' राखींव खातीं ' आणि ' संप्रदत्त खातीं ' या भेदाचें तत्त्व आपल्या योजनेंत घुसडून द्यावें हेंहि साहजिक आहे.

सरकारी धोरण ' निवेदनाच्या ' पहिल्या भागांत सांगितलें आहे व दुसऱ्या भागांत भारतमंत्र्यानें आपले वैयक्तिक विचार व्यक्त केले आहेत, हा आमचा अर्थ जर बरोबर असेल, तर उघडच आहे कीं, प्रांतिक जबाबदार राज्यपद्धति टप्प्याटप्प्यानें म्हणजे खातेवारीनें स्थापन केली पाहिजे ह्या भारतमंत्री आणि व्हाइसरॉय यांच्या अनुमानाला ' सरकारी धोरणाचा ' आधार नाहीं. भारतमंत्र्यांचेच ते शब्द असल्यामुळें त्यांनीं त्याचा ' खातेवारीनें ' असा अर्थ करून ' खातेवारीनें ' जबाबदार राज्यपद्धति स्थापन करण्याबद्दल शिफारस करावी, हें साहजिक आहे. परंतु आगष्ट वसिच्या सरकारी धोरणामुळें पूर्ण प्रांतिक जबाबदार राज्यपद्धतीची शिफारस करतां येत नाहीं हें भारतमंत्री आणि व्हाइसरॉय यांचें म्हणणें चुकीचें आहे, हें वरील विवेचनावरून वाचकांच्या लक्षांत येईलच.

आतां आपण असें समजूं कीं, आम्ही केलेला अर्थ चुकीचा आहे, आणि ज्यांत ' टप्प्याटप्प्यानें ' हा शब्द आहे तो दुसरा प्यारिग्राफहि सरकारी धोरणाचाच भाग आहे. तथापि प्रश्न असा उपस्थित होतो कीं, ' टप्प्याटप्प्यानें '

याचा अर्थ ' खातेवारीनें 'च असा होतो काय ! त्या शब्दाचा दुसरा व अधिक सयुक्तिक असा अर्थ होणार नाहीं काय ? ' स्टेज ' ( टप्पा ) याचा अर्थ ' खातें ' ( Department ) असा कसा होईल ? त्यास काय आधार आहे ? कोणताही इंग्रजी कोश घेतला तरी त्यांत स्टेज म्हणजे खातें असा अर्थ केलेला सांपडणार नाहीं. ' प्रांतिक सरकार, ' ' राष्ट्रीय सरकार, ' ' प्रांतिक खातीं, ' 'राष्ट्रीय खातीं' हा भेद योग्य आहे व हे दोन टप्पे आहेत असेंहि म्हणतां येईल. परंतु प्रांतिक खात्यांचीच विभागणी करून प्रत्येक खात्याला किंवा प्रत्येक खात्याच्या समुदायाला स्टेज किंवा टप्पा म्हणणें म्हणजे स्टेज ह्या शब्दाचा वाटेल तो अर्थ करण्यासारखें आहे.

' स्टेज ' याचा रिपोर्टांत केलेला अर्थ जर बरोबर नाहीं तर, त्याचा खरा अर्थ काय ? तो समजण्याकरितां दोन गोष्टी लक्षांत घेतल्या पाहिजेत. पहिली गोष्ट ही कीं, हिंदुस्थानांतील सर्व प्रांत सारख्या दर्जाचे नाहींत. कांहीं प्रांत पुढारलेले आहेत तर कांहीं अद्याप मागसलेल्या स्थितींत आहेत. शिवाय ब्रह्मदेश हा जरी हिंदुस्थानला जोडला आहे तरी तो अगदीं निराळा आहे. वायव्य सरहद्दीचा प्रांत, बलुचिस्थान, कूर्ग, अजमीर-मरवार हे प्रांत लहान असून राजकीय दृष्ट्या अद्याप मागसलेले आहेत. त्यांचा राज्यकारभार सर्वस्वीं एकतंत्री असून तेथें सल्लागार मंडळ किंवा कायदेकौन्सिलहि नाहीं. हिंदुस्थानच्या इतर भागांची जशी राजकीय प्रगति झाली आहे तशी त्यांची झालेली नाहीं. त्यांना आजच जबाबदारपद्धति देणें योग्य होणार नाहीं आणि तेथील रहिवाश्यांनीं ती मागितली आहे असेंहि दिसत नाहीं. ब्रह्मदेशांत कायदेकौन्सिल आहे परंतु त्यांत लोकनियुक्त सभासद फारच थोडे असून ब्रह्मी लोकांत फारशी राजकीय जागृति झाल्याचीं चिन्हें दिसत नाहींत. हिंदुस्थानांत स्थानिक स्वराज्याची जितकी वाढ झाली आहे तितकी सुद्धां ब्रह्मदेशांत झालेली नाहीं. तेथें डिस्ट्रिक्ट बोर्डें नाहींत आणि ज्यांत निवडणुकीचें तत्त्व अंशतः अंमलांत आलें आहे अशा म्युनिसिपालिट्याहि फारच थोड्या आहेत. सारांश, बलुचिस्थान, वायव्य सरहद्दीचा प्रांत वगैरे लहान प्रांतांइतका ब्रह्मदेश जरी मागासलेला नाहीं, तरी मुंबई, बंगाल इत्यादि प्रमुख प्रांतांप्रमाणें तो पुढारलेला नाहीं. तेव्हां राजकीय प्रगतीच्या दृष्टीनें ब्रिटिश हिंदुस्थानचे दोन भाग करितां येतील, आणि ब्रह्मदेश हा तिसराच भाग मानण्यास हरकत नाहीं. बलुचिस्थान वगैरे लहान, मागासलेल्या प्रांतांत सध्यां सर्वतोपरी एकतंत्री राज्यपद्धति असून सर्व

राज्यकारभार एकटा कमिशनर चालवितो हें वर सांगण्यांत आलेंच आहे. तेव्हां तेथें आजच जबाबदार राज्यपद्धति स्थापन करणें शक्य नाहीं व इष्टहि नाहीं. तेथें रिपोर्टांत सुचविल्याप्रमाणें प्रथम सल्लागार मंडळ किंवा फार तर कायदे-कौन्सिलें स्थापन करून त्यांच्या कालांतरानें जबाबदार राज्यपद्धतीला योग्य अशा संस्था बनविल्या पाहिजेत. ब्रह्मदेशांतहि जबाबदार राज्यपद्धति आजच स्थापन करणें श्रेयस्कर होणार नाहीं. परंतु तेथील कायदेकौन्सिलांचें पोषणा करून त्यांत लोकनियुक्त सभासदांचें आधिक्य ठेवण्यास हरकत नाहीं. तेव्हां ब्रिटिश हिंदुस्थानांतील प्रमुख प्रांतांत जबाबदार राज्यपद्धति, मागासलेल्या प्रांतांत सल्लागार मंडळें किंवा कायदेकौन्सिलें, आणि ब्रह्मदेशांत लोकनियुक्त सभासदांचें आधिक्य असलेलें कायदेकौन्सिल, अशी व्यवस्था आज करून पुढें कालांतरानें सर्व प्रांतांत जबाबदार राज्यपद्धति स्थापन करण्यांत आली म्हणजे जबाबदार राज्यपद्धति 'टप्प्या-टप्प्यानें' स्थापन केली असेंच होईल.

दुसरी गोष्ट अशी कीं, प्रथम प्रांतिक जबाबदार राज्यपद्धति स्थापन करणें व नंतर राष्ट्रीय जबाबदार राज्यपद्धति स्थापन करणें हे दोन टप्पे आहेत असें म्हट-ल्यास तें अगदीं बरोबर आहे. प्रांतिक जबाबदार राज्यपद्धति हा पहिला टप्पा आणि राष्ट्रीय जबाबदार राज्यपद्धति हा दुसरा टप्पा—असे दोन टप्पे स्पष्ट आहेत. आणि म्हणून टप्प्या-टप्प्यानें जबाबदार राज्यपद्धति स्थापन करणें याचा अर्थ इतकाच आहे कीं, अगोदर प्रांतिक जबाबदार राज्यपद्धति व नंतर राष्ट्रीय जबा-बदार राज्यपद्धति स्थापन करणें. दोन्ही एकदम स्थापन करणें हें 'टप्प्या-टप्प्यानें' ह्या तत्त्वाच्या विरुद्ध आहे हें आम्हांस कबूल आहे; आणि म्हणून पूर्ण प्रांतिक जबाबदार राज्यपद्धति स्थापन करणें हें आगष्ट २० रोजीं जाहीर केलेल्या सर-कारी धोरणाविरुद्ध नाहीं, हें आमचें म्हणणें जर बरोबर धरलें, आणि 'टप्प्या-टप्प्यानें' या तत्त्वाचा वास्तविक रीत्या त्या धोरणांत अंतर्भाव नाहीं, तें भारतमं-त्र्यांनीं आपलें स्वतःचें मत म्हणून प्रतिपादिलें आहे, हा आमचा अभिप्राय चुकीचा आहे असें मानलें, तर जबाबदारीचें तत्त्व, प्रांतिक तसेंच राष्ट्रीय ह्या दोन्ही प्रका-रच्या कारभारांना लावा अशी मागणी करणें विसंगत होईल हें आम्हांस मान्य आहे. आणि म्हणूनच पूर्ण प्रांतिक जबाबदार राज्यपद्धति स्थापन करण्याला सरकार जर तयार झालें, परंतु राष्ट्रीय कारभाराला जबाबदारीचें तत्त्व आजच लावण्याला त्यांनीं नाकारलें तर त्याबद्दल आम्हीं त्यांना दोष देणार नाहीं.

'टप्प्याटप्प्यानें' ( By stages ) ह्या शब्दाचा काय अर्थ केला पाहिजे हें, वरील विवेचनावरून आमच्या वाचकांच्या लक्ष्यांत येईलच. आमचें तर स्पष्ट मत आहे कीं, प्रमुख प्रांतांसंबंधानें तरी दोनच टप्पे आहेत. एक, प्रांतिक जबाबदार राज्यपद्धति व दुसरा, राष्ट्रीय जबाबदार राज्यपद्धति. ह्यांशिवाय आणखी टप्पा नाहीं. आणि 'टप्प्या-टप्प्यानें' जबाबदार राज्यपद्धति स्थापन करावी याचा अर्थ इतकाच कीं, प्रमुख प्रांतांत अगोदर प्रांतिक जबाबदार राज्यपद्धति स्थापन करून नंतर राष्ट्रीय जबाबदार राज्यपद्धति स्थापन करावी. याशिवाय दुसरा अर्थ करून तो प्रमुख प्रांतांना लागू करणें चुकीचें आहे. टप्प्याटप्प्यानें म्हणजे 'खातेवारीनें' या अर्थाला आधार नाहीं.

यासंबंधानें आणखी मुद्दा असा आहे कीं, खातेवारीनें जबाबदार राज्यपद्धति स्थापन करण्याची पद्धति अपूर्व आहे. तिला इतिहासांत आधार नाहीं. ज्या ज्या देशांत जबाबदार राज्यपद्धति आहे, त्या त्या देशांत ती ह्या विलक्षण पद्धतीनें स्थापण्यांत आलेली नाहीं. अशा नवीन पद्धतीचें अवलंबन करून हिंदुस्थानांत जबाबदार राज्यपद्धति केली पाहिजे, असा जर प्रधानमंडळाचा खरोखर अभिप्राय होता तर तो २० आगष्टच्या धोरणांत स्पष्टपणें 'खातेवारीनें' ( By Departments ) हा शब्द घालून कां व्यक्त करण्यांत आला नाहीं ? कोणती एखादी गोष्ट नवीन रीतीनें करावयाची असल्यास, त्या गोष्टीबरोबर ती रीतिही सांगण्यांत येते. आगष्टच्या धोरणांत जबाबदार राज्यपद्धति हें ध्येय स्पष्टपणें व्यक्त करण्यांत आलें. तें ध्येय खातेवारीनेंच सिद्धीस न्यावयाचें असें जर ठरलें होतें, तर तेंहि 'खातेवारीनें' शब्द घालून तितक्याच स्पष्ट रीतीनें व्यक्त करावयास पाहिजे होतें. परंतु ज्याअर्थी खातेवारीनें हा शब्द वापरलेला नाहीं, त्याअर्थी खातेवारीनें जबाबदार राज्यपद्धति स्थापन करावी असा मंत्रिमंडळाचा अभिप्राय निश्चित झाला नव्हता असें अनुमान कां काढूं नये ? तसा अभिप्राय निश्चित झाला होता असें मानावें तर तो स्पष्ट रीतीनें व्यक्त करणारे शब्द न वापरून हिंदी लोकांच्या डोळ्यांत धूळ टाकण्याचा प्रयत्न मंत्रिमंडळानें केला असें अनुमान काढावें लागेल. कारण योग्य अन्वर्थक भाषा वापरून त्यानें वरील अभिप्राय व्यक्त केला असता तर आगष्टच्या जाहीरनाम्यांतील धोरणाबद्दल हिंदी लोकांनीं जी कृतज्ञतापूर्वक पसंती दर्शविली, ती फक्त ध्येयाबद्दल दर्शविण्यांत आली असती; आणि तें ध्येय सिद्धीस नेण्याच्या पद्धतीबद्दल नापसंती दर्शविण्यांत येऊन तिच्याविरुद्ध चळवळ

एकदम सुरू झाली असती. परंतु हिंदी लोकांच्या डोळ्यांत धूळ घालण्याचा प्रयत्न प्रधानमंडळानें केला आहे असा त्यांचेवर आरोप लादण्याला आमची मनोदेवता आम्हांस सांगत नाहीं; निदान वरप्रमाणेंच आमचा अभिप्राय होता, असें प्रधान-मंडळ जाहीर करीतोंपर्यंत आम्हीं त्यांचेवर असा आरोप लादण्याला तयार नाहीं. ह्या आरोप करण्याला जागा ठेवण्यापेक्षां तसा त्यांचा अभिप्राय निश्चित झालेला नव्हता, हेंच अनुमान काढणें आम्हांस अधिक योग्य वाटतें.

खातेवारीनेंच जबाबदार राज्यपद्धति स्थापन करण्यांत यावी असें प्रधानमंडळानें ठरविलें नव्हतें, या विधानाच्या समर्थनार्थ आणखी एक कारण देतां येण्यासारखें आहे. तसें त्यानें ठरविलें होतें असें जर मानलें तर जबाबदार राज्यपद्धति स्थापन करण्याच्या ज्या अन्य रीती भारतमंत्र्यांस सुचविण्यांत आल्या त्यांच्या गुणदोषांचा विचार करण्याचेंच कारण नव्हतें. व काँग्रेस-लीगच्या योजनेचेंहि विस्तृतपणें दोषाविष्करण करण्याची आवश्यकता नव्हती. मंत्रिमंडळानें केलेल्या ठरावाविरुद्ध वरील सर्व योजना आहेत व म्हणून त्या अग्राह्य आहेत हा एकच आक्षेप पुरेसा होता. परंतु रिपोर्टांत त्या सर्वांचा सविस्तर रीतीनें विचार करण्यांत आला आहे, इतकेंच नव्हे तर त्या मंत्रिमंडळानें ठरविलेल्या धोरणाविरुद्ध आहेत असा कोठेंहि आक्षेप घेण्यांत आलेला नाहीं. यावरूनही हेंच निष्पन्न होतें कीं, जबाबदार राज्यपद्धति 'खातेवारीनें' सुरू करावी असें प्रधानमंडळानें निश्चित ठरविलें नव्हतें. ही एक पद्धति त्यांच्या मनांत असेल, नाहीं असें नाहीं; परंतु त्याच पद्धतीचा स्वीकार केला पाहिजे असें त्यांनीं नक्की ठरविलें होतें, असें अनुमान निष्पन्न होत नाहीं.

आमची ही विचारसरणी जर बरोबर असेल, तर उघडच आहे कीं, आगष्ट २० रोजीं जाहीर केलेल्या धोरणानें आमचे हातपाय बांधलेले आहेत, त्या धोरणांतील शर्तींमुळें जबाबदार राज्यपद्धति 'खातेवारीनें' सुरू केली पाहिजे, व म्हणून प्रमुख प्रांतांतहि जबाबदार राज्यपद्धति पूर्णपणें स्थापन करतां येत नाहीं, हा भारतमंत्री आणि व्हाइसरॉय यांचा सिद्धांत चुकीचा ठरतो. भारतमंत्री आणि व्हाइसरॉय यांचे हातपाय वरील धोरणामुळें बांधलेले नाहींत, व **पूर्ण प्रांतिक जबाबदार राज्यपद्धति स्थापन करण्याला त्या धोरणाची हरकत येत नाहीं.**

## दुसरें कारण.

पूर्ण प्रांतिक जबाबदार राज्यपद्धति स्थापन करण्याला भारतमंत्री आणि व्हाइसरॉय यांनीं दिलेलें दुसरें कारण असें आहे कीं, अशी राज्यपद्धति स्थापन करणें म्हणजे "प्रचलित पूर्ण बेजबाबदार राज्यपद्धतींतून पूर्ण जबाबदार राज्य-पद्धतींत एकदम मोठी उडी मारणें होय."

या कारणांत दोन विधानें केलीं आहेत. तीं हीं:–(१) प्रचलित राज्यपद्धति **पूर्ण** बेजबाबदार आहे आणि (२) पूर्ण जबाबदार राज्यपद्धति प्रांतांना देणें म्हणजे पूर्ण बेजबाबदार राज्यपद्धतींतून पूर्ण जबाबदार पद्धतींत **एकदम मोठी** उडी मारणें होय. हीं दोन्हीं विधानें चुकीचीं आहेत.

प्रचलित राज्यपद्धति तात्त्विकदृष्ट्या 'बेजबाबदार' आहे हें खरें. परंतु ती **पूर्ण** बेजबाबदार आहे या विधानांत अतिशयोक्ति आहे. मोर्लेमिंटो सुधारणा अमलांत येण्यापूर्वी ती 'पूर्णपणें बेजबाबदार होती,' असें कदाचित् म्हटल्यास चालेल. परंतु त्या सुधारणा झाल्यानंतर तिचा 'बेजबाबदारीपणा' बराच कमी झाला. लोकमताचा सरकारावर अधिक परिणाम होऊं लागला. इंग्लंडची राज्यपद्धतीच 'जबाबदार' असल्यामुळें हिंदुस्थानचा राज्यकारभार केव्हांहि 'पूर्ण बेजबाबदार' रीतीनें चालविणें शक्य नव्हतें. हिंदुस्थानसरकार हिंदी लोकांना अंशतः तरी जबाबदार आहे हें तत्त्व कायद्यांत जरी ग्रथित करण्यांत आलें नाहीं तरी तें अप्रत्यक्षपणें तारीख २ नवंबर १९०८ रोजीं सप्तम एडवर्ड बादशहांनीं काढलेल्या जाहीरनाम्यांत व्यक्त करण्यांत आलें आहे. वरील जाहीरनाम्यांत खालील वाक्य आहे,

"From the first, the principle of representative institutions began to be gradually intrcduced and the time has come when in the judgment of my Viceroy and Governor-General and others of my Councillors, that principle may be prudently extended."

(आरंभापासून प्रातिनिधिक संस्थांचें तत्त्व आस्ते आस्ते सुरू करण्यांत आलें, आणि आतां वेळ अशी आली आहे कीं, माझ्या गव्हर्नर जनरलच्या व इतर सल्लागारांच्या मतें तें शहाणपणानें वाढविण्यास हरकत नाहीं.) आगष्टच्या धोरणांत 'जबाबदार राज्यपद्धति स्थापन करण्याच्या हेतूनें प्रातिनिधिक

संस्थांचा आस्ते आस्ते विकास करणें' असे शब्द आहेत. जबाबदार राज्य-पद्धतीला प्रातिनिधिक संस्था लागतात व त्यांचें पोषण करून कार्यकारी सरकार त्यांना जबाबदार झालें म्हणजे जबाबदार पद्धति पूर्णपणें अमलांत आली असें आपण म्हणतों. हिंदुस्थानांत प्रातिनिधिक संस्था अस्तित्वांत येऊन कित्येक वर्षें झालीं, व मोर्ले-मिंटो सुधारणांमुळें त्यांचें बरेंच पोषण झालें आहे यांत शंका नाहीं. यापुढील पायरी म्हटली म्हणजे निदान प्रांतिक कौन्सिलांना कार्यकारी सरकार जबाबदार करणें ही होय. ही पायरी चढून जाणें अवघड नाहीं व क्रांतिकारकहि नाहीं.

प्रचलित राज्यपद्धति **पूर्ण बेजबाबदार** आहे, असें मि. मॉंटेग्यू व लॉर्ड चेल्म्सफर्ड म्हणतात; परंतु रिपोर्टाच्या तिसऱ्या प्रकरणांत ते काय म्हणतात तें पहा:—

" They ( i. e. the Morley-Minto changes ) admitted the need for increased representation, while reiterating the impossibility of basing it generally on a direct or general franchise. They admitted the desirability of generally securing non-official approval to the Government legislation......Frankly abandoning the old conception of the Councils as a mere Legislative Committee of the Government, they did much to make them serve the purpose of an inquest into the doings of Government, by conceding the very important rights of discussing administrative matters and of cross-examining Government on its replies to questions...He ( Lord Morley ) took the constitutional view that no relaxation of the control exercised by the British electorate was possible until an Indian electorate...had arisen to take the burden from its shoulders. None the less we are constrained to say that *the features of his reforms do constitute a decided step forward on a road leading at no distant period to a stage at which the question of responsible government was bound to present itself.* ( The Italics are mine. )"

( मोर्ले-मिंटो सुधारणांत, जनतेचें प्रतिनिधत्व प्रत्यक्ष व विस्तृत अशा मतदारांच्या हक्कावर उभारणें अशक्य आहे, ह्या गोष्टीचा पुनरुच्चार जरी करण्यांत आला आहे, तरी त्यांत तें प्रतिनिधित्व वृद्धिंगत करण्याची अवश्यकता मान्य करण्यांत आली आहे. सरकारी कायद्यांना बिनसरकारी संमति मिळण्याची इष्टता त्यांत मान्य केली आहे. कौन्सिलें म्हणजे सरकारच्या कायदे करण्याच्या कमिट्या, ही जुनी कल्पना त्यांत प्रांजलपणें टाकून देण्यांत आली आहे. ठरावांच्या रूपानें सरकारी बाबींचा खल करणें व सरकारची उलट तपासणी करणें हे दोन महत्त्वाचे हक्क दिल्यानें सरकारच्या कृत्यांची चवकशी करण्याचे कामीं त्यांचा चांगला उपयोग होऊं लागला...ब्रिटिश मतदारांच्या शिरावरील जबाबदारी आपले शिरावर घेण्याला हिंदी मतदारसंघ जोंपर्यंत अस्तित्वांत आला नाहीं; तोंपर्यंत ब्रिटिश मतदारसंघाचा ताबा कमी करितां येत नाहीं, असें लॉर्ड मोर्ले यांचें मन होतें. तथापि हें कबूल केलें पाहिजे कीं, त्यांच्या सुधारणांचें स्वरूप लक्ष्यांत घेतलें म्हणजे असें म्हणण्यास हरकत नाहीं कीं, जबाबदार राज्यपद्धतीचा प्रश्न लवकरच उपस्थित होणें अपरिहार्य आहे. )

मोर्ले-मिंटो सुधारणा अंमलांत येऊन आज नऊ वर्षें झालीं. तितक्या अवधींत लोकमताचें वजनहि बरेंच वाढलें आहे. तेव्हां तात्त्विकदृष्ट्या सध्यांची राज्यपद्धति जरी बेजबाबदार असली तरी लोकमताचा सरकारावर मुळींच परिणाम होत नाहीं, असें म्हणणें चुकीचें होईल. व म्हणून ती 'पूर्ण बेजबाबदार' आहे हें भारतमंत्री आणि व्हाइसरॉय यांचें विधान बरोबर नाहा. जबाबदार राज्यपद्धतीच्या पूर्वीची जी अवस्था असते ती आज हिंदुस्थानांतील प्रमुख प्रांतांची आहे. आणि त्या प्रांतांत जबाबदार राज्यपद्धति स्थापन करणें म्हणजे पूर्ण बेजबाबदार पद्धतींतून एकदम मोठी उडी मारणें नसून उत्क्रांतितत्त्वाला अनुसरून पुढील अवस्थेंत सहजगत्या प्रवेश करणें होय.

## तिसरें कारण.

तिसरें कारण असें आहे कीं, पूर्ण प्रांतिक जबाबदार राज्यपद्धति स्थापन केल्यानें राज्यकारभाराची इमारतच ढांसळून पडेल. पूर्ण प्रांतिक जबाबदार राज्यपद्धतीचा असा परिणाम कां व्हावा हें आम्हांस समजत नाहीं. वरील विधानाच्या समर्थनार्थ भारतमंत्री आणि व्हाइसरॉय यांनीं एकहि कारण दिलें नाहीं. रिपोर्टाच्या शेवटीं एका पुरवणींत प्रांतिक विषयाची यादी दिली आहे व दुसऱ्या

पुरवणींत संप्रदत्त विषयांची यादी दिली आहे, हें आम्हीं प्रस्तुत लेखाच्या आरंभीं सांगितलेंच आहे. ह्या दोन्ही याद्यांची तुलना केली असतां खालीं दिलेलीं खातीं 'राखींव' ठेवण्यांत यावीं, असें भारतमंत्री आणि व्हाइसरॉय यांचें मत आहे असें स्पष्ट दिसतें.

१. कायदा आणि सुव्यवस्था यांचें संरक्षण.
   (अ) फौजदारी न्यायाची अम्मलबजावणी.
   (आ) पोलीस–रेल्वे पोलिसामुद्धां.
   (इ) तुरुंग.
   (ई) गुन्हेगार जाती.
   (उ) गुन्ह्यास उत्तेजन देण्याचा कायदा, राजद्रोही सभांचा कायदा, प्रेसॲक्ट, हत्यारांचा कायदा–इत्यादि कायद्यांची अंमलबजावणी.
   (ऊ) विष.
   (ऋ) जुवेबाजी.
   (ॠ) नाटकें व सिनेमा.

२. जमीनमहसुलाची व्यवस्था.
३. जंगलें ( वर्गवारी केलेलीं आणि कांही संरक्षित. )
४. सार्वजनिक कामें–मोठीं पाटबंधाऱ्यांचीं कामें.
५. शिक्षण–उच्च प्रतीचें.
६. सार्वजनिक कामाकरितां जमिनी घेणें.
७. बँका, विम्याच्या कंपन्या इत्यादि.
८. सरकारी छापखाना.
९. एका प्रांतांतून दुसऱ्या प्रांतांत वसाहत करणें.
१०. दिवाणी कोर्टें.

आतां आम्ही भारतमंत्री आणि व्हाइसरॉय यांना विचारतों कीं, वरील खातीं 'संप्रदत्त' केल्यानें राज्यकारभाराची इमारत कशी ढांसळेल हें ते सांगतील काय? 'विष' ही बाब संप्रदत्त केल्यानें राज्यकारभाराची इमारत कशी ढांसळेल? जुवेबाजी संप्रदत्त केल्यानें ती कशी ढांसळेल? नाटकें व सिनेमा संप्रदत्त केल्यानें कशी ढांसळेल? सर्व प्रकारचीं जंगलें संप्रदत्त केल्यानें ती कां ढांसळावी? लहान

पाटबंधाऱ्यांचीं कामें 'संप्रदत्त' केल्यानें ती ढांसळणार नाहीं व मोठीं संप्रदत्त केल्याबरोबर ती ढांसळेल असें कां व्हावें? उच्च प्रतीचें शिक्षण 'संप्रदत्त' केल्याबरोबर ती ढांसळेल यास आधार काय? सार्वजनिक कामाकरितां मिळकती घेण्याचें काम इतकें अवघड आहे कीं काय कीं तें संप्रदत्त केल्याबरोबर घोंटाळा माजेल आणि तो इतका भयंकर कीं, त्यामुळें अराजक स्थितिच उत्पन्न होईल? बँका, विम्याच्या कंपन्या हे विषय राखून ठेविल्या-शिवाय राज्यव्यवस्था सुयंत्रित राहणार नाहीं असें मानण्यास कारण काय? सरकारी छापखान्यांत गुप्त प्रकरणें छापिलीं जातात व तीं जनतेच्या पुढाऱ्यांना कळल्यास राज्यकारभाराची इमारतच एकदम ढांसळून पडेल अशी का भारतमंत्री आणि व्हाइसरॉय यांची समजूत आहे? एका प्रांतांतून दुसऱ्या प्रांतांत वसाहत करणें ही बाब संप्रदत्त केल्याबरोबर राज्यकारभाराचें यंत्र मोडून कां जावें? आतां ह्याहीपेक्षां अधिक महत्त्वाच्या खात्यांचा आपण विचार करूं. जमीनमहसुलाची व्यवस्था लोकांच्या हातांत दिल्याबरोबर राज्यकारभाराची इमारतच कां ढांसळून पडावी? आपल्या हातांत सत्ता आल्याबरोबर जनतेचे प्रतिनिधी जमीनमहसूल घेण्याचेंच बंद करतील किंवा श्रीमंतांच्या जमिनी खालसा करितील अशी कां मि. मॉंटेग्यु व लॉर्ड चेल्म्सफर्ड यांना भीति वाटत आहे? इंग्रजी राज्य होण्यापूर्वी जमीनमहसुलाची व्यवस्था कोण करीत होते? हिंदिच ना? मग त्यावेळीं राज्यकारभाराची इमारत कां ढांसळून पडली नाहीं? जमीनमहसुलाची बाब संप्रदत्त केल्याबरोबर बंगालप्रमाणें जिकडे तिकडे काय-मसाऱ्याची पद्धति सुरू करण्यांत येईल अशी तर भारतमंत्री व व्हाइसरॉय यांना भीति वाटत नाहीं ना? आतां राहिल्या फौजदारी व दिवाणी न्यायाची अंमल-बजावणी, पोलीस, तुरुंग, आणि प्रेसॲक्ट वगैरे कायद्यांची अंमलबजावणी, ह्या बाबी. त्या जबाबदारीच्या व महत्त्वाच्या आहेत हें आम्हांस मान्य आहे. परंतु त्या संप्रदत्त केल्यानें राज्यकारभाराची इमारत अजिबाद ढांसळून पडेल अशी भीति भारतमंत्री व व्हाइसरॉय यांना कां वाटावी? शांतता व सुरक्षितपणा राखण्याला हिंदी लोक नालायक आहेत अशी कां त्यांची समजूत आहे? त्यांना फौजदारी व दिवाणी न्याय चांगल्या रीतीनें देतां येणार नाहीं असें कां त्यांना वाटतें? हल्लीं हिंदी न्यायाधीश नाहींन काय? व ते फौजदारी व दिवाणी न्याय देत नाहींत काय? प्रेस ॲक्टासारख्या कायद्यांची अंमलबजावणी 'जबाबदार' सर-काराकडून चांगल्या रीतीनें होणार नाहीं असें कां मानण्यांत यावें? हल्लींप्रमाणें

त्यांची वाटेल तशी अंमलबजावणी होणार नाहीं हें खरें; परंतु अशी अंमलबजावणी करून फायदा काय ? प्रांतिक सरकारें पूर्णपणें 'जबाबदार' झाल्यावर प्रेस अॅक्टासारख्या जुलमी कायद्यांची अवश्यकताच राहणार नाहीं हें आम्ही खात्रीनें सांगूं शकतों. सारांश, कोणतेंहि 'राखीव' खातें घ्या, तें 'संप्रदत्त' केल्यानें राज्यकारभाराची इमारतच ढांसळून पडेल, ही भीति निराधार आहे; व ती भारतमंत्री व व्हाइसरॉय यांनीं टाकून द्यावी अशी त्यांस आमची आग्रहपूर्वक विनंति आहे.

## चवथें कारण.

आतां चवथ्या कारणाचा विचार करूं. जबाबदार राज्यपद्धति पूर्णपणें अमलांत आणण्याला ( १ ) मतदारीचा विस्तृत हक्क, ( २ ) प्रतिनिधींची निवड ज्ञानपूर्वक करण्यास लागणारी मतदारांची योग्यता, आणि ( ३ ) कौन्सिलांत बहुमताचा पाठिंबा असेल तोंपर्यंत कार्यकारी सरकारची अधिकारारूढता, ह्या तीन गोष्टी अवश्य आहेत हें खरें. ह्यांपैकीं तिसरी गोष्ट जबाबदार राज्यपद्धतीचें लक्षणच असल्यामुळें तिचा विस्तारशः विचार करण्याचें कारण नाहीं.

मतदारीचा हक्क विस्तृत असावा हें इष्ट आहे. परंतु तो एकदम विस्तृत करणें जरी शक्य नसलें तरी त्यामुळें जबाबदार राज्यपद्धतीचा आरंभ करण्याला हरकत येत नाहीं. इंग्लंडांत मतदारीचा हक्क एकदम विस्तृत प्रमाणानें स्थापण्यांत आला नाहीं. इ. स. १८३२ सालापर्यंत तर वरिष्ठ व मध्यम वर्गांच्या लोकांनाच तो देण्यांत आलेला होता. ज्या इतर देशांत जबाबदार राज्यपद्धति आहे तेथेंहि हीच स्थिति होती. मतदारीचा हक्क प्रत्येक जाणत्या स्त्री-पुरुषास असावा हें अवश्य आहे, व हें ध्येय सिद्ध करण्याकरितां मतदारीचा हक्क व त्याची अंमलबजावणी याचें पदोपदीं विचारपूर्वक परीक्षण करून तो अधिकाधिक प्रमाणानें विस्तृत करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. प्रत्येक स्त्री-पुरुषाला हक्क ( Adult suffrage ) हें मतदारीच्या हक्काचें अंतिम पर्यवसान आहे, व हें पर्यवसान होईपर्यंत त्याच्या विकासाला अवकाश राहील, व प्रत्येक जाणता पुरुष किंवा जाणती स्त्री 'स्वराज्यांत' भाग घेते असें म्हणतां येणार नाहीं. परंतु ही अत्युच्च स्थिति प्राप्त होईपर्यंत जबाबदार राज्यपद्धति स्थापन करितां कामा नये किंवा ती स्थापन करावयाची असल्यास, खातेवारीनेंच स्थापन केली पाहिजे हें म्हणणें चुकीचें आहे. भारतमंत्री व व्हाइसरॉय यांच्या विचारसरणीचा अर्थ असा दिसतो

कीं, जोंपर्यंत मतदारीचा हक्क विस्तृत करितां येणार नाहीं, तोंपर्यंत सर्व राष्ट्रीय खातीं व महत्त्वाची प्रांतिक खातीं हीं जबाबदार सरकारच्या हातांतच राखून ठेविलीं पाहिजेत. याचा अर्थ असा होतो कीं, मर्यादित मतदारीच्या हक्काच्या पायावर जबाबदार राज्यपद्धतीची इमारत उभारण्यापेक्षां 'बेजबाबदार' राज्यपद्धति अधिक चांगली. परंतु हें अनुमान चुकीचें आहे. मतदारीचा हक्क विस्तृत नसतांहि जबाबदार राज्यपद्धति स्थापन केल्यास राज्यकारभार चालविण्याची जबाबदारी एकंदर जनतेवर न पडतां तिच्या लहानशा भागावर पडेल हें खरें; परंतु बेजबाबदार पद्धतीनें चालविलेल्या एकतंत्री राज्यपद्धतीपेक्षां एखाद्या वर्गानेंच ( Oligarchy ) कां होईना, परंतु जबाबदार पद्धतीनें चालविलेली राज्यपद्धति अधिक चांगली !

मतदारांनीं जे प्रतिनिधी निवडून द्यावयाचे ते लायक असले पाहिजेत हें आम्हांस कबूल आहे. ज्यांची राष्ट्रीय कळकळ खरीखुरी किंवा उच्च दर्जाची नाहीं, स्वतःचें महत्त्व किंवा स्तोम माजविण्याकडेच ज्यांचें अधिक लक्ष आहे, ज्यांनीं राजकीय प्रश्नांचें चांगलें अध्ययन केलेलें नाहीं, ज्यांची बुद्धिमत्ता केवळ सामान्य प्रतीची असून ज्यांच्यांत धैर्य, चिकाटी, सत्यप्रियता, निरभिलाष इत्यादि नैतिक गुण फारसे झळकत नाहींत असे गृहस्थ जर दुर्दैवानें निवडून आले तर राज्यकारभार उत्तम रीतीनें चालणार नाहीं हें उघड आहे. परंतु सामान्यतः असें म्हणण्यास हरकत नाहीं कीं, मतदारांना लायक उमेदवार कोण आहेत हें चांगलें कळतें व त्यांच्या हातून नालायकांची फारशी निवड होत नाहीं. आतां इंग्लंड, फ्रान्स, इटली, अमेरिका इत्यादि देशांत सुद्धां एखादे वेळीं नालायक उमेदवार निवडून येतात तर हिंदुस्थानांतहि मधून मधून अयोग्य गृहस्थांची निवड झाल्यास त्यांत नवल तें काय ? परंतु मतदारांनीं आपला हक्क योग्य रीतीनें बजावला आहे किंवा नाहीं हें एखाद्या नालायक निवडणुकीवरून न पाहतां एकंदर निवडणुकीवरून पाहिलें पाहिजे. व अशा रीतीनें विचार केला असतां, हिंदी मतदारसंघांना दोष देण्याला विशेष जागा राहील अशी भीति बाळगण्याचें कारण नाहीं.

सारांश, भारतमंत्री आणि व्हाइसरॉय यांनीं जें चवथें कारण दिलें आहे, त्यावरूनहि पूर्ण प्रांतिक जबाबदार राज्यपद्धति स्थापन करण्यांत येऊं नये, हें अनुमान निघत नाहीं.

## पांचवें कारण.

आता राहिलें शेवटचें कारण. तें सर्वांत अत्यंत महत्त्वाचें आहे. मि. मॉंटेग्यु व लॉर्ड चेल्म्सफर्ड यांचें असें म्हणणें आहे कीं, हिंदुस्थानची शैक्षणिक, सामाजिक, धार्मिक, राजकीय वगैरे स्थिति अशी आहे कीं, पूर्ण प्रांतिक जबाबदार राज्यपद्धति स्थापन करितां येत नाहीं. शिक्षणाचा प्रसार फार अल्प आहे; सामान्य लोकांत राजकयि जाणीव बहुतेक नसल्यासारखी आहे; युरोपांत नाहीं इतकें हिंदुस्थानांत दारिद्र्य आहे; लोक फार अडाणी आहेत; धर्मभेद अनेक असून जातिभेद तर असंख्य आहेत; हिंदुमुसलमानांतील सलोखा जरी वाढत असला तरी त्याचा पाया अद्याप भक्कम नसल्यामुळें तो केव्हां नाहींसा होईल याचा नेम नाहीं. ज्या शर्तीवर हिंदुमुसलमानांचें ऐक्य झालें आहे ती शर्तच लक्ष्यांत घेतां त्या ऐक्याचा पाया अद्याप किती डळमळीत आहे हें कोणाच्याहि लक्ष्यांत येईल. हिंदुस्थानची खरी अवस्था अशी आहे आणि म्हणून पूर्ण प्रांतिक जबाबदार राज्यपद्धति स्थापन करणें योग्य व हितावह होणार नाहीं.

हिंदी समाजांतील हे जे दोष रिपोर्टांत दाखविण्यांत आले आहेत ते अजिबात खोटे आहेत असें अर्थातच कोणीहि म्हणणार नाहीं. आमचे समाजांतील दोष आम्ही पूर्णपणें जाणून आहों, व त्या दोषांमुळेंच आमचें राष्ट्रीय जीवन व्हावें तितकें सामर्थ्यवान् झालेलें नाहीं हेंही आम्ही जाणून आहों. परंतु त्या दोषांकडे डोळेझांक करणें ज्याप्रमाणें योग्य होणार नाहीं, त्याप्रमाणेंच त्यांचें अतिशयोक्तीनें वर्णन करणें व त्यापासून वाटेल तीं अनुमानें काढणें हें कठिण नाहीं. ह्यांपैकीं कांहीं दोषांची जबाबदारी सरकारावरच पडते ही गोष्ट तर लक्षांत घेतां, त्यांचा त्यानेंच अशा रीतीनें उपयोग करावा, ही अत्यंत दुःखाची गोष्ट आहे. ज्या सरकारनें प्राथमिक शिक्षणाचा प्रसार करण्याचे कामीं अक्षम्य हयगय केली, त्यानेंच आमच्यांत शिक्षण कमी आहे म्हणून पूर्ण प्रांतिक जबाबदार राज्यपद्धति स्थापन करितां येत नाहीं असें उलट म्हणावें, यामुळें कोणास अत्यंत वाईट वाटणार नाहीं ? परंतु हे सर्व मुद्दे जरी बाजूला ठेविले तरी प्रश्न असा आहे कीं, वर जे दोष दाखविण्यांत आले आहेत त्यांवरून रिपोर्टांत काढलेलें अनुमान निष्पन्न होतेंच काय ? शिक्षणाचा प्रसार कमी आहे या गोष्टीवरून सर्व प्रांतिक खातीं संप्रदत्त करितां येत नाहींत हें अनुमान कसें निघतें? लोक दरिद्री आहेत म्हणून जमीनमहसूलखातें राखूनच ठेविलें पाहिजे असें कां ?

सामान्य लोकांत राजकीय जाणीव आणखी किती तरी वाढली पाहिजे हें खरें. परंतु त्यावरून कांहीं प्रांतिक खातीं सुद्धां 'बेजबाबदार' सरकारच्या हातांत ठेविलीं पाहिजेत हें कां ? धर्मभेद अनेक आहेत, म्हणून निदान प्रांतिक 'स्वराज्य' पूर्णपणें स्थापन करण्याला अडचण कां यावी ? जातिभेद हजारों आहेत हा मोठाच दोष आहे हें आम्हांस मान्य आहे; जातिभेदानें हिंदुस्थानचें अत्यंत अकल्याण झालें आहे व पुढें होईल; व म्हणून जातिसंस्था नष्ट करणें अवश्य आहे, हें मत आम्हांस मान्य आहे. तथापि जातिभेदामुळें प्रांतिक स्वराज्यसुद्धां **पूर्णपणें** स्थापन करितां येत नाहीं, हें अनुमान कसें निघतें, हें आम्हांस समजत नाहीं. आमची तर अशी समजूत आहे कीं, जातिभेद मोडण्याचें जबाबदार राज्यपद्धति हें एक चांगलें साधन आहे; जातिभेदाच्या अस्तित्वाला पोषक जर कांहीं असेल तर बेजबाबदार राज्यपद्धति हीच होय.

पूर्ण प्रांतिक जबाबदार राज्यपद्धति स्थापन न करण्याला जीं कारणें रिपोर्टांत दिलीं आहेत त्यांचा येथपर्यंत विचार झाला. त्या सर्वांचा आम्ही निःपक्षपातबुद्धीनें विचार करण्याचा प्रयत्न केला आहे. आमच्या मतें त्यांवरून **प्रांतिक जबाबदार राज्यपद्धतीसुद्धां पूर्णपणें स्थापन करतां कामा नये हें अनुमान निष्पन्न होत नाहीं.**

आमच्या मतें योजनेंतील अत्यंत मोठा दोष कोणता हें आम्हीं दाखविलें आहे. आतां इतर दोषांचा विचार पुढील अंकीं करूं.

---

# मॉटेग्यु-चेल्म्सफर्ड सुधारणांची योजना.

## लेखांक १.

मॉटेग्यु-चेल्म्सफर्ड सुधारणांच्या योजनेंत अत्यंत मोठा दोष कोणता हें आम्हीं मागील लेखांत दाखविलें आहे. मुंबई, बंगाल ह्यांसारख्या प्रमुख आणि प्रागतिक प्रांतांत सुद्धां पूर्ण जबाबदार राज्यपद्धति स्थापन करण्याची शिफारस करण्यांत आली नाहीं हा त्या योजनेंतील सर्वांत मोठा दोष होय. संप्रदत्त खातीं आणि राखींव खातीं, हें मि. मॉटेग्यु आणि लॉर्ड चेल्म्सफर्ड यांनीं आपल्या योजनेंत ग्रथित केलेलें विभागणीचें तत्त्व घातुक असल्यामुळें 'मूले कुठारः' या न्यायानें, प्रथम त्या तत्त्वावरच हल्ला केला पाहिजे, असा आमचा समज आहे; आणि आमचा असा अभिप्राय असल्यामुळें ह्यासंबंधानें आमच्या कित्येक पुढाऱ्यांनीं स्वीकारलेलें धोरण पाहून आम्हांस फार सखेदाश्चर्य वाटतें. मुंबईस भरलेल्या स्पेशल राष्ट्रीय सभेनें सुद्धां हें विभागणीचें तत्त्व मान्य केलें हें पाहून तर आम्हांस अतिशय दुःख होतें. स्वागत कमिटीचे अध्यक्ष ना. पटेल यांनी आपल्या प्रास्ताविक भाषणांत ह्या तत्त्वाविरुद्ध किती तरी ओरड केली, परंतु विषयनियामक कमिटींत हा प्रश्न निघाला असतां त्यांनीं मूग गिळून ह्या घातुक तत्त्वाचा स्वीकार केला! ना. झीना यांनीं ह्या तत्त्वाला अगोदरच संमति दिली असल्यामुळें त्यांनीं त्याविरुद्ध राष्ट्रीय सभेंत ब्र सुद्धां काढला नाहीं यांत नवल नाहीं. परंतु मिसेस् ॲनी बिझँट आणि लो. टिळक यांनीं सुद्धां हें तत्त्व हाणून पाडण्याचा प्रयत्न केला नाहीं ही मोठी आश्चर्याची गोष्ट आहे! ज्यानीं सरकारी योजना 'अग्राह्य' आहे असा एकदम प्रथम पुकारा केला, त्यांनीं तरी इतकी माघार घेणें उचित नव्हतें! मुंबईसारख्या प्रांतांत पूर्ण जबाबदार राज्यपद्धति स्थापन करण्यांत यावी असा आग्रह धरल्यानें ना. झीनासारख्या कांहीं मुसलमान बंधूंची कदाचित् खप्पामर्जी झाली असती हें खरें, परंतु महत्त्वाचा राष्ट्रीय प्रश्न उपस्थित झाला असतां वैयक्तिक मर्जी-गैरमर्जीची पर्वा कां करण्यांत यावी, हें आम्हांस समजत नाहीं! असो; आपलेच ओंठ आणि आपलेच दांत, तेव्हां ह्यासंबंधानें जास्त लिहिण्यांत हंशील नाहीं. एवढें मात्र खरें

कीं, ह्या प्रश्नाविषयीं खास राष्ट्रीयसभेनें जें कमकुवतपणाचें धोरण स्वीकारिलें त्यामुळें पुष्कळांची निराशा झाली.

सरकारी योजनेवर टीका करण्याचे दोन प्रकार आहेत. एक, तिच्यांतील मूळ तत्त्वें बरोबर आहेत किंवा चुकीचीं आहेत याची छाननी करून त्याप्रमाणें सुधारणा सुचविणें; व दुसरा, तीं तत्त्वें मान्य करून त्यांस बाध येऊं न देतां त्या योजनेंत काय दोष आहेत व ते कसे दूर केले पाहिजेत हें दाखविणें. पहिल्या प्रकारचें अवलंबन करून मॅांटेग्यु–चेल्म्सफर्ड योजनेंत कोणता मोठा दोष आहे हें आम्हीं गेल्या अंकांत दाखविलें आहे. ज्या चार तत्त्वांच्या पायावर सरकारी योजनेची इमारत उभारण्यांत आली आहे तीं तत्त्वें आमचे वाचकांस स्मरत असतीलच. त्यांपैकीं पहिलें, तिसरें आणि चवथें हीं तत्त्वें आम्हांस मान्य आहेत; परंतु दुसरें आम्हांस बिलकूल कबूल नाहीं. प्रांतिक सरकारांच्या राज्यकारभारांत कांहीं खातीं राखीव व कांहीं संप्रदत्त, असा भेद करणें आम्हांस संमत नाहीं, आणि मुंबईसारख्या पुढारलेल्या प्रांतांत तरी सर्व खातीं संप्रदत्त केल्याशिवाय हिंदुस्थानांत जबाबदार राज्यपद्धतीचा खराखुरा पाया घालण्यांत आला, व ता. २० आगष्ट १९१७ च्या निवेदनांत सरकारनें दिलेलें वचन पूर्णपणें पाळण्यांत आलें, असें म्हणतां येणार नाहीं, असें आमचें दृढ मत आहे. आतां, आपण दुसऱ्या प्रकाराचा स्वीकार करून सरकारी योजनेंत काय दोष आहेत हें पाहूं. ही दुसऱ्या प्रकारची टीका करणें आतां अधिकच अवश्य झालें आहे. आपल्या देशाच्या दुर्दैवानें, संप्रदत्त खातीं व राखीव खातीं, हें विभागणीतत्त्व नेमस्तांनींच नव्हे, हिंदुस्थानसरकारच्या कायदेकौन्सिलाच्या कमिटीनेंच नव्हे, तर खुद्द राष्ट्रीय सभेनें मान्य केलें आहे; आणि ह्या तत्त्वाला सर्व पक्षांकडून असा पाठिंबा मिळाल्यावर, ब्रिटिश सरकार किंवा पार्लमेंट, तें टाकून देऊन, सर्व हिंदुस्थानांत अत्यंत प्रागतिक म्हणून ज्याची गणना आहे त्या मुंबई प्रांतांत सुद्धां, पूर्ण जबाबदार राज्यपद्धति स्थापन करण्याला तयार होईल अशी आशा करणें आतां व्यर्थ आहे! आपण आपल्या फाजील नेमस्तपणामुळें आपल्या दुर्दैवी हिंदुस्थानाचें किती नुकसान करीत आहों, याची जाणीव आमच्या कित्येक राष्ट्राग्रणींना होऊं नये हा विचार आमचे मनांत वारंवार येऊन आम्हांस फार खेद होतो! आपणच जर, निदान सर्व प्रांतिक कारभार आमचे हातांत द्या अशी मागणी करीत नाहीं, तर ब्रिटिश पार्लमेंटाचें तरी काय अडलें आहे कीं, त्यानें पूर्ण प्रांतिक जबाबदार राज्यपद्धति आमचे घशांत कोंबण्याचा प्रयत्न करावा!

आणि जर कदाचित तहपरिषदेनें ( Peace Conference ) प्रे. वुइल्सन साहेबांना बिचाऱ्या हिंदुस्थानची आठवण झालीच, आणि त्यांनीं त्याला 'स्वयंनिर्णयाचें तत्त्व' ( Self-determination ) लावण्याचा आग्रह धरून निदान प्रांतिक राज्यकारभार तरी हिंदी लोकांचे हातांत देण्याची वेळ आली आहे अशी सूचना केली, तर बाबू सुरेंद्रनाथ बानर्जी यांच्या कमिटीच्या ठरावाकडेच केवळ नव्हे, तर स्पेशल राष्ट्रीय सभेच्या ठरावाकडे सुद्धां भारतमंत्री आणि प्रधानमंडळ यांनीं बोट दाखवून, 'स्वयंनिर्णयाच्या' तत्त्वाप्रमाणेंच आम्हीं हिंदुस्थानच्या राज्यकारभारांत सुधारणा करण्याचा प्रयत्न करीत आहों, असें त्यांनीं अमेरिकेचे अध्यक्ष यांस भासविण्याचा प्रयत्न कां करूं नये? मुंबईसारख्या प्रमुख प्रांतांतदेखील पूर्ण जबाबदार राज्यपद्धति स्थापन होण्याची आशा आतां फारशी राहिली नसल्यामुळें सरकारी योजनेंतील दुसरें तत्त्व ग्राह्य समजून तिचा विचार करणें आमच्या फाजील नेमस्तपणामुळें आणि राजकीय अदूरदर्शित्वामुळें अवश्य झालें आहे.

कांहीं खातीं 'बेजबाबदार' सरकारच्या हातांत राखून ठेवणें इष्ट आहे असें धरून आपण जर चाललों, तर निदान अशीं खातीं फारच थोडीं असावीं असा आग्रह धरणें अवश्य आहे. सरकारी रिपोर्टांत संप्रदत्त करण्यास हरकत नाहीं म्हणून ज्या विषयांची यादी दिली आहे, तेवढेच विषय संप्रदत्त केल्यानें हिंदी लोकांचें बिलकूल समाधान होणार नाहीं. पूर्ण प्रांतिक 'स्वराज्य' सुद्धां द्यावयाचें नसल्यास, फक्त पोलीस, कायदा आणि न्याय हीं तीनच खातीं राखून ठेवा, असें राष्ट्रीय सभेचें आणि मॉस्लेम लीगचें मागणें आहे; आणि हिंदुस्थानच्या कायदेकौन्सिलाच्या कमिटीनें ह्याविषयीं जरी स्पष्ट सूचना केली नाहीं, तरी ना. सुरेंद्रनाथ बानर्जी, ना. शास्त्री इत्यादि नेमस्त पुढाऱ्यांनीं सुधारणांच्या योजनेबद्दल जे अभिप्राय व्यक्त केले आहेत, त्यांवरून पाहतां, त्यांचेंहि मागणें असेंच आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. सर्व्हंटस् ऑफ इंडिया सोसायटीचें साप्ताहिक 'सर्व्हंट ऑफ इंडिया' त्यांत तर संपादकानें सरकारास निक्षून सांगितलें आहे कीं, सरकारी योजनेची ग्राह्यता किंवा अग्राह्यता कोणतीं खातीं संप्रदत्त करण्यांत येतील ह्यावर अवलंबून राहील; आणि वर सांगितलेल्या तीन खात्यांपेक्षां अधिक खातीं 'बेजबाबदार' सरकारच्या हातांत राखून ठेवण्यांत आल्यास, सरकारी योजनेला नमस्तांचाहि पाठिंबा मिळणार नाहीं. सारांश, मुंबई, मद्रास, बंगाल इत्यादि प्रांतांत

तरी पोलीस, कायदा आणि न्याय ह्यांखेरीज इतर सर्व खातीं संप्रदत्त करण्यांत यावीं अशी त्या त्या प्रांतांतील लोकांची एकमताची मागणी आहे. कोणतीं खातीं राखून ठेवावीं व कोणतीं जनसत्तेच्या स्वाधीन करावीं, या प्रश्नाचा विचार करण्या करितां जी कमिटी नेमण्यांत येईल, तिनें लोकमताला अनुसरून शिफारस केल्यास फारच उत्तम; नाहीं तर ह्यासंबंधानें जोरानें चळवळ सुरू करून लोकांची मागणी पार्लमेंटाकडून मान्य करून घेणें अवश्य होईल. ह्या प्रश्नासंबंधानें मि मॉंटेग्यु आणि लॉर्ड चेल्म्सफर्ड यांनीं आपल्या रिपोर्टांत जे विचार व्यक्त केले आहेत त्यांवरून पाहतां, पोलीस, कायदा आणि न्याय ह्यांखेरीज सर्व खातीं संप्रदत्त करण्यांत यावीं, अशी त्यांची इच्छा दिसत नाहीं. जमीनमहसुलाचें खातेंहि राखुन ठेवण्यांत यावें असें त्यांचें मत आहे. ह्या मताचीच 'विषयकमिटी (Functions Committee) री ओढील अशी भीति आहे. सबब वेळींच सावध होऊन तिच्यापुढें लोकमत योग्य रीतीनें मांडण्यांत येईल अशी आम्हांस आशा आहे. वरील कमिटींत श्री. चिमणलाल हरीलाल सेटलवाड आणि डॉ. सप्रू यांची नेमणूक होणार आहे अशी बोलवा आहे. हें जर खरें असेल तर श्री. सेटलवाड आणि डॉ. सप्रु हे हिंदी लोकमत कमिटीपुढें निर्भीडपणानें मांडतील, आणि पोलीस, कायदा आणि न्याय ह्यांखेरीज सर्व खातीं संप्रदत्त करावीं अशी ते शिफारस करतील अशी आम्हांस आशा आहे. ह्या सुधारणांच्या प्रश्नाचे बाबतींत असे कांहीं चमत्कारिक खेळ झाले आहेत कीं, 'कुऱ्हाडीचा दांडा गोतास काळ' असा प्रकार होईल काय अशी आम्हांस मधून मधून भीति वाटते. जास्त मागितलें असतां, देऊं केलेली देणगी सुद्धां पदरांत पडणार नाहीं, ह्या भीतीनें आमच्यापैकीं कित्येकांस इतकें पछाडलें आहे कीं, ते वाटेल तितकी माघार घेण्यास तयार होतील अशी भीति आहे. सरकारी योजनेंत सुधारणा सुचविल्यानें ती योजनाच 'भग्न' (Wrecked) होईल अशी जर आमची खात्री असती, किंबहुना अशी जर आम्हांस यत्किंचितही भीति वाटती, तर आम्हींही ही टीकात्मक लेखमाला लिहिण्याच्या भरीस पडलों नसतों; आणि आम्हीं आपल्या मनोदेवतेचा अनादर करूनहि सरकारी योजनेचे गोडवे गाऊन तिचें समर्थन केलें असतें! सरकारी योजना सर्वतेपरी किंबहुना बहुंशीं 'अग्राह्य' आहे असा आग्रह धरल्यानें तसा परिणाम होण्याचा संभव आहे हें आम्ही जाणून आहों; परंतु कायदा न्याय आणि पोलीस एवढींच खातीं राखून ठेवा, अशी आग्रहपूर्वक, जुटीनें मागणी केल्यानें त्या मागणीचा सरकारी योजनेच्या गर्भावर एवढा आघात होईल कीं ती

जन्मण्यापूर्वीच मृत होईल अशी धास्ती बाळगण्याचें कारण नाहीं. तेव्हां कांहीं खातीं राखून ठेवावयाचीं, असा सरकारचा निर्धारच असेल तर, फार तर पोलीस, कायदा आणि न्याय एवढींच राखून ठेवा, त्यापेक्षां जास्त खातीं राखून ठेवल्यास सरकारी योजना आम्हांस पसंत पडणार नाहीं, असें निक्षून सांगणें अवश्य आहे. रा. सेटलवाड, डॉ. सप्रु वगैरे पुढारी असें स्पष्टपणें सांगणार नाहीत तर ते आपल्या कर्तव्याला जागले असें म्हणतां येणार नाहीं.

## दुसरा दोष.

वरील विवेचनावरून आमचे वाचकांच्या लक्ष्यांत आलें असेलच कीं, **कोणतीं खातीं संप्रदत्त करावीं ह्याबद्दल व्यक्त केलेली अनुदारता हा सरकारी योजनेंतील दुसरा दोष आहे.**

## तिसरा दोष.

सरकारी योजनेंतील **तिसरा दोष** म्हटला म्हणजे प्रधानांची नेमणूक गव्हर्नरानें करावी हा होय. ज्या पक्षाचें कौन्सिलांत मताधिक्य होईल त्या पक्षाच्या पुढाऱ्यांना प्रधान नेमण्यांत यावें असा निर्बंध नसल्यामुळें गव्हर्नर वाटेल त्यास प्रधान नेमण्याचा संभव आहे व असें झाल्यास कायदेकौन्सिल आणि प्रधानमंडळ यांच्यांत विरोध उत्पन्न होईल. असा विरोध होणें जबाबदार राज्यपद्धतीच्या सुरुवातीस इष्ट नाहीं. असा निर्बंध सरकारी योजनेंत कां घालण्यांत आला नाहीं याचें कारण उघड आहे. नवीन कौन्सिलांत बहुतकरून होमरूलरांचें मताधिक्य होईल असा अंदाज आहे. नेमस्त सभासदांचेंच आधिक्य व्हावें ह्याकरितां त्यांच्याकडून व सरकारी अधिकाऱ्यांकडूनहि अटोकाट प्रयत्न होतील हें खरें; परंतु इतके प्रयत्न करूनहि नेमस्त पक्षाचे सभासद् अधिक निवडून येतील असा संभव नाहीं. होमरूलर जास्त निवडून येतील हें खास; परंतु होमरूलरांबद्दल सरकारास वाटत असलेली नावड एकदम कशी जाणार ? व होमरूलपक्षाचे मंत्री असावेत हें त्यास आरंभीं तरी कसें खपणार ! म्हणून गव्हर्नरानें मंत्री नेमावे ही शक्कल काढण्यांत आली आहे. आरंभीं जे मंत्री नेमण्यांत येतील ते नेमस्त पक्षाचे असतील असा आमचा अंदाज आहे, व तो जर खरा ठरला; तर कायदेकौन्सिल आणि मंत्रिमंडळ यांच्यामध्यें कितपत सलोखा राहील हा प्रश्नच आहे.. लोकसभा आणि प्रधानमंडळ यांच्यामध्यें तंटे सुरू झाले म्हणजे बहुतकरून सरतेशेवटीं लोकसत्तेचीच वाढ होते, असा पाश्चात्य इतिहास आहे. परंतु हिंदुस्थानचे हितशत्रु हिंदुस्थानांत

जबाबदार राज्यपद्धतीचा प्रयोग यशस्वी होऊं नये म्हणून खटपट केल्याबाचून रहाणार नाहींत हें लक्षांत घेतां, आरंभीं तरी असे तंटे होऊं देणें इष्ट नाहीं. सबब, ज्या पक्षाचें कौन्सिलांत बहुमत असेल त्याचेच मंत्री असावेत असा नियम करणें अवश्य आहे.

## चवथा दोष.

## संप्रदत्त खात्यांबद्दल निष्कारण निर्बंध.

संप्रदत्त खातीं आणि राखीव खातीं असा भेद केल्यामुळें सरकारी योजनेंत एक प्रकारचा आकुंचितपणा आला असून संप्रदत्त खात्यांबद्दलहि निष्कारण अधिक निर्बंध ठेवण्यांत आले आहेत. संपदत्त खात्यांची अंमलबजावणी मंत्र्यांनीं कायदेकौन्सिलाच्या सभासदांच्या बहुमतानें करावी, ते कायदेकौन्सिलास जबाबदार असावेत, त्यांच्या कारभारांत गव्हर्नरानें हात घालूं नये, अशी योजनेंत व्यवस्था केलेली नाहीं. उलट, संप्रदत्त खात्यासंबंधानें कोणताहि निर्णय करावयाचा असल्यास तो गव्हर्नर आणि मंत्री या सर्वांनीं मिळून करावा, मंत्र्यांच्या सूचना चुकीच्या आहेत किंवा त्या अंमलांत आल्यानें भयंकर परिणाम होतील असें गव्हर्नराचें मत असल्यास त्यांनीं त्यांस संमति देऊं नये, असे निबंध असावेत. अशी भारतमंत्री आणि व्हाइसरॉय यांची शिफारस आहे. या निर्बंधांचा असा परिणाम होईल कीं, मंत्र्यांना संप्रदत्त खात्यांबद्दल पुरेशी जबाबदारी वाटणार नाहीं. किंबहुना त्या खात्यांबद्दलहि जबाबदारपद्धति निष्कारण नियमित केल्यासारखें होईल. जबाबदारपद्धति म्हणजे एक तर मंत्रिमंडळ कौन्सिलास जबादार असलें पाहिजे; आणि दुसर, जर एखादा मंत्री आपली अंमलबजावणी योग्य रीतीनें करीत नसेल किंवा मंत्रिमंडळाचें एकंदर धोरणच समाधानकारक नसेल तर कौन्सिलास त्यांना अधिकारच्युत करतां यावें. मँटेग्यु-चेल्म्सफर्ड योजनेंत संप्रदत्त खात्यांनाहि जबाबदार राज्यपद्धतीचीं हीं मूलतत्त्वें लावण्यांत आलीं नाहींत व म्हणून त्या खात्यांचीहि अंमलबजावणी जबाबदार राज्यपद्धतीच्या तत्त्वाप्रमाणें पूर्णपणें होणार नाहीं. गव्हर्नर विचारी असून जबाबदार राज्यपद्धतीचें पोषण करण्याची त्यांची मनापासून इच्छा असल्यास तो मंत्र्यांच्या कारभारांत सहसा हात घालणार नाहीं हें खरें. कानडा आणि आस्ट्रेलिया ह्या देशांत गव्हर्नर जनरल, गव्हर्नर किंवा लेफ्टनंट गव्हर्नर हे ज्याप्रमाणें सनदशीर (Constitutional) आहेत त्याप्रमाणें तो सदनशीर होण्याची इच्छा करील.

परंतु संप्रदत्त खात्यांची अंमलबजावणी आरंभापासूनच जबाबदारपद्धतीनें पूर्णपणें होणें अवश्य व इष्ट आहे आणि म्हणून असली महत्त्वाची बाब गव्हर्नराच्या गुणावगुणांवर अवलंबून राहूं देणें योग्य नाहीं. ह्या घेडगुजरी पद्धतीचा असा परिणाम होईल कीं, मंत्र्यांना गव्हर्नराच्या आड लपून बसावयास सांपडेल आणि आम्हीं वर सांगितल्याप्रमाणें कौन्सिल आणि मंत्री यांच्यामध्यें सलोखा राहणार नाहीं. मॅंटेग्यु—चेल्म्सफर्ड योजनेंतील हा दोष काढून संप्रदत्त खात्यांबद्दल तरी जबाबदार पद्धतीचें तत्त्व, कोणतेहि निर्बंध न ठेवतां, पूर्णपणें अमलांत आणणें अवश्य आहे.

## जादा सभासद.

प्रांतिक कार्यकारी सरकारच्या ( Executive Government ) घटनेबद्दल मि. मॅंटेग्यु आणि लॉर्ड चेल्म्सफर्ड यांची अशी एक शिफारस आहे कीं, कार्यकारी कौन्सिलचे सभासद आणि मंत्री ह्यांशिवाय गव्हर्नरानें सल्ला घेण्याकरितां एक किंवा दोन अधिकारी सभासद नेमावे. त्यांच्या स्वाधीन कोणतेंहि खातें करण्यांत येऊं नये. तसेंच, त्यांना मत देण्याचा अधिकार नसावा; परंतु गव्हर्नरानें त्यांचा सल्ला घ्यावा व त्यांचा दर्जाहि कार्यकारी कौन्सिलच्या सभासदांप्रमाणेंच असावा, अशी भारतमंत्री आणि व्हाइसरॉय यांची सूचना आहे. असे जादा सभासद नेमण्याची आवश्यकता काय आहे, हें आम्हांस समजत नाहीं. ह्या अधिकाऱ्यांचा हुद्दा मंत्र्यांच्यापेक्षां किंवा कार्यकारी कौन्सिलच्या सभासदांच्यापेक्षां अर्थातच कमी असणार; आणि म्हणून त्यांना जादा सभासद नेमल्यानें त्यांचा आणि मंत्र्यांचा किंवा कार्यकारी कौन्सिलच्या सभासदांचा जो सरकारी संबंध असावा त्यांत एक प्रकारें गैरशिस्तपणा आल्यावांचून राहणार नाहीं. गव्हर्नरास वाटेल त्या अधिकाऱ्याचा सल्ला घेण्यास मुभा आहे, असें रिपोर्टांतच म्हटलें आहे. एखाद्या प्रश्नाबद्दल एखाद्या अधिकाऱ्याचा अभिप्राय घ्यावा असें त्यास वाटल्यास तसें करण्याला बिलकुल प्रत्यवाय नाहीं. अशी वस्तुस्थिति असल्यामुळें अधिकाऱ्यांना जादा सभासद नेमण्याचें कांहीं कारण दिसत नाहीं. **तथापि असे सभासद नेमण्याबद्दल सरकारचा आग्रहच असल्यास त्यांपैकीं निदान निम्मे तरी हिंदी असले पाहिजेत, अशी शर्त घालणें अवश्य आहे.**

## कायदेकौन्सिलाच्या घटनेंतील दोष.

कायदेकौन्सिलांत लोकनियुक्त सभासदांचें प्रमाण किती असावें हें रिपोर्टांत सांगितलेलें नाहीं; त्यांचें बरेंच बहुमत असावें एवढेंच म्हटलें आहे. राष्ट्रीय सभा आणि मॉस्लेम लीग यांच्या संयुक्त योजनेंत लोकनियुक्त सभासदांचें प्रमाण $\frac{3}{4}$ असावें अशी मागणी केलेली आहे. ह्या प्रश्नासंबंधानें आमचा असा अभिप्राय आहे कीं, पुढारलेल्या प्रांतांत तरी नेमणुकीचें तत्त्व ( Nomination ) अजिबाद टाकून देऊन तेथील कौन्सिलें पूर्णपणें लोकनियुक्त करण्याचा समय आला आहे. मुंबईसारख्या प्रांतांत कौन्सिलांतील सर्व सभासद लोकनियुक्त झाल्यानें यत्किंचितहि नुकसान होणार नाहीं. नेमणुकीचें तत्त्व कायम ठेवण्याला रिपोर्टांत असें कारण दिलें आहे कीं, तें जातवार प्रतिनिधित्वाच्या तत्त्वापेक्षां अधिक चांगलें आहे आणि म्हणून अल्पसंख्याक वर्गाच्या प्रतिनिधित्वाकरितां अवश्य आहे. जातवार प्रतिनिधित्वाच्या पद्धतीपेक्षां नेमणुकीची पद्धति लवकर बंद करितां येते, हा तिच्यांत विशेष असल्यामुळें, अल्पसंख्याक वर्गांचे प्रतिनिधी पहिल्यापेक्षां दुसऱ्या पद्धतीनें येऊं देणें श्रेयस्कर आहे असें रिपोर्टांत म्हटलें आहे. ( Nomination has in our eyes the great advantage over the alternative of extending the class or communal system that it can be more easily abolished when the necessity for it ceases. ) रिपोर्टांतील हि विचारसरणी कितपत सयुक्तिक आहे याचा आपण विचार करूं.

## जातवार प्रतिनिधित्व

नेमणुकीचें तत्व अल्पसंख्यांक वर्गाला प्रतिनिधित्व देण्याकरितां अवश्य आहे असा मि. मॉंटेग्यु आणि लॉर्ड चेल्म्सफर्ड यांचा अभिप्राय आहे हें वर सांगितलेंच आहे. त्यांचें असें म्हणणें आहे कीं, जातवार किंवा वर्गवार प्रतिनिधित्वाची पद्धति अपायकारक असून त्यापेक्षां नेमणुकीची पद्धति स्वीकारणें अधिक चांगलें. नेमणुकीची पद्धत अवश्य आहे काय, याचा विचार करण्यापूर्वी जातवार प्रतिनिधित्वाच्या पद्धतीबद्दल मि. मॉंटेग्यु आणि लॉर्ड चेल्म्सफर्ड यांनीं आपल्या रिपोर्टांत जे विचार व्यक्त केले आहेत त्यांचें परीक्षण करणें अवश्य आहे.

## आक्षेप.

जातवार किंवा वर्गवार प्रतिनिधित्वाचें तत्त्व जबाबदार राज्यपद्धतीच्या इतिहासाच्या विरुद्ध आहे असा त्यांचा पहिला आक्षेप आहे. वरील पद्धतीनें निवडून

आलेले प्रतिनिधी सबंध राष्ट्राच्या हितापेक्षां आपल्या वर्गाच्याच हिताकडे अधिक लक्ष देतात. आपण आपल्या राष्ट्राचे घटकावयव आहोंत ही जी भावना प्रत्येक सभासदांत पाहिजे, ती त्यांच्यांत नसून, आपण अमक्या वर्गाचे प्रतिनिधी आहोंत हीच भावना त्यांच्यांत असते. सबब, वर्गवार किंवा जातवार पद्धतीचें तत्त्व अंमलांत आणणें अनिष्ट आहे. शिवाय जातवार किंवा वर्गवार पद्धतीनें राष्ट्रांतील धर्मामुळें किंवा वर्गामुळें किंवा जातीमुळें झालेले भेद अबाधित राहतात. राष्ट्रैक्याची कल्पना वृद्धिंगत होत नाहीं. याशिवाय जातवार किंवा वर्गवार प्रतिनिधित्वाच्या तत्त्वासंबंधानें तिसरा आक्षेप असा आहे कीं, तें तत्त्व जर अंमलांत आणलें तर मागसलेल्या वर्गांना आपली उन्नति करून घेण्याकरितां प्रयत्न करण्याला उत्तेजन वाटणार नाहीं. आपण अशिक्षित, मागसलेले असूनही जर आपणाला राज्यकारभारांत हक्कानें भाग घेतां येतो तर आपली शैक्षणिक, सामाजिक वगैरे सुधारणा करून पुढारलेल्या वर्गाबरोबर येण्याची काय अवश्यकता आहे असें त्याना वाटूं लागेल.

जातवार किंवा वर्गवार प्रतिनिधित्वाच्या तत्त्वाबद्दल वर दिलेले आक्षेप भारतमंत्री आणि व्हाइसरॉय यांनीं घेतलेले पाहून कोणासही असें वाटेल कीं धर्मवार किंवा वर्गवार किंवा जातवार प्रतिनिधित्वाचें तत्त्व हिंदुस्थानच्या राजपद्धतींतून अजिबात काढून टाकावें अशी त्यांनीं सूचना केलेली असेल. परंतु मजा अशी आहे कीं, वरील तात्त्विक आक्षेप घेऊनही त्यांनीं शिफारस केली आहे कीं, हें तत्त्व मुसलमानांच्या बाबतींत कायम ठेवणें अवश्य आहे, येवढेंच नव्हे तर तें शीख लोकांनाही लागू करणें इष्ट आहे. मुसलमानांना १९०९ सालींच विशेष प्रतिनिधित्वाचा हक्क दिला असल्यामुळें तो काढून घेणें तात्त्विक दृष्ट्या कितीही योग्य असलें तरी तसें करणें आतां शक्य नाहीं. मुसलमानांना दिलेला विशेष प्रतिनिधित्वाचा हक्क काढून न घेण्याला दिलेलें हें कारण सयुक्तिक आहे असें जरी मानलें तरी शिखांना तें लागू करण्याला दिलेलें कारण पाहून कोणासहि आश्चर्य वाटल्यावांचून राहणार नाहीं. आणि शीखांना तें लागू करण्याला जर हरकत नाहीं तर मराठे वगैरे इतर वर्गांना लागू करण्याला कोणती हरकत आहे, असें विशेष प्रतिनिधित्वाचा हक्क मागणारे अल्पसंख्याक वर्गांचे पुढारी विचारल्याशिवाय राहणार नाहींत. शिखांना विशेष प्रतिनिधित्वाचा हक्क देण्याबद्दल भारतमंत्री आणि व्हाइसरॉय असें म्हणतात कीं, " सदरहु हक्क शिखांना न देणें असमंजसपणाचें ( inexpedient ) होणार आहे. पंजाबांतील

शीख म्हणजे एक स्वतंत्रच आणि महत्त्वाचा वर्ग आहे. हिंदुस्थानच्या सैन्यांत त्यांच्या पलटणी असून ते शूर लढवय्ये आहेत. सर्व ठिकाणीं त्यांची संख्या अल्प असून अनुभव असा आलेला आहे कीं, शीख धर्माचे प्रतिनिधी हल्लींच्या पद्धतीनें बहुधा निवडून येत नाहींत. "

## आक्षेपास उत्तर

विशेष प्रतिनिधित्वाच्या तत्त्वाबद्दल भारतमंत्री आणि व्हाइसरॉय यांनीं व्यक्त केलेले विचार आणि केलेल्या शिफारशी पाहिल्या म्हणजे कोणाच्याही लक्षांत असें येईल की, त्यांनीं या प्रश्नाचा केवळ तात्त्विक रीत्या विचार केलेला नाहीं. जर त्यांनी तसा विचार केला असतां तर तें तत्त्व शीखांना लागू करण्याची शिफारस त्यांनीं केली नसती; आणि मुसलमानांच्या बाबतींतहि तें तत्त्व चालू ठेवण्याला कांहीं तरी कालमर्यादा घातली असती. धर्मवार किंवा जातवार किंवा वर्गवार निवडणुकीच्या तत्त्वाविरुद्ध त्यांनीं घेतलेले आक्षेप बऱ्याच अंशीं खरे आहेत, हें प्रांजलपणें कबूल केलें पाहिजे. तथापि त्यांच्या पहिल्या आक्षेपांत थोडीशी अतिशयोक्ति आहे अशी आमची समजूत आहे. धर्मवार, वर्गवार किंवा जातवार प्रतिनिधित्वाच्या पद्धतीनें निवडून आलेल्या सभासदांत राष्ट्रीय भावना कमी असते हा आक्षेप सर्वतोपरी रास्त नाहीं. विशेष प्रतिनिधित्वाचा हक्क मागण्याचें कारण असें आहे कीं, समाजाच्या विशिष्ट रचनेमुळें, एखाद्या महत्त्वाच्या राष्ट्रीय प्रश्नाचा विचार करितांना कांहीं विशिष्ट वर्गांचा त्यांत जो हितसंबध असतो त्याच्या दृष्टीनेंहि त्याचा पूर्णपणें विचार करण्यांत येईलच अशी खात्री नसते, आणि म्हणून त्या प्रश्नाचा सर्व बाजूंनीं निःपक्षपात बुद्धीनें विचार व्हावा याकरितां विशेष प्रतिनिधित्वाचा हक्क देणें इष्ट आहे. विशेष प्रतिनिधित्वाच्या हक्काची अवश्यकता समाजाच्या विशिष्ट घटनेमुळें उत्पन्न झालेली असते आणि ती घटना इष्ट दिशेनें जशी जशी बदलत जाईल तशी तशी ती आवश्यकता कमी होईल. आणि वर्गवार किंवा जातवार प्रतिनिधित्वाच्या तत्त्वाविरुद्ध जे लोक आहेत त्यांनीं ती घटना बदलण्याची जबाबदारी आपल्यावर येत आहे हें ओळखून असलें पाहिजे. परंतु राजकीय घटना ही केवळ तात्त्विक बाब नाहीं. तात्त्विक विचाराप्रमाणेंच राजकीय घटना करूं लागल्यास असा एकही देश सांपडणार नाहीं कीं, त्याच्या राजकीय घटनेंत क्रांतिकारक फेरबदल अवश्य होणार नाहींत. खुद्द हिंदुस्थानच्या राजकीय प्रश्नाचा विचार केवळ तात्त्विकदृष्ट्या केल्यास तीत भारतमंत्री आणि

व्हाइसरॉय यांनीं सुचविल्यापेक्षां किती तरी अधिक फेरफार करावे लागतील. मि. मँटेग्यु आणि लॉर्ड चेल्म्सफर्ड हे ही गोष्ट ओळखून नाहींत असें नाहीं. तात्त्विक विचार विवक्षित परिस्थितीला लागू करितांना त्यांत कसे फेरफार करावे लागतात याचें त्यांचा रिपोर्ट म्हणजे एक उत्कृष्टच उदाहरण आहे. परंतु ज्याप्रमाणें त्यांनीं तात्त्विक विचार आणि प्रत्यक्ष परिस्थिति या दोन्ही गोष्टी लक्षांत घेऊन इतर प्रश्नांचा निर्णय करण्याचा प्रयत्न केला आहे, त्याप्रमाणें त्यांनीं या विशेष प्रतिनिधित्वाच्या प्रश्नाचा निर्णय केलेला नाहीं असें आम्हांस म्हणावें लागतें. एक तर त्यांनीं एक महत्त्वाची गोष्ट मुळींच लक्षांत घेतली नाहीं. ब्राह्मणेतर वगैरे जे वर्ग विशेष प्रतिनिधित्वाचा हक्क मागत आहेत ते तो हक्क कायमचा मुळीच मागत नाहींत. त्या हक्काला कालमर्यादा घालणें अवश्य आहे, हें ते कबूल करितात. कांहीं महिन्यांपूर्वी खामगांव येथें मराठ्यांची परिषद् भरली होती. तींत तिचे अध्यक्ष श्री. छत्रपति कोल्हापूरचे महाराज यांनीं स्पष्ट सांगितलें कीं, मागासलेल्या जातींना हा विशेष प्रतिनिधित्वाचा हक्क दहा वर्षेपर्यंतच दिला तरी हरकत नाहीं. ह्या हक्काला कालमर्यादा घातल्यावर मि. मँटेग्यु आणि लॉर्ड चेल्म्सफर्ड यांच्या तिसऱ्या आक्षेपांत कांहींच तथ्य रहात नाहीं. दहा वर्षांनंतर हा हक्क आपोआप नष्ट होईल, या निर्बंधामुळे मागासलेल्या वर्गांना असलेल्या स्थितींतच रहाण्याची इच्छा न होतां उलट अमुकच कालावधींत पुढारलेल्या वर्गांच्या बरोबर येण्याची अवश्यकता असल्यामुळें ते आपली उन्नति करून घेण्याचा किती तरी जोरानें आणि उत्साहानें प्रयत्न करतील !

कांहीं वर्गांना विशेष प्रतिनिधित्वाचा हक्क देण्याविषयींच्या प्रश्नाचा विचार करितांना त्या हक्काला कालमर्यादा घातली पाहिजे ही एक गोष्ट लक्षांत ठेवणें अवश्य आहे. दुसरें असें कीं, कांहीं अल्पसंख्याक जातींना किंवा वर्गांना विशेष प्रतिनिधित्वाचा हक्क दिल्याबरोबर हिंदु समाजाचें एकीकरण करण्याचे जे सध्यां प्रयत्न चालू आहेत ते बंद पडतील किंवा कमी होतील असें समजण्याचें कारण नाहीं. आमची तर अशी समजूत आहे कीं ब्राह्मणेतर वर्गांना विशेष प्रतिनिधित्वाचा हक्क दिल्यानें सर्व वर्गांची राजकीय समानता विशेष रीतीनें दृग्गोचर होईल. आणि या राजकीय समानतेचा त्यांच्या सामाजिक एकीकरणावर परिणाम झाल्यावांचून रहाणार नाहीं. कायदेकौन्सिल ही जरी राजकीय संस्था

असली तरी तिच्या सभासदात कमी ज्यास्त प्रमाणानें सामाजिक दळणवळण सुरू झाल्याशिवाय रहात नाहीं. शिवाय भिन्न भिन्न जातीचे प्रतिनिधी एकाच सभेंत खांद्याला खांदा लावून समानतेनें काम करीत असतांना पाहून प्रत्येक विचारी मनुष्याला असें वाटल्यावांचून राहणार नाहीं कीं जर भिन्न भिन्न जातीचे लोक राजकीय क्षेत्रांत एकाच दर्जाचे आहेत तर सामाजिक क्षेत्रांत तरी त्यांच्यामध्यें विषमता कां राहूं द्यावी ? सारांश, कायदेकौन्सिलांत ब्राह्मणेतर जातींचे प्रतिनिधी आल्यानें सामाजिक एकीकरणाचें व समानतेचें पोषणच होईल अशी आमची समजूत आहे.

वरील विवेचनावरून आमचे वाचकांच्या लक्षांत आलें असेलच कीं, ब्राह्मणेतर वगैरे जातींनीं विशेष प्रतिनिधित्वाचा हक्क मिळविण्याबद्दल जी चळवळ चालविली आहे तिच्या विरुद्ध आम्ही नाहीं. हिंदुसमाजांत ज्या अठरापगड जाती आहेत त्यांपैकीं प्रत्येकीला विशेष प्रतिनिधित्वाचा हक्क द्यावा असें कोणीही म्हणत नाहीं आणि ब्राह्मणेतर वर्गाच्या पुढाऱ्यांनीं तशी मागणी केली आहे असेंहि नाहीं. मागसलेल्या जातींत जे मतदार होतील त्यांचा एक संघ करून त्यानें मागसलेल्या वर्गाच्या तर्फे प्रतिनिधी निवडून द्यावे अशी त्या वर्गाच्या पुढाऱ्यांची मागणी आहे. अशी योजना करण्याला हरकत आहे किंवा अडचण उपस्थित होईल असें दिसत नाहीं. शिवाय, इष्ट वाटल्यास उमेदवार कोणत्याही जातीचा असला तरी हरकत नाहीं असा नियम असूं द्यावा. या नियमानें विशेष प्रतिनिधित्व आणि राष्ट्रैक्याची भावना यांचा मिलाफ चांगल्या रीतीनें करतां येईल असें आम्हांस वाटतें. उमेदवार कोणत्याही जातीचा असल्यानें फायदा असा होईल कीं मागसलेल्या वर्गाच्या निवडणुकीचें क्षेत्र विस्तृत होईल. अर्थातच सामान्यतः असा नियम जरी असला तरी मागसलेल्या वर्गाचे मतदार आपल्या जातीच्या उमेदवारांना निवडून देतील. त्यांच्या जातीचा उमेदवार एकंदरीनें लायक असल्यास त्याचीच ते निवड करतील हें उघड आहे. तेव्हां वाटेल त्या जातीचा उमेदवार असल्यानें मागसलेल्या जातीचे उमेदवार निवडून येण्याला अडचण पडेल असें आम्हांस वाटत नाहीं. परंतु प्रसंगवशात् असें होण्याचा संभव आहे कीं, मागसलेल्या जातीचे लायक उमेदवार आढळणार नाहींत. अशा स्थितींत इतर जातींचे लायक उमेदवार असल्यास त्यांना निवडून देण्याची मतदारांना इच्छा होईल. सर्वच उमेदवार नालायक असले किंवा असावे तितके लायक नसले तर आपल्या जातींचे उमेदवार मागसलेल्या

जातींचे मतदार सामान्यतः निवडून देतील असें म्हणण्यास हरकत नाहीं. परंतु त्यांच्या जातीचे उमेदवार अगदीं नालायक आहेत, पण इतर उमेदवार लायक आहेत, अशा स्थितींत या दुसऱ्या अन्य जातींच्या उमेदवारांना निवडून देण्याची त्यांना संधि कां देण्यांत येऊं नये ? ब्राह्मणेतर वर्गांना विशेष प्रतिनिधित्वाचा हक्क देण्याचें खरें कारण जर कोणतें असेल तर तें हें आहे की, त्यांच्या हितसंबंधाचें योग्य रीतीनें संरक्षण व्हावें, आणि कायदे कौन्सिलांत जे प्रतिनिधी जातील ते जातिविषयक विचारापासून अलिप्त असावे. त्यांच्या हितसंबंधाचें योग्य संरक्षण करणारा आणि जातिविषयक विचारापासून अलिप्त असलेला असा जर एखादा इतर जातीचा उमेदवार असला तर त्याला निवडून देण्याची त्यांना संधि कां देऊं नये ? कल्पना करा कीं दोन उमेदवार आहेत, त्यांपैकीं एक मागसलेल्या जातीचा आहे व दुसरा पुढारलेल्या जातीचा आहे; दोघांची लायकी स्थूलमानानें जर सारखी असेल आणि दोघेही जातिविषयक विचारांपासून अलिप्त असतील तर पहिलाच उमेदवार निवडून येईल हें उघड आहे. परंतु जर पहिला उमेदवार इतका नालायक असला कीं त्याला कौन्सिलांत निवडून देणें म्हणजे कौन्सिलाची केवळ थट्टा करणें होय, परंतु दुसरा जरी इतर जातीचा असला तरी तो लायक असून मागसलेल्या वर्गांच्या हक्कसंबंधाचें योग्य संरक्षण करण्यास समर्थ आहे–अशा स्थितींत दुसऱ्या उमेदवारालाच निवडून देणें अधिक चांगलें होणार नाहीं काय ? सारांश, उमेदवार कोणत्याही जातीचा असला तरी चालेल, असा नियम केल्यानें विशेष प्रतिनिधित्वाच्या मूळ हेतूस बाध न येतां विशेष प्रतिनिधित्व आणि राष्ट्रीय भावनेचें पोषण यांच्यामध्यें सांगड घालतां येईल.

विशेष प्रतिनिधित्वाचा हक्क कांहीं वर्षेपर्यंतच देण्यांत यावा आणि उमेदवार कोणत्याही जातीचा असला तरी हरकत नाहीं. हे दोन नियम केल्यावर विशेष प्रतिनिधित्वाच्या पद्धतींत जे तात्त्विक दोष आहेत त्यांचा जोर बराच कमी होईल. आणि अशा रीतीनें तो जोर कमी करून विशेष प्रतिनिधित्वाचें तत्त्व हिंदुस्थानच्या सध्यांच्या सामाजिक व राजकीय परिस्थितींत अमलांत आणण्याला हरकत नाहीं.

## विशेष प्रतिनिधित्व आणि नेमणुकीचें तत्त्व.

जातवार किंवा वर्गवार प्रतिनिधित्वाच्या प्रश्नाकडे अशा रीतीनें पाहिल्यास विशेष प्रतिनिधित्वाच्या पद्धतीपेक्षां नेमणुकीची पद्धत अधिक चांगली आहे

असें म्हणतां येणार नाहीं. आणि मग अल्पसंख्याक वर्गांच्या प्रतिनिधित्वाकरितां नेमणुकीच्या तत्त्वाची आवश्यकता आहे असें जें भारतमंत्री व व्हाइसरॉय यांचें म्हणणें आहे, त्यांतही कांहीं तथ्य नाहीं असें आमच्या वाचकांच्या लक्षांत आल्यावांचून रहाणार नाहीं. आणि म्हणून आमचें असें म्हणणें आहे कीं, वर दिलेले नियम घालून विशेष प्रतिनिधित्वाचा हक्क अमलांत आणण्याला हरकत नाहीं. परंतु मुंबईसारख्या पुढारलेल्या प्रांतांत तरी कायदे-कौन्सिलचे सर्व सभासद लोकनियुक्त असले पाहिजेत. नेमणुकीचें तत्त्व आम्हांस बिलकुल पसंत नाही, आणि हें तत्त्व आणि वर लिहिल्याप्रमाणें विशेष प्रतिनिधित्वाचें तत्त्व या दोहोंमध्यें निवड करावयाची झाल्यास आम्ही दुसरेंच तत्त्व पसंत करूं. गव्हर्नरानें 'होयबा मान डोलवे' नेमण्यापेक्षां अल्पसंख्याक वर्गांनीं विशेष प्रतिनिधित्वाचा हक्क बजावून आपले उमेदवार निवडून देणें हेंच अधिक चांगलें आहे. विशेष प्रतिनिधित्वाच्या पद्धतीनें कां होईना, परंतु मतदारसंघांनीं निवडून दिलेले उमेदवार जरी अगदीं उत्तमच नसले तरी ते सरकारचे अंध अनुयायी कधींहि होणार नाहींत. परंतु सरकारनें नेमलेल्या सभासदांबद्दल अशी ग्वाही कोण देऊं शकेल ! एकाद्याला सरकारनें कौन्सिलचे सभासद नेमलें म्हणजे आपणावर त्यांनीं मोठे उपकार केले आहेत असें त्याला वाटत असतें आणि या उपकारांच्या जाणिवेचा त्याच्या विचारस्वातंत्र्यावर जरी नाही, तरी भाषणस्वातंत्र्यावर आणि मतस्वातंत्र्यावर विघातक परिणाम होत असतो असा अनुभव आहे. आपल्या मनोदेवतेला स्मरून वागणारे आणि आपलें खरें मत निर्भीडपणें देणारे सरकारनें नेमलेले सभासद क्वचितच आढळतात. सरकारनें नेमलेल्या सभासदांची साहजिक प्रवृत्ति अधिकारी सभासदांप्रमाणें मत देण्याची असते. म्हणजे अधिकारी सभासदांपैकींच सामान्यतः ते असतात असें म्हणण्यास हरकत नाहीं. सरकारनें नेमलेले सभासद म्हणजे अधिकारी सभासदांत भर होय. सारांश, नेमणुकीचें तत्त्व अपायकारक असून सर्व सभासद लोकनियुक्त असणें अवश्य आहे व म्हणूनच आम्हीं अशी सूचना केली आहे कीं, **निदान मुंबईसारख्या प्रांताचें कायदे-कौन्सिल पूर्णपणें लोकनियुक्त असलें पाहिजे.** नेमणुकीचें तत्त्व जबाबदार पद्धतीच्या तत्त्वाच्या विरुद्ध आहे हें भारतमंत्री आणि व्हाइसरॉय यांनीं आपल्या रिपोर्टांत कबूल केलें आहे. तेव्हां सर्व गोष्टींचा विचार करितां नेमणुकीच्या तत्त्वाला अजिबाद फांटा देऊन निवडणुकीचेंच तत्त्व पूर्णपणें अमलांत आणलें पाहिजे.

अल्पसंख्याक वर्गांच्या हितसंबंधाचें योग्य संरक्षण व्हावें याकरितां जातवार प्रतिनिधित्वाचें तत्त्व जरी योग्य नाहीं असें आपण क्षणभर गृहीत धरलें, तरी नेमणुकीचें तत्त्व स्वीकारल्याशिवाय गत्यंतर नाहीं काय, याचाही विचार झाला पाहिजे. प्रमाणशीर प्रतिनिधित्व ( Proportional Representation ) या पद्धतीनें अल्पसंख्याक वर्गांचे प्रतिनिधी योग्य प्रमाणानें येऊं शकतात असें त्या पद्धतीच्या पुरस्कर्त्यांचें म्हणणें आहे. आपल्या इकडे ना. परांजपे हे या पद्धतीचे कट्टे अभिमानी असून त्यांनीं ती अमलांत आणण्याबद्दल सरकारास विनंतिहि केली आहे. अस्पृश्यादि वर्गांचे प्रतिनिधी या पद्धतीनेंहि येणार नाहींत हें त्यांना कबूल आहे. म्हणून फक्त त्यांच्याकरितां जातवार प्रतिनिधित्वाच्या पद्धतीचें अवलंबन केल्यास हरकत नाहीं असें त्यांचें म्हणणें आहे. प्रमाणशीर प्रतिनिधित्वाचें तत्त्व हिंदुस्थानांत सुरू करणें सोपें आहे असें आम्ही म्हणत नाहीं. आमचा सध्यां मुद्दा इतकाच आहे कीं, जातवार प्रतिनिधित्वाचें तत्त्व ब्रिटिश पार्लमेंटास जरी पसंत पडलें नाहीं तरी प्रमाणशीर प्रतिनिधित्व इत्यादि अन्य तत्त्वांचाहि विचार करण्यांत आला पाहिजे. जातवार प्रतिनिधित्वाचें तत्त्व मान्य झालें नाहीं तरी नेमणुकीचें तत्त्व स्वीकारण्यांत येतां कामा नये. **जातवार प्रतिनिधित्वाचें तत्त्व स्वीकारा, किंवा प्रमाणशीर प्रतिनिधित्वाचें तत्त्व स्वीकारा, परंतु नेमणुकीचें तत्त्व सोडून दिलें पाहिजे, एवढाच आमचा आग्रह आहे.**

## सरकारी अधिकारी.

कायदेकौन्सिलांत सरकारी अधिकारी नेमण्यांत यावे अशी सूचना रिपोर्टांत करण्यांत आली आहे, तीही बरोबर नाहीं. सरकारी अधिकाऱ्यांना कौन्सिलांत नेमण्याचें कारण उरलेलें नाहीं. सरकारी अधिकाऱ्यांचें योग्य स्थान कायदेकौन्सिल हें नाहीं आणि त्यांना कायदेकौन्सिलचे सभासद नेमणें हें बिनअधिकारी सभासद नेमण्यापेक्षांहि जबाबदार राज्यपद्धतीशीं अधिक विसंगत आहे. सरकारी अधिकाऱ्यांना राज्यकारभाराच्या बारक्यासारक्या गोष्टींचा अनुभव असतो हें खरें; परंतु त्या अनुभवाचा अन्य रीतीनें उपयोग करून घेतां येण्यासारखा आहे; त्याकरितां त्यांना कौन्सिलांत नेमलेंच पाहिजे असें नाहीं.

## द्विमंडळी राज्यपद्धति.

मुंबईसारख्या प्रांतांतील कायदेकौन्सिलें पूर्णपणें लोकनियुक्त केल्यास राज्यांतील शांत्यांबद्दल सरकारास जे कायदेकानू करणें अवश्य वाटेल ते पास करून घेण्या-

करितां काय योजना केली पाहिजे हा अर्थातच प्रश्न उत्पन्न होतो. काय कौन्सिल हें पूर्णपणें लोकनियुक्त केल्यास ग्रँड कमिटीची सरकारी योजना चालणार नाहीं हें उघड आहे. कारण त्या कमिटीची योजनाच नेमलेल्या सभासदांच्या आधिक्यावर उभारलेली आहे. कायदेकौन्सिलें जर पूर्णपणें लोकनियुक्त करावयाचीं तर सरकारास अवश्य वाटणारे कायदे करून घेण्याकरितां ग्रँड कमिटीहून भिन्न योजना केली पाहिजे हें आम्हांस कबूल आहे. यासंबंधानें आमचें असें म्हणणें आहे की, हिंदुस्थान सरकारासंबंधानें ज्याप्रमाणें लेजिस्लेटिव असेंब्लीशिवाय कौन्सिल ऑफ स्टेट असें दुसरें मंडळ स्थापण्याची भारतमंत्री आणि व्हाइसरॉय यांनीं शिफारस केली आहे, त्याप्रमाणेंच प्रांतिक कारभारासंबंधानेंहि दुसरें मंडळ स्थापण्यांत यावें. प्रांतिक कारभारांत द्विमंडळी राज्यपद्धतिची मि. मॉंटेग्यु आणि लॉर्ड चेल्म्सफर्ड यांनीं आपल्या रिपोर्टांत शिफारस केलेली नाहीं. त्यांच्या मतें अशी पद्धति आजच अमलांत आणण्याची आवश्यकता नाहीं. त्यांच्या योजनेचा अधिक विकास होऊन जबाबदारराज्यपद्धति बऱ्याच प्रमाणानें अमलांत आल्यावर ती पद्धति स्थापन करण्याचा विचार करावा लागेल असें त्यांनीं म्हटलें आहे. त्यांच्या योजनेचें स्वरूप लक्षांत घेतां त्यांनीं असा अभिप्राय द्यावा हें अगदीं साहजिक आहे. परंतु कायदेकौन्सिलें पूर्ण लोकनियुक्त करावयाचीं असल्यास द्विमंडळी राज्यपद्धति स्थापन करण्याच्या आवश्यकतेचा आरंभापासूनच विचार करावा लागेल. आणि म्हणून आमची अशी सूचना आहे कीं, हिंदुस्थानसरकारासंबंधीं ज्याप्रमाणें कौन्सिल ऑफ स्टेट स्थापन करण्याची सूचना करण्यांत आली आहे त्याप्रमाणें कांहीं तरी योजना प्रांतिक सरकारासंबंधानें करण्यांत यावी. द्विमंडळी राज्यपद्धति बहुतेक सर्वत्र ठिकाणीं आहे. ब्रिटिश साम्राज्यांत ती कानडाच्या कांहीं प्रांताखेरजि इतर सर्व ठिकाणीं आहे. तिजविरुद्ध आक्षेप घेणारे कांहीं लोक अद्याप सांपडतात हें खरें; परंतु ती एकंदरीनें एकमंडळी राज्यपद्धतीपेक्षां अधिक चांगली असें बहुमत आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. इंग्लंडांतील अमीरउमरावांच्या सभेची ( House of Lords ) सुधारणेला प्रतिकूलता पाहून तें मंडळ ठेवण्याची आवश्यकता आहे काय, असा प्रश्न निघाला होता. परंतु सदरहु मंडळ नष्ट करण्यांत येऊं नये, फार तर त्यांत इष्ट त्या सुधारणा कराव्या असेंच इंग्लंडांतील बहुमत आहे. राजकीय तत्त्ववेत्त्यांनींहि या प्रश्नाचा विचार केलेला असून त्यांचेंहि

असेंच मत आहे कीं, एकमंडळी राज्यपद्धतीपेक्षां द्विमंडळी राज्यपद्धति अधिक चांगली. सारांश, द्विमंडळी राज्यपद्धति असणें इष्ट व अवश्य आहे, असें मुत्सद्यांचें आणि राजकीय तत्त्ववेत्त्यांचें बहुमत आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. द्विमंडळी राज्यपद्धतीचा असा फायदा आहे कीं कायदेकानू सरतेशेवटीं शांतपणानें आणि विचारपूर्वक करण्यांत येतात. एकमंडळी राज्यपद्धतींत, कायदेकौन्सिलाचे लोकनियुक्त सभासद् सामान्यतः अधिक उत्साही असतात असा अनुभव आहे, आणि म्हणून त्यांच्या हातून कायदे करितांना उतावीळपणा होण्याचा संभव असतो. वरिष्ठ मंडळाची सामान्यतः अशी घटना असते कीं, त्यांत तरुण आणि अननुभवी असे सभासद् फारसे नसतात; आणि म्हणून त्यांच्या हातून उतावीळपणा होण्याचा संभव कमी असतो. इतकेंच नव्हे तर ते सामान्यतः पुराणप्रिय असल्यामुळें त सुधारणा करण्याला उत्सुक नसतात. कनिष्ठ मंडळांतील सभासदांची सुधारणेबद्दल उत्सुकता विशेष असते. सबब त्यांचा उत्साह व सुधारणाप्रियता, आणि वरिष्ठ मंडळांतील सभासदांचा धिमेपणा यांचा मिलाफ होऊन जे कायदेकानू होतात, त्यांत दोष कमी राहण्याचा संभव असतो. वरिष्ठ मंडळास दुरुस्ती करणारी संस्था ( Revising Chamber ) असें म्हणतात. याचें कारण असें कीं, कनिष्ठ मंडळानें केलेल्या कायदेकानूंत जर कांहीं दोष राहिले तर ते त्यानें दुरुस्त करावे. या सर्व कारणांस्तव द्विमंडळी पद्धति अधिक चांगली असा सर्वत्र समज आहे. मिलसारख्या लोकसत्तेच्या विस्ताराचें समर्थन करणाऱ्या तत्त्ववेत्त्यानेंहि हीच पद्धति अधिक चांगली असा अभिप्राय दिला आहे. सारांश, उत्तम राज्यघटनेला आणि व्यवस्थित राज्यकारभाराला द्विमंडळी पद्धति अवश्य आहे याबद्दल मतभेद नाहीं असें म्हटल्यास चालेल.

द्विमंडळी राज्यपद्धतीचें वास्तविक महत्त्व जर एवढें आहे, तर ती हिंदुस्थानांत सुद्धां स्थापन करण्यांत आली पाहिजे, व तिचा पाया आरंभापासूनच घातला पाहिजे. भारतमंत्री आणि व्हाइसरॉय यांनीं कौन्सिल ऑफ स्टेट स्थापन करावें अशी सूचना केली आहे. तिजविरुद्ध कित्येकांनीं आक्षेप घेतले आहेत, परंतु आमच्या मतें ते आक्षेप पोकळ असून आम्हांस ती सूचना पसंत आहे. हिंदुस्थानसरकारच्या घटनेंत ज्याप्रमाणें ही शिफारस केली आहे त्याप्रमाणें प्रांतिक सरकारच्या घटनेंतहि अशीच योजना करणें अवश्य आहे. वरिष्ठ मंडळांत कांहीं सभासद् लोकनियुक्त आणि कांहीं नेमलेले असावेत

असें मत सध्यां प्रचलित आहे. त्याप्रमाणें कौन्सिल ऑफ स्टेटच्या घटनेंत योजना करण्यांत आली आहे. प्रांतिक वरिष्ठ मंडळाचीहि घटना तशीच असावी. नेमणुकीचें तत्त्व वरिष्ठ मंडळाच्या घटनेस लावण्यास हरकत नाहीं. परंतु कायदेकौन्सिल पूर्णपणें लोकनियुक्त असलें पाहिजे असें आमचें मत आहे.

प्रांतिक राज्यकारभारासंबंधानें मि. मॉटेग्यु आणि लॉर्ड चेल्म्सफर्ड यांच्या योजनेंत मुख्य दोष कोणते आहेत, याचें विवेचन येथपर्यंत झालें. याशिवाय किरकोळ दोष आहेत ते हिंदुस्थानसरकारच्या कायदेकौन्सिलच्या कमिटीनें आपल्या रिपोर्टांत चांगल्या रीतीनें दाखविले आहेत. कायदेकौन्सिलचा प्रेसिडेंट आणि व्हाइस प्रेसिडेंट हे सभासदांनीं निवडावे अशी वरील कमिटीची सूचना आहे. सार्वजनिक सभा आणि मोस्लीम लीग यांनीहि ही सूचना केली होती. प्रेसिडेंट निवडून देण्याचा अधिकार जरी सभासदांना देण्यांत आला नाहीं, तरी निदान व्हाइस प्रेसिडेंट निवडून देण्याचा अधिकार देण्यांत यावा, अशी आमची सूचना आहे. प्रसंगविशेषीं कायदेकौन्सिल बरखास्त करण्याचा अधिकार गव्हर्नरला असावा हें योग्यच आहे. परंतु पुनः कांहीं विवक्षित कालावधींत कौन्सिलची सभा गव्हर्नरनें भरविलीच पाहिजे असा निर्बंध ठरणें अवश्य आहे.

प्रांतिक राज्यघटनेचा विचार करितांना आणखी दोन मुद्याचा विचार झाला पाहिजे. कायदेकौन्सिलच्या सभासदांची संख्या पुरेशी असणें अवश्य आहे, त्याप्रमाणेंच मतदारीचा हक्कही शक्य तितका विस्तृत असला पाहिजे. दुसरें तत्त्व रिपोर्टांत मान्य केलें आहे, परंतु प्रांतिक कायदेकौन्सिलांच्या सभासदांची संख्या किती असावी हें सांगण्यांत आलेलें नाहीं. सभासदांची संख्या आणि मतदारांच्या हक्काचें स्वरूप यांचा अन्योन्य संबंध आहे हें आम्ही जाणून आहोंत, आणि म्हणून रिपोर्टांत म्हटल्याप्रमाणें फ्रँचाइस कमिटीचा रिपोर्ट प्रसिद्ध झाल्याशिवाय कौन्सिलाच्या सभासदांची संख्या किती असावी, आणि मतदारसंघाची रचना कशा रीतीनें करण्यांत यावी, या गोष्टीचा निकाल लावतां येणार नाहीं हें खरें आहे. तथापि सध्या आम्हांस उपलब्ध असलेल्या माहितीवरून या प्रश्नासंबंधानें आमचा जो अभिप्राय आहे तो आम्ही आमच्या वाचकांस सादर करितों.

मुंबई कायदेकौन्सिलाच्या सभासदांची संख्या किती असावी हें ठरवितांना कांहीं आंकडे लक्षांत घेतल्यास उपयोग होणार आहे. १९११ च्या खानेसुमारीप्रमाणें मुंबई इलाख्याची एकंदर लोकसंख्या २०६५२०८७ आहे. त्यापैकीं एडनची

लोकसंख्या ४६१६५, मुंबई शहराची ९७९४४५ आणि बाकी राहिलेली लोकसंख्या १९६२६४७७ ही ब्रिटिश जिल्ह्यांची आहे. खालीं दिलेल्या कोष्टकावरून धर्मवार लोकसंख्या कशी आहे हें कळून येईल.

| धर्म व जात | एडन | मुंबई शहर | ब्रिटिश जिल्हे. |
|---|---|---|---|
| हिंदु | २०४५ | ६६४०४८ | १५९२०९२० |
| मुसलमान | ३७००८ | १७९३४६ | ३१८०४७७ |
| जैन | २३५ | २०४६० | २१२०७४ |
| ख्रिश्चन | २७१४ | ५७३५५ | २३०५३२ |
| पारशी | ३८४ | ५०९३१ | ८०५९६ |
| शीख | २० | ५०७ | ११८६७ |
| ज्यू | ३७४७ | ६०५७ | ११३३४ |

वरील लोकसंख्येपैकीं मतदार किती असू शकतील, याचा अंदाज करितांना स्त्रिया किंवा एकवीस वर्षांचे आंतील पुरुष यांची संख्या जमेस धरण्याचें कारण नाहीं. स्त्रियांना मतदारीचा हक्क द्यावा अशी मागणी स्पेशल कॉंग्रेसनें केली आहे. ती जर मान्य करण्यांत आली तर अर्थातच वयांत आलेल्या स्त्रियांची संख्याहि धरावी लागेल. परन्तु स्त्रियांना मतदारीचा हक्क देण्यांत येईल असा रंग दिसत नाहीं. तेव्हां त्यांची संख्या वगळण्यास हरकत नाहीं. एकवीस आणि त्यापेक्षां अधिक वयाच्या पुरुषांची संख्या किती आहे, हें १९११ च्या खानेसुमारीच्या रिपोर्टावरून सांगतां येत नाहीं, कारण त्यांत ती संख्या दिलेली नाहीं. वीस आणि त्यापेक्षां अधिक वयाच्या पुरुषांची संख्या दिली आहे. तिजवरून खालील कोष्टक तयार केलें आहे:—

## वीस आणि त्यापेक्षां अधिक वयाच्या पुरुषांची संख्या.

| | | | |
|---|---|---|---|
| अहमदाबाद जिल्हा | | २४३८२१ | उत्तर भाग |
| भडोच | ,, | ८९०२६ | |
| केडा | ,, | २०४६४६ | |
| पंचमहाल | ,, | ८३८६० | |
| सुरत | ,, | १७८७०२ | |
| ठाणें | ,, | २४७६५६ | |
| एकंदर | | १०४७७११ | |

| | | | |
|---|---|---|---|
| अहमदनगर | जिल्हा | २६२५९७ | मध्यभाग |
| पूर्व खानदेश | ,, | २७३३१४ | |
| पश्चिम खानदेश | ,, | १४८२३४ | |
| नाशिक | ,, | २४१३६१ | |
| पुणें | ,, | २९८२०४ | |
| सातारा | ,, | २८३२७० | |
| सोलापूर | ,, | २१८८६१ | |
| एकंदर | | १७२५८४१ | |

| | | | |
|---|---|---|---|
| बेळगांव | जिल्हा | २५४१७२ | दक्षिण भाग |
| विजापूर | ,, | २३४३७६ | |
| धारवाड | ,, | २८०६२८ | |
| कानडा | ,, | ११९९९८ | |
| कुलाबा | ,, | १५२१११ | |
| रत्नागिरी | ,, | २७०६५६ | |
| एकंदर | | १२११९४१ | |

| | | | |
|---|---|---|---|
| हैद्राबाद | जिल्हा | ३०६१४० | सिंध |
| कराची | ,, | १६४१३७ | |
| लारखाना | ,, | १९१५४२ | |
| सक्कर | ,, | १६८५७५ | |
| थर आणि पारकर | ,, | १३७५५३ | |
| अप्पर सिंध फ्रॉंटिअर | ,, | ७६४९२ | |
| एकंदर | | १०४४४३९ | |

प्रत्येक जिल्ह्यांत वर जी संख्या दिली आहे, तीत मतदार किती असतील हा प्रश्नच आहे, व तो मतदारीच्या हक्काचें स्वरूप ठरविल्याशिवाय सोडवितां येणारहि नाहीं. सध्या मुसलमानांनाच प्रत्यक्ष मतदारीचा हक्क आहे; व त्यासंबंधानें प्रचलित असलेले नियम लक्षांत घेतां असें अनुमान काढण्यास हरकत नाहीं कीं, मतदारीचा हक्क शक्य तितका विस्तृत ठेविल्यास जबाबदार पद्धतीचा आरंभ करण्यास जितका मतदारसंघ असणें इष्ट आहे तितका हिंदुस्थानांत सहज निर्माण करितां येईल. कित्येकांच्या मतें म्युनिसिपालिट्या आणि लोकलबोर्डें यांच्यासंबंधानें मतदारीचा हक्क जसा आहे तसाच कायदेकौन्सिलासंबंधानें

असावा; म्हणजे जे म्युनिसिपालिट्या आणि लोकलबोर्डें यांचे मतदार ते कौन्सिलाचेहि होतील. आमच्या मतें कौन्सिलाबद्दलचा मतदारीचा हक्क आणि म्युनिसिपालिट्या आणि लोकलबोर्डें यांच्याबद्दलचा मतदारीचा हक्क या दोहोंत फरक करणें इष्ट आहे; दुसऱ्याइतका पहिला विस्तृत नसावा, असें आमचें मत आहे. मुसलमानांच्या बाबतींत असलेला हक्क विस्तृत करणें शक्य व इष्ट आहे. सारांश कायदेकौन्सिलासंबंधानें जो मतदारीचा हक्क द्यावयाचा तो मुसलमानांच्या बाबतींत हल्लीं असलेल्या हक्कापेक्षां अधिक विस्तृत, परंतु म्युनिसिपालिट्या व लोकल बोर्डें यांच्यासंबंधानें असलेल्या हक्कापेक्षां कमी विस्तृत, असा असावा. मतदारीच्या हक्काचे नियम कांहीं असोत, ते रिपोर्टांत दिलेल्या मूल तत्त्वाला धरून झाल्यास मतदारसंघ आरंभीं तरी पुरेसा होईल, अशी आमची खात्री आहे. आणि मग प्रत्येक जिल्ह्याला निदान तीन सभासद देण्यास हरकत नाहीं. प्रत्येक जिल्ह्यांतील मतदारांचे तीन निरनिराळे विभाग करण्यांत येऊन प्रत्येकानें एक सभासद निवडावा किंवा सर्व मतदारांनीं मिळून तीन सभासद निवडावे. ह्यापैकीं कोणतीही पद्धति आरंभीं स्वीकारली तरी हरकत नाहीं.

प्रत्येक जिल्ह्याला तीन सभासद या मानानें एकंदर २५ जिल्ह्यांचे ७५ सभासद होतील. मुंबई शहरांत २० आणि त्यापेक्षां अधिक वयाच्या पुरुषांची संख्या ४५६४२५ आहे. ब्रिटिश जिल्ह्यांना एकंदर ७५ सभासद असावेत असें आम्ही वर म्हटलें आहे. त्या मानानें पाहिलें म्हणजे सुमारें ६७२०२४ वयांत आलेल्या पुरुषांना १ सभासद पडतो. या प्रमाणानें पाहिलें असतां मुंबई शहराला ७ सभासद दिले पाहिजेत. पुणें, अहमदाबाद आणि कराची हीं शहरें मोठीं असल्यामुळें प्रत्येकाला एक स्वतंत्र सभासद देण्यांत यावा. एडनची काय व्यवस्था करण्यांत येईल याबद्दल रिपोर्टांत उल्लेख नाहीं. परंतु तें शहर मुंबई इलाख्यांतच धरण्यांत येत असल्याकारणानें त्याच्यातर्फे एक सभासद असावा. म्हणजे एकंदर ८६ सभासद होतात. याशिवाय मुंबई युनिव्हर्सिटीला दोन, मुंबई कार्पोरेशनला एक, युरोपियन व्यापारी वर्गाला चार आणि हिंदी व्यापारी वर्गाला तीन असे सभासद दिल्यास एकंदर संख्या ९६ होईल. याखेरीज मुसलमानांतर्फे १२, जैनांतर्फे २, पारशांकरितां २, ख्रिश्चन लोकांकरितां २, ज्यू लोकांकरितां १, शीख लोकांकरितां १, लिंगायतांकरितां ४, अस्पृश्य जातींकरितां ३, आणि अस्पृश्यांखेरीज इतर मागासलेल्या वर्गांकरितां ६, हे आणखी

सभासद् मिळविले म्हणजे एकंदर सभासदांची संख्या १२९ होते. तेव्हां स्थूलमानानें विचार करतां कायदे कौन्सिलांच्या सभासदांची संख्या १२९ पेक्षां कमी असूं नये असें आमचें मत आहे. ही संख्या कदाचित् कृत्रिम वाटण्याचा संभव आहे; परंतु आमचा मुख्य मुद्दा इतकाच आहे की इतर सभासदांची संख्या कमी जास्त करण्यांत आली तरी जिल्ह्यांच्यातर्फे सभासदांची जी संख्या असावी ती प्रत्येक जिल्ह्याला ३ यापेक्षां कमी असतां कामा नये.

पूर्ण प्रांतिक जबाबदार राज्यपद्धति जर स्थापन करण्यांत येईल तर हिंदुस्थानसरकारासंबंधानें रिपोर्टांत सुचविलेल्या सुधारणा पुरेशा आहेत असें मानण्यास हरकत नाही, असें आमचें मत आहे हें आम्ही वर सांगितलेंच आहे. पूर्ण प्रांतिक जबाबदार राज्यपद्धति ही पहिली पायरी व पूर्ण राष्ट्रीय जबाबदार राज्यपद्धति ही दुसरी पायरी, असा आमचा अभिप्राय असल्यामुळें आणि २० आगष्ट १९१७ रोजी केलेल्या निवेदनाचा असाच अर्थ केला पाहिजे असें आमचें मत असल्यामुळें, जर पूर्ण प्रांतिक जबाबदार राज्यपद्धति स्थापन करण्यांत आली तर हिंदुस्थानसरकारच्या राज्यकारभागतही संप्रदत्त व राखीव खाती हे विभागणीचें तत्त्व अंमलात आणून कांही खातीं संप्रदत्त करण्यात यावी, अशी मागणी करणें योग्य होणार नाही. परंतु ता. २० आगष्टच्या निवेदनाचा आम्ही केलेला अर्थ जर बरोबर नसेल आणि खातेवारीनेंच जबाबदार राज्यपद्धति अंमलांत आणण्याचें तत्त्व बरोबर आहे असेंच जर पार्लमेंटानें ठरविलें तर तें तत्त्व हिंदुस्थानसरकारासहि लागू करून त्या सरकारची कांही खाती संप्रदत्त करण्यांत आली पाहिजेत. स्पेशल राष्ट्रीय सभा, स्पेशल मॉस्लेमलीग आणि नेमस्तांची परिषद या तिन्ही संस्थांनी ही जी मागणी केली आहे तिजप्रमाणें सुधारणेच्या योजनेंत दुरुस्ती होणें अवश्य आहे. एक तर पूर्ण प्रांतिक जबाबदार राज्यपद्धति स्थापन करा, किंवा संप्रदत्त आणि राखीव खाती हें विभागणीचें तत्त्व हिंदुस्थानसरकारलाहि लावा, ही विचारसरणी अगदीं रास्त आहे. ह्या बाबीसंबंधानें तरी राष्ट्रीय सभेंतील दोन्ही पक्षांचें आणि मॉस्लेमलीगचें मतैक्य आहे. स्पेशल राष्ट्रीय सभा आणि मॉस्लेमलीग यांनीं जसा ठराव केला आहे, तसाच नेमस्तांच्या परिषदेनें केला आहे. हिंदुस्थानसरकारचीं कांहीं खातीं संप्रदत्त करा, ही हिंदी लोकांची एकमुखी मागणी आहे यांत बिलकूल संदेह नाही. मॉन्टेग्यु-चेल्मसफर्ड योजना लॉर्डांच्या विरोधरूपी खडकावर आदळून तिचे तुकडे तुकडे होऊं नयेत म्हणून तिच्या

बचावाकरितां स्वतंत्र परिषद् भरवून खटपट करणाऱ्या ना. बाबु सुरेंद्रनाथ बानर्जी, सर दिनशा वाच्छा, सर नारायणराव चंदावरकर, ना. परांजपे, ग. समर्थ वगैरे नेमस्तांनीं, तसेंच नेमस्तांच्या मतें तिच्या नाशार्थ सज्ज झालेल्या लो. टिळक, मिसेस ॲनी बिझंट, ना. पंडित मदनमोहन मालवीय इत्यादि जहालांनीं हीच मागणी केली आहे. आणि हिंदुस्थानला 'स्वयंनिर्णया'चें तत्त्व (Principle of self-determination) लावण्याची इंग्लंडची जर खरोखर इच्छा असेल तर हिंदुस्थानांतील सर्व पक्षांनीं केलेली ही मागणी ब्रिटिशपार्लमेंटानें अवश्य मान्य केली पाहिजे. नेमस्तांच्या मुत्सद्दीपणाची,आणि दूर धोरणाची टाइम्सऑफ–इंडियासारखीं ॲंग्लो-इंडियन पत्रें सध्यां एकसारखी स्तुति करीत आहेत; नेमस्तपक्ष सरकारास निदान जहालपक्षाइतका अप्रिय नाहीं; मवाळांना एकत्र करून त्यांचा पाठिंबा मिळवा. (Rally the moderates) हें सरकारचें व उदार ब्रिटिश मुत्सद्यांचें धोरण आहे. तेव्हा त्यांच्या मागणीला तरी ब्रिटिश पार्लमेंट वाटाण्याच्या अक्षता लावणार नाहीं अशी आम्हांस फार आशा आहे.

गव्हर्नरजनरलच्या सध्यांच्या लेजिस्लेटिव्ह कौन्सिलच्या ऐवजीं लेजिस्लेटिव्ह असेंब्ली आणि कौन्सिल ऑफ स्टेट या दोन संस्था स्थापन करण्यांत याव्या अशी शिफारस करण्यांत आली आहे. कौन्सिल ऑफ स्टेट स्थापन करण्याबद्दल हिंदी राजकीय सुधारकांत मतभेद आहे. जादा कॉंग्रेस आणि मॉस्लेमलीग यांनी तें स्थापन करूं नये अशी सूचना केली आहे. आणि तें स्थापन करावयाचें असल्यास निदान त्यांपैकीं निम्मे सभासद लोकनियुक्त असावेत असें वरील संस्थांचें म्हणणें आहे. नेमस्तांच्या परिषदेनें कौन्सिल ऑफ स्टेट स्थापन करण्याच्या विरुद्ध अभिप्राय दिलेला नसून फक्त त्याचे सभासद निम्मे लोकनियुक्त असावे येवढीच दुरुस्ती त्यांनीं सुचविली आहे. द्विमंडळी राज्यपद्धतीसंबंधानें वर जे विचार आम्ही व्यक्त केले आहेत, त्यावरून आमच्या वाचकांच्या लक्षांत आलें असेलच कीं, आम्हांला या बाबतींत नेमस्त परिषदेचा अभिप्रायच पसंत आहे. कौन्सिल ऑफ स्टेट स्थापन केल्यानें एकंदरीनें फायदाच होईल. त्याचे निम्मे सभासद लोकनियुक्त असावेत अशी वरील सर्व संस्थांची सूचना आहे. ती मान्य करण्यांत येईल अशी आमची आशा आहे. परंतु जरी ती मान्य करण्यांत आली नाहीं आणि रिपोर्टांत लिहिल्याप्रमाणें त्याची घटना ठेवण्यांत आली तरी कांहीं हरकत नाहीं.

कौन्सिल ऑफ स्टेटच्या सभासदांच्या लायकीसंबंधाचे नियम गव्हर्नरजनरलाच्या कौन्सिलनें ठरवावे अशी रिपोर्टांत सूचना आहे. लेजिस्लेटिव्ह असेंब्ली व लेजिस्लेटिव्ह कौन्सिल यांच्या सभासदांच्या लायकीचे नियम फ्रँचाइस कमिटीनें ठरवावे असें असतां कौन्सिल ऑफ स्टेटसंबंधानें मात्र निराळी सूचना कां करण्यांत आली हें आम्हांस समजत नाहीं. कौन्सिल ऑफ स्टेटच्या सभासदांच्या लायकीसंबंधाचे नियम फ्रँचाइस कमिटीनें करावे अशी नेमस्तांच्या परिषदेनें केलेली सूचना योग्य असून ती आम्हांस पसंत आहे.

मॉंटेग्यु–चेल्म्सफर्ड योजनेंत कोणते दोष आहेत व तींत कोणते फेरबदल केले पाहिजेत याचें विवेचन आम्हीं वर केलें आहे. तिचा स्थूल मानानें विचार करितां मुख्य प्रश्न उपस्थित होतो तो असा कीं, सदरहु योजना २० आगष्ट १९१७ च्या जाहीरनाम्याप्रमाणें जबाबदार राज्यपद्धतीचा भरीव हप्ता किंवा पायरी आहे काय? ती अंमलांत आल्यानें हिंदी लोकांचें राजकीय मार्गांतील पाऊल पुढें पडेल याबद्दल वाद नाही. प्रांतिक राज्यकारभारांत कांहीं खातीं संप्रदत्त केल्यामुळें जबाबदारीचें तत्त्व अंशतः तरी अंमलांत येऊन प्रांतिक कारभारावर थोडीशी तरी लोकसत्ता चालेल. हिंदुस्थानच्या राज्यकारभारांतही हिंदी लोकांचें हल्लींपेक्षांही अधिक वजन वाढेल. परंतु ही योजना पुरेशी आहे किंवा नाहीं हें पाहिलें पाहिजे; आणि म्हणून ता. २० आगष्टच्या जाहीरनाम्यांत दिलेल्या अभिवचनाप्रमाणें ती भरीव आहे किंवा नाहीं याचा विचार झाला पाहिजे. जबाबदार राज्यपद्धति अधिक अधिक सिद्ध करण्याच्या हेतूनें स्वराज्य-संस्थांचा आस्ते आस्ते विकास करणें या धोरणाला अनुसरून मॉंटेग्यु–चेल्म्सफर्ड योजनेंतलि या सुधारणा भरीव आहेत किंवा नाहींत हाच महत्त्वाचा प्रश्न आहे, आणि या प्रश्नाचें जें उत्तर असेल त्याप्रमाणेंच ती पुरेशी आहे किंवा नाहीं हें ठरवावें लागेल. २० आगस्टचें निवेदन सर्वांना बंधनकारक आहे असें भारत-मंत्री आणि व्हाइसरॉय यांचें म्हणणें आहे. त्या निवेदनाचे सर्व भाग हिंदी जनतेवर बंधनकारक नसून फक्त पहिलाच बंधनकारक आहे असें आम्हीं वर सिद्ध केलें आहे. परंतु हा मुद्दा जरी बाजूला ठेवला तरी निवेदनाच्या पहिल्या भागांत सांगितल्याप्रमाणें मॉंटेग्यु–चेल्म्सफर्ड योजनेंतील सुधारणा भरीव असल्यास त्या पुरेशा आहेत, असें समजलें पाहिजे, हें आम्हांस मान्य आहे. तेव्हां त्या योजनेंतील सुधारणांचा भरीवपणा हेंच खरें प्रमाण आहे, आणि त्यावरूनच त्यांची परीक्षा करण्यांत आली पाहिजे. हिंदुस्थानच्या कायदेकौन्सिलाच्या कमिटीनें

केलेल्या रिपोर्टांत वरील सुधारणा म्हणजे पुढचें एक पाऊल आहे असें म्हटलें आहे. हिंदुस्थानांत जबाबदार राज्यपद्धतीच्या सिध्द्यर्थ ही योजना म्हणजे खराखुरा प्रयत्न आहे असें ना. सुरेंद्रनाथ बानर्जी यांनीं हिंदुस्थानच्या कायदेकौन्सिलांत आणलेल्या ठरावांत म्हटलेलें आहे. मॉंटेग्यु–चेल्म्सफर्ड योजनेच्या स्वरूपाचें केलेल्या या वर्णनाबद्दल कोणीहि समंजस मनुष्य आक्षेप घेणार नाहीं अशी आमची पक्की खात्री आहे. परंतु निर्णायक प्रश्न हा नव्हे. मॉंटेग्यु–चेल्म्सफर्ड योजना भरीव आहे किंवा नाहीं हाच निर्णायक मुद्दा असून त्यावरूनच ती पुरेशी आहे किंवा नाहीं हें ठरविलें पाहिजे. अशा दृष्टीनें या योजनेचा विचार केला म्हणजे, प्रत्येक विचारशील व निःपक्षपाती राजकीय सुधारकास कबूल करावें लागेल कीं ती भरीव नसून हिंदुस्थानच्या सध्यांच्या राजकीय परिस्थितीला अनुसरून नाहीं. आणि म्हणून ती भरीव करण्याकरितां अवश्य ते फेरबदल तींत झाले पाहिजेत.

तर मग मॉंटेग्यु–चेल्म्सफर्ड योजना भरीव कशानें होईल ? हा पुढील प्रश्न आहे. त्याचें उत्तर वरील विवेचनांत आहेच. तथापि त्याची द्विरुक्ति केल्यास हरकत नाहीं. एक तर निदान प्रमुख प्रांतांत पूर्ण प्रांतिक जबाबदार राज्यपद्धति स्थापन करण्यांत आली पाहिजे. असें करण्याची ब्रिटिश पार्लमेंटाची इच्छा नसल्यास निदान राष्ट्रीय सभा, मॉस्लेमलीग, आणि नेमस्तांची परिषद् या सर्व संस्थांनीं सुचविल्याप्रमाणें पोलीस, कायदा आणि न्याय एवढींच खातीं राखीव करून बाकीचीं सर्व संप्रदत्त करण्यांत आलीं पाहिजेत. आणि हिंदुस्थानसरकारचींहि कांहीं खातीं लोकनियंत्रणाखालीं आणिलीं पाहिजेत. अशा रीतीनें योजनेंत दुरुस्ती झाली तरच ती भरीव होईल, नाहीं तर होणार नाहीं. आणि ती जर भरीव झाली नाहीं तर ती पुरेशी आहे, असें समजतां येणार नाहीं. हिंदुस्थानच्या राज्यकारभारांत एकदम क्रांतिकारक सुधारणा करण्यांत याव्या असें कोणीहि म्हणत नाहीं. राजकीय सुधारणा काय किंवा सामाजिक सुधारणा काय ती वस्तुस्थितीला धरूनच केली पाहिजे. परंतु वस्तुस्थितीपेक्षां सुधारणा जास्त करणें ज्याप्रमाणें कदाचित् हितावह होणार नाहीं, त्याप्रमाणें ती कमी होऊं देणें हेंही शहाणपणाचें लक्षण नव्हे. अधिक नाहीं व कमी नाहीं अशीच ती असली पाहिजे. अधिक झाल्यास तिची अमंलबजावणी योग्य रीतीनें न होऊन घोंटाळा होण्याचा संभव असतो, त्याप्रमाणेंच ती कमी असल्यास लोकांचा असंतोष नाहींसा न होऊन चळवळीला ( Agitation ) निष्कारण

जागा राहते. सुधारणेकरितां चळवळ करणें इष्ट व अवश्य आहे परंतु कधीं कधीं चळवळीला जागा राखूं न देतां अंमलांत आणलेल्या सुधारणेचें कार्य उत्तम रीतीनें घडवून आणण्याकरितां विधायक गोष्टीकडे अधिक लक्ष देणें अवश्य असतें. हिंदुस्थानच्या राज्यकारभारांत सध्यांच्या परिस्थितीला अनुसरून पुरेशा सुधारणा जर अमलांत आणल्या तर त्यांची अंमलबजावणी जुटीनें आणि योग्य रीतीनें होऊन हिंदी राष्ट्र निर्माण करण्याचें कार्य अधिक चांगल्या रीतीनें होईल. नाहींतर पुरेशा सुधारणा मिळविण्याकरितां चळवळ करण्याची इच्छा कायम राहून राष्ट्र निर्माण करण्याचें कार्य मागें पडण्याचा संभव आहे. व म्हणून हिंदी मुत्सद्दी काय किंवा इंग्लिश मुत्सद्दी काय, या सर्वांनी एक गोष्ट लक्षांत ठेवणें अवश्य आहे. ती ही कीं, राजकीय सुधारणा वस्तुस्थितीला अनुसरून पुरेशा असल्या पाहिजेत. सबब आम्ही वर लिहिल्याप्रमाणें मॉंटेग्यु—चेल्म्सफर्ड योजनेंत अवश्य फेरफार झाले पाहिजेत. ते फेरफार करण्यांतच हिंदुस्थानचें व इंग्लंडचें खरें हित आहे. तें जर करण्यांत आलें नाहीं तर हिंदी लोकांना समाधान वाटणार नाही.

मॉंटेग्यु–चेल्म्सफर्ड योजना ग्राह्य आहे किंवा अग्राह्य आहे असा वाद उपस्थित होऊन हिंदी राजकीय सुधारकांत निष्कारण दुही झाली आहे. आणि त्यामुळें हिंदुस्थानचें नुकसान होण्याचा संभव दिसत आहे. वास्तविक पाहतां हा वाद उपस्थित होण्याचें कारण नाहीं आणि तो उपस्थित झाला ही मोठी दुर्दैवाची गोष्ट आहे. त्याला जबाबदार कोण याचा विचार करण्याचें कारण नाही. तथापि सुधारणांच्या योजनेबद्दल कांहीं राष्ट्रीय सभेच्या पुढाऱ्यांनी जे गैरमुत्सद्दीपणाचे विचार आरंभीं व्यक्त केले त्यामुळें तो उपस्थित झाला असें मोठ्या दुःखानें म्हणावें लागतें. राष्ट्रीय पुढाऱ्यांवर मोठी जबाबदारी असते आणि हिंदुस्थानच्या चमत्कारिक परिस्थितींत तर ती फारच मोठी आहे. हिंदुस्थानच्या राष्ट्रीय पुढाऱ्यांचें अत्यंत महत्त्वाचें असें कोणतें कार्य असेल तर तें एकीकरणाचें होय. हिंदुस्थानचें मन अद्याप एक झालें नाहीं. हिंदी लोकांच्या विचारांचा सांचा अद्याप एक बनलेला नाही. धर्म, जाती, संस्कार, परिस्थिति यांच्या भिन्नत्वामुळें हिंदुस्थानचें एकीकरणाचें कार्य जात्याच अवघड आहे आणि म्हणून तें जास्त अवघड होऊं नये अशी खबरदारी घेणें हें हिंदी राष्ट्रीय पुढाऱ्यांचें कर्तव्य आहे. आणि म्हणून एखाद्या महत्त्वाच्या बाबी-

संबंधानें आपले विचार व्यक्त करितांना राष्ट्रीय पुढाऱ्यांनी साधकबाधक पूर्ण विचार केला पाहिजे. मॉंटेग्यु-चेल्म्सफर्ड योजना अग्राह्य आहे असा जर अभिप्राय मिसेस बेझंट आणि लो. टिळक यांनी व्यक्त केला नसता तर नेमस्तांच्या मनांत भीति उत्पन्न होऊन तिचें पर्यवसान स्वतंत्र परिषद् भरविण्यांत झालें नसतें. अगदी आरंभीच त्यांनीं व्यक्त केलेले विचार त्यांनीं पुढें बदलले आणि आम्ही संमिश्रपक्षाचे आहोंत असें त्यांनीं जाहीर केलें हें खरें. आणि स्वतंत्र परिषद् भरविण्याचा ठराव करण्यापूर्वी नेमस्तांनीं या गोष्टीला महत्त्व द्यावयास पाहिजे होतें. नेमस्त परिषदेचे अध्यक्ष ना. सुरेंद्रनाथ बानर्जी यांनी केसरीतील योजनेवरील पहिल्या लेखाचा उल्लेख केला आहे, परंतु आम्ही संमिश्रपक्षाचे आहोंत असें केसरीनें ज्या लेखांत जाहीर केलें, त्याचा त्यांनी उल्लेख केला नाहीं हें निःपक्षपातपणाचें लक्षण नव्हे. राजकारणांत कालपरिस्थिति वगैरे गोष्टी लक्षात घेऊन धोरणांत फेरबदल करावा लागतो आणि मॉंटेग्यु-चेल्म्सफर्ड योजना अग्राह्य आहे, असा जरी मिसेस बेझंट आणि लो. टिळक यांनी आरंभी अभिप्राय दिला तरी लोकमताचा वारा खरोखर कोणीकडे वहात आहे याचा त्यांनीं विचार करून त्यांनी तो अभिप्राय बदलला, ही गोष्ट नेमस्त पुढाऱ्यांनी लक्षात घ्यावयास पाहिजे होती. आणि ती जर त्यांनी घेतली असती आणि मिसेस बेझंट आणि लो. टिळक यांच्याबद्दल त्यांना गैरविश्वास वाटला नसता तर राष्ट्रीयसभेंत दुही न होतां योजनेबद्दल हिंदी लोकांचें मत एकमुखानें व्यक्त करण्यांत आलें असतें. परंतु झालेल्या गोष्टीस आतां नाइलाज आहे. मुख्य मुद्दा एवढाच आहे कीं, योजनेच्या ग्राह्याग्राह्यतेचा प्रश्न जरी आरंभ निघाला तरी तो आतां राहिला नाहीं. योजना अग्राह्य आहे, म्हणजे ती पुरेशी करण्याकरितां अवश्य असलेले फेरबदल झाल्याशिवाय ती अमलात येऊं नये. व याउपर ती अंमलांत आल्यास तिची अंमलबजावणी करण्याचे कामीं आम्ही मदत करणार नाहीं, तिजपासून आम्ही परावृत्त राहूं असें आतां कोणीही म्हणत नाहीं. हिंदुस्थानच्या दुर्दैवानें आणि ब्रिटिश पार्लमेंटच्या गैरमुत्सद्दीपणामुळें हिंदी लोकांनी तींत सुचविलेले फेरबदल करण्यांत आले नाहींत आणि ती जशीच्या तशीच अंमलांत आली, तर तिला बहिष्कार घालावा किंवा अप्रत्यक्ष प्रतिकाराचें अवलंबन करून तिला विरोध करावा असें कोणीही म्हणत नाहीं. ती भरीव जरी नसली तरी ती सुधारणेच्या मार्गांतील एक पाऊल असल्यामुळें तिचा स्वीकार करून पुढील

उद्योगास लागावें हीच गोष्ट सर्वांना संमत आहे. नेमस्तांच्या परिषदेनें वरील योजनेला अंतःकरणपूर्वक पाठिंबा दिला आहे. (The Conference accords its hearty support to those proposals) परंतु तिनेंही कांहीं फेरबदल सुचविले असून त्यापैकी महत्त्वाचे फेरबदल राष्ट्रीयसभा आणि मॉस्लेमलीग यांनी सुचविलेल्या फेरफारांहून भिन्न नाहींत. कॉंग्रेस आणि मॉस्लेमलीग यांच्या ठरावांत " आम्ही वरील योजनेचें समर्थन करितों " असे शब्द नाहींत. ती योजना निराशाजनक आणि असमाधानकारक आहे असे राष्ट्रीयसभेच्या ठरावांत शब्द आहेत. मॉस्लेमलीगच्या ठरावांत निराशाजनक हा शब्द नाही, असमाधानकारक हेंच विशेषण त्यास लावलेलें आहे. नेमस्तांच्या परिषदेचा ठराव आणि राष्ट्रीयसभा आणि मॉस्लेमलीग यांचे ठराव यांची भाषा भिन्न आहे हें खरें. नेमस्तांच्या ठरावांत सुधारणेच्या योजनेला प्रथम पाठिंबा देण्यांत आला असून नंतर फेरबदल सुचविण्यांत आले आहेत. राष्ट्रीयसभा आणि मॉस्लेमलीग यांच्या ठरावात ती असमाधानकारक आहे असें प्रथम म्हणण्यांत आलें असून नंतर ती सरस करण्याकरितां कोणते फेरबदल केले पाहिजेत हें सांगण्यांत आलें आहे.

सर्वांनी सुचविलेले फेरबदल बहुतेकअंशी सारखेच आहेत असें आम्ही वर सांग-तलेंच आहे. राष्ट्रीय सभा आणि मॉस्लेमलीग यांनी ती योजना असमाधानका-रक आहे असें आरंभीं तिचें वर्णन केल्यावरून ती अग्राह्य आहे व म्हणून तिचें समर्थन करितां येत नाहीं असा राष्ट्रीयसभा आणि मॉस्लेमलीग यांचा अभिप्राय आहे असें अनुमान निघत नाहीं. सर्व संस्थांच्या ठरावांचा इत्यर्थ पाहिला तर तो एकच आहे. सर्वांना तींत कांहीं फेरबदल हवे आहेत, परंतु ते जर करण्यांत आले नाहींत तर राष्ट्रीयसभा आणि मॉस्लेमलीग ती ग्राह्य करणार नाही व तिला विरोध करतील असें नाहीं. नेमस्तांच्या परिषदेनें आपली पसंती प्रत्यक्षपणें आणि स्पष्ट रीतीनें व्यक्त केली आहे. राष्ट्रीयसभा आणि मॉस्लेमलीग यांनी दुरुस्त्यांवर अधिक जोर दिला आहे. परंतु त्यांनीहि अप्रत्यक्ष रीत्या योजनेचें समर्थनच केलें आहे. सबब, नेमस्तांची परिषद आणि राष्ट्रीयसभा व मॉस्लेमलीग यांच्या योजनाविषयक धोरणांत फरक करून नेमस्तांना योजना ग्राह्य आहे व इतरांना ती अग्राह्य आहे असें म्हणणें चुकीचें आहे. मॉंटेग्यु-चेल्म्सफर्ड योज-नेला हिंदी लोकांचा पाठिंबा आहे असें ब्रिटिश लोकांना दाखविणें अवश्य आहे,

नाहीं तर ती योजना लॉर्ड सिडनहॅम वगैरे लॉर्डांच्या विरोधानें भग्न होईल असें सांगण्यांत येतें. आणि नेमस्तांनीं जी स्वतंत्र परिषद् भरविली व तिचा जो एवढा अँग्लो-इंडियन आणि इंग्लिश पत्रांनीं गाजावाजा चालविला आहे त्याचें कारण तरी हेंच आहे कीं, हिंदुस्थानांतील निदान एका पक्षाला तरी ती योजना पूर्णपणें ग्राह्य आहे असें ब्रिटिश जनतेला दाखवितां यावें. परंतु ब्रिटिश जनता कांहीं मूर्ख किंवा दुधखुळी नाहीं. तिजपुढें नेमस्तांचे आणि राष्ट्रीयसभा व मॉस्लेमलीग या संस्थांचे ठराव योग्य रीतीनें मांडण्यात आले तर तिलाहि असेंच वाटेल कीं, नेमस्त पक्षालाच काय पण इतर पक्षांनाहि ही योजना ग्राह्य असून सर्व पक्षांच्या मतें तीत कांहीं दुरुस्त्या झाल्या पाहिजेत. दुरुस्त्यांवर राष्ट्रीयसभा व मॉस्लेम-लीग यांनीं जोर दिला आहे, एवढ्या एकाच गोष्टीवरून त्यांना ती ग्राह्य नाहीं असें अनुमान ब्रिटिश जनता काढणार नाहीं अशी आमची पक्की खात्री आहे मिसेस् बेझंट, लो. टिळक इत्यादि राष्ट्रीयसभेच्या पुढाऱ्यांची नालस्ती करण्याच्या हेतूनें त्यांनीं आरंभीं दिलेल्या अभिप्रायावर फाजील जोर देऊन आणि जादा कॉंग्रेस आणि मॉस्लेमलीग यांच्याबद्दल एकदेशीय माहिती देऊन ब्रिटिश जनतेचा गैरसमज करण्याचे प्रयत्न चालू आहेत, हें खरें; व त्यामुळें कित्येक ब्रिटिश मतदारांचा आणि कांहीं पार्लमेंटच्या सभासदांचा सुधारणांची योजना फक्त नेमस्तांनाच ग्राह्य आहे, इतरांना ग्राह्य नाहीं असा ग्रह झाल्यास नवल नाहीं. आणि असा गैरसमज करण्याला लो. टिळक आणि मिसेस् बेझंट यांचे आरंभींचे अभिप्राय अंशतः तरी कारणीभूत झाले आहेत ही दुःखाची गोष्ट आहे. परंतु यामुळें सर्व बिघडलें असें होत नाहीं. कांहीं ब्रिटिश नागरिकांचा झालेला गैरसमज दूर करणें अशक्य नाहीं आणि राष्ट्रीय सभा आणि मॉस्लेमलीग यांचें संयुक्त डेप्युटेशन विलायतेंत गेल्यावर तो गैरसमज दूर होईल अशी आमची समजूत आहे. तें कसेंहि असलें तरी येवढें निश्चित आहे कीं, लॉर्ड सिडनहॅम वगैरे जे लोक योजनेला विरोध करीत आहेत त्याचें कारण हा गैरसमज खात्रीनें नव्हे; ते जाणून-बुजून विरोध करीत आहेत; मॉंटेग्यु-चेल्म्सफर्ड योजना जर कोणाला ग्राह्य नसली तर ती त्यांनाच नाहीं. जी थोडीशी सत्ता हिंदी लोकांना द्यावी म्हणून योजनेंत शिफारस करण्यांत आली आहे तेवढीहि सत्ता आपल्या देशबांधवांच्या हातांतून कमी व्हावी अशी त्यांची यत्किंचितहि इच्छा नाहीं. नेमस्तांच्या परिषदेच्या ठरावात जी भाषा वापरली आहे ती भाषा राष्ट्रीय सभा व मॉस्लेमलीग यांनींहि आपल्या ठरावांत वापरली असती तरी त्यांनीं आपला विरोध यत्किंच-

ग्रह कमी केला नसता. लो. टिळक यांच्या प्रथमच्या अभिप्रायाचा उल्लेख करून लॉर्ड सिडेनहॅम यांनी पार्लमेंटच्या डोळ्यांत धूळ टाकण्याचा प्रयत्न केला आहे; परंतु एकंदरीनें विचार करतां हा प्रयत्न यशस्वी होण्याचा संभव नाहीं. मि. मॉंटेग्यु यांना अर्थात्च आपल्या योजनेबद्दल अभिमान वाटत असला पाहिजे. आणि ती पार्लमेंटनें स्वीकारावी अशी त्यांची इच्छा असली पाहिजे. तेव्हां लॉर्ड सिडेनहॅमसारख्यांनी केलेला गैरसमज ते घालविण्याचा प्रयत्न करणार नाहीत असें आपण का समजावें ? त्यांना वस्तुस्थिति समजत नाहीं असें नाहीं. आणि राष्ट्रीय सभा व मॉस्लेमलीग यांच्या ठरावाचा खरा अर्थ काय, हें न समजण्याइतके ते खात्रीनें अडाणी नाहीत; तेव्हां आपली योजना ब्रिटिश जनतेनें मान्य करावी, अशी जर त्यांची खरीखुरी इच्छा असेल तर ते लॉर्ड सिडेनहॅमसारख्यांच्या कावेबाज विधानाना भीक न घालता आपल्या योजनेला एकंदरीनें हिंदी जनतेचा पाठिंबाच आहे असें पार्लमेंटाला स्पष्टपणें व निर्भीडपणें सांगितल्यावांचून रहाणार नाहीत. सारांश, राष्ट्रीयसभा व मॉस्लेमलीग यांनी आपला अभिप्राय व्यक्त करितांना दुराचारी भाषा वापरली नाहीं, आणि स्वाभिमानी अशा लोकांना साजेल अशीच भाषा त्यांनी वापरली आहे, इतक्यानेंच ब्रिटिश पार्लमेंटचा गैरसमज होऊन योजना सरते शेवटीं भग्न होईल, आणि हिंदुस्थानची होणारी प्रगति थांबेल असें अनुमान काढण्याचें कारण नाहीं. नेमस्तांची परिषद्, राष्ट्रीय सभा, मॉस्लेमलीग या सर्व संस्थांच्या धोरणाचा अर्थ एकच आहे व तो हा कीं, आहे ही योजना जरी ग्राह्य आहे तरी पुरेशी नसल्याकारणानें तीत अवश्य ते फेरफार होणें जरूर आहे. ती पुरशी आहे, असा नेमस्तांचा अभिप्राय आहे, असें जर मानावें तर त्यांनी दुरुस्त्या सुचविण्याचें प्रयोजन कोणतें !

## उपसंहार.

मॉंटेग्यु–चेल्म्सफर्ड योजनेबद्दल राष्ट्रीय सभा आणि नेमस्तपरिषद् यांच्यामध्यें जर खरोखर फारसा मतभेद नाहीं आणि जो आहे तोहि जर गौण आहे तर पुढील धोरण कसें असावें ? दिल्ली येथें राष्ट्रीय सभा लौकरच भरण्यांत येणार आहे. त्या सभेला नेमस्तांनीं हजर राहणें अगदीं अवश्य आहे. हिंदुस्थानच्या सध्यांच्या परिस्थितींत राष्ट्रीय सभेंतील दोन्ही पक्षांनीं आपआपले मतभेद विकोपास नेऊन स्वतंत्र परिषदा भरविणें राष्ट्रीयदृष्ट्या अत्यंत विघातक झाल्याशिवाय राहणार नाहीं. जेथें जेथें जबाबदार राज्यपद्धति आहे तेथें तेथें पक्षभेद

असतात, हें आम्ही जाणून आहोंत. आणि जबाबदार राज्यपद्धतीचें कार्य व्यवस्थित रीतीनें चालण्याला पक्षभेद अवश्य असतील, निदान ते अपरिहार्य आहेत, याबद्दल शंका नाही. परंतु पक्षभेदाचीं जीं तत्त्वें स्वतंत्र राष्ट्रांना लागू आहेत, ती हिंदुस्थानाला सर्वतोपरी लागू करणें चुकीचें आहे. खुद्द इंग्लंडसारख्या देशांत सुद्धां पक्षभेदांचा अतिरेक होऊन राष्ट्रीय नुकसान होतें, अशी कित्येक विचारशील व्यक्तींची ओरड आहे. लोकसत्ताक राज्यपद्धति चालविण्याला पक्षभेद जरी अवश्य असले तरी त्यांचा अतिरेक होऊं देणें अपायकारक आहे, ही गोष्ट कित्येक ब्रिटिश मुत्सद्यांनीं गेल्या चार वर्षांत बोलून दाखविली आहे. परंतु हा मुद्दा जरी बाजूला ठेविला तरी एक गोष्ट अगदीं उघड आहे की, इंग्लंड, फ्रान्स, अमेरिका वगैरे देशांत प्रचलित असलेलीं पक्षभेदाचीं तत्त्वें हिंदुस्थानाला आजच लागू करण्याचा प्रयत्न करणें अत्यंत अपायकारक झाल्याशिवाय राहणार नाहीं. नेमस्तांची स्वतंत्र परिषद भरविण्याच्या योजनेचें समर्थन करणारे कित्येक गृहस्थ असें म्हणतात कीं, हिंदुस्थानांत जबाबदार राज्यपद्धतीचा लौकरच उपक्रम होणार आहे. आणि ज्या अर्थी तो झाल्यावर निरनिराळे पक्ष अस्तित्वांत आल्यावांचून राहणार नाहींत, त्याअर्थी नेमस्तांनीं आपला पक्ष संघटित करून स्वतंत्र परिषद कां भरवूं नये ? परंतु ही विचारसरणी चुकीची आहे. एक तर हिंदुस्थानांत जबाबदार राज्यपद्धतीला अद्याप सुरुवात झाली नाहीं. आणि मॉंटेग्यु–चेल्म्सफर्ड योजना जशीच्या तशी जरी अमलांत आली तरी जबाबदार राज्यपद्धति विशेष प्रमाणानें सुरू झाली असें म्हणतां येणार नाहीं. हिंदुस्थानांत जबाबदार राज्यपद्धति पूर्णपणें किंवा बऱ्याच प्रमाणानें स्थापन झाल्यावर जे पक्ष आपोआपच उत्पन्न होतील ते कृत्रिम रीतीनें आजच स्थापन करण्याचा प्रयत्न करणें म्हणजे आपण आपलें जाणूनबुजून नुकसान करून घेण्यासारखें आहे. निरनिराळे पक्ष स्थापन करणें कदाचित् पंधरा वर्षांनीं अवश्य व इष्ट असलें तरी त्यावरून ते आजच स्थापन करणें अवश्य व इष्ट आहे असें अनुमान निघत नाहीं. हिंदुस्थानाबद्दल एक गोष्ट प्रत्येकानें लक्षांत ठेविली पाहिजे. ती ही कीं, त्यांत निराळा असा आणखी एक पक्ष आहे. आणि त्या पक्षाचें अस्तित्व विसरून कधींहि चालावयाचें नाहीं. हिंदुस्थान आणि इंग्लंड, फ्रान्स, अमेरिका वगैरेसारखीं स्वतंत्र राष्ट्रें यांच्यामध्यें जो अत्यंत महत्त्वाचा भेद आहे तो हाच होय. त्यामुळें पक्ष स्थापन करतांना हा भेद लक्षांत घेणें अगदीं अवश्य

आहे. हा निराळा स्वतंत्र पक्ष नोकरशाहीचा आहे आणि तो इतका बलाढ्य आहे कीं त्याचा परिणाम इतर सर्व पक्षांवर कमीजास्त प्रमाणानें झाल्याशिवाय राहणार नाही. जे स्वतंत्र पक्ष असावेत म्हणून कित्येकांना वाटतें तेवढेच पक्ष जर हिंदुस्थानांत होऊं शकतील तर गोष्ट निराळी; परंतु अशी वस्तुस्थिति नाहीं. ब्रिटिश सरकार किंवा अँग्लो–इंडियन नोकरशाही नेमस्त पक्षाशीं आपलें तादात्म्य करील आणि त्याच्या मागण्या तरी देण्याला यत्किंचित्‌हि कांकूं करणार नाहीं, तर असे भिन्न भिन्न पक्ष झाले तरी हरकत नाही. परंतु असाही प्रकार नाहीं आणि तो होण्याचा संभवही नाहीं. इंग्लंड, फ्रान्स वगैरे देशांत निरनिराळे राजकीय पक्ष आहेत हें खरें; परंतु त्यांच्या हाती जशी सत्ता आहे तशी हिंदुस्थानांतील एका पक्षाच्या तरी हातांत आहे काय ? आज नेमस्त पक्षाला सरकार व ब्रिटिश अधिकारी गोंजारीत आहेत, परंतु त्यांच्या मागण्या सुद्धां कितपत ब्रिटिश सरकार मान्य करील हा प्रश्नच आहे. तेव्हां अशा स्थितींत जी तत्त्वें स्वतंत्र राष्ट्राला लागू पडतात तीं हिंदुस्थानाला लागू करण्याचा प्रयत्न करून किंवा एखाद्या बड्या अधिकाऱ्यानें स्वतंत्र परिषद् भरविण्याचा सल्ला दिला म्हणून तो मान्य करून आपल्या देशाचें नुकसान करण्याचा प्रयत्न करण्यांत यावा ह्यापेक्षां अधिक दुर्दैवाची दुसरी गोष्ट कोणती ? सबब नेमस्तांनीं पुन्हां स्वतंत्र परिषद् भरविण्याचा नाद न धरितां दिल्ली कॉंग्रेसला त्यांनीं हजर रहावें अशी त्यांना आमची प्रेमाची पण आग्रहपूर्वक सूचना आहे. नेमस्त पक्षाची संघटना व्यवस्थित रीतीनें झाल्यास त्याला हरकत नाहीं, किंबहुना आपापला पक्ष चांगला संघटित करून त्याचें वजन वाढविण्याचा प्रयत्न करणें हें त्या त्या पक्षाच्या पुढाऱ्यांचें आणि अनुयायांचें कर्तव्य आहे. ज्याप्रमाणें मिसेस बेझंट आणि लो. टिळक यांनीं आपला पक्ष संघटित करून त्याचा प्रसार करण्याचा प्रयत्न चालविला आहे, त्याप्रमाणें नेमस्ताग्रणींनीं नेमस्त पक्षाची संख्या वाढवून त्याचा त्यांनीं प्रसार करण्याचा प्रयत्न केला तर त्यांत वावगें नाहीं; परंतु आपला पक्ष संघटित करणें म्हणजे राष्ट्रीय सभेपासून अलिप्त राहून त्या पक्षाची स्वतंत्र परिषद् भरविणें असें होत नाहीं. आणि म्हणून स्वतंत्र परिषद् भरविण्याचा प्रयत्न नेमस्ताग्रणी करणार नाहींत आणि दिल्लीच्या राष्ट्रीय सभेला ते येतील अशी आम्हांस सबळ आशा आहे. नेमस्तांनीं दिल्लीच्या राष्ट्रीय सभेला जावें, अशी सर्व्हंट ऑफ इंडियाच्या संपादकानें सूचना केलेली पाहून आम्हांस फार आनंद होतो. वास्तविक पाहतां ना. शास्त्री यांना नेमस्तांची

स्वतंत्र परिषद् भरविण्याची कल्पना कशी रुचली याचेंच आम्हांस आश्चर्य वाटत होतें. हिंदुस्थानच्या पुढाऱ्यांनीं आपलें राजकीय धोरण वेळोवेळीं कसें ठेवावें हें ज्या कांहीं थोड्या पुढाऱ्यांना समजतें त्यांपैकीं ते आहेत आणि म्हणून नेमस्तांची स्वतंत्र परिषद् भरविण्याच्या चळवळीला त्यांनीं पाठिंबा दिला तेव्हां आम्हांस सखेदाश्चर्य वाटलें. ना. शास्त्री यांच्याबद्दल "भारतसेवका"च्या संपादकास किती आदर वाटतो हें सर्वांना माहीत आहे; तेव्हां या प्रश्नासंबंधानें ते आणि ना. शास्त्री यांच्यामध्यें झालेला हा महत्त्वाचा मतभेद पाहून त्यांस वाईट वाटतें; परंतु ना. शास्त्री यांचा कदाचित् नाइलाज झाला असेल हें आम्ही जाणून आहोंत. आणि म्हणून झाल्या गोष्टीबद्दल खंती न करितां पुढील मार्गाचा विचार केला पाहिजे. तेव्हां नेमस्तांनीं दिल्लीच्या राष्ट्रीय सभेला जावें अशी ना. शास्त्री यांच्या पत्रानें सूचना केली आहे ही मोठी समाधानाची गोष्ट असून ती सर्व नेमस्तांना पसंत पडेल अशी आम्हांस फार आशा आहे. आमचा स्वतःचा अभिप्राय असा आहे कीं, नेमस्तांनी दिल्लीच्या राष्ट्रीय सभेला येऊन त्यांनी आपल्या मताप्रमाणें सुधारणासंबंधाच्या ठरावांत दुरुस्त्या करून घेण्याचा प्रयत्न करावा. आमची खात्री आहे कीं, जहाल पक्षाचे पुढारी त्यांच्याशी फट-कून वागणार नाहींत आणि तडजोडीचा मार्ग निघून सर्वांना मान्य असाच ठराव सरतेशेवटीं पसार करण्यांत येईल. नवीन पार्लमेंटाची लौकरच निवड होऊन त्यापुढें सुधारणेचें बिल येणार आहे. फ्रान्चाईज कमिटी आणि फंक्शनस कमिटी यांचे रिपोर्ट बहुतकरून येत्या मार्चअखेर प्रसिद्ध होतील. तेव्हां निदान एप्रिल महिन्यांत तरी राष्ट्रीयसभेचें डेप्युटेशन विलायतेस गेलें पाहिजे. नेमस्तांचें डेप्युटेशन, राष्ट्रीय सभेचें डेप्युटेशन अशीं निरनिराळीं डेप्युटेशनें पाठविण्यांत कांहीं अर्थ नाहीं. आणि त्यामुळें फायदा न होतां उलट नुकसानच होईल. एका डेप्युटेशननें एक सांगावें आणि दुसऱ्यानें दुसरें सांगावें, हा प्रकार पाहून ब्रिटिश जनतेला आणि पार्लमेंटच्या सभासदांना काय वाटेल याचा राष्ट्रीय सभा आणि नेमस्तांची परिषद् यांच्या पुढाऱ्यांनीं विचार करावयास नको काय? तेव्हां दिल्लीच्या राष्ट्रीय सभेंत सर्वांना पसंत पडेल असा ठराव पास करून एकच डेप्यु-टेशन पाठविण्याचा ठराव करण्यांत आला पाहिजे. यासंबंधानें जहालांना एक सूचना आम्हांस करावीशी वाटते; तिचा ते योग्य विचार करतील अशी आम्हांस आशा आहे. राष्ट्रीय सभा, प्रांतिक कॉंग्रेस कमिटी वगैरे संस्थांतून नेमस्तांच्या पुढाऱ्यांची हाकालपट्टी करण्याचा जहालांनीं जो गेल्या एक दोन वर्षांत प्रयत्न

केला तो अत्यंत गेरशिस्त होता. पक्षभेद विकोपास जाऊं देऊं नयेत असें एकीकडे म्हणावयाचें आणि दुसरीकडे नेमस्त पक्षाच्या पुढाऱ्यांना ऑल-इंडिया कॉंग्रेस कमिटी, प्रांतिक कॉंग्रेस कमिट्या वगैरे संस्थांतून हांकून लावण्याचा प्रयत्न करावयाचा; या अदूरदर्शी आणि विसंगत पद्धतीला काय म्हणावें ! नेमस्तांनीं राष्ट्रीय सभेंतून आपलें अंग काढून घेतलें आणि आपली स्वतंत्र परिषद भरविली याला जहाल अंशतः तरी जबाबदार आहेत, असें आम्हांस म्हटल्यावांचून राहवत नाहीं. नेमस्तांचे विचार आणि त्यांच्या पद्धती जहालांना पूर्णपणें पसंत नसतील. परंतु नेमस्तांच्या पुढाऱ्यांनीं आज कित्येक वर्षे देशसेवा केली असून त्यांची राजकीय तारतम्यबुद्धि अगदीं टाकाऊ आहे असें कोणासहि म्हणतां यावयाचें नाहीं. तें कसेंहि असलें तरी त्यांच्यावांचून जहालांचें चालणार नाहीं. जहाल मवाळांना अवश्य आहेत. आणि मवाळ जहालांना अवश्य आहेत. अशा स्थितींत एकाद्या पक्षानें संप करून दुसऱ्या पक्षावर ऑल-इंडिया कॉंग्रेस कमिटी वगैरे महत्त्वाच्या संस्थांत बहिष्कार घालण्याचा प्रयत्न करणें हें अविचाराचें लक्षण नव्हे काय ? ऑल-इंडिया कॉंग्रेस कमिटीच्या सभासदांची निवड आली, घाला मवाळांना बहिष्कार. प्रांतिक कॉंग्रेस कमिटीची निवड आली, घाला मवाळांना बहिष्कार. अशा रीतीचें अनुदार व अविचारी धोरण जहालांनीं जर गेल्या एक दोन वर्षांत स्वीकारलें नसतें तर कदाचित् नेमस्तांची स्वतंत्र परिषद भरविण्याची चळवळच झाली नसती अशी आमची समजूत आहे. तेव्हां अशा एकपक्षीय पद्धतीचें अवलंबन जहाल पक्ष पुनः करणार नाहीं, आणि ऑल-इंडिया कॉंग्रेस कमिटी व प्राव्हिन्शिअल कॉंग्रेसचें कौन्सिल वगैरे संस्थांचे जे सभासद व अधिकारी निवडावयाचे त्यांत दोन्ही पक्षांचे लोक येतील असा प्रेमपूर्वक उदारबुद्धीनें प्रयत्न झाला पाहिजे. आणि असें उदार धोरण स्वीकारण्यांत आल्यास पक्षभेद विकोपाला न जातां कोणतीहि महत्त्वाची गोष्ट जुटीनें होईल असा आमचा पक्का भरंवसा आहे.

वरील विवेचनावरून पुढील धोरण कसें असावें हें आमच्या वाचकांच्या लक्षांत येईलच. राष्ट्रीय सभा ही एकाच पक्षाची होऊं न देतां तींत पूर्ववत् मवाळ, जहाल हे दोन्ही पक्ष असले पाहिजेत. कोणीहि एकमेकांवर बहिष्कार घालण्याचा प्रयत्न न करितां ऑल-इंडिया कॉंग्रेस कमिटी वगैरे संस्थांत दोन्ही पक्षांचे सभासद असले पाहिजेत. दिल्लीच्या राष्ट्रीय सभेला नेमस्तांनीं हजर

राहून त्यांनीं आपली मतें निर्भीडपणें व्यक्त करावीं. राष्ट्रीय सभेच्या पुढाऱ्यांनीं नेमस्त पुढाऱ्यांच्या मतांना योग्य मान देऊन, आणि तडजोड करून सर्वांना पसंत असा ठराव पास करून मॉन्टेग्यु-चेल्मसफर्ड सुधारणेच्या योजनेंत जे फेरफार सुचवावयाचे ते जुटीनें सुचविण्यांत यावेत. विलायतेस एकच डेप्युटेशन जावें; त्यांत दोन्ही पक्षांचे सभासद असावेत. अशा रीतीचें धोरण स्वीकारण्यांत आलें पाहिजे, तरच ब्रिटिश जनतेवर आणि पार्लमेंटावर आपलें थोडेंबहुत वजन पडून आपणाला इष्ट त्या सुधारणा मिळण्याचा संभव आहे, एरव्हीं नाहीं हें प्रत्येकानें लक्षांत ठेवावें.

# सुधारणेचा कायदा व पुढील धोरण.

गेल्या दिसेंबर महिन्यांत सुधारणेचा कायदा पास झाल्यापासून पुढील धोरण कसें असावें याविषयीं बरीच भवति न भवति चालू आहे. पंजाबप्रकरण आणि खिलाफत प्रश्न ह्या दोहोंमुळें ह्या प्रश्नास विशेष महत्त्व आलें आहे. पंजाबांत गेलें सालीं नोकरशाहीनें जे भयंकर अत्याचार केले, व तुर्की साम्राज्याबद्दल संयुक्त राष्ट्रांनीं जें धोरण स्वीकारलें आहे, त्यामुळें सुधारणेच्या कायद्याचें महत्त्व कित्येकांना कमी वाटून महात्मा गांधी आणि लाला लजपतराय ह्यांच्यासारखे पुढारी त्या कायद्यान्वयें अस्तित्वांत येणाऱ्या कायदेकौन्सिलांना बहिष्कार घालण्याचा उपदेश करीत आहेत. पंजाब व खिलाफत प्रश्न उपस्थित झाले नसते तर गांधी आणि लालाजी ह्यांनीं असें धोरण अर्थातच स्वीकारिलें नसतें. परंतु त्या दोन प्रकरणांमुळें हिंदुस्थानची राजकीय स्थिति बरीच घोटाळ्याची झाली असून सुधारणेच्या कायद्याबद्दल योग्य धोरण कोणतें होईल ह्याबद्दल लोक बुचकळ्यांत पडले आहेत. अशा स्थितींत ह्या प्रश्नाचा नीट विचार करणें इष्ट आहे व म्हणून सुधारणेच्या कायद्यानें आपली राजकीय प्रगति किती झाली आहे व होण्याचा संभव आहे, व त्याबद्दल कोणतें धोरण स्वीकारणें योग्य आहे, ह्याचा प्रस्तुत लेखांत विचार करण्याचा आमचा मानस आहे.

सुधारणेच्या कायद्याच्या महत्त्वाबद्दल जहाल आणि नेमस्त ह्या दोन पक्षांत बराच मतभेद आहे. जहालांच्या मतें ह्या नवीन सुधारणा अपुऱ्या, असमाधानकारक व निराशाजनक आहेत. अमृतसरच्या राष्ट्रीय सभेनें त्याबद्दल जो ठराव पास केला, त्यांत त्यांचें वर्णन वरप्रमाणें केलें आहे. नेमस्तांच्या मतें त्या भरींव असून त्यामुळें हिंदुस्थाननें स्वराज्याचा मार्ग बराच आक्रमिला आहे. कलकत्ता येथें नेमस्त पक्षाची जी परिषद् भरली होती तींत त्या सुधारणा भरीव असून त्यामुळें हिंदुस्थानची राजकीय प्रगति बरीच होईल असा ठराव पास झाला. सकृद्दर्शनीं हे ठराव परस्परविरोधी दिसतात. परंतु व्यापक दृष्टीनें विचार केल्यास त्यांची एकवाक्यता करणें अशक्य नाहीं. वास्तविक पाहतां हिंदुस्थान आज स्वराज्याला पूर्ण लायक आहे, आणि आतांच पूर्ण जबाबदार राज्यपद्धति स्थापन करण्यांत यावी, मँटेग्युसाहेब व लॉर्ड चेल्मसफर्ड ह्यांच्या

सुधारणेच्या योजनेनें आमचें समाधान होणार नाहीं, असा आरंभापासून हिंदी लोकांनीं आग्रह धरला असता तर त्यांत कांहीं वावगें झालें नसतें. पूर्ण जबाबदार राज्यपद्धति आरंभापासून स्थापन केल्यानें ब्रिटिश साम्राज्य लयास गेलें नसतें किंवा हिंदुस्थानांत अनावस्थाहि झाली नसती. तसेंच पार्लमेंटानें जी सुधारलेली योजना सरतेशेवटीं पास केली, तिजपेक्षां अधिक उदार योजना अमलांत आणण्याला यत्किंचितही हरकत नव्हती. हिंदुस्थानांतील भिन्न भिन्न पक्षांनी वरील योजनेंत ज्या दुरुस्त्या सुचविल्या त्या ह्याच धोरणानें सुचविल्या होत्या. हिंदुस्थानसरकारला जबाबदारीचें तत्त्व लागू करावें, मुंबईसारख्या पुढारलेल्या प्रांतांत पूर्ण प्रांतिक जबाबदार राज्यपद्धति स्थापन करावी, निदान कायदा, न्याय, पोलीस, आणि राजकीय संबंध हीं खातीं वगळून बाकीचीं सर्व खातीं संप्रदत्त करण्यांत यावीं, इत्यादि दुरुस्त्या सुचविण्यात आल्या होत्या. ह्या दुरुस्त्या पार्लमेंटानें मान्य केल्या नाहीत. सबब पूर्ण जबाबदार राज्यपद्धतीच्या दृष्टीनें आणि सुधारणेची योजना अधिक उदार करण्याकरितां ज्या दुरुस्त्या सुचविण्यांत आल्या होत्या त्यांच्या दृष्टीनें विचार केला असतां, सुधारणेचा कायदा अपुरा व असमाधानकारक आहे असें म्हटलें असतां चूक होणार नाही. राष्ट्रीय सभेनें त्याला निराशाजनक हें जें विशेषण लाविलें आहे, तेंही चुकीचें आहे असें म्हणतां येत नाही. हिंदुस्थान सरकारला जबाबदारीचें तत्त्व लागू करण्यांत येऊन त्या सरकारची थोडीं तरी खातीं संप्रदत्त करण्यांत येतील अशी सर्व पक्षांना आशा वाटत होती. हिंदुस्थाननें एकमुखानें जर कोणती मागणी केली होती, तर ती हीच की, प्रांतिक सरकारच्या खात्यांप्रमाणें हिंदुस्थानसरकारचीहि कांहीं खातीं संप्रदत्त करण्यांत यावीं. पार्लमेंटाच्या कमेटीपुढें आपापलीं मतें मांडण्याकरितां जी भिन्न डेप्युटेशनें विलायतेस गेलीं होतीं त्यांच्या सभासदांच्या मि. मॉंटेग्यूसाहेब यांच्याशीं ज्या मुलाखती झाल्या त्यांत त्यांनीं, त्या मागणीचा सहानुभूतिपूर्वक विचार करण्यांत येईल असें स्पष्ट आश्वासन दिलें होतें. राष्ट्रीय सभा, नेमस्तपक्ष, ऑल-इंडिया होमरूल लीग, नॅशनल होमरूल लीग आणि ऑल-इंडिया मॉस्लेम लीग ह्यांच्या तर्फे ज्यांच्या पार्लमेंटाच्या कमेटीपुढें साक्षी झाल्या त्या सर्वांनी ही मागणी केली होती. वस्तुस्थिति अशी असल्यामुळें, एकमुखी हिंदी मताला मान देऊन पार्लमेंट ती मागणी मान्य करील अशी सर्वांना फार आशा वाटत होती; परंतु ती निष्फळ झाली, आणि जबाबदारीचें तत्त्व हिंदुस्थानच्या राज्यकारभा-

राला लागू करण्यांत आलें नाहीं. सुधारणेच्या कायद्यानें हिंदुस्थानसरकारांत मुळींच सुधारणा घडून आली नाहीं असें आमचें म्हणणें नाहीं; परंतु एकंदरीनें विचार करितां त्यामुळें हिंदुस्थानसरकारच्या बेजबाबदार स्वरूपांत म्हणण्यासारखा फरक झालेला नाहीं, हें कोणासही नाकबूल करतां येणार नाहीं. तेव्हां अशा दृष्टीनें विचार केल्यास सुधारणेच्या कायद्यानें हिंदी लोकांची निराशा झाली असें म्हटलें असतां त्यांत काय चूक आहे ? तेव्हां पूर्ण जबाबदार राज्यपद्धतीच्या दृष्टीनें, आणि सुधारणेच्या बिलांत हिंदी लोकांनीं ज्या दुरुस्त्या सुचविल्या होत्या, त्यांच्या दृष्टीनें विचार करितां राष्ट्रीय सभेनें आपल्या ठरावांत त्या कायद्याचें जें वर्णन केलें आहे तें आक्षेपार्ह नाहीं. परंतु सुधारणेच्या कायद्याकडे ह्या दृष्टीनें जसें पाहतां येईल तसें दुसऱ्या दृष्टीनेंही पाहिलें पाहिजे. प्रचलित राज्यपद्धतीच्या दृष्टीनें पाहतां, सुधारणेचा कायदा टाकाऊ आहे असें कोणीही विचारी मनुष्य म्हणणार नाहीं. त्यामुळें स्वराज्याच्या मार्गांत हिंदुस्थानचें पाऊल पुढें पडलें आहे, यांत शंका नाहीं. तें पाऊल नेमस्तांनीं म्हटल्याप्रमाणें कदाचित् फारसें मोठें नसेल. तें पाऊल किती मोठें आहे हें आजच सांगतां येणें कठीण आहे. तें मोठें आहे किंवा लहान आहे हें सर्वस्वी आपल्या धोरणावर अवलंबून राहील. इतकें खास कीं तें पाऊल महत्त्वाचें असून त्यामुळें आपला पुढील मार्ग बराच सुकर झाल्याशिवाय राहणार नाहीं. तेव्हां नेमस्त परिषदेनें सुधारणेच्या कायद्याचें जें वर्णन केलें आहे, तेंही चुकीचें नसून त्या परिषदेचा ठराव आणि राष्ट्रीय सभेचा ठराव ह्यांची एकवाक्यता करतां येण्यासारखी आहे; आणि म्हणून ह्या दोन ठरावांपैकीं कोणता बरोबर आहे, नेमस्तांचा बरोबर आहे किंवा राष्ट्रीय सभेचा बरोबर आहे, ह्याबद्दल काथ्याकूट करून दोन्ही पक्षांनीं एकमेकांस शिव्या देण्यांत आपला कालक्षेप करावा यांत बिलकूल शहाणपणा नाहीं.

राष्ट्रीय सभेचा ठराव आणि नेमस्त परिषदेचा ठराव ह्यांची एकवाक्यता करण्याचा आमचा प्रयत्न कित्येकांस पसंत पडणार नाहीं. तथापि ज्यांना नेमस्त परिषदेचा ठराव मान्य नाहीं तेही कबूल करतील कीं सुधारणेचा कायदा जरी अपुरा, असमाधानकारक व निराशाजनक असला तरी तो महत्त्वाचा असून त्याचा हिंदुस्थानच्या भवितव्यतेवर बराच परिणाम झाल्यावांचून राहणार नाहीं. सुधारणेचा कायदा म्हणजे हिंदुस्थानच्या इतिहासांत एक अत्यंत महत्त्वाची

गोष्ट आहे. त्यांत राज्यपद्धतीचें जें तत्त्व ग्रथित केलें आहे तें लक्षांत घेतलें असतां हिंदुस्थानच्या प्राचीन व अर्वाचीन इतिहासांत तो अपूर्व आहे असें म्हटलें असतां अतिशयोक्ति होणार नाहीं. त्या कायद्यांत लोकसत्ताक राज्यपद्धतीचें तत्त्व ग्रथित केलें आहे. आणि एकंदरीनें विचार करितां हिंदुस्थानच्या आजपर्यंतच्या इतिहासांत हें तत्त्व अपूर्वच होय. सुधारणेचा कायदा इतका महत्त्वाचा असल्यामुळें त्याबद्दल चुकीचें धोरण स्वीकारलें गेल्यास हिंदुस्तानचें अत्यंत नुकसान होईल. म्हणून त्याबद्दल धोरण काय असावें, ह्याचा दूरदृष्टीनें विचार करणें अवश्य आहे.

सुधारणेच्या कायद्याबद्दल काय धोरण असावें ह्या प्रश्नाचा विचार करण्यापूर्वी त्या कायद्यामुळें कोणत्या महत्त्वाच्या सुधारणा घडून येतील हें सांगणें अवश्य आहे. मँटेग्यूसाहेब आणि लॉर्ड चेल्म्सफर्ड ह्यांनीं जी योजना प्रसिद्ध केली तिच्याहून सुधारणेचा कायदा फारसा भिन्न नाहीं. ज्या धर्तीवर सुधारणा केली पाहिजे असा मँटेग्यूसाहेब आणि लॉर्ड चेल्म्सफर्ड ह्यांचा अभिप्राय होता त्या धर्तीवरच कायदा केलेला आहे. मँटेग्यू–चेल्म्सफर्ड–रिपोर्टांत चार मूलतत्त्वें ग्रथित केलीं होतीं, तींच ह्या कायद्यांत ग्रथित केलीं आहेत. प्रथम प्रांतिक खातीं कोणतीं आणि राष्ट्रीय खातीं कोणतीं, हें ठरविलें आहे. नंतर प्रांतिक खात्यांपैकीं कांहीं संप्रदत्त करण्यांत आलीं आहेत. प्रांतिक सरकारासंबंधी सुधारणेच्या कायद्यानें जी सुधारणा होईल तिचें तत्त्व असें आहे कीं, संप्रदत्त खात्यांवर लोकसत्ता चालावी, आणि राखीव खात्यांची अंमलबजावणी हल्लींपेक्षां अधिक प्रमाणानें लोकमताला धरून व्हावी. संप्रदत्त खात्यांची अंमलबजावणी कायदेकौन्सिलच्या मताप्रमाणें मंत्र्यांनीं करावी. आणि राखीव खात्यांची अंमलबजावणी गव्हर्नर आणि त्याचें कार्यकारी कौन्सिल यांनीं लोकमताला अधिक मान देऊन करावी. ह्या तत्त्वावर प्रांतिक राज्यघटना उभारण्यांत आली आहे. संप्रदत्त खात्यांबद्दल लोकांचे हातीं बरीच सत्ता दिली आहे. राखीव खात्यांवर लोकमताचें वजन हल्लींपेक्षां अधिक पडेल अशी योजना करण्यांत आली आहे; परंतु यासंबंधाचे अंतिम निर्णय करण्याचा अधिकार गव्हर्नर आणि त्याचें कार्यकारी कौन्सिल ह्यांचे हातीं राखून ठेवला आहे. प्रांतिक सरकारची घटना एकमंडली केलेली आहे. हिंदुस्थान सरकाराची घटना द्विमंडली केलेली आहे; म्हणजे ज्याप्रमाणें ब्रिटिश पार्लमेंटाचें हौस ऑफ कॉमन्स आणि हौस ऑफ लॉर्ड्स् अशीं दोन

मंडळें आहेत, त्याप्रमाणेंच हिंदुस्थान सरकारच्या कायदेकानू करणाऱ्या संस्थेची ऊर्फ पार्लमेंटाची लेजिस्लेटिव्ह असेंब्ली आणि कौन्सिल ऑफ स्टेट अशीं दोन मंडळें केलीं आहेत. तिन्ही संस्थाचे जे सभासद मतदारांनीं निवडून द्यावयाचे ते प्रत्यक्ष निवडणुकीनें निवडून द्यावे असें ठरविण्यांत आलें आहे. मतदारीचा हक्क बराच विस्तृत केला असून तो मुंबई इलाख्यांत सामान्यतः सालीना ३२ रुपये सारा देणारे किंवा इनूकमटॅक्स देणारे किंवा सालिना ३६ रुपये घरभाडें देणारे त्या सर्वांना देण्यांत आला आहे, व त्यामुळें प्रत्येक जिल्ह्यांत हजारों लोकांना मतदारीचा हक्क मिळाला आहे. प्रत्येक जिल्ह्याला त्याच्या लोकसंख्येच्या मानानें एकपासून तीन प्रतिनिधी निवडण्याचा हक्क दिला असून त्यांची निवडणूक जिल्ह्यांतील मतदारांनी प्रत्यक्ष निवडणुकीच्या तत्त्वाप्रमाणें करावी, असें ठरविलें आहे. हल्लींचें अप्रत्यक्ष निवडणुकीचें तत्त्व टाकून देऊन प्रत्यक्ष निवडणुकीचें तत्त्व अमलांत आणावें आणि मतदारीचा हक्क बऱ्याच विस्तृत प्रमाणांत देण्यांत यावा अशा आपल्या मागण्या होत्या, त्या पार्लमेंटानें मान्य केल्या आहेत. मतदारीचा हक्क हा लोकसत्तेचा पाया आहे. प्रतिनिधिसत्ताक राज्यपद्धति मतदारीच्या हक्काच्या पायावरच उभारतां येईल. तीन वर्षांतून एकदां मत देण्यांत विशेष काय आहे, असें कित्येकांना वाटेल. सोलापुरास भरलेल्या प्रांतिक परिषदेचे अध्यक्ष रा. केळकर ह्यांनीं आपल्या भाषणांत मतदारीच्या हक्काबद्दल असेच उद्गार काढले आहेत. परंतु ज्यांना मतदारीच्या हक्काचें महत्त्व वाटत नाहीं, किंवा त्यांत कांहीं पावित्र्य दिसत नाहीं, त्यांनीं लोकसत्तेबद्दल इतका अट्टाहास कां करावा, हें आम्हांस समजत नाहीं. प्रातिनिधिक राज्यपद्धति ज्यांना पसंत नाहीं, सामान्य लोक आपला राज्यकारभार चालविण्याला निसर्गतःच पात्र नाहींत, व राज्यकारभार एकतंत्री किंवा फार झालें तर शिष्टतंत्री असावा, अशी ज्यांची समजूत आहे, त्यांना मतदारीचा हक्क म्हणजे केवळ फार्स आहे असें वाटावें व त्यांनी त्याची किंमत कमी करावी हें साहजिक आहे. परंतु लोकसत्तेवर ज्यांचा विश्वास आहे, राष्ट्रीय प्रगतीला जनसत्ता अगदीं अवश्य आहे असें ज्यांना वाटतें, सामान्य लोक आपला राज्यकारभार चालविण्यास लायक असे प्रतिनिधी निवडूं शकतील असा ज्यांचा दृढ विश्वास आहे, सारांश, जे खरे लोकसत्तावादी आहेत, त्यांनीं मतदारीच्या हक्काचें महत्त्व किंवा पावित्र्य कमी करण्याचा कधींहि प्रयत्न करितां कामा नये. खऱ्या लोकसत्तावाद्यास मतदारीचा हक्क अत्यंत पवित्र वाटला पाहिजे. तो हक्क म्हणजे नागरिक-

त्याचें लक्षण होय, हें त्यांनीं कधींही विसरतां कामा नये. सुधारणेच्या कायद्यानें प्रत्येक प्रांतांत लाखों लोकांना मतदारीचा हक्क मिळाला आहे ही गोष्ट आमच्या मतें अत्यंत महत्त्वाची आहे, आणि तिचें महत्त्व लोकांना जसजसें अधिकाधिक कळूं लागेल, तसतसें त्यांचें राजकीय ज्ञान वाढून त्यांच्यांत देशाभिमान, राष्ट्रीय कळकळ, राष्ट्रीय प्रश्नांचा विचार करण्याची बुद्धि ह्यांचा विकास होईल. मतदारीचा हक्क हा सकृद्दर्शनीं फारसा महत्त्वाचा दिसत नाहीं; परंतु सूक्ष्म विचार केल्यास त्याचे बरे वाईट परिणाम दूरवर होण्यासारखे आहेत. जर मतदारांनीं त्या हक्काचा दुरुपयोग केला आणि नालायक लोक निवडून दिले तर राष्ट्रीय भवितव्यतेवर दुष्परिणाम झाल्यावाचून राहणार नाहीं. कौन्सिलचे सभासदांना साहजिकपणेंच महत्त्व प्राप्त होतें आणि त्यांच्या विचारांचा आणि आचाराचा राष्ट्रावर बरा वाईट परिणाम होतो. एखाद्या मतदारानें आपल्या हक्काचा दुरुपयोग केला आणि त्यामुळें नालायक मनुष्य निवडून आला तर प्रसंगविशेषीं राष्ट्रीय जीवनास भलतीच दिशा लागण्याचा संभव आहे. उलट पक्षीं मतदार आपल्या हक्काचा सदुपयोग करून योग्य माणसांचीच निवड करतील तर राष्ट्रीय प्रगति दिवसेंदिवस सुकर होत जाईल. सारांश, मतदारीचा हक्क हा अत्यंत महत्त्वाचा आहे; आणि तो सुधारणेच्या कायद्यानें हिंदी लोकांना बऱ्याच प्रमाणानें मिळाला आहे, हें त्या कायद्याचें एक महत्त्वाचें लक्षण होय. कालांतरानें ह्या एकाच गोष्टीमुळें हिंदुस्थानच्या राजकीय, सामाजिक, औद्योगिक, नैतिक आणि धार्मिक स्थितींत क्रांति झाल्यावांचून राहणार नाहीं अशी आमची पक्की समजूत आहे.

कांहीं प्रांतिक खात्यांवर जनतेचा ताबा, बाकीचीं खातीं लोकमताप्रमाणें चालविण्याकरितां केलेली योजना, हजारों लोकांना दिलेला मतदारीचा हक्क, हीं सुधारणेच्या कायद्यामुळें प्रांतिक राज्यकारभारांत घडून येणाऱ्या सुधारणांचीं मुख्य लक्षणें होत. संप्रदत्त खातीं पुरेशीं नाहींत हें कोणीही कबूल करील. मुंबईसारख्या प्रांतांत तरी सर्व खातीं संप्रदत्त करण्यांत यावींत असा आमचा आरंभापासूनच आग्रह होता, हें आमच्या वाचकांना स्मरत असेलच. तेव्हां संप्रदत्त खातीं अपुरीं आहेत असें आम्हांला तरी वाटणें अगदीं साहजिक आहे. तथापि संप्रदत्त खात्यांत शिक्षण, स्थानिक स्वराज्य, उद्योगधंद्यांची वाढ, शेती आणि आरोग्य ह्या ज्या खात्यांचा समावेश केला आहे, तीं सर्व महत्त्वाचीं असून

त्यांचा लोकांच्या दैनिक जीवनक्रमाशी निकट संबंध आहे. खेड्यांत जे लाखो लोक रहात असून शेतीवर किंवा व्यापारावर आपला उदरनिर्वाह करीत आहेत त्यांचें हिताहित बऱ्याच अंशी वरील खात्यांवर अवलंबून आहे; आणि त्यांत ज्या सुधारणा व्हाव्या म्हणून आपण इच्छितों त्या जर आपणाला करितां आल्या, तर गोरगरीब लोकांचें पुष्कळच कल्याण होईल यांत शंका नाही. हिंदी लोकांची सद्यःस्थिति लक्षांत घेतली तर आपणांस असें आढळून येईल की, दारिद्र्य आणि अज्ञान ह्यामुळें त्यांची दुर्दशा झाली आहे. हिंदी लोकांचें दारिद्र्य, त्यांची खालावलेली सांपात्तिक स्थिति आणि त्यांचें अज्ञान म्हणजे हिंदु संस्कृतीवर मोठें कलंक होत. ह्या दारिद्र्याचें व अज्ञानाचें कारण परकीय सत्ता तर खरेंच; परंतु सामान्य जनतेविषयी वरिष्ठ वर्गांत आज कित्येक शतकें जो बेफिकीरपणा रूढ झाला आहे, त्यामुळें परकीय सत्तेमुळें ओढवलेले हे अनर्थ द्विगुणित झाले आहेत. सामान्य लोकांची जनावरासारखी जी स्थिति आज कित्येक वर्षे झाली आहे, त्यामुळें आमचें अंतःकरण द्रवत नाही. सामान्य लोकांची अशीच नेहमी स्थिति राहणार, ह्या खोट्या आणि घातक कल्पनेचा आमच्यावर अद्याप पूर्णपणे पगडा आहे. सामान्य लोक हे ब्रह्मदेवाच्या पायापासून निघाले आहेत, तेव्हां ते पायाखाली—अधिकाऱ्यांच्या किंवा वरिष्ठ वर्गांच्या--तुडविले गेले तर त्यांत विशेष नाही, ह्या आसुरी भावनेनें आमची मनें विकृत झाली आहेत. सामान्य लोक ते सामान्य लोकच. ते सदा सर्वदा अज्ञानांत व दारिद्र्यांतच राहणार, त्यांची उन्नति करणें व्यर्थ होय, ती करण्याची जबाबदारी आपणांवर येत नाही, त्यांनी वरिष्ठ वर्गाची निमुटपणें सेवा करावी, आणि फार तर आपला काळ भजनपूजनांत घालवावा त्यांनी वर डोकें काढूं नये व काढण्याची त्यांना इच्छा झाल्यास त्यांना हाणून पाडावें, त्यांनी कोणतीही महत्त्वाकांक्षा बाळगूं नये, ह्या घातक कल्पनांनी हिंदुस्थानचें जें नुकसान झालें आहे, तें अपरंपार होय. ह्या कल्पना सध्यांच्या मनूंत नाहींशा होत चालल्या आहेत, ह्यांतच हिंदुस्थानच्या उन्नतीची आशा आहे. हिंदुस्थानांतील यच्चयावत् स्त्रीपुरुषांस योग्य शिक्षण मिळाल्याशिवाय आणि हिंदी लोकांचें दारिद्र्य दूर होऊन प्रत्येक कुटुंबाची सांपत्तिक स्थिति चांगली झाल्याशिवाय हिंदुस्थानची सुस्थिति कधीही होणार नाही. शिक्षण, उद्योगधंद्यांची अभिवृद्धि वगैरे जीं खातीं संप्रदत्त करण्यांत आली आहेत, त्यांत आपणांला हव्या तशा सुधारणा करतां आल्या तर सामान्य लोकांची कितीतरी उन्नति होईल; परंतु ह्या सुधारणा करणें पैशाशिवाय शक्य नाही. प्रांतिक वसुलाच्या

वाटणीसंबधानें पार्लमेंटाच्या कमिटीनें ज्या सूचना केल्या आहेत त्या जर योग्य रीतीनें अमलांत आल्या तर वरील सुधारणा करण्याकरितां लागणारा पैसा मिळण्यास अडचण पडणार नाहीं. राखीव खात्यांकरितां अगदीं अवश्य तो खर्च करण्याला लोकप्रतिनिधी कधीही हरकत घेणार नाहींत. परंतु त्यांचा खर्च एक-सारखा वाढत गेला तर मात्र संप्रदत्त खात्यांची सुधारणा करणें अत्यंत कठीण होईल. संप्रदत्त खात्यांच्या वाढत्या खर्चाकरितां जरूर असल्यास अधिक कर बसविण्यास लोकप्रतिनिधी तयार होतील. सामान्य लोकांवरील करांचें ओझें न वाढवितां करांची वाढ करून वाढता खर्च भागविला पाहिजे, त्याशिवाय लोक-कल्याणाचीं अनेक कामें करतां येणार नाहीत, हें तत्त्व प्रत्येक हिंदी गृहस्थास मान्य आहे. आणि एकंदर खर्चाचें प्रमाण लक्षांत घेऊन कर वाढविल्याशिवाय लोकोपयोगी कामें करतां येणें शक्य नाही असें दिसून आल्यास आमचे लोक अधिक कराचें ओझें निमूटपणें सहन करतील. परंतु राखीव खात्यांकरितां वाटेल तसा खर्च करून संप्रदत्त खात्यांचा वाढता खर्च केवळ कर वाढून भागवावा, असें जर गव्हर्नर आणि त्याचें कार्यकारीमंडळ ह्यांनीं धोरण स्वीकारिलें तर तें लोकांना मुळीच पसंत पडणार नाहीं, आणि त्यासंबंधानें विरोध होऊन सुधार-णेची योजना यशस्वी होणार नाही. राखीव खातीं आणि संप्रदत्त खातीं यांमध्ये उत्पन्नाची योग्य विभागणी करणें अवश्य आहे. हें लक्षांत घेऊनच पार्लमेंटच्या कमिटीनें त्यासंबंधानें कांहीं नियम घालून दिले आहेत आणि ते नियम पाळले गेल्यास अधिक कर लादण्याचा प्रश्न समाधानकारक रीतीनें सुटेल. एक गोष्ट मात्र निश्चित आहे कीं, सुधारणेच्या कायद्यान्वयें गव्हर्नर आणि त्याचे कार्यकारी कौन्सिल ह्यांच्यावर मोठी जबाबदारी पडणार आहे. ती ही की, संप्रदत्त खात्यांत शक्य तितकी सुधारणा करण्याकरितां मंत्री आणि कायदेकौन्सिल ह्यांना त्यांनी पूर्ण मदत केली पाहिजे. उत्पन्नाचा बहुतेक भाग त्यांनीं आपणाकडे ओढून घेतला आणि त्यामुळें संप्रदत्त खात्यांची उपासमार झाली, तर लोकोपयोगी खातीं लोकांचे हवालीं करून त्यांत त्यांनीं वाटेल त्या सुधारणा कराव्या, हें जें सुधारणेच्या कायद्याचें एक मुख्य तत्त्व तें सिद्धीस जाणार नाहीं. कर वाढवि-ल्यावांचून अधिकाधिक सुधारणा करणें अशक्य आहे हें आम्ही जाणून आहों. परंतु ह्याचा अर्थ असा नाहीं की, राखीव खात्यांचा खर्च वाटेल तसा वाढवावा आणि संप्रदत्त खात्यांची सुधारणा मात्र कर वाढविल्याशिवाय करतां येऊं नये. संप्रदत्त आणि राखीव खातीं ह्यांमध्यें उत्पन्नाची विभागणी न्यायानें करून कर

ढविल्याशिवाय भागत नाहीं असें दिसून आलें तरच कर वाढविणें योग्य होईल. उत्पन्नाच्या योग्य विभागणीवरच सुधारणेच्या योजनेची यशःसिद्धि अवलंबून आहे. संप्रदत्त खात्यांच्या सुधारणेकरितां लागणारा पैसा मिळण्यास अडचण पडली नाहीं तर शिक्षणाचा प्रसार, शेतीची सुधारणा, उद्योगधंद्यांची वाढ वगैरे लोकोपयोगी कामें करून जनतेची शैक्षणिक आणि नैतिक सुधारणा करतां येईल. परंतु पैशाची व्यवस्था करतां आली नाहीं तर मात्र सुधारणा करतां येणार नाहीं, आणि त्यामुळें जनतेची अत्यंत निराशा होईल. राखींव खात्यांच्या खर्चांत आम्ही काटकसर करणार नाहीं, संप्रदत्त खात्यांच्या सुधारणेशीं आम्हांस कांहीं कर्तव्य नाहीं, वाटेल तर कर वाढवा आणि संप्रदत्त खात्यांची सुधारणा करा, असें गव्हर्नर आणि त्याचें कार्यकारी कौन्सिल ह्यांनी धोरण स्वीकारणें अगदीं चुकीचें होणार आहे. हा मुद्दा अत्यंत महत्त्वाचा आहे. त्यावरच सुधारणेच्या योजनेची सफलता अवलंबून राहणार आहे आणि म्हणूनच त्याचा नीट विचार करणें अवश्य आहे. सुधारणेची योजना हिंदी लोकांना टाकाऊ वाटत नाहीं त्याचें कारण हेंच कीं, शिक्षण वगैरे खात्यांत सुधारणा करण्याला तीत वाव आहे परंतु ती सर्वस्वी पैशावर अवलंबून असल्यानें राखींव खात्यांबद्दल आपमतलबी धोरण स्वीकारण्यांत आल्यास लोकांत असंतोष उत्पन्न होऊन सुधारणेची योजना यशस्वी करण्याकरितां सरकाराशीं सहकारिता करण्याला लोकांना हुरूप वाटणार नाहीं. संप्रदत्त खात्यांची उपासमार करून किंवा कर लादण्याची सर्वस्वी जबाबदारी मंत्र्यावर लादून सुधारणेची योजना कधींहि यशस्वी होणार नाहीं ही गोष्ट पार्लमेंटच्या कमिटीनें ओळखली आहे. आणि नोकरशाहीनेंहि ती पूर्णपणें लक्षांत ठेवली तरच सहकारितेनें काम चालून सुधारणेच्या योजनेचें कार्य सफल होईल.

प्रांतिक सरकारासंबंधानें ज्या सुधारणा करण्यांत आल्या आहेत त्यांचें स्थूल स्वरूप वर सांगितल्याप्रमाणें आहे. हिंदुस्थान सरकारासंबंधीं कोणत्या सुधारणा करण्यांत आल्या आहेत हें पाहूं जातां असें दिसतें कीं, हिंदुस्थानसरकारचें बेजबाबदारीचें स्वरूप कायम ठेवण्यांत आलें आहे, परंतु त्या सरकारचा कारभार, प्रांतिक राखींव खात्यांच्या कारभाराप्रमाणें लोकमताला अनुसरून अधिक चालावा म्हणून योजना केली आहे. लेजिस्लेटिव्ह असेंब्लीमध्यें लोकनियुक्त सभासदांचें मताधिक्य, कार्यकारी कौन्सिलांत तीन हिंदी सभासद असावेत ही योजना, बजेट लेजिस्लेटिव्ह असेंब्लीपुढें सादर करण्याची योजना, त्यांतलि कांहीं

बाबींवर तिला दिलेला ताबा, इत्यादि व्यवस्थेमुळें हिंदुस्थान सरकारच्या कारभारांत हिंदी लोकमताचें हल्लींपेक्षां अधिक वजन पडेल यांत शंका नाहीं. बजेटाबद्दलची कायद्यानें केलेली योजना कांहीं अंशीं प्रागतिक स्वरूपाची आहे, तर ती कांहीं अंशानें प्रतिगामी आहे. सध्यां स्थिति अशी आहे कीं, बजेटावर हिंदी लोकांची बिलकूल हुकमत चालत नाहीं. बजेट कायदेकौन्सिलपुढें सादर करण्यांत येतें. सभासद त्यावर वादविवाद करून आपल्या सूचना करितात. परंतु बजेट मंजूर किंवा नामंजूर करण्याचा कौन्सिलला अधिकार नाहीं. परंतु बजेट पास करण्याचा, नापास करण्याचा किंवा त्यांत फेरबदल करण्याचा कौन्सिलला जरी अधिकार नाहीं तरी बजेटांतील प्रत्येक बाबीबद्दल वादविवाद करून सूचना करण्याचा त्याला अधिकार आहे. सुधारणेच्या कायद्यानें ह्यासंबंधानें बराच फेरफार केला आहे. राजकीय बाबी, सैन्य, आरमार, मिलिटरी कामें, धर्मविषयक बाबी इत्यादि बाबीव्यतिरिक्त इतर बाबी मंजूर किंवा नामंजूर करण्याचा किंवा त्यांत फेरबदल करण्याचा लेजिस्लेटिव्ह असेंब्लीला अधिकार देण्यांत आला आहे. परंतु वरील बाबींबद्दल बजेटांत नमूद केलेला खर्च नामंजूर करण्याचा किंवा त्यांत फेरबदल करण्याचा तिला अधिकार दिला नाहीं. इतकेंच नव्हे तर त्या बाबीबद्दल तिनें वादविवादसुद्धां करूं नये असें ठरविलें आहे. बजेटाच्या कांहीं बाबी मंजूर किंवा नामंजूर करण्याचा अधिकार लेजिस्लेटिव्ह असेंब्लीला दिला आहे ही सुधारणा झाली. परंतु सैन्य, आरमार, वगैरे अत्यंत महत्त्वाच्या बाबीबद्दल तिनें वादविवादसुद्धां करितां कामा नये, ही योजना म्हणजे उलटी सुधारणा नव्हे काय? वरील बाबींची चर्चा करण्याचा आमचा हक्क हिरावून घेण्यांत आला आहे हा सुधारणेच्या कायद्यांतील एक मोठा दोष आहे. तो लवकर काढून टाकण्याकरितां प्रयत्न झाला पाहिजे. आरमार, सैन्य वगैरे बाबींची हिंदी लोकांनीं चर्चासुद्धां करतां कामा नये ह्या निर्बंधाचा असा परिणाम झाल्यावांचून राहणार नाहीं की त्या बाबीसंबंधानें पुनर्घटना करण्याकरितां सरकारचे जे प्रयत्न चालू आहेत त्याबद्दल हिंदी लोक उदासीन राहतील. वरील बाबीसंबंधानें आमचा सल्ला घेण्याचीहि जर सरकारची इच्छा नाही तर त्या बाबीसंबंधानें आम्हीं तरी सरकाराशीं सहकारिता कां करावी? महायुद्ध संपल्यानंतर सर्वत्र शांतता नांदेल आणि पुन्हां आमचें सरकारास युद्ध करण्याची पाळी येणार नाहीं अशी पुष्कळांना आशा वाटत होती. परंतु जर्मनी, टर्की, वगैरे राष्ट्रांबरोबर

केलेल्या भिन्न भिन्न तहनाम्यांच्या स्वरूपाकडे पाहतां, आणि लाखों तरुणांचे प्राण बळी पडून युद्धामुळें किती भयंकर अनर्थ ओढवितात ह्याचा अनुभव येऊनही युरोपांतील राष्ट्रांची साम्राज्य-तृष्णा आणि त्यांचा स्वार्थ कमी झाला नाही हें लक्षांत घेतां, पुढील पंचवीस पन्नास वर्षांत आणखी प्रचंड युद्ध सुरू झाल्यास नवल नाहीं, ही गोष्ट आमचें धूर्त ब्रिटिश सरकार पूर्णपणें जाणून आहे. आणि म्हणूनच आरमार आणि सैन्य ह्यांची पुनर्घटना कशी करावी ह्याविषयीं त्यांचा विचार चालू आहे. राष्ट्रसंरक्षणाच्या योजना अत्यंत महत्त्वाच्या असून त्यांची चर्चा करण्याचा आम्हांला पूर्ण हक्क आहे. आणि आजपर्यंत सरकारनें आमच्या मतास जरी फारसें महत्त्व दिलें नाहीं तरी तो हक्क आम्ही बजावीत आलों आहों. तो हक्क सुधारणेच्या कायद्यानें हिरावून घ्यावा, ही अत्यंत खेदाची गोष्ट आहे. ह्या कायद्यांत हा मोठाच दोष आहे यांत शंका नाहीं.

सुधारणेच्या कायद्यान्वयें हिंदुस्थानाला आर्थिक स्वातंत्र्य मिळालें आहे किंवा नाहीं ह्याबद्दल वाद चालू आहे. आमच्या मतें हा वाद निरर्थक आहे. कारण हिंदुस्थानला ग्रेटब्रिटन, आस्ट्रेलिया, न्यूझीलंड, कानडा, आणि दक्षिण आफ्रिका, ह्या देशांप्रमाणें आर्थिक स्वातंत्र्य असलें पाहिजे, अशी पार्लमेंटाच्या कमिटीनें आपले रिपोर्टांत स्पष्ट शिफारस केली आहे. ती शिफारस कायद्यांत ग्रथित केलेली नाही हें खरें; परंतु त्याचें कारण सदरहु कमिटीनें असें दिलें आहे की, ती कायद्यांत ग्रथित करण्याला कायदेशीर हरकत आहे. हिंदुस्थानच्या राज्यकारभारावर पार्लमेंटाची जी हुकमत आहे ती, किंवा हिंदुस्थानासंबंधी कोणताहि कायदा नामंजूर किंवा रद्द करण्याचा बादशहास जो अधिकार आहे, तो, मर्यादित केल्याशिवाय आर्थिक स्वातंत्र्याची योजना कायद्यांत ग्रथित करतां येत नाही असें कमिटीचें म्हणणें आहे. हें म्हणणें सयुक्तिक दिसत नाही. हिंदुस्थानाला आर्थिक स्वातंत्र्याचा अधिकार दिल्यानें पार्लमेंटाचा किंवा बादशहाचा वरील अधिकार मर्यादित कसा होईल हें आम्हांस समजत नाही. हिंदुस्थानाला आर्थिक स्वातंत्र्य असावें ह्याचा अर्थ असा नव्हे कीं त्यानें त्यासंबंधानें वाटेल तसे कायदेकानू केले तरी ते प्रसंगविशेषींसुद्धां पार्लमेंटानें किंवा बादशहानें नामंजूर करूं नयेत. त्याचा अर्थ एवढाच कीं, सामान्यतः हिंदुस्थानाला आर्थिक स्वातंत्र्य असावें आणि जोंपर्यंत त्याचा दुरुपयोग होऊन साम्राज्याला विघातक असा दुष्परिणाम झाला नाहीं तोंपर्यंत ब्रिटिश पार्लमेंटानें किंवा बादशहांनीं

आपला नकार म्हणण्याचा अधिकार गाजवून त्यांत हात घालूं नये. आर्थिक स्वातंत्र्य कायद्यानें न देण्याला पार्लमेंटांनी जीं कारणें दिली आहेत तीं लॉर्ड सिंह आणि लॉर्ड आयलिंग्टन ह्यांना पसंत नव्हतीं असें दिसतें. कारण पार्लमेंटाच्या कमिटीच्या सभेपुढें हिंदुस्थानचें आर्थिक स्वातंत्र्य कायद्यांत नमूद करावें अशी सूचना त्यांनीं आणली होती. ती सूचना नामंजूर झाली आणि कमिटीनें रिपोर्टांत दिलेलीं कारणें मान्य करून सुधारणेच्या कायद्यांत आर्थिक स्वातंत्र्याचा हक्क ग्रथित करण्याचें नाकारिलें. तथापि ह्यावरून स्पष्ट आहे कीं, तिनें हिंदुस्थानचा आर्थिक स्वातंत्र्याचा हक्क मान्य केला आहे. आणि तो कायद्यांत ग्रथित न करण्याचें कारण एवढेंच कीं, कमिटीच्या मतें तसें करण्याला कांहीं कायदेशीर स्वरूपाच्या अडचणी आहेत. तेव्हां सुधारणेच्या कायद्यानें आपणाला आर्थिक स्वातंत्र्याचा हक्क मिळाला आहे असेंच आपण मानलें पाहिजे. आणि तो हक्क बजावण्याला हिंदुस्थान सरकाराकडून यत्किंचितही हरकत आली तर तो बजाविण्याला आपण त्यास भाग पाडलें पाहिजे. आर्थिक स्वातंत्र्याचा हक्क हिंदुस्थानाला मिळाला आहे, असें धरूनच आपण आपलें धोरण ठरविलें पाहिजे.

राखीव प्रांतिक खात्यांचा आणि हिंदुस्थान सरकारच्या खात्यांचा कारभार लोकमताप्रमाणें अधिकाधिक चालावा अशी सुधारणेच्या कायद्याची योजना आहे. तिला नोकरशाही किती महत्त्व देते हें अनुभवांतीच कळणार आहे. सुधारणेच्या कायद्याचें हें तत्त्व अगदी योग्य आहे आणि त्याप्रमाणें नोकरशाहीनें आपलें वर्तन ठेवल्यास तक्रारीला जागा राहणार नाहीं. अर्थातच गव्हर्नर जनरल आणि गव्हर्नर व त्यांच्या कार्यकारी कौन्सिलांतील सभासद हे उदार विचारांचे असून लोकमताचें महत्त्व पूर्णपणें ओळखणारे असले पाहिजेत. त्याशिवाय राखीव खात्यांबद्दल आणि हिंदुस्थान सरकारच्या खात्यांबद्दल योग्य धोरण राहणार नाहीं. राऊंड टेबलचे संपादक मि. कर्टिस ह्यांचें जें पत्र महात्मा गांधी ह्यांनीं १९१६ सालीं लखनौच्या राष्ट्रीय सभेच्या वेळीं प्रसिद्ध केलें, आणि ज्याचा आम्ही भारतसेवकाच्या दुसऱ्या वर्षाच्या दुसऱ्या अंकांत सविस्तर विचार केला आहे, त्यांत मि. कर्टिस ह्यांनी म्हटलें आहे कीं "हिंदी राष्ट्रमत उत्तम प्रकारचें नाहीं असें जरी सरकारास वाटत असलें तरी तें पुष्कळ वेळां सरकार मान्य करतें. तें इतकें चुकीचें आहे कीं त्याप्रमाणें वागलें असतां संकट ओढवेल असें सरकारास वाटलें तरच सरकार त्या मताकडे लक्ष देत नाहीं." हिंदी

मताप्रमाणें वागलें असत. संकट ओढवेल असें सरकारला वाटलें तरच सरकार त्याकडे लक्ष देत नाही हें मि. कर्टिस ह्यांचें म्हणणें खरें नाही. पुष्कळ वेळ, हिंदी मताला मान दिला असता अनर्थ ओढवण्याची यत्किंचितहि भीति नसतां सरकारनें तें पायाखाली तुडविलें आहे. परंतु हा मुद्दा सध्यां अप्रस्तुत आहे. आम्हांस सांगावयाचें तें एवढेंच कीं, हिंदीमताप्रमाणें वागलें असतां अनर्थ ओढवेल तरच त्याकडे सरकारनें दुर्लक्ष करावें, एरव्हीं तें मान्य करून त्याप्रमाणें आपलें धोरण ठेवावें, हें जें तत्त्व मि. कर्टिस यांनी प्रतिपादिलें आहे तें लक्षांत ठेवूनच राखीव खात्यांची आणि हिंदुस्थान सरकारच्या खात्याची अंमलबजावणी झाली पाहिजे. नाहीं तर असंतोष माजून पूर्ण जबाबदार राज्यपद्धति ऊर्फ पूर्ण स्वराज्य लवकरच मिळविण्याकरितां चळवळ केल्यावांचून हिंदी लोकांना गत्यंतर राहणार नाही.

सुधारणेच्या कायद्यानें प्रांतिक सरकारांत आणि हिंदुस्थान सरकारांत ज्या सुधारणा करण्यांत आल्या आहेत त्याचें स्थूल रीतीनें आम्ही वर थोडक्यांत विवेचन केलें आहे. सुधारणेच्या कायद्याबद्दल आपलें धोरण ठरवितांना त्यांचा स्थूलमानानेंच विचार केला पाहिजे. अशा रीतीनें विचार केल्यास त्या कायद्याचीं मुख्य लक्षणें येणेंप्रमाणें सांगतां येतील:—

( १ ) सदरहू कायद्यानें हिंदुस्थानांत जबाबदार राज्यपद्धति स्थापन केली पाहिजे हें तत्त्व मान्य केलें आहे. ब्रिटिश साम्राज्यांत हिंदुस्थानचा दर्जा स्वयंशासित ब्रिटिश वसाहतीप्रमाणें असला पाहिजे, ही गोष्ट त्या कायद्यानें मान्य केली आहे. आजपर्यंत चालत आलेली बेजबाबदार राज्यपद्धति हिंदुस्थानच्या नूतन परिस्थितीला अनुरूप नाहीं असें ठरविण्यात येऊन जबाबदार राज्यपद्धतीचा ऊर्फ लोकसत्तेचा पाया घालण्यांत आला आहे. हिंदुस्थानचें अंतिम राजकीय ध्येय स्वराज्य ऊर्फ जबाबदार राज्यपद्धति आहे हें मान्य करून तें सिद्धीस नेण्याकरितां राज्यघटना वेळोवेळीं बदलली पाहिजे, असेंहि ठरविण्यांत आलें आहे. हिंदुस्थानचा राज्यकारभार चालविणारे अधिकारी आजपर्यंत हिंदी लोकांना जबाबदार नव्हते. हिंदी लोकांची त्यांचेवर हुकमत चालत नव्हती. पार्लमेंटाची हुकमत त्यांचेवर आजपर्यंत चालत आली आहे. परंतु पार्लमेंटाची हुकमत चालणें जवळ जवळ अशक्य असल्यामुळें हिंदुस्थानची राज्यपद्धति एकंदरीनें बेजबाबदार होती. पार्लमेंटची हुकमत कमी करून तिच्याऐवजी हिंदी लोकांची हुकमत चालावी हे मूलतत्त्व कायद्यानें मान्य केलें आहे.

( २ ) वरील तत्वान्वयें प्रत्यक्ष निवडणूक सुरू करण्यांत येऊन लाखों लोकांना मतदारीचा हक्क मिळाला आहे.

( ३ ) प्रांतिक खात्यांपैकीं स्थानिक स्वराज्य, शिक्षण, शेती, उद्योगधंद्यांची वाढ, आरोग्य वगैरे लोकहितसंवर्धक खाती जनतेच्या स्वाधीन करण्यांत आलीं असून त्यांचा कारभार मतदारांनीं निवडून दिलेल्या सभासदांपैकी जे मंत्री नेमिले जातील त्यांनी करावा असें ठरविण्यांत आलें आहे.

( ४ ) राखींव प्रांतिक खाती आणि हिंदुस्थान सरकारचीं खातीं ह्यांची अंमलबजावणी सामान्यतः लोकमताप्रमाणें व्हावी असें ठरविलें आहे.

( ५ ) प्रांतिक बजेटावर जनतेची हुकमत चालावी अशी योजना करण्यांत आली आहे.

( ६ ) हिंदुस्थानाला आर्थिक स्वातंत्र्य देण्यांत आलें आहे.

( ७ ) हिंदुस्थानचा राज्यकारभार सुधारणेच्या कायद्यांतील तत्त्वाप्रमाणें होत आहे किंवा नाहीं हें वेळोवेळीं पाहण्याकरितां पार्लमेंटची कमिटी नेमण्यांत आली आहे.

( ८ ) हिंदुस्थानच्या कार्यकारी कौन्सिलांत निदान तीन सभासद असावेत असें ठरविलें आहे.

( ९ ) प्रत्येक जिल्ह्याला कायदेकौन्सिलचे प्रतिनिधी निवडून देण्याचा हक्क दिलेला आहे.

( १० ) मागासलेल्या वर्गांत जी जागृति झालेली आहे तिला उत्तेजन मिळून त्यांचा दर्जा वाढत जाऊन ते वरिष्ठ वर्गांच्या दर्जासमान व्हावे म्हणून मुंबई आणि मद्रास ह्या इलाख्यांत त्यांना विशिष्ट प्रतिनिधित्वाचा हक्क देण्यांत आला आहे.

सुधारणेच्या कायद्याचीं मुख्य लक्षणें वर दिल्याप्रमाणें आहेत. आणि त्याबद्दल धोरण कसें असावें ह्या प्रश्नाचा विचार करतांना तींच मुख्यत्वें करून लक्षांत घेतलीं पाहिजेत.

ह्या प्रश्नाचा विचार तीन प्रकारांनीं करतां येईल. सुधारणेचा कायदा टाकाऊ आहे, म्हणून त्याअन्वयें स्थापन होणाऱ्या कायदेकौन्सिलांना बहिष्कार घालून सुधारणेची योजना त्याज्य मानावी हा एक प्रकार होय. दुसरा प्रकार असा

कीं, कौन्सिलांत शिरावें परंतु नेहमीं विरोधीपणाचें धोरण स्वीकारून सुधारणेची योजना हाणून पाडण्याचा प्रयत्न करावा, व ती निरर्थक ठरवावी. आणि तिसरा प्रकार असा कीं, जरी सुधारणेची योजना समाधानकारक नसली तरी जी कांहीं थोडीबहुत सत्ता मिळाली आहे तिचा योग्य उपयोग करून सरकारशीं मनोभावानें शक्य तितकी सहकारिता करावी आणि योजना यशस्वी करून अधिक सत्ता मिळविण्याचा प्रयत्न करावा. सुधारणेचा कायदा पास होण्यापूर्वी पहिला प्रकार ज्यांना पसंत होता असे फारच थोडे लोक होते. १९१८ सालीं जेव्हां स्टेट सेक्रेटरीसाहेब आणि व्हॉइसरॉयसाहेब ह्यांनीं आपली योजना प्रसिद्ध केली तेव्हां लोकमान्य टिळक आणि मिसेस् बेझन्ट यांनीं ती त्याज्य आहे आणि लोकांनीं तिचा स्वीकार करूं नये असा आपला अभिप्राय दिला होता. परंतु लोकांना तो अभिप्राय पसंत पडला नाहीं आणि लोकमान्य टिळक आणि मिसेस् बेझंट यांनाच आपलें मत बदलावें लागलें. सामान्यतः असें म्हणण्याला हरकत नाहीं कीं, पंजाब प्रकरण आणि खिलाफत प्रश्न हे उपस्थित होण्यापूर्वी, सुधारणेची योजना टाकाऊ समजून तिला बहिष्कार घालावा असें मत कोणत्याही जबाबदार पुढाऱ्यानें व्यक्त केलें नव्हतें. मद्रासच्या सत्यमूर्तीसारख्या कांहीं ज्वलज्जहाल तरुणांनीं सुधारणेच्या योजनेचा स्वीकार करूं नये असें मत व्यक्त केलें होतें हें खरें; परंतु त्याला कोणी फारसें महत्त्व दिलें नाहीं. खिलाफत प्रश्न आणि पंजाब प्रकरण ह्यांमुळेंच सुधारणेच्या योजनेला बहिष्कार घालावा काय हा प्रश्न उपस्थित झाला असून महात्मा गांधी आणि लाला लजपतराय ह्यांनीं बहिष्काराला अनुकूल मत दिलें आहे. कांहीं दिवसांपूर्वी लाला लजपतराय यांनीं भाषण केलें, त्यांत त्यांनीं सांगितलें कीं, जोंपर्यंत पंजाब प्रकरणाचा समाधानकारक निकाल लागला नाहीं तोंपर्यंत नवीन कौन्सिलांना बहिष्कार घालावा. महात्मा गांधी यांनीं संयुक्त राष्ट्रांनीं तुर्कीसाम्राज्याचे तुकडे तुकडे करूं नये म्हणून मुसलमानांनीं जी खिलाफत चळवळ सुरू केली आहे तिचा पुढारीपणा स्वीकारून, जर संयुक्त राष्ट्रें आणि टर्की ह्यांचेमधील तह अन्यायाचा झाला, तर हिंदुस्थानानें असहकारितेचें धोरण स्वीकारावें असें जाहीर केलें आहे. आणि ऑगस्ट एकपासून हें धोरण अमलांत आणण्याचें त्यांनीं ठरविलें आहे. लालाजी आणि गांधी ह्या दोघांच्या मतें नवीन कौन्सिलांना बहिष्कार घालावा, व कोणीही त्यांत शिरण्याचा प्रयत्न करूं नये. कौन्सिलांना बहिष्कार घालण्यासंबंधानें लालाजी आणि गांधी ह्यांचें जरी एकमत आहे तरी त्यांचें धोरण अगदीं एकच

आहे असें दिसत नाहीं. खिलाफत प्रश्नाबद्दल लालाजींनी आपला अभिप्राय अद्याप व्यक्त केला नाहीं. त्या प्रश्नाबद्दल त्यांचे विचार काय आहेत हें अद्याप समजत नाहीं. त्यांचें म्हणणें एवढेंच आहे कीं, जोंपर्यंत सरकार पंजाबांतील अत्याचार करणाऱ्यांना योग्य शासन करणार नाहीं तोंपर्यंत सुधारणेच्या कायद्याचा फायदा न घेतां कौन्सिलांना बहिष्कार घातला पाहिजे. गांधींचें मन असें आहे कीं, पंजाबांतील प्रकरण आणि खिलाफत प्रश्न इतके महत्त्वाचे आहेत कीं, त्यामुळें झालेला अन्याय दूर करण्याकरितां असहकारितेचें व्यापक धोरण स्वीकारिलें पाहिजे. कौन्सिलांना बहिष्कार घालणें हें त्या धोरणाचें केवळ एक अंग आहे. ह्याशिवाय तिसरा एक पक्ष आहे तो बाबू बिपिन चंद्रपाल ह्यांचा आहे. त्यांचें असें म्हणणें आहे कीं, सुधारणेच्या कायद्याबद्दल अमृतसरच्या राष्ट्रीय सभेनें जो ठराव केला त्याचाच अर्थ असा आहे कीं, असहकारितेचें धोरण स्वीकारून सुधारणेची योजना हाणून पाडावी.

सुधारणेच्या योजनेबद्दल अमृतसरच्या राष्ट्रीय सभेनें जो ठराव केला, त्याचे चार भाग आहेत पहिल्या भागांत हिंदुस्थान पूर्ण जबाबदार राज्यपद्धतीलीं लायक आहे हें जाहीर करण्यांत आलें आहे. दुसऱ्या भागांत सुधारणेचा कायदा अपुरा, असमाधानकारक आणि निराशाजनक आहे, असें सांगितलें आहे. तिसऱ्या भागांत स्वयंनिर्णयाच्या तत्त्वाप्रमाणें हिंदुस्थानांत पूर्ण राज्यपद्धति स्थापण्यांत यावी अशी पार्लमेंटाला विनंति केली आहे. आणि चवथ्या भागांत पूर्ण जबाबदार राज्यपद्धति स्थापन होई तोंपर्यंत हिंदी लोकांनीं सुधारणेच्या योजनेचा असा उपयोग करावा कीं, त्यामुळें पूर्ण जबाबदार राज्यपद्धति लवकरच स्थापण्यांत येईल. ह्या चवथ्या भागाचा बाबू बिपिनचंद्र पाल असा अर्थ करतात कीं, लोकांनीं असहकारितेचें धोरण स्वीकारून सुधारणेची योजना हाणून पाडावी आणि अशा रीतीनें पूर्ण जबाबदार राज्यपद्धति मिळवावी असें त्यांत सांगितलें आहे. पूर्ण जबाबदार राज्यपद्धति लवकर प्राप्त करून घेण्याचा मार्ग म्हटला म्हणजे सुधारणेची योजना हाणून पाडणें हा होय. आणि ती हाणून पाडण्याकरितां ती त्याज्य समजून कौन्सिलांना बहिष्कार घालावा. अमृतसरच्या राष्ट्रीय सभेच्या ठरावाचा पाल बाबूंनें असा अर्थ केला आहे. उलटपक्षीं कित्येकांनीं असा अर्थ केला आहे कीं, सुधारणेच्या योजनेचा शक्य तितका उपयोग करून पूर्ण जबाबदार राज्यपद्धति लवकर मिळवावी असें त्यांत सांगितलें आहे. पुढाऱ्या पुढाऱ्यांमध्येंच झालेला हा मतभेद पाहून राष्ट्रीय सभेच्या

ठरावाचा खरा अर्थ कोणता त्याचा निर्णय ऑल इंडिया कॉंग्रेस कमिटीनें करावयास पाहिजे होता, परंतु तिनें तो केला नाहीं ही अत्यंत दुःखाची गोष्ट आहे. जून महिन्यांत ऑल इंडिया कॉंग्रेस कमिटीची सभा भरली होती. तींत हा प्रश्न निघाला होता, परंतु तिनें तो फेटाळून लावून असें ठरविलें कीं, राष्ट्रीय सभेचा ठराव स्पष्ट आहे आणि त्याचा अर्थ करण्याचें कारण नाहीं !

कौन्सिलांना बहिष्कार घालून सुधारणेची योजना हाणून पाडावी, हें एक धोरण झालें. दुसरें धोरण असें आहे कीं, कौन्सिलांत शिरावें परंतु सरकारशीं नेहमीं विरोध करून सुधारणेची योजना हाणून पाडावी. दोन्ही धोरणांचा उद्देश एकच आहे, आणि तो, योजना हाणून पाडणें हा होय. योजना हाणून पाडल्यानें हिंदुस्थानाची प्रगति होईल आणि पूर्ण जबाबदार राज्यपद्धति लवकरच मिळेल असें ह्या दोन्ही धोरणांच्या पुरस्कर्त्यांचें मत आहे. महात्मा गांधी आणि लालाजी यांचें मात्र असें मत नाहीं. आम्ही वर सांगितलेंच आहे कीं, पंजाब प्रकरण आणि खिलाफत प्रश्न उपस्थित झाले नसते तर कौन्सिलांना बहिष्कार घालण्याचें धोरण त्यांनीं स्वीकारलें नसतें. पालबाबु ह्यांच्या आणि त्यांच्या मतांत फरक आहे. कौन्सिलांत जाऊन सरकारांशीं सदासर्वदा विरोध करून योजना हाणून पाडूं इच्छिणाऱ्यांचें धोरण आणि त्यांचें धोरण ह्या दोहोंतहि फरक आहे. पालबाबूंचा पक्ष आणि कौन्सिलांत शिरून योजना हाणून पाडूं इच्छिणाऱ्यांचा पक्ष ह्या दोहोंच्या मतें पूर्ण जबाबदार राज्यपद्धति लवकर मिळण्याचें साधन सरकाराशीं सहकारिता करून सुधारणेच्या योजनेचा योग्य उपयोग करणें हें नसून ती येन केन प्रकारेण हाणून पाडणें हें होय. लालाजी आणि गांधी यांच्या मतें योजनाच हाणून पाडण्यासारखी आहे, व ती हाणून पाडल्यानेंच पूर्ण जबाबदार राज्यपद्धति लवकर मिळेल असें नसून पंजाब प्रकरण आणि खिलाफत प्रश्न ह्यांसंबंधानें झालेला अन्याय दूर करण्याचें तें एक तात्पुरतें साधन आहे. त्या प्रकरणाचा आणि त्या प्रश्नाचा समाधानकारक निकाल लागला म्हणजे सरकाराशीं सहकारिता करून सुधारणेच्या योजनेचा योग्य उपयोग करणें रास्त होईल, किंबहुना कर्तव्य होईल, असा त्या दोघांच्या धोरणाचा इत्यर्थ आहे. हा जो आम्हीं फरक दाखविला आहे त्यावरून एक गोष्ट निष्पन्न होते ती ही कीं, सुधारणेच्या योजनेला बहिष्कार घालावा ह्या धोरणाचा विचार दोन दृष्टींनीं केला पाहिजे. पहिली दृष्टि अशी कीं, खिलाफत

प्रश्न आणि पंजाब प्रकरण ह्यांमुळें बहिष्काराचें धोरण योग्य होईल काय ? व दुसरी दृष्टि अशी कीं, खिलाफत प्रश्न आणि पंजाब प्रकरण हे विचारांत न घेतले तरी पूर्ण जबाबदार राज्यपद्धति प्राप्त करून घेण्याच्या दृष्टीनें योजनेला बहिष्कार घालणें योग्य होईल काय ? ह्या दोन्ही दृष्टींनी आतां आपण बहिष्काराच्या धोरणाचा विचार करूं.

पूर्ण जबाबदार राज्यपद्धति मिळविण्याकरितां सुधारणेच्या योजनेला बहिष्कार घालण्याचेंच धोरण योग्य आहे, ह्या मुद्याचा विशेष विचार करण्याचें कारण नाहीं. पालबाबूंचें हें मत फारच थोड्या लोकांना पसंत आहे. राष्ट्रीय सभेचा अभिप्राय त्याच्याविरुद्ध आहे. राष्ट्रीय सभेच्या ठरावाचा खरा अर्थ सुधारणेच्या योजनेला बहिष्कार घालावा हा नसून तिचा उपयोग करून घ्यावा हा आहे. खिलाफत प्रश्न आणि पंजाब प्रकरण ह्यांमुळें जी नवीन परिस्थिति उत्पन्न झाली आहे ती लक्षांत घेतां असहकारितेचें धोरण स्वीकारणें योग्य होईल काय, ह्या प्रश्नाचा विचार करण्याकरितां जादा राष्ट्रीय सभा भरविण्याचें ठरविलें आहे. सुधारणेच्या योजनेला बहिष्कार घालावा असा अमृतसरच्या राष्ट्रीय सभेचा ठराव असता तर तिला बहिष्कार घालावा किंवा नाहीं ह्या प्रश्नाचा विचार करण्याकरितां मुद्दाम स्पेशल राष्ट्रीय सभा भरविण्याचें कारणच नाहीं. सारांश, पंजाब प्रकरण आणि खिलापत प्रश्न हे जर लक्षांत घेतले नाहींत, तर सुधारणेच्या योजनेचा उपयोग करावा असेंच हिंदुस्थानांतील बहुमत आहे. परंतु आपण क्षणभर राष्ट्रीय सभेच्या ठरावाकडे किंवा बहुमताकडे न पाहतां ह्या प्रश्नाचा विचार करूं. हिंदुस्थानच्या स्थितीचा एकंदरीनें विचार करितां सुधारणेच्या योजनेला बहिष्कार घातल्यानें अत्यंत नुकसान होणार आहे. हिंदुस्थानची जी शोचनीय स्थिति झाली आहे, किंबहुना, पंजाबांत जे अत्याचार झाले, त्यांचें मूळ कारण आपल्या हातांत सत्ता नाहीं हें होय. आज जर आपल्या हातांत पूर्ण सत्ता असती तर निःशस्त्र, गरीब, हजारों लोकांची आहुति घेण्याचें धैर्य जनरल डायर ह्यास झालें नसतें, किंवा कर्नल ओब्रायन, मि. बास्वर्थ स्मिथ ह्यांनीं जे अत्याचार करून प्रशियन लोकांवर ताण केली ते त्यांचे हातून कधींही झाले नसते. हिंदुस्थानच्या रोगाला एकच औषध आहे. तें म्हटलें म्हणजे पूर्ण स्वराज्य होय. सुधारणेच्या योजनेला बहिष्कार घातल्यानें पूर्ण स्वराज्य ताबडतोब किंवा लवकर मिळेल, तर गोष्ट निराळी. सुधारणेच्या

योजनेचा उपयोग करून जितक्या अवधीत पूर्ण स्वराज्य मिळण्याचा संभव आहे तिजपेक्षां कमी अवधीत योजनेला बहिष्कार घालून पूर्ण स्वराज्य प्राप्त होईल, तरच बहिष्काराचें धोरण योग्य होईल. परंतु तसा परिणाम होईल अशी काय खात्री आहे ! योजनेला बहिष्कार घातला तर इंग्रज आणि हिंदी लोक ह्यांच्यामध्यें वैमनस्य वाढेल. आपल्या राजकीय चळवळीला मजूरपक्षाची जी सहानुभूति मिळाली आहे ती नष्ट होईल. सनदशीर चळवळीला वाव न मिळाल्यानें कित्येक लोक बेहोष होऊन कदाचित् अत्याचार करितील. आणि कालांतरानें अशी स्थिति प्राप्त होईल की, इंग्रज आणि हिंदी लोक परस्परांना शत्रु समजून त्यांचा परस्परसंबंधाचा प्रश्न मनगटाच्या जोरावरच सोडविण्याची पाळी येईल. परंतु तो प्रश्न अशा रीतीनें सोडविण्याचें हिंदुस्थानाला आज सामर्थ्य नाहीं व तें लवकर येण्याचा संभव नाही हें कोणीहि विसरतां कामा नये. शिवाय मनगटाच्या जोरावर जर निकाल करावयाचा तर प्राणआहुती किती द्यावी लागेल व अन्य रीतीनें हिंदुस्थानचें किती नुकसान होईल, ह्याचा विचार करावयास नको काय ? इंग्रज आणि हिंदी ह्यांच्यामध्यें वैमनस्य वाढून वरील प्रश्नाचा निकाल सलोख्यानें लागत नाहीं, अशी स्थिति झाली असतां, हिंदुस्थानची सामाजिक वगैरे बाबतींत जी प्रगति होत चालली आहे आणि त्याची संघशक्ति वाढत चालली आहे, ती प्रगति आणि संघशक्ति वाढत जाणार नाहीं. साराश, बहिष्काराचें धोरण धोक्याचें आहे. त्यामुळें अनेक अनर्थ उत्पन्न होण्याचा संभव आहे. याउप्परही त्या धोरणानें स्वराज्यप्राप्ति लवकर होइल तर गोष्ट निराळी. परंतु इतके अनर्थ सोसून आणि देश धोक्यांत घालून जर आपला हेतु सिद्धीस जाणार नाहीं तर त्यांत काय अर्थ आहे ! सुधारणेच्या योजनेचा उपयोग केल्यानेंच स्वराज्यप्राप्ति अधिक लवकर होईल असें आम्हांस वाटतें. ह्यासंबंधानें दुसऱ्या एका मुद्याचा विचार करणें अवश्य आहे. आपण आज पूर्ण स्वराज्याला लायक आहों ही गोष्ट खरी, परंतु लोकसत्ताक राज्यपद्धति ही आपणाला नवीन असून तिचा आपणाला प्रत्यक्ष अनुभव नाहीं. हिंदुस्थानात हिंदी लोकांची एकतंत्री सत्ता स्थापन करण्याचा हल्लीचा प्रश्न असता तर गोष्ट निराळी होती. अशी राज्यपद्धति स्थापून राज्यकारभार चालविण्याला आपण आज पूर्ण समर्थ आहों. एकतंत्री राज्यपद्धतीचा आपणाला आज कित्येक शतकें अनुभव आहे. अशा पद्धतीच्या तत्त्वाबरहुकूम

राज्यकारभार चालविण्याला लायक अशा शेंकडों व्यक्ती हिंदुस्थानांत सांपडतील. परंतु एकतंत्री राज्यपद्धतीनें हिंदुस्थानचें अतोनात अकल्याण झालें आहे, आणि तिची पुन्हां स्थापना करण्याला कोणीही तयार होणार नाहीं. हिंदुस्थानला पुन्हां जर उच्च पद मिळावयाचें असेल तर तें एकतंत्री राज्यपद्धतीनें कधींहि मिळणार नाहीं. जरी विलंब लागला तरी हरकत नाहीं, परंतु लोकसत्ताक राज्यपद्धति प्राप्त करून घेण्यावरच हिंदुस्थानचें भावी वैभव अवलंबून आहे. कल्पना करा कीं, परमेश्वर अवतार धारण करून या भरतभूमीवर अवतीर्ण झाला आणि, तावडतोब एकतंत्री राज्यपद्धति आणि दहा वर्षांनी लोकसत्ताक राज्यपद्धति, या दोन वरांपैकीं कोणता तरी एक वर मागून घ्या, असें त्यांनीं आपणांस सांगितलें, तर दुसरा वर मागून घेण्यानेंच आपलें परमकल्याण होईल. पहिल्या वराची फलप्राप्ति जरी तावडतोब होण्यासारखी असली तरी त्यामुळें आपलें खरें आणि कायमचें कल्याण होणार नाहीं. एकसत्ताक राज्यपद्धति आपणाला आज मिळत असली तरी ती नको. लोकसत्ताक राज्यपद्धति मिळण्याला कांहीं विलंब लागला तरी हरकत नाहीं, परंतु तीच आम्ही मिळविणार. परंतु लोकसत्तात्मक राज्यपद्धति आपल्या देशांत रूढ व्हावयाची असल्यामुळें आणि तिच्या ज्या जबाबदाऱ्या असतात त्यांची जाणीव अद्याप फारच थोड्या लोकांना असल्यामुळें आजच एकदम पूर्ण जबाबदार राज्यपद्धति मिळाल्यानें राष्ट्रीय जबाबदारीचें ओझें असह्य होण्याचा संभव आहे. लोकसत्ताक राज्यपद्धतीप्रमाणें राज्यकारभार चालविणें सोपें नाहीं. आणि त्या पद्धतीचा ज्या राष्ट्राला अनुभव नाहीं, त्याला तर त्या पद्धतीप्रमाणें राज्यकारभार चालविणें फारच कठीण आहे. तेव्हां ह्यासंबंधानें एकदम सर्व जबाबदारी आपले शिरावर घेण्याचा अट्टाहास धरणें असमंजसपणाचें होईल. सारांश, सुधारणेच्या योजनेला बहिष्कार घातल्यानें पूर्ण जबाबदार राज्यपद्धति लवकर मिळेल ही समजूत चुकीची असून राष्ट्रीय प्रगतीला अपायकारक आहे. योजनेचा उपयोग करून पूर्ण जबाबदार राज्यपद्धति मिळण्याला जितका वेळ लागेल त्यापेक्षां अधिक तिला बहिष्कार घातल्यानें लागेल, असें आम्हांस वाटतें. पालबाबूनें सुचविलेलें बहिष्काराचें धोरण राष्ट्रविघातक आहे, आणि त्याचा अवलंब केल्यानें हिंदुस्थानची प्रगति न होतां, उलट पिछेहाट होईल. योजनेला बहिष्कार घालण्याचा मार्ग म्हणजे राज्यक्रांतीचा मार्ग आहे, आणि हिंदुस्थाननें तो स्वीकारला, तर घोटाळा होऊन त्याचें पर्यवसान काय होईल हें सांगतां येणार नाहीं.

आतां पंजाब प्रकरण आणि खिलाफत प्रश्न ह्यांमुळें बहिष्काराचें धोरण योग्य होईल काय ह्याचा विचार करूं. पंजाब प्रकरणाबद्दल ब्रिटिश मंत्रिमंडळानें आपला निर्णय जाहीर केला असून त्याबद्दल हौस ऑफ कॉमन्स आणि होस ऑफ लॉर्डस ह्यांत नुकताच वादविवाद झाला आहे. खिलाफत प्रश्नहि आपल्या मुसलमानबंधूंच्या मताप्रमाणें समाधानकारक रीतीनें सोडविण्यांत येईल असें दिसत नाहीं. टर्कीला ज्या तहाच्या अटी संयुक्त राष्ट्रांनीं सुचविल्या आहेत त्यांत फेरबदल करावा अशी टर्कीच्या सरकारनें विनंति केली होती, ती अमान्य करण्यांत आली असून, त्या सरकारला तहनाम्यावर लवकरच सही करावी लागेल असें स्पष्ट दिसतें. जनरल डायरसंबंधानें ब्रिटिश सरकारनें केलेल्या ठरावाबद्दल तें स्तुतीस पात्र आहे. अमृतसर येथें जनरल डायरने जी कत्तल केली त्याबद्दल त्यास जर शासन केलें नसतें तर ब्रिटिश सरकारचा पक्षपातीपणा आणि अन्यायबुद्धि अत्यंत लांछनास्पद झाली असती. तथापि पंजाब प्रकरणाबद्दल ब्रिटिश मंत्रिमंडळानें जो निकाल दिला आहे तो अगदीं हिंदी लोकमताप्रमाणें नसल्यामुळें तो आपणाला असमाधानकारक वाटावा हें साहाजिक आहे. जनरल डायर व इतर अधिकारी यांना सरकारनें जें शासन केलें आहे त्यापेक्षां अधिक शासन त्यांनी करावयास पाहिजे होतें. तथापि झालेला निकाल सर्वतोपरी निराशाजनक आहे असें म्हणतां येणार नाहीं. तेव्हां प्रश्न असा आहे कीं ब्रिटिश सरकारनें केलेला निकाल इतका अयोग्य व अन्याय्य आहे काय की त्यामुळें बहिष्काराचें धोरण रास्त होइल. आमच्या मतें पंजाब प्रकरणासंबंधानें जो अन्याय झाला आहे तो दूर करण्याला योग्य उपाय सुधारणेच्या योजनेला बहिष्कार घालणें हा नाहीं. परतंत्र राष्ट्रांना असले अन्याय वेळोवेळी सोसावे लागतात. ते दूर करण्याचा किंवा ते पुन्हा होऊं न देण्याचा एकच मार्ग आहे. तो म्हटला ह्मणजे पूर्ण स्वराज्य मिळविणें हा होय. पंजाब प्रकरणाचे बाबतींत झालेल्या अन्यायाचा विचार करतांना प्रधानमंडळाच्या आणि पार्लमेंटच्या निकालाकडेच लक्ष दिलें पाहिजे. जनरल डायरचें समर्थन करणारे आणि त्यांच्याकरितां फंड उभारून त्यांचा गौरव करणारे जे अँग्लो—इंडियन आणि इंग्रज गृहस्थ आहेत त्यांच्या मदोन्मत्त बरळण्याकडे लक्ष देण्याचें कारण नाहीं. जनरल डायरनें केलेल्या अमानुष कत्तलीचें कांहीं इंग्रज स्त्रीपुरुषांनीं समर्थन करावें ही अत्यंत किळसवाणी गोष्ट आहे; आणि तिजवरून स्पष्ट दिसतें कीं महायुद्धाचा ज्यांचे मनावर

सुपरिणाम न होतां उलट दुष्परिणाम झाला आहे असे साम्राज्यवादी ब्रिटिश लोक अद्याप पुष्कळ आहेत. लार्डांच्या सभेनें प्रधानमंडळानें केलेल्या अर्धवट न्यायाचाही निषेध करावा, ह्यावरून इंग्लंडांतील अमीरउमरावांची मनोघटना किती अयोग्य आहे हेंहि चांगलें दिसून येतें. इंग्रज लोक आणि त्यांचें राज्य ह्यांचेबद्दल विचार करतांना इंग्लंडांतील वरिष्ठ वर्गाचें हें अमानुष धोरण आपण विसरतां कामा नये. परंतु त्याबरोबर आपण हेंहि लक्षांत ठेविलें पाहिजे की हौस ऑफ कॉमन्सनें पूर्ण जरी नाहीं तरी बराच न्याय केला आहे. आणि मि. मॉंटेग्यू, मि. चार्चिल, मि. ॲस्क्विथ, लॉर्ड कर्झन, वगैरे मुत्सद्यांच्या विचारांत इंग्रज राष्ट्राचें खरें मत प्रतिबिंबित झालें असेल तर झालेला निकाल एकंदरीनें असमाधानकारक नाहीं असेंच म्हटलें पाहिजे. प्रधान मंडळानें जो निकाल दिला तो अपुरा आहे; त्यानें जनरल डायर वगैरे अधिकाऱ्यांनीं ब्रिटिश साम्राज्याला लावलेला कलंक धुऊन जाणार नाहीं; सदरहु अधिकाऱ्यांना अधिक कडक शासन केलें पाहिजे; इत्यादि मजूर पक्षानें जे विचार व्यक्त केले आहेत तेही आपण लक्षांत घेतले पाहिजेत. मजूर पक्षाचें आज कांही चाललें नाही, म्हणून काय झालें ? तो पक्ष वाढत असून इंग्लंडच्या राष्ट्रीय धोरणावर त्याचें वजन अधिकाधिक पडत आहे. मजूरपक्ष म्हणजे इंग्लंडचा बहुजनसमाज होय. तो आज सत्ताधीश नाही, आणि म्हणून त्याचे विचार आज अमलांत येत नाहींत. तथापि पंजाब प्रकरणाबद्दल त्या पक्षाचे विचार आपले विचाराहून भिन्न नाहीत ही मोठी संतोषाची गोष्ट आहे. आणि बहिष्काराचें धोरण योग्य किंवा अयोग्य होईल हें ठरवितांना ह्या गोष्टीकडे दुर्लक्ष करता कामा नये. पंजाब प्रकरणाचा प्रधान मंडळानें केलेला निकाल अपुरा व असमाधानकारक आहे यांत शंका नाही. परंतु वरील सर्व गोष्टी लक्षांत घेतां बहिष्काराचें धोरण योग्य होणार नाही. अन्याय पूर्णपणें दूर करून घेणें हे अर्थातच आपलें कर्तव्य आहे. परंतु तें दूर करण्याची योग्य साधनें कोणती ह्याचा नीट विचार झाला पाहिजे. आम्हीं वर सांगितलेंच आहे की असले अन्याय फक्त पूर्ण स्वराज्यानेंच नाहीसे होतील. आपले हातांत पूर्ण सत्ता आली म्हणजे त्यांची पुनरावृत्ति होण्याची बिलकूल भीति नको. कानडा, आस्ट्रेलिया, दक्षिण आफ्रिका यांत असले अन्याय होणें शक्य आहे काय ? त्या देशांत अमृतसरची कत्तल झाली तर ते ब्रिटिश साम्राज्याचें जूं केव्हांच झुगारून देतील. ज्या देशांत स्वराज्य नाहीं त्याला असले अन्याय मधून मधून

सहन करणें भाग आहे. आणि स्वराज्याशिवाय अन्य उपायांनीं ते दूर होतील अशी आशा करणें व्यर्थ आहे. जे लोक स्वराज्याचा उपभोग घेत नाहींत त्यांना, असले अन्याय परतंत्र स्थितीचीं नैसर्गिक फळें होत अशी मनांत खूण गांठ बांधून, आणि पापाचा घडा पूर्ण भरावा लागतो ह्या म्हणींतील तत्त्व ओळखून, स्वराज्यप्राप्तिकरतां अधिकाधिक प्रयत्न करणें ह्याशिवाय दुसरा मार्ग नाहीं, हें लक्षांत ठेवून वागावें लागतें.

पंजाब प्रकरणामुळें कौन्सिलांना बहिष्कार घालण्याचें धोरण योग्य होत नाहीं ह्याचा येथपर्यंत विचार झाला. खिलाफत प्रकरणामुळें तें धोरण योग्य होईल काय ह्याचा आपण विचार करूं. टर्कीवर संयुक्त राष्ट्रांनीं जो तह लादला आहे त्यांत बराच अन्याय झाला आहे. स्वार्थ आणि महायुद्धांत इंग्लंड व फ्रान्स ह्यांना ग्रीसनें केलेल्या मदतीबद्दल उतराई होण्याची अवश्यकता, ह्या दोन कारणांमुळें तो अन्यायीपणाचा झाला असून त्यामुळें तुर्की साम्राज्याचे तुकडे होतील ह्यांत शंका नाहीं. ग्रीस आणि टर्की ह्या दोन देशांचें आज कित्येक वर्षें हाडवैर आहे. कॉन्स्टान्टिनोपल, थ्रेस, स्मर्ना वगैरे तुर्कस्थानचे भाग काबीज करण्याची ग्रीसला पुष्कळ वर्षांपासून महत्त्वाकांक्षा आहे. ग्रीसचे मुख्य प्रधान मि. व्हेनीझीलॉस हे अत्यंत धूर्त व कारस्थानी असून युरोपांतील राजकारणांत त्यांचें बरेंच वजन आहे. त्यांच्या कारस्थानामुळेंच ग्रीसच्या राजाचा ओढा जर्मनीकडे असतांहि ग्रीसनें सरतेशेवटीं संयुक्त राष्ट्रांची बाजू धरून तुर्कांचा पराभव करण्याला मदत केली. ती मदत ग्रीसनें अर्थातच निरपेक्ष बुद्धीनें केली नाहीं. तुर्की साम्राज्याचा थोडासा तरी भाग आपणाला गिळंकृत करितां यावा ह्या स्वार्थी बुद्धीनेंच व्हेनीझीलॉसनें आपल्या राजाला हद्दपार करून संयुक्त राष्ट्रांना मदत केली. युद्धसमाप्तिनंतर मि. व्हेनिझीलॉसनें आपल्या देशाच्या मागण्या मि. लॉइड जॉर्ज आणि फ्रान्सचे मुख्य प्रधान मि. मिलेरॅन ह्यांच्यापुढें मांडल्या आणि त्या दोघांना त्या नाकबूल करता आल्या नाहीत. शिवाय, युद्ध चालूं असतां इंग्लंड आणि फ्रान्स ह्यांच्यामध्यें गुप्त तह होऊन असें ठरलें होतें कीं फ्रान्सनें आपणाकडे सिरिया देश ठेवावा आणि इंग्लंडनें मेसॉपोटेमियावर आपली सत्ता चालवावी. युद्ध चालू असतां जीं उदात्त तत्त्वें प्रत्येक राष्ट्रानें प्रतिपादन केली होती त्यांची बहुतेक सर्व राष्ट्रांना विस्मृति पडली, आणि

स्वार्थाचा जिकडे तिकडे पुन्हां प्रादुर्भाव झाला. सारांश, कॉन्स्टान्टिनोपल, थ्रेस, स्मर्ना, सिरिया आणि मेसॉपोटेमिया ह्यासंबंधाच्या तहाच्या अटी अन्यायाच्या असून त्या ज्या तत्त्वाकरितां संयुक्त राष्ट्रांनी जर्मनीशीं युद्ध केलें, त्यांविरुद्ध आहेत. टर्कीच्या साम्राज्याची शकलें झालेली पाहून मुसलमानधर्मानुयायांना तीव्र दुःख व्हावें यांत नवल नाहीं. सर्व मुसलमानांना अत्यंत दुःख झालें आहे असें मात्र दिसत नाहीं. टर्कीच्या भवितव्यतेबद्दल इराण उदासीन आहे. आणि सुलतानचें तक्तासन ढासळलें असतांही इराणचा शहा इंग्रजाची कुमक मागत आहे. अरब लोकही सुलतानाच्या सत्तेची पर्वा करीत नाहीत; इतकेंच नव्हे तर त्याची सत्ता झुगारून देण्याची आपणांला संधि मिळाल्याबद्दल ते आनंदांत आहेत असें दिसतें. सर्व मुसलमानांत ऐक्य असतें आणि सुलतानची गादी राखण्याकरितां त्यांनीं जुटीनें प्रयत्न केला असतां तर टर्कीचे तुकडे कधींहि झाले नसते. तथापि खुद्द तुर्कांना अत्यंत खेद होत आहे आणि ते केमलपाशाचें नेतृत्व स्वीकारून स्वातंत्र्यसंरक्षणार्थ धडपड करीत आहेत हें खरें आहे. हिंदुस्थानांतील मुसलमानांना तुर्कांप्रमाणें तुर्की साम्राज्याच्या नाशाबद्दल हळहळ वाटत आहे ह्यांतहि शंका नाहीं. किंबहुना असें म्हणण्यास हरकत नाहीं कीं टर्कीवर लादण्यांत आलेल्या तहाच्या दुरुस्तीकरितां तुर्कांखेरीज जर कोणी दुसरे मुसलमान प्रयत्न करीत असतील तर ते हिंदुस्थानांतीलच होय. ह्या सर्व गोष्टी खऱ्या आहेत. परंतु प्रश्न असा आहे कीं त्यामुळें बहिष्काराचें धोरण योग्य होईल काय ?

ह्या प्रश्नाचा विचार मुख्यत्वेंकरून हिंदुस्थानच्या हिताच्या दृष्टीनेंच केला पाहिजे. जे मुसलमान पुढारी असहकारितेची चळवळ सुरू करून कौन्सिलांना बहिष्कार घालण्याला सांगत आहेत त्यांचा हेतु केवळ अन्यायीपणाच्या तहाचा निषेध करावा हा नाहीं. त्यांचा जर एवढाच हेतु असता तर त्यांनी जर्मनी आणि ऑस्ट्रिया यांच्याशीं केलेल्या तहांचाही निषेध केला असता. ज्या मुसलमानांनी खिलाफत चळवळ सुरू केली आहे त्यांची दृष्टि केवळ हिंदी नसून अखिल इस्लामीय आहे. ती हिंदुस्थानच्या प्रगतीला अनुकूल नाहीं. ह्या अखिल इस्लामी मुसलमानांना असें वाटतें कीं सर्व मुसलमानधर्मीयांचें ऐक्य होऊन त्यांचें पूर्ववत साम्राज्य असावें आणि त्यांच्या प्राचीन वैभवाचें पुनरुज्जीवन व्हावें. हिंदुस्थानात पूर्वी मुसलमानांची सत्ता होती तशी ती पुन्हां

व्हावी असें त्यांपैकीं कित्येकांना वाटत असलें तर त्यांत आश्चर्य नाहीं. अखिल इस्लामीय चळवळीमुळें अशी मनोवृत्ति होणें साहजिक आहे. इस्लामची इभ्रत राखण्याकरितां अफगाणिस्थानच्या अमीरानें जर हिंदुस्थानावर स्वारी केली तर तिचा आम्ही प्रतिकार करणार नाहीं हें जें कांहीं मुसलमानांनी नुकतेंच सांगितलें तें अत्यंत अर्थसूचक आहे. परंतु असलें धोरण हिंदुस्थानच्या प्रगतीच्या दृष्टीनें अपायकारक आहे. अखिल इस्लामीय चळवळ ही साम्राज्यवादी असल्यामुळें राष्ट्रीय स्वातंत्र्याला किंवा स्वराज्याला अर्थातच प्रतिकूल आहे. कल्पना करा कीं, इस्लामच्या इभ्रतीकरितां अमीरानें हिंदुस्थानावर स्वारी केली आणि तीत त्याला यश आलें. त्याचा परिणाम काय होईल ? इस्लामची इभ्रत राखल्यावर अमीर काबूलला परत जाईल काय ? ज्या स्वार्थानें प्रेरित होऊन इंग्लंडनें आपलें ठाणें मेसोपोटेमियामध्यें कायम केलें आहे किंवा फ्रान्सनें सिरिया घशांत टाकण्याची हाव धरली आहे तोच स्वार्थ अमीराला पछाडणार नाहीं काय ? अमीरानें इस्लामी धर्माची इभ्रत राखल्याबरोबर आमचे मुसलमान बंधू त्याला हिंदुस्थानांतून हांकलून देतील काय ? जरी कदाचित त्यांनी तसा प्रयत्न केला तरी तो सिद्धीस जाईल काय ? इस्लामी धर्माच्या इभ्रतीकरितां अमीरानें हिंदुस्थानावर स्वारी केली आणि ती यशस्वी झाली नाहीं तर मुसलमानांचा हेतु साध्य होणार नाहीं. उलट हिंदुस्थानचें मात्र अतिशय अकल्याण होऊन त्याची झालेली प्रगति नष्ट होईल. जर ती यशस्वी झाली तर हिंदी लोकांना अमीराची सत्ता मान्य करावी लागेल. हिंदुस्थानच्या दुर्दैवानें असला प्रकार घडून आला तर आपलें जें नुकसान होईल त्याची कल्पना करणें शक्य नाहीं. ज्या स्वराज्याकरितां आम्ही प्रयत्न करीत आहों आणि जें आतां आमच्या आटोक्यांत आलें आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं तें मृगजळाप्रमाणें मिथ्या होईल. हिंदुस्थानच्या सुधारणेची सर्व बाजूंना छिन्नविच्छिन्न होऊन मध्ययुगाचा त्याला पुन्हा अनुभव घ्यावा लागेल.

तुर्की साम्राज्याचा नाश होत आहे हें पाहून मुसलमानांना वाईट वाटणें साहजिक आहे. आणि त्याचा प्रतिकार करण्याकरितां त्यांनी प्रयत्न करावा हेंहि साहजिक आहे. टर्कीच्या सरकारावर लादण्यांत आलेला तह अन्यायाचा असून त्यांत दुरुस्ति होणें अवश्य आहे, ह्याबद्दल मतभेद नाहीं. परंतु अखिल इस्लामीय चळवळ हिंदुस्थानच्या राष्ट्रीय स्वातंत्र्याला किंवा स्वराज्याला पोषक नस--

त्यामुळें तिचा जर उत्कर्ष झाला तर हिंदुस्थानचें भयंकर नुकसान होईल. मुसलमानांनीं जी खिलाफत चळवळ सुरू केली आहे तिच्या बुडाशी प्राचीन मुसलमान साम्राज्याचें पुनरुज्जीवन करण्याची इच्छा असेल तर तिच्यामुळें हिंदुस्थानचा काय फायदा होणार आहे ? महात्मा गांधी म्हणतात कीं मुसलमान हे आपले देशबंधू आहेत, त्यांच्या धर्मसमजुती बरोबर असोत किंवा नसोत या गोष्टीचा विचार न करितां केवळ ते आपले बंधू आहेत ही गोष्ट लक्षांत घेऊन त्यांच्या सुखदुःखांत भागीदार होणें हें हिंदूंचें कर्तव्य आहे. मुसलमान हे आपले देशबंधू असल्यामुळें त्यांचें सुख तें आपलें सुख आणि त्यांचें दुःख तें आपलें दुःख अशी जाणीव हिंदूंना असली पाहिजे हें खरें. परंतु ह्यावरून असें अनुमान निष्पन्न होत नाहीं कीं आपलीं दुःखें दूर करण्याकरितां जे उपाय मुसलमानांना पसंत पडतील त्यांच्या योग्यायोग्यतेचा किंवा दूरवरच्या परिणामांचा विचार न करितां ते हिंदु लोकांनीं निमूटपणें मान्य करावे. महात्मा गांधी म्हणतात कीं आपलीं सत्याग्रहाचीं तत्त्वें न सोडतां जोंपर्यंत मुसलमान लोक असहकारितेची चळवळ चालवितील तोंपर्यंत तींत सामील होणें हें हिंदूंचें कर्तव्य आहे. गांधींचें हें म्हणणें तात्त्विक दृष्ट्या रास्त दिसतें. परंतु नीट विचार केला असतां केवळ तात्त्विक रीतीनें विचार करून चालावयाचें नाहीं. मुसलमानांनीं गांधींच्या सत्याग्रहाचीं सर्व तत्त्वें मान्य केलीं असतीं तर गोष्ट निराळी होती. परंतु मुसलमान बहुजनसमाजानें गांधींचीं सर्व तत्त्वें अद्याप स्वीकारलीं नाहींत, हें इंग्लंडच्या मालावर बहिष्कार घालण्याबद्दल गांधी आणि मुसलमान पुढारी ह्यांच्यांत असलेल्या मतभेदावरून स्पष्ट दिसून येतें. असहकारितेची चळवळ पूर्णपणें गांधींच्या हातांत राहील आणि तिला अखिल इस्लामीय चळवळीचें स्वरूप येणार नाहीं अशी खात्री देतां येत नाहीं. अमीरानें हिंदुस्थानावर स्वारी केली तर त्याबद्दल आम्ही काय धोरण स्वीकारूं, ह्याबद्दल कांहीं मुसलमान पुढाऱ्यांनीं जे उद्गार काढले आहेत त्यावरून हें स्पष्ट आहे. महात्मा गांधींवर हिंदू लोकांचा विश्वास आहे. परंतु तितकाच विश्वास त्यांनीं महंमद अल्ली, शौकत अल्ली वगैरे मुसलमान पुढाऱ्यांवर कां ठेवावा ? त्या पुढाऱ्यांचें हिंदुस्थानावर प्रेम नाहीं, असें आम्ही म्हणत नाहीं. परंतु अखिल इस्लामीय चळवळीबद्दल आणि खलिफाबद्दल त्यांची जितकी निष्ठा आहे, तितकी हिंदुस्थानावर आहे असें आम्हांस वाटत नाहीं. त्यांची खलिफाबद्दल आणि अखिल इस्लामीय चळवळीबद्दल निष्ठा आणि हिंदुस्थानाबद्दल निष्ठा ह्या दोहों-

मध्यें जर विरोध आला तर दुसरी मोडून ते पहिली धरून बसतील ह्यांत शंका नाहीं. असहकारितेची चळवळ अशा रीतीनें धोक्याची असल्यानें आणि तिचे परिणाम अपायकारक होण्याचा संभव असल्यामुळें तिचा स्वीकार करणें योग्य नाहीं.

तुर्की साम्राज्याचे तुकडे तुकडे झालेले पाहून मुसलमानांनीं जी खिलाफत चळवळ सुरू केली आहे, ती अखिल इस्लामीय चळवळीच्या दृष्टीनें बरोबर आहे. हिंदुस्थानांत मुसलमानांची बहुसंख्या असती आणि सुलतानाची त्यांचेवर सत्ता असती तर असहकारितेची चळवळ अगदीं योग्य झाली असती. परंतु हिंदुस्थानांत हिंदूंची बहुसंख्या आहे आणि हिंदुस्थानचें ध्येय मुसलमानांच्या साम्राज्याचें किंवा वैभवाचें पुनर्जीवन हें नसून स्वराज्य आहे हें लक्षांत घेतां त्या चळवळीचा हिंदुस्थानच्या भावी प्रगतीवर काय परिणाम होईल, ह्याचाच विचार केला पाहिजे. आणि तो केला असतां हिंदुस्थानच्या सद्यःस्थितीत असहकारितेची चळवळ अपायकारक होईल ह्याबद्दल शंका नाहीं. सुलतानचें साम्राज्य राखण्याकरितां किंवा मुसलमानांच्या वैभवाचें पुनर्जीवन करण्याकरितां हिंदुस्थानची प्रगति धोक्यांत घालणें अत्यंत अविचाराचें आहे. शिवाय ज्या तात्त्विक विचारानें प्रेरित होऊन महात्मा गांधी यांनी असहकारितेची चळवळ चालविली आहे, तो विचार एकंदर बहुजनसमाजाला कसा पटणार? अखिल इस्लामीय चळवळीच्या दृष्टीनें असहकारितेची चळवळ योग्य ठरेल. आणि ज्या मुसलमानांना अखिल इस्लामीय चळवळीचें महत्त्व अधिक वाटतें त्यांनीं तिचा स्वीकार अवश्य करावा. परंतु हिंदुस्थानच्या प्रगतीच्या दृष्टीनें विचार केल्यास ती अपायकारक आहे. आणि म्हणून ज्यांना हिंदुस्थानच्या प्रगतीपुढें अखिल इस्लामीय चळवळीची किंमत वाटत नाहीं त्यांनी तिचा मुळीच अवलंब करूं नये, असें आमचें स्पष्ट मत आहे.

असहकारितेची आणि तदंगभूत कौन्सिलांना बहिष्कार घालण्याची चळवळ योग्य नाही याचा आम्ही येथपर्यंत अनेक बाजूंनीं विचार केला आहे. आमचें असें निश्चित मत आहे कीं कौन्सिलांना बहिष्कार घालण्याचें धोरण स्वीकारल्यास अत्यंत नुकसान होऊन हिंदुस्थानची पिछेहाट होईल.

वरील विवेचनावरून आमच्या वाचकांच्या लक्षांत आलें असेलच कीं आमच्या मतें सुधारणेच्या कायद्यासंबंधानें योग्य धोरण सुधारणेची योजना

हाणून पाडावी किंवा कौन्सिलांना बहिष्कार घालावा, हें नसून त्या कायद्यामुळें जे आपणांस नवीन हक्क प्राप्त झाले आहेत, त्यांचा सदुपयोग करणें हें होय. सुधारणेच्या कायद्याबद्दल धोरण कसें असावें ह्या प्रश्नाची जर मीमांसा केली, तर मुख्य मुद्दा असा आहे कीं, आपण मंत्र्यांच्या जागा स्वीकारून लोकमताप्रमाणें संप्रदत्त खात्यांची सुधारणा करण्याला तयार व्हावें किंवा नाहीं? हा एकच मुद्दा महत्त्वाचा असून सरकाराशीं सहकारिता करण्याचा जो प्रश्न उपस्थित झाला आहे त्याचा मुख्यत्वें करून त्याच्याशींच संबंध आहे. सुधारणेच्या कायद्यान्वयें, योजलेल्या मंत्र्यांच्या जागा स्वीकारूं नयेत आणि संप्रदत्त खात्यांची सुधारणा करूं नये असें धोरण स्वीकारणें म्हणजे सुधारणेची योजना हाणून पाडणें होय. उलट पक्षीं मंत्र्यांच्या जागा स्वीकारून संप्रदत्त खात्यांची सुधारणा करणें म्हणजे सहकारितेचें धोरण स्वीकारणें होय. हिंदुस्थानसरकारची खातीं व राखीव प्रांतिक खाती ह्यांचेबद्दल हा प्रश्न उपस्थित होत नाहीं. त्या खात्यांसंबंधानें आम्ही सदासर्वदा सरकाराशीं सहकारिता करूं असें आश्वासन देतां येणार नाहीं. त्याविषयीं एवढेंच आश्वासन देतां येईल कीं, जोंपर्यंत सरकारचें धोरण हिंदी लोकमताविरुद्ध असणार नाहीं तोंपर्यंत त्याला आम्हीं पूर्णपणें पाठिंबा देऊं. तें धोरण हिंदी लोकमताविरुद्ध असल्यास त्याचा प्रतिकार करणें हें अर्थातच आमचें कर्तव्य आहे. संप्रदत्त खात्यांबद्दल मात्र असें निश्चित सांगण्यास हरकत नाहीं कीं सरकाराशीं सहकारिता करून त्या खात्यांची शक्य तितकी सुधारणा करण्याला आम्ही तयार आहोंत. संप्रदत्त खात्यांची सुधारणा करण्याकरितां शक्य ते उपाय योजणें, जीं खातीं राखून ठेवण्यांत आलीं आहेत आणि हिंदुस्थानसरकारची जीं खातीं आहेत त्यांसंबंधानें सरकारचें धोरण योग्य असल्यास त्याला पूर्ण पाठिंबा देणें, आणि तें अयोग्य असल्यास त्याचा प्रतिकार करणें हेंच सुधारणेच्या योजनेबद्दल योग्य धोरण होय, आणि तेंच आपण स्वीकारिलें पाहिजे. त्यावरच आपली राष्ट्रीय प्रगति अवलंबून आहे.

ह्यापुढील प्रश्न म्हटला म्हणजे कौन्सिलांच्या निवडणुकींकरितां जे उमेदवार उभे राहतील त्यांची निवड कोणत्या तत्वानें करण्यांत यावी हा होय. आपल्या महाराष्ट्रांत आज दोन मुख्य पक्ष आहेत. लो. टिळक यांनी कॉंग्रेस डेमोक्रॅटिक पार्टी हा पक्ष स्थापन केला असून त्याचा त्यांनी जाहीरनामा प्रसिद्ध केला

आहे. नामदार परांजप्ये वगैरे नेमस्त पक्षाच्या पुढाऱ्यांनी लिबरलपार्टी हा नूतन पक्ष स्थापन केला आहे. व त्याचाहि जाहीरनामा नामदार श्रीनिवास-शास्त्री यांच्या नांवानें प्रसिद्ध झाला आहे. सोलापुरास भरलेल्या प्रांतिक परिषदेनें असा ठराव केला आहे कीं ज्यांच्या राष्ट्रीय सभेविषयींच्या निष्ठेबद्दल शंका घेण्याला बिलकूल जागा नाहीं त्यांनाच मतदारांनीं निवडून द्यावें. ह्या ठरावाचा कांहीं लोक असा अर्थ करितात कीं सुधारणेच्या कायद्याबद्दल अमृतसरच्या राष्ट्रीय सभेंत पास झालेला ठराव ज्यांना मान्य आहे. त्यांनाच निवडून द्यावें. आमच्या मतें हा अर्थ चुकीचा आहे. ज्यांना अमृतसरच्या राष्ट्रीय सभेंत सुधारणेच्या कायद्याबद्दल झालेला ठराव पसंत आहे तेच राष्ट्रीय सभेचे कट्टे भक्त होत, ज्यांना तो पसंत नाही ते राष्ट्रीय सभेचे कट्टे भक्त नाहीत असें म्हणणें चुकीचें आहे. नामदार शास्त्री, मि. नटराजन, नामदार परांजप्ये, नामदार कामत इत्यादि नेमस्त पक्षाच्या पुढाऱ्यांना अमृतसर या ठराव पसंत नाहीं. परंतु तितक्यावरून त्यांची राष्ट्रीय सभेबद्दलची निष्ठा कमी आहे असें म्हणतां येणार नाही. तेव्हां ज्यांना अमृतसरच्या राष्ट्रीय सभेंत सुधारणेच्या कायद्या-बद्दल झालेला ठराव पसंत आहे तेच राष्ट्रसभाभक्त, ज्यांना तो पसंत नाहीं ते राष्ट्रसभा-भक्त नाहींत, ही विचारसरणी सयुक्तिक नाहीं. खुद्द लोकमान्य व त्यांचे अनुयायी यांना कांहीं वर्षे राष्ट्रिय सभेपासून दूर रहावें लागलें. परंतु त्यावरून ते राष्ट्रसभाभक्त नव्हते असें अनुमान कोणीं काढिल्यास तें योग्य होईल काय ? अमृतसरचा ठराव ज्यांना पसंत आहे तेच राष्ट्रीयसभानिष्ठ आहेत असें ठरविल्यास राष्ट्रीय सभेचें प्रातिनिधिक स्वरूप नष्ट होऊन तिला एका विवक्षित पक्षाच्या सभेचें स्वरूप प्राप्त होईल. राष्ट्रीय सभा ही आज आपली पार्लमेंट आहे तीत भिन्न भिन्न पक्षांना स्थान मिळून निरनिराळ्या मतांचा विचार झाला पाहिजे. तिच्या घटनाविषयक नियमांतील पहिला नियम, म्हणजे ज्यांत तिचें ध्येय सांगितलेलें आहे तो ज्यांना मान्य आहे, आणि त्या नियमांत सांगितलेलें स्वराज्याचें ध्येय सिद्धीस नेण्याकरितां जे मनोभावानें प्रयत्न करीत आहेत, ते सर्व राष्ट्रासभानिष्ठ होत; मग विवक्षित प्रश्नाबद्दल त्यांचीं मतें भिन्न असोत वा नसोत. अमृतसरचा ठराव आम्हांला स्वतःला मान्य आहे. परंतु ज्यांना तो मान्य नाहीं ते राष्ट्रीयसभानिष्ठ नाहींत असें म्हणण्याला मात्र आम्ही तयार नाहीं. आणि म्हणून सोलापूरच्या परिषदेंत निवडणुकीसंबंधानें झालेल्या ठरावाचा कित्येक लोक जो अर्थ करितात तो आमच्या मतें अगदीं चुकीचा आहे.

कौन्सिलांत कोणत्या उमेदवारांना निवडून द्यावें ह्या प्रश्नाचा विचार करितां राष्ट्रीय सभेचें ध्येय कोणाला पसंत आहे, राष्ट्रीय सभेबद्दल आजपर्यंत कोणीं अधिक कळकळ दाखविली आहे, आणि राष्ट्रीय सभेचें ध्येय सिद्धीस नेण्याकरितां कोण आजपर्यंत मनोभावानें झटत आला आहे, ह्याचा मतदारांनीं अवश्य विचार केला पाहिजे. सुधारणेच्या कायद्याचा एक परिणाम असा होईल कीं जे लोक राजकीय चळवळींत पडत नव्हते, किंबहुना राजकीय चळवळीचा विटाळ न होऊं देण्याबद्दल खबरदारी घेत असत, ज्यांना अधिकाऱ्यांची मर्जी संपादन करणें हेंच आपलें जीवितकर्तव्य होय असें वाटत होतें, नेमस्तांची चळवळ असो किंवा जहालांची असो तिजपासून जे सारखे अलिप्त राहत असत, जे कधींहि राष्ट्रीय सभेला गेले नाहींत व तिजबद्दल ज्यांना कधींहि कळकळ वाटली नाहीं. राजकीय चळवळींत पडणाऱ्यांची निंदा करण्यांतच ज्यांना भूषण वाटत असे, असे स्वार्थसाधू लोक मानाची हाव धरून निवडणुकींत उमेदवार म्हणून उभे राहतील. अशा उमेदवारांना निवडून न देणें हें मतदारांचें आद्य कर्तव्य होय. मतदारांनीं वाटल्यास नेमस्तांस निवडून द्यावें किंवा जहालांस निवडून द्यावें. परंतु असे स्वार्थसाधू लोक जर उमेदवार म्हणून पुढें आले तर त्यांना कधींही निवडून देतां कामा नये, निवडून दिल्यास मायभूमीस बेइमान झाल्याचें पातक लागेल, हें प्रत्येक मतदारानें लक्षांत ठेवावें. असल्या उमेदवारांना निवडून देतां कामा नये, हें पहिलें तत्त्व होय. व तें प्रत्येक मतदार लक्षांत ठेवील अशी आम्हांस आशा आहे. उमेदवार कोणत्या कां पक्षाचा असेना ज्याची राष्ट्रीय कळकळ खरी आहे, ज्यानें देशाकरितां झीज सोसली आहे, आणि आपल्या देशाच्या राजकीय प्रगतीकरितां खऱ्या भावनेनें प्रयत्न केला आहे, असा जो उमेदवार असेल त्यालाच मतदारांनीं निवडून दिलें पाहिजे.

कांहीं लोकांचें असें म्हणणें आहे कीं मतदारांनीं नेमस्त पक्षाच्या उमेदवारांना निवडून देऊं नये, जहाल पक्षाच्या उमेदवारांनाच निवडून द्यावें. लोकमान्य टिळक यांनीं कॉंग्रेस डेमोक्रॅटिक पार्टी म्हणून जो नवीन पक्ष स्थापन केला आहे त्या पक्षाचे जे उमेदवार असतील त्यांनाच मतदारांनीं मतें द्यावीं, प्रागतिक पक्षाच्या उमेदवारांना बहिष्कार घालावा, असा लोकमान्यांच्या अनुयायांचा आग्रह दिसतो. आमच्या मतें हें धोरण अत्यंत चुकीचें असून राष्ट्रीय प्रगतीस

विघातक झाल्यावांचून राहणार नाहीं. हिंदुस्थानाला अद्याप पूर्ण स्वराज्य मिळालें नाहीं आणि तें मिळविण्याकरितां नोकरशाहीबरोबर आपणाला आणखी कित्येक वर्षें संग्राम करावा लागेल हें कोणीहि विसरतां कामा नये. ज्या देशांत स्वराज्य पूर्णपणें नांदत आहे त्यांत भिन्न भिन्न पक्ष होऊन प्रत्येक पक्षानें आपली सरशी होण्याकरितां प्रयत्न केल्यास नुकसान होणार नाहीं. परंतु ज्या देशांत स्वराज्याचा चांगला आरंभसुद्धां झाला नाहीं, त्यांत भिन्न भिन्न पक्ष होऊन प्रत्येक पक्षानें दुसऱ्यास हाणून पाडण्याचा प्रयत्न केल्यास राष्ट्रीय नुकसान होऊन पूर्ण स्वराज्य प्राप्त होण्याला विलंब लागेल. नोकरशाहीबरोबर आपण जर जुटीनें झगडलों नाहीं तर आपल्यांतील दुहीचा ती फायदा घेतल्याशिवाय राहणार नाही. पूर्ण स्वराज्य प्राप्त होईतोंपर्यंत तरी आपण जूट राखली पाहिजे. आणि आपल्यामध्यें जे मतभेद असतील ते बाजूला राखून आपण एकोप्यानें वागलें पाहिजे. परंतु एका पक्षानें दुसऱ्या पक्षाला बहिष्कार घालण्याचें धोरण स्वीकारल्यास अशी जूट राहणें शक्य आहे काय ह्याचा प्रत्येकानें विचार करावा. जहालांनीं नेमस्तांना कौन्सिलांतील एकहि जागा मिळूं दिली नाहीं तर पक्षभेद विकोपास जाऊन राष्ट्राचें अत्यंत नुकसान झाल्यावांचून राहणार नाही. उमेदवाराची लायकी कशी कां असेना तो अमक्या पक्षाचा आहे म्हणून त्याला मतदारांनीं निवडून द्यावें हें धोरण इतकें अपायकारक आहे कीं त्याप्रमाणें मतदारांनीं आपलें वर्तन ठेवूं नये असें त्यांना आमचें आग्रहपूर्वक सांगणें आहे. आपणाला शक्य तितकें लवकर पूर्ण स्वराज्य प्राप्त करून घ्यावयाचें आहे हें आपण विसरतां कामा नये आणि म्हणून आपण आपले पक्षभेद अतिरेकाला नेले आणि एका पक्षानें दुसऱ्या पक्षाच्या उमेदवारांना कौन्सिलांत येऊं दिलें नाही तर हें आपलें ध्येय लवकर सिद्धीस जाणार नाहीं. कल्पना करा कीं नामदार परांजप्ये, नामदार शास्त्री, सर चिमणलाल सेटलवाड यांच्यासारख्या नेमस्त पक्षाच्या अग्रणीनासुद्धां बहिष्कार घालण्याचा जहाल पक्षानें प्रयत्न केला आणि तो दुर्दैवानें सिद्धीस गेला तर आपलें नुकसान होणार नाहीं काय? कौन्सिलांत प्रत्येक पक्षाचे जे चांगले उमेदवार आहेत ते निवडून येणें हें राष्ट्रीय हिताच्या दृष्टीनें अगदीं अवश्य आहे. आणि मतदार पक्षांधतेला बळी पडून देशाच्या नुकसानीला कारणीभूत होणार नाहींत, अशी आम्हांस पूर्ण आशा आहे. आमच्या मतें आपल्या सध्यांच्या राजकीय अवस्थेंत योग्य धोरण हें आहे कीं पक्षाकडे न पाहतां ज्या उमेदवारांची लायकी एकंदरीनें श्रेष्ठ आहे, त्यांनाच

मतदारांनीं निवडून द्यावें. एक सामान्य प्रतीचा उमेद्वार आहे, दुसरा गुणानें, कर्तृत्वानें, राष्ट्रीय कळकळीनें, हुशारीनें त्याच्यापेक्षां श्रेष्ठ आहे. पहिला जहाल आहे आणि दुसरा नेमस्त आहे. ह्या दोन उमेद्वारांत पहिला उमेद्वार जहाल पक्षाचा आहे, एवढ्याच कारणास्तव त्याची जर मतदारांनीं निवड केली तर त्यांनीं आपलें कर्तव्य योग्य रीतीनें केलें असें म्हणतां येणार नाहीं. अशा स्थितींत त्यांनीं दुसऱ्या उमेद्वाराचीच निवड करणें राष्ट्रीय हिताच्या दृष्टीनें अवश्य आहे. कौन्सिलांत उत्तम प्रतीचे उमेद्वार निवडून आले पाहिजेत. मग ते जहाल असोत किंवा नेमस्त असोत. यांतच आपलें खरें हित आहे. आणि याकडे दुर्लक्ष करून केवळ पक्षाभिमानानें प्रेरित होऊन नालायक किंवा कमी लायक उमेद्वारांची आपण निवड करून दिली तर आपली पिछेहाट झाल्याशिवाय राहणार नाहीं हें प्रत्येक मतदारानें लक्षांत ठेवावें. पक्षाकडे न पाहतां जो उमेद्वार सर्वांत अधिक लायक असेल त्याचीच निवड करणें हें मतदारांचें कर्तव्य आहे. आणि तें कर्तव्य पक्षाभिमानानें प्रेरित झालेल्या पुढाऱ्यांच्या किंवा लोकांच्या उपदेशाची परवा न करितां मतदार पूर्णपणें बजावतील अशी आम्हांस आशा आहे. पक्षाभिमानानें प्रेरित होऊन वागण्याची ही वेळ नाहीं. हुशार, कर्तृत्वान्, राष्ट्रीयहिततत्पर स्वार्थत्यागी, राजकीय प्रश्नांचें अध्ययन केलेले असेच सद्गृहस्थ कौन्सिलांत निवडून आले पाहिजेत, मग त्यांच्या कपाळावर जहाल पक्षाचा किंवा नेमस्त पक्षाचा शिक्का असो. मतदार ह्या तत्त्वाप्रमाणेंच जर आपल्या हक्काचा उपयोग करतील तरच हिंदुस्थानाला पूर्ण स्वराज्य लवकर मिळण्याची आशा आहे, एरव्हीं नाहीं हें प्रत्येकानें लक्षांत ठेवावें. मतदारीचा हक्क अत्यंत महत्त्वाचा व पवित्र आहे. आणि त्याचा जर मतदार दुरुपयोग करतील आणि पक्षांधतेला बळी पडून नालायक माणसांची निवड करून देतील तर त्याचें आपल्या मायभूमीस प्रायश्चित्त भोगावें लागेल, हें कोणींहि विसरतां कामा नये.

---

## परलोकवासी दादाभाई नौरोजी.

" Self-Government is the only and chief remedy. In Self-Government lie our hope, strength and greatness. I do not know what good fortune may be in store for me during the short period that may be left to me, and if I can leave a word of affection and devotion for my country and countrymen, I say: Be united, persevere, and achieve Self-Government, so that the millions now perishing by poverty, famine and plague and the scores of millions that are starving on scant subsistence may be saved, and India may once more occupy her proud position of yore among the greatest and civilised Nations of the West."

" Agitation is the life and soul of the whole political, social and industrial history of England. It is by agitation that the English have accomplished the most glorious achievements, their prosperity, their liberties and in short, their first place among the Nations of the world. The whole life of England, every day, is all agitation. You do not open your paper in the morning but read from beginning to end, it is all agitation,-Congresses and Conferences, meetings and resolutions without end-for a thousand and one movements, local and national. From the Prime minister to the humblest politician, his occupation is agitation for every thing he wants to accomplish. The whole Parliament, Press. and Platform is simply all agitation. Agitation is the civilised peaceful weapon of moral force, and infinitely preferable to brute physical force..........Agitate, agitate means inform. Inform, inform the Indian people what their rights are, and how and why they should obtain them and inform the British people, of the rights of the Indian people, and why they should grant them. If we do not speak, they

say we are satisfied. If we speak we become agita tors! The Indian people are properly asked to act constitutionally, while the Government remains unconstitutional and despotic."

DADABHAI NAOROJI,
in his adress at the Calcutta Congress 1906,

( हिंदुस्थानच्या उन्नतीला एकच उपाय आहे आणि तो **स्वराज्य** हा होय. आपली आशा, आपलें सर्व सामर्थ्य, आणि आपला सर्व मोठेपणा स्वराज्यांत आहे. माझ्या आयुष्याचीं जीं कांहीं थोडीं वर्षें उरलीं असतील त्यांत कोणत्या भाग्याच्या गोष्टी मला अनुभवण्यास मिळतील, हें सांगतां येत नाहीं. परंतु माझ्या देशबांधवांना एखादा प्रेमाचा निरोप मला देतां आला तर तो मी हा देईन कीं, "**माझ्या प्रिय देशबांधवांनो, तुम्ही सर्व एक व्हा, सतत प्रयत्न करा आणि स्वराज्य संपादन करा.** तुम्ही जर स्वराज्य संपादन कराल, तर आज जे लाखों लोक दारिद्र्यानें, दुष्काळानें आणि प्लेगानें मरत आहेत, आणि ज्या कोट्यावधि लोकांना उपासमार करून आयुष्य कंठावें लागत आहे, त्यांचे प्राण वांचतील आणि पाश्चात्य देशांतील मोठ्या आणि सुधारलेल्या राष्ट्रांत हिंदुस्थानाला पूर्वीप्रमाणें पुन्हां महत्त्व प्राप्त होईल. इंग्लंडच्या राजकीय, सामाजिक, आणि औद्योगिक इतिहासाकडे जर पाहिलें तर त्याचा आत्मा, त्याचें जीवित चळवळींत आहे. इंग्लिश लोकांचें वैभव, त्यांचें स्वातंत्र्य, त्यांचे सर्व हक्क, किंबहुना जगांतील राष्ट्रांत त्यांना प्राप्त झालेलें पहिलें स्थान—ह्या सर्व गोष्टी त्यांनी चळवळीनेंच मिळविल्या आहेत. इंग्लंडचा प्रत्यक दिवसाचा आयुष्यक्रम म्हणजे चळवळ होय. कोणतेंही वर्तमानपत्र घ्या. त्यांत तुम्हांला आरंभापासून शेवटपर्यंत काय आढळून येतें ? तर चळवळ. हजारों स्थानिक आणि राष्ट्रीय कार्याकरितां सभा भरत आहेत, परिषदा भरत आहेत आणि ठराव करण्यांत येत आहेत—अशी जिकडे तिकडे चळवळ चाललेली असते. मुख्य प्रधान असो किंवा एखादा ग्राममुत्सद्दी असो, प्रत्येक जण आपल्याला जें पाहिजे त्याच्याकरितां चळवळ करीत असतो. पार्लमेंटांत, वर्तमानपत्रांच्या किंवा सभांच्या द्वारें चळवळ चालू असते. चळवळ हें सुधारलेल्या राष्ट्राचें नैतिक सामर्थ्याचें शस्त्र आहे. तें शस्त्र शांततेचें असून शारीरिक सामर्थ्यापेक्षां अधिक श्रेयस्कर आहे. चळवळ करा. चळवळ करणें

म्हणजे लोकांना सुशिक्षित करणें होय. आपले हक्क काय आहेत, आणि ते कां व कसे मिळविले पाहिजेत, याबद्दल आपल्या देशबांधवांना शिक्षण द्या. तसेंच आपले हक्क काय आहेत, आणि ब्रिटिश लोकांनीं ते कां दिले पाहिजेत, हें ब्रिटिश लोकांना सांगा. आपण जर गप्प बसून कांहीं चळवळ केली नाहीं, तर आपण संतुष्ट आहोंत, असें आपले राज्यकर्ते म्हणतात. आणि आपण जर गाऱ्हाणी सांगूं लागलों तर आम्ही चळवळ्ये आहोंत असा आम्हांला दोष देण्यांत येतो. हिंदी लोकांनीं सनदशीर वागावें असें त्यांना सांगण्यांत येतें; आणि तें बरोबरही आहे. परंतु सरकार मात्र सनदशीर नसून अनियंत्रित आहे.

गेल्या अंकांत दादाभाई नौरोजी ह्यांच्याबद्दल आम्हीं लहानसा मृत्युलेख लिहिला आहे. या लेखांत त्यांचा जीवन–वृत्तांत थोडक्यांत देऊन त्यांनी केलेल्या राष्ट्रसेवेचें सिंहावलोकन करण्याचा आमचा विचार आहे.

दादाभाईंचा जीवनवृत्तांत म्हणजे गेल्या पाऊणशें वर्षांचा राजकीय चळवळीचा इतिहास होय, असें आम्हीं मागील लेखांत म्हटलें आहे. दादाभाईंचा जन्म मुंबई येथें ता. ४ सप्टेंबर १८२५ रोजी झाला. १८१८ साली पेशवाई बुडून महाराष्ट्रांत ब्रिटिश रियासतीस सुरुवात झाली. मराठ्यांचें स्वराज्य लयास जाऊन दहा वर्षे झाली नाहींत तोंच हिंदुस्थानच्या नूतन स्वराज्याचा पाया घालणारी ही थोर विभूति जन्मास आली. परकीयांचा अम्मल नुकताच स्थापन झाला, म्हणजे राज्यकार्यधुरंधर परकीय मुत्सद्दी आपलें राज्य लोकांना प्रिय कसें होईल याचा सतत विचार करून आपलें धोरण ठरवीत असतात. १८१८ सालीं हिंदुस्थानचा राजदंड पेशव्यांचे हातांतून इंग्रजांचे हातांत गेला, त्यावेळीं महाराष्ट्रांत लॉर्ड एलफिन्स्टन् हे इंग्रज मुत्सद्दी राज्यकारभार करीत होते. ते राज्यकारणांत कुशल असून इंग्रजांची सत्ता लोकप्रिय करण्याकरितां अहर्निश झटत असत. त्यांच्या उत्तेजनानें महाराष्ट्रांत इंग्रजी विद्येचा प्रसार होऊं लागला आणि लोकांना इंग्रजी शिक्षण देण्याकरितां मुंबईस एलफिन्स्टन इन्स्टिट्यूशन, ही संस्था स्थापन करण्यांत आली. दादाभाईंचे वडील त्यांच्या वयाच्या चौथ्या वर्षीच वारले. त्यांच्या आईनें त्यांचें योग्य संगोपन करून त्यांना एलफिन्स्टन इन्स्टिट्यूशनमध्यें शिकावयास घातलें. हिंदुस्थानांत अद्याप विश्वविद्यालयें स्थापन झालीं नव्हती, आणि त्यामुळें अर्थात्च बी. ए, एम. ए. वगैरे पदव्या देण्यांत

येत नव्हत्या. एलफिन्स्टन इन्स्टिट्यूशनमध्यें इंग्रजी पहिले इयत्तेपासून शेवटपर्यंत इंग्रजी शिक्षण देण्यांत येत असे. एलफिन्स्टन इन्स्टिट्यूशनमध्यें शिकत असतां दादाभाईच्या अप्रतिम बुद्धिमत्तेबद्दल त्यांचे गुरु कौतुक करीत असत. उत्तम गणिती म्हणून दादाभाईंची बरीच ख्याति होती. गणितशास्त्रांतील पारंगतता राजकारणाला फारशी अनुकूल नाहीं, अशी प्रचलित समजूत आहे. गणित-शास्त्रांतील पृथक्करणबुद्धि राजकारणांतील संग्राहक पद्धतीला पोषक नाहीं अशी कित्येकांची समजूत आहे. ही समजूत खरी किंवा खोटी आहे हें निश्चयानें सांगणें कठीण आहे. परंतु दादाभाईसारखे मुत्सद्दी उत्तम गणिती होते व रा. टिळकांसारखे राजकारणी पुरुष हेही उत्तम गणिती आहेत, ही गोष्ट लक्षांत घेण्यासारखी आहे. सरकारी रिपोर्टांत आंकड्यांचें जें जाळें पसरलेलें असतें त्यांचें सूक्ष्म परीक्षण करून हिंदुस्थानच्या सांपत्तिक स्थितीबद्दल दादाभाईंनीं जे सिद्धांत प्रस्थापित केले ते शोधून काढण्याचे कामीं गणितविषयांतील त्यांचें नैपुण्य त्यांना बरेंच उपयोगी पडलें असेल असें मानण्यास हरकत नाहीं. दादाभाईंचा अभ्यासक्रम पुरा झाल्यावर लौकरच म्हणजे १८५४ सालीं त्यांना सरकारनें त्यांच्याच कॉले-जांत गणिताचे प्रोफेसर नेमलें. मुंबई इलाख्यांत हे पहिलेच हिंदी प्रोफेसर अस-ल्यामुळें त्यांच्या नेमणुकीमुळें लोकांना फार समाधान वाटलें. आणि खुद्द दादा-भाईंनाही आपल्या गुरुपदाच्या काळाची आठवण झाली म्हणजे विशेष आनंद होत असे. दादाभाई प्रोफेसर असतांना ( सर ) रामकृष्ण भांडारकर हे त्यांचे विद्यार्थी होते. आणि दादाभाईंच्या प्रोत्साहनानेंच भांडारकरांचें प्राच्यविद्यासंशो-धनाकडे लक्ष लागलें असें म्हणतात. शिक्षक व प्रोफेसर यांच्यासंबंधानें आज सरकारनें कडक निर्बंध केले आहेत, ते त्यावेळीं नव्हते, व म्हणून त्यांना सार्व-जनिक चळवळींत आपल्या इच्छेप्रमाणें पडतां येत असे. आपला अभ्यासक्रम पुरा झाल्याबरोबरच दादाभाईंनी स्वदेशसेवाव्रत स्वीकारलें. हिंदुस्थानची त्यावेळीं अशीच स्थिति होती कीं, शैक्षणिक आणि सामाजिक विषयांकडे प्रमुख विचारी गृहस्थांचें प्रामुख्यानें लक्ष लागत असे. ब्रिटिश साम्राज्याचे तोटे अद्याप अनु-भवास येऊं लागले नव्हते, आणि राजकीय महत्त्वाकांक्षाही जागृत झालेल्या नव्हत्या. हिंदुस्थानची अवनति झालेली पाहून सुशिक्षित लोकांना दुःख होत असे व ती नाहींशी करण्याकरितां प्रयत्न करणें आपलें कर्तव्य आहे ही भावना त्यांच्यामध्यें उत्पन्न झाली होती. हिंदी समाज त्यावेळीं अज्ञानपंकांत इतका रुतला होता कीं, शिक्षणाचा प्रसार करून लोकांना ज्ञानामृत पाजणें हें आपलें आद्य-

कर्तव्य होय, अशी जाणीव आंग्लविद्याविभूषित गृहस्थांच्या मनांत उत्पन्न झालेली होती. शिवाय समाजांत रूढ असलेल्या घातुक चालीरीती नष्ट केल्याशिवाय हिंदुस्थानला पुन्हां ऊर्जितावस्था येणार नाहीं, व त्याला राजकीय महत्पद प्राप्त होणार नाहीं असाही विचार सुशिक्षित वर्गांत उत्पन्न झाला होता. अशी स्थिति असल्यामुळें ज्या सार्वजनिक चळवळी चालू होत्या त्या मुख्यत्वेंकरून शिक्षण-विषयक व सामाजिक होत्या. राजकीय चळवळीला आज जें प्राधान्य मिळालें आहे तें तिला त्यावेळीं मिळणें शक्य नव्हतें. दादाभाई नौरोजी यांनीं त्यावेळच्या या परिस्थितीस अनुसरून शिक्षणविषयक व सामाजिक चळवळी सुरू केल्या. मुंबईतील पुष्कळ सामाजिक आणि शिक्षणविषयक संस्थांचें जनकत्व दादाभाईकडे आहे. राष्ट्रीय सेवा करण्याला उत्सुक झालेल्या मताभिमानी मनुष्याला आपले विचार निर्भीडपणें प्रदर्शित करून लोकांत जागृति उत्पन्न करण्याकरितां वर्तमानपत्र काढावें असें वाटत असतें; आणि त्याप्रमाणें दादाभाईनीं **रास्त गोफ्तार** या नांवाचें साप्ताहिक काढून आपल्या समाजाला जागृत करण्याचें कार्य आरंभिलें. सुधारणा हें गोफ्तारचें ध्येय होतें, आणि तें सिद्धीस नेण्याकरितां हिंदी लोकांनीं धर्मभेद जातिभेद वगैरे सर्व भेदभाव टाकून दिले पाहिजेत असा उपदेश दादाभाई आपल्या पत्रांतून करीत असत. पारशी समाजाची हरएक बाबतींत आज जी प्रगति झालेली दिसून येते, तिचें श्रेय बऱ्याच अंशीं **रास्त गोफ्ताराला** दिलें पाहिजे. १८५५ सालीं दादाभाईनीं अध्यापकाच्या जागेचा राजीनामा देऊन ते लंडन येथें स्थापन झालेल्या कामा नांवाच्या व्यापारी कंपनीला मिळाले. अध्यापकाची जागा दादाभाईना प्रिय असतां ती सोडून देऊन ते व्यापारांत कां शिरले हें समजत नाहीं. परंतु सुशिक्षित हिंदी लोक सरकारी नोकरीचीच हांव धरतात, उद्योगधंदे व व्यापार यांकडे ते लक्ष देत नाहींत, हा आक्षेप दूर करण्याला आपण अंशतः तरी कारणीभूत व्हावें या उदात्त हेतूनें त्यांनीं प्रोफेसरासारख्या योग्यतेच्या जागेचा राजिनामा दिला असावा असा तर्क केल्यास तो चुकीचा ठरणार नाहीं असें आम्हांस वाटतें. शिवाय, विलायतेस राहून हिंदी लोकांची राजकीय गाऱ्हाणीं दूर करण्याचा प्रयत्न अधिक सफल होण्याचा संभव आहे असेंहि त्यांना वाटलें असावें. तें कसेंही असो; एवढी गोष्ट निर्विवाद आहे कीं, विलायतेंतहि संपत्ति मिळविण्यांत आपलें आयुष्य न घालवितां दादाभाईनीं तेथें गेल्याबरोबर राजकीय चळवळीस सुरुवात केली.

तेथें त्यांनीं लंडन इंडियन सोसायटी, ईस्ट इंडिया असोसिएशन वगैरे संस्था स्थापन करून त्यांच्याद्वारें हिंदुस्थानचें दारिद्र्य, हिंदुस्थानच्या राज्यकारभारांतून हिंदी लोकांना केलेला मज्जाव, समकालीन सिव्हिलसर्व्हिस परीक्षा इत्यादि प्रश्नांकडे ब्रिटिश जनतेचें व मुत्सद्यांचें लक्ष वेधण्याचा उपक्रम केला. १८६९ सालीं ते हिंदुस्थानांत परत आले. त्यावेळीं त्यांना मुंबईकरांनीं आहेर केला. १८७१।१८७२ त हिंदुस्थानच्या जमाखर्चाचा विचार करण्याकरित बसलेल्या पार्लमेंटाच्या कमिटीपुढें त्यांची साक्ष झाली. त्या साक्षींत त्यांनीं हिंदुस्थान किती दरिद्री झालेलें आहे हें उत्तम रीतीनें सांगितलें. हिंदी लोकांना मोठमोठाल्या जागा देण्यांत येतील, अशीं वचनें सरकारनें वेळोवेळीं दिलीं असतां, तीं पाळलीं जात नाहींत, त्यामुळें, आणि हिंदुस्थानचे उद्योगधंदे बुडून त्याचा बहुतेक सर्व व्यापार परकीयांच्या हातांत गेल्यामुळें, हिंदुस्थानच्या संपत्तीचा कसा अपहार होत आहे व त्यामुळें तो दिवसेंदिवस कसा अधिकाधिक भिकारी होत चालला आहे हें दादाभाईनी आपल्या जबानींत सांगितलें. हिंदुस्थानांत परत आल्यावर मल्हारराव गायकवाड यांच्या कारकीर्दींत त्यांना बडोदा संस्थानचे दिवाण नेमण्यांत आलें. परंतु त्या संस्थानची त्यावेळीं इतकी चमत्कारिक स्थिति झाली होती कीं दादाभाईस दिवाणगिरीचा लवकरच राजिनामा द्यावा लागला. १८७६ सालीं लॉर्ड लिटन हे हिंदुस्थानचे व्हाइसरॉय होऊन आले. त्यांनीं मुस्कटदाबीचा कायदा करून देशी भाषेंतील वर्तमानपत्रांच्या स्वातंत्र्यावर गदा हाणली, आणि एकंदरींत प्रतिगामी धोरण स्वीकारलें. परंतु त्यांचे मागून उदारमतवादी लॉर्ड रिपन हे येऊन त्यांनीं पुन्हा मुद्रणस्वातंत्र्य स्थापित केलें आणि स्थानिक स्वराज्याची पद्धत सुरू केली. रिपन साहेबांच्या उदार धोरणामुळें, हिंदी लोकांच्या राजकीय आकांक्षांना अंकुर फुटून राजकीय चळवळ जोरानें चालविण्याला त्यांना उत्तेजन वाटूं लागलें. १८८५ च्या जानेवारी महिन्यांत बद्रुद्दीन तय्यबजी, फेरोजशहा मेथा, आणि काशिनाथ त्र्यंबक तेलंग यांनीं बॉम्बे प्रेसिडेन्सी असोसिएशन या नांवाची राजकीय संस्था स्थापन केली; आणि ही नूतन संस्था आणि पुण्यांतील सार्वजनिक सभा, या दोन संस्थांच्या द्वारें मुंबई इलाख्यांतील राजकीय चळवळीला जोर येऊं लागला.

इ० स० १८८५ हें वर्ष हिंदुस्थानच्या इतिहासांत अत्यंत महत्त्वाचें आहे. त्या वर्षी राष्ट्रीयसभेची स्थापना होऊन तिची पहिली बैठक मुंबई येथें बंगालचे

प्रसिद्ध बॅरिस्टर डब्ल्यू. सी. बॅनर्जी यांच्या अध्यक्षतेखालीं भरली. या राष्ट्रीय सभेला दादाभाई हजर होते आणि त्यांनीं दोन ठरावांवर भाषण केलें. त्यांपैकीं, एक ठराव कायदेकौन्सिलांच्या सुधारणेसंबंधीं होता. ह्या ठरावाला पुष्टी देतांना दादाभाई म्हणाले, " स्वराज्याकरितां प्रातिनिधिक संस्था किती आवश्यक आहेत याचें ज्ञान आम्हांला इंग्रजांकडून मिळालें आहे. या प्रातिनिधिक संस्था जर इंग्लंड आम्हांला देणार नाही, तर ब्रिटिशांच्या अंमलाखालीं राहण्यापासून हिंदुस्थानचा फायदा काय ? प्रातिनिधिक संस्थांविरहित इंग्रजी राज्य म्हणजे आशियाखंडांतलि अनियंत्रित राज्यपद्धतीची आवृत्ति होय. आजच्या घटकेस आमची स्थिति म्हणजे केवळ गुलामांची अगर ओझ्याच्या बैलांची झालेली आहे." दुसरा ठराव समकालीन सिव्हिल सर्व्हिस परीक्षेसंबंधानें होता, आणि त्यावरहि दादाभाईंचें उत्तम भाषण झालें. समकालीन परीक्षा न भरविण्यानें किती अन्याय होत आहे हें त्यांनीं उत्कृष्ट रीतीनें सांगितलें. १८८६ सालीं राष्ट्रीयसभा कलकत्त्यास भरली आणि तिच्या अध्यक्षत्वाचा बहुमान दादाभाई नौरोजी यांना देण्यांत आला. १८८७ सालीं पब्लिक सर्व्हिसेस कमिशनपुढें त्यांची साक्ष झाली आणि नंतर ते पुन्हां विलायतेस गेले. १८९२ सालीं पार्लमेंटाची निवडणूक झाली, आणि तींत तारीख ७ जुलै रोजीं ते सेंट्रलफिन्सबेरि या भागातर्फे निवडून आले. पार्लमेंटाचा सभासद ह्या नात्यानें झालेली त्यांची निवडणूक म्हणजे इंग्लंडच्या व हिंदुस्थानच्या इतिहासांत अत्यंत महत्त्वाची गोष्ट होय. एका हिंदी गृहस्थानें विलायतेस राहून नेटानें उद्योग करून आपल्या बुद्धिमत्तेनें आणि सार्वजनिक कळकळीनें परकीय मतदारांची मर्जी संपादन करावी, आणि ब्रिटिश पार्लमेंटासारख्या पुरातन व वजनदार लोकसभेंत निवडून यावें या एकाच गोष्टीवरून योग्य संधी व अनुकूल परिस्थिति प्राप्त झाली असतां हिंदी लोक किती योग्यतेला चढूं शकतील, हें चांगलें सिद्ध होतें. दादाभाईंच्या निवडणुकीनें हिंदुस्थानांत जिकडे तिकडे आनंदीआनंद झाला. आणि त्यांचें अभिनंदन करण्याकरितां व सेंट्रल फिन्सबेरीच्या मतदारांचे आभार मानण्याकरितां सर्वत्र सभा झाल्या. मुंबईस भरलेल्या प्रचंड सभेला प्रस्तुत लेखक हजर होता. त्यावेळचा उत्साह अद्याप त्याच्या डोळ्यांसमोर आहे, आणि त्यावेळीं झालेलीं जोरदार भाषणें, व विशेषतः फेरोजशहा मेथा यांचें उत्साहपूर्वक भाषण अद्याप त्याचे कानांत दुमदुमत आहे. तारीख ९ आगष्ट १८९२ रोजीं दादाभाईंचें पार्लमेंटांतील पहिलें भाषण झालें.

दादाभाइचा पार्लमेंटांत निवड झाली खरी, परंतु ग्लॅडस्टननें आयर्लंडला होमरूल देण्याकरितां आणलेल्या बिलाबद्दल रणकंदन माजून सरतेशेवटीं १८९५ सालीं पार्लमेंट बरखास्त करण्यांत येऊन त्याची पुन्हां निवड झाली. सेंट्रल फिन्सबेरीच्या मतदारांनीं आपणाला पुन्हां निवडावें म्हणून दादाभाईनीं पुष्कळ प्रयत्न केला, परंतु त्यांना त्यांत यश आलें नाहीं. पार्लमेंटाचे सभासद या नात्यानें दादाभाईंची कारकीर्द जरी अवघी तीन वर्षांचीच झाली, तरी तितक्या अवधीत त्यांनीं हिंदी लोकांचीं गाऱ्हाणीं आणि त्यांच्या राजकीय आकांक्षा ब्रिटिश पार्लमेंटापुढें मांडण्याकरितां शक्य तितका प्रयत्न केला. सिव्हिल सर्व्हिस परीक्षा हिंदुस्थानांत घेण्यांत यावी, असा ठराव मि० पाल यांनीं आणला व त्याला दादाभाईनीं दुजोरा दिला. तो ठराव बहुमतानें पास झाला आणि त्याची अम्मलबजावणीहि करण्यांत येईल असें आश्वासन स्टेट सेक्रेटरीनें दिलें. तथापि हिंदुस्थानसरकारच्या विरोधामुळें त्याला सरतेशेवटीं वाटाण्याच्या अक्षता मिळाल्या. हिंदुस्थानांत सिव्हिल सर्व्हिस परीक्षा भरविण्यांत यावी असा ठराव पार्लमेंटानें बहुमतानें केला असतां, हिंदुस्थानांतील गोऱ्या अधिकाऱ्यांच्या विरोधामुळें त्याला स्टेट सेक्रेटरीनें धाब्यावर बसविलें, ही गोष्ट अत्यंत गर्हणीय झाली यांत शंका नाहीं. हिंदी लोकांची स्थिति, त्यांच्या गरजा, त्यांच्यावर असलेलें करांचें ओझें सहन करण्याचें त्यांचें सामर्थ्य, खर्चांत काटकसर करण्याची शक्यता, हिंदुस्थान आणि ग्रेटब्रिटन यांचे दरम्यान असलेले जमाखर्चाचे संबंध, आणि हिंदुस्थानची एकंदर राज्यपद्धति ह्या बाबींविषयीं चौकशी करण्याकरितां पार्लमेंटाची कमिटी नेमण्यांत यावी, असाही ठराव दादाभाईनीं पार्लमेंटापुढें मांडला. ह्या ठरावावर त्यांनीं मुद्देसूद, माहितीनें भरलेलें व कळकळ्याचें भाषण केलें. परंतु त्याचा कांहीं उपयोग न होतां तो नामंजूर झाला. १८९३ सालीं लाहोर येथें राष्ट्रीय सभा भरली आणि तिचें अध्यक्षस्थान दादाभाईंना देण्यांत आलें. राष्ट्रीयसभेचें अधिवेशन संपल्यावर ते पुन्हां विलायतेस गेले. १८९५ सालीं झालेल्या निवडणुकींत त्यांना यश आलें नाहीं. तथापि त्यामुळें निरुत्साह न होतां त्यांनीं आपलें कार्य तसेंच चालू ठेविलें. त्यांच्याच उद्योगामुळें १८९५ सालीं हिंदुस्थानच्या जमाखर्चाबद्दल चौकशी करण्याकरितां सरकारनें कमिशन नेमून त्याचे त्यांना सभासद नेमलें. हिंदुस्थानच्या दारिद्र्याविषयीं दादाभाईनीं आपलें मत कमिशनपुढें मांडलें, आणि जरी ते स्वतः सभासद होते, तरी त्यांनीं साक्षीदार ह्या नात्यानें साक्षहि देऊन तींत हिंदुस्थानच्या दारिद्र्याविषयीं

आपल्याजवळ असलेला सर्व पुरावा सादर केला. १९०६ साली त्यांना पुन्हां राष्ट्रीयसभेचे अध्यक्ष निवडण्यांत आलें, आणि त्यावेळीं त्यांनीं केलेलें भाषण अत्यंत महत्त्वाचें असून, त्यांत त्यांनीं आपल्या देशबांधवांना स्वराज्याचा मंत्र दिला आहे. १९०७ सालीं पुन्हां ते विलायतेस गेले; परंतु डॉक्टरच्या सल्ल्या-वरून ते १९०८ मध्यें हिंदुस्थानांत परत आले. तेव्हांपासून ते मुंबईजवळ वरसोवा येथें रहात असत. हिंदुस्थानांत परत आल्यावर ते वार्धक्यामुळें सार्व-जनिक चळवळींत पडत नसत; परंतु त्यांच्या वास्तव्यामुळें वरसोवा ह्या गांवाला राजकीयक्षेत्राचें महत्त्व आलें होतें. आणि मधून मधून ते पत्रद्वारें राष्ट्रसेवकांना आशीर्वाद व उत्तेजन देत असत.

## दादाभाईंचे विचार.

दादाभाईंचा जीवनवृत्तांत वर लिहिल्याप्रमाणें आहे. हिंदुस्थानची सध्यांची परिस्थितिच अशी आहे कीं, दादाभाईंसारख्या व्यक्तींना सुद्धां ग्लॅडस्टन, मार्किस इटो, किंवा युआनशिकाई यांच्याप्रमाणें मोठमोठाले उपक्रम करणें शक्य नाहीं. दादाभाईंनी ब्रिटिश पार्लमेंटांत आपला शिरकाव करून घेतला, ही त्यांनीं विशेष पराक्रमाची गोष्ट केली हें खरें; आणि जर त्यांचें सभासदत्व आणखी कांहीं वर्षें टिकलें असतें, तर पार्लमेंटावर त्यांची छाप बसून त्यांच्या हातून बरीच काम-गिरी झाली असती यांतहि शंका नाहीं. परंतु हिंदुलोकांच्या दुर्दैवामुळें पार्लमेंट लवकरच बरखास्त होऊन पुन्हां झालेल्या निवडणुकींत त्यांना यश आलें नाहीं; आणि त्यामुळें त्यांना चळवळीशिवाय दुसरें कार्य करतां आलें नाहीं. हिंदुस्था-नांत जोंपर्यंत जबाबदार राज्यपद्धति स्थापन झाली नाहीं, तोंपर्यंत हिंदी देशभ-क्तांना 'चळवळ्ये' बनल्याशिवाय गत्यंतर नाहीं. अशी स्थिति असल्यामुळें, त्यांच्या प्रत्यक्ष कृतीपेक्षां त्यांच्या विचारांचेंच आणि त्यांनीं चालविलेल्या चळ-वळींचेंच अधिक महत्त्व आहे. असो; दादाभाईंचा अत्यंत आवडीचा विषय म्हटला म्हणजे **हिंदुस्थानचें दारिद्र्य** हा होय. १८७० सालीं त्यांनीं त्या विषयावर निबंध लिहून असें सप्रमाण सिद्ध केलें कीं, हिंदी लोकांच्या वार्षिक उत्पन्नाचें प्रमाण प्रत्येक माणशीं वीस रुपयांपेक्षां जास्त पडत नाहीं. ब्रिटिश लोकांनीं हिंदुस्थानांत जी राज्यपद्धति स्थापन केली आहे, आणि ज्या व्यापारी धोरणाचा अवलंब केला आहे, त्यामुळें हिंदुस्थान दिवसेंदिवस भिकारी होत चालला आहे असें दादाभाईंचें पक्कें मत झालें होतें, आणि तें मत ते वारंवार

निर्भीडपणें व्यक्त करीत असत. ब्रिटिश सरकारच्या राजकीय व औद्योगिक धोरणामुळें हिंदुस्थानांतून विलायतेस अलोट संपत्ति जात आहे आणि त्यामुळे हिंदी लोक खालावत चालले आहेत, आणि हा द्रव्यशोष ( Drain ) जरी अजिबात बंद करतां आला नाहीं तरी तो पुष्कळच कमी झाल्याशिवाय हिंदुस्थानची सांपत्तिक स्थिति सुधारणार नाहीं हें आपलें मत ते सदासर्वदा व्यक्त करीत असत, व त्याबद्दल त्यांना अँग्लो इंडियन अधिकाऱ्यांची इतराजीहि संपादन करावी लागली होती. आज कांही अँग्लोइंडियन पत्रकार त्यांचे गोडवे गात आहेत; आणि त्यांचा गौरव करून मिसेस बेझंटसारख्या स्वराज्यसंघाच्या अग्रणीची अप्रत्यक्ष निर्भर्त्सना करीत आहेत. परंतु हेच टीकाकार दादाभाईंना एके काळीं जहाल समजत असत, ही गोष्ट लक्षांत घेण्यासारखी आहे. हिंदुस्थानच्या दारिद्र्याच्या प्रश्नाचा विचार दादाभाईंनीं जसा केला होता, तसा दुसरा कोणीहि केला नव्हता व अद्याप केलेला नाहीं. हिंदुस्थानचा द्रव्यशोष होत आहे, आणि त्याला आळा न घातल्यास अनर्थपरंपरा ओढवल्याशिवाय रहाणार नाही, या मताचे आद्य संस्थापक दादाभाई होते, असें नाहीं. त्यांच्या पूर्वी सुद्धां कित्येक अँग्लो-इंडियन अधिकाऱ्यांनींच तें मत व्यक्त केलेलें होतें. दादाभाईंनीं आपल्या लेखांत याविषयींचे अँग्लोइंडियन अधिकाऱ्यांचे अभिप्राय नमूद केले आहेत. हिंदुस्थान दरिद्री आहे, आणि त्याची पुष्कळशी संपत्ति विलायतेस जात असल्यामुळें त्यांत कांहीं त्राण उरला नाहीं असें मत कोणी व्यक्त केल्यास, सरकारास अलीकडे राग येतो. आणि हिंदुस्थानच्या संपत्तीचें शोषण होत चाललें आहे ( Drain theory ) हें मत चुकीचें आहे, असा आपला अभिप्राय सरकारनें ठोकूनहि दिला आहे. नुकतेंच हें मत एका गुजराथी लेखकानें आपल्या पुस्तकांत व्यक्त केल्यामुळें ज्या छापखान्यांत तें पुस्तक छापण्यांत आलें होतें, त्याच्या मालकाला प्रेसॲक्टान्वयें जामीन द्यावा लागला. सारांश, आपल्या अंमलाखालीं हिंदुस्थानदेश भिकारी होत चालला आहे असें कोणी बोललेलें किंवा लिहिलेलें सरकारास खपत नाहीं. परंतु हा प्रश्न इतका महत्त्वाचा आहे कीं, त्याचें शास्त्रीय पद्धतीनें विवेचन होणें अगदीं अवश्य आहे. या प्रश्नाचें शास्त्रीय पद्धतीनें प्रथम जर कोणीं विवेचन केलें असेल तर तें दादाभाईंनींच होय. १८७०।१८७१ सालचे आंकडे घेऊन त्यांनीं दाखविलें आहे कीं, जमीनमहसुलाचें सरकारचें उत्पन्न सुमारें २,१०,०००,०० पौंड आहे. जमिनीचा सारा उत्पन्नाच्या $\frac{1}{८}$ पेक्षां जास्त नाहीं असें मानण्यास हरकत नाहीं. म्हणजे जमि-

र्मीचें सर्व उत्पन्न १,६०,००,०००० पौंड होतें. या उत्पन्नांत मिठावरचा कर, अफूवरचा कर, जंगलखात्याचें उत्पन्न, उद्योगधंद्यापासून होणारें उत्पन्न, इत्यादि बाबींपासून झालेलें उत्पन्न मिळविलें असतां एकंदर उत्पन्न ३००००००० पौंड होतें. आतां १८७०।१८७१ सालीं ब्रिटिश इंडियाची लोकवस्ती १५००००००० कोटी होती. तेव्हां, प्रत्येक माणशीं २ पौंड किंवा त्यावेळच्या पौंडाच्या भावाप्रमाणें वीस रुपये उत्पन्नाचें प्रमाण पडतें. हा मुख्य सिद्धांत सरकारी रिपोर्टांतून प्रत्येक प्रांताचे उत्पन्नाचे आंकडे घेऊन दादाभाईंनीं स्थापित केला आहे. दादाभाईंनी केलेला अंदाज १८७०।१८७१ सालचा आहे, आणि तो आजच्या स्थितीशीं जुळेलच असें खात्रीनें म्हणतां येत नाहीं. तथापि त्यांचा अंदाज सरकारी अंदाजापेक्षां अगदीं कमी आहे असें नाहीं. सरकारच्या अंदाजाप्रमाणें हिंदुस्थानचें दर माणशीं उत्पन्न तीस रुपयांपेक्षां अधिक नाहीं. तीस रुपयांचा अंदाज हाही कमीच आहे, असें जरी क्षणभर गृहीत धरलें आणि त्याऐवजीं चाळीस रुपयांचें प्रमाण मान्य केलें, तरी देखील हिंदुस्थान हा अतिशय दरिद्री आहे हा सिद्धांत चुकीचा ठरत नाहीं. **भारतसेवका**च्या फेब्रुवारीच्या अंकांत रा. देवळे यांचा 'हिंदुस्थानांतील उद्योगधंदे आणि सरकार' या विषयावर लेख प्रसिद्ध झाला आहे. त्यांत त्यांनी प्रत्येक देशाचें दर माणशीं उत्पन्न दिलें आहे. त्यावरून असें दिसून येईल कीं, हिंदुस्थानच्या दर माणशीं उत्पन्नाचें प्रमाण जरी चाळीस रुपये धरलें तरी देखील तें इतर देशांच्या दर माणशीं उत्पन्नापेक्षां किती तरी कमी आहे! दादाभाईंच्या पद्धतीचा अवलंब करून पुन्हां या प्रश्नाचें शास्त्रीय पद्धतीनें व्यवस्थित विवेचन होणें अवश्य आहे.

हिंदुस्थान दरिद्री आहे, यास उत्तरपक्ष असा करण्यांत येतो कीं, बाजारभाव आणि मजुरीचे दर वाढत आहेत, आणि परदेशांतून हिंदुस्थानांत पुष्कळशी चांदी व सोनें येत आहे. या आक्षेपांचेंहि दादाभाईंनीं मुद्देसूद विवेचन करून असें सिद्ध केलें आहे कीं, बाजारभावाची वाढ स्थानिक व तात्पुरती असून तिचें मुख्य कारण रेल्वेचा विस्तार हें होय. दादाभाईंचें हें मत आजच्या स्थितीला जुळणार नाहीं, कारण बाजारभाव हे सर्वत्र वाढलेले आहेत. तथापि या मुद्याचाहि अधिक व्यवस्थित रीतीनें विचार होणें अवश्य आहे. मजुरीच्या दरांच्या वाढीसंबंधानेंहि दादाभाईंचें असें मत आहे कीं, तींत झालेली वाढ

सार्वत्रिक नसून जेथें रेल्वे वगैरे कामें चालू आहेत, तेथेंच झालेली आहे. सोन्यारुप्याच्या स्वरूपांत पुष्कळशी संपत्ति हिंदुस्थानांत सांठविलेली आहे, या आक्षेपाला उत्तर देतांना दादाभाई म्हणतात, " हिंदुस्थानांतील लोकांनीं दागिन्यांची किंवा चीजवस्तूंची मुळींच आवड बाळगूं नये, आणि त्यांनीं केवळ जनावराप्रमाणें राहावें, असें ब्रिटिशांचें म्हणणें आहे काय ! वस्तुस्थिति अशी आहे कीं, कोट्यवधि लोकांना पोट भरण्याचीच मारामार पडते, व चांदीचें नाणेंहि त्यांच्या दृष्टीस पडत नाहीं. एकेकाळीं हिंदुस्थानची संपत्ति अलोट होती, परंतु आतां हिंदुस्थानची संपत्ति म्हणजे केवळ शब्द होत. " ब्रिटिश राज्यपद्धतीचे नैतिक दुष्परिणामहि दादाभाईंनीं चांगल्या रीतीनें दाखविले आहेत. ते म्हणतात, " हिंदुस्थानच्या संपत्तीबरोबर अनुभव आणि शहाणपण हींहि हिंदुस्थानांतून नाहींशीं होतात. प्रत्येक खात्यांतील बहुतेक सर्व वरिष्ठ जागा युरोपियनांना देण्यानें असा परिणाम झाला आहे कीं, हिंदुस्थानांत असतांना त्यांना हिंदुस्थानचें द्रव्य, आणि मोठमोठ्या हुद्यांच्या नोकऱ्या करण्यानें प्राप्त होणारा अनुभव आणि शहाणपण, हीं मिळतात; आणि पेन्शन घेऊन ते आपले देशांत परत गेले म्हणजे, त्यांनीं संपादन केलेल्या अनुभवाला आणि शहाणपणाला हिंदुस्थान मुकतें. अशा रितीनें हिंदुस्थानची नैतिक संपत्तीहि नष्ट होते. " ते आणखी म्हणतात, " इंग्लंडचें हिंदुस्थानाशीं जें धोरण आहे आणि त्याचें इतर देशांशीं जें धोरण आहे, त्यामध्यें विलक्षण तफावत आहे. सनदशीर प्रतिनिधिसत्ताक राज्यपद्धति मिळविण्याकरितां झगडणाऱ्या प्रत्येक राष्ट्राबद्दल इंग्लंड केवळ आपली सहानुभूति व्यक्त करतें इतकेंच नव्हे तर त्याला मदतहि करतें. एकीकडे पहावें तर इंग्लंड सनदशीर राज्यपद्धतीची जननी आहे. उलटपक्षीं हिंदुस्थानांतील राज्यपद्धतीकडे पहावें तर ती केवळ अनियंत्रित असून त्यामुळें हिंदुस्थानच्या द्रव्याचा आणि नैतिक संपत्तीचा अपहार होत आहे. हिंदुस्थानांत कायदेकौन्सिलें स्थापन करण्यांत आलीं आहेत परंतु हीं कौन्सिलें म्हणजे फार्स होत. इंग्लंडनें सनदशीर राज्यपद्धतीची देणगी ज्याला देण्यास हरकत नाहीं असा जर कोणता देश असेल, तर तो हिंदुस्थान होय. परंतु इतर देशांकरितां वाटेल तें करण्याला जें इंग्लंड तयार होतें, तेंच, हिंदी लोकांना राज्यकारभारांत किंवा कायदेकानू करण्यांत अधिक भाग देण्याचा प्रश्न निघाला कीं, कोणती ना कोणती तरी सबब सांगून त्याकडे दुर्लक्ष करितें. इंग्लंडच्या पार्लमेंटाप्रमाणें हिंदुस्थानांत एकदम पार्लमेंट

स्थापन करावें असें कोणी म्हणत नाहीं, परंतु हिंदी लोकांना खऱ्याखुऱ्या प्रातिनिधिक संस्था देण्याचा इंग्लंडनें प्रयत्न केला आहे काय ?" हिंदुस्थानांतील अनियंत्रित राज्यपद्धतीचा परिणाम अप्रत्यक्ष रीत्या इंग्लंडच्या सनदशीर राज्यपद्धतीवरहि होऊन इंग्लिश लोकांच्या राजकीय संस्था आणि इंग्रजांचें राष्ट्रीय चारित्र्य सरतेशेवटीं एकतंत्री राज्यपद्धतीला पोषक झाल्यावांचून राहणार नाहींत, असेंहि दादाभाईंनीं उत्कृष्ट रीतीनें दाखविलें आहे. हिंदुस्थानच्या पूर्वीच्या राज्यकर्त्यांपेक्षां आमचें राज्य कितीतरी अधिक चांगलें आहे, अशी इंग्रज लोक बढाई मारीत असतात. तिला उद्देशून दादाभाई म्हणतात, "पूर्वीच्या राज्यकर्त्यांशीं तुलना करून आपल्या राज्याचें श्रेष्ठत्व स्थापन करण्याचा ब्रिटिश लोकांचा प्रयत्न निरर्थक आहे. सुधारणेंत आणि प्रगतींत गतकालीन राजांपेक्षां ब्रिटिश लोक अधिक श्रेष्ठ असणार नाहींत, त्यांच्या अमदानींत पूर्वीच्या राज्यापेक्षां हिंदुस्थानची अधिक भरभराट होणार नाही, तर त्यांच्या हिंदुस्थानांतील राज्याचें नैतिक समर्थनच करितां येणार नाहीं. आजपर्यंत हिंदुस्थानचा नैतिक आणि सांपत्तिक शोष झाला आहे तो बुद्धिपुरस्सर झालेला नाहीं, असें समजून आम्ही त्याकडे दुर्लक्ष करूं. परंतु यापुढें तो शोष चालूं राहिला, तर आम्हांला जाणूनबुजून लुबाडण्यांत येत आहे आणि जाणूनबुजून आमचा नाश करण्यांत येत आहे असें आम्ही कां म्हणूं नये ?" ब्रिटिश लोकांच्या राजकीय धोरणानें हिंदुस्थानचा नैतिक ऱ्हास कसा होत आहे, याबद्दल दादाभाईंनीं लिहिलेला लेख अत्यंत मननीय आहे. तो त्यांनीं १८८० सालीं लिहून हिंदुस्थानचे त्यावेळचे अंडर सेक्रेटरी सर लुई मॅलेट यांना सादर केला. तो लिहून आज सदतीस वर्षें झालीं आहेत, परंतु त्यांतील बहुतेक विधानें आजच्या स्थितीला पूर्णपणें लागूं पडण्यासारखी आहेत. हिंदी लोकांच्या लायकीबद्दल अलीकडे बराच खल चालू आहे. त्यासंबंधानेंहि दादाभाईंचे विचार निर्भीडपणाचे आहेत. ते म्हणतात, "आपली लायकी व्यक्त करण्याला संधी द्यावयाची नाहीं, आणि नंतर तुम्ही नालायक आहां अशी आमची बदनामी करावयाची. जुलमी राज्यकर्त्यांच्या पद्धतीचाच हा मासला आहे. सिव्हिल सर्व्हिस परीक्षा देण्याकरितां हिंदी लोकांना अनेक अडचणी सोसून परदेशांत जावें लागतें. सैन्यांत व आरमारांत त्यांना कमिशनच्या जागा देण्यांत येत नाहींत. असे अनेक अन्याय्य निर्बंध, पार्लमेंटानें केलेले कायदे आणि दिलेलीं वचनें, मोडून करण्यांत आलीं आहेत. असें असतां हिंदी

लोक नालायक आहेत, अशी उलटीच बोंब मारण्यांत येते, याला काय म्हणावें? योग्य संधी मिळाल्यास हिंदी लोक किती योग्यता संपादू शकतील हें राजकुमार रणजित सिंहजी, मि. चॅटर्जी आणि प्रो. बोस, यांच्याबद्दल टाईम्समध्यें प्रसिद्ध झालेल्या लेखावरून स्पष्ट आहे."

पूर्वीच्या राज्यांपेक्षां ब्रिटिशांचें राज्य अधिक चांगलें आहे व म्हणून हिंदी लोकांनीं असंतुष्ट असूं नये, असें वारंवार सांगण्यांत येतें. त्याबद्दल दादाभाईंनीं १८५३ सालीं एक निबंध प्रसिद्ध केला. त्यांत ते म्हणतात कीं, "इंग्रजलोक जितके चांगले आहेत असें आपण म्हणतों तितके ते वस्तुतः आहेत, असें नाहीं. उलटपक्षीं हिंदी लोक जितके वाईट आहेत असें भासविण्यांत येतें तितके ते वाईट नाहीत. इंग्रजांची राज्यपद्धति आणि त्यांच्या संस्था अगदीं निर्दोष आहेत आणि हिंदी लोकांच्या अगदी सदोष होत्या असेंहि नाही. ब्रिटिश अंमलाखालीं हिंदुस्थानची उन्नति होत चालली आहे, याचा अर्थ इतकाच कीं, एकोणिसाव्या शतकांतील एका ख्रिस्ती देशाचें राज्य पंधराव्या आणि सोळाव्या शतकांतील हिंदुमुसलमानांच्या राज्यापेक्षां अधिक चांगलें आहे. ब्रिटिश राज्याच्या श्रेष्ठत्वाची हीच सीमा आहे, आणि ती स्थापन करतांना मुद्धा ब्रिटिश राजकर्त्यांच्या गुणांचें व कृतींचें अतिशयोक्तीनें वर्णन करावें लागतें आणि पूर्वीच्या राज्यकर्त्यांचे गुण व कृती यांना विनाकारण कमी लेखावें लागतें. आणि याउप्परहि ब्रिटिशांचें राज्य खरोखर अधिक चांगलें आहे किंवा नाहीं, हा प्रश्नच राहतो."

१९०६ सालीं कलकत्ता येथें भरलेल्या राष्ट्रीय सभेचे अध्यक्ष या नात्यानें दादाभाईंनीं केलेल्या भाषणांतील दोन अवतरणें आम्ही या लेखाच्या आरंभींच दिलीं आहेत. तीं किती मननीय आहेत हें कोणाच्याहि लक्षांत येईल. विद्याभ्यास पुरा झाल्यावर तावडतोब दादाभाईंनीं सार्वजनिक कामें करण्याला सुरवात केली. त्यांचे अत्यंत आवडीचे विषय म्हटले म्हणजे हिंदुस्थानचें दारिद्र्य आणि समकालीन सिव्हिल सर्व्हिस परीक्षा हे होत. ब्रिटिश सरकारनें हिंदुस्थानच्या दारिद्र्याचें ओझें हलकें करावें म्हणून त्यांनीं सतत प्रयत्न केला; परंतु त्याकडे कोणी लक्ष दिलें नाहीं. उलट दादाभाई हे जहाल असून ब्रिटिश राज्याची विनाकारण नालस्ती करतात अशी कित्येकांना त्यांच्यावर टीका केली. दादाभाईंचें दारिद्र्याचें रडगाणें म्हणजे अरण्यरुदित झालें. हिंदुस्थानच्या संपत्तीचा प्रवाह एक-

सारखा इंग्लंडांत वाहत असल्यामुळें हिंदुस्थान या सांपत्तिक ऱ्हास होत चालला आहे, हें त्यांचें विधान म्हणजे केवळ वेड्याचें बरळणें आहे अशा प्रकारची टीका त्यांच्या प्रतिस्पर्ध्यांनीं त्यांचेवर केली. दादाभाई हे जर पारशी नसते आणि त्यांनीं आपले लेख मायभाषेंत लिहिले असते तर ते इंडियन पिनल कोडाच्या कचाट्यांतून सुटले असते किंवा नाहीं हा प्रश्नच आहे. हिंदुस्थान देश भिकार होत चालला आहे, असा टाहो दादाभाई एकसारखे फोडीत होते; परन्तु ब्रिटिशांच्या कठीण हृदयावर त्याचा फारसा परिणाम झाला नाहीं व अलीकडे तर हिंदुस्थनचा द्रव्य-शोष चालला आहे या सिद्धांताला बहिष्कृत सिद्धांतांच्या पंक्तीला सरकारनें कायद्याचा दंडुका उभारून बसविलें आहे. हिंदुस्थानच्या सांपत्तिक शोषाला आळा घालण्याचें एक साधन सिव्हिल सर्व्हिस परीक्षा हिंदुस्थानांत घेणें हा होय, अशी दादाभाईंची पक्की खात्री झाली होती, म्हणून त्या प्रश्नाचाहि त्यांनीं एकसारखा पिच्छा पुरविला. हिंदी लोकांच्या बुद्धिमत्तेवर त्यांचा अर्थातच इतका विश्वास होता कीं, सिव्हिल सर्व्हिस परीक्षा जर हिंदुस्थानांत घेण्यांत येईल तर वरिष्ठ प्रतीच्या जागा त्यांना योग्य प्रमाणानें मिळाल्याशिवाय राहणार नाहींत, आणि त्यामुळें हिंदुस्थानच्या द्रव्याचा शोष अंशतः तरी कमी होईल अशी त्यांची खात्री होती. दादाभाईंची चिकाटी अवर्णनीय असल्यामुळें जो जो प्रश्न त्यांनीं हातीं घेतला त्याचें पूर्ण अध्ययन करून त्याचा त्यांनी पिच्छा पुरविला. या समकालीन परीक्षेच्या प्रश्नांत त्यांच्या चिकाटीला यशहि आलें. हिंदुस्थानांत सिव्हिल सर्व्हिस परीक्षा घेण्यांत यावी असा पार्लमेंटानें ठराव केला. परंतु त्यावेळच्या अनुदार स्टेट सेक्रेटरीनें व येथील अधिकाऱ्यांनीं त्याची अंमलबजावणी होऊं दिली नाही. दुधाचें पात्र ओंठाला लागलें नाहीं तोंच तें हिसकून घेण्यांत आलें. आणि आम्हांला वाटेल तेव्हां आम्ही पार्लमेंटाचीहि सत्ता धाब्यावर बसवूं शकूं असें अधिकाऱ्यांनीं निदर्शनास आणून दिलें. दादाभाईंनीं आपल्या कलकत्त्याच्या भाषणांत असें सांगितलें कीं माझी किती तरी निराशा झाली. बहुतेकांची उद्योगांत यश न आल्यामुळें निराशा होते. परंतु मला यश मिळून सरतेशेवटीं निराशा सोसावी लागली आहे. समकालीन सिव्हिल सर्व्हिस परीक्षेचा प्रश्न त्यांच्या वरील उद्गारांचें उदाहरण आहे. आपण एकसारखी चाळीस वर्षें खटपट केली, पार्लमेंटांत आपला शिरकाव करून घेतला आणि त्या सत्ताधीश ब्रिटिश जनतेच्या प्रतिनिधिमंडळानें आपल्या इच्छेनुरूप ठरावहि केला. परंतु केवळ स्टेट सेक्रेटरी आणि हिंदुस्थानांतील अधिकारी

यांच्या आपमतलबी आणि अन्याय्य विरोधामुळें या बाबतींत हिंदी लोकांना सरतेशेवटीं न्याय मिळाला नाहीं व अन्यायाचाच विजय झाला, हें पाहून कोणाचें अंतःकरण निराशेनें व निराशाजन्य त्वेषानें विदीर्ण होणार नाहीं ! दादाभाई म्हणतात कीं, दुसऱ्या एखाद्याला अशा प्रकारचे अनुभव आले असते तर तो कदाचित् बंडखोर बनला असता. परंतु अधिकारी कितीहि अन्यायी आणि आपमतलबी असले तरी त्यांना जिला सरतेशेवटीं जाब द्यावा लागतो, ती ब्रिटिश जनता न्यायप्रिय असून हिंदी लोकांचें कल्याण करण्याचीच तिची इच्छा आहे असा त्यांचा भरंवसा असल्यामुळें सतत प्रयत्न केल्यास सदनशीर चळवळीस सरतेशेवटीं यश आल्यावांचून राहणार नाहीं अशी त्यांची खात्री होती. व म्हणून त्यांची कितीहि तीव्र निराशा झाली तरी त्यांनीं आपल्या पूर्वीच्या पद्धतिप्रमाणेंच चळवळ चालू ठेवली. परंतु राजकीय चळवळीचें स्वरूपच असें असतें कीं, अधिकाऱ्यांच्या अदूरदर्शित्वामुळें आणि आपमतलबी विरोधामुळें तिला अधिकाधिक व्यापकत्व प्राप्त होतें. हिंदुस्थानचें दारिद्र्य हलकें करण्याकरितां त्याच्या राज्यकारभारांत हिंदी लोकांना अधिक भाग मिळावा आणि एकंदरीनें त्यांची राजकीय स्थिति उन्नत व्हावी, म्हणून चालविलेले प्रयत्न निष्फळ झालेले पाहून राजकीय सत्तेच्या मुळाशीं गेल्याशिवाय गत्यंतर नाहीं असा विचार सरतेशेवटीं हिंदीलोकांत उत्पन्न झाला. राजकीय चळवळ प्रथमतः अल्पस्वरूपाची असते, आणि अधिकारीवर्गानें तिच्याबद्दल जर सहानुभूतीचें धोरण स्वीकारिलें, तर तिच्यांत तीव्रता उत्पन्न न होतां ती योग्य वेळीं फलित होते. परंतु सामान्यतः अधिकारीवर्गाचें धोरण विरोधी असतें. आपल्या विरोधानें राजकीय चळवळीचा प्राण जाईल असें अधिकारीमंडळास वाटत असतें. परंतु वास्तविक परिणाम अगदीं उलट होतो, आणि अधिकाऱ्यांच्या विरोधामुळें मूलतत्त्वांकडे किंवा मूलभूत गोष्टीकडे जाण्याची चळवळ्यांची प्रवृत्ति होते. हिंदुस्थानच्या राजकीय चळवळीची उत्क्रांति अशीच झाली आहे. हिंदुस्थानांतील राज्यपद्धतींत विवक्षित सुधारणा होत जाव्या, अशा प्रकारचें हिंदी राजकीय चळवळीचें प्रथम स्वरूप होतें. परंतु त्या सुधारणा करण्याची सरकारची इच्छा नाहीं, असें जेव्हां अधिकाधिक निदर्शनास येऊं लागलें, तेव्हां जी सुधारणा झाली असतां इतर बऱ्याच सुधारणा सहजगत्या घडून येतील, तीच आग्रहानें मागावी अशी इच्छा उत्पन्न होऊन त्याप्रमाणें राजकीय चळवळीला नवीन वळण लागलें. १९०५।१९०६ साली हिंदी लोकांची मनःस्थिति अशी

झाली कीं, आपल्या राजकीय उन्नतीचें मूलतत्त्व त्यांच्या लक्षांत न येणें शक्य नव्हतें. हें मूलतत्त्व म्हणजे स्वराज्य होय. स्वराज्य प्राप्त झाल्याशिवाय हिंदुस्थानच्या राज्यकारभारांत योग्य सुधारणा होणार नाहींत, आणि हिंदुस्थानची राष्ट्रीय उन्नति होणार नाहीं, हा विचार हिंदी लोकांच्या बुद्धीवर विद्युत्प्रकाशाप्रमाणें चकाकूं लागला, आणि स्वराज्यप्राप्तीच्या अपेक्षेनें हिंदी हृदय उचंबळूं लागलें. अशा खळबळीच्या स्थितींत १९०६ सालीं दादाभाईंच्या अध्यक्षतेखालीं कलकत्त्यास राष्ट्रीयसभा भरली. आणि त्या राष्ट्रीयसभेंत हिंदी जनतेचे मुख्य प्रतिनिधि ह्या नात्यानें दादाभाईंनीं स्वराज्याच्या ध्येयाची पताका उभारली. स्वराज्य हें साध्य आणि सतत चळवळ हें साधन असा त्यांनीं अधिकारवाणीनें उपदेश केला. स्वराज्याची मुहूर्तमेढ रोंवण्याला त्यांच्यासारखाच अनुभवी, वजनदार आणि अधिकारी गृहस्थ पाहिजे होता. कलकत्त्याच्या राष्ट्रीयसभेनंतर हिंदुस्थानच्या इतिहासांत बरींच स्थित्यंतरें झालीं, परंतु एकंदरीनें स्वराज्याची चळवळ जोरानें चालून ज्या कार्याकरितां दादाभाईंनीं आपलें सर्व आयुष्य खर्च केलें, तें अंशतः तरी सिद्धीस जाण्याचीं चिन्हें स्पष्ट दिसूं लागलीं आहेत, यामुळें प्रत्येकाला आनंद झाल्यावांचून राहणार नाहीं.

दादाभाईंचें चरित्र अत्यंत बोधप्रद आहे. दीर्घउद्योग, चिकाटी, आणि निरपेक्ष राष्ट्रबुद्धि हे त्यांचे विशेष गुण होते. ते कर्मयोगी होते, असें आम्हीं आमच्या मागील लेखांत लिहिलें आहे. स्तुतीची किंवा निंदेची, द्रव्याची किंवा मानाची पर्वा न करितां त्यांनीं आपलें सर्व आयुष्य देशसेवेंत एकनिष्ठपणें खर्च केलें. त्यांच्या मार्गांत जरी शेंकडों अडचणी आल्या, आणि त्यांची वेळोवेळीं जरी निराशा झाली, तरी ते कर्तव्यापासून कधींहि पराङ्मुख झाले नाहींत. त्यांना आपल्या सार्वजनिक आयुष्यांतच निराशा सोसावी लागली असें नसून, कौटुंबिक संकटेंहि त्यांना सोसावीं लागलीं. त्यांच्या एकुलत्या एक पुत्राला निर्घृण काळानें अकालींच ओढून नेलें. त्यांच्या कुटुंबाचीहि प्रकृति कित्येक वर्षें चांगली नसून त्यांच्या सहवासालाहि त्यांना मुकावें लागलें. अशीं जरी कौटुंबिक व राष्ट्रीय दुःखें त्यांना सहन करावीं लागलीं, तरी त्यांचें मनोधैर्य यत्किंचितहि ढळलें नाहीं, आणि शेवटपर्यंत त्यांनीं स्वदेशसेवाव्रत कडक रीतीनें पाळलें. तरुण हिंदी लोकांना त्यांच्यासारखा दुसरा मार्गदर्शक नाहीं, आणि हिंदुस्थानच्या अर्वाचीन इतिहासांत त्यांना उच्च स्थान मिळाल्यावांचून राहणार नाहीं. त्यांचें उदात्त, बोधप्रद, व उत्साहपूर्ण चरित्र आपल्या डोळ्यांपुढें ठेवून हिंदी लोक राष्ट्रोन्नतीचें कार्य एकनिष्ठपणें, धैर्यानें, जुटीनें, व शहाणपणानें करीत राहतील अशी आशा व्यक्त करून हा लेख पुरा करितों.

# अप्रत्यक्ष प्रतिकार.

हिंदुस्थानसरकारच्या पूर्ण संमतीनें किंबहुना त्यांच्या प्रोत्साहनानेंच प्रांतिक सरकारांनीं सुरू केलेल्या दडपेगिरीच्या धोरणामुळें अप्रत्यक्ष प्रतिकाराच्या प्रश्नाला सध्यां महत्त्व प्राप्त झालें असून त्याबद्दल ऑल-इंडिया काँग्रेस कमिटी आणि ऑल-इंडिया मॉस्लेमलीगचें कौन्सिल यांच्या संयुक्त परिषदेनें ठराव करून प्रांतिक काँग्रेस कमिट्या आणि मॉस्लेमलीगचें कौन्सिल यांचे अभिप्राय मागविले आहेत, हें आमच्या वाचकांना माहीत आहेच. अप्रत्यक्ष प्रतिकाराबद्दल पुढाऱ्यांच्याही कल्पनांत स्पष्टपणा दिसून येत नाहीं; तेव्हां त्याविषयींच्या सामान्य लोकांच्या कल्पना अस्पष्ट व संदिग्ध असल्यास नवल नाहीं, व म्हणून प्रस्तुत लेखांत अप्रत्यक्ष प्रतिकाराची मीमांसा करण्याचा आमचा विचार आहे.

## अप्रत्यक्ष प्रतिकार म्हणजे काय ?

प्रथम अप्रत्यक्ष प्रतिकार म्हणजे काय याचा स्पष्ट खुलासा करणें अवश्य आहे. तो करितांना एक गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे ती ही कीं, अप्रत्यक्ष प्रतिकारांत मनगटाच्या जोराचा अंतर्भाव होत नाहीं. कोणत्याही प्रकारचा अपाय, अपकार किंवा अत्याचार, यांचा अप्रत्यक्ष प्रतिकारांत समावेश होत नाहीं. बंड करणें, दंगेधोपे करणें, अधिकाऱ्यांना मारणें, मिळकतीची नासधूस करणें, इत्यादि अत्याचाराच्या गोष्टी अप्रत्यक्ष प्रतिकाराच्या बाहेर आहेत. असलीं कृत्यें अप्रत्यक्ष प्रतिकाराचीं नसून प्रत्यक्ष प्रतिकाराचीं आहेत. हा मुद्दा इतका स्पष्ट आहे कीं, त्याचें विवेचन करण्याचें कारण नाहीं.

## अप्रत्यक्ष प्रतिकाराला विशिष्ट हेतु असावा लागतो.

अप्रत्यक्ष प्रतिकाराचा अवलंब करण्यापूर्वी त्याचें उद्दिष्ट काय, याचा विचार करावा लागतो. सरकारनें एखादा आक्षेपार्ह कायदा केला, किंवा हुकूम सोडला, तर तो कायदा किंवा हुकूम रद्द करून घेणें, किंवा त्यांत योग्य ती दुरुस्ती करून घेणें, किंवा एखाद्या व्यक्तीचें, वर्गाचें किंवा एकंदर जनतेचें जें गाऱ्हाणें असेल तें दूर करून घेणें किंवा लोकांनीं केलेल्या मागण्यांचा सरकारकडून स्वीकार करविणें, ह्या तीन उद्देशांपैकीं कोणता तरी एक उद्देश अप्रत्यक्ष

प्रतिकाराचा अवलंब करणाऱ्यांच्या पुढें स्पष्ट असला पाहिजे. अन्य शब्दांनीं सांगावयाचें असल्यास वरील तीन हेतूंपैकीं एक किंवा अनेक हेतू सिद्धीस नेण्याकरितां प्रसंग विशेषीं अप्रत्यक्ष प्रतिकाराच्या पद्धतीचा स्वीकार करणें अवश्य होतें.

## अप्रत्यक्ष प्रतिकाराचे प्रकार.

अप्रत्यक्ष प्रतिकाराचे दोन प्रकार आहेत. सरकारनें एखादा जुलमी व अन्यायाचा कायदा किंवा हुकूम केला, तर तो कायदा किंवा हुकूम बुद्धिपुरःसर मोडणें हा एक प्रकार; व सरकाला राज्यकारभाराच्या कामीं मदत न करणें हा दुसरा प्रकार. सरकारनें केलेला कायदा किंवा हुकूम जाणूनबुजून मोडणें, व त्यामुळें सरकार करील ती शिक्षा शांतपणें सहन करणें, हा अप्रत्यक्ष प्रतिकाराचा पहिला प्रकार उघड आहे. परंतु सरकारला राज्यकारभारांत मदत न करणें ह्या दुसऱ्या प्रकाराचें अंमळ विस्तृत विवेचन करणें अवश्य आहे. राज्यपद्धति कितीही अनियंत्रित असली, तरी सरकारला प्रजेच्या मदतीशिवाय राज्यकारभार चालवितां येणें शक्य नाहीं. राजा कितीही जुलमी आणि अनियंत्रित असला तरी, मी एकटाच राज्यकारभार चालवीन असें तो म्हणेल तर त्यास तें शक्य नाहीं. त्यालाही मंत्री, अधिकारी व सैनिक यांची आवश्यकता असते. शिवाय प्रजेकडून कर वसूल झाल्याशिवाय त्याला राज्यकारभार फार दिवस चालवितां येणार नाहीं. सबब राजाला कर द्यावयाचा नाहीं, त्याची सेवा करावयाची नाहीं, किंवा त्याला अन्य तऱ्हेनें मदत करावयाची नाहीं, असा प्रजेपैकीं प्रत्येकानें किंवा बहुतेकांनीं निर्धार केल्यास, राजाला राज्यशकट हांकणें अशक्य आहे. ही एकतंत्री राजाची गोष्ट झाली. परंतु ज्या देशांत एकतंत्री राज्यपद्धति नसून राज्यकारभार प्रजेच्या संमतीनें किंवा निदान पसंतीनें अंशतः तरी चालला आहे, तेथें तर सरकारला प्रजेच्या सहकारितेशिवाय राज्यकारभार चालविणें अशक्यच आहे, आणि त्यांतल्या त्यांत राज्य जर परकीयांचें असेल तर, भाषेच्या अज्ञानामुळें व अन्य कारणांमुळें प्रजेच्या थोड्या तरी मदतीशिवाय राज्यकारभार चालविणें अगदीं अशक्य आहे. कल्पना करा कीं, उद्यां हिंदुस्थानच्या लोकांनीं असा निश्चय केला कीं, सरकारची नोकरी करावयाची नाहीं, किंवा गोऱ्यांना प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष रीतीनें मदत करावयाची नाहीं, तर हिंदुस्थानचा राज्यकारभार चालणें एक दिवसही शक्य होणार नाहीं.

हिंदी लोकांनीं असा निर्धार करून तो जर तडीस नेला तर त्याच्या परिणामाची मजल कोठपर्यंत जाण्यासारखी आहे हें इंग्लिश लोकांना ठाऊक नाहीं असें नाहीं. **मेरिडिथ टाऊनसेंड** यांनीं आपल्या **आशिया आणि युरोप** ह्या ग्रंथांत असें म्हटलें आहे कीं, " काळे लोक जर संप करतील आणि एक आठवडाभर गोऱ्यांची नोकरी करणार नाहीत, तर पत्त्याच्या घराप्रमाणें ब्रिटिश साम्राज्य ढांसळून पडेल, आणि प्रत्येक पांढरा अधिकारी आपल्या घरांत कैदी होऊन त्याला खाण्याला अन्न सुद्धां मिळणार नाहीं. त्याला हालतां येणार नाहीं, अन्न मिळणार नाहीं, किंवा पिण्यास पाणीसुद्धां मिळणार नाहीं. " सरकारला किंवा सरकारी अधिकाऱ्यांना अशा रीतीनें प्रत्यक्षपणें किंवा अप्रत्यक्षपणें अंशतः सुद्धां मदत न करणें, व अशा रीतीनें मदत करण्याचें नाकारून वर दिलेल्या तीन हेतूंपैकीं आपला जो हेतु असेल तो सिद्धीस नेणें, हा अप्रत्यक्ष प्रतिकाराचा दुसरा प्रकार आहे.

## कायदा किंवा हुकूम मोडणें अवश्य केव्हां होतें ?

अधिकाऱ्यांचा कायदा किंवा हुकूम प्रसंगोपात मोडणें कां अवश्य आहे, याचा विचार करितांना कायद्याचा किंवा हुकुमाचा अंतिम हेतु काय हें पाहिलें पाहिजे. समाज अस्तित्वांत येऊन त्याला राजकीय स्वरूप प्राप्त झालें म्हणजे कायद्यांची आवश्यकता उत्पन्न होते. परंतु ते कायदे असे असले पाहिजेत कीं, त्यामुळें समाजानें मान्य केलेल्या वैयक्तिक किंवा सार्वजनिक हक्कांची पायमल्ली न होतां समाजाचें कल्याण व प्रगति, ही होत गेली पाहिजेत. **भारतसेवकाच्या** गेल्या वर्षाच्या दहाव्या अंकांत " आम्ही स्वराज्य कां मागतों " ह्या लेखांत राजकीयसत्तेचे हेतू काय, हें आम्ही सांगितलें आहे. त्यांत **लॉक** नांवाच्या तत्त्ववेत्त्याचा अभिप्राय दिला आहे. तो म्हणतो कीं, मनुष्यजातीचें कल्याण ( Good of mankind ) हें सरकारचें ध्येय आहे. हें ध्येय सिद्धीस नेण्याचें कायदा किंवा हुकूम एक साधन आहे. तेव्हां अर्थातच कायदा किंवा हुकूम असा असला पाहिजे कीं, त्यामुळें समाजाचें व सरतेशेवटीं मनुष्य जातीचें कल्याण होईल. कायदे किंवा हुकूम न्यायाला, नीतिला व धर्माला अनुसरून असले, म्हणजे ते मानवी प्रगतीला पोषक असेच असतात. परंतु सर्वच कायदे किंवा हुकूम न्यायाला, नीतीला व धर्माला अनुसरून असतात, व अतएव समाजाला कल्याणकारक होतात असें नाहीं. कांहीं कायदे व हुकूम अन्याय्य, जुलमी व

व निंद्य असे असतात, व त्यामुळें समाजाचें कल्याण न होतां उलट त्याचें अकल्याण होतें. ज्याप्रमाणें राजसत्तेचे कायदे किंवा अधिकाऱ्यांचे हुकूम असतात त्याप्रमाणें नैतिक कायदेहि आहेत. नैतिक कायद्यापासून अकल्याण न होतां सदासर्वदां कल्याणच होतें. व वास्तविक पाहतां नैतिक कायदे व राजकीय कायदे यांच्यांत विरोध असतां कामा नये. परंतु समाजाचें कल्याण करणें हें जरी सरकारचें ध्येय आहे तरी त्याप्रमाणें प्रत्येक सरकारचें वर्तन असतेंच असें नाहीं. सरकार लोकसत्ताक असलें तरी देखील त्याच्या हातून नीतीला विरुद्ध असे कायदे प्रसंगोपात होण्याचा संभव असतो; आणि राजपद्धति लोकसत्ताक नसेल तर हा संभव अधिकच असतो. समाजाचें कल्याण हा नीतीचा व कायद्याचा हेतु आहे. परंतु कायदा आणि समाजाचें कल्याण यांच्यामध्यें कधीं कधीं विरोध उत्पन्न होतो. एकीकडे सरकारनें केलेला कायदा किंवा अधिकाऱ्यांनीं सोडलेला हुकूम, तर दुसरीकडे नीति व समाजाचें कल्याण अशी स्थिति उपस्थित होते, व अशी स्थिति झाली असतां, काय करावें असा प्रश्न प्रत्येक विचारी माणसापुढें उभा राहतो. व प्रसंग विशेषीं नीतीकरितां व समाजाच्या कल्याणाकरितां सरकारनें केलेले कायदे किंवा हुकूम मोडल्याशिवाय गत्यंतर नसतें.

## कायद्याचें उल्लंघन व समाजाचें कल्याण.

वरील विवेचनावरून एक गोष्ट आमचे वाचकांचें लक्षांत आली असेलच. ती ही कीं, कायद्याचें उल्लंघन करावयाचें किंवा सरकारला राज्यकारभारांत मदत करावयाची नाहीं, याचें अंतिम कारण समाजाचें कल्याण हें होय. ज्याप्रमाणें कायदा पाळण्याचें व सरकारला मदत करण्याचें अंतिम कारण समाजाचें कल्याण हें होय, त्याप्रमाणेंच कायदा मोडण्याचें किंवा सरकारला मदत न करण्याचें अंतिम कारण समाजाचें कल्याण हेंच होय. दुसऱ्या कोणत्याहि कारणास्तव कायदा मोडणें किंवा सरकारला मदत करण्याचें नाकारणें योग्य होणार नाहीं. समाजाचें अस्तित्व समाजाच्या कल्याणाकरितांच आहे. आणि समाजाला राजकीय स्वरूप प्राप्त होऊन त्यांत सरकारची जी स्थापना होते, तीहि समाजाचें कल्याणाकरितांच असते. सरकारशिवाय समाजाचें कल्याण होणें जर शक्य असतें तर सरकारच अस्तित्वांत आलें नसतें. समाजाचा जो अंतिम हेतु समाजाचें कल्याण त्याचकरितां सरकार अस्तित्वांत आलें, आणि हा हेतु

एखाद्या सरकाराच्या हातून सिद्धीस जात नसेल, तर त्याऐवजीं दुसरें सरकार स्थापन करण्याचा समाजाला पूर्ण अखत्यार आहे. आतां ज्या साधनांनीं सरकार समाजाचें कल्याण करीत असतें त्यांत कायदे व कायद्यांची अंमलबजावणी हीं साधनें प्रमुख होत. कायदे आणि कायद्यांचा अंमलबजावणी याशिवाय सरकारला समाजाचा अंतिम हेतु सिद्धीस नेतां येणार नाहीं, व म्हणूनच सामान्यतः प्रजेनें कायदे पाळले पाहिजेत. परंतु हा सामान्य सिद्धांत झाला. त्या सिद्धांताच्या मुळाशीं समाजाचें कल्याण हें जें तत्त्व आहे, त्यावरूनच असें निष्पन्न होतें कीं, जर एखादा कायदा असा असला कीं, त्यामुळें समाजाचें कल्याण न होतां अकल्याण होईल तर समाजाच्या कल्याणाकरितांच तो मोडण्याशिवाय दुसरा उपाय नाहीं. तेव्हां कायदा मोडण्यापूर्वी समाजाचें कल्याण कशानें होईल–कायदा पाळण्यानें किंवा तो मोडण्यानें–याचा नीट शांतपणें विचार करून कायदा मोडण्यानेंच समाजाचें कल्याण होईल अशी खात्री झाली, तरच कायदा मोडणें योग्य होईल, एरव्हीं होणार नाहीं. समाजाचें कल्याण हें मूळ तत्त्व सदैव लक्षांत असलें पाहिजे, आणि त्या तत्त्वानेंच एखादा कायदा मोडणें योग्य होईल किंवा नाहीं याचा निर्णय केला पाहिजे.

## कायदा समाजाचे कल्याणाला विरोधी आहे हे कोणीं ठरवावयाचें?

आतां प्रश्न असा उपस्थित होतो कीं, एखादा कायदा किंवा हुकूम समाजाच्या कल्याणाला इतका प्रतिकूल आहे कीं तो मोडला पाहिजे, हें कोणी ठरवावयाचें ? याला उत्तर हेंच होय कीं, हें ठरविण्याचा अधिकार प्रत्येक नागरिकाला आहे. प्रसिद्ध इंग्लिश तत्त्ववेत्ता टामस हिल ग्रीन आपल्या "राजकीय कर्तव्याचीं तत्त्वें" या पुस्तकांत म्हणतो कीं, "एखादा कायदा समाजाला कल्याणकारी आहे किंवा नाहीं हें प्रत्येक व्यक्तीनें ठरविलें पाहिजे किंवा नाहीं, या प्रश्नाचें 'होय' हेंच उत्तर आहे." ग्रीन आणखी म्हणतो: "कायदे आणि समाजाचें कल्याण यांमधील असलेला संबंध ज्या प्रमाणानें एखादा मनुष्य स्वतः विचार करून ओळखूं शकतो त्या प्रमाणानेंच, इतरांचे आणि राजकीय समाजाचे हक्कांची त्याची जाणीव केवळ प्रकृतिसिद्ध नसून ज्ञानयुक्त असते, आणि ह्या ज्ञानयुक्त जाणीवेवरच केवळ अधिकार आणि आपण मानलेले हक्क यांमध्यें असलेल्या फरकाचें त्याचें व्यावहारिक ज्ञान अवलंबून असतें." तेव्हां

कायदा समाजाला कल्याणकारी आहे किंवा नाहीं हें ठरविण्याचा प्रत्येक व्यक्तीला अधिकार आहे. परंतु हें ठरविणें नेहमींच सोपें नसल्यामुळें प्रत्येकानें पूर्ण विचार करून तें ठरविलें पाहिजे. कांहीं कायदे उघड उघड अन्यायाचे जुलमी व म्हणून समाजाला अपाय करणारे असे असतील. परंतु एखादा कायदा समाजाला खरोखर कल्याणकारी आहे किंवा अपायकारी आहे हें समजणें सोपें नाहीं. अशा वेळीं प्रत्येकानें ज्ञानी, विचारी व निरपेक्ष लोकांचा अभिप्राय घेऊन प्रत्येकानें आपलें मत ठरविलें पाहिजे. परंतु कायदा कल्याणकारी किंवा अपायकारक आहे हें ठरवितांना पूर्ण विचार करणें हें जरी प्रत्येकाचें कर्तव्य आहे, तरी तो तसा आहे किंवा नाहीं हें ठरविण्याचा अधिकार प्रत्येक व्यक्तीला आहे.

## कायदा मोडण्याला अवश्य लागणारी दुसरी गोष्ट.

कायद्याचें उल्लंघन करण्यापूर्वी तो समाजाला अपायकारक आहे कीं काय हें प्रथम ठरविलें पाहिजे, हें आम्हीं वर सांगितलेंच आहे. परंतु कायद्याचा अन्यायीपणा किंवा त्याचें अपायकारित्व हेंच **सामान्यतः** कायदा मोडण्याला पुरेसें कारण होत नाहीं. कायदा वाईट असला तर तो प्रथम कायदेशीर किंवा सनदशीर पद्धतीनें रद्द करून घेण्याचा प्रयत्न केला पाहिजे. ज्या देशांत जबाबदार राज्यपद्धति आहे, तेथें समाजाला अपायकारक असलेले कायदे रद्द करून घेण्याचे सनदशीर उपाय अनेक असतात. परंतु असे उपाय उपलब्ध नसतील किंवा ते अंमलांत आणूनहि निरर्थक ठरले असतील, तर कायद्याचें उल्लंघन करणें हा एकच मार्ग खुला राहतो. सरकारनें वाईट कायदा केला तर तो रद्द करून किंवा आपल्या इच्छेप्रमाणें दुरुस्त करून घेण्याचे कोणते सनदशीर मार्ग उपलब्ध आहेत, हें प्रथम पाहिलें पाहिजे. जर असा कोणताहि मार्ग उपलब्ध नसेल तर अर्थात्च हा विचार करण्याचें कारणच नाहीं, आणि कायद्याचें एकदम उल्लंघन करणें आक्षेपार्ह होणार नाहीं. परंतु असे मार्ग जर उपलब्ध असतील तर त्यांचें अवलंबन प्रथम केलें पाहिजे व त्यांचें अवलंबन करूनहि जर कांहीं उपयोग झाला नाहीं तर मात्र कायदा मोडणें उचित होईल. सारांश, कायदा किंवा हुकूम मोडण्याला सामान्यतः दोन अटी लागतात. पहिली, तो कायदा किंवा हुकूम असा असला पाहिजे कीं, त्यामुळें समाजाचें कल्याण न होतां अकल्याण होईल. व दुसरी, कायदा रद्द किंवा दुरुस्त करून

घेण्याचीं सनदशीर साधनें नसलीं पाहिजेत किंवा असूनही तीं निरुपयोगीं ठरलीं पाहिजेत.

कायदा मोडण्यापूर्वी तो प्रथम सनदशीर उपायांनीं रद्द किंवा दुरुस्त करून घेण्याचा प्रयत्न केला पाहिजे असें आम्ही म्हटलें आहे, परंतु हा सामान्य सिद्धांत झाला. याला अपवाद असूं शकणार नाहीत असें नाही. एखादा कायदा किंवा हुकूम इतका धडधडीत जुलमी असेल कीं किंवा त्यामुळें व्यक्तीच्या मूलभूत हक्कांवरच इतका जोराचा हल्ला झाला असेल कीं, तो सनदशीर उपायांनीं रद्द करून घेण्याच्या भरीस न पडतां एकदम मोडणें हेंच योग्य होईल. कायदा मोडण्यानें समाजांतलि बेजबाबदार व उच्छृंखल लोकांचा कायद्याबद्दलचा आदर कमी होऊन कायद्याला न जुमानण्याची प्रवृत्ति वृद्धिंगत होण्याचा ज्याप्रमाणें संभव असतो, त्याप्रमाणेंच कायदा कितीही वाईट व जुलमी असला तरी त्याचा एकदम कधींही प्रतिकार करावयाचा नाही असें प्रजेनें धोरण स्वीकारल्यास अधिकाऱ्यांना जुलूम करण्याची चटक लागून, वाटेल ते कायदे किंवा हुकूम करण्याची त्याची प्रवृत्ति अमर्याद होण्याचा संभव असतो. अशी चटक त्यांना लागणार नाही आणि ही त्यांची प्रवृत्ति अमर्याद होणार नाहीं, याबद्दल खबरदारी घेणें हें स्वाभिमानी, न्यायप्रिय व स्वातंत्र्यलोलुप नागरिकांचें कर्तव्य आहे. आणि म्हणूनच एखादा कायदा किंवा हुकूम धडधडीत अन्यायाचा व जुलमी असला किंवा त्यामुळें व्यक्तीच्या किंवा समाजाच्या मूलभूत हक्कांवर गदा येत असली, तर त्याचा एकदम प्रतिकार करणें हेंच व्यक्तीचें किंवा समाजाचें कर्तव्य आहे. सनदशीर मार्गाचें अवलंबन करून कायदा रद्द करण्याचा प्रथम प्रयत्न करण्यांत यावा हें सामान्यतः जरी खरें असलें, तरी विशेष प्रसंगी त्या मार्गाचें अवलंबन न करितां कायद्याचा किंवा हुकुमाचा एकदम प्रतिकार करणें अयोग्य होणार नाहीं.

येथपर्यंत अप्रत्यक्ष प्रतिकाराची मीमांसा झाली. आतां राष्ट्रीय सभेनें अप्रत्यक्ष प्रतिकाराचें धोरण स्वीकारण्याला लागणारी परिस्थिति प्राप्त झाली आहे काय याचा विचार करूं. ज्या गोष्टींमुळें अप्रत्यक्ष प्रतिकाराचा प्रश्न उपस्थित झाला आहे, त्या (१) मिसेस बेझंटप्रभृति व्यक्तींना हिंदुस्थान रक्षणकानूअन्वयें केलेली अटक, व त्या कानूअन्वयें केलेले इतर हुकूम, (२) कित्येक ठिकाणी जाहीर सभांना केलेला प्रतिबंध आणि (३) सुधारणांच्या प्रश्नासं-

बंधानें हिंदुस्थानसरकारनें व कांहीं प्रांतिक सरकारांनीं स्वीकारलेलें धोरण, ह्या होत. ह्या प्रत्येक बाबीसंबंधानें अप्रत्यक्ष प्रतिकाराचें धोरण स्वीकारणें राष्ट्रीय-सभेला उचित होईल कीं काय याचा आतां आपण विचार करूं.

## राज्यरक्षण कानूअन्वयें केलेले हूकूम

राज्यरक्षणकानूअन्वयें केलेल्या हुकुमासंबंधानें पहिली गोष्ट लक्षांत ठेवावयाची ती ही कीं, ज्या कानूअन्वयें ते करण्यांत आले आहेत, किंवा ज्या कायद्यान्वयें ते कानू करण्यांत आले आहेत ते कानू किंवा तो कायदा, समाजाला अपायकारक अतएव आक्षेपार्ह आहे, अशी आपली तक्रार नाहीं. युद्धप्रसंगीं समाजाच्या संरक्षणाकरितां व कल्याणाकरितां अशा प्रकारचे कायदे किंवा कानू करणें अवश्य आहे, याबद्दल मतभेद नाहीं. आपलें म्हणणें इतकेंच आहे किं, ह्या कायद्याचा किंवा त्या कायद्याअन्वयें केलेले कानूंचा सरकारनें दुरुपयोग करून समाजाला अपायकारक असे हुकूम सोडले आहेत. म्हणजे अन्य शब्दांनीं सांगावयाचें झाल्यास त्या कायद्याची किंवा कानूंची कित्येक व्यक्तीसंबंधानें अंमलबजावणी योग्य रीतीनें न होतां समाजाला अपायकारक अशा रीतीनें झाली आहे. युद्धप्रसंगीं सरकारला व्यक्तीच्या स्वातंत्र्यावर किंवा मालमत्तेवर नेहमीपेक्षां अधिक हुकमत चालविणें अवश्य आहे यांत शंका नाहीं. युद्ध सुरू झालें असतां जनतेचीं मनें अस्वस्थ होऊन अंतस्थ शांततेचा व सुरक्षितपणाचा भंग होण्याचा नेहमीपेक्षां अधिक संभव असतो. तो भंग होऊं नये म्हणून नेहमीपेक्षां अधिक खबरदारी घेणें हें सरकारचें कर्तव्य आहे. युद्धाच्या कामाकरितां प्रजेच्या मालमत्तेवर अधिक हुकमत चालविणें हेंहि अवश्य आहे. आणि युद्धासारख्या विशिष्ट प्रसंगीं सरकारचे हे विशेष अधिकार योग्य रीतीनें अंमलांत आणण्यांत येतील तर तक्रारीला मुळींच जागा राहणार नाहीं. परंतु हे अधिकार विशेष प्रकारचे आहेत, हें सरकारनें नेहमी लक्षांत ठेविलें पाहिजे, आणि त्यांची अंमलबजावणी अन्यायाची होणार नाहीं, ह्याबद्दल विशेषच खबरदारी घेतली पाहिजे. असें न करितां ह्या विशेष अधिकारांचा जर सरकार दुरुपयोग करील तर त्या दुरुपयोगाचा प्रतिकार कसा करावा हा साहजिक प्रश्न उपस्थित होतो. आणि असा दुरुपयोग करण्यांत येऊन कोणाला अटक करण्यांत आली किंवा दुसरे अन्यायाचे हुकूम सोडण्यांत आले तर अप्रत्यक्ष प्रतिकाराचें धोरण योग्य होईल काय, हा प्रस्तुत प्रश्न आहे. असल्या हुकुमासंबंधानें एक गोष्ट उघड आहे

कीं, ते विवक्षित व्यक्तींना केलेले असतात व म्हणून मोडावयाचे असल्यास त्यांनाच ते मोडतां येतील. इतरांना अर्थातूच ते मोडतां येणार नाहींत. आतां त्या व्यक्तींची अशी जर खात्री असेल कीं, ते हुकूम समाजाला अपायकारक आहेत, त्यामुळें समाजाचें कल्याण न होतां अकल्याणच होईल आणि ते मोडणें हेंच आपलें कर्तव्य आहे, तर त्यांचें उल्लंघन करून त्यांचा प्रतिकार करण्याला त्यांना पूर्ण मुभा आहे. त्यांची मनोदेवताच जर त्यांना स्पष्ट सांगत असेल कीं, सद्रहु हुकुमांचें उल्लंघन करून त्यांचा प्रतिकार करावा, तर मनोदेवतेची आज्ञा शिरसावंद्य करणें हेंच त्यांचें कर्तव्य आहे. हुकूम मोडले असतां काय परिणाम भोगावे लागतील हें माहीत असतां, ते शांतपणानें व आनंदानें सहन करण्याला तयार होऊन मनोदेवतेच्या आज्ञेप्रमाणें आपलें वर्तन ठेवण्यानें ते विचारी माणसांच्या आदरास पात्र होतील, आणि हिंदुस्थानच्या राजकीय चळवळीच्या नैतिक सामर्थ्यांत भर घालतील यांत शंका नाहीं. परंतु अशा सत्यनिष्ठ व स्वार्थत्यागी व्यक्तींना राष्ट्रीय सभेनें किंवा इतर सार्वजनिक संस्थेनें सल्ला देण्याचें किंवा आज्ञा करण्याचें प्रयोजनच नाहीं. जेथें व्यक्तीच्या सदसद्विवेक बुद्धीच्या आज्ञेवर निर्णय अवलंबून आहे, तेथें सार्वजनिक संस्थांच्या आज्ञेचें प्रयोजन काय? ज्याची मनोदेवतेच्या आज्ञेप्रमाणें वागण्याची तयारी आहे, तो राष्ट्रीय सभेच्या किंवा इतर संस्थेच्या उपदेशाची वाट कशाला पाहील? शिवाय तो उपदेश किंवा ती आज्ञा त्याच्या मनोदेवतेच्या आज्ञेला अनुसरून असेल तरच ठीक. नाहीं तर त्यानें तरी त्या उपदेशाला किंवा आज्ञेला भीक कां घालावी! समजा कीं, असले हुकूम मोडावे असें त्याची मनोदेवता त्याला सांगत आहे, परंतु राष्ट्रीय सभेचें, ते हुकूम कोणी मोडूं नयेत, असें मत आहे. अशा प्रसंगीं त्यानें मनोदेवतेची आज्ञा मोडावी काय? राष्ट्रीय सभेसारख्या संस्थेचें मत आपल्या मताच्या विरुद्ध आहे, हें पाहून त्यानें आणखी शांतपणानें व सर्व बाजूंनी विचार करावा हें उचित आहे, यांत शंका नाहीं. परंतु या उप्परहि त्याची मनोदेवता 'हुकूम मोडलाच पाहिजे' असें जर त्याला सांगत असेल तर मनोदेवतेच्या आज्ञेप्रमाणें वागणें हें त्याचें कर्तव्य राष्ट्रीय सभेच्या प्रतिकूल मतानें बाधित होत नाहीं. उलटपक्षीं त्याच्या मनोदेवतेच्या आज्ञेप्रमाणेंच राष्ट्रीय सभेचा अभिप्राय असेल तर वास्तविक पाहतां तो अभिप्राय अनवश्यक आहे. आतां कदाचित् असें म्हणण्यांत येईल कीं, असले हुकूम सार्वजनिक हिताच्या दृष्टीनें मोडणें योग्य होईल किंवा नाहीं हा प्रश्न अगोदरच

बिकट आहे आणि कित्येक व्यक्तींना तर त्याचा निश्चयात्मक विचार करणें अतिशयच अवघड आहे. असले हुकूम मोडण्याला व ते मोडल्यामुळें प्राप्त होणारे परिणाम भोगण्याला लागणारें मनोधैर्य त्यांच्यामध्यें असेल; परंतु ते मोडावे किंवा मोडूं नये हें निश्चयपूर्वक ठरविण्याला लागणारी बुद्धीची तीव्रता त्यांच्यामध्यें नसेल. बुद्धीची तीव्रता व मनोधैर्य यांचा संगम प्रत्येकांतच आढळतो असें नाहीं. कित्येकांची बुद्धि तीव्र असते, परंतु त्यांच्यांत अवश्य तितकें मनोधैर्य आढळून येत नाहीं. उलटपक्षीं कित्येकांत मनोधैर्य उत्तम असतें, परंतु त्यांच्या बुद्धीची ग्राहकता व तीव्रता कमी असल्यामुळें प्रसंगविशेषीं त्यांच्या मनांत कर्तव्याबद्दल व्यामोह उत्पन्न होतो. महाभारतांत म्हटल्याप्रमाणें धर्म हा सूक्ष्म आहे, आणि श्रीकृष्णानें भगवद्गीतेंत सांगितल्याप्रमाणें कर्तव्य कोणतें व अकर्तव्य कोणतें हें ठरवितांना कधीं कधीं ज्ञात्यांची सुद्धां बुद्धि कुंठित होते. सारांश, कर्तव्याचे कांहीं प्रश्न अतिशय बिकट असतात, आणि राज्यरक्षण कानूअन्वयें केलेले हुकूम असेच कर्तव्याकर्तव्याचे बिकट प्रश्न उपस्थित करणारे आहेत असें कित्येकांना वाटण्याचा संभव आहे. असले हुकूम मोडावे किंवा न मोडावे असा त्यांच्या मनांत कल्लोळ चाललेला असेल, आणि कोणी तरी आपणाला मार्ग दाखवील काय अशी इच्छा त्यांच्या ठिकाणीं उत्पन्न झाली असेल. अशा व्यक्तींना राष्ट्रीय सभेसारख्या वजनदार संस्थेनें मार्गदर्शन केल्यास, त्यांच्या मनाचा निश्चय होऊन त्यांना आपलें कर्तव्य नीट ओळखतां येणार नाहीं काय? आणि त्यामुळें सरतेशेवटीं समाजाचें हित होणार नाहीं काय? हा प्रश्न अगदीं बरोबर आहे. आणि त्याचें उत्तरहि देणें अवश्य आहे. परंतु प्रत्येक मनुष्यानें आपल्या मनोदेवतेच्या आज्ञेप्रमाणें वागावें, यांतच राष्ट्राचें कल्याण आहे, हा सामान्य सिद्धांत व्यक्त करण्यापलीकडे राष्ट्रीय सभेसारख्या जबाबदार सार्वजनिक संस्थेला ह्या बाबीसंबंधानें जातां येईल, असें आम्हांस वाटत नाहीं. सरकारनें राज्यरक्षण कानूअन्वयें जो जो हुकूम सोडला आहे, तो तो अन्यायाचा व समाजाला अपायकारक आहे असें ठरविण्याची जबाबदारी राष्ट्रीय सभेला घेतां येणार नाहीं. व ती जर तिला घेतां येणार नाहीं, तर प्रत्येकानें असले हुकूम मोडावे असें ती कसें सांगूं शकेल? मिसेस बेझंट इत्यादि कांहीं व्यक्तींच्यासंबंधानें असे हुकूम समाजाला अपायकारक आहेत किंवा नाहींत हें ती सांगूं शकेल. परंतु अशा व्यक्तींसंबंधानें कर्तव्याकर्तव्याचा प्रश्नच उपस्थित होण्याचा संभव नाहीं. कारण, ते मोडावे किंवा न मोडावे या

संशयानें ज्यांच्या मनांत काहूर उठण्याचा संभव आहे, अशापैकीं त्या नाहींत. तेव्हां राज्यरक्षण कानूअन्वयें केलेले हुकूम मोडण्यांत यावे किंवा नाही या प्रश्नासंबंधानें राष्ट्रीय सभेसारखी जबाबदार संस्था इतकेंच सांगूं शकेल कीं, ते हुकूम मोडावे अशी जर एखाद्याची मनोदेवता त्याला निश्चयानें सांगत असेल तर त्याप्रमाणें वागण्यास तो पूर्ण मुखत्यार आहे, आणि सदसद्विवेकबुद्धीला अनुसरून वागण्यानें राष्ट्राचें अकल्याण तर होणार नाहीच, परंतु कल्याणच होईल. ह्या तात्त्विक अभिप्रायापलीकडे राष्ट्रीय सभेला जातां येणार नाहीं. असे हुकूम ज्यांना मोडतां येत नसतील किंवा मोडण्याची ज्यांची इच्छा नसेल त्यांना ते मोडा असें राष्ट्रीय सभेला सांगतां येणार नाहीं. ह्या बाबतींत राष्ट्रीय सभेच्या अभिप्रायापेक्षां आपल्या स्वतःच्या मनोदेवतेवरच प्रत्येकानें अधिक अवलंबून राहिलें पाहिजे. आतां कदाचित् असें म्हणण्यांत येईल कीं, राज्यरक्षण कानूअन्वयें सोडलेल्या हुकुमाच्या बाबींसंबंधानें कायद्याचें उल्लंघन ह्या अप्रत्यक्ष प्रतिकाराच्या पद्धतीचें अवलंबन इष्ट नसलें, तरी अप्रत्यक्ष प्रतिकाराच्या दुसऱ्या पद्धतीचें अवलंबन करण्याला हरकत कोणती ? म्हणजे हे हुकूम जरी मोडले नाहींत, तरी सरकारला मदत करण्याचें नाकारून त्याबद्दलची आपली नापसंती आपण कां व्यक्त करूं नये ? या प्रश्नाचें उत्तर देतांना असें लक्षांत ठेवलें पाहिजे कीं,राज्यरक्षण कानूअन्वयें ज्या व्यक्तींना सरकारनें हुकूम केले आहेत त्या व्यक्तींच्या हातून ते जर मोडण्यांत आले नाहीत, तर त्याचें कारण ( १ ) ते हुकूम मोडावे असें त्यांची मनोदेवता त्यांना सांगत नसेल, किंवा ( २ ) मनोदेवता सांगत असूनहि ते मोडण्याला त्यांच्यांत मनोधैर्य नसेल. या दोन कारणांपैकीं कोणतें तरी एक असलें पाहिजे. पहिलें कारण जर असेल, तर जो हुकूम त्या व्यक्तींनाच आक्षेपार्ह वाटत नाहीं, त्याचा प्रतिकार करण्याकरितां इतरांनीं सरकारला मदत करूं नये, असें म्हणणें हास्यास्पद आहे. दुसरें कारण असेल तर ज्या व्यक्तींच्या ठिकाणीं मनोधैर्य नाहीं त्यांच्याबद्दल केलेल्या हुकूमाचा प्रतिकार स्वतः त्या व्यक्तींनीं न करतां इतरांनीं करण्याला प्रवृत्त व्हावें हें अत्यंत चमत्कारिक आहे. तेव्हां ह्या बाबींसंबंधानें अप्रत्यक्ष प्रतिकाराचा अवलंब योग्य होणार नाहीं असें आमचें मत आहे. आतां कदाचित् असें होण्याचा संभव आहे कीं, एखादी व्यक्ति आपल्या विरुद्ध केलेला हुकूम मोडीत नाही याचें कारण मनोधैर्याचा अभाव हें नसेल. त्या व्यक्तीला तो हुकूम अत्यंत गैरशिस्त वाटत असेल. तींत मनोधैर्यहि असेल. परंतु वार्धक्यामुळें किंवा प्रकृतीच्या अस्वस्थतेमुळें

तिनें तो हुकूम मोडणें इष्ट नसेल. अशा स्थितींत इतरांनीं त्याचा प्रतिकार करावा किंवा नाहीं हा बिकट प्रश्न आहे. आमच्या मतें त्या प्रश्नाचा निर्णय करण्यापूर्वी त्या व्यक्तीचें मत काय आहे हें प्रथम लक्षांत घ्यावें, आणि नंतर सारासार निर्णय करून दुसऱ्या प्रकारच्या अप्रत्यक्ष प्रतिकाराचा अवलंब केल्यानें देशाचें अधिक कल्याण होण्याचा स्पष्ट संभव असेल, तरच त्याचा अवलंब करण्यांत यावा. अशा बिकट प्रश्नांचा निर्णय करण्याचें प्रमाण म्हटलें म्हणजे देशाचें कल्याण हें एकच होय. आणि त्याप्रमाणेंच त्यांचा निर्णय केला पाहिजे.

## सभाबंदीचे हुकूम.

सभाबंदीच्या हुकमासंबंधानें राष्ट्रिय सभेनें अप्रत्यक्ष प्रतिकाराचा अवलंब करावा किंवा नाहीं हा दुसरा प्रश्न आहे. ही बाब आमच्या मतें पहिल्यापेक्षांहि अधिक महत्त्वाची आहे. सनदशीर पद्धतीनें राजकीय चळवळ चालविण्याकरितां सभा भरविण्याचा हक्क मूलभूत आहे, आणि तो जर सरकारनें हिरावून घेतला तर समाजाचें अत्यंत नकसान होऊन त्याची प्रगति कुंठित होईल यांत शंका नाहीं. मुद्रणस्वातंत्र्य आणि सभास्वातंत्र्य हीं समाजाचें कल्याण करण्याचीं प्रमुख साधनें आहेत, आणि त्यांची उपयुक्तता आणि हितकारित्व हीं इतकीं सिद्ध झालीं आहेत कीं, कोणत्याहि सुधारलेल्या राष्ट्रांत तीं हिरावून घेण्यांत येत नाहींत. इतकेंच नव्हे, तर त्यांना कित्येक देशांत मूलभूत हक्कांचें माहात्म्य प्राप्त झालें असून तें त्यांच्या राज्यघटनेंत मान्य केलेले आहेत. प्रजेचे विचार, तिचीं गाऱ्हाणीं व तिच्या इच्छा सनदशीर पद्धतीनें सरकारला कळविण्याचें जाहीरसभा हें एक अत्यंत महत्त्वाचें साधन आहे, आणि सरकारनें तें हिरावून घेतां कामा नये. सबब योग्य कारण नसतां सरकारनें किंवा सरकारी अधिकाऱ्यांनीं सभाबंदीचे हुकूम सोडले तर ते निमूटपणें मान्य करणें हें नागरिकांच्या स्वातंत्र्यप्रिय शीलास बिलकूल शोभणार नाहीं. मिसेस बेझंट आणि त्यांचे साथीदार यांना केलेल्या अटकेचा निषेध करण्याकरितां सर राशबिहारी घोष यांच्या अध्यक्षतेखालीं कलकत्ता येथें भरणाऱ्या सभेला केलेला प्रतिबंध हा इतका अन्यायाचा आणि गैरशिस्त होता कीं, त्याचा प्रत्यक्ष प्रतिकार करणें योग्यच झालें असतें. तेव्हां असल्या सभाबंदीच्या हुकमासंबंधानें राष्ट्रीय सभेनें अप्रत्यक्ष प्रतिकाराचें धोरण स्वीकारणें योग्य आहे असें आम्हांस वाटतें. सबब

ह्यासंबंधानें आमचा असा अभिप्राय आहे की, डिस्ट्रिक्ट कॉंग्रेस कमिटी वगैरे ज्या राष्ट्रीय सभेच्या संस्था आहेत, त्यांच्यातर्फे बोलावण्यात आलेली जाहीरसभा जर अधिकाऱ्यांनीं बंद केली तर ताबडतोब प्रांतिक कॉंग्रेस कमिटीची सभा भरविण्यांत येऊन तिनें त्या सभाबंदी हुकुमाचा अप्रत्यक्ष प्रतिकार करावा किंवा नाहीं, व करावयाचा असल्यास अप्रत्यक्ष प्रतिकाराची कोणती पद्धति स्वीकारावी किंवा दोन्ही स्वीकाराव्या याचा निर्णय करावा आणि त्याप्रमाणें पुढें वर्तन ठेवण्यात यावें. राष्ट्रीय सभेच्या संस्थेमार्फत बोलावलेल्या सभांच्या बाबतीतच प्रांतिक कॉंग्रेस कमिटीला निर्णय करितां येईल हें उघड आहे. कारण ते इतर संस्थांना बंधनकारक होणार नाहीत. असले सभाबंदीचे हुकूम एकदम मोडावे किंवा ते रद्द करून घेण्याचे इतर स्वाभिमानी उपाय निष्फळ झालेले आढळून आल्यानंतर मोडावें, याचाही प्रांतिक कॉंग्रेस कमिटीनें निर्णय करावा. कांहीं हुकूम इतके जुलमी व अन्यायाचे असतात कीं, ते एकदम मोडणें हेंच योग्य होईल. तेव्हां सरसकट नियम न करितां प्रत्येक हुकुमाचा स्वतंत्र रीतीनें विचार करून प्रांतिक कॉंग्रेस कमिटीनें आपला निर्णय द्यावा. होमरूल लीगच्या चालकांनींहि आपल्या संस्थांच्यातर्फे बोलाविलेल्या सभांबद्दलही अशाच प्रकारचें धोरण स्वीकारावें.

## राजकीय सुधारणा व अप्रत्यक्ष प्रतिकार.

आतां तिसरा प्रश्न राजकीय सुधारणांसंबंधानें आहे. राष्ट्रीय सभा आणि मॉस्लेमलीग यांनीं मागितलेल्या सुधारणा सरकारनें जर अंमलांत आणल्या नाहींत तर अप्रत्यक्ष प्रतिकाराचा अवलंब करणें योग्य होईल काय? हा तिसरा प्रश्न आहे. राष्ट्रीय सभा व मॉस्लेमलीग यांनीं तयार केलेली सुधारणांची योजना जशीच्या तशी सरकारनें मान्य करावी असें अर्थात्‌च कोणीहि म्हणत नाहीं. परंतु तींत ग्रथित केलेल्या अवश्यक व महत्त्वाच्या सुधारणा अंमलांत आणण्याचें सरकारनें नाकारलें, व केवळ गौणच सुधारणा अंमलांत आणण्याचें ठरविलें तर लोकांनी अप्रत्यक्ष प्रतिकाराचा अवलंब करावा किंवा नाहीं, असा प्रश्न उपस्थित होतो. युरोपांतील युद्ध ब्रिटिश सरकारनें इतका स्वार्थत्याग करून कां चालविलें आहे याबद्दल जबाबदार ब्रिटिश मुत्सद्यांनीं वेळोवेळी केलेलीं भाषणें लक्षांत घेतां आम्हांस असें म्हणण्यास बिलकूल दिक्कत वाटत नाहीं कीं, स्वराज्याला पोषक अशा महत्त्वाच्या खऱ्याखुऱ्या सुधारणा ब्रिटिश सरकार हिंदु-

स्थानच्या राज्यपद्धतींत जर करणार नाही, तर कलकत्त्याच्या बिशपसाहेबांनीं म्हटल्याप्रमाणें सरकारचें वर्तन अतिशय ढोंगीपणाचें आहे असें म्हणावें लागेल. ज्या उदात्त तत्त्वांकरितां व ध्येयांकरितां ब्रिटिश सरकार आज जर्मनीबरोबर लढत आहे, तीं तत्त्वें व ध्येयें हिंदुस्थानच्या बाबतींत जर पायाखालीं तुडविण्यांत आलीं तर ब्रिटिश सरकार हिंदुस्थानच्या व सर्व सुधारलेल्या देशांच्या तिरस्काराला पात्र होईल." स्वातंत्र्याच्या, समतेच्या, न्यायाच्या, नीतीच्या, लोकसत्ताक राज्यपद्धतीच्या श्रेष्ठत्वाच्या, लांब लांब गप्पा मारून सरतेशेवटीं जर सरकार हिंदी लोकांच्या तोंडाला पानें पुशील आणि क्षुल्लक सुधारणांवरच त्यांची राष्ट्रीय उन्नतीची तृषा भागविण्याला त्यांना भाग पाडण्याचा प्रयत्न करील, तर ब्रिटिश सरकारच्या ह्या ढोंगी वर्तनाचा "अप्रत्यक्षपणें प्रतिकार" करणें अवश्य होईल. सुदैवानें अशी पाळी येणार नाहीं आणि स्वराज्याला पोषक अशा खऱ्याखुऱ्याच सुधारणा करण्यांत येतील असें मानण्याला हिंदुस्थानचे नवे सेक्रेटरी मि. मॉंटेग्यु यांच्या भाषणावरून सबळ आशा उत्पन्न झाली आहे. तथापि, मि. मॉंटेग्यु यांनाहि अँग्लो-इंडियन अधिकाऱ्यांनीं घेरलें आणि सरतेशेवटीं डोंगर पोखरून उंदीरच निघाला तर सरकारशीं शक्य त्या प्रमाणानें सहकारिता करण्याचें नाकारून अप्रत्यक्ष प्रतिकाराचा अवलंब करणें अवश्य होईल. परंतु यासंबंधानें राष्ट्रीय सभेला आजच निर्णय करण्याचें कारण नाहीं. एक तर आपल्या मागण्यांच्या समर्थनार्थ आपल्या हातून शक्य तितके उपाय झालेले नाहींत. आपण आपल्या मागण्या शक्य तितक्या सनदशीर उपायांनीं सरकारपुढें अद्याप मांडल्या नाहींत राष्ट्रीय सभेचें डेप्युटेशन अद्याप विलायतेस जावयाचें आहे, आणि पार्लमेंटाला अर्ज करणें वगैरे इतर उपाय अद्याप अंमलांत यावयाचे आहेत. मि. मॉंटेग्यु हे हिंदुस्थानांत येऊन काय करितात व त्यांची सुधारणांची योजना काय आहे हेंहि पाहावयाचें आहे. सरकारची सुधारणांची योजना सार्वजनिक चर्चेकरितां प्रसिद्ध करण्यांत येईल असें मि. मॉंटेग्यु यांनीं आश्वासन दिलें आहे. सबब ती योजना आपणांस पसंत पडली नाहीं तर तिच्यांत फेरबदल सुचविण्याची संधी आपणाला मिळणार आहे. आणि तिचा उपयोग करणें हें अर्थात्च आपलें कर्तव्य आहे. ह्या सर्व कारणांस्तव सुधारणांच्या प्रश्नाच्या बाबतींत अप्रत्यक्ष प्रतिकाराचा अवलंब करावा किंवा नाहीं याचा आजच राष्ट्रीय सभेला निर्णय करण्याचें कारण नाहीं. तथापि तात्त्विक दृष्ट्या विचार केल्यास आपण शक्य तितका प्रयत्न करूनहि जर सर-

कार सुधारणांच्या प्रश्नांचा समाधानकारक रीतीनें निकाल करणार नाहीं तर, आपल्या इच्छेप्रमाणें सुधारणा घडवून आणण्याकरितां अप्रत्यक्ष प्रतिकाराचें अवलंबन करावें लागेल असें आम्हांस वाटतें. आणि हें स्पष्टपणें सरकारला कळविण्याला बिलकूल हरकत नाही. सरकारला किंवा सरकारी अधिकाऱ्यांना स्पष्टोक्ति आवडत नाही हें आम्ही जाणून आहों. परंतु आम्हाला ज्या सुधारणा अगदी अवश्य वाटतात, त्या अंमलांत आणण्याचें सरकारनें नाकारलें तर त्याकरितां अप्रत्यक्ष प्रतिकाराचें धोरण आम्हांस नाइलाजास्तव स्वीकारावें लागेल असें स्पष्टपणें सरकारला कळविणें हें आपलें कर्तव्य आहे. अप्रत्यक्ष प्रति-काराचें धोरण सोपें आहे असें नाही आणि तें निरुपायाशिवाय कोणी स्वीकारीतही नाही. तव्हां त्याचा अवलंब करणें सरतेशेवटीं जर अवश्य झालें तर त्यांत कर्तव्यबुद्धीच्या पलीकडे कांहीं आहे असा भलताच अर्थ सरकार करील असें मानण्याचें कारण नाहीं.

## उपसंहार.

राज्यरक्षण कानूअन्वयें केलेले हुकूम, जाहीरसभांना प्रतिबंध व राजकीय सुधारणाचा प्रश्न, ह्या तीन बाबींसंबंधानें राष्ट्रीय सभेला अप्रत्यक्ष प्रतिकाराचें धोरण कितपत स्वीकारतां येईल याचा आम्ही वर लिहिल्याप्रमाणें विचार केला आहे. अप्रत्यक्ष प्रतिकार हें तीव्र शस्त्र असल्याकारणानें सामान्यतः त्याचा एकदम उपयोग करणें योग्य व इष्ट होणार नाही. परंतु त्याचा उपयोग करण्याची आवश्यकता प्राप्त झाल्यास, तत्परतेनें, आनंदानें व जुटीनें त्याचा उपयोग करण्यास समाज तयार झाला तरच त्यांच्यांत नागरिकत्वाची जाणीव आणि नैतिक सामर्थ्य आहे असें म्हणतां येईल. अन्याय दूर होईपर्यंत तो दूर करण्याची उत्कट बुद्धि बाळगणें हें राष्ट्रीय शीलाचें अत्यंत महत्त्वाचें अंग आहे. आणि इंग्लंड, फ्रान्स, अमेरिका, जपान, यांच्या राष्ट्रीय शीलांत तें बऱ्याच प्रमाणांत आढळून येत असल्यामुळेंच त्यांना जगांत उच्च स्थान प्राप्त झालें आहे. रा० गांधी हे वारंवार सांगत असतात की, अप्रत्यक्ष प्रतिकार ही आत्म्याची शक्ति [ Soul force ] आहे. आणि तें अगदी बरोबर आहे. ज्या व्यक्तीच्या किंवा राष्ट्राच्या आत्म्याची शक्ति विकसित झाली आहे तिलाच किंवा त्यालाच अप्रत्यक्ष प्रतिकार साध्य आहे. नेभळट, स्वार्थी, अभिमानशून्य, परस्परकलहांत आनंद मानणाऱ्या लोकांच्या हातून अप्रत्यक्ष प्रतिकार होणार नाहीं; आणि उलट

पक्षीं, ज्या व्यक्तीच्या किंवा समाजाच्या हातून अप्रत्यक्ष प्रतिकार होईल, त्या व्यक्तीत किंवा त्या समाजांत असले दुर्गुण आढळून येणार नाहींत. सरकारची शक्ति सामान्यतः किती प्रचंड असते हें सर्वांना माहीत आहे. असल्या प्रचंड शक्तीबरोबर केवळ न्यायाकरितां अप्रत्यक्ष प्रतिकाराचा अवलंब करून झगडणें किती क्लेशकारक आहे हें कोणास सांगावयास पाहिजे असें नाहीं. हे क्लेश सहन करण्याला आत्मा जिवंत व जोरदार असावा लागतो आणि म्हणून ज्यांना अप्रत्यक्ष प्रतिकाराचें अवलंबन करावयाचें असेल त्यांची चांगली नैतिक व आत्मिक उन्नति झालेली असली पाहिजे. अप्रत्यक्ष प्रतिकाराचा एकदां अवलंब केल्यानंतर आपला हेतु सिद्धीस जाण्यापूर्वीच आपण मागें घेतलें तर आपल्या छीःथूला पारावार राहणार नाहीं. आणि म्हणून अप्रत्यक्ष प्रतिकाराचा अवलंब करावयाचा असल्यास तो निर्धारानेंच केला पाहिजे. अप्रत्यक्ष प्रतिकाराचीं हीं मूलतत्त्वें आहेत आणि अप्रत्यक्ष प्रतिकाराचें अवलंबन करूं इच्छिणारांनीं तीं पूर्णपणें लक्षांत ठेविलीं पाहिजेत, व म्हणूनच सभाबंदीच्या बाबतींत प्रत्येक सभाबंदीच्या हुकुमाचा प्रांतिक कॉंग्रेस कमिटीनें विचार करावा असें आम्हीं सुचविलें आहे. बंगाल सरकारनें केलेला सभाबंदीचा हुकूम परत घेतला व अन्य ठिकाणींही सभाबंदीचे नवीन हुकूम मोडलेले नाहींत. यावरून या बाबतींतही लोकमताचा सरकारावर परिणाम होऊन सरकारचें धोरण बदललें आहे, असें दिसतें. साराश, राष्ट्रीय सभेसारख्या संस्थेनें अप्रत्यक्ष प्रतिकाराचें अवलंबन करावें अशी परिस्थिति प्राप्त झाली नाहीं असें म्हणण्यास हरकत नाहीं. सुधारणांच्याही प्रश्नाचा समाधानकारक विचार होईल अशी आशा बाळगण्यास कारण आहे. व मिसेस बेझंट आणि त्यांचे साथीदार यांना सोडून देण्यांत येईल अशींही चिन्हें दिसूं लागलीं आहेत. हिंदुस्थानचें राजकीय वातावरण शांत होऊन सर्वत्र आबादीआबाद झालें तर त्यांत सर्वांना आनंदच आहे. परंतु हिंदुस्थानच्या सुदैवानें किंवा दुर्दैवानें ह्या सर्व नूतन आशा विलयास गेल्या, आणि अन्यायाचेंच साम्राज्य टिकलें तर अप्रत्यक्ष प्रतिकाराचें धोरण स्वीकारण्याला हिंदी लोकांनीं, भ्याडपणाचे व स्वार्थाचे विचार अजिबात टाकून देऊन कंबर बांधली पाहिजे, त्याशिवाय तरणोपाय नाहीं, हें उघड आहे.

---

# पुस्तकपरीक्षण.

## प्रो. रॉलिन्सन्-कृत शिवाजीचें चरित्र.

डेक्कन कॉलेजांतील इंग्रजीचे प्रोफेसर रॉलिन्सन्‌साहेब ह्यांनीं " शिवाजी—त्याचें चरित्र व त्याचे वेळचा काळ " ह्या नांवाचें पुस्तक नुकतेंच प्रसिद्ध केलें आहे. प्रो. रॉलिन्सन् ह्यांची डेक्कन कॉलेजांत प्रोफेसराच्या जागीं नेमणूक होऊन जरी फारशी वर्षें झालीं नाहींत, तरी विद्वत्तेबद्दल, विद्याव्यासंगाबद्दल व ग्रंथरचनेबद्दल त्यांची बरीच कीर्ति झालेली असून, इंग्लडांतून हिंदुस्थानांत जे थोडे उत्तम प्रोफेसर येऊन गेलेले आहेत त्यांत कालांतरानें त्यांची गणना होण्यासारखी आहे, अशी पुष्कळांना आशा वाटूं लागली आहे. त्यांनीं " बॅक्ट्रिया " " हिंदी इतिहासविषयक निबंध ", " हिंदुस्थान व पाश्चिमात्य देश यांचेमधील दळणवळण " इत्यादि ग्रंथ लिहिले असून त्या ग्रंथांची विद्वानांकडून बरीच वाहवा झाली आहे. अशा विद्वान व कसलेल्या लेखकानें मराठ्यांच्या इतिहासाचें अध्ययन करून शिवाजीमहाराजांचें चरित्र लिहावें ही मोठी आनंदाची गोष्ट होय.

सुमारें पंचवीस वर्षांपूर्वी सर वुइल्यम हंटर ह्यांनीं सुरू केलेली " हिंदुस्थानचे राज्यकर्ते " ह्या नांवाची ग्रंथमाला ( Rulers of India series ) इंग्रजी वाचकांना माहित आहेच. त्या मालिकेंत निरनिराळ्या लेखकांनीं अशोक, अकबर, औरंगजेब, महादजी शिंदे, रणजितसिंग, डुप्ली, क्लाइव्ह इत्यादि हिंदी व आंग्ल राज्यकर्त्यांचीं व कर्तृत्ववान् पुरुषांचीं चरित्रें लिहिलीं आहेत व त्यांपैकीं कांहीं चरित्रांचीं मराठींत भाषांतरेंही झालीं आहेत. ही ग्रंथमाला प्रसिद्ध करण्याचें हंटरसाहेबांनीं जेव्हां जाहीर केलें, तेव्हां तींत महादजी शिंदे, रणजितसिंग, डुप्ली, क्लाईव्ह इत्यादिकांचीं चरित्रें यावीं, परंतु मराठ्यांच्या राज्याचे संस्थापक शिवाजीमहाराज ह्यांचे चरित्रास स्थान देण्यांत येऊं नये, ह्याबद्दल त्या वेळीं मराठी वर्तमानपत्रांतून बरीच टीका झाली होती. त्या टीकेस मान देऊन हंटरसाहेब शिवाजीमहाराजांचें चरित्र लिहिण्याचें काम, कोणा एखाद्या अधिकारयुक्त आंग्ल किंवा हिंदी लेखकाकडे सोंपवितील, अशी लोकांना फार आशा वाटत होती. परंतु दुराग्रहामुळें म्हणा किंवा इतर कोणत्याही कारणामुळें म्हणा, ' हिंदी राज्यकर्ते ' ह्या ग्रंथमालेंत, शिवाजीमहाराजांच्या उदात्त

रूपी पुष्पाचा अभाव झाल्यामुळें त्या मालेच्या वैचित्र्यांत, सौरभांत व मनोहारित्वांत जो न्यूनपणा आला होता तो अद्याप नाहींसा झालेला नाहीं. पुढें मेसर्स लॉंगमन्स कंपनीनें "हिंदुस्थानच्या इतिहासाचे मुख्य काल" ( Epochs of Indian History ) ह्या नांवाची ग्रंथमाला सुरू केली. तींत रोमेशचंद्र दत्त ह्यांनीं "प्राचीन भरतभूमि" ह्या नांवाचें पुस्तक लिहिलें असून "मराठ्यांच्या इतिहासा" वर ग्रंथ लिहिण्याचें काम न्यायमूर्ति तेलंग यांचेकडे सोंपविलें होतें. तेलंगांचें इंग्रजी भाषेंतील प्रावीण्य अप्रतिम होतें, व त्यांचे ठायीं समतोलपणा, पूर्ण माहिती मिळविल्याशिवाय कोणतेंही विधान न करण्याची बुद्धि, चिकित्सकपणा, सहानुभूति इत्यादि इतिहासकारास अवश्य लागणारे गुण चांगल्या रीतीनें वसत असल्यामुळें, त्यांचा "मराठ्यांचा इतिहास" भाषा व विचारसरणी ह्या दोन्ही दृष्टींनीं उत्तम ऐतिहासिक ग्रंथांत गणला गेला असता ह्यांत शंका नाहीं. परंतु, त्यांच्या अकालीं मृत्यूमुळें 'मराठ्यांचा इतिहास' लिहिण्याचें काम तसेंच राहिलें व पुढें लॉंगमन्स साहेबांची ग्रंथमालाही बंद पडली. ह्यानंतर न्यायमूर्ति रानड्यांचा "मराठी सत्तेचा अभ्युदय" Rise of the Maratha Power ह्या नांवाचा ग्रंथ प्रसिद्ध झाला. न्यायमूर्ति रानडे यांचा ग्रंथ प्रसिद्ध होण्यापूर्वी मराठ्यांच्या इतिहासाबद्दल व विशेषतः शिवाजीमहाराजांबद्दल ज्या कल्पना आंग्ल व इतर पाश्चिमात्य लोकांत प्रचलित होत्या, त्या सर्व ग्रँड डफच्या मराठ्यांच्या इतिहासावरून प्रचलित झालेल्या होत्या. ग्रँड डफचा इतिहास म्हणजे मराठ्यांचा इतिहास लिहिण्याचा पहिलाच प्रयत्न होता, व डफ साहेब हे इतिहासकार किंवा लेखक नसून केवळ सैन्यांतील अधिकारी होते, हें लक्षांत घेतां सदरहु ग्रंथ, ग्रोटच्या ग्रीसच्या इतिहासाच्या किंवा मॉमसन व गिबन ह्यांच्या रोमच्या इतिहासांच्या किंवा अलिसनच्या युरोपच्या इतिहासाच्या किंवा लेकीच्या इंग्लंडच्या इतिहासाच्या तोडीचा झालेला नाहीं यांत कांहीं नवल नाहीं. आमच्या मतें ग्रँड डफच्या "मराठ्यांच्या इतिहासां" त जो मोठा दोष आहे तो, त्याचा ग्रंथ वरील ग्रंथांप्रमाणें पहिल्या दर्जाचा वठला नाहीं, हा नसून त्यांना मराठ्यांच्या चळवळीचें व त्या चळवळीचे पहिले व मुख्य पुरस्कर्ते शिवाजीमहाराज ह्यांच्या चरित्राचें, रहस्य समजलें नाहीं, हा होय. त्यांच्या मतें शिवाजीमहाराज खुनी व लुटारू असून त्यांनीं मुसलमानी सत्तेविरुद्ध सुरू केलेल्या चळवळींत देशाभिमानाचा व राष्ट्रीयत्वाच्या कल्पनेचा लवलेशही नव्हता. लुटारू लोकांनीं जसा धुमाकूळ माजवावा व सांपडेल त्याची संपत्ति हिरावून न्यावी त्याप्रमाणेंच शिवा

जीमहाराजांचें व त्यांच्या अनुयायांचें धोरण होतें. ही कल्पना किती चुकीची आहे, हें न्यायमूर्ति रानडे यांनी आपल्या ग्रंथांत उत्तम रीतीनें दाखविलें आहे. परंतु मराठ्यांच्या इतिहासाबद्दल पाश्चिमात्य लोकांना जी कांहीं थोडीबहुत माहिती आहे, ती बहुतेक ग्रँड डफच्या इतिहासावरून मिळविलेली असल्यामुळें, वरील कल्पना जरी पूर्वीप्रमाणेंच बलवत्तर राहिलेली नाही, तरी अद्याप पूर्णपणें नाहींशीही झाली नाहीं. दुराग्रह व गैरसमजुती दूर करणें फार दुरापास्त असतें ( Prejudices die hard ) अशी जी इंग्रजींत म्हण आहे, ती मराठ्यांच्या इतिहासास अक्षरशः लागू पडते. असो. ग्रँड डफच्या इतिहासांत वर सांगितलेला मोठा दोष असल्यामुळें त्याची किंमत बरीच कमी झालेली आहे. तथापि त्याबरोबर हेंही कबूल केलें पाहिजे कीं, जरी त्याचा इतिहास प्रसिद्ध होऊन अर्धशतकापेक्षां अधिक वर्षें झालीं आहेत व दरम्यान बरीच उपयुक्त व महत्त्वाची माहितीही उपलब्ध झाली आहे, तरी अद्याप मराठींत किंवा इंग्रजींत मराठ्यांचा इतिहास लिहावा तसा कोणींही लिहिलेला नाहीं. एखाद्या हुषार 'मराठा' पदवीधराच्या हातून हें कार्य होईल अशी आम्हांस फार आशा आहे. परंतु आमच्यामध्यें ग्रोट, गिबन, मॉम्सन, ह्यॉलॅम, लेकी, अलिसन ह्यांच्यासारखे उत्कृष्ट इतिहासकार निपजेपर्यंत डफ, हंटर, कीन ह्यांच्यासारख्या दुसऱ्या किंवा तिसऱ्या प्रतीच्या इतिहासकारांच्या ग्रंथांनींच आपण आपलें काम भागविलें पाहिजे, हें उघड आहे.

इंग्रज इतिहासकार किंवा टीकाकार कांहींही म्हणोत, शिवाजमिहाराज हे अस्सल देशभक्त असून त्यांनीं केलेल्या चळवळीच्या बुडाशीं लुटारूपणा, स्वार्थ इत्यादि नीच वृत्ती नसून देशाभिमान, हिंदुधर्मरक्षण वगैरे उदात्त हेतू होते, ह्याबद्दल ज्यांच्या धमन्यांत मराठ्यांचें रक्त खेळत आहे, त्यांना तरी तिळप्राय संशय वाटत नाहीं. शिवाजीमहाराजांबद्दल मराठ्यांना इतकें अप्रतिम प्रेम वाटत असल्यामुळें त्यांचें चरित्र कोणींही लिहिलें, तरी तें वाचण्याची साहजिकपणेंच उत्कंठा होते. व प्रो॰ रॉलिन्सन साहेबांनीं शिवाजीमहाराजांचें चरित्र लिहून तें लवकरच प्रसिद्ध होणार आहे, असें आम्हांस समजल्यावर, तें प्रसिद्ध झाल्याबरोबर लागलींच आम्हीं तारापुरवाला व कंपनी ह्यांचेकडून मागवून वाचिलें. परंतु आम्हांस लिहिण्यास अत्यंत वाईट वाटतें, कीं ग्रंथकाराच्या योग्यतेवरून, व त्यांच्याच पूर्वी प्रसिद्ध झालेल्या "हिंदी इतिहासविषयक निबंध"

( Indian Historical Studies ) ह्या नांवाच्या ग्रंथांत शिवाजीमहाराजांवर जो त्यांनीं निबंध लिहिला आहे त्यावरून, प्रस्तुत ग्रंथांतलि माहितीबद्दल व त्याच्या एकंदर महत्त्वाबद्दल जें आम्हीं अनुमान केलें होतें, तें खोटें ठरून आमची बरीच निराशा झाली. प्रो० मजकुरांना शिवाजीमहाराजांचें चरित्र जर लिहावयाचें होतें, तर त्यांनीं चांगली माहिती मिळवून व शिवाजी महाराजांच्या चरित्रांतील वादग्रस्त मुद्यांचें अधिक विस्तृत विवेचन करून लिहावयास पाहिजे होतें, असें आह्मांस म्हणणें भाग आहे, व त्याबद्दल प्रो० रॉलिन्सन साहेब आमचेवर रागावणार नाहींत अशी आह्मांस आशा आहे.

प्रो. रॉलिन्सनच्या ग्रंथाचें नांव (" Shivaji the Maratha : His life and times " ) " शिवाजी–त्याचें चरित्र व त्याचा काळ " हें आहे. ग्रंथाचे नांवावरून त्यांतील मजकुराबद्दल जर अनुमान काढणें योग्य असेल–व तें योग्य आहे, ह्याबद्दल मतभेद असूं शकणार नाही–तर प्रस्तुत ग्रंथांत शिवाजी महाराजांचे वेळी, महाराष्ट्राची एकंदर राजकीय, धार्मिक वगैरे स्थिति कशी होती, ह्याची बरीच माहिती द्यावयास पाहिजे होती. विशेषतः, शिवाजीमहाराजांनीं स्वातंत्र्याची चळवळ सुरू करण्यापूर्वी, महाराष्ट्रांतील साधुसंतांच्या प्रयत्नांनीं व त्यांच्या जीवंत वाणीनें, महाराष्ट्रांतील हिंदु लोकांत जी धार्मिक व राजकीय जागृति झाली होती, तिचें चित्र ग्रंथकर्त्यानें काढावयास पाहिजे होतें. परंतु ह्याबद्दल प्रो. रॉलिन्सन ह्यांनीं आपलें पुस्तकांत दिलेली माहिती फारच त्रोटक व जुजबी आहे. त्यांच्या ग्रंथाचें नांव जरी मोठें व भपकेदार आहे, तरी त्यावरून शिवाजीमहाराजांचे काळाची चांगलीशी कल्पना होत नाहीं. पुस्तकाच्या बारा पानांच्या पहिल्या प्रकरणांत दक्षिणेचा आरंभापासून इतिहास दिला आहे, व विजापूर व अहमदनगर येथील मुसलमानी अमदानींत हिंदु लोकांची स्थिति कशी होती, ह्याची हकीकत सदरहु प्रकरणाच्या फक्त दोन पानांत ( पानें २३ व २४ ) दिलेली आहे. संक्षिप्तता बुद्धिमत्तेचा आत्मा होय ( Brevity is the soul of wit ) ही इंग्रेजी म्हण कांहीं खोटी नाहीं. परंतु ह्या म्हणींतील तत्वाचेंच अवलंबन जर रॉलिन्सन साहेबांस करावयाचें होतें, तर त्यांनीं आपले ग्रंथास भपकेदार नांव कां द्यावें हें आह्मांस समजत नाही. पुस्तकाचे शेवटीं " शिवाजी व मराठा कवी " ( Shivaji and Maratha Poets ) हें परिशिष्ट जोडलेलें आहे. परंतु त्यांतही फक्त तुकाराम व रामदास ह्या दोनच

कवींची हकीकत दिली आहे व तीही फारच त्रोटक असून त्यांच्या काव्याचा व चारित्र्याचा महाराष्ट्रावर परिणाम काय झाला, ह्या मुद्याचें मुळींच विवेचन केलेलें नाहीं.

शिवाजीमहाराजांच्या चरित्राबद्दल आतां बरीच सामुग्री उपलब्ध झालेली आहे. परंतु त्या सर्व सामुग्रीचा प्रो. रॉलिन्सन साहेबांनीं आपलें पुस्तक लिहितांना उपयोग केलेला दिसत नाही. शिवाजी महाराजांच्या–म्हणजे भोसले–घराण्याच्या सोळा बखरी उपलब्ध आहेत, असें खुद्द प्रोफेसर मजकूरच प्रस्तावनेंत लिहितात. असें असतां, त्यांनीं 'फक्त तीन चार बखरींच्याच आधारें आपलें पुस्तक लिहावें, हें इतिहासकाराच्या किंवा चरित्रकाराच्या योग्य कर्तव्यास फारसें धरून आहे, असें आमच्यानें म्हणवत नाहीं. तसेंच त्यांनीं जो इतर ग्रंथांचा आधार दिला आहे, त्यांत प्रो. ओवेन साहेबांच्या India on the eve of the British conquest ( ब्रिटिशांचा विजय होण्याचे वेळचें हिंदुस्थान ) ह्या ग्रंथाचा उल्लेख नसावा हें अंमळ आश्चर्यकारकच आहे. न्यायमूर्ती रानड्यांच्या ग्रंथाचा उल्लेख केला आहे, परंतु शिवाजीमहाराजांचे गुण व पराक्रम ह्यांचेविषयींची त्यांचीं मतें अतिशयोक्तीचीं आहेत, असा अंमलबजावणी खात्यांतील बड्या अधिकाऱ्याच्या पद्धतीस साजेल असा सरसकट शेरा मारून, सद्रहू उत्कृष्ट ग्रंथाचा प्रोफेसर मजकुरांनीं एका वाक्यांत समाचार घेतला आहे !

( The late Justice Ranade's brilliant little essay on The Rise of the Maratha Power is spoilt by the author's exaggerated views on his hero's merits and achievements)

रानड्याचीं कोणतीं मतें अतिशयोक्तीचीं आहेत, व तीं कशी अतिशयोक्तीचीं आहेत, हें दाखविण्याचा प्रयत्न न करितां 'समरी' अधिकार गाजविणाऱ्या मॅजिस्ट्रेटाप्रमाणें त्यांनीं रानड्यांच्या विचारपूर्वक लिहिलेल्या ग्रंथावर आपल्या नापसंतीचा एकदम शिक्का मारावा, हें टीकाकाराच्या उच्चतम ध्येयास अनुसरून आहे, असें कोण म्हणेल ? असो.

प्रो. रॉलिन्सनच्या पुस्तकाचीं एकंदर आठ प्रकरणें असून सुमारें नव्वद पानांच्या मर्यादेंत शिवाजीमहाराजांचा सर्व वृत्तांत दिला आहे. आठव्या प्रकरणांत शिवाजीमहाराजांचा स्वभाव व त्यांचे पराक्रम ह्यांचा विचार केलेला आहे. प्रो. रॉलिन्सन शिवाजीमहाराजांची ग्रँडडफ व इतर आंग्ल इतिहासकार यांच्याप्रमाणें

खुनी व लुटारू ह्यांचे वर्गांत गणना करीत नाहींत, ही मोठी समाधानाची गोष्ट आहे.. ते म्हणतात: —

**" There seems to be little doubt that Shivaji grew up with a genuine sense of a mission, that his career was inspired by a real desire to free his country from what he considered to be a foreign tyranny, and not by a mere love of plunder. "**

( आपणास विशेष कार्य करावयाचें आहे ही भावना लहानपणापासूनच शिवाजीमहाराजांचे मनांत वसत होती, व त्यांचा जीवनक्रम परकीयांची जुलमी सत्ता म्हणून जी त्यास वाटत होती, त्या सत्तेपासून आपला देश मुक्त करण्याच्या खऱ्या इच्छेनें प्रेरित झाला होता, केवळ लुटीच्या लोभानें प्रेरित झाला नव्हता, ह्यांत शंका नाहीं. ) शिवाजीमहाराजांनीं चालविलेली चळवळ राष्ट्रीय स्वातंत्र्याकरितां होती, तिच्या बुडाशीं लुटारुपणा नव्हता, हें मत प्रांजळपणें व्यक्त केल्याबद्दल आम्ही प्रो. रॉलिन्सन साहेबांचें मनःपूर्वक अभिनंदन करतों. प्रो. मजकुरांचें पुस्तक मुख्यत्वेंकरून इंग्रजी सामान्य वाचकांकरितां लिहिलेलें असल्यामुळें यापुढें तरी शिवाजीमहाराज हे खुनी व लुटारू होते ह्या कल्पनेस मुळींच थारा मिळणार नाहीं. अशी आम्हांस आशा आहे. मात्र इंग्रजी इतिहासकारांची शिवाजीमहाराजांबद्दलची ही चुकीची कल्पना खोडून काढतांना हिंदी लेखकांवर त्यांनीं जो शिंतोडा उडविला आहे, तो आम्हांस पसंत नाहीं. रानड्यांच्या ग्रंथावर त्यांनीं काय शेरा मारिला आहे, हें वर सांगितलेंच आहे. परंतु त्यांची टीका नुसती रानड्यांच्या ग्रंथावर नसून सरसकट सर्व हिंदी लेखकांवर आहे. प्रो० साहेब ह्मणतात: " Indian writers are prone, often for political ends, to exaggerate his good qualities to an extraordinary degree " ( शिवाजीमहाराजांच्या गुणांचें, असामान्य प्रमाणानें अतिशयोक्ति करून, वर्णन करण्याची हिंदी लेखकांची प्रवृत्ति आहे, व त्यांत पुष्कळ वेळां त्यांचे राजकीय हेतू असतात. ) हिंदी लेखकांचें शिवाजीमहाराजांच्या गुणांचें वर्णन अतिशयोक्तीनें भरलेलें असतें, हा सिद्धांतच अगोदर न्याय्य नाहीं. तथापि, तो न्याय्य आहे असें जरी क्षणभर गृहीत धरलें, तरी त्यांत त्यांचे राजकीय हेतू असतात, हें कशावरून ? चिटणीस, सभासद् वगैरे बखरीकारांनीं शिवाजीमहाराजांच्या गुणांचें वर्णन केलें आहे, तें अर्वाचीन ग्रंथकारांच्या वर्णनापेक्षां कमी

आहे, असें नाहीं. किंबहुना तें कांकणभर अधिकच आहे. पूर्वीचे ग्रंथकार शिवाजीमहाराजांना शंकराचा अवतार समजत असत, अर्वाचीन चिकित्सक ग्रंथकार निदान तसें तरी समजत नाहींत. मग पूर्वीच्या बखरीकारांचे राजकीय हेतू होते काय ? त्यांचे जर नव्हते तर अर्वाचीन लेखकांचे आहेत हें कशावरून ? शिवाजी महाराजांच्या चरित्राचा राजकीय उपयोग करावा, असें जर कोणास वाटत असेल तर त्यास त्यांच्या गुणांचें अतिशयोक्तीनें वर्णन केल्याशिवाय करितां येणार नाहीं काय ? शिवाजी महाराज अस्सल देशभक्त होते. त्यांची चळवळ राष्ट्रीय स्वातंत्र्याकरितां होती, हे सिद्धांत, कीं ज्याबद्दल प्रो॰ साहेबांचेंही मत हिंदी लेखकांच्या मताप्रमाणेंच आहे, वरील प्रकारचा उपयोग करण्यास अगदीं पुरे आहेत. एखाद्या थोर ऐतिहासिक व्यक्तीच्या गुणाबद्दल प्रामाणिक मतभेद असूं शकणार नाहीं काय ? तर मग मनकवडेपणा करून अंतस्थ हेतू शोधीत बसण्यांत अर्थ काय ? तसेंच हिंदी लेखकांनीं केलेल्या शिवाजीमहाराजांच्या गुणवर्णनांत प्रो॰ मजकुरांस जर राजकीय हेतू दिसतात, तर आंग्ल इतिहासकारांनी केलेल्या शिवाजीमहाराजांच्या मालस्तीत हिंदु लोकांना राजकीय हेतू कां दिसूं नयेत ? आणखी एक मुद्दा असा आहे कीं, इतिहास व राजकारण ह्यांचा अन्योन्य संबंध आहे, ही गोष्ट खुद्द प्रो॰ साहेब नाकबूल करतील असें आम्हांस वाटत नाहीं. कारण हा सिद्धांत त्यांच्या गुरूंचे गुरु प्रो. सीलीसाहेब ह्यांनीं खुद्द प्रस्थापित केला आहे. इतिहास म्हणजे गतकालीन राजकारण, व राजकारण म्हणजे चालू इतिहास, हा सिद्धांत कांहीं खोटा नाहीं. असें जर आहे, तर शिवाजीमहाराजांचे देशाभिमान, धर्मबुद्धि, पवित्र आचरण, पितृभक्ति, मातृभक्ति, मित्रनिष्ठा, स्वार्थत्याग इत्यादि अनेक गुण डोळ्यांपुढें ठेविण्यास जर एखाद्या हिंदी गृहस्थानें आपल्या तरुण देशबांधवांस सांगितलें, तर त्यांत गैरवाजवी तें काय आहे ? ऐतिहासिक थोर राष्ट्रीय विभूती जर पुढील पिढ्यांना मार्गदर्शक व्हावयाच्या नाहींत, तर त्यांचीं चरित्रें लिहून तरी उपयोग काय ? ऐतिहासिक थोर व्यक्ती म्हणजे पदार्थसंग्रहालयांतील जुन्या अस्थी, पुरातन नाणीं, जुनाट चित्रें वगैरे वस्तूप्रमाणें कांहीं केवळ कौतूहलोत्पादक अचेतन पदार्थ नाहींत. व म्हणून त्यांच्या चरित्रांचा प्रस्तुत कालीं अनुरूप असा जर कोणीं उपयोग केला, तर त्यांत नांव ठेवण्यासारखें कांहीं आहे, असें आम्हांस वाटत नाहीं.

शिवाजीमहाराजांच्या चरित्रांत अत्यंत महत्त्वाचा व आणीबाणीचा प्रसंग म्हटला म्हणजे, त्यांची व अफझुलखानाची झालेली भेट हा होय. शिवाजीमहाराजांनी विश्वासघात करून अफझुलखानाचा खून केला असा कित्येक इतिहासकारांचा व लेखकांचा त्यांचेवर आक्षेप आहे. उलटपक्षी, बखरीकार व इतर लेखक ह्यांचें असें म्हणणें आहे कीं, अफझुलखानाचाच विश्वासघात करून शिवाजी महाराजांना पकडण्याचा हेतु होता; परंतु त्यांनी मोठ्या शिताफीनें व सावधगिरीनें तो हेतु सफळ होऊं न देतां, केवळ आपल्या बचावाकरितांच अफझुलखानाचा वध केला. अशी ह्या बाबतींत दोन भिन्न मतें आहेत, हें मराठी वाचकांना माहीत आहेच.

ह्या महत्वाच्या प्रश्नासंबंधानें प्रो. रॉलिन्सनसाहेब यांचें म्हणणें काय आहे, तें आपण पाहूं. पुस्तकाच्या तिसऱ्या प्रकरणांत ते लिहितात,

" He ( Shivaji ) conceived a plan which, for treachery and daring, is almost unparalleled in history. "

( धाडस व विश्वासघात ह्या बाबतींत, इतिहासांत ज्यास बहुतेक मुळींच साम्य सांपडणार नाहीं, अशी युक्ति शिवाजीनें योजिली. ) पुढें आठव्या प्रकरणांत ते लिहितातः—" Shivaji must not be judged by twentieth century western standards. He certainly from the English point of view, acted treacherously towards Afzul Khan " विसाव्या शतकांतील पाश्चिमात्य प्रमाणानें शिवाजीची परीक्षा करितां कामा नये. इंग्रजी दृष्टीनें पाहतां त्यांनी अफझुलखानाशीं विश्वासघात केला ह्यांत शंका नाहीं. ) ह्यानंतर एका टीपेंत प्रोफेसर साहेब म्हणतातः— "The murder of Afzul Khan was, after all, no more treacherous than the murder of the Red Comyn. Yet what historian seriously blames Robert the Bruce "?

( एकंदर विचार करितां, शिवाजीनें केलेला अफझुलखानाचा खून, रॉबर्ट ब्रूसनें केलेल्या रेड कॉमिनच्या खुनापेक्षा अधिक विश्वासघातकीपणाचा नव्हता. परंतु कोण इतिहासकार रॉबर्ट ब्रूसला त्याबद्दल मनापासून दोष देतो ! ) सारांश, प्रोफेसरांच्या मतें ( १ ) शिवाजीनें अफझुलखानाचा विश्वासघातानें खून केला.

परंतु ( २ ) त्या वेळची परिस्थिति व नीति लक्षांत घेतां त्याबद्दल शिवाजीस दोष देण्यांत अर्थ नाहीं.

शिवाजीनें अफझुलखानास विश्वासघात करून मारिलें, हें प्रो. रॉलिसन साहेबांचें मत अगदीं अलीकडे झालें असावें असें दिसतें. कारण १९१३ सालीं शिवाजीमहाराजांवर जो त्यांनीं निबंध लिहिला आहे, त्यांत त्यांनी अगदीं उलट मत व्यक्त केलें आहे. त्या निबंधांत गोपिनाथपंताच्या मध्यस्थीनें शिवाजीमहाराज व अफझुलखान ह्यांची भेट होण्याचें ठरलें असें सांगून, ते म्हणतात:—
" To this Afzul Khan raised no objection. Probably he thought that he would find an opportunity to assassinate or capture his foe. Himself a man of huge stature, and skilled in the use of arms, he saw nothing to fear in an open meeting with the insignificant Maratha. ( ह्या भेटीस अफझुलखानानें हरकत घेतली नाहीं. बहुतकरून त्यास असें वाटलें कीं, आपल्या शत्रूचा खून करण्याची किंवा त्यास पकडण्याची आपणास संधि मिळेल. अफझुलखान शरीरानें धिप्पाड असून शस्त्रांचा उपयोग करण्यांत निष्णात होता, सबब यःकश्चित् शिवाजीस भेटल्यानें भीति बाळगण्याचें त्यास कांहीं कारण वाटलें नाहीं. ) पुढें प्रोफेसर साहेब लिहितात:

" As he came in sight, Shivaji accompanied by his tried comrade Tanaji Malusare came down to meet him. What exactly happened after this, we shall never know. Afzul Khan may or may not have struck the first blow; but Shivaji, leaning forward as if to embrace him, thrust the tiger's claws into his entrails." ( अफझुलखान दृष्टीस पडतांच, शिवाजी आपला विश्वासु मित्र तानाजी मालुसरे ह्यांचेसह त्याला भेटण्याकरितां खालीं उतरला. ह्यानंतर अगदीं काय झालें हें आपणांस कधींहि समजणार नाहीं. अफझुलखानानें शिवाजीवर प्रथम आघात केला असेल किंवा नसेल, परंतु शिवाजी त्यास आलिंगन देण्याकरितां म्हणून

पुढें वांकला व त्यांनी त्याचें पोटांत वाघनख खुपसलें ) तसेंच, " The death of Afzul Khan was looked upon at the time as due to the man's own folly, and there is reasonable ground for believing that he met Shivaji for exactly tha same purpose himself " ( अफझुलखानाचा मृत्यु त्याच्या मूर्खपणामुळेंच झाला, असें त्या वेळीं लोक समजत असत. व शिवाजीची भेट घेण्यांत त्यास मारण्याचाच त्याचा हेतु होता असें मानण्यास योग्य जागा आहे. )

वरील अवतरणांवरून, शिवाजी–अफझुलखान प्रकरणाबद्दल प्रो. रॉलिन्सनसाहेबांचें इ. स. १९१३ त काय मत होतें, व इ. स. १९१५ त काय मत झालें, हें आमच्या वाचकांना कळून येईलच. मतांत बदल होणें हें कांहीं अशक्य नाहीं, व त्याबद्दल कोणीं कोणास दोषही देऊं नये. प्रश्न इतकाच कीं, मतांत बदल झाल्यानंतर त्याचीं कारणें देण्याची जबाबदारी लेखकावर येते किंवा नाहीं ? व जर ती येत असेल, तर शिवाजीमहाराजांच्या चरित्रांतील ह्या महत्वाच्या प्रश्नाबद्दल प्रो. साहेबांच्या मतांत जो फरक झाला आहे, त्याबद्दल त्यांनीं योग्य कारणें द्यावयास नको होतीं काय ? परंतु, त्यांनीं तसें केलें नाहीं, इतकेंच नव्हे, तर आपल्या पूर्वीच्या मताचा अंधुकसुद्धां उल्लेख प्रस्तुत ग्रंथांत केलेला नाहीं. व प्रोफेसरसाहेबांचा पूर्वीचा निबंध ज्याचे पहाण्यांत आला नसेल त्यास, ह्या बाबतींत दोन वर्षांपूर्वीं प्रोफेसरसाहेबांचें एक मत होतें, व हल्लीं दुसरेंच मत झालें आहे, असा तिळप्रायही संशय येणार नाहीं. वास्तविक पहातां, शिवाजी–अफझुलखान प्रकरणासारखीं इतिहासांत जी वादग्रस्त प्रकरणें आहेत, त्याबद्दल लिहितांना, लेखकांनीं फारच समतोलपणा दाखविला पाहिजे. प्रथम, सत्य काय आहे. हें शोधण्याचा त्यांनीं शक्य तो प्रयत्न केला पाहिजे; व ह्याकरितां सर्व बाजू वाचकांपुढें मांडल्या पाहिजेत. सर्व बाजूंचा निष्पक्षपातीपणानें विचार करून, सत्य शोधून काढणें दुरापास्त असेल, तर त्यांनीं तसें स्पष्ट मत दिलें पाहिजे, किंवा अमकी बाजू त्यांस सत्याची वाटत असेल, किंवा निराळेंच स्वतंत्र अनुमान त्यांस सयुक्तिक वाटत असेल, तर त्याबद्दल त्यांनीं कारणें दिलीं पाहिजेत. परंतु ह्या ऐतिहासिक पद्धतीचा प्रो. रॉलिन्सनसाहेब यांनीं प्रस्तुत प्रकरणांत अवलंब केलेला नाहीं, असें म्हणणें भाग आहे. इतिहासकाराचें कर्तव्य काय ह्यासंबंधानें प्रस्तावनेंत प्रोफेसरसाहेब

लिहितात की, " The object of the historian is, I conceive, to ' nothing extenuate, '

Nor aught set down in malice "

( आमच्या मतें, इतिहासकाराचा हेतु दोष कमी न लेखणें किंवा दूषबुद्धीनें भलतेंच न लिहिणें, हा होय ). इतिहासकाराच्या कर्तव्याची ही त्यांची कल्पना अगदीं योग्य आहे; परंतु ती अपुरी आहे, असें आम्हांस वाटतें. कारण, इतिहासकाराचें पहिलें कर्तव्य म्हटलें म्हणजे, सत्य शोधणें हें होय. उपलब्ध असलेल्या सर्व पुराव्याचा योग्य विचार करून प्रथम सत्य काय आहे, हें त्यांनीं पाहिलें पाहिजे. तें न करितां दोषारोप करणें किंवा दोषनिरसन करणें हें कधींही बरोबर होणार नाहीं. शिवाजी–अफझुलखान प्रकरणाबद्दल बखरी व इतर ग्रंथ ह्यांत जी माहिती दिली आहे, तिच्यावरून शिवाजीनें अफझूलखानाचा विश्वासघातानें खून केला हेंच जर अनुमान निघत असेल, तर त्याबद्दल शिवाजीस दोषच दिला पाहिजे. मग तो दोष किती द्यावयाचा ह्याचा विचार करितांना राजकारण, त्यावेळची परिस्थिति इत्यादि आनुषंगिक मुद्यांचा विचार करण्यास हरकत नाहीं. एकाद्या इसमावर खून केल्याचा आरोप असून त्याची चौकशी न्यायमंदिरांत चालली असतां, त्यानें खरोखर खून केला आहे किंवा नाहीं, हा मुख्य मुद्दा सोडून देऊन, जर न्यायाधीश, आरोपीच्या समाजांत कोणत्या नीतिकल्पना रूढ आहेत, त्यास कोणीं चेतविलें काय वगैरे मुद्यांचाच जर विचार करील, तर ज्याप्रमाणें न्यायास अनुसरून निर्णय होईल असें नाहीं, तद्वतच शिवाजीनें अफझुलखानाचा विश्वासघातानें खून केला काय हा मुख्य मुद्दा असतां, त्याबद्दलच्या पुराव्याचा मुळींच विचार न करितां, एकदम एखादें विधान करून, किंवा त्यानें खून केला असावा असें अगोदर गृहीत धरून, नंतर शिवाजीचें कृत्य त्या वेळच्या परिस्थितीच्या व नीतिमत्तेच्या दृष्टीनें कितपत दोषार्ह आहे, याचा विचार करणें म्हणजे खरा व मुख्य प्रश्न अजिबाद सोडून देऊन आंगतुक प्रश्नांचेंच स्तोम माजविण्यासारखें अगदीं अप्रशस्त आहे. प्रोफेसरसाहेबांनी आपल्या पहिल्या निबंधांत सत्य शोधण्याचा बराच निःपक्षपातीपणानें प्रयत्न केला आहे. कारण त्यांनीं त्यांत स्पष्ट म्हटलें आहे कीं, शिवाजी व अफझुलखान ह्यांची जेव्हां गांठ झाली, तेव्हां खरोखर काय झालें, हें आतां समजणें अगदीं अशक्य आहे. ( What exactly happened after

this, we shall never know ), हें विधान कोणास पसंत पडो किंवा न पडो, तें निदान निःपक्षापातीपणाचें द्योतक आहे, ह्यांत शंका नाही. परंतु प्रस्तुत पुस्तकांत, प्रो. साहेबांनी दोन्ही बाजूंचा विचार केलेला नाहीं, किंबहुना दुसरी बाजू आहे, असें ध्वनित सुद्धां केलें नाहीं.

सारांश, शिवाजी—अफझुलखान प्रकरणाबद्दल प्रो. साहेबांनीं प्रस्तुत पुस्तकांत जी हकीकत दिली आहे, व जी विधानें केलीं आहेत, त्यांबद्दल आमचे आक्षेप आहेत, ते येणेंप्रमाणें ( १ ) आपल्या पूर्वीच्या मतांत बदल कां झाला, हें त्यांनीं सांगितलें नाहीं. ( २ ) सदरहू प्रकरणाबद्दल ज्या दोन बाजू आहेत, त्या वाचकांपुढें मांडलेल्या नाहीत. ( ३ ) मुख्य मुद्याचा साधकबाधक प्रमाणें देऊन जो विचार करावयास पाहिजे तो केलेला नाहीं.

रॉबर्ट ब्रूसनें केलेल्या रेड कॉमिनच्या खुनापेक्षां शिवाजीनें केलेला अफझलखानाचा खून अधिक गर्हणीय नाहीं, असें खुद्द प्रोफेसरच कबूल करतात. इतकेंच नव्हे, तर ते आपल्या पहिल्या निबंधांत स्पष्ट लिहितात कीं, " The murder of the Comyn by Rodert Bruce was far more unjustifiable, but it is never brought against him ( कॉमिनच्या खुनाचें समर्थन करणें अधिक कठिण आहे, तरी सुद्धां त्याबद्दल कोणी रॉबर्ट ब्रूसला दोष लावीत नाहीत. ) असें जर आहे, तर शिवाजीनें केलेल्या ( प्रोफेसरांच्या मतें ) विश्वासघाताच्या तोडीला दुसरें उदाहरण इतिहासांत सांपडणार नाही, हें म्हणणें विसंगत नाही काय ? तसेंच इंग्रजी दृष्टीनें पाहतां, शिवाजीनें अफझुलखानाशीं विश्वासघात केला, असें म्हणण्यांत अर्थ काय ? विश्वासघाताच्या बाबतींत हिंदूंची दृष्टि एक व इंग्लिशांची दुसरी असें आहे काय ? एखाद्यास विश्वास दाखवून फसविणें यास पूर्वात्य राष्ट्रांत विश्वासघात मानीत नाहीत, व जरी मानीत असलें तरी त्यांच्या दृष्टीनें तो मोठासा अवगुण नाहीं, असें ध्वनित करण्याचा जर प्रोफेसर साहेबांचा हेतु असेल, तर आम्ही त्यांस स्पष्ट विचारतों कीं, असें मानण्यास त्यांस कोणता आधार आहे ? पाश्चात्य नीतिमत्ता पौर्वात्य नीतिमत्तेपेक्षां श्रेष्ठ आहे, असें पाश्चात्य लेखकांना व मुत्सद्यांना प्रतिपादन करण्याची फार संवय आहे. परंतु अद्यापही, सध्याच्या युद्धामुळें खुद्द पाश्चात्य सुधारणेच्या परीक्षेची वेळ आली असतां, असलीं दुरभिमानाचीं विधानें करण्यांत यावीं, हें मोठें चमत्कारिक आहे ! असो.

प्रोफेसर रॉलिन्सन साहेबांचे पुस्तकांत याशिवाय आणखीही बारीक सारीक दोष आहेत. उदाहरणार्थ, औरंगजेबाच्या दरबारांतील इतिहासकार खाफीखान याचा शिवाजीबद्दलचा अभिप्राय योग्य निःपक्षपाती आहे, असें सांगून प्रोफेसर-साहेबांनीं त्या अभिप्रायांतील उतारा दिला आहे. परंतु शिवाजी बायका लुबाडीत असे, असा खोटा आरोप ज्या इतिहासकारानें शिवाजीमहाराजांवर लादला आहे, त्याचा अभिप्राय निःपक्षपाती कसा, हें समजणें फार कठीण आहे. एकंदर विचार करितां प्रोफेसर साहेबांनीं लिहिलेलें शिवाजी महाराजांचें चरित्र पहिल्या प्रतीचें वठलें आहे, असें म्हणतां येत नाहीं. त्यांत बरेच दोष आहेत; व सबब कोणी हिंदी पदवीधर शिवाजीमहाराजांचें सविस्तर चरित्र लिहून त्यांची खरी योग्यता जगाच्या निदर्शनास आणण्याचा प्रयत्न करील, अशी आशा व्यक्त करून हें ग्रंथपरीक्षण पुरें करितों.

---

# ना. पटेल यांचें जातीजातींतील विवाहविषयक बिल.

ता. ५ सप्टेंबर १९१८ रोजी भरलेल्या हिंदुस्थानच्या कायदेकौन्सिलच्या बैठकींत ना. पटेल यांनी आपलें जातीजातीतील विवाहविषयक बिल सादर केलें. त्यावेळी बऱ्याच सभासदांनीं त्याची चर्चा केली आणि तेव्हांपासून तें हिंदुसमाजांत चर्चेचा एक महत्त्वाचा विषय झाला आहे. जिकडे तिकडे त्या बिलाची भवति न भवति होऊन त्याला अनुकूल व प्रतिकूल असे ठराव करण्यांत येत आहेत. ना. पटेल यांचें हें बिल अत्यंत महत्त्वाचें असून त्याचा हिंदुसमाजाच्या विचारांवर व आचारावर बराच परिणाम झाल्याशिवाय राहणार नाही. हें बिल सरतेशेवटीं कायदेकौन्सिलांतून पसार होऊन बाहेर निघेल किंवा नाहीं हें आजच सांगतां येणार नाही. तथापि येवढें निश्चित आहे की, जरी सरकारनें तें स्वीकारलें नाही, तरी त्याचा हिंदुसमाजाच्या विचारांवर व सरतेशेवटी आचारावर इष्ट परिणाम झाल्यावांचून राहणार नाहीं. १९१२ साली ना. बसु यांनी आणलेलें विवाहविषयक बिल जरी नापास झालें तरी त्याचा जसा सुपरिणाम झाला आणि हिंदुसमाजाच्या सामाजिक विचारांना इष्ट वळण लागण्याला त्याची जशी मदत झाली तसाच हितकारक परिणाम ना. पटेल यांच्या बिलाचा होईल अशी आमची पक्की खात्री आहे. आणि म्हणून हें बिल कौन्सिलपुढें आणल्याबद्दल आम्ही ना. पटेल यांचें मनःपूर्वक अभिनंदन करितों. राजकिय स्वातंत्र्याकरितां जसें युद्ध करावें लागतें व त्यांत ज्याप्रमाणें सरतेशेवटीं स्वातंत्र्याच्या पक्षाचा विजय होतो, त्याप्रमाणेंच सामाजिक स्वतंत्रता, न्याय आणि समता यांचेंही युद्ध असतें आणि राजकीय स्वातंत्र्याच्या युद्धाप्रमाणेंच तें दीर्घकाल नेटानें व चिकाटीनें चालवावें लागतें. राजकीय स्वातंत्र्याच्या युद्धापेक्षांहि हें युद्ध अधिक बिकट आहे. कारण या युद्धांत इष्ट सामाजिक तत्त्वांकरितां लढणाऱ्या लोकांचा पक्ष लहान असून त्याला बहुजनसमाजाशी विरोध करावा लागतो. परंतु न्यायाचा, सत्याचा व समानतेचा पक्ष सामाजिक असो अगर राजकीय असो, तो लहान असो, किंवा मोठा असो, सरतेशेवटी त्याचा विजय झाल्यावांचून राहत नाही. हिंदुस्थानच्या दुर्दैवानें ना. पटेल यांच्या बिलाची विल्हेवाट कदाचित् ना. बसु यांच्या बिलाप्रमाणेंच होईल. ना. पटेलांच्या प्रयत्नाप्रमाणें आणखी कित्येक

प्रयत्न करावे लागतील. परंतु पुराणमतवाद्यांनीं हें पक्कें लक्षांत ठेवावें कीं, हिंदुस्थानच्या सामाजिक प्रगतीला त्यांचेकडून जे अडथळे येत आहेत आणि पुढें येतील त्यांना न जुमानतां हिंदुस्थानच्या प्रगतीचा गाडा अव्याहत गतीनें पुढें गेल्यावांचून राहणार नाहीं. कालाचा ओघ हिंदुस्थानच्या राजकीय प्रगतीला जसा अनुकूल आहे, तसाच तो सामाजिक प्रगतीलाही अनुकूल आहे; आणि जे पुराणप्रिय लोक अज्ञानानें, अविचारानें किंवा उन्मत्तपणानें या ओघाचा प्रतिकार करण्याला उद्युक्त होतील ते त्याची गति तिळप्राय कमी करूं शकणार तर नाहींतच, परंतु ते स्वतः ओघांत सांपडून खुद्द त्यांचीच अवस्था कशी केविलवाणी होईल याचा त्यांनींच विचार करावा. ना. बसूंचें बिल कौन्सिलांत नापास होऊन आज ६:७ वर्षें झालीं. तितक्या अवधींत जगाच्या इतिहासात प्रचंड स्थित्यंतरें झालीं असून प्रत्येक सुधारलेलें राष्ट्र या नूतन परिस्थितीला अनुरूप अशा राजकीय व सामाजिक सुधारणा करण्याला तयार झालें आहे. प्रत्येक उन्नतीच्छु राष्ट्राला मदत करण्याला परमेश्वर उभा आहे. अशा अनुकूल परिस्थितींत कालाची गति कशी आहे याकडे डोळेझांक करून, हिंदुलोक अद्यापही कुपमंडूकच राहूं इच्छितील तर, त्यांच्यासारखे हतभागी तेच होत असें म्हणण्याची पाळी येईल. प्रत्येक राष्ट्रांत पुराणप्रिय असा एक वर्ग असतो; परंतु जीं राष्ट्रें खरोखर प्रागतिक आहेत त्यांत हा वर्ग लहान असून दुर्बल असतो. हिंदुस्थानांत मात्र याच्या उलट स्थिति अद्याप दिसून येते. जोंपर्यंत हिंदुस्थानांत अविचारी, दुर्बुद्ध, अज्ञानांध, पुराणप्रिय लोकांचा वर्ग मोठा आहे आणि त्याचें समाजावर वजन बरेंच आहे, तोंपर्यंत हिंदुस्थानची नष्ट दशा संपली अशी आशा कोणी करूं नये.

प्रस्तुत लेखांत ना. पटेल यांचें बिल पास होणें कसें अवश्य व इष्ट आहे हें दाखविण्याचा आमचा विचार आहे. आमचे वाचक या बिलाचा नीट विचार करून त्याचें समर्थन करतील अशी आम्हांस आशा आहे.

ना. पटेल यांचें बिल अगदीं लहान आहे. त्याचीं फक्त दोनच कलमें आहेत. तीं येणेंप्रमाणें—**भिन्नभिन्न जातींच्या हिंदूंचे विवाह कायदेशीर आहेत, असें ठरविणें इष्ट असल्यामुळें येणेंप्रमाणें कायदा करण्यांत येत आहे. (१) ह्या कायद्याला इ. स. १९१८ चा** ( Hindu Marriages validity Act ) **हिंदूंचीं लग्नें कायदेशीर करणारा कायदा**

म्हणावें ( २ ) हा कायदा सर्व ब्रिटिश हिंदुस्थानाला लागू आहे. वधू आणि वर जरी भिन्न जातींचीं असलीं तरी त्यामुळें त्यांचें लग्न गैरकायदेशीर होणार नाहीं. असें लग्न गैरकायदेशीर आहे अशी हिंदुसमाजांत जरी चाल असली, किंवा असा हिंदुधर्मशास्त्राचा अर्थ करण्यांत येत असला, तरी अशा प्रकारचें लग्न गैरकायदेशीर न समजतां तें या कायद्यानें कायदेशीर समजण्यांत येईल.

( Whereas it is expendient to provide that marriages between Hindus of different castes are valid, it is hereby enacted as follows;--( 1 ) This act may be called the Hindu Marriages Validity Act of 1918. ( 2 ) It extends to the whole of British India. No marriage among Hindus shall be invalid by reason that the parties thereto do not belong to the same caste, any custom or any interpretation of Hindu law to the contrary notwithstanding.

ना. पटेल यांचें बिल अवश्य किंवा इष्ट आहे किंवा नाहीं या प्रश्नाचा निर्णय करण्यापूर्वी कांहीं महत्त्वाच्या गोष्टी प्रत्येकानें लक्षांत घेतल्या पाहिजेत. पहिली गोष्ट अशी, कीं भिन्नभिन्न जातींतील विवाह कायद्यानें अगदीं निषिद्ध मानलेले नाहींत. भिन्नभिन्न जातींच्या तरुणतरुणींना विवाह करण्याची इच्छा झाली तर ती तृप्त करण्याचें साधन आजही त्यांना उपलब्ध आहे. हिंदुस्थानांत हल्लीं जीं सामाजिक स्थित्यंतरें होत चाललीं आहेत, तीं लक्षांत घेतां भिन्नभिन्न जातींतील विवाह दिवसेंदिवस वाढत्या प्रमाणानें होणें कठीण नाहीं, इतकेंच नव्हे तर तें अपरिहार्य आहे. भिन्नभिन्न जातींचें दळणवळण पूर्वींपेक्षां हल्लीं अधिक होत आहे; लग्नाची वयोमर्यादा वाढत्या प्रमाणावर आहे; कित्येक अविवाहित मुली इंग्रजी शाळा व कॉलेजें यांत विद्या संपादन करीत आहेत; असले विवाह नीतीच्या व धर्माच्या खऱ्या तत्त्वांच्या विरुद्ध नाहींत ही गोष्ट ज्यांना पटूं लागली आहे त्यांची संख्या वाढत आहे; हिंदुस्थानच्या एकीकरणाला व त्याच्या राजकीय उन्नतीला जातिनिर्बंध ढिले केले पाहिजेत, इतकेंच नव्हे तर ते अजीबात नाहींसे केले पाहिजेत या मताचा प्रसार अधिकाधिक होत आहे; भिन्नभिन्न जातींत विवाह घडल्याचीं उदाहरणें झालेलीं आहेत; अशा स्थितींत पुराणमतवाद्यांनीं

आणि धर्माच्या नांवाखालीं हिंदुस्थानच्या प्रगतीला विरोध करणाऱ्यांनीं, कितीही आक्रोश केला तरी असले विवाह अधिक प्रमाणानें झाल्याशिवाय रहाणार नाहींत. समाजशास्त्रवेत्ते आणि दूरदर्शी मुत्सद्दी यांचे धोरण नेहमीं असें असावें लागतें व असतें की, जी गोष्ट अपरिहार्य आहे ती जरी परंपरेच्या व कांहीं लोकांच्या दुराग्रहांच्या किंबहुना प्रामाणिक परंतु चुकीच्या समजुतीच्या विरुद्ध असली तरी ती कायद्यानें निषिद्ध करावयाची नाहीं. हें तत्त्व लक्षांत घेऊनच हिंदुस्थानसरकारनें १८७२ सालीं सिव्हिल मॅरेज अक्ट करून भिन्नभिन्न धर्मांतील व जातींतील विवाह कायदेशीर ठरविले आहेत. ह्या कायद्याचा फायदा घेऊन आजच्या स्थितींत कोणाही भिन्नभिन्न धर्मांच्या किंवा जातींच्या स्त्रीपुरुषांना विवाह करितां येईल. मात्र या कायद्यांत अशी एक शर्त ठेवण्यांत आली आहे की, ज्यांना त्याचा फायदा घ्यावयाचा असेल त्यांनीं आपण कोणत्याही संमत धर्माचे नाहीं, म्हणजे आपण हिंदु, मुसलमान, पार्शी, ख्रिस्ती, जैन, बुद्ध, वगैरे कोणत्याही धर्माचे नाहीं असें प्रथम प्रतिज्ञापूर्वक लिहून दिलें पाहिजे. ही शर्त पाळल्याशिवाय गत्यंतर नसल्यामुळें कित्येकांनीं असलीं विधानें करून लग्नें लावलेलीं आहेत. परंतु हीं विधानें त्यांनीं केवळ नाइलाजास्तव केलेलीं आहेत. खरोखर ते कोणत्याही धर्माचे नाहींत, किंबहुना त्यांचा हिंदुधर्मावरील विश्वास उडाला आहे, असें नाहीं. इतकेंच नव्हे तर असेंही म्हणण्यास हरकत नाहीं की हिंदुधर्माचा पोकळ अभिमान बाळगणाऱ्या लाखों लोकांपेक्षां त्यांचा हिंदुधर्माच्या मूलभूत तत्त्वांवरील विश्वास अधिक उत्कट आहे आणि त्यांचें वर्तन त्या तत्त्वांना अधिक धरून आहे. तेव्हां हिंदुसमाजापुढें प्रश्न आहे तो हा की, असलीं लग्नें अधिक प्रमाणानें होणें जर अपरिहार्य आहे, आणि तीं करणारे स्त्रीपुरुष अज्ञानांध किंवा केवळ विकारांध नसून विचारशील, सुशिक्षित, राष्ट्रकार्यतत्पर असे आहेत तर असल्या लोकांना आपल्या समाजांतून हांकलून लावून हिंदु लोक आपलें नुकसान करून घेणार की काय ! अगोदरच हिंदुधर्म धर्मांतराच्या विरुद्ध असल्यामुळें त्याच्या अनुयायांची संख्या नैसर्गिक कारणांनीं जितकी वाढावयाची त्यापेक्षां अधिक प्रमाणानें वाढत नाहीं. हिंदुसमाज इतर समाजांच्या मानानें अनेक बाबतींत अधिक दुर्बळ होत चालला आहे. अशी वस्तुस्थिति असतां हिंदुधर्माचा व हिंदुसमाजाचा पाया अधिकाधिक विस्तृत करून हिंदुसमाजांतील एकही व्यक्ती त्या समाजाच्या बाहेर जाणार नाहीं अशी खबरदारी घेणें प्रत्येक खऱ्या हिंदुधर्माभिमान्याचें पवित्र

स्वातंत्र्याच्या व व्यक्तस्वातंत्र्याच्या आड ना. पटेल यांचें बिल येत नाही. आणि हें बिल केवळ अनुज्ञापूर्वक असल्यामुळें तें त्यांच्या आड येईल, अशी समजूत वास्तविकरीत्या कोणाचीही होण्याचें कारण नाही. ही गोष्ट अगदीं धडधडीत असतां केसरीकारांनी खोटीच समजूत करून घेऊन लोकांच्या डोळ्यांत धूळ घालण्याचा प्रयत्न करावा हें त्यांना बिलकूल शोभत नाही. परंतु ज्याना ना. पटेल याच्या बिलाविरुद्ध येनकेन प्रकारेण सामान्य लोकमत क्षुब्ध करावयाचं आहे त्यांनी असला प्रयत्न केल्यास त्यांत आश्चर्य तें कसलें ? केसरीकार म्हणतात की, ब्राह्मण व क्षत्रिय यांना आपलें बीज धर्मदृष्ट्या शुद्ध व निर्दोष रहावें अशी उत्कट इच्छा असेल तर त्यांनी ह्या बिलाचा निषेध केला पाहिजे. केसरीकाराची धर्माची कल्पना काय आहे हें त्यांनी आपल्या लेखांत सांगितलें नाहीं. परंतु त्यांच्या एकंदर धोरणावरून ती काय असावी ह्याबद्दल कोणासही अनुमान काढतां येण्यासारखें आहे. भिन्नभिन्न जातींत विवाह झाल्यानें ब्राह्मण व क्षत्रिय यांचें बीज धर्मदृष्ट्या अशुद्ध व सदोष होईल हे मत पुराणमताभिमानी लोकांना कितीही पसंत असलें तरी तें खऱ्या धर्माच्या आणि नीतीच्या अगदीं विरुद्ध आहे, याबद्दल समंजस व विचारी मनुष्याला यत्किंचितही शंका वाटणार नाही. हिंदुस्थानांतील ब्राम्हण जितके आर्य आहेत, तितकेच हिंदुस्थानांतील क्षत्रियही आर्य आहेत. ब्राह्मणच तेवढे आर्य आहेत, आणि ब्राह्मणेतर सर्व हिंदु अनार्य आहेत असें कोणीही म्हणत नाहीं; आणि तसें म्हणणारा एखादा वेडा पीर निघाल्यास त्याच्या म्हणण्याला कोणी यत्किंचितहि किंमत देणार नाहीं. ब्राह्मणेतर अनार्य आहेत ह्या म्हणण्याला आधार नाही. ब्राह्मणेतरांत अनार्यांचं मिश्रण झालें असेल तर त्या मिश्रणापासून ब्राह्मण अगदी मुक्त आहेत असें कोणी म्हणूं शकेल काय ! आर्यानार्यांचें मिश्रण प्रत्येक जातींत झालें आहे किंवा नाही, झालें असल्यास तें कितपत झालें आहे, हा प्रश्न इतका बिकट आहे की, तो सोडविणें अशक्य आहे. आणि ब्राह्मण फक्त आर्य आहेत, बाकीच्या जातींत अनार्यांचें कमीजास्त प्रमाणानें मिश्रण झालें आहे हें मत उपलब्ध माहितीच्या विरुद्ध आहे, इतकेंच नव्हे तर, असल्या प्रकारचें मत अहंकारानें प्रतिपादन केल्यानें ब्राह्मणेतर जातींचीं मनें विनाकारण दुखविली जातील. तव्हां ब्राह्मण हे आर्य आणि ब्राह्मणेतर अनार्य आहेत ह्या मुद्यावर सर्व भिस्त ठेवून भिन्नभिन्न जातींत विवाह करणें योग्य नाहीं असें म्हणणें हें च-

## दुसरी गोष्ट.

यासंबंधानें दुसरी महत्त्वाची गोष्ट लक्षांत घेण्यासारखी आहे ती ही कीं, नेपाळसारख्यां संस्थानांत भिन्नभिन्न जातींतील विवाह पूर्णपणें कायदेशीर समजण्यांत येतात. वरिष्ठ कायदेकौन्सिलांत बिलावर झालेल्या वादविवादांत ना० डॉ. सप्रू यांनीं ही गोष्ट स्पष्टपणें सांगितलेली आहे. नेपाळ संस्थान फारसें प्रागतिक आहे असें म्हणतां येणार नाहीं. आर्यांच्या कांहीं प्राचीन संस्था व रूढी तेथें अद्याप पूर्वीप्रमाणेंच आढळून येतात. नेपाळांतील हिंदु लोकांना भिन्नभिन्न जातीतील विवाह कायदेशीर वाटावे तर हिंदुस्थानांतीलच हिंदु लोकांनीं ते बेकायदेशिर कां मानावे हें आम्हास समजत नाहीं. जी गोष्ट नेपाळांत प्रचलित आहे तिला हिंदुस्थानांतील सुशिक्षित लोकांनीं हरकत घ्यावी ही आश्चर्याची गोष्ट आहे. भिन्नभिन्न जातींत विवाह करणें नेपाळांत जर हिंदुधर्मशास्त्राविरुद्ध समजण्यांत येत नाहीं तर हिंदुस्थानांतच तसें कां समजण्यांत यावें ? नेपाळांतील हिंदु लोकांना हिंदुधर्माचा कमी अभिमान वाटतो असें नाहीं, किंबहुना ते हिंदुस्थानांतील हिंदु लोकांपेक्षां अधिक कट्टे धर्माभिमानी आहेत हें ज्यांना नेपाळाची माहिती आहे ते सर्वजण कबूल करतील. ना० पटेल यांच्या बिलाचा विचार करितांना या सर्व गोष्टींचा विचार करण्यात आला पाहिजे.

## ना. पटेल यांच्या बिलांत अंतर्भूत असलेला मुख्य प्रश्न.

ना. पटेल यानी आपल्या बिलाच्या समर्थनांत आपल्या भाषणांत अनेक कारणें दिलेली आहेत; परंतु आमच्या मतें तीं बहुतेक गौण आहेत. मुख्य मुद्दा हा आहे कीं, हिंदुस्थानांत प्रचलित असलेली जातिसंस्था इष्ट आहे किंवा अनिष्ट आहे, हितकारक आहे किंवा अहितकारक आहे ? ना० पटेल यांच्या बिलांत मुख्य प्रश्न जो अंतर्भूत होतो तो हाच आहे. ज्यांना जातिसंस्था पसंत आहे त्यांनीं नामदार पटेल यांच्या बिलाला विरोध करावा हें साहजिक आहे. परंतु जातिसंस्था खरोखर चांगली आहे किंवा वाईट आहे, तिच्यामुळें हिंदुस्थानचें कल्याण होत आहे किंवा नुकसान होत आहे, याचा प्रत्येक विचारशील माणसानें विचार करावयास नको काय ? जातिसंस्थेची उत्पत्ति कशी झाली, हिंदुस्थानाच्या उत्क्रांतिला तिजमुळें मदत झाली किंवा नाहीं इत्यादि प्रश्नांचा सध्यां विचार करण्याचें कारण नाहीं. एकाद्या संस्थेची उत्पत्ति चांगली असेल, कांहीं वेळपर्यंत समाजाच्या विशिष्ट परिस्थितींत ती अंशतः हितावह झाली असेल,

परंतु तितक्यावरून ती आजहि हितावह आहे व म्हणून ती कायम ठेवली पाहिजे असें अनुमान निघत नाही. सर्व गोष्टींचा विचार करून जातिसंस्था इष्ट व हितावह आहे काय ? याचा विचार प्रत्येकानें केला पाहिजे. जातिभेद अत्यंत अपायकारक असून त्यामुळें हिंदुस्थानच्या प्रगतीला अडथळे उत्पन्न होतात, असें सर्व विचारशील लोकांना वाटत आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. हिंदुसमाजाचे जे विचारशील व वजनदार पुढारी आहेत, त्या सर्वांचा अभिप्राय असाच आहे. हिंदु धर्माची वृथा प्रौढी मिळविणारे व हिंदु धर्मावर संकट आलें आहे, अशी वेळीं अवेळीं ओरड करणारे असे जे हिंदु लोक आहेत, त्यांपैकींहि पुष्कळांना जातिसंस्था खरोखर संमत नाहीं. पोटजाती नष्ट कराव्या, परंतु मुख्य चार जाती कायम ठेवाव्या असें म्हणणारे पुष्कळ सुशिक्षित हिंदु कांहीं वर्षांपूर्वीं आढळण्यांत येत असत. १८९५-९६ सालीं जेव्हां हिंदुस्थानांत थिऑसॉफिकल सोसायटीचा प्रसार होऊं लागला, त्यावेळीं हें मत बरेंच लोकप्रिय झालेलें होतें. परंतु आज या मताचेंही प्राबल्य कमी झालेलें असून जातिसंस्था समूळ नष्ट झाल्याशिवाय हिंदुस्थानची खरी राष्ट्रीय प्रगति होणार नाही, असें विचारशील माणसांना अधिकाधिक वाटूं लागलें आहे. मत १९१७ च्या डिसेंबरच्या **भारतसेवकाच्या** अंकांत आम्ही सर रवींद्रनाथ टागोर यांचा अभिप्राय दिला आहे. त्याचें आमच्या वाचकांनीं पुनः पुनः मनन करावें, अशी आमची त्यांना विनंति आहे. या मुद्याचें अधिक विवेचन करण्याचें कारण नाहा. प्रत्येकापुढें मुख्य प्रश्न उभा आहे तो हाच कीं, जातिसंस्था हितकारक आहे किंवा अपायकारक आहे. या मूलभूत प्रश्नाचा प्रत्येकानें निर्विकार मनानें विचार केला पाहिजे. जातिसंस्था इष्ट असून तिजपासून हिंदुस्थानचें कल्याणच होईल, अशी ज्यांची प्रामाणिक समजूत आहे, त्यांनीं बेलाशक ना. पटेल यांच्या बिलाला विरोध करावा; मात्र तो करितांना आम्हांला जातिसंस्था पसंत आहे व ती कायम राखली पाहिजे हें आपलें मत त्यांनीं निर्भीडपणें जाहीर करण्यास चुकूं नये. परंतु ज्यांना जातिसंस्था नापसंत असेल त्यांनीं ना. पटेल यांच्या बिलाला विरोध करण्याकरितां एखादी पोकळ सबब पुढें आणावी, हें अत्यंत लांच्छनास्पद आहे. ज्यांना जातिसंस्था पसंत नाहीं, त्यांनीं ह्या बिलाचें समर्थन करावें हें त्यांचें पवित्र कर्तव्य आहे. आमच्यामध्यें विचारभीरुता इतकी भरली आहे कीं, कित्येक लोक एखाद्या महत्त्वाच्या प्रश्नाचा मनापासून विचारच करीत नाहीत. त्यांना बौद्धिक अंधताच प्रिय असते.

ही बौद्धिक अंधता राष्ट्रीय प्रगतीला अत्यंत अपायकारकआहे. व ती पुष्कळ कमी झाल्याशिवाय हिंदु लोकांत आलेली मानसिक दुर्बलता नष्ट होणार नाहीं. अगोदरच मन जात्याच दुर्बळ; तेव्हां विचारांप्रमाणें कृति करणाऱ्यांची संख्या अगदींच अल्प असल्यास नवल नाहीं या जातिभेदाच्या प्रश्नासंबंधानें हिंदु समाजाची जवळ जवळ अशीच स्थिति झाली आहे. जातिसंस्थेचा हिंदु समाजावर इतका पगडा बसला आहे कीं, ती चांगली आहे किंवा वाईट आहे याचा विचार करणारे फारच थोडे लोक आहेत. कित्येकांच्या मनांत तिच्या चांगलेपणाबद्दल प्रसंगोपात संशय उत्पन्न होतो, परंतु तो उत्पन्न झाल्याबरोबर ते त्याला जाणूनबुजून दाबून टाकण्याचा प्रयत्न करितात. कित्येकांना ती अहितकारक वाटते, परंतु ती नष्ट करितां येईल अशी त्यांना बिलकुल आशा वाटत नाहीं व म्हणून आहे त्याच मार्गानें ते जात असतात. कित्येकांना हिंदु धर्माचा पोकळ अभिमान वाटत असतो आणि जातिसंस्था ही त्या धर्माचें अवश्य अंग आहे अशी त्यांची समजूत झालेली असते. याशिवाय आणखी एक असा वर्ग आहे की, जातिसंस्था ही त्याला अनिष्ट वाटते इतकेंच नव्हे तर ती नाहीशी करितां येण्यासारखीहि आहे अशी त्याची खात्री असते. परंतु त्यांची इच्छाशक्ति ( Will power ) इतकी दुर्बळ असते कीं, विचाराप्रमाणें त्यांच्या हातून बिलकुल आचरण होत नाहीं. अशी वस्तुस्थिति असल्यामुळें हा जातिभेदाचा प्रश्न जरी अत्यंत महत्त्वाचा आहे, तरी तो अद्याप मागें राहिलेला आहे, आणि त्याचा समाधानकारक निकाल झालेला नाहीं. परंतु आम्ही आमच्या देशबांधवांना असें विचारतों कीं, ही स्थिति तुम्ही अशीच राहूं देणार काय? जर जातिभेदाचा प्रश्न अत्यंत महत्त्वाचा आहे, त्याचा हिंदुसमाजाच्या कल्याणाशीं आणि हिंदुस्थानच्या सर्वांगीण प्रगतीशी निकट संबंध येत आहे, त्याच्या योग्य व समाधानकारक निकालावर हिंदुस्थानच्या वैभवाची इमारत उभारणें किंवा न उभारणें हें जर अवलंबून आहे, तर या प्रश्नाचा बुद्धिपुरःसर शक्य तितका लवकर निकाल लावणें अवश्य नाहीं काय? मानसिक दुर्बलता आतां पुरे झाली. येईल त्या प्रवाहाबरोबर वाहात जाण्याची जी प्रवृत्ति हिंदुसमाजांत रूढ झालेली दिसून येते ती टाकून दिली पाहिजे. हा प्रश्न जरी बिकट असला तरी तो हातीं घेतला पाहिजे, आणि त्याचा समाधानकारक निकाल लावला पाहिजे, याशिवाय गत्यंतर नाहीं हें प्रत्येक हिंदूनें लक्षांत ठेविलें पाहिजे. जातिनिर्बंध मोडणें अवश्य आहे हाच जर या प्रश्नाचा

खरा निकाल आहे तर ना. पटेल यांच्या बिलाचें समर्थन करणें अवश्य होत नाहीं काय ? ज्या पुराणप्रिय लोकांना किंवा लोकच्छंदानुवर्ती अहंमन्य स्वनियुक्त पुढाऱ्यांना ना. पटेल यांचें बिल पास होऊं नये असें वाटत असेल, ते गौण आणि अप्रस्तुत प्रश्न उपस्थित करून लोकांच्या डोळ्यांत धूळ घालण्याचा प्रयत्न करतील; परंतु असले प्रयत्न यशस्वी न होऊं देण्याकरितां प्रत्येकानें जपलें पाहिजे, आणि जातिभेद इष्ट आहे किंवा अनिष्ट आहे हा एक प्रश्न डोळ्यांपुढें ठेवून प्रत्येकानें आपलें धोरण ठरविलें पाहिजे.

## आक्षेप.

ना. पटेल यांच्या बिलासंबंधानें पहिला आक्षेप असा घेण्यांत येतो कीं, भिन्न भिन्न जातींतील विवाह हिंदुधर्माच्या विरुद्ध आहेत. हा आक्षेप घेणारांची अशी समजूत आहे कीं, जातिसंस्था ही हिंदु धर्माचें अवश्य अंग आहे, आणि म्हणून जातीजातींतील विवाह जातिसंस्थेच्या विरुद्ध असल्यामुळे ते हिंदुधर्माच्याहि विरुद्ध आहेत. हिंदुधर्माचीं अवश्य अंगें कोणती, जातिसंस्था अवश्यक अंग आहे किंवा काय इत्यादि प्रश्नांचा हिंदुधर्माचें शास्त्रीय पद्धतीनें अध्ययन करणारांनीं विचार केलेला आहे; आणि जातिसंस्था हिंदुधर्माचें अवश्य अंग नाहीं हेंच मत त्यांपैकीं बहुतेकांनीं प्रस्थापित केलें आहे. लो० टिळक यांनीं हिंदुधर्माची जी व्याख्या केली आहे तींत त्यांनीं जातिभेदाचा अंतर्भाव केलेला नाहीं. ती व्याख्या अशी:—

> प्रामाण्यबुद्धिर्वेदेषु साधनानामनेकता ॥
> उपास्यानामनियमः एतद्धर्मस्य लक्षणम् ॥

लोकमान्यांनीं हिंदु धर्माची केलेली ही व्याख्या अगदीं बरोबर आहे आणि तिजवरून प्रत्येकाच्या लक्षांत येईल कीं जातिसंस्था हिंदु धर्माचें अवश्य अंग नाहीं. आणि हें अगदीं साहजिकच आहे. धर्माचें क्षेत्र काय याचा जो कोणी नीट विचार करील त्याच्या लक्षांत हें आलेंच पाहिजे कीं, जातिभेद हें धर्माचे अवश्य अंग होणें अशक्य आहे. कोणत्याहि धर्मांत मानवी जातीचें ऐक्यच प्रतिपादिलें आहे. वास्तविक पाहतां खऱ्या धर्मांत भेद, विषमता इत्यादिकांना थारा नाहीं. जातिसंस्था ही अर्थातच भेदावर रचलेली आहे, आणि भेद हे नैसर्गिक नसून कृत्रिम आहेत. जिचा पायाच कृत्रिम भेद ती जातिसंस्था धर्माचें अवश्य अंग कसें होऊं शकेल ? शिवाय, हिंदुधर्म हा फार प्राचीन असून वैदिक काळांत जा-

तिभेद नव्हते ही गोष्ट सर्वांना मान्य आहे. वैदिक काळांत हिंदुधर्म नव्हता असें नाहीं आणि त्या वेळीं जर जातिभेद नव्हते तर ते हिंदुधर्माचें अवश्यक अंग आहे असें कसें म्हणतां येईल ! परंतु **या प्रश्नाचा याहीपेक्षां अधिक व्यापक रीतीनें विचार केला पाहिजे.** क्षणभर असें जरी मानलें कीं, जातिसंस्था हिंदुधर्माचें अवश्य अंग आहे तरी त्यावरून ती जर अपायकारक होत असली तर ती नाहींशी करूं नये असें अनुमान निघत नाहीं. हिंदुधर्माची योग्यता आम्ही पूर्णपणें जाणून आहोंत. आम्हांला त्याबद्दल कमी अभिमान वाटतो असें नाहीं; परंतु कोणताहि धर्म जरी घेतला तरी तो निर्दोष आहे, त्यांत सुधारणा करण्याला अवसर नाहीं असें म्हणणें चुकीचें आहे. धर्माचीहि उत्क्रांति होत जाते आणि त्यांत देशकालपरिस्थित्यनुरूप सुधारणा कराव्या लागतात. हिंदुधर्माची अशीच उत्क्रांति होत गेलेली आहे आणि आपली नवीन परिस्थिति, नूतन आकांक्षा, नूतन ध्येयें हीं सर्व लक्षांत घेऊन हिंदुधर्मांतहि इष्ट त्या सुधारणा करण्याला आपण तयार असलों पाहिजे. जातिसंस्था हिंदुधर्माचें अवश्यक अंग आहे हा सिद्धांत जर बरोबर असेल, तर तें अंग जरी अवश्यक असलें तरी तें अपायकारक असल्यामुळें तें नष्ट करून हिंदुधर्माची सुधारणा केली पाहिजे. आणि ती करितांना त्याच्या पुरातनत्वाकडे किंवा त्याच्या एके काळच्या उपयुक्ततेकडे लक्ष देतां कामा नये ! प्राचीन काळीं नवीन नवीन धर्मकार व शास्त्रकार होऊन त्यांनीं इष्ट त्या सुधारणा केल्या. आजच्या नवीन कालांत आम्ही आमच्या धर्मांत इष्ट त्या सुधारणा कां करूं नयेत ! हिंदुधर्मांत जे दोष आपणाला आढळून येतात ते आपण काढून कां टाकूं नयेत ! त्यांत ज्या सुधारणा करणें अवश्य आहे असें आपणांस वाटतें त्या आपण कां करूं नयेत ! धर्मांत योग्य त्या सुधारणा करणें हें बुद्धीच्या सजीवतेचें लक्षण आहे; आणि हिंदुधर्मांत कांहीं दोष ढळढळीत दिसत असतां आपण ते काढून टाकण्याचा प्रयत्न केला नाहीं तर आपली बुद्धि निर्जीव झालेली आहे असेंच म्हणावें लागेल. जातिसंस्था हिंदुधर्माचें अवश्य अंग आहे असें जरी मानलें तरी तें अंग आमच्या कल्याणाच्या व प्रगतीच्या आड आज येत असल्यामुळें तें काढून टाकून हिंदुधर्म अधिक शुद्ध व शक्तिमान् करणें हें हिंदूंचें पवित्र कर्तव्य आहे.

## ना० खापर्डे यांचे विचार.

यासंबंधानें ना. खापर्डे यांनीं कायदेकौन्सिलांत बिलावर भाषण करितांना व्यक्त केलेले विचार मननीय आहेत. ते म्हणाले " भिन्नभिन्न जातींतील विवाह कायदे-

शीर ठरविल्यानें हिंदुधर्मशास्त्राचें जें पूर्वापार धोरण चालत आलें आहे तेंच अमलांत आणण्यांत येईल...... हिंदुधर्माचा ज्या ज्या भिन्नधर्मीयांशीं संबंध आला त्यांना हिंदुधर्मानें आपल्यांत घेण्याला वाव ठेविली आहे. जे लोक हिंदुधर्म सोडून गेले आहेत त्यांच्याशी तो फटकून वागत नाहीं. जर कोणाला जुने संस्कार आवडत नसतील तर तो त्यांना ते सोडून देण्याला परवानगी देतो. " हिंदुधर्माच्या व्यापक व उदार स्वरूपविषयीं ना० खापर्डे यांनी हे जे विचार व्यक्त केले आहेत त्यांत बरेंच तथ्य आहे. हिंदुधर्माचा पाया जातिभेदावर रचलेला नसून कांहीं सनातन, नैतिक तत्त्वांवर रचिलेला आहे. हिंदुसमाजाची रचनाच जातिभेदांवर अवलंबून आहे अशी कांहीं लोकांची समजूत आहे. हिंदुधर्माचा आणि हिंदुसमाजाचा वरवर विचार करणाऱ्यांची अशी समजूत झाल्यास नवल नाहीं. परंतु हिंदु धर्माचा व समाजाचा खोल रीतीनें विचार केल्यास ती चुकीची आहे असें कोणाच्याही लक्षांत येईल. जातिसंस्था नष्ट झाल्यानें हिंदुधर्म नाहीसा होणार नाहीं व हिंदु समाजही रसातळास जाणार नाहीं. हिंदुधर्माचीं जीं अवश्य तत्त्वें आहेत तीं मान्य करण्याला व त्याप्रमाणें आचरण ठेवण्याला जातिसंस्था बिलकूल अवश्य नाहीं. किंबहुना असें म्हणण्यास हरकत नाहीं कीं, हिंदुधर्माच्या उच्चतम तत्त्वांची प्रचीति घेण्याला जातिभेदांतील विषमता ही सोडूनच दिली पाहिजे. जो मनुष्य जातिभेदांत गुरफटलेला आहे त्याला हिंदुधर्माच्या उदात्त तत्त्वांचा कधींही अनुभव येणार नाहीं. तसेंच हिंदुसमाज कायम राखण्यालाही जातिभेद अवश्य नाहीं. अशी कल्पना करा कीं हिंदुसमाजांतील जातिभेद आज अजीबात नाहींसे झाले. अशी स्थिति झाली म्हणजे हिंदुसमाज नष्ट होईल असें मानण्याला आधार काय ! जातिभेद नाहींसे झाले म्हणजे हिंदुधर्माचीं सनातन तत्त्वें नाहींशीं होत नाहींत. कांहींही झालें तरी तीं तत्त्वें नाहींशीं होणार नाहींत. तीं इतकीं उदात्त व सत्य आहेत कीं, तीं कोणत्याही काळांत व परिस्थितींत अबाधितच राहणार; आणि जोंपर्यंत तीं तत्त्वें अबाधित आहेत तोंपर्यंत हिंदुसमाज म्हणजे तीं तत्त्वें मान्य करणारा समाज हाही कायमच राहणार. जातिभेद नष्ट झाल्यानें हिंदु लोक आपल्या धर्माचीं सनातन व आवश्यक तत्त्वें सोडून धर्मांतर करतील आणि म्हणून सरतेशेवटीं हिंदुधर्म जगांतून नाहींसा होईल असें कोणास वाटत असेल तर तें अगदी चुकीचें आहे. हिंदुधर्माच्या नैतिक व अध्यात्मिक तत्त्वांचा पाया बौद्धिक दृष्ट्या इतका मजबूत आहे कीं, तो हिंदुसमाजपद्धति बदलल्यानें यत्किंचितही

डळमळणार नाहीं, किंबहुना समाजपद्धतींत कालपरिस्थित्यनुरूप फेरबदल केल्यानें त्या तत्त्वांची क्रिया अधिक जोरदार रीतीनें होईल. सारांश, हिंदुधर्म व हिंदुसमाज यांचें अस्तित्व जातिभेदांवर अवलंबून आहे ही कल्पना अगदीं चुकीची असून अपायकारक आहे. ना॰ पटेल यांचें बिल कित्येकांना पसंत नसण्याचें कारण ही चुकीची समजूत होय. परंतु, जातीजातींत विवाह झाल्यानें हिंदुधर्माच्या एकही मुख्य तत्त्वाला बाध येणार नाही किंवा हिंदुसमाजाच्या तत्त्वाला यत्किंचितही अपाय होणार नाहीं हें प्रत्येकानें लक्षांत ठेवावें. ज्यांच्यामध्यें जातिभेद नाहींत असे शेंकडों समाज पृथ्वीतलावर आहेत किंबहुना ज्यांच्यांत जातिभेद आहे असा हा एकटाच हिंदुसमाज आहे. जातिभेद नसूनही शेंकडों समाज जर अस्तित्वांत आहेत, इतकेंच नव्हे तर ते प्रागतिक असून सामर्थ्यवान् झालेले आहेत, तर हिंदुसमाजाच्या अस्तित्वाला किंवा त्याच्या मोठेपणाला जातिभेद कां अवश्य असावेत हें समजणें अशक्य आहे. जातिभेदाशिवाय हिंदुसमाजाचें अस्तित्व राहणार नाहीं किंवा त्याचा मोठेपणा टिकणार नाहीं, असें कोणी सिद्ध करूं शकेल काय ? इतर समाजापेक्षां हिंदुसमाजांत कांहीं विशेष आहे आणि तो विशेष जातिभेदावर ( हिंदुधर्मावर नव्हे ) अवलंबून आहे, असें जोंपर्यंत कोणास सिद्ध करतां येणार नाही तोंपर्यंत जातिभेद अवश्य आहेत, ते हितकारक आहेत, वगैरे अविचारमूलक विधानें करण्यांत बिलकूल अर्थ नाहीं. तेव्हां एकंदरीनें आमच्या वाचकांस आमचें असें सांगणें आहे कीं, जातिसंस्था हिंदुधर्माचें अवश्य अंग आहे, ती नष्ट झाल्यानें तो धर्म नाहींसा होईल, किंवा हिंदुसमाजच नष्ट होईल, इत्यादि कल्पना अजिबात चुकीच्या आहेत.

ना॰ पटेल यांच्या बिलाच्या विरुद्ध जो मुख्य आक्षेप घेण्यांत येतो तो किती पोकळ व निराधार आहे हें आम्हीं दाखविलें आहे. याखेरीज दुसरे जे आक्षेप घेण्यांत येतात ते किरकोळ आहेत. कांहीं दिवसांपूर्वी या विषयावर केसरींत एक अग्रलेख आला होता. त्यांत ना॰ पटेल यांचें बिल झाल्यास सगोत्र व सप्रवर विवाह होतील असा आक्षेप घेण्यांत आलेला आहे.

## केसरीचें धोरण.

ना॰ पटेल यांच्या बिलासंबंधानें केसरीचें धोरण पाहून कोणासहि विषाद वाटल्यावांचून राहणार नाहीं. केसरी ना॰ बसू यांच्या बिलाला अनुकूल होता, परंतु तो ना॰ बसूंच्या बिलापेक्षां कमी व्यापक असलेल्या ना॰ पटेल यांच्या

बिलाच्या विरुद्ध आहे. हें स्थित्यंतर आश्चर्य करण्यासारखें आहे असें समजण्याचें कारण नाहीं. ना० बसूंच्या बिलाच्या वेळीं केसरीचे संपादक श्री. न. चिं. केळकर हे होते. हल्लीं केसरीचीं सूत्रें श्री. कृ. प्र. खाडिलकर यांच्या हातांत आहेत. संपादक बदलल्याबरोबर वर्तमानपत्राचें धोरण बदलावें यांत आश्चर्य नाही. तथापि केसरीच्या वाचकांनी त्या पत्रांत ना० पटेल यांच्या बिलाविषयीं जे लेख आले आहेत किंवा पुढें येतील त्यांचें संपादकत्व कोणाकडे आहे हें लक्षांत घेऊन त्यांनी आपला गैरसमज होऊं देऊं नये एवढी त्यांना इषारत देणें अवश्य आहे असें आम्हांस वाटतें. केसरींतील विचार बाबावाक्यं प्रमाणम् ह्या न्यायानें प्रमाणभूत मानण्याची पुष्कळांना संवय लागून गेलेली आहे व त्याचा परिणाम असा झाला आहे की, केसरींतील विचार कोणाच्या लेखणींतून उतरतात हे पुष्कळ लोक पहात सुद्धां नाहीत. तें कसेंहि असो; केसरीसारख्या वजनदार वर्तमानपत्रांत पटेल बिलासंबंधानें जे वेडगळ विचार व्यक्त करण्यांत आले आहेत त्यामुळें त्याचें वजन पुष्कळ अंशी कमी झाल्यावांचून राहणार नाहीं. ना. पटेल यांच्या बिलाविरुद्ध आक्षेप घेतांना केसरीकार (हल्लींचे कां असेनात) इतके पोचट विचार व्यक्त करतील अशी कोणाचीहि कल्पना झाली नसेल. त्यांचा आक्षेप असा आहे की ना० पटेल यांचें बिल जर पास झालें तर सगोत्र विवाह होतील व सगोत्र विवाह वैद्यकदृष्ट्या व नैतिकदृष्ट्या अपायकारक आहेत. केसरीकार म्हणतात "ऋषींनी सगोत्र व सप्रवर विवाह निषिद्ध ठरविले याची उपपत्ति पाहूं जातां वैद्यकदृष्ट्या बसूं शकेल व मानवशास्त्रदृष्ट्याहि बसूं शकेल असें आम्हांस वाटतें. एकाच कुटुंबांत विवाह केल्यापासून अनुवंशिक रोग वाढतात असा विवाहशास्त्रकारांचा सिद्धांत आहे. अनेक उदाहरणांवरून ही गोष्ट सप्रमाण सिद्ध झाली आहे. पण आम्हांस वाटतें त्या सिद्धांताची पुष्टी घेण्याची अवश्यकता नाही. **श्रद्धायुक्त हिंदु लोकांच्या दृष्टीनें ऋषीनें जें विवाहशास्त्र घालून दिलेलें आहे तें युक्त आहे कीं प्रयुक्त आहे हें पहावयाची अवश्यकता नाहीं**....ऋषिप्रणीत सगोत्र सप्रवर निर्बंध कोणत्या तत्त्वावर घातला आहे याची मिमांसा करीत बसण्याची अवश्यकता नाहीं." येणेंप्रमाणें सगोत्र किंवा सप्रवर विवाहाबद्दल केसरीनें चर्पटपंजरी केली आहे. केसरीकारांनीं असेंहि म्हटलें आहे की, स्वसंमतितत्त्वाचा उपयोग केला आणि अर्थात् नवीन पद्धतीनें बोलावयाचें तर ब्राह्मणक्षत्रियांचें मत घेतलें तर हें बिल सर्वतोपरी अमान्य ठरेल. आणि नंतर आपल्या लेखाच्या शेवटीं केसरीकारांनी अशी आग्रहाची विनंति केली आहे कीं,

"ब्राह्मण व क्षत्रिय यांना आपलें बीज धर्मदृष्ट्या शुद्ध व निर्दोष रहावें अशी उत्कट इच्छा असेल तर त्यांनीं या बिलाचा निषेध सर्व देशभर लौकरच केला पाहिजे." वरील विचार इतके पोंचट आहेत कीं, जर ते दुसऱ्या एखाद्या वर्तमानपत्रांत व्यक्त झाले असते तर त्याकडे कोणीं ढुंकुनही पाहिलें नसतें. परंतु केसरीसारख्या वर्तमानपत्रांत ते प्रसिद्ध झाले असल्याकारणानें महाराष्ट्रांतील हजारों वाचकांची दिशाभूल होण्याचा संभव आहे, व म्हणून त्यांतील पोचटपणा उघडकीस आणणें अवश्य आहे. सगोत्रसप्रवर विवाह निषिद्ध समजण्यांत कांही तत्त्व आहे की नाही हा प्रश्न सध्यां आपण बाजूला ठेवूं. असे विवाह निषिद्ध मानण्याला जी कारणें सामान्यतः देण्यांत येतात ती सर्व बरोबर आहेत असें जरी क्षणभर गृहीत धरलें तरी हा आक्षेप ना. पटेल यांच्या बिलाला लागू पडत नाही. ब्राह्मण–क्षत्रिय वगैरे वरिष्ठ जातींतील विवाह कायदेशीर समजण्याला सध्यां ज्या अटी अवश्य आहेत त्यापैकी दोन येणेंप्रमाणें आहेत. (१) ते विवाह भिन्न जातींतील असतां कामा नयेत. (२) ते सगोत्र असतां कामा नयेत. सगोत्र विवाह आज कायदेशीर समजण्यांत येत नाहीत. हिंदुस्थानांतील वरिष्ठ जातींत होणाऱ्या विवाहांच्या कायदेशीरपणाला अवश्य लागणारी ही दुसरी शर्त काढून टाकावी असें ना० पटेल यांचें बिलकूल म्हणणें नाहीं, व त्याप्रमाणें त्यांच्या बिलांत योजनाहि केलेली नाहीं. पहिला निषेध काढून टाकण्याचा त्यांचा फक्त प्रयत्न आहे. जातीजातींतील विवाह कायदेशीर ठरविल्यानें सगोत्र विवाह कायदेशीर ठरले जाणार नाहींत किंवा सगोत्र विवाह होतीलच असें नाही. एकाच जातींतील सगोत्र विवाह आज जितके कायद्यांनीं निषिद्ध आहेत, तितकेच भिन्नभिन्न जातींतील सगोत्र विवाह निषिद्ध होतील. जे लोक सगोत्र विवाहाच्या इतके विरुद्ध आहेत कीं, त्याना ते यत्किंचितही रुचणार नहीत त्यांच्या आड ना. पटेल यांचें बिल येत नाही. त्यांनीं भिन्नभिन्न जातींत विवाह करितांना हल्लीप्रमाणेंच वधूवरांची गोत्रें पाहण्याला हरकत नाहीं. गोत्र एकच असल्यामुळें जर दोन ब्राह्मण कुटुंबांना परस्पर विवाहसंबंध करण्याला हरकत वाटत असेल तर दोन भिन्न जातींतील कुटुंबांनाही तशीच हरकत वाटल्यास त्यांना भिन्न जातींतील भिन्न गोत्र पाहून लग्नसंबंध जुळवून आणण्याला हरकत नाहीं. सारांश, सगोत्र विवाहाचा प्रश्न हा अगदीं स्वतंत्र आहे, आणि भिन्न जातींत विवाह झाल्यानें सगोत्र विवाहसंबंधाचा निर्बंध टाकून द्यावा लागेल असें मानण्याचें कारण नाहीं. जे सगोत्र विवाह निषिद्ध मानतात त्यांच्या विचार-

स्वातंत्र्याच्या व व्यक्तिस्वातंत्र्याच्या आड ना. पटेल यांचें बिल येत नाहीं. आणि हें बिल केवळ अनुज्ञापूर्वक असल्यामुळें तें त्यांच्या आड येईल, अशी समजूत वास्तविकरीत्या कोणाचीही होण्याचें कारण नाहीं. ही गोष्ट अगदीं धडधडीत असतां केसरीकारांनीं खोटीच समजूत करून घेऊन लोकांच्या डोळ्यांत धूळ घालण्याचा प्रयत्न करावा हें त्यांना बिलकूल शोभत नाहीं. परंतु ज्यांना ना. पटेल यांच्या बिलाविरुद्ध येनकेन प्रकारेण सामान्य लोकमत क्षुब्ध करावयाचें आहे त्यांनीं असला प्रयत्न केल्यास त्यांत आश्चर्य तें कसलें ? केसरीकार म्हणतात कीं, ब्राह्मण व क्षत्रिय यांना आपलें बीज धर्मदृष्ट्या शुद्ध व निर्दोष रहावें अशी उत्कट इच्छा असेल तर त्यांनीं ह्या बिलाचा निषेध केला पाहिजे. केसरीकारांची धर्माची कल्पना काय आहे हें त्यांनीं आपल्या लेखांत सांगितलें नाहीं. परंतु त्यांच्या एकंदर धोरणावरून ती काय असावी ह्याबद्दल कोणासही अनुमान काढतां येण्यासारखें आहे. भिन्नभिन्न जातींत विवाह झाल्यानें ब्राह्मण व क्षत्रिय यांचें बीज धर्मदृष्ट्या अशुद्ध व सदोष होईल हें मत पुराणमताभिमानी लोकांना कितीही पसंत असलें तरी तें खऱ्या धर्माच्या आणि नीतीच्या अगदीं विरुद्ध आहे, याबद्दल समंजस व विचारी मनुष्याला यत्किंचितही शंका वाटणार नाहीं. हिंदुस्थानांतील ब्राम्हण जितके आर्य आहेत, तितकेच हिंदुस्थानांतील क्षत्रियही आर्य आहेत. ब्राह्मणच तेवढे आर्य आहेत, आणि ब्राह्मणेतर सर्व हिंदु अनार्य आहेत असें कोणीही म्हणत नाहीं; आणि तसें म्हणणारा एखादा वेडा पीर निघाल्यास त्याच्या म्हणण्याला कोणी यत्किंचितहि किंमत देणार नाहीं. ब्राह्मणेतर अनार्य आहेत ह्या म्हणण्याला आधार नाहीं. ब्राह्मणेतरांत अनार्यांचें मिश्रण झालें असेल तर त्या मिश्रणापासून ब्राह्मण अगदीं मुक्त आहेत असें कोणी म्हणूं शकेल काय ? आर्यानार्यांचें मिश्रण प्रत्येक जातींत झालें आहे किंवा नाहीं, झालें असल्यास तें कितपत झालें आहे, हा प्रश्न इतका बिकट आहे कीं, तो सोडविणें अशक्य आहे. आणि ब्राह्मण फक्त आर्य आहेत, बाकीच्या जातींत अनार्यांचें कमीजास्त प्रमाणानें मिश्रण झालें आहे हें मत उपलब्ध माहितीच्या विरुद्ध आहे, इतकेंच नव्हे तर, असल्या प्रकारचें मत अहंकारानें प्रतिपादन केल्यानें ब्राह्मणेतर जातींचीं मनें विनाकारण दुखविली जातील. तव्हां ब्राह्मण हे आर्य आणि ब्राह्मणेतर अनार्य आहेत ह्या मुद्यावर सर्व भिस्त ठेवून भिन्नभिन्न जातींत विवाह करणें योग्य नाहीं असें म्हणणें हें व-

स्तुस्थितीच्या अगदीं विरुद्ध आहे. आर्य व मांगोलियन इत्यादि ज्या अनार्य जाती आहेत त्यांच्यांत परस्पर विवाह झाल्यानें नुकसान होईल की काय हा प्रश्न आहे. आमच्या मतें भिन्नभिन्न जातींतील विवाह हितावह न होणें ही गोष्ट जातींच्या भिन्नत्वावर अवलंबून नसून त्यांच्या संस्कृतीच्या विषमतेवर अवलंबून आहे. दोन जातींची संस्कृति सामान्यतः जर सारखी असेल तर त्यांच्यामध्यें विवाह झाल्यानें यत्किंचितही नुकसान न होतां मानवी प्रगतीचें पोषणच होईल. उदाहरणार्थ, आफ्रिकेंतील नीग्रो लोक आणि हिंदूंच्या वरिष्ठ जाती ह्यांचे परस्परविवाहसंबंध जर अपायकारक झाले तर त्याचें कारण नीग्रो लोक आणि वरिष्ठ वर्गाचे हिंदु लोक हे भिन्न जातींचे आहेत हें नसून, त्यांच्या संस्कृतिविषयक दर्जांत सध्यां महदंतर आहे हें होय. शैक्षणिक प्रगतीनें व इतर कारणानें हें महदंतर जर नाहींसें झालें आणि नीग्रो लोकांचा आणि वरिष्ठ वर्गाच्या हिंदूंचा संस्कृतिविषयक दर्जा सामान्यतः सारखा झाला तर त्यांच्या परस्परविवाहसंबंधानें मानवी जातीच्या प्रगतीच्या दृष्टीनें यत्किंचितही नुकसान होणार नाहीं. एखादा वरिष्ठ वर्गाचा हिंदु वैवाहिक सुखाला लागणाऱ्या गोष्टीकडे दुर्लक्ष करून अज्ञानांत असलेल्या, व संस्कृतीच्या दृष्टीनें मागसलेल्या जातीच्या कुमारिकेशीं लग्न लावील तर नुकसान होईल हें खरें; परंतु त्याचें कारण वधूवर हीं भिन्न जातीचीं आहेत हें नसून त्यांचा संस्कृतिविषयक दर्जा अगदीं भिन्न प्रकारचा आहे हें होय. परंतु एखाद्या मागसलेल्या जातीच्या कुटुंबाची शैक्षणिक, नैतिक, संस्कृतिविषयक स्थिति जर सुधारली, आणि वरिष्ठ जातींतील कुटुंबाच्या आणि त्या कुटुंबाच्या दर्जातील अंतर नाहींसें झालें तर ह्या दोन कुटुंबांचा बेटीव्यवहार झाल्यानें नुकसान कां व्हावें हें आम्हांस समजत नाहीं. लग्न सुखावह होण्याकरितां सामान्यतः दर्जाची समानता व इतर ज्या गोष्टी लागतात त्या न जुमानतां भिन्न भिन्न जातींत विवाह करण्यांत यावे असें ना० पटेल यांचें म्हणणें नाहीं. त्यांच्या बिलाचा तसा रोंख नाही व त्या बिलाचा तसा परिणामही होणार नाहीं. विवाहसंबंध सुखावह होण्याकरितां ज्या गोष्टींची अवश्यकता असते, त्यांकडे जर कोणी दुर्लक्ष करीत असेल तर तें बहुधा नाइलाजास्तव करण्यांत येतें. स्वार्थाकरितां असें दुर्लक्ष करणाऱ्या व्यक्ती नाहींत असें नाहीं. परंतु प्रस्तुत प्रश्नाचा विचार करतांना त्या लक्षांत घेण्याचें कारण नाहीं. वैवाहिक सुखाला लागणाऱ्या गोष्टींकडे दुर्लक्ष करा असें

ना० पटेल यांचें बिलकूल म्हणणें नाहीं. त्यांच्या बिलाचें धोरण एवढेंच आहे कीं, ह्या गोष्टी भिन्न जातींतील वधूवरांच्यासंबंधानें आढळून आल्यास त्यांचा विवाहसंबंध होण्याला हरकत पडूं नये व असले संबंध कायद्यांनीं निषिद्ध समजण्यांत येऊं नयेत. ना. पटेल यांच्या बिलाचें खरें स्वरूप अशा प्रकारचें असल्यामुळें तें पास झाल्यास ब्राह्मण व क्षत्रिय यांचें बीज अशुद्ध व सदोष होईल, अशा प्रकारचा आक्रोश करणें हें कोणतीही सामाजिक सुधारणा झाली म्हणजे हिंदु धर्म बुडून जाईल अशा प्रकारची जी ओरड कांहीं जुने लोक नेहमी करीत असतात, तिच्याइतकीच अविचाराची व मूर्खपणाची आहे.